म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निर्वाह
सं. क्र. २११०



REFBK-0023252

मराठी ग्रंथ

ना :—खाली दि
तन केल्यास वर
ी भरावी ला

3 SEP 1
27 SE
24

19 JA

18 MA

3 AUG 19

4 JUL

मराठी ग्रंथ संग्रहालय मार्फ
२८८०
२३२५२
लिबंध
२८।८।

संदर्भ
निबंध
२८८०
23252
२८८८९

टिळक विचार

भा. कृ. केळकर

REFBK-0023252

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
अष्टभुजा रस्ता, पुणे ३०

प्रकाशन काल
प्रथमावृत्ती : १ मार्च १९८१
सर्व हक्क सुरक्षित
किंमत पंचेचाळीस रुपये
मुखपृष्ठ : सुभाष अवचट

मुद्रक :
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड, पुणे ३०

अनुक्रमणिका

१	लोकमान्य टिळकांचे विचारविश्व	१
२	भारतीय राष्ट्रवादाचे तत्त्वचिंतन	१३
३	राष्ट्रजागृतीचे माध्यम : राष्ट्रीय शिक्षण	४३
४	आर्थिक राष्ट्रवादाची पायाभरणी	७२
५	भारतातील लोकयुगाचा तत्त्वविचार	१०१
६	राजकीय असंतोषाची पेरणी	१२५
७	टिळकांच्या राजकीय मोहिमा	१४०
८	काँग्रेसला लढाऊ राजकारणाची दीक्षा	१६८
९	स्वराज्याचा मंत्रजागर	१९३
१०	टिळकांचे सामाजिक चिंतन	२२१
११	लोकव्यवहाराचे भारतीय तत्त्वज्ञान	२८९
१२	राष्ट्रसंजीवक विचारसंपदा	३०८

●



भूमिका

लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्वाचे आणि त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात केलेल्या कामगिरीचे आजपर्यंत अनेकांनी विश्लेषण केले आहे. काहींनी त्यांचे मूल्य-मापन करण्याचाही प्रयत्न केला आहे. भारतातल्या असंतोषाचे निर्माते, आधुनिक भारताचे एक शिल्पकार वगैरे विरुदे त्यांना लावली गेली आहेत. पण त्यांच्या समग्र जीवनाचा विचार केला की त्यांना लावली गेलेली ही विरुदे त्यांचे समग्र व्यक्तिमत्व समर्पक रीतीने व्यक्त करू शकत नाहीत, असे वाटते. त्यांचे आयुष्य हा एक प्रदीर्घ लढा होताच पण तात्कालिकाच्याही पलीकडे जाऊन शाश्वत अशा मूल्यांवर त्यांनी त्या लढ्याची उभारणी केलेली होती. भारतीय तत्त्वज्ञानाचे ते एक आधुनिक दार्शनिक होते, संशोधक होते. ही त्यांची प्रतिमा लोकांच्या कमी परिचयाची आहे. टिळकांच्या सर्व जीवनाला सुसंगत तात्त्विक अधिष्ठान होते. सर्व विचारांत एकात्मता होती. एक निश्चित दिशा होती. सतत वाहणारा एक वैचारिक अंतःप्रवाह होता. विचार व आचार यांच्यातही एकात्मता व सुसंगती होती. किंबहुना त्यांचे सारे व्यक्तित्वच असे एकात्म होते. टिळक समजून घ्यावयाचे असतील तर त्यांच्या त्या सर्व विचारांची पद्धतशीर मांडणी व्हावयास हवी. तशी करण्याच्या हेतूनेच 'टिळक विचार' या पुस्तकाचे लेखन मी हाती घेतले. टिळकांचे जीवनचरित्र हा भारतीय इतिहासाचा प्रेरणादायक तेजस्वी कालखंड आहे, तर त्यांचे विचार ही सतत उद्‌बोधन करणारी शक्ती आहे. टिळकांच्या लेखनात-भाषणात जे जे उद्‌बोधक, प्रेरक, मूलगामी, विचार त्यांनी वेळोवेळी मांडले तेच आधुनिक भारताचे एक राजकीय विचारपीठ (School of thought) किंवा तात्त्विक परिभाषेत 'दर्शन' आहे.

टिळकांच्या विचार-प्रतिपादनाला प्रारंभ होऊन शंभर वर्षे होऊन गेली आहेत. भारताचे राष्ट्र म्हणून पुनरुत्थान झाले पाहिजे हा टिळकांचा ध्यास होता. त्यांच्या राजकीय जीवनाचा तो ध्रुवतारा होता. त्या दृष्टीने टिळकांनी राजकीय प्रवास सुरू केला. राजकीय व्यूहरचना केली. त्या व्यूहरचनेचे स्वरूप, त्यांतील टप्पे समजून घेतले तर त्यांच्या विचारातील आवेश, आर्तता, सुसंगती समजू शकेल. 'टिळक

विचार ' या पुस्तकात हाच प्रयत्न केला आहे.

टिळकांच्या विचारावर त्यांचा काळ, त्यांचे व्यक्तित्व, त्यांच्या काळातील प्रभावी राजकीय-सामाजिक संकल्पना, ब्रिटिशांची भारताविषयीची नीती या सर्वांचा परिणाम झाला होता. तरीही ते सुसंगत गतिशील झाले.

टिळकांच्या राजकीय व्यक्तित्वाची व नेतृत्वाची जडण व घडण तीन अवस्थांमध्ये झाली. पहिली अवस्था स्वतःच्या व्यक्तित्वाचे व मतप्रणालीचे स्वरूप निश्चित करणे (Self-definition), दुसरी स्वतःची मते प्रस्थापित करण्यासाठी वाद करून, संघर्ष करून स्वमताचे अनुयायी निर्माण करणे, स्वतःचा ठसा उमटविण्याचा (Self-assertion) प्रयत्न करणे. तिसरी अवस्था समाजातील कार्यशक्ती व उत्साह स्वतःच्या उद्दिष्टासाठी संघटित करून स्वतःच्या ध्येयवादाचा व कल्पनांचा प्रभाव देशभर पाडणे. हे कार्यही अविरोधाने होत नाही. टिळकांनी स्वतःची अधिसत्ता लोकबळावर निर्माण केली. ब्रिटिशांना दहशत बसविली, समकालीन विरोधकांना सतत आव्हाने दिली. टिळकांची राजकीय समयज्ञता, गतिशीलता, आक्रमकता यासारखे त्यांच्या व्यक्तित्वाचे अनेक गुण त्यांच्या लिखाणात आढळतात. विचार व व्यक्तित्व यांची सुसंगती टिळकांइतकी कोणाही भारतीय पुढाऱ्यांत आढळत नाही.

टिळकांच्या राजकीय जीवनाचे राजकीय व्यक्तित्वाच्या वर उल्लेखिलेल्या तीन अवस्थांप्रमाणे कालदृष्ट्या तीन खंड पाडता येतील. त्या त्या काळातील त्यांचे राजकीय पवित्रे व राजकीय कार्यशैली बदलत होती. टिळक ध्येयवादी असले तरी स्वप्नरंजन करून त्या मृगजळामागे धावणारे पुढारी नव्हते. प्रत्यक्षनिष्ठ, वास्तववादी राजकीय नेते होते. टिळकांची संग्रामनीती, त्यांची राजकीय व्यूहरचना १८१८ ते १८८० या कालखंडातील घटनांमुळे घडवली गेली होती. नवे सामाजिक प्रबोधन, पाश्चात्त्य राजकीय विचार, भारताचा धर्मविचार या सर्वांमुळे तिचे स्वरूप ठरले. या दृष्टीने १८१८ ते १८८० हा कालखंड घोरणाच्या घडणीचा कालखंड मानला पाहिजे.

दुसरा कालखंड १८८० ते १८९७ पर्यंतचा आहे. या काळात टिळकांचा राजकीय पवित्रा व दिशा लोकमतजागृती, लोकसंघटना व ब्रिटिश नोकरशाहीशी कायद्याच्या चौकटीत राहून संघर्ष करणे अशी होती. या काळात टिळक चळवळींची पायाभरणी करीत होते. त्यामुळे सावधगिरी, म्हणून राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी कायद्याची अधिसत्ता व चौकट मान्य करीत असतानाच लोकमत हे कायद्याचे अधिष्ठान आहे, हे गृहीत धरून लोकमताची उठावणी व संघटन करण्याचा उघड प्रयत्न करीत. ही सगळी तारेवरची कसरत होती. जनतेच्या हक्कांचा कायद्याने दिलेल्या सवलतींचा विस्तार करण्यासाठी त्यांनी ही दुहेरी कार्यशैली योजली. कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते, तरी दृष्टी भारतीय राजकारणावर होतीच. राष्ट्रीय सभेची दुसरी आघाडी सुरू करण्याची तयारी चालू होती. १८९५ च्या पुण्याच्या काँग्रेसच्या अधिवेशनात

प्रस्थापित राजकीय नेतृत्वाला आव्हान देऊन टिळक राष्ट्रीय सभेकडे वळले. १८९६–९७ या वर्षात महाराष्ट्रातील दुष्काळ, प्लेग यामुळे जी विकट परिस्थिती निर्माण झाली होती तिच्यात टिळकांच्या राजकीय नेतृत्वाचे गुण धसास लागले. रँडच्या खुनानंतर त्यांना जो कारावास भोगावा लागला त्यामुळे त्यागी, कष्टयोगी व साहसी पुढारी व झुंझार पत्रकार अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. हा दुसरा कालखंड.

१८९८ नंतर टिळकांनी पुनश्च हरि ॐ म्हणून पुन्हा कार्यारंभ केला. त्यानंतर काँग्रेसकडे त्यांनी लक्ष दिले. तेथील जुन्या राजकीय नेतृत्वाला आव्हान देऊन काँग्रेसला बहुजनांच्या संघटनेचे स्वरूप देण्याची खटपट सुरू केली. १९०५ साली बंगालची फाळणी झाली. त्यानंतर नोकरशाही व साम्राज्यशाही यांच्याविरुद्ध टिळकांनी जे तेजस्वी लेखन केले व कार्य केले त्यातून प्रक्षोभक परिस्थिती निर्माण होत गेली. १८९७ ते १९०८ हा कालखंड भारताच्या इतिहासातील क्रांतीच्या धगीने ब्रिटिशांना आव्हान देणारा कालखंड ठरला. भारतीय राष्ट्रवाद युद्धमान होऊ लागला. टिळक त्यांचे प्रतीक झाले होते. टिळकांचा हा राजकीय उत्कर्षबिंदू आहे. सुरत काँग्रेस व १९०८ चा राजद्रोहाचा खटला या त्यातील कलाटणी देण्याऱ्या घटना होत्या. तिसरा कालखंड मंडालेतून मुक्त होऊन आल्यानंतर म्हणजे १९१४ ते १९२० हा होता. टिळकांच्या राजकीय नेतृत्वाला व तत्त्वज्ञानाला या काळात राष्ट्रमान्यता मिळाली. टिळकांचा शब्द व टिळकांची भाषणे राष्ट्रसंजीवक ठरली. टिळकांची वाणी लोकवाणी झाली.

टिळकांच्या राजकीय विचारांचे स्वरूप राजकीय परिस्थितीबरोबर विकसित होत गेले. 'साधनानाम् अनेकता' ही टिळकांची कार्यनीती होती. त्यांनी भारतात राजकारणाचे लोकतंत्र सुरू केले. राजकारणाचे लोकशाहीकरण केले. हे करण्यासाठी त्यांनी काय केले? त्यांच्या कार्यनीतीचे स्वरूप काय होते? ब्रिटिश सत्तेकडून जास्तीतजास्त अधिकार मिळवावयाचे, प्रशासकीय न्याय मिळवावयाचा हे ध्येय. लोकहिताचे मार्ग कोणते, राष्ट्रीय अभ्युदयाची दिशा कोणती हे लोकांपुढे मांडावयाचे, हे राजकीय शिक्षण. त्यातून एका बाजूस वृत्तपत्राद्वारे सरकारवर दडपण आणावयाचे तर दुसऱ्या बाजूला लोकांची जागृती करावयाची, असे हे दुहेरी तंत्र असे. प्रस्थापित वा संकल्पित कायद्याचा अपुरेपणा सांगावयाचा, त्याचा कीस काढावयाचा, त्यातील तरतुदी सांगून त्यांचा आपल्याला इष्ट व तर्कसंगत असा अर्थ लावून प्रस्थापित सरकारला सतत आव्हान द्यावयाचे. यामुळेच प्रथम नोकरशाही, नंतर भारत सरकार व त्यानंतर ब्रिटिश सरकार यांच्याशी त्यांचा सतत संघर्ष झाला. हक्क–संपादनाची त्यांची प्रक्रिया स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्कापर्यंत विस्तारत गेली. त्या हक्कसंपादनासाठी कायदेशीर मार्ग जेव्हा संपतात तेव्हा प्रजा निःशस्त्र प्रतिकार करण्यास सज्ज होते, नव्हे, टिळकांना तशी तिची तयारी करावयाची होती. १९०७ नंतरच्या आपल्या लेखनातून, व्याख्यानांतून

व प्रत्यक्ष जनसंपर्कातून टिळकांनी ही हक्कसंपादनाच्या चळवळीची सीमारेषा पुढे रेटीत समाजाला आपल्या बरोबर नेले. हेच त्यांचे युगप्रवर्तक कार्य होते. टिळकांच्या कार्याची ही एक तेजस्वी बाजू. टिळकांचा विचार त्याबरोबरच विकसित होत गेला. लोकांचा मतप्रवाह त्यातून निर्माण झाला. टिळक–विचार हा राष्ट्रविचार झाला.

टिळक-विचाराची दोन भेदक रूपे होती. एक इंग्रजी राज्य व नोकरशाहीचे वर्चस्व अपरिवर्तनीय आहे हे टिळकांच्या आधी निर्माण झालेले, भारतीय जनतेने मुकाट्याने स्वीकारलेले मनोकल्पित (myth) टिळकांनी आपल्या भेदक टीकेने उद्ध्वस्त केले. हे टिळकांचे राजकीय कार्य, तसेच त्याला दुसरी बाजू होती. या देशाने पश्चिमी संस्कृती, पश्चिमी विचार स्वीकारला पाहिजे, तरच त्याची प्रगती होऊ शकेल, हा भारतातील आंग्लविद्याविभूषितांनी दृढ केलेला व रुजवलेला समज किंवा मनोकल्पित टिळकांनी स्वीकारले नाही. स्वदेशी अर्थकारण, स्वधर्म, स्वतःची जीवन-दृष्टी यांच्या आधारावरच या राष्ट्राचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. हा त्यांच्या सामाजिक विचाराचा मुख्य रोख होता. सारांश, राष्ट्र म्हणून आत्मरक्षण, आत्मसाक्षात्कार व पुनरुत्थान (Conservation, selfrealisation, resurrection) या तिन्ही प्रक्रिया एकाच वेळी चालू ठेवणे हाच भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचा मार्ग आहे, हा विचार टिळकांनी अप्रियता पत्करून सतत मांडला व आंधळ्या पश्चिमी-करणाला पायबंद घातला. ही टिळकांच्या विचाराची दुसरी बाजू. गीतेतील कर्मयोगाला सामाजिक दिशा दाखवून, वेदांती जीवनदृष्टी देशभक्तीशी जोडून, राष्ट्रीयत्वाशी जोडून टिळकांनी एक नवा राष्ट्रधर्म भारताला दिला. लोकशाहीतून आलेले कायद्याचे राज्य, लोकांचे व लोकांसाठी स्वराज्य यांचा स्वीकार व पुरस्कार करून भारताच्या नव्या राजकीय संस्कृतीची पायाभरणी टिळकांनी केली होती. तिला वेदान्ती जीवनदृष्टी व सांस्कृतिक अहंता यांची जोड देऊन राष्ट्रीय 'स्वत्व' कसे असले पाहिजे याचे मार्गदर्शन केले. टिळकांचे हे वैचारिक प्रबोधन हा भारतीय राजकारणातील लोक-युगाचा प्रारंभ ठरला.

टिळकांच्या विचारविश्वाच्या सगळ्याच दिशा या पुस्तकात चर्चिलेल्या नाहीत. टिळकांनी पंचांग, प्राच्यविद्या, वैदिक संशोधन, भाषा इत्यादी अनेक क्षेत्रांत नवे विचार मांडले. ते एक साहसी संशोधक होते. त्या सर्वांचा मागोवा या पुस्तकात घेतलेला नाही. फक्त राजकीय, सामाजिक दृष्ट्या जे विचार टिळकांनी मांडले ते पुढे ठेवूनच हे 'टिळक-विचार-दर्शन' घडविले आहे. यात उल्लेखिलेले टिळकांचे बहुतेक लेख व भाषणे समग्र टिळक वाङ्मय खंडांतून घेतली आहेत. त्या खंडांचे संपादन करीत असताना 'केसरी'च्या सर्व फायली वाचण्याची संधी मला मिळाली होती. त्यावेळी टिळकांनी लिहिलेली अनेक संपादकीय स्फुटे व काही अग्रलेख माझ्या मते जे संग्रहात समाविष्ट व्हावयास हवे होते व जे केले गेलेले नाहीत अशांचाही उपयोग या

पुस्तकात केलेला आहे. उदाहरणार्थ दहाव्या सामाजिक विचारांच्या प्रकरणांत 'लोक-प्रवर्तनाचे' मार्ग, धर्मसंस्थापना, इत्यादी विषयांवरील टिळकांचे जे विचार आहेत ते महत्त्वाचे असल्यामुळे यात ते मी समाविष्ट केले आहेत. अशा रीतीने शक्यतो मुळात जाऊन टिळकांचे विचार-संशोधन केले आहे. इंग्रजी भाषेमध्ये टिळकांचे असलेले लेख अद्यापि पूर्णपणे संग्रहित व्हावयाचे आहेत. त्यामुळे त्यातील विचार घेता आलेले नाहीत. पण साधारणतः टिळकांचा समग्र विचार 'केसरी' मध्ये प्रकट झालेला होता. 'मराठामध्ये मांडलेले विचार हे केवळ राष्ट्रव्यापी प्रसारार्थ होते.


या पुस्तकात टिळकांच्या विचारांची मांडणी करताना विचारांची मीमांसा व टीका फारशी केलेली नाहीं. एखाद्या विषयावरचे टिळकांचे विविध वेळी प्रकट झालेले विचार वाचून त्यांचा जो आराखडा किंवा आकृती मनात ठसते ती सांगून तिच्या अनुषंगाने वेचक विचार दिले आहेत. अर्थात एकाच विषयावरचे पुष्कळ लेखन व निरूपण त्यांना करावे लागले होते. त्यातील सर्वसाधारण सूत्र पकडून ही मांडणी केली आहे. अशा मांडणीत मतभेदाला जागा असते. टिळकांच्या सामाजिक विचारांची जुळणी त्यांच्या काळात निर्माण केलेले वाद बाजूला ठेवून केलेली आहे. तसेच राजकीय वादप्रसंगांतील तात्कालिकता न लक्षात घेता जे चिरकालीन संदर्भाचे व महत्त्वाचे विचार आहेत तेवढेच घेतले आहेत. टिळकांचे राजकीय जीवनचरित्र सांगणारे व मीमांसा करणारे 'टिळक युग' नावाचे पुस्तक लिहिण्याचा माझा विचार आहे. त्यात या सर्वांचे निवेदन व मीमांसा समाविष्ट करावयाची असल्याने या पुस्तकात टिळकांचेच शब्दांत 'टिळकविचार' सांगावयाचा, एवढेच उद्दिष्ट पुढे ठेवले आहे.

पुस्तकाचे लेखन करताना व त्यापूर्वी अनेक तज्ज्ञांशी, अभ्यासकांशी मी चर्चा केली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. मामाराव दाते, प्रा. के. वि. बेलसरे, डॉ. सुरेंद्र बारलिंगे, डॉ. विद्याधर पुंडलीक, श्री. धोंडो विठ्ठल देशपांडे, डॉ. स. ह. देशपांडे, डॉ. य. दि. फडके, डॉ. रा. चिं. ढेरे या सर्वांनी काही मोलाच्या सूचना केल्या. डॉ. वि. रा. करंदीकर यांनी 'गीतारहस्या'विषयीचे प्रकरण वाचून त्यासंबंधी काही मार्गदर्शन केले. तसेच श्री. मा. कृ. पारधी, श्री. अरुण टिकेकर यांनीही हस्तलिखित वाचून काही सूचना केल्या. श्री. आनंद हर्डीकर यांनी या पुस्तकाची छपाई होत असताना सर्व प्रकारचे सहाय्य केले. श्री. श्याम नाईक यांनी मुद्रणप्रत करून दिली. या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे. श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी आपुलकीने या पुस्तकाचे प्रकाशन केले, याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे. कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर यांनी नेहेमीच्या सुबकतेने व स्वतः लक्ष घालून या पुस्तकाचे मुद्रण करून दिले व श्री. सुभाष अवचट यांनी सजावट केली. या दोघांचेही मनःपूर्वक आभार. टिळक-वाङ्मयातील उतारे उद्धृत करण्यास श्री. जयंतराव टिळक व केसरी-मराठा संस्था यांनी परवानगी दिली याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

लोकमान्य टिळकांचे विचारधन या राष्ट्राच्या वैचारिक परंपरेत योग्य मानाने व समजुतीने समाविष्ट केले जावे व ते एक विचारपीठ आहे याची जाणीव विद्यमान व येणाऱ्या पिढ्यांना व अभ्यासकांना व्हावी या हेतूनेच हा ग्रंथलेखनाचा संकल्प केला होता व तो सिद्धीस जात आहे याचा आनंद मला आहे. अशा विचाराचा अभ्यास व संशोधन कधीही न संपणारे असते. ते चालू राहावे, हीच इच्छा आहे.

नवी दिल्ली,
५ डिसेंबर १९८०

भा. कृ. केळकर



१

लोकमान्य टिळकांचे विचारविश्व

लोकमान्य टिळकांचे वर्णन 'भारतीय राज्यक्रांतीचे जनक', 'भारतीय असंतोषाचे निर्माते', 'आधुनिक भारताचे एक शिल्पकार' या तीन अभिधानांनी साधारणतः केले जाते. टिळकांचे हे वर्णन समर्पक असले तरी ते अपुरे आहे...टिळकांचे सारे जीवन ही साम्राज्यशाहीशी झुंज तर होतीच, पण हा त्यांचा संग्राम एका निश्चित पूर्वचिंतित तात्त्विक भूमिकेवरून चालू होता. 'मामनुस्मर युद्ध्य च' ह्या श्रीकृष्णाच्या संदेशाप्रमाणे त्यांनी हा संग्राम केला होता. त्यांच्या जीवनात कर्मप्रधानता असली तरी ते ज्ञानयोगी होते. भविष्यदर्शी, कालज्ञ, राजकीय विचारवंत होते. आधुनिक भारताच्या राष्ट्रधर्माचे ते दार्शनिक होते. टिळकांचे व्यक्तित्व, त्यांचे विचार व त्यांचे जीवनकार्य यांत सुसंगती होती, वैचारिक एकात्मता होती, सतत व सर्वत्र वाहणारा तात्त्विक अंतःप्रवाह होता. त्यांच्या सर्व चळवळी, त्यांच्या प्रतिक्रिया या त्यांच्या तात्त्विक अंतःप्रवाहाशी निगडित होत्या. टिळकांनी व्यक्त केलेल्या विविध सामाजिक, आर्थिक व तत्त्वज्ञान-विषयक तत्त्वविचारांचे विचारपीठ (School of thought) तयार झाले. हा शब्द-प्रयोग रूढ असला तरी त्याची तपशिलात जाऊन मांडणी केल्याचे मात्र आढळत नाही.

टिळकांचे विचारविश्व कसे निर्माण झाले? कोणत्याही राजकीय विचारवंताचे, विशेषतः दार्शनिक नेत्याचे, विचार त्या काळच्या परिस्थितीने प्रभावित झालेले असतात. म्हणजे त्यांना कालसंदर्भ असतो. दुसरे म्हणजे त्या काळात ज्या राजकीय, सामाजिक आर्थिक संकल्पना रूढ असतात, प्रस्थापित झालेल्या असतात, त्यांच्याशी त्याला संघर्ष तरी करावा लागतो किंवा त्या स्वीकाराव्या तरी लागतात. त्यांची त्याला उपेक्षा करता

येत नाही. तिसरे, त्या नेत्याच्या व्यक्तित्वाचा, भावपिंडाचा (Ethos) व जीवननिष्ठांचा त्याच्या विचारसरणीवर अपरिहार्यपणे प्रभाव पडतो. या तीनही घटकांचा प्रभाव पडून विचारसरणी तयार होत जाते. टिळकांच्या विचारविश्वाला हे तीनही संदर्भ आहेत. या तीनही संदर्भांतून त्यांचा कालप्रभावी विचार निर्माण झाला व टिळकांचे राजकीय जीवन हे भारतीय राजकारणातले ' टिळक युग ' ठरले.

कालसंदर्भ

टिळकांच्या विचारात त्यांनी केलेली इंग्रजी राज्याची समीक्षा, त्यांच्या पूर्वीच्या राजकीय पिढीचे विचार व नेतृत्व, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक समस्या यांचा संदर्भ महत्त्वाचा आहे. पेशवाईचा अस्त झाल्यापासून–१८१८ पासून १८५७ चा एक कालखंड व दुसरा १८५७ ते १८८० चा कालखंड हे या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. स्वतः टिळकांनी वेळोवेळी समीक्षा करताना या दोन्ही कालखंडांचे समर्पक वर्णन केले होते. इंग्रजी राज्य आल्यावर " या देशाचीं राज्यसूत्रें जेव्हां प्रथम इंग्रज सरकारच्या हातांत पडलीं तेव्हां टोपीवाल्यांची टापटीप, हुशारी आणि चातुर्य पाहून बहुतेक सर्व लोक चकित झाले. यांचें लष्कर, यांची जमाबंदीची पद्धत, आगबोट, आगगाडी, तारायंत्र, सडका, रस्ते, पूल, शाळा इत्यादि प्रकारांनीं कांहीं दिवसपर्यंत लोकांस अगदीं गांगरून टाकलें होतें. दंगेधोपे नाहींसे होऊन ज्यास-त्यास सुखशांततेचा पूर्ण अनुभव मिळूं लागला. पोराबाळांस मुलुखगिरी करून पैसा मिळविण्याचे श्रम पडतनासे झाले. काशीचें पत्र पुण्यास दोन पैशांत पांच-सहा दिवसांनीं येऊन निर्विघ्नपणें पोचूं लागलें; पेंढाराचा बंदोबस्त झाला; ठगी निर्मूल झाली आणि पेशवाईंत नाना फडणविसांसहि जेथें सालिना तीनशें रुपये मिळण्याची मारामार, त्याच ठिकाणीं आतां दरमहा दोनशें-चारशें रुपये मामलेदार, मुनसफांस मिळूं लागले. अर्थात्च कांहीं काळ-पर्यंत ईश्वरानें दयाळु होऊन आमच्यावर राज्य करण्याकरितां हे कोणीतरी दैवशाली पुरुष पाठविले आहेत असा सर्वांचा समज झाला." (केसरी, २४ जानेवारी १८९३, समग्र टिळक खंड ३, पान ६).

इंग्रजी राज्याच्या नवलाईचे वर्णन करणारे, तत्कालीन लोकांच्या मनःस्थितीचे टिळकांनी रेखाटलेले हे शब्दचित्र. हा काळ साधारणपणे ४० वर्षांचा होता. महाराष्ट्रात सरदार गोपाळराव हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांनी १८४८ साली त्या काळच्या सामाजिक किंवा सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर लेखन करावयास सुरुवात केली. श्री. बाळशास्त्री जांभेकर यांच्या ' प्रभाकर ' पत्रात हे लेख येऊ लागले. १८४८ मध्ये ' राज्यसुधारणा ' या विषयावर त्यांचा लेख आला होता. विष्णुबुवा ब्रह्मचारींचा ' सुखदायक राज्य प्रकरणी ' हा निबंध १८४३ मध्ये प्रसिद्ध झाला. सारांश, इंग्रजी राज्याचे खरे स्वरूप काय आहे, त्याच्यापासून फायदे किती, तोटे किती, याचे

विचारमंथन या काळात सुरू झाले. या काळाचेही वर्णन टिळकांनी उपरोक्त लेखात उत्तम रीतीने केले होते. त्यांनी लिहिले होते, "गरीबगुरिबांस तर कंपनी सरकारचें यंत्र कोणीकडे आहे त्याचा थांगच लागेना. जें कांहीं पहावें तें सर्व कांहीं विलक्षण! तेव्हां हें आहे तरी काय? हाच भ्रम कित्येक दिवस लोकांस पडला होता, व इंग्रजांच्या राज्यांत आंधळ्यानें काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत जावें, असें लोक म्हणू लागले. परंतु दारूचा अंमल ज्याप्रमाणें फार वेळ टिकत नाहीं, त्याचप्रमाणें राज्यक्रांतीपासून उत्पन्न झालेला हा भ्रमहि उत्तरोत्तर दूर होत चालला. आंधळ्यानें काठीस सोनें बांधून जावें खरें, पण सोनेंच उत्तरोत्तर दुर्मिळ होत चाललें ही गोष्ट दिवसानुदिवस लोकांच्या जास्त लक्षांत येऊ लागली. सुखशांतता झाल्यामुळें लोकसंख्या वाढली. उद्योगधंदे परकीयांच्या हातांत पडले आणि ज्या राज्यपद्धतीचे आम्हीं कौतुक करीत होतों त्या पद्धतीनें आम्हांस काळसर्पाप्रमाणें चोहोंकडून ग्रासून टाकलें आहे असें वाटू लागलें. डोळ्यांवरील धूर जरासा कमी झाला व हें गौडबंगाल आहे तरी काय, अशी चौकशी सुरू झाली." (समग्र टिळक खंड ३, पान ६–७).

ही चौकशी सुरू झाल्यावर स्वाभाविकच नेत्यांमध्ये मतभेद सुरू झाले. ब्रिटिश राज्यकर्त्यांतही येथे जी राज्यपद्धती स्थापन करावयाची त्यासंबंधी चर्चा सुरू झाली. त्यांच्यातही मतभिन्नता होती. काही राज्यकर्ते उदारमतवादी होते. त्यांना वाटे की, दूरदर्शी स्वार्थाच्या दृष्टीने एतद्देशीय लोकांना शिक्षण देऊन शहाणे करावे व हळूहळू त्यांची मने जिंकीत राज्य करावे. असे केले तरच ते राज्य दीर्घकाळ चालेल व इंग्लंडचाही व्यापारी दृष्ट्या फायदा होईल. दुसरा वर्ग कट्टर साम्राज्यवाद्यांचा होता. जित व जेते हे संबंध कायम टेवून हिंदी लोकांच्याच सहाय्याने राज्य चालविणे शक्य आहे, असे या वर्गाला वाटत होते. या मतभिन्नतेच्या अनुषंगानेच भारतीय नेत्यांतही दोन विचारप्रवाह निर्माण झाले.

इंग्रजी राज्यपद्धतीचे कौतुक

भारतातील इंग्रजी राज्यपद्धतीचे कौतुक करणारा व त्यांच्या संस्कृतीचे अंधानुकरण करणारा वर्ग याच काळात निर्माण झाला. राज्यकर्त्यांचा तो आश्रित बनला. त्यामुळे इंग्रजी राज्य स्थिर करण्याच्या दृष्टीने हाच वर्ग उपयोगी पडेल, असे येथे आलेल्या इंग्रज नोकरशहांना वाटू लागले. या वर्गाबद्दल टिळकांनी म्हटले होते, "लहानापासून थोरापर्यंत, वतनदारांपासून जहागीरदारांपर्यंत, मजुरापासून मोठ्या सरकारी नोकरापर्यंत आणि किरकोळ धंदा करणाऱ्यापासून मोठ्या व्यापाऱ्यापर्यंत सर्वांस एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं झालेली ही राज्यक्रांति त्या वेळीं सुखावहच भासली...ज्याला त्याला असें वाटे कीं, इंग्रजांची प्रत्येक गोष्ट चांगली व अनुकरणीय आहे व त्यांच्यासारखे आपण झाल्याखेरीज आपली धडगत नाहीं...केवळ राजकीय

दृष्टीनें पाहिलें तर असें आढळून येईल कीं, पहिल्या इंग्रजी भट्टींतून निघालेल्या सुशिक्षित वर्गानें तत्कालीन इंग्रजी राज्याच्या धोरणास मदत केल्यानें पेशवाईंत जे पुढारी व पुरस्कर्ते पुरुष झाले, त्यांच्या वंशजांस देशांतील लोकांचें पुरस्कर्तृत्व स्वीकारण्याची शक्ति अखेरीस राहिली नाहीं. किंवा यदाकदाचित् थोडी बहुत कोठें राहिली असल्यास फुकट घरीं बसून खावयास मिळालेल्या इनामाच्या किंवा नेमणुकीच्या लोभानें ती इच्छा निरुपयोगी झाली...त्यानंतर समाजाचे पुढारी म्हणून इंग्रजी पद्धतीनें तयार झालेल्या सुशिक्षितांचा वर्ग पुढें आला. इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या भट्टींत तयार झालेली बहुतेक मंडळी इंग्रजी राज्यपद्धतीचें कौतुक करण्यांतच निवर्तली." ('आशेची निराशा आणि निराशेची आशा'–स. टि. खंड ३, पान १०५–१०७).

तेव्हा इंग्रजांचा अनुनय व अनुकरण करणारा एक वर्ग व त्यांचे नेतृत्व करणारे पुढारी वा समर्थन करणारे सामाजिक नेते यांचा या काळात प्रभाव होता. टिळकांनी ज्याला पुढे कडाडून विरोध केला तो हाच वर्ग होता.

धर्मसुधारणेची चळवळ

ही स्थिती राजकारणाविषयीची होती. त्या काळी खिस्ती मिशनरी खिस्ती धर्म-प्रसार करीत होते. उघडपणे हिंदू धर्मावर हल्ला करीत होते. हिंदू खिस्ती झाले तर इंग्रजी राज्यालाही बळकटी येईल, ही त्यामागची आशा होती. या आक्रमक प्रचाराची प्रतिक्रियाही तीव्र झाली. बंगालमध्ये राजा राममोहन राय, महाराष्ट्रात विष्णुबुवा ब्रह्मचारी, पंजाबात स्वामी दयानंद यांनी हिंदू धर्माचे समर्थन व संरक्षण करण्याचे मोठे कार्य सुरू केले होते. अशा रीतीने इंग्रजी राज्याच्या प्रतिक्रिया व त्या व्यक्त करणारे नेते राजकीय व सामाजिक-धार्मिक क्षेत्रांत १८१८ ते १८५७ या काळात निर्माण झाले होते. धर्मरक्षण व धर्मसुधारणा ही या सर्व प्रयत्नांची दिशा होती.

संस्थात्मक जीवनाचा प्रारंभ

इंग्रजी राज्य आल्यानंतर वर उल्लेखिलेल्या ज्या सामाजिक, धार्मिक व राजकीय प्रतिक्रिया झाल्या, त्या प्रारंभी व्यक्तिनिष्ठ होत्या. पुढे त्यांना संस्थात्मक स्वरूप आले. इंग्रजी राज्याचे या देशावर जे परिणाम झालेल्यांपैकी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे एकछत्री अंमलाखाली, इंग्रजी शासनव्यवस्थेखाली सर्व देश प्रथमच एकत्र आला. तेव्हा इंग्रज सरकारकडे गाऱ्हाणी सांगावयाची असतील तर ती हिंदी किंवा भारतीय म्हणून सर्व प्रजेच्या वतीने मांडली पाहिजेत, ही जाणीव पुढाऱ्यांना होऊ लागली. भारतावर आतापर्यंत जी आक्रमणे झाली होती, त्यांचा प्रतिकार त्या–त्या प्रदेशांतल्या लोकांनी केला होता. भारतीय म्हणून नव्हे. हिंदू म्हणून केला असला तरी त्या–त्या प्रदेशां-तल्या हिंदूंनी केला होता. इंग्रजी राज्य आल्यावर त्यांच्या शासनव्यवस्थेखाली आलेले

हिंदू, मुसलमान, बंगाली, महाराष्ट्रीय, पंजाबी, दाक्षिणात्य या सर्वांची 'हिंदी प्रजा' म्हणून गणना होऊ लागली. हे त्यांचे 'भारतीयत्व' ही राजकीय दृष्ट्या अगदी नवी संज्ञा वा संकल्पना होती. हे आधुनिक भारतीयत्व वा राष्ट्रीयत्व हा सर्व चळवळीचा पाया होऊ लागला. दुसरे असे की, आतापर्यंतच्या राज्यक्रांत्या राजघराण्यांच्या किंवा राजवंशांच्या संघर्षातून झाल्या होत्या. त्यामुळे जे राजकारण होई, ते राजवाड्यांत किंवा त्यांच्या आधारे जगणाऱ्या आश्रित वर्गात व राज्यकर्त्या वर्गात होई. इंग्रजी राज्याचे स्वरूप सर्वस्वी भिन्न होते. तेथे राजसत्ता ही नाममात्र असल्यामुळे इंग्रजी राष्ट्राच्या, जनतेच्या प्रातिनिधिक सत्तेशी भारतीयांचा संपर्क आला व ही इंग्रजी सत्ता व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) होती. भारताचे राजकारणही त्यामुळे व्यक्तिनिष्ठ किंवा राजघराण्यांचे वा राजवाड्याचे राहिले नाही. सर्व भारतीय जनतेचे राजकारण सुरू झाले. शास्ते व शासित यांचे संबंध असेच व्यक्तिनिरपेक्ष होऊ लागले. साम्राज्यसत्ता ही एक राज्य-पद्धती (political system) होती. तिच्याविरुद्ध उभे राहावयाचे असेल तर ते भारतीय म्हणूनच उभे राहिले पाहिजे, ही जाणीव बळावली. भारताचे राजकीय एकत्व यामुळेच आकारास येऊ लागले. सारांश, भारतीय जनता एका बाजूला व इंग्रजी साम्राज्यसत्ता दुसऱ्या बाजूला असा हा संघर्ष भारताच्या राजकीय इतिहासात प्रथमच सुरू होणार होता. येणारे प्रश्न व उद्भवलेली परिस्थिती यांचा विचार भारतीय म्हणून करण्याची प्रथा या वेळेपासूनच सुरू झाली. त्यासाठी वेगवेगळ्या प्रांतांत संस्था स्थापन होऊ लागल्या. मुंबईत 'बॉम्बे असोसिएशन', पुण्यात 'डेक्कन असोसिएशन', बंगालमध्ये 'ईस्ट इंडिया असोसिएशन', मद्रासमध्ये 'मद्रास नेटिव असोसिएशन' अशा स्थानिक सार्वजनिक संस्था निर्माण झाल्या. सारांश, हिंदी जनतेचे संस्थात्मक जीवन (institutional life) इंग्रजी राज्याच्या आगमनाबरोबर सुरू झाले. हा महत्त्वाचा फरक होता. पुढे १८८५ मध्ये सर्व भारतीय जनतेची प्रातिनिधिक संस्था म्हणून काँग्रेस जन्माला आली.

महाराष्ट्रातील संस्था

महाराष्ट्राच्या व टिळकांच्या राजकीय जीवनाच्या दृष्टीने १८७० ते १८८० या काळाला फार महत्त्व आहे. न्या. रानडे यांनी १८७० साली पुण्यात सार्वजनिक सभेची स्थापना केली. या संस्थेच्यामार्फत न्या. रानडे यांनी महाराष्ट्राचे अनेक प्रश्न हाताळले. महाराष्ट्राची आर्थिक पाहाणी केली. त्याकाळी पडलेल्या दुष्काळात शेतकऱ्यांची बाजू सरकारपुढे मांडण्याचे कार्य केले. गणेश वासुदेव जोशी तथा सार्वजनिक काका हे त्यांचे सहकारी होते. जनसंपर्काचे काम सार्वजनिक काकांनीच चालविले होते. याच काळात न्या. रानडे यांनी स्वदेशी उद्योगधंद्यांसंबंधी आपले विचार मांडले. त्यात स्वदेशी उद्योगधंदे व व्यापार यांचा पुरस्कार केला होता. स्वदेशी कापड म्हणजे स्वतः

काढलेल्या सुताची खादी सार्वजनिक काका वापरत होते. अशा रीतीने महाराष्ट्राच्या आधुनिक सार्वजनिक व संस्थात्मक जीवनाचा पाया न्या. रानडे यांनी या १० वर्षांत घातला. म्हणूनच टिळकांनी पुढे न्या. रानडे यांच्यासंबंधीच्या मृत्युलेखात म्हटले होते, " महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हलवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणीं मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे. " (केसरी, २२ जानेवारी १९०१, स. टि. खंड ५–पान ९०२)

प्रस्थापित संकल्पना व नेतृत्व

वर उल्लेखिलेल्या काळात काही संकल्पनांनी मूळ धरले होते. पैकी एक म्हणजे इंग्रजी राज्यपद्धती व पाश्चात्त्य उदारमतवाद यांच्याशी भारताचा जो संबंध आला तो दैवी सुयोग होय. म्हणून तो संबंध तुटेल, असे काहीही करता कामा नये. इंग्रज उदार आहेत, ते प्रजेची गाऱ्हाणी ऐकून हळूहळू अधिकार देतील. तेव्हा त्यांच्याशी संघर्ष करू नये. ही दैवी सुयोगाची विचारसरणी बाळगणारे नेते स्वाभाविकपणेच राज्यकर्त्यांना उपयुक्त वाटत होते. दुसरे असे की, इंग्रजी विचारसरणीमुळे भारतीय जनतेतील सामाजिक व्यंगे ही सुशिक्षित वर्गाच्या ध्यानात येऊ लागली. ती बोचू लागली. राजकीयदृष्ट्या मवाळ व सामाजिक दृष्ट्या जहाल असे धोरण ठेवणारे व सरकारला उपयुक्त ठरणारे नेतृत्व निर्माण झाले. इतकेच नव्हे तर त्याला प्रतिष्ठाही मिळू लागली. टिळकांचे पुढे जे संघर्ष झाले, ते या दोन्ही संकल्पनांशी व त्या पुरस्कारणाऱ्या नेत्यांशी. अर्थात त्यांच्यातही फरक होता. सगळे काही एकाच पोताचे व निष्ठेचे नेते नव्हते.

इंग्रजी राज्यपद्धतीचे फायदे टिळकांनी मान्य केले होते. किंबहुना त्या पद्धतीमुळेच आता नवा मनू आला आहे, नवे वळण लागले आहे, स्वातंत्र्याची अभिरुची निर्माण झाली आहे, शिक्षणाच्या सोयी वाढल्या आहेत, कायद्याचे राज्य व शांतता आली आहे, हे सर्व टिळकांना मान्य होते. पण जनता दुःखीच आहे, जुलमी राज्यकारभाराने गांजली आहे, दारिद्र्य, शेतीची निकृष्टावस्था यामुळे दुष्काळासारख्या आपत्तीत लक्षावधी माणसे भुकेने तडफडून मरत आहेत. तेव्हा याच्यावर काहीतरी उपाय केला पाहिजे. ही पिळवणूक थांबली पाहिजे. उन्मत्त व बेजबाबदार नोकरशाहीला जरब बसेल, असे काहीतरी केले पाहिजे. म्हणून प्रजेला राजकीय हक्क मिळाले पाहिजेत, ही टिळकांची भूमिका होती. त्या भूमिकेतूनच या दोन्ही प्रस्थापित संकल्पना व त्या पुरस्कारणारे जुने नेतृत्व यांच्याविरुद्ध टिळकांनी विचार मांडले व प्रत्यक्ष चळवळ करावयास सुरुवात केली.

टिळकांचे म्हणणे असे होते की, या जुलमी इंग्रजी राज्याचा आधारस्तंभ म्हणून हा देशी गुलामांचा वर्ग काम करीत आहे व त्याच्यामुळे समाजातं लाचारी, तोंडपुजेपणा, अंधानुकरणाची प्रवृत्ती मूळ धरत आहे. इंग्रजी शिक्षण हेही हा नित्य-सेवकांचा, गुलामांचा वर्ग निर्माण करण्यासाठीच सुरू झाले आहे. स्वाभिमान नाहीसा करून, न्यूनगंड निर्माण करून इंग्रज आपले राज्य स्थिरावू पाहात आहेत. ही याचकांची संस्कृती, हा खुशामत संप्रदाय, व त्याचे ते पोचट व स्वाभिमानशून्य पुढारी यांचे टिळकांनी सतत वस्त्रहरण केले, त्याचे कारण हे होते. टिळकांच्या राजकीय कार्याचा तो महत्त्वाचा भाग होता. ब्रिटिश नोकरशाहीचा दरारा, प्रतिष्ठा व सहाय्य टिळकांनी या रीतीने कमी केले. त्यांचे हे महत्त्वाचे कार्य होते.

राजकीय व सामाजिक विचारकलह

इंग्रजी राज्याकडे पाहाण्याची व राजकीय हक्क-प्रस्थापना व संपादन यासंबंधी टिळकांची जी आग्रही, संघर्षात्मक व प्रतिकार करण्याची भूमिका होती, तिच्यातून त्यांचा नेमस्त पक्षाशी १८९५ पासून लढा सुरू झाला. १८९५ ते १९०८ आणि १९१४–१९२० असे त्याचे दोन कालखंड पडतात. या काळातच त्यांचा 'राष्ट्रीय चतुःसूत्री' म्हणून गाजलेला राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य हा कार्यक्रम निर्माण झाला व १९१४ च्या पुढे इंग्रज सरकारने देऊ केलेल्या राजकीय सुधारणांविषयी प्रतियोगी सहकारितेचे धोरण जन्माला आले. टिळकांच्या विचारसूत्रांत ही अत्यंत महत्त्वाची सूत्रे आहेत.

सामाजिक क्षेत्रातील टिळकांचा वैचारिक संघर्ष मुख्यतः १८८८ ते १९०८ या काळातील आहे. भारताच्या सांस्कृतिक प्रबोधनाचा प्रारंभ १९ व्या शतकाच्या प्रारंभापासून सुरू झाला होता, त्यात धर्मनिष्ठ सुधारणा, इहवादी सुधारणा, धर्माचे आधुनिकीकरण, भारतीय संस्कृतीच्या आधारावर सामाजिक व राष्ट्रीय पुनर्रचना आदि विचारप्रवाह निर्माण झाले होते. टिळकांची स्वतःची अशी एक सामाजिक भूमिका होती. ती त्यांच्या व्यक्तित्वाशी, जीवननिष्ठांशी व राजकारणाशी निगडीत होती. ती निखळ सामाजिक सिद्धांतांवर व विचारसरणीवर आधारलेली नव्हती. ती काही ठाम समजुतींवर, त्यांच्या आकलनावर व श्रद्धांवर आधारलेली होती. तिचा विचार स्वतंत्र प्रकरणात केलेलाच आहे. राष्ट्रीय उत्थान व राष्ट्रीय स्वातंत्र्य ही टिळकांची स्वप्ने होती. त्यांच्या संदर्भात त्यांच्या सामाजिक भूमिकेची मांडणी आवश्यक आहे.

टिळकांच्या व्यक्तित्वाचा कंद

टिळकांच्या व्यक्तित्वाची घडण त्यांच्यावर भारतीय संस्कृतीच्या जन्मतः झालेल्या संस्कारांनी व पाश्चात्त्य शिक्षणाने झालेली होती. इंग्रजी राज्यामुळे वैचारिक क्रांती झालेली

आहे, हे टिळक मानीत असत. तिचे फायदे सांगताना टिळकांनी स्वातंत्र्याची अभिरुची, कायद्याचे राज्य, लेखनस्वातंत्र्य इत्यादींचा उल्लेख केलेला होता. इंग्रजी राज्यामुळे आलेल्या उदारमतवादी विचारांचा, संसदीय पद्धतीचा, लोक आणि लोकमत यांना राजकारणात असलेले स्थान या सर्व संकल्पनांचा त्यांच्या भावपिंडावर निश्चित परिणाम झाला होता. पण त्यांच्या व्यक्तित्वाचा कंद निःसंशय वेदान्ती दार्शनिकाचा होता. त्यांनी गीतेतील कर्मयोग पुरस्कारला, याचे कारण टिळक हे गीता-धर्माचे आधुनिक प्रणेते होते, हे आहे. त्यांचा ज्ञानयोग, त्यांचा लोकसंग्रह, त्यांची कर्मप्रवणता व युद्धमय जीवन जगण्याची तयारी, ही सारी गुणवैशिष्ट्ये त्यांच्या गीतेवरील निष्ठेतून आलेली होती. दादासाहेब खापर्डे यांनी म्हटल्याप्रमाणे टिळक गीतेचा दिनदर्शिकेसारखा (कॅलेंडर) उपयोग करीत. व्यवहारात कोणतीही समस्या आली की, गीतेचा आधार व मार्गदर्शन शोधीत असत. त्यांचे लोकप्रेम गीतेत सांगितलेल्या लोकसंग्रहाच्या तत्त्वज्ञानातून आलेले होते. त्यांनी लोकशिक्षणाचे कार्य अंगावर घेतले, त्यालाही 'ज्ञानिनः तत्त्व-दर्शिनः' या गीता-वचनाचाच आधार असावा. त्यांनी देशभक्तीचे समर्थनही वेदांती दृष्टिकोणातून केले होते. टिळकांना हिंदुधर्माचा अभिमान होता, तोही वेदांतासारखे तत्त्वज्ञान त्यात आहे म्हणूनच. त्यांचे गरिबांबद्दलचे, पीडितांबद्दलचे प्रेम किंवा त्यांना न्याय मिळवून देण्याची तळमळ ही गीतेतील समदर्शित्वामुळेच असावी. त्यांचे साहस, निर्भयता, निःस्वार्थी देशसेवा ही गुणसंपदा त्यांच्या गीतेवरील श्रद्धेतूनच आली असावी. म्हणून टिळकांच्या सर्व विचारविश्वाला असणारा त्यांच्या व्यक्तित्वाचा हा संदर्भ ध्यानी ठेवल्याविना टिळक समजायचेच नाहीत.

टिळकांची विचार करण्याची पद्धती तर्कनिष्ठ व बुद्धिनिष्ठ होती व ते मांडण्याची पद्धती तर्कनिष्ठ युक्तिवादावर आधारलेली होती. वादपद्धती आक्रमक व डावपेचाची होती. लेखनशैली व भाषा सुगम, परखड, निर्दय होती. विरोधक, मग तो कोणीही असो, त्याला कडाडून, परिणामांची पर्वा न करता ते विरोध करीत, प्रहार करीत. त्यामुळे 'सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय?' हे शीर्षक काय, किंवा 'मुंबईच्या टाइम्सचा वेशरमपणा' किंवा 'म्हातारचळ की पोरखेळ?' ही शीर्षके काय, एकाच भेदक उपहासाची, तीव्र भावनेची उदाहरणे होती. तीव्रता हा टिळकांच्या स्वभावाचा विशेष होता. निदान प्रारंभीच्या १८८८ ते १९०८ या वर्षांतील लेखनात तरी तो विशेष जाणवतो. सारांश, तर्कनिष्ठ, अभ्यासपूर्ण निष्कर्ष काढून, स्वतःचे सिद्धांत निश्चित करून मग त्यांचा हिरीरीने पाठपुरावा करावयाचा, हा टिळकांचा स्वभावच होता. त्यामुळेच टिळकांच्या विचारांच्या मांडणीत तीव्रता, धारदारपणा आढळत असे.

व्यापक सामाजिक जाणीव

टिळकांच्या विचारांना जशी तीव्रता होती, तशी त्यांची सामाजिक जाणीव व कणवही

फार व्यापक व सखोल होती. टिळकांच्या विचारविश्वात शेतकरी, कामगारही होते, तसे मध्यमवर्गीय, सरकारी नोकर, सावकार, खोतही होते. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या वेळच्या त्यांच्या लेखनात सामाजिक दुःखाची जी जाणीव व सहवेदना दिसते, ती त्यांच्या शब्दांतून व शैलीतून व्यक्त होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सुशिक्षितांनी लक्ष द्यावे, त्यांच्याशी समरस व्हावे, असा उपदेश त्यांनी सुशिक्षितांना केला होता. ज्या काळात सरकारी नोकरांची किंवा शेतकरी-कामगारांची बाजू घेणे धोक्याचे होते, त्या काळात औद्योगिक मजुरांसंबंधी, तारखात्यातील व पोष्टांतील सरकारी नोकरांच्या संपाविषयी सहानुभूती दाखविण्यात टिळकांनी आपली सामाजिक जाणीव किंवा बांधिलकीच सिद्ध केली होती.

टिळकांचा प्रवृत्तिपर वेदांत

टिळकांच्या विचारांचा रोख व जोर (Thrust) राष्ट्रीय पुनरुत्थानाकडे व समाजाला देशसेवेसाठी कार्यप्रवण करण्याकडे होता. समर्थ रामदासांनी 'विवेकें क्रिया आपुली पालटावी,' हे जसे सांगितले, तसेच टिळकांनीही सांसितले होते. त्यांनी प्रयत्नवादाचाच पुरस्कार केला होता. मानवाच्या प्रयत्नातूनच, कर्मातूनच मानवाचा इतिहास घडत असतो, मनुष्य हाच इतिहासाचा कर्ता आहे, असे टिळक सुचवीत असत. 'ज्ञानी पुरुष हे समाजाचे डोळे असतात, त्यांनी पाहाण्याचें आपलें काम केलें नाहीं, तर समाज आंधळा होईल,' असे जेव्हा टिळक सांगत होते, त्यावेळी 'समाजाचें ऋण बुद्धिमंतांनीं फेडलें पाहिजे,' असे त्यांना सांगावयाचे होते. समाज-ऋणाची टिळकांची ही कल्पना, गीतेतील लोकसंग्रहाच्या संकल्पनेचे त्यांनी केलेले विवरण, कर्मयोगाचे त्यांनी केलेले विवेचन, 'वेदांत हें परोपकारांचें मोठें माप आहे व देशभक्ती हें लहान माप आहे,' हा त्यांचा विचार, 'देश व देव वेगळे आहेत, असें मानणारे लोक सर्व प्रकारें धर्मभ्रष्ट आहेत,' ही त्यांची भूमिका ही सारी टिळकांच्या समाजाला चिरकाल मार्गदर्शन करू शकणाऱ्या सामाजिक वेदान्ताची सूत्रे आहेत. ती केवळ भारतापुरती मर्यादित नाहीत, तर वैश्विक आहेत. गीतारहस्यातील मानव-केंद्रित कर्मप्रवण अध्यात्म हे केवळ भारतीयांसाठी नाही, तर ती मानवी जीवनाकडे पाहाण्याची दृष्टी आहे. टिळक म्हणत असत की, " मनुष्याला नीतिशास्त्र हवें असेल तर अध्यात्मशास्त्र सोडून चालणार नाही. " सारांश, टिळकांच्या विचारांचा हा गाभा मानला पाहिजे, मार्गदर्शक सिद्धांत मानला पाहिजे. त्यांच्या विचारांत आधुनिक लोकशाही-वादी राजकीय व भौतिक अभ्युदयाचे भारताचे ध्येय याला अध्यात्मनिष्ठ सामाजिक नीतिशास्त्राची व प्रवृत्तिपर वेदांताची जोड दिली गेली आहे. टिळक भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचे व अभ्युदयाचे जसे स्वप्न पाहात होते, तसेच 'वेदान्त मिशन' काढून मानवजातीला नवे तत्त्वज्ञान देण्याचीही आकांक्षा बाळगीत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

टिळक विचारपीठाची आधारतत्त्वे

भारताच्या दृष्टीने टिळकविचाराची आधारतत्त्वे कोणती होती ? भारत हे सांस्कृतिक दृष्ट्या एकात्म असलेले राष्ट्र होते व आता ते बहुधर्मीय, विविध वंशांचे संमीलित एकात्म राष्ट्र होत आहे. मातृभूमीची भक्ती हे त्याचे अधिष्ठान आहे. हा नवा राष्ट्रधर्म आहे, हे टिळकांचे पहिले आधारतत्त्व आहे. टिळकांनी ज्याच्यासाठी ब्रिटिश साम्राज्यशाहीशी संघर्ष केला, ते हे भारतराष्ट्र आहे, त्याचा अभ्युदय स्वातंत्र्यानेच होणार आहे, हा विचार त्यांनी मांडला, तो या राष्ट्रवादी भूमिकेतूनच. दुसरे म्हणजे भारतात ब्रिटिश राज्यामुळे नवा मनू सुरू झाला आहे. ही राज्यक्रांती वेगळ्या प्रकारची आहे. लोकांना लोक म्हणून काही हक्क असतात व त्या हक्कांत लोकमताला प्राधान्य आहे. कायदा व सरकार लोकमतानुवर्ती पाहिजे. स्वराज्य हा लोकांचा जन्मसिद्ध हक्क आहे व ते स्वराज्यही लोकराज्य असले पाहिजे, हा टिळकांचा दुसरा सिद्धांत. यात आधुनिक लोकशाही, स्वातंत्र्य व लोकसत्ताक राज्यपद्धती यांचा टिळकांनी स्वीकार केला होता, असे दिसेल. तिसरे टिळक-सूत्र म्हणजे औद्योगिक, राजकीय परिवर्तन करण्यासाठी राज्यशक्तीच आवश्यक आहे व जगातील आधुनिक राष्ट्रांच्या पंक्तीत भारत बसावयाचा असेल, तर तो राष्ट्र म्हणून जपान, जर्मनी, अमेरिकेसारखाच आधुनिक व समर्थ झाला पाहिजे. चौथे टिळकसूत्र म्हणजे ही लोकमतानुवर्ती लोकशाही समुदायाच्या मतावर, प्रवृत्तीवर आधारलेली असते. तेव्हा लोकमत हे लोकशाहीतील आद्य दैवत असते. ते आपल्या बाजूला वळवून सामाजिक परिवर्तन किंवा राजकीय बदल घडवून आणता येतो. पाचवा सिद्धांत-समाजाच्या परिवर्तनाचे उदाहरण व शिक्षण हे मार्ग आहेत. समाजाला पोटाशी धरून, त्याच्याशी समरस होऊन त्याचे मतपरिवर्तन केले, तरच समाजसुधारणा होते. केवळ तार्किक हल्ले करून ती होत नाही.

प्रतियोगी सहकारिता

टिळकांनी राजकीय सुधारणांच्याबाबत व इंग्रज सरकारशी वागताना प्रतियोगी सहकारितेचे अगदी नवे धोरण पुरस्कारले होते. हा सिद्धांत कोणत्याही प्रतिपक्षाशी वागताना अनुसरण्यासारखा आहे. म्हणून ती आता धोरणविषयक राजकीय संकल्पनाच झाली आहे. टिळक-तत्त्वज्ञानाचे हे सहावे सूत्र मानावयास पाहिजे. राज्यशास्त्राच्या दृष्टीने व आधुनिक लोकशाहीतील विरोधी पक्षांच्या व वृत्तपत्रांच्या दृष्टीने टिळकांनी इंग्रजी सत्तेविरुद्ध केलेल्या लढ्यात जी मूलभूत तत्त्वे मान्य झाली, तोही टिळक-विचाराचा आधारभूत सिद्धांत मानावयास हरकत नाही. त्यातील पहिले तत्त्व म्हणजे सरकारविरुद्ध टीका करणे म्हणजे राज्याविरुद्ध टीका करणे नव्हे किंवा त्याबद्दल अप्रीती (Disaffection) निर्माण करणे नव्हे. दुसरे तत्त्व असे की, सरकार म्हणजे नोकरशाही नव्हे. नोकरशाहीविरुद्ध टीका करण्याचा वृत्तपत्रांना हक्क आहे. तशी टीका

करणे म्हणजे सरकारवर अविश्वास व्यक्त करणे नव्हे. लोकशाही स्वातंत्र्याच्या दृष्टीने टिळकांनी प्रस्थापित केलेल्या या वृत्तपत्रीय हक्कांना महत्त्वाचे स्थान आहे. हे टिळक-विचाराचे सातवे आधारसूत्र मानता येईल.

धोरणपद्धतीची सूत्रे

टिळकांची धोरणपद्धती किंवा कार्यपद्धती हीही सदैव अनुकरणीय ठरणारी आहे. 'मिळतील ते हक्क घ्या व उरलेल्यांसाठी झगडत राहा', हा एक टिळकांचा धोरण-विषयक मार्गदर्शक सिद्धांत आहे. हक्क-संपादनासाठी सतत व नित्य संघर्ष करावा लागतो. मिळेल ते पदरात पाडून घेऊन त्याचाच उपयोग अधिक हक्क मिळविण्या-साठी करावा लागतो, हे राजकीय सामाजिक वा आर्थिक व्यवहाराचे मार्गदर्शक तत्त्व होऊ शकते. दुसरे मार्गदर्शक तत्त्व, लोक–संघर्षाचे आहे. सगळा समाज हक्क-संपादनाच्या लढ्यात सहभागी करून घ्यावयाचा असेल, तर समाजाच्या फार पुढे जाऊन चालत नाही. समाजाची जेवढी कुवत असेल, त्याच्या एक-दोन पावले पुढे उभे राहिले, तर तो नेता एकाकी पडत नाही. समाज त्याच्या मागून जात राहतो. समाज हुतात्म्यांचा आदर करतो, पूजा करतो, पण समाज हौतात्म्य पत्करू शकत नाही. ती हाराकिरी ठरते. टिळकांनी लोकसंघर्षाची जी नीती ठरविली होती, ती या प्रकारची होती. टिळकांच्या या भूमिकेतून हक्क-विस्ताराची नीती त्यांनी अवलंबिली. टिळकांचे धोरणविषयक महत्त्वाचे सूत्र म्हणजे 'साधनानां अनेकता'. टिळकांनी केलेल्या स्वराज्याच्या आंदोलनात लोकांत असंतोष पसरविण्यासाठी विविध साधनांचा सतत उपयोग केला. शस्त्राचारी क्रांतिकारकांशीही संबंध ठेवले. शस्त्राचारी आंदोलनाच्या मर्यादा माहीत असूनही लोकमानस चेतवण्यासाठी त्याचा उपयोग असतो, हे त्यांना मान्य असावे. म्हणूनच त्यांनी क्रांतिकारकांच्या कृत्यांचा कधी निषेध केला नाही. सैन्यातही असंतोष पसरविणे आवश्यक आहे, इकडेही टिळकांचे लक्ष होते. परदेशात आपली आघाडी पाहिजे, असे अगदी शेवटपर्यंत टिळकांना वाटत होते. या सर्वांचे कारण अनेक साधने वापरण्यावर टिळकांचा असलेला विश्वास हेच आहे. अर्थात ही सगळी धोरणविषयक तत्त्वे त्यांनी प्रत्यक्ष कोठे लिहिलेली नाहीत. त्यामागचा हा विचार अनुभवसिद्ध आहे. तो आता इतिहाससिद्ध आहे. म्हणून तो टिळकविचाराचाच एक महत्त्वाचा भाग मानला पाहिजे.

सारांश, टिळकांच्या विचारांची व्याप्ती मोठी होती. टिळकांचे व्यक्तित्व एकसंघ होते. त्या काळी इंग्रजी शिक्षणामुळे भंगलेल्या व्यक्तित्वाची, दिशासंभ्रमात सापडलेली, एकांगी विचार करणारी, इंग्रजी शिक्षणाने सामान्य जनतेपासून स्वतःला वेगळी समजणारी माणसे समाजाचे नेतृत्व करीत होती. टिळकांचे व्यक्तित्व वेदांती परंपरेच्या मुशीत तयार झालेले अभंग व्यक्तित्व होते. पाश्चात्त्य विज्ञान, लोकशाही मूल्ये, संस्थात्मक

जीवन यांचा त्यांनी स्वीकार केलेला होता. त्यामुळे ते बहिर्मुख व गतिमान राजकीय व्यक्तित्व होते. या सर्वांचा टिळकांच्या विचारांवर परिणाम झाला. ते चौफेर, सखोल, सूक्ष्म विचार करून तयार झाले. खुद्द टिळकांनीच म्हटले होते, "व्यक्ति काय किंवा संस्था काय, दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे परिस्थिति मान्य करून तिच्याशीं तडजोड करणें आणि दुसरा प्रकार म्हणजे खंबीरपणें व चिकाटीनें आपल्या मार्गानें लढत जाऊन अनुकूल परिस्थिति निर्माण करणें. आणि आपलीं मतें लोकांच्या गळी उतरविणें. स्वार्थत्यागाची नैतिक शक्ति दुसऱ्या प्रकारासाठीं लागते. पहिल्यासाठीं नव्हे." हा उतारा टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा दिला त्यावेळी सहकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रातील आहे. (स. टि. खंड ६, पान ७०) हे टिळकांचे जीवनसूत्र होते. टिळक हे अनुकूल परिस्थिती निर्माण करून स्वतःचे विचार लोकांच्या गळी उतरवणारे नेते होते. टिळकांच्या वैचारिक संपदेला कृतीची जोड होती, म्हणूनच त्यांचा विचार हा राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाचा ठरला. ते भारतीय राष्ट्राचे कृतिवंत दार्शनिक झाले.

२

भारतीय राष्ट्रवादाचे तत्त्वचिंतन

टिळकांना भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार मानले जाते. किंबहुना टिळक हे आधुनिक भारताच्या राष्ट्रीय भावनांचे, राष्ट्रीय पुनरुत्थानाचे, साक्षात् राष्ट्रीयत्वाचे प्रतीक होते. टिळकांच्या आयुष्यातील सर्व आंदोलनांचे, वैचारिक वादळांचे, त्यांच्या व्यासंगाचे, संशोधनाचे उद्दिष्ट भारताची राष्ट्र म्हणून पुनर्स्थापना करणे, भारतीयांना त्यांच्या राष्ट्रीय परंपरेची जाणीव करून देऊन राष्ट्रकार्यास प्रवृत्त करणे व भारताच्या त्यावेळच्या परकीय राज्यकर्त्यांना व जगातील इतर राष्ट्रांना भारताची राष्ट्रीय अस्मिता जिवंत आहे, याची जाणीव करून देणे हेच होते. हाच टिळकांचा जीवनातील मुख्य ध्यास होता. टिळकांचा त्यांच्या एकसष्टीनिमित्त पुण्यात जो सत्कार झाला त्यावेळी त्यांनी उत्तरादाखल जे भाषण केले होते, त्यात त्यांनी हाच संदेश जनतेला दिला होता. ते म्हणाले होते, " आज आपणां सर्वांपुढें जें राष्ट्रकार्य आहे तें इतकें मोठें, इतकें व्यापक आणि इतकें जरुरीचें आहे कीं त्याला आपणां सर्वांनीं माझ्यापेक्षा कितीतरी पट निश्चयानें आणि स्फूर्तीनें लागलें पाहिजे. आपली मातृभूमी आपणा सर्वांस या उद्योगास लागण्याबद्दल आवाहन करीत आहे. माझें कर्तव्य म्हणून मी आपणांस शेवटची एवढीच विनंति करीत आहे कीं, मातृभूमीच्या या आवाहनाकडे लक्ष देऊन कोणताही भेदभाव मनात न ठेवता आपण सर्व राष्ट्रदेव होऊ या. " (टिळक चरित्र–न. चिं. केळकर, खंड ३,) सर्व आयुष्यभर राष्ट्राला देव मानून त्याची भक्ती करणाऱ्या टिळकांचे हे उद्‌गार आहेत. ते केवळ त्यांच्या भावनांचे प्रतीक आहेत, एवढेच नव्हे तर त्यांच्या विचार-विश्वाचा तो ध्रुवतारा आहे. म्हणून टिळकांचे राष्ट्रविषयक विचार समजून घेतल्याविना

त्यांच्या विचारांचे मर्मच उकलणार नाही.

टिळकांच्या पिढीची समस्या

टिळकांची पिढी सांस्कृतिक व राजकीयदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीत जन्मली होती. टिळकांच्या आधी इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या भट्टीतून निघालेल्या पिढीतील पुढारी वर्गाने 'पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करणे, हाच भारताच्या अभ्युदयाचा मार्ग आहे,' ही समजूत दृढ करण्याचा प्रयत्न चालविला होता. भारतात आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या आक्रमक धर्मप्रसारामुळे भारताच्या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे, ही भावना त्याकाळच्या नव्या पिढीत बळावत होती. टिळकांनी आपल्या पूर्वीच्या पिढीचे वर्णन स्वतःच पुढे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कार्याचे मूल्यमापन करताना केले होते. त्यांनी म्हटले होते, "शास्त्रीबुवांच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांतील मंडळी प्राचीन आचारविचार किंवा सामाजिक व धार्मिक व्यवस्था यांच्या पूर्व-प्रवर्तकांस मूर्ख ठरवून त्यांच्या जागीं आपण स्थानापन्न होण्याच्या तयारीस लागलेली होतीं. व त्यांचा असा भरंवसा होता कीं, आपल्या मागून आपल्या तालमींत तयार झालेली जी तरुण पिढी येईल ती आपला गौरव करून आपल्यास अभिनव धर्म-संस्थापकांचे किंवा सामाजिक रचना प्रवर्तन करणाऱ्यांचे अढळ स्थान प्राप्त करून देईल!...राष्ट्राच्या अभ्युदयास स्वभाषा, स्वधर्म यावद्दल योग्य अभिमान व प्रेम समाजाच्या पुढाऱ्यांच्या अंगीं असणें किती जरूर आहे, वगैरे गोष्टींचा विचार न करतां अथवा आपली बलाबलता न पहातां त्यांनीं केवळ अभिनव शिक्षणाच्या जोरावर देशसुधारणेची पताका हातीं घेतली होती." (केसरी, २ एप्रिल १९०१, स. टि. खंड ५, पान ९१७) टिळकांनी त्या लेखात असेही म्हटले होते की, "स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वांचें शिक्षण बिलकुल नाहीं आणि परधर्माचेही नाहीं, समाजांच्या परंपरागत बंधनांबद्दल आदर असावयाचा तोहि नाहींसा झालेला आणि दोन-चार बुकें झाल्याबरोबर बऱ्याच मोठ्या पगाराची जागा त्या वेळीं मिळत असल्यानें अधिकारपदाचाहि बराचसा अमल त्यांच्या मनावर बसलेला होता." (केसरी, १९ मार्च १९०१; स. टि. खंड ५, पान ९११) अशा प्रकारच्या बिघडलेल्या वातावरणात वावरणाऱ्या त्या काळच्या पिढीला एक प्रकारचा सांस्कृतिक भग्नपणा किंवा अलगपणा आलेला होता. महाराष्ट्र किंवा बंगालमध्ये इंग्रजी शिक्षितांची ही नवी पिढी या सांस्कृतिक भग्नावस्थेत किंवा स्वत्व विसरावयास लावणाऱ्या शिक्षणाच्या पकडीत सापडली होती. टिळकांच्या पूर्वीच्या पिढीची ही होती सांस्कृतिक बाजू. दुसऱ्या बाजूला राजकीय दृष्ट्या इंग्रजी राज्याचे पहिले कौतुकाचे दिवस संपून नोकरशाहीच्या मग्रुरीचा, जुलमी राज्यकारभाराचा लोकांना अनुभव येऊ लागल्यामुळे राज्यकर्त्यांना भारतीयांची गाऱ्हाणी समजावून सांगण्यासाठी काहीतरी परिणामकारक चळवळ केली पाहिजे,

याची जाणीव होऊ लागली होती. लोकांचे हक्क संपुष्टात येत असून नोकरशहांचे पाश, दृढ होत असल्याची जाणीव जाणत्या पुढाऱ्यांना होऊ लागली होती. यामुळे लोकांच्या हक्कांसाठी नोकरशाहीशी राजकीय संघर्ष अटळ आहे, हे स्पष्ट होऊ लागले होते. भारतीय जनतेच्या राजकीय आकांक्षांचे प्रतीक असणारा भारतीय राष्ट्रवाद अशा रीतीने सांस्कृतिक व राजकीय अशा दोन्ही संघर्षांच्या अवस्थेत उभा होता. सांस्कृतिक आक्रमण व राजकीय पेचप्रसंग अशा दुहेरी कोंडीत देश सापडला होता.

सांस्कृतिक राष्ट्रवादाचे बीज

या राजकीय व सामाजिक परिस्थितीतच त्या काळी भारतात सुरू झालेल्या राष्ट्रीय उत्थानाच्या चळवळीचे बीज होते. १८५७च्या युद्धात स्वधर्म व स्वदेश ही दोन्ही संकटात आहेत, असे स्वातंत्र्ययुद्धाच्या नेत्यांना वाटले, म्हणून या दोन्हींच्या संरक्षणासाठी उठावणी झाली. १८५८ च्या राणी व्हिक्टोरियाच्या जाहीरनाम्यात ब्रिटिश सरकारने धर्मरक्षणाचे, धर्मदृष्ट्या सरकार तटस्थ राहील असे जे आश्वासन दिले होते, त्याचे कारण आपल्या धर्मावर ब्रिटिश राज्यामुळे संकट आले आहे, अशी हिंदू-मुसलमानांची भावना प्रबळ झाली होती, हेच आहे. पण ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी नंतरच्या काळात केलेले धर्मप्रसाराचे प्रयत्न व समाजात झालेली काही धर्मांतरे यामुळे हिंदू धर्मातच काय सुधारणा करता येईल, याचा विचार त्या काळच्या समाजधुरीणांनी सुरू केला होता. बंगालमध्ये राजा राममोहनराय, स्वामी विवेकानंद, उत्तर भारतात स्वामी दयानंद, महाराष्ट्रात विष्णुबुवा ब्रह्मचारी आदि नेत्यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराला आळा घालणारे व वैदिक संस्कृतीचे श्रेष्ठत्व समाजाला समजावून सांगणारे प्रबोधनाचे कार्य सुरू केले. त्यासाठी स्वतंत्र संस्था स्थापन केल्या. स्वतःचा अनुयायी वर्ग निर्माण केला. ब्राह्मोसमाज, आर्य समाज, प्रार्थनासमाज, या सर्व चळवळी धर्मनिष्ठ प्रबोधनाच्या चळवळी होत्या. हिंदू प्रबोधन किंवा हिंदूधर्माचे आधुनिकीकरण किंवा पुनर्संघटन हेच त्यांचे उद्दिष्ट होते. अर्थात या सर्वांत एकवाक्यता नव्हती. पण त्या चळवळी निधर्मी नव्हत्या, हे महत्त्वाचे आहे. भारताच्या आधुनिक राष्ट्रवादाला सांस्कृतिक राष्ट्रवादाचे स्वरूप देण्यात येत होते. भारतात धर्म ही समाजनियंत्रक व समाजधारक शक्ती आहे व तिच्यात परिवर्तन झाल्याविना भारताच्या राष्ट्रीय एकतेला बळकटी येणार नाही, या श्रद्धेतूनच हे सर्व प्रयत्न चालू होते.

टिळकांची राष्ट्रकल्पना

टिळकांच्या प्रारंभीच्या लेखनात, शिवाजी स्मारकाच्या चळवळीबद्दल किंवा काँग्रेससंबंधी त्यांनी वेळोवेळी केलेल्या मतप्रदर्शनात राष्ट्रीयत्वाची चर्चा केलेली आढळते. टिळकांनी भारताच्या राष्ट्रीयत्वाचा विचार प्रासंगिकरीत्या केलेला असला, तरी त्यांच्या

राष्ट्रविषयक संकल्पनेचा एक आकृतिबंध तयार होऊ शकतो. त्या संकल्पनेची सूत्रे त्यांनी वेळोवेळी मांडली होती. ती सूत्रे पूर्वेतिहास, त्यांचा सांस्कृतिक व धर्मविचार व त्यांचे राजकारण यांच्यावर आधारलेली होती. टिळकांच्या सर्वच राजकारणाला पाश्चात्य राष्ट्रे, जपान, चीनसारखी आशियाई राष्ट्रे, आयर्लंड व अमेरिका यांचा राष्ट्रानुभव यांची पार्श्वभूमी आहे. तशीच त्यांच्या राष्ट्रविषयक विचारांनाही ती आहे. 'भारत हे प्राचीन राष्ट्र आहे, त्याचे ऐक्य हे केवळ समान राजकीय अनुभव किंवा आकांक्षा यांच्यातून निर्माण झालेले नाही,' हे त्यांचे मत होते. सारांश, टिळकांची राष्ट्रकल्पना केवळ आदर्शवादी नव्हती, व्यवहारनिष्ठ होती. तिचा गाभा ऐतिहासिक होता. राष्ट्रकल्पना भूत–काळाशी बद्ध असली, तरी राष्ट्रवाद ही उत्क्रांत होणारी, विकसनशील, गतिमान कल्पना आहे, ही टिळकांची श्रद्धा होती. मातृभूमीची भक्ती हा तिचा आधार होता. ती सांस्कृतिकदृष्ट्या समावेशक होती. राष्ट्रवादाची घडण करण्यासाठी, विविध समाज राष्ट्रीय जाणिवेच्या प्रवाहात संमीलित करण्यासाठी राजकीय समानहितत्त्व, समान आकांक्षा या जशा उपयोगी पडतील, तसेच हिंदूंची धर्ममूलक सामाजिक एकता व उदार वेदांती दृष्टिकोण हेही भिन्न धर्मी लोकांना राष्ट्रीय प्रवाहात समाविष्ट करून घेण्यास उपयोगी पडतील, असा टिळकांचा विश्वास होता.

एकात्म सांस्कृतिक राष्ट्र

भारताच्या राष्ट्रीयत्वाचे स्वरूप इतिहासकाळात कसे होते, याची चर्चा टिळकांनी एक-दोन लेखांत केलेली आढळते. टिळकांना प्राचीन काळात भारत हे बहुभाषी, बहुराज्यी पण सांस्कृतिकदृष्ट्या एकात्म असलेले राष्ट्र (multi–state nation) होते, असे वाटत असे. टिळकांनी १९०५ साली 'महाभारता' वर जे लेख लिहिले होते, त्यांत त्यांच्या या कल्पनेचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावेळी टिळकांनी म्हटले होते, " एकछत्री इंग्रजी राज्य या देशांत झाल्यानें निरनिराळ्या प्रांतांतील लोकांस आपण एकाच राष्ट्राचे अवयव आहों, अशी नवी कल्पना येऊं लागली आहे, असें कित्येकांचें म्हणणें आहे. राजकीय दृष्टीनें पाहिलें तर यांत बराच अर्थ आहे, नाहीं असें नाहीं. " (स.टि.खंड ५, पान ७०८) याच लेखमालेत टिळकांनी पुढे म्हटले होते की, " वैदिक धर्म, भारत धर्म, ब्राह्मण धर्म अथवा हिंदु धर्म–त्यास कोणतेंहि नांव द्या–याचेंच त्या वेळीं (महाभारतकाळीं) आसेतुहिमाचलापर्यंत प्रावल्य होतें. भारतवर्षातील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे राजे राज्य करीत असत. परंतु धर्मदृष्ट्या ते सर्व एक होते आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे भारत वर्ष हें त्या वेळचें एक मोठें हिंदुराष्ट्र होतें. भारतधर्मानुसारी लोकांच्या महासागरावर निरनिराळ्या प्रांतांतील राजांच्या लहानमोठ्या लाटा भारतकाळीं उसळलेल्या नजरेस येत. अशा परिस्थितींत राष्ट्रांतील पुढारी पुरुषांचें कर्तव्य हल्लीं राष्ट्राच्या पुढाऱ्यांचें जे आपण कर्तव्य समजतों त्याहून फार भिन्न

होतें. निरनिराळ्या धर्मांचे किंवा निरनिराळ्या रंगांचे लोक त्यांस एक करावयाचे नव्हते. हिंदुस्थानचे मूळचे रहिवासी जे अनार्य लोक त्यांचा या पूर्वीच हिंदु धर्मांतील चातुर्वर्ण्यांत समावेश झालेला होता; आणि उत्तरेकडून हिंदुस्थानांत आलेले जे आर्य लोक त्यांच्याशी यांचा शरीरसंबंध होऊन दोघांच्या संमेलनानें एक प्रकारचें नवीनच राष्ट्र तयार झालेलें होतें." (केसरी, ३० मे १९०५, स. टि. खंड ५, पान ७५०–७५१).

असेच विचार टिळकांनी 'जुनीं व नवीं साम्राज्यें' या विषयावर अमरावती येथे केलेल्या भाषणात व्यक्त केले होते. ते म्हणाले होते, "एका जातीचे व एका आचार-विचारांचे लोक एका विवक्षित प्रदेशांत समुदायानें असणें म्हणजे राज्य आणि अशीं पुष्कळ राज्यें एखाद्या प्रतापी राजाच्या ताब्यांत असलीं म्हणजे तें साम्राज्य होत असे. हिंदुस्थानांत पहिल्यानें निरनिराळ्या आचारविचारांचे लोक होते. हिंदुस्थानांतील राजांना '५६ देशचे राजे' असें म्हणत असत. या सर्वांचें ऐक्य होण्यास वैदिक धर्मच कारणीभूत झाला खरा, तरी हिंदुस्थानांत एकच राज्य असें कधींहि नव्हतें. महाराष्ट्र, गुर्जर राष्ट्र, पांड्य राष्ट्र, चौलराष्ट्र, बंगाल, पंजाब वगैरे प्रांतांस निरनिराळीं राज्यें व राजे असत. या राज्यांपैकी एखाद्या राज्यांत एखादा प्रतापी राजा निघाला, तर बाकीच्या राजांकडून करभार घेऊन त्यांस तो मांडलिक राजे करी. पण यापेक्षां पलीकडे त्या वेळची साम्राज्याची कल्पना गेली नव्हती. पांडवांच्या वेळचें साम्राज्य घ्या किंवा रघूचें साम्राज्य घ्या, इतर राजांनीं मांडलिक बनून 'आपलें यश गावें व वर्चस्व कबूल करावें', यापेक्षां जास्त त्या वेळच्या सम्राटांची महत्त्वाकांक्षा नव्हती. करभारानें जें द्रव्य मिळे तें हे देखील चक्रवर्ति राजे वेळोवेळीं प्रजेस वांटून देत. जिंकलेल्या देशांतील लोकांचा ते समूळ उच्छेद करीत नसत किंवा त्यांचे सर्व स्वातंत्र्यहि हिरावून घेत नसत." (केसरी, २२ ऑगस्ट १९०५, स. टि. खंड ६, पान ७१५–७१६) टिळकांच्या विवेचनाचा निष्कर्ष हाच की, पूर्वीच्या काळी भारत सांस्कृतिकदृष्ट्या एकात्म असलेले पण विविध राज्ये असणारे राष्ट्र होते. तसेच चिं. वि. वैद्यांच्या 'महाभारता'वरील पुस्तकाचे परीक्षण करण्यासाठी १९०५ साली लिहिलेल्या लेखमालेत टिळकांनी रामायण-महाभारताचे सांस्कृतिक व राष्ट्रीय एकतेच्या दृष्टीने जे महत्त्व आहे, त्याची चर्चा केली होती. त्यात म्हटले होते, "हिमालयापासून सेतुबंधापर्यंत निरनिराळ्या प्रांतांतील हिंदु लोकांच्या आचारांत जें कांहीं साम्य आहे तें रामायण किंवा महाभारत या आर्ष महाकाव्यांमुळेंच निर्माण झालें आहे व आजमितीस जागृत आहे. बंगाल्यांत जा, काश्मिरांत जा किंवा मद्रासेत जा. रामायण व महाभारतांतील कथा, उपकथा किंवा आख्यानें हीं लोकांस सारखींच आवडतात व श्रवणानें एकसारखेच विचार त्यांच्या मनांत उत्पन्न होऊन भरतभूमीच्या राष्ट्रीय ऐक्यत्वाची साक्ष देतात. महाभारत हा राष्ट्रीय ग्रंथ आहे आणि हा आधार सुटला असतां राष्ट्राच्या पुढील प्रगतीस जें एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त व्हावयास पाहिजे, तें प्राप्त व्हावयाचें नाहीं, असा चांगल्या

विद्वानांचा समज झाला आहे." (केसरी, १४ मार्च १९०५, स. टि. खंड ५, पान ७०७–७०८.)

आधुनिक राष्ट्रवादाची उत्क्रांती

पण ऐतिहासिकदृष्ट्या टिळकांची भारतीय राष्ट्रवादाबद्दल ही कल्पना असली तरी ज्या काळात टिळक जन्मले व ज्या काळाचे ते राजकारण करीत होते त्याची परिस्थिती काय आहे, याची जाणीव त्यांना होती. युगप्रेरणा, कालगती या दोहोंचेही भान टिळकांच्या राजकीय विचारात असे, याचे हे गमक आहे. ब्रिटिश राज्यामुळे नवी राजकीय परिस्थिती निर्माण झाली असून, "राणी सरकारच्या राज्यछत्राखालीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोक एकवटले जाऊन त्यांस एकराष्ट्रीयत्व येत आहे. एक धर्म, एक राजा, एक भाषा हीं राष्ट्रीयत्वाचीं प्रधान अंगें आहेत. पैकीं इंग्रज सरकारच्या राज्यसत्तेखालीं शेवटचीं दोन अंगें आपणांस चांगल्या रीतीनें प्राप्त झालीं आहेत." (केसरी, ३ सप्टेंबर १८९५, स. टि. खं. ४, पान ४). असे त्यांनी म्हटले होते.

समान प्रशासन व समान राजकीय आकांक्षा यांच्या आधारे भारतीय राष्ट्रवादाला नवे स्वरूप देता येईल, अशी टिळकांची समजूत होती. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठाचा व कार्याचा या दृष्टीने उपयोग होईल असे त्यांना वाटत असे. वेळोवेळी आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचा हा विचार त्यांनी मांडला होता. सर्वात प्रथम १८९३ साली महर्षी दादाभाई नौरोजी हे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निवडून आल्यानंतर अगदी प्रथम ते जेव्हा मुंबईस आले तेव्हा दादाभाईंचे वर्णन टिळकांनी 'नव्या राजधर्माचे उपदेशक' असे करून म्हटले होते, "हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हा सर्वांचें बंधुत्वाचें नातें आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें, वा स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा धर्म हें दादाभाईंच्या चरित्रावरून पूर्णपणें व्यक्त होत आहे." (केसरी, १९ डिसेंबर १८९३, स. टि. खंड ३, पान १६) या नव्या राजधर्माच्या स्थापनेस व विकासास ब्रिटिश राज्य कसे कारणीभूत व सहाय्यभूत होत आहे हे स्पष्ट करताना टिळकांनी लिहिले होते, "महाराणींच्या सार्वभौम सत्तेखालीं सर्व हिंदुस्थानभर शांतता होऊन हिंदु–मुसलमान, पार्शी, शीख वगैरे सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांस त्यांनीं एकाच वर्गांत ओढून त्यांच्या हिताहिताचा एक संबंध करून टाकला आहे. इंग्रजी राज्यापूर्वी कोठें मराठे, कोठें मुसलमान, कोठें शीख व कोठें रजपूत आपापल्या लायकीप्रमाणें राज्यवैभवाचा उपभोग घेत अगर दुसऱ्याचे अंकित होऊन राहात. आमच्या दुर्दैवानें अगर सुदैवानें तसा प्रकार आतां राहिला नाहीं. राज्यवैभव सर्व इंग्रज लोकांनीं आपल्या हातांत राखलें आहे, व हिंदु, मुसलमान व पार्शी वगैरे

निरनिराळ्या जातींतील लोकांच्या गुणदोषांत कितीहि अंतर असलें तरी त्या सर्वांस 'नेटिव्ह' या एकाच वर्गांत घालून जे त्यांस काय अधिकार अथवा हक्क द्यावयाचे तेहि सारखेच दिले आहेत. सारांश, राज्यकर्ते व प्रजा असे राजकीयदृष्ट्या दोनच वर्ग हल्लीं हिंदुस्थानांत आहेत, असें म्हटलें तरी चालेल. निरनिराळ्या जातींतल्या लोकांस आपली खरी स्थिति कळू लागेपर्यंत जातिजातींतील पूर्वापार चालत असलेली वैमनस्यें नष्ट व्हावयाचीं नाहींत, हें खरें आहे, तथापि तसा दिवस येण्यास फार अवकाश लागेल, असें हल्लींच्या चिन्हांवरून दिसत नाहीं. सर्व जातींतील सुशिक्षित लोक एकदिलाचे आहेत हें काँग्रेससारख्या संस्थांवरून व मुंबईतील दंग्यांच्या हकीगतीवरूनहि व्यक्त होत आहे; व इंग्रज सरकारचें राज्य आणखी कांहीं दिवस राहिल्यास हें आमचें राजधर्मबंधुत्व उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेरीस आम्ही व राज्यकर्ते असे दोनच लौकिकदृष्ट्या वर्ग होतील, अशी आमच्या राजकर्त्यांची आणि आमची उमेद व आशा आहे."...

"आमच्या राज्यकर्त्यांचें सामर्थ्य इतकें जबर आहे कीं, वर सांगितलेल्या जातींपैकीं कोणाचाहि निरर्थक शिरजोरपणा ते चालू देणार नाहींत. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जें काय करणें असेल तें त्यांनीं एकदिलानेंच केलें पाहिजे, मग कोणाचें सामर्थ्य कमी असो वा कोणाचें जास्त असो, तो भेद लक्षांत घ्यावयाचा नाहीं. इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचे बंध तुटून पुन्हा त्यांतील लाकडें निरनिराळीं होऊं नयेत, अशी व्यवस्था करण्याचें सामर्थ्यही त्यांत आहे." (केसरी, १९ डिसेंबर १८९६, स. टि. खंड ३, पान १३–१४).

पूर्वेतिहासाचे स्मरण

याच सुमारास टिळकांनी शिवाजी उत्सव सुरू केला. त्यावेळी शिवाजी हा केवळ महाराष्ट्राचा किंवा हिंदूंचा महापुरुष नसून तो राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक असलेला व भारतीयांना पूर्वेतिहासाचे स्मरण करून राष्ट्रीय भावना दृढ करणारा पुरुष आहे, अशी भूमिका टिळकांनी घेतली होती. त्याही संदर्भात टिळकांनी भारताच्या राष्ट्रीयत्वाचा विचार केलेला होता. त्यांनी म्हटले होते, "ज्यास म्हणून इतिहासाची यत्किंचित् ओळख आहे; स्वराज्य, स्वधर्म म्हणजे काय व तीं शेंकडों वर्षें नष्ट झाली असतां त्यांची पुनः संस्थापना करण्यास कोणत्या प्रकारचें धैर्य, वीर्य, उत्साह आणि विचार वगैरे अलौकिक गुण संस्थापकाच्या अंगीं असावे लागतात, हें जो जाणतो; अथवा एखादें राष्ट्र नामशेष होऊन रसातळास जाण्याचा प्रसंग आला असतां वराहरूपी महाविष्णूने प्रलयकाळीं ज्याप्रमाणें पृथ्वीस दंताग्रावर धरून तिचे रक्षण केलें, त्याप्रमाणें आपल्या राष्ट्रीयत्वाचें रक्षण करण्यास अवतारी पुरुषांची कोणत्याहि देशांत किती गरज असते हें ज्यास अवगत आहे, त्यांस शिवाजीमहाराजांचें स्मारक करण्याबद्दल

कोणींहि सुचविलें पाहिजे असें नाहीं. राष्ट्रामध्यें आपलेपणाची जागरूकता रहाण्यास त्या त्या राष्ट्रांतील पूर्वी झालेल्या पराक्रमी पुरुषांचें लोकांस नेहमीं स्मरण असलें पाहिजे, किंवा दिलें पाहिजे. हें तत्त्व सगळ्या जिवंत राष्ट्रांस हल्लीं पूर्णपणें मान्य झालेलें आहे. आम्हीच जर तें विसरलों, तर तें आमच्या निद्रावस्थेचें अगर दुर्दैवाचें लक्षण होय." (केसरी, २ जुलै १८९५, स. टि. खंड ४, पान ३०).

टिळकांनी दुसऱ्या एका लेखात म्हटले होते, "ज्याप्रमाणें आम्ही आपल्या वाडवडिलांचें स्मरण कायम ठेवून, त्याच्या योगें आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लौकिक राखण्याचें एक साधन करून ठेवितों तद्वतच राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहाण्यास एक चांगलें साधन आहे. एकराष्ट्रीयत्व म्हणजे कांहीं दृश्य पदार्थ नव्हे. ही एक प्रकारची कल्पना असून, ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकविण्यासारखी आहे; व ज्या, ज्या राष्ट्रांनीं ती कायम राखिली आहे त्यांनीं आपल्या ऐतिहासिक थोर पुरुषांच्या इतिहासाची या कामीं योग्य मदत घेतली, असें थोड्या विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. सर्व लोकांच्या आदरास पात्र झालेल्या जितक्या अधिकाधिक वस्तु असतात, त्या मानानें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना अधिकाधिक दृढ होत जाते, हें तत्त्व निर्विवाद आहे; व राष्ट्रांचे जे खरे हितकर्ते आहेत ते अशीच कांहीं रचना करितात कीं, त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें एका गोष्टीकडे लागून लोकांस आपण एक राष्ट्रांतील व्यक्ति आहों, असें वाटूं लागावें. श्रीरामदास स्वामींनीं 'मराठा तेवढा मेळवावा' असा जो उपदेश केला आहे, त्यांतील बीज हेंच होय. कोणत्याहि लोकांचें राष्ट्र बनण्यास त्या सर्व लोकांस पूज्य अशा कांहीं वस्तु असाव्या लागतात; व देशकालानुसारें अशा कांहीं गोष्टी लोकांपुढें मांडणे हेंच प्रत्येक देशाभिमान्याचें कर्तव्य आहे." (केसरी, २८ एप्रिल १८९६, स. टि. खंड ४, पान ३६).

"विश्वकुटुंबियत्वाची कल्पना दिसावयास फार मोहक आहे खरी, परंतु केवळ अशा कल्पनेच्या पायावर रचलेली राष्ट्रीयत्वाची इमारत शिखरास पोहोचल्याचें जगाच्या इतिहासांत कोणीं तरी पाहिलें किंवा ऐकलें आहे काय? कोणत्याहि शक्तीचा परिणाम होण्यास तिला आधारभूत असा कांहीं तरी विवक्षित उपस्तंभ (Fulcrum) लागतो, हें एक भौतिक शास्त्रांतील ठरीव तत्त्व आहे. प्रसिद्ध ग्रीक शास्त्रवेत्ता आर्किमिडीज याचें म्हणणें असें होतें कीं, हा भूगोल उलथून इकडचा तिकडे टाकण्याएवढी शक्तिहि कदाचित् उत्पन्न करतां येईल. परंतु ज्याच्या आधारानें या शक्तीचा परिणाम व्हावयाचा असा उपस्तंभ (Fulcrum) कोठेंहि नाहीं, त्यामुळे ती शक्ति व्यर्थ आहे. हीच गोष्ट इतरत्रहि लागू पडते. प्रपंच किंवा परमार्थ यांमध्यें मनुष्याच्या कोणत्याहि मानसिक शक्तीचा परिणाम तिला आधारभूत असा एखादा विवक्षित हेतु मिळाल्याशिवाय बिलकुल व्हावयाचा नाहीं. उदाहरणार्थ, प्रेमबुद्धि ही एक चांगली शक्ति आहे. परंतु सर्वच जगाविषयीं समानतेनें आपण प्रेमबुद्धि बाळगूं, असें म्हणणाऱ्या सद्भावी

परंतु व्यवहारशून्य मनुष्यास आपल्या प्रेमबुद्धिरूप शक्तीचा दृश्य परिणाम जगांत कधींहि करून दाखवितां येणार नाहीं. "...

स्वत्वच राष्ट्रीयत्वाचा पाया

" तात्पर्य, स्वत्वबुद्धि जागृत झाल्याशिवाय सद्भाव सुफल परिणामीं होणार नाहीं हें निर्विवाद आहे; व हें स्वत्वच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा मूळ पाया होय. या स्वत्वाच्या सीमेचा परिच्छेद ठरविणें हें काम महत्त्वाचें आहे. सर्व जग हेंच आपलें कुटुंब किंवा राष्ट्र असें मानलें असतां, आपल्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु दुसऱ्या पक्षीं पहातां आपण केवळ आपणापुरतेंच पाहूं लागलों तरीहि कांहीं व्हावयाचें नाहीं. म्हणून एकपक्षीं दूरान्वित लोक वगळून अलीकडे अलीकडे येऊं लागलें असतां, व दुसरेपक्षीं आपण, आपलें कुटुंब व आपला समाज अशा रीतीनें आपली स्वत्व-बुद्धि विस्तृत करीत गेलेलें असतां राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या परिच्छेदाची बरोबर रेषा आपणास कोठें तरी सापडलीच पाहिजे. राष्ट्रीयत्वाचा मुख्य घटक म्हटला म्हणजे समानहिततत्व हा होय; व हें समानहिततत्व जेथें सर्वांत अधिक प्रमाणानें साध्य होईल तेथेंच परिच्छेदाची रेषा बरोबर पडेल. परंतु हें समानहिततत्व मनुष्यें एकाच धर्माचीं किंवा एकाच चतुस्सीमेंत रहाणारीं किंवा एकच भाषा बोलणारीं असलीं म्हणजे हटकून साधतेंच असें नाहीं. चतुस्सीमेसंबंधानें पाहिलें असतां हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांचें ऐक्य केवळ आपण एका देशांत राहणारे यामुळें कधीं तरी झालें होतें काय ? "

समानहित तत्वाची चतुस्सीमा

धर्म हीसुद्धा समानहिततत्वाची चतुस्सीमा होऊ शकत नाही, हे खिस्ती व बौद्ध असलेली अनेक राष्ट्रे आहेत, यावरून सिद्ध होते, असे सांगून टिळक म्हणाले होते, " समानहिततत्व हें केवळ धर्मावरच, चतुस्सीमेवर किंवा भाषेवरहि अवलंबून नाहीं व यामुळें राष्ट्रीयत्वाच्या परिच्छेदाचा बिंदु परिस्थितीप्रमाणें बदलत जाईल, तो कधींहि अढळ असणार नाहीं. व आपआपल्या परिस्थितीप्रमाणें स्वत्व राखण्यास वर सांगितलेल्या धर्म, चतुस्सीमा, भाषा, पूर्वेतिहास वगैरे गोष्टींपैकीं राष्ट्रीयत्व सिद्धीकरतां सर्वांत अधिक अनुकूल असेल त्या गोष्टीचा अवलंब करून, त्यावर जो तो आपल्या देशकार्याचा पाया रचण्याचा प्रयत्न करितो. जगाच्या इतिहासांत राष्ट्रीयत्वाची कल्पना पुढें आणण्यास या सर्व गोष्टींचा वेळोवेळीं उपयोग करून घेतल्याचीं उदाहरणें आढळून येतात. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय होण्यास लोकशिक्षण, स्वाभिमान, स्वार्थत्याग-बुद्धि, वगैरे जी इतर तयारी लागते ती झाली म्हणजे मग सर्व सैन्याची नजर एका ठिकाणीं आकृष्ट होण्यास ज्याप्रमाणें लढाऊ निशाणांचा उपयोग होतो त्याचप्रमाणें

राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा प्रसार होण्यास धर्म, भाषा, देशाभिमान, पूर्वेतिहास स्मरण यांपैकीं कोणती ना कोणती तरी गोष्ट उपयोगी पडते. एखाद्या पेल्यांत बर्फ करण्याकरितां पाणी घालून त्यामध्यें एखादी काठी उभी करून ठेवावी व त्या पाण्याची उष्णता कृत्रिम उपायांनी हळू हळू कमी करीत जावें व असें होतां होतां असा एक क्षण येऊन पोहोचतो कीं, त्या पाण्यास जरा हलविलें कीं, एकदम त्याचा घट्ट गोळा बनून त्या काठीस टांगून राहतो. राष्ट्रीयत्व बनविण्याची कृति ही कांहीं अंशीं वरीलप्रमाणेंच आहे. त्यास मूळ आधारभूत म्हणून कोणत्या ना कोणत्या तरी समाजप्रिय अशा गोष्टीची योजना करावी लागते."...

आधुनिक भारतीय राष्ट्रवाद

"काँग्रेस-सभा ही एका अर्थानें राष्ट्रीय संस्था आहे खरी व हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांचें राजकीय हितानहिताचें कारण ब्रिटिश राज्य हें एकच असल्यामुळें त्यांच्या राजकीय चळवळीचें साधन राष्ट्रीय सभा हें मानलें जात आहे हें ठीकच आहे. परंतु केवळ राष्ट्रीय सभेमध्यें निरनिराळें ठराव पास केल्यानें, फार काय पण ते ठराव उद्या अमलांत आले असेंहि धेऊन चाललें तरी तेवढ्यानें मराठे, पंजाबी, बंगाली वगैरे निरनिराळ्या लोकांचें राष्ट्रीयत्व सर्वांशीं सिद्ध झालेंच ही समजूत चुकीची आहे. राजकीयदृष्ट्या हितानहित एकच धेऊन चाललें तरी जातिहित, समाजहित, धर्मासंबंधीं हित हें एकच आहे असें नाहीं, व वास्तव वरील प्रत्येक लोकांनीं आपला धर्मपंथ, आपली समाजपद्धति, आपलें शिक्षण, आपली भाषा, आपलें वाङ्मय, आपला पूर्वेतिहास, आपल्यांतील विभूति, आपला व्यापार–उदीम वगैरे बाबतींत आपण एकमेकांहून निरनिराळे आहोंत असें जाणून व राष्ट्रीयत्वाच्या उदयास अवश्य असलेली अहंकारबुद्धि बाळगून उद्योगास लागलें पाहिजे. पाणिनीनें ज्याप्रमाणें कांहीं विवक्षित कारणाकरतां 'कुत्रा, तरुण मनुष्य व इंद्र' ही सर्व 'श्वयुवमघोनाम तद्धिते' या सूत्रांत घातलीं त्याचप्रमाणें केवळ यदृच्छेनेंच ब्रिटिश राज्यरूपी सूत्रांत हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, बंगाली व मद्रासी वगैरे एक वेळीं निरनिराळे राष्ट्रीयत्व अनुभविलेल्या लोकांची सांगड घातलेली आहे. एवढ्यावरूनच त्यांचें राष्ट्रीयत्व सर्वांशीं एक झालें असें मानणें हें अगदी चुकीचें होईल. जसें व्यक्तीचें प्रारब्ध निरनिराळें आहे तसेंच हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचें प्रारब्धही निरनिराळें आहे व पुढेंहीं कदाचित् निरनिराळें होईल, हें सूक्ष्म दृष्टीनें हिंदुस्थानचा इतिहास वाचणाराच्या ध्यानांत आलेंच पाहिजें." (केसरी, २३ एप्रिल १९०१, स. टि. खंड ५, पान ५०४–५०९)

अमेरिकेसारख्या संघराज्यात जी राष्ट्रीय भावना आढळते तशाच प्रकारे भारताची राष्ट्रीयता राहील, हा मुद्दा या विवेचनातून टिळकांनी सूचित केलेला असला तरी त्यांनी त्याच वेळी हेही स्पष्ट केले होते की, भारताची राष्ट्रीय भावना विविध अवयवांस

असणाऱ्या एकाच संवेदनेसारखी असली पाहिजे. त्यांनी सांगितले होते, " जात, मत व धर्म यांतील भेदाभेद लक्षांत न आणतां सर्व माणसें राष्ट्राच्या कार्याकरितां एक होतात, याचें नांव एकी व याचें नांव राष्ट्र. एकदां राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झालेले सर हेन्री कॉटन यांनी आपल्या 'न्यू इंडिया' पुस्तकाच्या प्रारंभी असें विधान केलें आहे कीं, " The test of a nation is that its members, among all kinds of racial differences, do, in the main, work together as fellow–citizens, linked by common memories and associations and common objects. "

..." आपली राष्ट्रीय सभा सर्वांचीच आहे. अमक्यांचीच ती आहे, तमक्यांची नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं. देशांत भिन्न भिन्न समाज, भिन्न भिन्न व्यक्ति, भिन्न भिन्न मतें हीं असावयाचींच. हातांचीं पांचीं बोटें जशीं सारखीं नसतात तसें हें असावयाचेंच. नाहीं तर मग त्या देशांत माणसें रहात नाहींत तर मेंढरें राहातात, असें म्हणावें लागेल. राष्ट्र म्हणजे एका धर्माचे, एका जातीचे, एका मताचे लोक अशी व्याख्या नाहीं, आपली भिन्न भिन्न मतें सोडून विशिष्ट उच्च हेतूकरितां लोक एक होतात, तेव्हां त्यांस राष्ट्र म्हणतात. "...

" कोणी म्हणतील, हा प्रांताचा प्रश्न नाहीं, राष्ट्राचा आहे. होय, हा राष्ट्राचा प्रश्न आहे. पण आम्ही राष्ट्राचे अवयव आहोंत, हें विसरूं नका. डोळ्याला दुखापत झाली असतां हातानें त्याला औषध घालूं नये असें म्हणत असाल, तर मग हा ठराव प्रांतानें घेऊं नये, असा प्रयत्न करण्याचा आमचा हक्क आहे. पोट आणि अवयव या धडयांतील गोष्टीप्रमाणें आम्ही एक झालें पाहिजे, नाहीं तर सर्व शरीर मृत होईल. " (धुळे येथील भाषण – २९ एप्रिल १९०८, स. टि. खंड ६, पान ४०० व ४०४)

राष्ट्रीय सभेसंबंधी टिळकांची ही राष्ट्रीय ऐक्याची दृष्टी १८९५ पासून होती. पुण्यात १८९५ साली जे अधिवेशन झाले त्यासंबंधी लिहिताना टिळकांनी ही राष्ट्रीय एकतेची भावना स्पष्टपणे मांडली होती. त्यांनी लिहिले होते, " राष्ट्रीय सभेच्या विस्तीर्ण मंडपांत बंगाली, मद्रासी, सिंधी, पार्शी, मुसलमान आदिकरून सर्व जातींचे लोक एकदिलानें व एकचित्तानें राजकीय व राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना ज्यांनीं पाहिले असतील त्यांची हिंदुस्थानच्या भावी उदयाचा व ऐक्यतेचा राष्ट्रीय सभा हा एक मजबूत पायाच होय, अशी खात्री होऊन मनें आनंदानें भरून गेलीं असतील, यांत बिलकुल शंका नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत पूर्वी छप्पन्न देश होते असा इतिहास आहे. पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेखालीं हे छप्पन्न देश मोडून त्यांचा एकजीव अथवा एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे, हें राष्ट्रीय सभेवरून जितकें पूर्णपणें व्यक्त होतें तितकें दुसरें कशावरूनहि होत नाहीं...सर्व ठिकाणच्या प्रमुख लोकांचें जें आज

राष्ट्रीय प्रश्नांसंबंधें ऐकमत्य अथवा समप्रवृत्ति दिसून येते ती राष्ट्रीय सभेच्या उद्योगाचेंच फळ होय. आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांनीं रेल्वे, तारायंत्रें वगैरे बाह्य साधनांनीं आणि राज्य करण्याची एकसारखी पद्धत, एकसारखे कायदे आणि राज्यव्यवहारांत उपयोगी पडणारी एक भाषा, यामुळें सर्व हिंदुस्थान देश जणुं काय एकत्र करून बांधून टाकला आहे. पण अशा रीतीनें बाह्य साधनांनीं बांधून टाकलेल्या लोकांचीं दिलें एक करून त्यांस खरोखर एकराष्ट्रीयत्व आणणें हें काम करण्यास राष्ट्रीय सभा हेंच काय तें उत्तम साधन आहे. आमच्या राज्यकर्त्यांनीं बाकीची सर्व तयारी केली आहे; लोखंडी रुळांनीं व तारांनी त्यांनीं सर्व देश आंवळून टाकिला आहे, पण त्याचा एकजीव होण्यास लोकांचीं मनें एक झालीं पाहिजेत...हिंथुस्थानांतील सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या आणि सर्व प्रांतांच्या लोकांस एकदिलाचें आणि एकविचाराचें करणें हें राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य होय." (केसरी, ६ ऑगस्ट १८९५, स. टि. खंड ४, पान २१९–२२०).

राष्ट्रकल्पनेचा विकासक्रम

टिळकांनी १९०१ मध्यें वर उल्लेखिलेल्या 'राष्ट्रीयत्वाची कल्पना' या लेखात जे विवेचन केले होते तशाच प्रकारचे पण अधिक विस्तृत विवरण 'केसरी'त 'आमचेच, पण कळेल तेव्हा' या शीर्षकाखाली फेब्रुवारी १९०६ पासून त्यांनी जी लेखमाला लिहिली होती त्यात केलेले आढळते. आयरिश पुढारी मि. ग्रीफिथ यांनी डर्बीन येथे २८ नोव्हेंबर १९०५ रोजी त्यांच्या नॅशनल कौन्सिलपुढे केलेल्या भाषणाचा विस्तृत सारांश या लेखमालेत दिला असून टिळकांची भारतीय राष्ट्रवादाविषयीची जी कल्पना होती, त्याच्याशी सुसंगत व अधिक तपशिलवार केलेले हे विवरण आहे. टिळकांच्या राष्ट्रसिद्धांताचे हे सुगम स्पष्टीकरण आहे. त्याचा सारांश पुढे दिलेला आहे. हे लेख टिळकांनी लिहिलेले वाटत नाहीत, मात्र त्यातील विचारसादृश्य तंतोतंत जुळणारे असल्यामुळे तो टिळकविचारच मानावयास हरकत नाही. त्याचा सारांश असा :

"मनुष्यजात व व्यक्ती यांच्यांमध्ये राष्ट्र म्हणून कांहीं संस्था असते आणि हें राष्ट्र बनण्यास एक भाषा, एक धर्म, एक तत्त्वज्ञान, वाङ्मय यासंबंधीं सर्वांस सारखी लागू पडणारी पूर्वपीठिका, संसारयात्रेंतील सुखदुःखाविषयी एकाच तऱ्हेच्या आशा आणि निराशा आणि सर्वांना सारखेंच ठेचणाऱ्या संकटांपासून मुक्त होऊन आपली परंपरा राखून आपलेपणास उर्जितावस्था आणण्याची महत्त्वाकांक्षा या प्रधान साधनांची किंवा बंधनांची अपेक्षा असते. कालमानाप्रमाणें यांतील कांहीं बंधनें ढिलीं असतात व कांहीं अत्यंत जोमाचीं असतात..."

"राष्ट्रीयत्वाची बुद्धि हा कोणत्याही देशाचा आत्मा होय. देशाचा हा आत्मा नाहींसा करण्याचें इंग्रजी राज्यव्यवस्थेचें धोरण असतें. ही राष्ट्रीयत्वाची बुद्धि निर्माण करणारीं जुनीं कारणें किंवा देशांतील निरनिराळ्या लोकांमध्ये असलेलीं बंधनें तोडून

त्यांचें पुनरुज्जीवन होईल किंवा नवीन विचारांचें खत त्यांस मिळून राष्ट्रीयत्व जन्मास न येईल, असा बंदोबस्त ठेवण्याचें त्यांचें मुख्य धोरण असतें. लोकांच्या देशांत परदेशी माल भरावयाचा व मनांतहि इंग्रजी विचार कोंबावयाचे अशी ही दुहेरी नीति असते. "

भारतीय परंपरा

देशभक्तीची भारतीय परंपरा व त्यामागील तात्त्विक दृष्टिकोण विशद करताना या लेखात म्हटले होते, " देशभक्तीची भावना परोपकारबुद्धीतून निर्माण होते. स्वतःच्या सुखापलीकडचें पाहाणें ही त्याच्या मागची भावना असावी लागते, पण तेवढीच उपयुक्त नाहीं. स्वतः कष्ट सोसून, दुःख भोगून परहित वा दुसऱ्याचें सुख पाहाण्याची बुद्धि हीच उच्च परोपकारबुद्धि होय. अशा प्रकारच्या परोपकारबुद्धीस जेव्हां समाजाची वा देशाची सीमा घातली जाते तेव्हां ती देशभक्ति होते. पण हीच श्रद्धा जेव्हां सर्व मानवी समाजापर्यंत विस्तारली जाते तेव्हां तो मनुष्य साधू किंवा संतपदास पोहोचतो. सारांश, परोपकार बुद्धीचें देशभक्ति हें लहान माप आहे व विश्वावर प्रेम करावयास सांगणारा वेदांत हें मोठें माप आहे. ही भारतीय परंपरा आहे. "

" इंग्रज येण्यापूर्वी धर्मविचाराचें ऐक्य हा देशाभिमान जागृत ठेवत होता. ' सर्व राष्ट्र एका धर्मविचारानें भरून म्लेंच्छांवर तुटून पडा ' असें सांगणारे रामदास व आपल्या अलौकिक कर्तबगारीनें या उपदेशाची अंमलबजावणी करणारे शिवाजी महाराजांसारखे शिष्य यांसारखे देशभक्त हिंदुराष्ट्राच्या व सर्व इतिहासकारांच्या दृष्टीनें आजवर कोणीच निपजले नाहींत. "

साम्राज्यवादाचा वरवंटा

" परदेशांत आपला व्यापार वाढविण्याचे उद्दिष्ट व त्यांचें रक्षण करण्यासाठीं राज्य व या दोहोंचें नियंत्रण करणारी साम्राज्यशाही निर्माण झाली. साम्राज्यवादाचा हा वरवंटा सर्व जनतेवर फिरत असल्यामुळें या सर्व शोषितांचें एक राष्ट्र होण्याची प्रक्रिया ब्रिटिश साम्राज्यांत सुरु झाली. हीच स्थिति इतर साम्राज्यांबाबत होती. द्रव्यहीन व साधनहीन अशी ही प्रजा समानहिततत्वाच्या व समान राज्याच्या बंधनानें एकजीव होण्याची प्रक्रिया साम्राज्यांतील देशांत सुरु झाली. ही समान संकटाची भावना व त्यातून एक होण्याची प्रबळ इच्छा हे राष्ट्रीयत्वाचे नवे बंध झाले. "

साम्राज्यवादामुळे वसाहतींतील देशांत निर्माण होत असलेल्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेची ही पार्श्वभूमी ' केसरी 'तील या लेखांतून स्पष्ट होत होती. या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या संदर्भातच राष्ट्रीय शिक्षण व स्वदेशी उद्योगधंदे यांचा पुरस्कार टिळकांनी पुढे स्वदेशी चळवळीच्या प्रसारासाठी केलेला होता. वसाहती अर्थकारणातूनच

आर्थिक राष्ट्रवादाचा जन्म झाला होता. त्याचे विवेचन पुढे स्वतंत्र प्रकरणात केले आहे.

आशियाई राष्ट्रवादाची पार्श्वभूमी

ब्रिटिश साम्राज्यवादाची ब्रिटिश व्यापार व भांडवलशाही यांच्या दृष्टिकोणातून टिळक चिकित्सा करीत होतेच. पण त्याच पार्श्वभूमीवर आशियाई राष्ट्रवाद, आयर्लंडची राष्ट्रवादी चळवळ यांचे विवेचनही ते वारंवार करीत होते. जपानचा उदय ही त्या काळातील राष्ट्रवाद्यांना स्फूर्ती देणारी मोठी घटना होती. उद्योगधंदे, शिक्षण या सर्व बाबतीत जपान कसा पुढे गेला आहे याचा टिळक वारंवार उल्लेख करीत. तसेच आशियाई राष्ट्रांना स्वतंत्र सांस्कृतिक व्यक्तित्व आहे, याचे विवेचन त्यांनी 'पूर्वेकडील लोकांचे विचारैक्य' या त्यांच्या लेखात केले होते. भेदातही साम्य पहाणारी वेदांती दृष्टी हे पूर्वेकडील देशांचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान आहे, याचा उल्लेख करून टिळक म्हणाले होते, "आशिया खंडांतील लोकांमध्यें एक प्रकारचें विलक्षण प्राचीन काळापासून चालत आलेलें विचारैक्य आहे, व हिमालय पर्वत आड आल्यानेंहि जर तें नाहींसें झालेलें नाहीं, तर अन्य कारणानेंहि तें नाहींसें होणें शक्य नाहीं. बुडविलेल्या भोपळ्याप्रमाणें तें केव्हां ना केव्हां तरी पाण्याच्या सपाटीवर तरंगून तें दृक्प्रत्ययास येईल....पश्चिमात्य राष्ट्रांची धांव ज्याप्रमाणें सुखोपभोगांकडे आहे, तशी पूर्वेकडील लोकांची नाहीं, व आयुष्य सुखांत घालविण्याच्या साधनांपेक्षां आयुष्याचें परिणामीं साफल्य कसें होईल हाच विचार त्यांच्या डोळ्यांपुढे नेहमीं उभा असतो." (स. टि. खंड ४, पान १०३७–१०३८). आशियाई राष्ट्रांच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक वैशिष्ट्याप्रमाणे जपानच्या उदयाने आशियाई राष्ट्रांत जी एक नवी उमेद निर्माण झाली होती त्याचीही दखल टिळक आपल्या राष्ट्रीय उत्थानाच्या संदर्भातील लेखनात घेताना दिसत होते. या अनुषंगाने आशियाई राष्ट्रांची घडण नव्या युगानुसार कशी व्हावयास हवी, याची चर्चा करताना ते 'आशिया खंडातील कारस्थाने' या लेखात म्हणाले होते, "परराष्ट्रीय कारभाराचीं सर्व सूत्रें राज्यकर्त्यांच्या हातीं असल्यामुळें आपली कर्तृत्वशक्ति जरी तेवढ्या अंशानें संकुचित झाली आहे, तरी इंग्रजी अमलांत मिळालेलें पूर्ण विचार-स्वातंत्र्य व इंग्रजी शिक्षणानें प्राप्त झालेली प्रगल्भ विचारशक्ति यांचा उपयोग करून हल्लीं चालू असलेल्या राष्ट्रांच्या हालचालींत आपल्या देशाचा हितसंबंध किती व कसा काय आहे हे, त्रयस्थ या नात्यानें पाहाण्यास चांगली सवड आहे...असल्या विषयांचा विचार करण्याची आपणांस जों–जों अधिक सवय लागेल तों–तों हिंदुस्थानांतील सर्व लोक एका राष्ट्राचे घटकावयव आहोंत, आपलें सर्वांचें कांहींतरी एक सामान्य हित आहे, व त्या हितप्राप्तीकरितां आपण सर्वांनीं अवांतर भेद विसरून जाऊन एकमतानें विचार व प्रयत्न

करण्यास शिकलें पाहिजे; ही भावना हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, वर्णांच्या व धर्मांच्या लोकांमध्यें अधिक बळावत जाईल व तेणेंकरून परस्परांतील प्रेमबंधन व एकराष्ट्रीयत्वाची कल्पना कालांतरानें दृढतर होईल यांत शंका नाही. व या दृष्टीनेंच आम्हीं आज आशिया खंडांतील हल्लीं चालू असलेल्या कित्येक घडामोडींचें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे." (केसरी, २६ मे १९०३, स. टि. खंड ४, पान १०४१) सारांश, आशियाई खंडातील घटनांमुळे भारताचे एक राष्ट्रीयत्व दृढ होत जाईल, या आशेने टिळक विचार करीत होते. रूसो–जपानी युद्धात जपानची सरशी होऊ लागल्यावर १९०४ साली टिळकांनी लिहिले होते, "युरोपियन आणि एशियाटिक यांच्यामध्यें हल्लीं जो भेद दृष्टीस येतो तो नैसर्गिक नाहीं, कृत्रिम आहे, आणि आशियांतील लोकांस नवीन शस्त्रास्त्रें व इतर सामग्री आणि शिक्षण जर पाश्चिमात्य देशांतील लोकांप्रमाणें मिळेल, तर आशियांतील राष्ट्रें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्यास कोणतीहि अडचण पडणार नाहीं, हे पुष्कळ लोक आतां कबूल करूं लागले आहेत...आशियांतील राष्ट्रांनीं सदैव युरोपियन राष्ट्रांच्या कह्यांत राहिलें पाहिजे असा कांहीं देवदत्त अवगुण आशियांतील लोकांच्या अंगीं नाहीं हें वाचेनें नव्हे, तर कृतीनें जपानी लोकांनीं प्रत्ययास आणून दिलें आहे." (केसरी, ६ डिसेंबर १९०४, स. टि. खंड ४, पान १०४८). असेच विचार १९०५ मध्ये रशियन व जपानी लोकांचे युद्ध होऊन त्यात जपानी लोकांना निर्णायक विजय मिळाल्यानंतर रशियाची कशी रेवडी उडाली हे सांगताना टिळकांनी व्यक्त केले होते. "आशिया हे गोऱ्या राष्ट्रांकरितां ईश्वरानें एक सुपीक कुरण निर्माण केलें आहे, ही समजूत आतां बुडाली; व आशिया खंडाचीं कारस्थानें आशियांतील कोणत्याही राष्ट्राला न विचारतां करण्याचे दिवसहि आतां गेले. जपाननें ही मोठी क्रांती घडवून आणली. त्याबद्दल आशियांतील सर्व देशांच्या लोकांनीं जपानचे आभार मानिले पाहिजेत...आशिया खंडाच्या अभ्युदयाचा सूर्य आज नुकता कोठें क्षितिजावर आलेला आहे. तो पुढे कोठवर वर चढतो याचा आज अंदाज करणें कठिण आहे; परंतु ऐतिहासिकदृष्ट्या हा विचार लवकरच मध्यान्हीं येऊन आपल्या किरणांनीं सर्व आशियावर जागृति उत्पन्न करील, असा रंग दिसतो." (केसरी, दि. २१ मार्च १९०५, स. टि. खंड ४, पान १०५६).

भारताचा वडीलकीचा अधिकार

याच्या आधी सप्टेंबर १९०३ मध्यें 'आशिया आणि युरोपमधील राष्ट्रजागृती' या विषयावर 'केसरी'त जे अग्रलेख आलेले होते त्यांतही या आशियाई राष्ट्रवादाच्या अभिमानाचे बीज दिसते. पहिल्या लेखाच्या सुरुवातीलाच दिलेल्या गुस्तावेल बॉनच्या उद्धृतात भिन्न वंशीय, भिन्न जातीय अल्पसंख्यांक एकाच भूमीवर एकाच वातावरणात, एकत्र राहिल्यानंतर कित्येक शतकांनंतर संमीलन होऊन त्यातून

एकजिनसी राष्ट्र कसे बनते, हे सांगितले होते. त्यात भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जागृतीचे वर्णन केलेले असून 'यावाबत भारत सर्व राष्ट्रांना मार्गदर्शन करील,' असा आशावाद प्रकट केलेला होता. हे लेख टिळकांचे वाटत नाहीत पण वर उद्धृत केलेल्या टिळकांच्या लेखांत भारतीय राष्ट्रवादाची उत्क्रांती कोणत्या दिशेने होत आहे याची जशी चर्चा आहे, तशीच या लेखांतही असल्यामुळे हे विचारैक्य महत्त्वाचे आहे. त्या लेखात म्हटले होते, " सर्व एशियाटिक राष्ट्रांत हिंदुस्थान हा देश सुधारणेंत व बुद्धिमत्तेंत फार प्राचीन काळापासून अग्रेसर व वडील आहे. तेंच वडीलकीचें नातें नूतन राष्ट्रजागृतीचें बाबतींतही राहून एशियांतील सर्व राष्ट्रांना भावी मार्ग हिंदुस्थानचे लोक दाखवतील, असा संभव दिसत आहे. रशिया व जपान यांनीं सध्या आघाडी मारली आहे, हें खरें, पण ती एकदेशीय आहे. राष्ट्राची प्रगति सर्व दिशांनीं झाली " पाहिजे व तें काम प्राचीन काळीं हिंदुस्थाननें केलें व पुढेंही तें त्यालाच करावें लागेल.

"ही राष्ट्रजागृति हल्लीं हिंदुस्थानांत कशी व किती प्रकारानें होत आहे, याचें यथार्थ वर्णन करण्याला स्वतंत्र ग्रंथच लिहावा लागेल. हल्लीं देशांत सर्वत्र एक प्रकारची चळवळ, लोकांची अस्थिरता आहे. युरोपियन लोकांच्या अपार धनतृष्णेनें व्यापारद्वारा त्यांचें आमचें दळणवळण वाढून परस्पर ओळख चांगली होत आहे व त्यांच्या सहवासानें सुधारणेचीं पुष्कळ साधनें आशियांतील इतर लोकांस अजून दुर्मिळ आहेत तीं आपणांस अगदीं सुलभ झालीं आहेत. विशेषेंकरून प्रवासाच्या सौकर्यामुळें व एका दृढ राजबंधनांत जखडल्यामुळें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांच्या, जातींच्या, पंथांच्या व धर्मोच्या लोकांत परस्पर सहानुभूति व ऐक्यबुद्धि उत्पन्न झाली आहे व सदरहू राजबंधन असेंच कांहीं काळ दृढ राहिल्यास हें ऐक्यहि दृढ होऊन हें खरें राष्ट्र बनण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे." (केसरी, १ सप्टेंबर १९०३)

भारतीय राष्ट्रवादाचा सामाजिक संदर्भ

भारताचा राष्ट्रवाद प्राचीन असला आणि ब्रिटिश राजवटीत एकछत्री प्रशासन निर्माण झाल्यामुळे त्याच्या राष्ट्रीय आकांक्षांना एकमुखी स्वरूप आले असले तरी भारताच्या एकजिनसी राष्ट्रवादाच्या काही सामाजिक समस्या आहेत व टिळकांच्या काळीही त्या होत्या. भूतकाळात भारताचे ऐक्य हे समान सांस्कृतिक वारशाने व धर्मविचाराने निर्माण झाले होते. नव्या स्थितीत हिंदू–मुसलमानांचे ऐक्य ही केवळ अध्याहृत संकल्पना होती. प्रत्यक्षात ते सिद्ध व्हावयाचे होते. टिळकांना हिंदूंचे धर्म-मूलक ऐक्य हे राष्ट्रीयत्वाच्या भावनेच्या संवर्धनार्थ वापरावयाचे होते आणि मुसलमानांना व इतर धर्मीयांना राजकीय समानहिततत्वाच्या पायावर व 'भारत ही मातृभूमी आहे,' या भावनिक आधारावर नव्या राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यावयाचे होते.

सारांश, हिंदुत्व व राष्ट्रीयत्व यांचे पूर्वापार संबंध कायम ठेवून भारतातील अन्य धर्मीयांना आधुनिक राष्ट्रवादाची दीक्षा द्यावयाची होती. हे अत्यंत कठीण काम होते. एक तर ब्रिटिश राज्यकर्ते अशा एकात्म राष्ट्रवादात अडचणी निर्माण करीत होते. मुसलमानांना आपला वेगळेपणा राखण्याची फूस देत होते. पण मुसलमानांचे राजकीय प्रबोधन करून इंग्रजी फूटपाडया नीतीपासून त्यांना वेगळे करून उदारता व न्याय यांच्या जोडगोळीने हिंदू–मुसलमानांचा सामाजिक–राजकीय प्रश्न सोडवावा, असे टिळकांचे मत होते. . .हे परस्परविरुद्ध किंवा विसंगत वाटणारे सिद्धांत हे टिळकांच्या राष्ट्रवादातील सामाजिक प्रश्नांतील मूलभूत घटक होते. यासंबंधी टिळकांची भूमिका त्यांनी वेळोवेळी मांडलेली आढळते. विशेषतः हिंदूंच्या सामाजिक सुधारणेच्या संदर्भात त्यांनी हिंदुत्व व राष्ट्रीयत्व यांचा विचार केलेला आढळतो व हिंदू–मुसलमानांचे १८९२ पासून जे दंगे झाले त्यासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करताना व पुढे मुसलमानांना राजकीय हक्क देण्यासंबंधीची चर्चा करताना टिळकांचे मुसलमानविषयक धोरण स्पष्ट झालेले आढळते.

धर्म आणि राष्ट्रीयत्व

धर्म आणि राष्ट्रीयत्व यांच्या परस्परसंबंधांविषयी सुस्पष्ट विचार टिळकांच्या लेखनात वा भाषणांत दिसत नाही. निधर्मी राष्ट्रीयत्वाची संकल्पना त्याकाळी प्रचलित झाली नसल्याने त्यासंबंधी कोठेही उल्लेख आढळत नाही. पण हिंदू-मुसलमानांसंबंधी लिहिताना टिळकांनी असे म्हटले होते की, " हिंदु आणि मुसलमान लोकांस आपल्या राष्ट्रीयत्वाचा पाया आपआपल्या धर्मावरच रचला गेला पाहिजे असें वाटतें हें खरें आहे." (केसरी, २१ मे १९०१, स. टि. खंड ५, पान ५१३) ख्रिस्ती मिशनऱ्यांनी चालविलेल्या धर्मांतरानिमित्त हिंदूंना उद्देशून 'जागे व्हा किंवा मरा' हा लेख टिळकांनी लिहिला होता. त्यात 'धर्मस्वातंत्र्य कायम ठेवून आपणाला आता धर्मरक्षणाच्या तजविजी कराव्यास हव्यात,' असे टिळकांनी म्हटले होते. 'धर्मस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य वगैरे आधुनिक राज्यपद्धतीचीं तत्त्वें आम्हांस मान्य असोत वा नसोत, तीं फिरविता येणें अशक्य आहे' असे त्यांचे प्रतिपादन होते. याचा अर्थ धर्मस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य ही लोकशाहीची मूलतत्त्वे मान्य करून राष्ट्रीयत्वाचा विचार केला पाहिजे, हे टिळकांचे म्हणणे होते. म्हणून धर्मनिष्ठ राष्ट्र त्यांनी स्वीकारले नाही तसेच निधर्मी राष्ट्राचाही उल्लेख केला नाही. धर्मासंबंधी टिळकांनी अनेकदा आपली मते व्यक्त केलेली होती. स्वामी विवेकानंदांसंबंधीच्या मृत्युलेखात टिळकांनी निःसंदिग्धपणे म्हटले होते, " आमच्याजवळ जर कांहीं महत्त्वाचा ठेवा असेल तर तो आमचा धर्मच होय. आमचें वैभव, आमचें स्वातंत्र्य, सर्व कांहीं लुप्त झालें आहे. परंतु आमचा धर्म अद्याप आमच्यापाशीं शिल्लक आहे; व तो असा तसा नव्हे, तर सुधारलेल्या राष्ट्रांत

उघड रीतीनें कसोटीस लावला असतांहि त्याचा कस शुद्ध व उत्कृष्ट येतो हें आतां अनुभवास आलेलें आहे. अशा स्थितींत जर आम्ही त्यास सोडून देऊं, तर इसापनीतींतील कोंवड्या-प्रमाणें आम्ही रत्नपारखी आहों अशी आमची सर्व जगभर नालस्ती होईल." (केसरी, ८ जुलै १९०२, स. टि. खंड ५, पान ९३२). अशाच तऱ्हेचे विचार त्यांनी वेळोवेळी प्रकट करून आपला धर्माभिमान व्यक्त केला होता. शिक्षणातही धर्मशिक्षणाचा पुरस्कार त्यांनी केलेला आढळतो तेव्हा टिळकांचा मानसिक कल व विचारप्रवृत्ती धर्मनिष्ठ होती, यात शंका नाही. तरीही भारतीय राष्ट्रवादाचे अंतिम स्वरूप स्पष्ट करीत असतांना मात्र 'हिंदुस्थान ही आतां सर्वांचीच सारखीच मातृभूमि व जन्मभूमि झालेली आहे व या जन्मभूमीच्या भाग्योदयासाठीं सर्वांनीं सारखीच खटपट केली पाहिजें' असे ते सांगत असत.

हिंदुत्व व राष्ट्रीयत्व

टिळकांची राष्ट्रकल्पना अशी समावेशक होती, हे ध्यानात ठेवूनच त्यांनी हिंदुत्व व राष्ट्रीयत्व, हिंदू-मुसलमान संबंध व राष्ट्रीयत्व याविषयी जे विचार व्यक्त केले होते त्यांचा विचार केला पाहिजे. या संबंधात टिळकांनी मांडलेला पहिला मुद्दा असा होता की, हिंदुस्थानातील बहुसंख्य असलेली हिंदू प्रजा हिंदू धर्माच्या बंधनाने एकत्र बांधलेली आहे. राष्ट्रीयत्वाशी हिंदुत्वाचे असलेले हे भावबंधन तोडणे किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष करणे राष्ट्रीयदृष्ट्या हिताचे नाही.

टिळकांनी म्हटले होते, "हिंदुस्थानच्या हल्लींच्या काळीं तीन-चार धर्म प्रचलित आहेत, म्हणून हिंदु धर्मास राष्ट्रीयत्व नाहीं हें म्हणणें चुकीचें आहे. केवळ लोकसंख्येच्या मानानें पाहिलें तरीहि हिंदूंचाच समुदाय मोठा आहे; व एवढा मोठा समुदाय ज्या बंधनानें एकत्र आला आहे तें हिंदुत्व हेच होय. हें बंधन मोडून टाकणें किंवा त्याची उपेक्षा करून दृढ न राखणें म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजा वाळूच्या कणांप्रमाणे सैरा-वैरा मोकळी सोडणें होय. अशा रीतीनें हिंदुत्व मोडल्यानें राष्ट्रीयदृष्ट्या पुढें चांगले परिणाम होतील, असें कोणास वाटत असेल तर तो निवळ भ्रम आहे. हिंदुस्थानांतील तीस कोटि प्रजेस एकत्र करण्यास हिंदुत्वाखेरीज दुसरींहि कांहीं साधनें पाहिलीं पाहिजेत, हें खरें आहे. पण त्याच्याबरोबर हेंहि लक्षात ठेविलें पाहिजे कीं, तीस कोटिपैकीं बीस कोटि प्रजा हिंदुत्वानें एकत्र झालेली आहे व त्यांचें बंधन कायम ठेवणें हेच राष्ट्रीयदृष्ट्या अधिक सोयीचें, शक्य आणि जरूर आहे. सारांश, कोणतीहि समाजसुधारणा करणें झाल्यास हे राष्ट्रीयत्वाचें धोरण लक्षांत ठेवूनच झाली पाहिजे." (केसरी, १९ जानेवारी १९०४, स. टि. खंड, ५ पान ३०४)

सामाजिक सुधारणा व राष्ट्रीयत्व

टिळकांच्या सामाजिक सुधारणेविषयींच्या भूमिकेतही त्यांच्या राष्ट्रीय विचाराला

महत्त्वाचे स्थान होते. किंबहुना ती भूमिका मांडताना त्यांनी हिंदुत्व व राष्ट्रीयत्व यांचा अविभाज्य संबंध आहे, हे सतत मांडले होते. 'स्वधर्मावर श्रद्धा असणें हें राष्ट्रीयत्वाशी विसंगत नाहीं,' असेच त्यांनी म्हटले होते. "स्वधर्मावर श्रद्धा, आपले राष्ट्र पुरातन असून तें ईश्वराच्या कृपेनें जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें होणें शक्य आहे असा दृढ विश्वास, अभिमान आणि भरंवसा आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग कळकळीनें करण्याची इच्छा किंवा उमेद आणि संवय असल्याखेरीज कोणत्याहि सुधारणेचें कार्य तडीस जाणें अशक्य आहे. हिंदु धर्म, हिंदु राष्ट्र हें आमच्या मतें सामाजिक सुधारणेपेक्षां अधिक महत्त्वाचें आहे, व जी कांहीं सामाजिक सुधारणा हवी आहे ती लोकांमध्यें राष्ट्रीयत्व निर्माण करण्याच्या उद्योगास अभिमानानें कळकळीनें व स्वार्थत्यागपूर्वक लागलें असतां सहज घडून येणार आहे असें आम्हांस वाटतें." (केसरी, ५ मे १९०३, स. टि. खंड ५, पान १५७–१५९).

"सामाजिक सुधारणा हें राष्ट्रीय उन्नतीचें एक अंग आहे; अर्थात् या अंगाचा राष्ट्रीयत्वाशीं जर पूर्ण संबंध नसेल तर सामाजिक सुधारणेस केवळ मनःपूत आचाराचेंच स्वरूप प्राप्त येईल, हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. राष्ट्रीयत्वाची दिशा सुटली म्हणजे समाजसुधारणा झाली काय आणि न झाली काय, सारखीच होय." (केसरी, १० जानेवारी १९०५, स. टि. खंड ५, पान १७५)

"कोणतीहि सामाजिक सुधारणा झाली कीं ती स्वीकारतांना आम्हीं आपलें मूळ काय आहे हे विसरतां कामा नये; आणि तसें होईल तरच आमचें राष्ट्रीयत्व कायम राहून आम्ही प्रगतीच्या मार्गास लागूं. सामाजिक सुधारणा राष्ट्रीयत्वास धरून पाहिजे असें आमचे जें म्हणणें आहे त्याचा अर्थ काय हें यावरून व्यक्त होईल." (केसरी, ५ जानेवारी १९०४, स. टि. खंड ५, पान १७२)

"स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे, तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहीत. पण एकदां कां तो जोम नाहींसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहासता होण्यास कारण होतात." (केसरी, २८ जानेवारी १८९६, स. टि. खंड ५, पान १४२).

"कोणत्याहि सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणें हा होय. तो अभिमान आम्हीं कोणता धरावयाचा ? अर्थात् हिंदुत्वाचा होय. आम्हांला धर्माची कांहीं एक परंपरा आहे, त्या परंपरेत जें ज्ञान आहे तें इतर धर्मातील ज्ञानांच्या बरोबरीनें किंबहुना त्याहूनहि श्रेष्ठ आहे आणि ही परंपरा जर आम्हीं सोडून दिली, तर आमचे असे म्हणण्यासारखें आम्हांस सामान्य बंधन कांहींच

नाहीं." (केसरी, १२ जानेवारी १९०४, स. टि. खंड ५, पान २९८)

" आपणांस पुढें जी उर्जितावस्था प्राप्त व्हावयाची आहे ती हिंदु राष्ट्र या नात्यानें झाली पाहिजे इतकें लक्षांत ठेविलें आणि त्याप्रमाणें वर्तन राखलें म्हणजे सुधारकी पंथांत आणि नवीन झालेल्या हिंदुसभेच्या पंथांत दुसरें कांहीं अंतर नाहीं. " (केसरी, १२ जानेवारी १९०४, स. टि. खंड ५, पान ३००)

वेदांती भूमिका

मात्र टिळकांची विचारसरणी मुख्यतः हिंदु धर्माची जी वेदांती परंपरा तिच्या अभिमानावर आधारलेली होती. त्यांनी वापरलेले ' हिंदु राष्ट्र ' हे शब्द त्या धर्ममूलक सांस्कृतिक एकतेचे वर्णन करणारे आहेत. वेदांत हे भारताचे जीवनतत्त्वज्ञान आहे, या विश्वासाने किंवा श्रद्धेने टिळक नेहमी हिंदू धर्म किंवा भारत याविषयी लिहीत वा बोलत असत. किंबहुना " आमच्या वेदान्ती धर्माचीं तत्त्वें वेदांत-मिशन काढून खिस्ती मिशनऱ्यांप्रमाणें जर सर्व जगास आम्हीं शिकविलीं तर प्राच्य व पश्चिमात्य विचारांची सांगड घालून देऊन सर्व जगाच्या विचाराचें पाऊल आम्हीं पुढे टाकल्याचें श्रेय आपणांस मिळेल. " (केसरी, २७ फेब्रुवारी १९०६, स. टि. खंड ५, पान ५७३). असे भव्य स्वप्न टिळक उत्कटतेने पाहात होते. म्हणूनच जेव्हा टिळक ' हिंदुत्वाच्या पायावरच समाजसुधारणा झाली पाहिजे,' असे म्हणत तेव्हा त्याचा अर्थ ' वेदांती तत्त्व-ज्ञानाचा हा वारसा आपण जपला पाहिजे ' असा होता. सारांश, वेदांती जीवनदृष्टी ही समग्र जीवनदृष्टी असल्यामुळे ती स्वीकारली तर सगळे भेद मिटविता येतील व भेदातील अभेदत्व दिसू लागेल, हा टिळकांच्या विचारांचा मुख्य आशय आहे.

हिंदू-मुसलमान व राष्ट्रीयत्व : तीन बाजू

भारतीय राष्ट्रवादाची महत्त्वाची सामाजिक व राजकीय समस्या म्हणजे हिंदू-मुसलमान संबंधाची. टिळकांच्या राजकीय जीवनात मुंबई इलाख्यात येवले, मालेगाव, वेळगाव, राजापूर, मुंबई इत्यादी ठिकाणी १८९३ पासून जे हिंदू-मुसलमान दंगे झाले त्यावेळेपासून ते १९१८ मध्ये हिंदू-मुस्लीम घटनात्मक संबंधाची पायाभरणी करणारा ' काँग्रेस-मुस्लीम लीग स्कीम ' नावाने संमत झालेला व 'लखनौ करार' म्हणून ओळखला जाणारा समेट होईपर्यंत टिळक या प्रश्नाचा पाठपुरावा करीत होते. या सर्व काळात वेळोवेळी टिळकांनी ज्या भूमिका घेतल्या, त्या त्या वेळी जे राजकीय विचार व्यक्त केले त्यातील तात्कालिकता, अभिनिवेश किंवा युक्तिवाद सोडून त्या सर्वांचे समालोचन केले तर टिळकांची हिंदू-मुसलमान संबंध व भारतीय राष्ट्रवादाची तत्त्वे यासंबंधीची मते किंवा त्यासंबंधी आधारसूत्रे काय असावीत यासंबंधीची त्यांची कल्पना याचा अंदाज येतो. टिळक आपले लेखन सरकारचे वर्तन सुधारण्यासाठी त्याच्या धोरणावर

टीका करणारे पत्रकार या भूमिकेतून करीत व दुसरी भूमिका राजकीय मार्गदर्शकाची, तत्त्वचिंतकाची असे. या दोन्ही भूमिकांतून सरकार व सामान्य जनता यांना प्रत्येक घटना समजावून सांगावी लागत असे. टिळकांची ही पद्धतच होती. या दृष्टीने पाहिल्यास टिळकांनी हिंदू-मुस्लिम संबंधाचा तीन बाजूंनी विचार केलेला दिसतो.

पहिली बाजू, हिंदू-मुसलमान दंग्यांची. या घटनांचा विचार करताना टिळक कायदा, पुरावा व प्रत्यक्ष मिळालेली माहिती यांच्या आधारे विवेचन करीत व सरकार-पुढे आपले म्हणणे मांडीत.

दुसरी बाजू, हिंदू-मुसलमानांतील सामाजिक संघर्ष नाहीसा करून मुसलमानांना भारताच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्यासाठी हिंदू समाजावरोबर त्यांचे संबंध कसे असावेत, यासंबंधी असे. त्यातही टिळकांनी ठाम भूमिका घेतलेली आढळते.

तिसरी बाजू, इंग्रज सरकार व मुसलमान यांचे संबंध राष्ट्रीय व राजकीय दृष्टीने कसे आहेत व कसे राहावयास हवेत यासंबंधीची. टिळकांची सावध नजर या बाबतीत सर्व घटनांवर लक्ष ठेवून असे. त्याबाबतची आपली मते ते सरकार व मुसलमान यांना स्पष्टच सांगत असत. त्यांनी मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्यासाठी कोणते विचार मांडले होते, हे पाहाण्यासारखे आहे.

वास्तव दृष्टिकोण हवा

भारतातील मुसलमानांनी भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने कोणता वास्तव दृष्टिकोण बाळगावा, यासंबंधी टिळकांचे विचार स्पष्ट होते.

" हिंदुस्थानातील मुसलमान लोक अरबस्थानांतून किंवा मध्य एशियामधून इकडे आलेल्या मुसलमानांचे वंशज असोत अथवा येथल्या हिंदूंचे मुसलमान झालेले असोत, कसेंहि असलें तरी हिंदुस्थान ही आतां सर्वांचीच सारखीच जन्मभूमि झालेली आहे; व या जन्मभूमीच्या भाग्योदयासाठीं सर्वांनीं एकसारखीच खटपट केली पाहिजे." (केसरी, दि. १ ऑगस्ट १८९९, स. टि. खंड ५, पान ४५३.) ही टिळकांची भूमिका होती.

राष्ट्रीय प्रवाहात समरस होण्यासाठी मुसलमानांनी आपला अहंकार आणि हिंदूंसंबंधीचे आपले गैरसमज, टाकून दिले पाहिजेत व भारतीय जीवनापासून त्यांना वेगळे ठेवू पाहणाऱ्या ब्रिटिशांचा कावा ओळखून विश्वासाने भारताच्या राजकीय चळवळीत सामील झाले पाहिजे, हा विचार टिळकांनी सतत मांडला होता. अलीगड येथे मुसलमानांचे विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर टिळकांनी लिहिले होते, " आमच्या महाराष्ट्र देशांत अथवा दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचें फारसें महत्त्व नाहीं; परंतु दिल्ली, आग्रा अगर लखनौ वगैरे प्रांतांत मुसलमानी राज्याच्या वैभवाची आणा-दोन आणे तरी ओळख अद्याप कायम राहिलेली आहे; व आमच्याकडील लोकांस

पेशवाईत आम्ही एकदां राज्यकर्ते होतों या गोष्टीचा जसा अभिमान वाटतो, तद्वतच दिल्ली-लखनौकडील मुसलमानांची स्थिति आहे. आपण राज्यकर्ते होतों त्या वेळीं बंगाल्यांतील ज्या बाबूंवर चोपून अंमल गाजविला त्या बंगाली 'ढेरपोट्या' बाबूंनी इंग्रजी लिहिण्या–बोलण्यास शिकून आमच्यावर अधिकारी होऊन यावें हें तिकडील मुसलमानांस रुचत नाहीं.....इंग्रज सरकारचें राज्य झाल्यामुळें पूर्वी पादाक्रांत केलेल्या बाबूंचा वरचष्मा होऊन आपली वाईट स्थिति झाली, असें उत्तरेकडील मुसलमानांस वाटत असतें व अलीगड येथील कॉलेज हेंहि अशाच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष समजुतीमुळें उत्पन्न झालेलें आहे..."

"मुसलमानी राज्यांत ज्यांवर आपण अंमल गाजविला त्या काफीर हिंदूंस आज बरोबरीच्या नात्यानें आपणांस सलाम करावा लागतो यावद्दलचें वैषम्य जर मुसलमान लोकांस वाटत असेल तर आतां तें त्यांनीं सोडून दिलें पाहिजे. हिंदु आणि मुसलमान यांच्यांतील वेबनाव उत्पन्न होण्यास पूर्वीचीं पुष्कळ कारणें आहेत; पण हा वेबनाव जाऊन दोन्ही जातींच्या लोकांचें एकमत झाल्याखेरीज हिंदुस्थानचें हित व्हावयाचें नाहीं, असें आतां प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास वाटूं लागलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वी ज्याप्रमाणें मुसलमानांची सत्ता अबाधित होती, त्याप्रमाणेंच दक्षिण हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य येण्यापूर्वी निदान कांहीं वर्षें तरी हिंदूंनीं स्वामित्व उपभोगिलें आहे. किंबहुना कंपनीसरकारबहादुर यांची स्वारी जर हिंदुस्थानांत शें-दोनशें वर्षें उशिरानें आली असती, तर उत्तर आणि दक्षिण मिळून हिंदुस्थानच्या दोन्ही भागांत मराठेशाहीचाच झेंडा तिच्या दृष्टीस पडला असता. पण ह्या गतगोष्टी सांगण्यांत आता कोणताच फायदा नाहीं. इंग्रज सरकारच्या छत्राखालीं सर्वच एकसारखे टक्क्यास सव्वाशेराप्रमाणें मोजले जात आहों. अशा वेळीं हिंदूंनीं मुसलमानांचीं व मुसलमानांनीं हिंदूंचीं डोकीं फोडण्यांत पुरुषार्थ मानावा, यापेक्षां आणखी दुर्दैव तें कोणतें?"

मुसलमानांना असा उपदेश करून झाल्यावर हिंदूंना उद्देशून त्याच लेखात टिळकांनी लिहिले होते, "कोणत्याही इतर धर्मीच्या लोकांशीं द्वेषभावानें वागण्यास हिंदु लोकांस त्यांचा धर्म सांगत नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या धर्माप्रमाणें चालावें हेंच हिंदु धर्माचें खरें रहस्य होय; तथापि तेवढ्याकरितां मुसलमान लोकांनीं कोणतीहि गैरशिस्त गोष्ट सांगितल्यास ती सर्वांशीं मुकाट्यानें हिंदु लोक ग्राह्य करतील असें मात्र कोणी समजूं नये. गोवध हिंदुस्थानांत मुळींच होऊं देऊं नये असें हिंदु लोकांचें मत आहे, व त्याप्रमाणें घडून आल्यास प्रत्येक हिंदूस मनापासून आनंद होईल हें खरें आहे. पण तेवढ्याकरितां मुसलमान अगर इंग्रज लोक त्यांच्या धर्माप्रमाणें गोवध करीत असल्यास त्यांच्या आड हिंदु लोक येत नाहींत; फक्त अशा तऱ्हेचीं कृत्यें हिंदु लोकांच्या नजरेस न पडतील अशा ठिकाणीं त्यांनीं तीं केलीं पाहिजेत. सारांश, स्वधर्माप्रमाणें प्रत्येकानें

आचरण ठेवावें, एकानें दुसऱ्याची विनाकारण कुचाळी काढूं नये, आणि सर्वांनीं एकदिलानें चालावें अशी सर्व हिंदूंची इच्छा आहे. कोणी कोणास त्रास देऊं इच्छित नाहीं; पण त्यांपैकीं एखादा विनाकारण आपला वरचष्मा दाखवावयास पाहील तर तोहि दुसऱ्यास खपावयाचा नाहीं. अशा विकट प्रसंगीं दोघांचेहि सर्व म्हणणें ऐकून घेऊन पूर्वापार वहिवाट आणि न्याय यांस धरून निकाल सांगणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें कर्तव्य होय." (केसरी, १ ऑगस्ट १८९९, स. टि. खंड ५, पान ४५३–४५४.)

मुसलमानांचा कावेबाज अनुनय

हिंदू-मुसलमानांच्या ऐक्यात बिब्बा घालण्यासाठी कावेबाज इंग्रज त्यांना राष्ट्रीय सभेपासून अलग करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे मुसलमान राष्ट्रीय प्रवाहापासून दूर जाण्याचा, वेगळे होण्याचा धोका आहे, असा इशारा टिळकांनी वेळोवेळी दिला होता. त्यांनी लिहिले होते, "राष्ट्रीय सभा कोणत्याहि विशिष्ट जातीकरितां नसून ती ज्या हक्कांकरितां भांडत आहे ते मुसलमानांस व हिंदूंस सारखेच मिळावयाचे आहेत... राष्ट्रीय सभेस शिव्या देतांना सदर सभेच्या उद्योगामुळें प्राप्त झालेले हक्क मुसलमान लोकांनीं घेऊं नयेत, असा जर बेकसाहेबांनीं उपदेश केला असता, तर आपल्याच समजुतीप्रमाणें का होईना, पण सद्बुद्धीनें तरी हे साहेब उपदेश करीत आहेत असें आम्हीं म्हटलें असतें, पण सध्यांच्या त्यांच्या भाषणावरून हिंदुस्थानांत कज्जे लावण्यांत व राणीच्या प्रजेमध्यें असंतोष व वैमनस्य उत्पन्न करून राजद्रोह संपादन करण्यास बेकसाहेबांचा अवतार येथें झाला आहे, असें म्हणावें लागतें; व साहेब बहादुरांच्या या उपदेशाचें खरें स्वरूप आमचे मुसलमान बंधूहि लवकर ओळखल्याखेरीज राहणार नाहींत अशी आमची उमेद आहे." (केसरी, ६ फेब्रुवारी १८९४, स. टि. खंड ५, पान ४५८...मि. बेक हे अलिगड कॉलेजचे प्राचार्य होते.)

सरकारी नोकरीतील जातवारी

मुसलमानांत हिंदूंविषयी विद्वेष व असूया निर्माण करणारी आणखी एक गोष्ट म्हणजे सरकारी नोकरीत त्यांना मिळणारे अल्प प्रतिनिधित्व. तेथेही हिंदूंइतकेच मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, अशी मागणी करण्यासाठी १९०६ मध्ये मुसलमान पुढाऱ्यांचे एक शिष्टमंडळ त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांना सिमला येथे जाऊन भेटले होते. त्यासंबंधी टिळकांनी जो लेख 'केसरी'त लिहिला होता, त्यात असे बजावले होते की, "इंग्रजी सरकार हें परकी सरकार आहे, आणि त्यास हिंदुस्थानवर जें राज्य करावयाचें आहे, ते मुसलमानांस हाताशीं धरून हिंदूंवर करावयाचें नाहीं, किंवा हिंदूंस हातीं धरून मुसलमानांवर करावयाचें नाहीं. कधीं कधीं स्थानिक कामांत केव्हां मुसलमानांस तर केव्हां हिंदूंस हरभऱ्याच्या झाडावर चढविण्यांत येत असतें, पण ही युक्त

केवळ तात्पुरती असून त्यांत तेवढ्यापुरता मतलब असतो, बाकी सर्व ठिकाणीं हिंदु आणि मुसलमान या दोघांसही सारख्या दर्जानें वागविलें जातें. पहिल्या पहिल्यानें हा इंग्रजी कावा हिंदु आणि मुसलमान या दोघांच्या लक्षात आला नव्हता. हिंदु पुढाऱ्यांपैकीं बऱ्याच जणांना तो आतां कळूं लागला आहे. सिमल्यास गेलेल्या नबाबजाद्यांच्या लक्षांत जरी तो आलेला नसला तरी त्यांनीं आपल्या अर्जांत ध्वनित केल्याप्रमाणें तरुण मुसलमान पिढीच्या लक्षांत ती गोष्ट येऊ लागली आहे. या साम्राज्यांत हिंदु, मुसलमान, जैन, पार्शी, शीख किंवा युरोपियन अथवा दुसरा कोणीहि गृहस्थ कितीहि लायक, विद्वान अगर हुशार असला तरी अमुक एक मर्यादेच्या बाहेर त्याची वाढ होऊ द्यावयाची नाहीं, असा कायदा ठरलेला आहे. हा कायदा किंवा नियम मुसलमान लोकांकरितां सरकारनें ढिला केला तर त्यामुळें हिंदु लोकांस वाईट वाटण्याचें कांहीं कारण नाहीं, उलट आनंदच होईल. एखादा किल्ला घेण्याकरितां भोवतालीं जमलेल्या सैन्यापैकीं एका तुकडीनें किल्ल्याच्या तटबंदीस भोक पाडलें तर त्याचा इतरांस विषाद न वाटतां ज्याप्रमाणें सैन्यांतील सर्व लोकांस आनंदच होतो, त्याप्रमाणें प्रस्तुतचा प्रकार आहे... "

परस्परावलंबी समाज

" दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, आमच्या अभ्युन्नतीच्या आड आलेली जी भिंत आहे, तिचा दरवाजा मुसलमानांनीं ठोकला तरी उघडत नाहीं व हिंदूंनीं ठोकला तरी उघडत नाहीं. अर्थात् तो उघडणें दोघांसहि इष्ट असेल तर दोघांनीं एकत्र येऊन तो उघडण्यास यापेक्षां अधिक सक्त उपाययोजना केली पाहिजे. सारांश, हिंदूंस सोडून मुसलमानांचें चालावयाचें नाहीं आणि मुसलमानांस सोडून हिंदूंचे चालावयाचें नाहीं, असे आतां दिवस आले आहेत, हें ओळखूनच दोन्ही धर्मांतील लोकांच्या पुढाऱ्यांनीं इत्युत्तर आपला वर्तनक्रम ठेवला पाहिजे. इंग्रजी राज्यामुळें देशांत शांतता झाली, वगैरे गोष्टी सरकारकडे जाणाऱ्या अर्जांत नमूद करणें म्हणजे समुद्राचेंच पाणी घेऊन समुद्रास अर्घ्य देणें होय. इंग्रजी राज्यकर्ते आमच्या सर्वांचे बारसे जेविलेले आहेत. ते कांहीं असल्या स्तुतीनें फसतात असें नाहीं किंवा भीति दाखवल्यानें भीतही नाहींत. त्यांनीं राज्यकारभाराची जी पद्धति सुरु केलेली आहे ती सर्व गोष्टींचा सर्व बाजूंनीं विचार करूनच केलेली आहे. प्रतिनिधिसत्ताक पाश्चिमात्य राज्यपद्धति सर्वस्वीं हिंदुस्थानांत स्थापित करतां येईल कीं नाहीं, याबद्दल मुसलमानांचें किंवा हिंदूंचें मत त्यांना नको आहे. त्यांनीं आजमितीस हिंदुस्थानांत जी राज्यपद्धति सुरु केली आहे ती या गोष्टीचा विचार करूनच केली आहे. सहा हजार मैलांवरून इंग्रज लोक जे येथें आले ते कांहीं पदरच्या भाकऱ्या खाऊन आमचें कल्याण करण्याकरितां नव्हे."

एकत्रच राहिले पाहिजे

" ज्या तत्त्वावर हल्लींची पद्धत सुरु केलेली आहे, त्यामुळें सर्व जातींच्या लोकांस एकवट होण्यास पूर्वीपेक्षा अधिक साधनें व कारणें घडून येत आहेत. एक कायदा व शिस्त अंमलांत असल्यामुळें कोणा एका जातीस विशिष्ट हक्क मिळण्याचे दिवस राहिलेले नाहींत. शिक्षण एक आणि योग्यतेचें किंवा लायकीचें मापहि एक. वास्तविक म्हटलें म्हणजे अशा स्थितींत हिंदुमुसलमानांनीं एक होऊन जें काय मागणें असेल तें सरकारपाशीं मागितलें पाहिजे. एरव्हीं कोणास कांहीं मिळावयाचें नाहीं. हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारीवर्ग ही गोष्ट ओळखून आहे. तथापि त्यांनीं ठरविलेल्या तत्त्वाप्रमाणें त्यांस कोणत्याहि विशिष्ट वर्गास किंवा जातीस इतर वर्गांहून अधिक हक्क देतां येत नाहींत, अर्थात् कोणास कांहीं न देतां जर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींतले लोक एकत्र येऊ नयेत अशी तजवीज करावयाची असेल, तर थापाथापी आणि गोडबोली याखेरीज दुसरा मार्ग सरकारी अधिकारी वर्गास राहिलेला नाहीं. दोन बायकांच्या दादल्याप्रमाणें त्यांची स्थिति झालेली आहे. कोणावरहि अधिक प्रीति दाखविली तर दुसरी रागावणार आणि दोघींवर सारखी वक्रदृष्टि ठेवणें तर शक्य नाहीं. (केसरी, ९ ऑक्टोबर १९०६.)

इंग्रज सरकारला इशारा

इंग्रज सरकारचे हे फूटपाडे धोरण एकराष्ट्रीयत्वाला धोका देणारे आहे, त्याला मुसलमानांनी बळी पडू नये, असा ज्यावेळी टिळक मुसलमानांना उपदेश करीत होते, त्यावेळी इंग्रज सरकारलाही बजावीत होते की, परस्परांत द्वेषभाव निर्माण करणारे धोरण इंग्रजांच्याही हिताचे नाही. टिळकांनी इंग्रज सरकारला उद्देशून लिहिले होते, " हिंदु आणि मुसलमान या दोन्ही लोकांच्या धर्मांमध्यें, आचारांत आणि विचारांत जे अंतर आहे तें अजीबात नाहींसें होऊन दोन्ही लोक एकविचाराचे आणि एकदिलाचे होण्यास किती शतकें लागतील किंबहुना होतील कीं नाहीं, हेंहि आज सांगतां येत नाहीं. आमच्यापैकीं कांहीं मंडळी अशी आहे कीं, मुसलमानांनीं कांहींहि आगळिकी केल्या, तरी भावी परिणामावर नजर ठेवून बंधुत्वाच्या नात्यानें आम्हीं त्यांस आलिंगन द्यावें, आणि क्षमा व शांति हे ब्रह्मगुण प्रकट करावे असें ते प्रतिपादन करीत असतात. आजची स्थिति लक्षात आणितां हा पक्ष आम्हांस बिलकुल मान्य नाहीं; इतकेंच नाहीं तर, सरकारनेंही ते मान्य करितां कामा नये, अशी आमची समजूत आहे. हिंदुस्थानांतील प्रजेचे सामान्य हक्क संपादन करण्याकरितां जरी आम्ही एक झालों व होऊं, तरी धर्माचा, खाण्यापिण्याचा आणि आचार–विचारांचा हिंदु-मुसलमान यांच्यांत जो भेद आहे तो कित्येक शतकें कायम राहील या समजुतीवरच सरकारनें व आम्हीं त्याची योग्य व्यवस्था लाविली पाहिजे. आणि ती व्यवस्था म्हटली म्हणजे लॉर्ड लॅन्सडाऊन

यांनी आग्रा येथे सांगितल्याप्रमाणें अथवा १८५८ च्या राणी-सरकारच्या जाहीरनाम्याप्रमाणें निरनिराळ्या जातींस आपआपल्या चालीरीति, एकमेकांस त्रास अगर उपसर्ग न लावतां, पाळू देण्याची सवलत देणें हीच होय. हिंदु-मुसलमान यांच्या चालीरीति जर भिन्न असत्या, तर हल्लींच्या कायद्याप्रमाणें परस्परांचें व्यक्तिस्वातंत्र्य कायम रहाण्यास परस्परांस जितका प्रतिबंध करणें जरूर असेल तितका करून एकमेकांचे हक्क बजावण्यास मॅजिस्ट्रेट किंवा सरकारचे इतर अधिकारी यांनीं कायद्याप्रमाणें योग्य मदत दिली पाहिजे. हिंदुस्थानसारख्या म्हणजे ज्या देशांत भिन्न भिन्न जातींचे लोक एकाच अधिकाऱ्याच्या अमलाखालीं असतात तेथल्या अंमलदारांस असल्या कामीं मोठ्या दक्षतेनें आणि शहाणपणानें वागलें पाहिजे. मुसलमान लोक अडाणी आहेत अगर हिंदु लोकांच्या समजुती साहेब लोकांच्या मताप्रमाणें वेडगळपणाच्या आहेत, अशा सबबीवर कोणाहि अधिकाऱ्यानें हिंदूंचा अगर मुसलमानांचा पक्ष स्वीकारल्यास त्यापासून भयंकर अनर्थ होतात." (केसरी, १३ फेब्रुवारी १८९४, स. टि. खंड, ५ पान ३३७–३३८.)

हा लेख येवला येथे झालेल्या हिंदू-मुस्लीम दंग्यांनंतरचा आहे. यामध्ये इंग्रज सरकारच्या राणीच्या जाहीरनाम्यात दिलेल्या हिंदू-मुसलमानांना समवृत्तीने, न्यायनिष्ठ धोरणाने वागवण्याच्या आश्वासनाचा वारंवार उल्लेख टिळकांनी केला होता व तेच धर्मविषयक समदर्शी, न्यायी व तटस्थ धोरण सरकारने ठेवले पाहिजे, न ठेवल्यास न्यायी राज्याच्या त्यांच्या लौकिकास धोका पोहोचेल, असा त्यांचा युक्तिवाद होता. हिंदू-मुस्लीम दंग्यांबद्दल त्यांनी जी सतत टीका केली तिचा उल्लेख पुढे येईलच. पण हेच त्यांचे मुख्य सूत्र होते.

भारताचे राष्ट्रीयत्व

भारताचे राष्ट्रीयत्व जपण्याची व त्यातील परस्परसंबंध दृढ करण्याची जबाबदारी इंग्रज सरकार, मुसलमान व हिंदू या सर्वांची आहे व ती त्यांनी पार पाडली पाहिजे, हे टिळकांच्या भारतीय राष्ट्रवादविषयक विचाराचे मुख्य सूत्र होते. हे धोरण प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी लागणारा समंजसपणा व तत्त्वनिष्ठा या तिघांनी दाखविली पाहिजे, हा त्याचा मथितार्थ होता. राष्ट्रवाद प्रबळ करण्यासाठी कोणता तत्त्वविचार केला पाहिजे, यासंबंधीचे त्यांचे विचार उदार हिंदुत्वाचे होते.

"शांति, क्षमा, दया आणि बंधुप्रीति ही तत्त्वें विशेषतः हिंदु धर्माचींच आहेत असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाही. धर्मबेडानें मुसलमान बेफाम झाल्याचीं ज्याप्रमाणें शेंकडों उदाहरणें आहेत तशी हिंदूंचीं क्वचितच सांपडतील. आपला धर्म आपण पाळावा, लोकांचा लोकांस पाळूं द्यावा, परक्यांस मदत करावी, हिंसा करू नये, भूतदया ठेवावी ह्या गोष्टी आमच्या हाडापिंडांत जितक्या खिळल्या आहेत तितक्या

मुसलमान बंधूंच्या अंगीं खिळण्यास आणखी कांहीं दिवस गेले पाहिजेत. ही अशी स्थिति कां झाली आहे, याचीं कारणें शोधत बसण्याची तूर्त जरूर नाहीं. शांति व भूतदया हे गुण हिंदुधर्माचे मुख्य आधारस्तंभ होत व आमच्या मुसलमान बंधूंच्या धर्मांत जर या तत्त्वांचा पूर्ण रिघाव होईल, तर मौलवीसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें हिंदु–मुसलमानांतील दंगे नामशेष होण्यास फारसा अवकाश लागणार नाहीं.. . . "

" स्वार्थ आणि परमार्थ हे दोन्हीहि हेतु अशा रीतीनें नष्ट झाले म्हणजे हिंदु–मुसलमानांचा समेट करण्याची फारशी अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजी राज्याखालीं प्रत्येकास मतस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य पूर्ण उपभोगावयास सांपडत आहे व तें तसेंच सांपडेल अशी एकदा मनाची खात्री झाल्यावर काजीसाहेबांनीं हिरावागेंत ज्या बारीकसारीक गोष्टी सांगितल्या आहेत तिकडे कोणाचेंहि लक्ष जाणार नाहीं. मग त्या खऱ्या असोत वा खोट्या असोत. हिंदु–मुसलमानांत रोटी-बेटी व्यवहार होण्याइतकें धर्मौदासीन्य अथवा धर्मौदार्य निदान कधींहि होईल असें आमच्या बुद्धीस तरी वाटत नाहीं. निदान हजार-पांचशें वर्षांत तरी ही गोष्ट होण्यासारखी नाहीं आणि हजार-पांचशें वर्षांपलीकडल्या स्थितीचा आज विचार करीत बसलों म्हणजे मनांत मांडे खात बसण्यासारखेंच आहे. करितां हिंदु-मुसलमान लोकांनीं ज्या नात्यानें एकत्र राहावयाचें तें कांहीं अंशीं अमेरिकेंत निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचेंच असलें पाहिजे. हिंदु लोकांस जिंकून मुसलमानांनीं राज्य केलें हें जितकें खरें आहे, तितकें हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वी मुसलमानांचा अंमल संपुष्टांत आला होता, हेंहि इतिहासांत प्रसिद्ध आहे. रजपूत, शीख, मराठे इत्यादि हिंदु लोकांतहि बऱ्याच जाति मुसलमानांच्या बरोबरीनें शूर, धीट व तेजस्वी आहेत व इंग्रज सरकारचा अंमल नाहींसा झाला, तर हिंदु लोकांस केवळ मुसलमानांसच शरण जावयास नको. एकमेकांच्या शौर्याबद्दल व पराक्रमाबद्दल असा ग्रह झाला असला म्हणजे दंग्यांचें पहिलें कारण नाहींसें होईल व हिंदु आणि मुसलमान मिळून दोघेहि आपल्या शक्तीचा उपयोग दोघांच्या साधारण हितासाठीं करतील. हिंदुस्थानच्या इतिहासानें अशा रीतीचा ज्यांच्या मनावर परिणाम झाला आहे व ज्यांची धर्मबुद्धि वेदांत–विचारांनीं उदात्त झालेली आहे, त्यांस आपआपसांतील तंट्यांचीं बारीकसारीक कारणें काढून टाकण्यास पंचाईत पडणार नाहीं." भारताचे राष्ट्रीयत्व सामाजिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी ज्या समंजस सामाजिक विचारांची गरज आहे त्यांचे विवरण टिळकांनी या लेखात केले होते. 'हिंदु–मुसलमानांचा समेट' हे त्याचे शीर्षक होते. (केसरी, दि. १० ऑक्टोबर १८९३, स. टि. खंड ५, पान ३८४–३८५). टिळकांना अशीही खात्री वाटत होती की, " हिंदु–मुसलमानांमध्यें जो कांहीं स्वभावतः थोडा द्वैतभाव आहे तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदान्ताची अधिक

मिसळ झाल्याखेरीज कधींहि पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा नाहीं." (केसरी, ३ ऑक्टोबर १८९३, स. टि. खंड ५, पान ४२३)

सारांश, हिंदू-मुसलमानांच्या बाबतीत सरकारने तटस्थपणा ठेवला पाहिजे व हिंदू-मुसलमान संबंध धर्मस्वातंत्र्य, सह-अस्तित्व, सहयोग, परस्पर समजूत यांच्यावर आधारलेले असावेत व मातृभूमीशी निष्ठा ठेवून त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात संमीलित व्हावे, हा टिळकांचा आग्रह होता. हिंदूंनी व मुसलमानांनी इतिहासातील आपले द्वैत विसरून राजकीय समानहिततत्वाच्या आधारावर भारतीय राष्ट्राचे घटक म्हणून एकत्र नांदावे हे अपेक्षित असून राष्ट्रीय सभा हे त्यांचे एकत्र येण्याचे साधन आहे, ही टिळकांची भूमिका होती.

राष्ट्रनिर्मितीचा ध्यास

भारतीय राष्ट्रवादाच्या सामाजिक समस्येत प्रादेशिक संस्कृतींचा प्रश्न टिळकांच्या काळी निर्माण झालेला नव्हता, तरी भारतीय राष्ट्र हे अमेरिकेसारखे संघराष्ट्र होणार, हे टिळकांनी सूचित केले होते. भारतीय राष्ट्रवादाच्या सामाजिक प्रश्नांत जातिभेदाचा प्रश्न त्यांच्या काळी निर्माण झाला होता, पण तो मुख्यतः राजकीय हक्कांच्या संदर्भात होता. तथापि टिळकांची त्या बाबतीतील दृष्टी राष्ट्रीयत्वाचे संवर्धन करण्याची, ब्रिटिशविरोधी एकजूट अभंग राखण्याची होती. किंबहुना टिळकांना राष्ट्रनिर्मितीचा, राष्ट्रीयत्वाचा इतका ध्यास लागलेला होता की त्यांच्या विचारांत त्याबाबत एकाग्रता होती. राष्ट्रहिताला अग्रक्रम, प्राथमिकता द्या, असाच त्यांचा सतत आग्रह असे... 'स्वराज्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर' या लेखात टिळकांनी जे विचार प्रकट केले होते ते या संदर्भातली त्यांची भूमिका स्पष्ट करणारे होते. त्या लेखात टिळकांनी म्हटले होते की, "ब्राह्मणवर्गाचा पाडाव व्हावा अशी ब्राह्मणेतरांना इच्छा होणें स्वाभाविक आहे, असें धरून चाललें तरी केवळ ब्राह्मणांना अपशकुन करण्याकरितां आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेचें नाक कापून घेण्यासहि ब्राह्मणेतर कबूल होतील, इतका अधमपणा आपल्या ब्राह्मणेतर बंधूंमध्यें वसत असेल, त्यांच्या मनुष्यत्वाची इतकी हानि झाली असेल, असें मानण्यास आमचें मनच घेत नाहीं. अर्थात् ब्राह्मणवर्ग क्षणभर विचारांतून अजीबात वगळला आणि केवळ ब्राह्मणेतर आणि ब्रिटिश ब्युरॉक्रसी यांच्यापुरतेंच पाहिलें तर स्वराज्य हवें असेंच ब्राह्मणेतरांना वाटलें पाहिजे, व तसें त्यांना वाटत आहेहि...आम्हांस स्वराज्य हवें, पण त्याची कोणतीहि योजना निश्चित होताना 'ब्राह्मणेतरांच्या हक्कांचें योग्य संरक्षण झालें पाहिजे' असा या वादांतील दुसरा मुद्दा आहे. या मुद्यासंबंधानें आम्ही एकदमच असें सांगून मोकळे होतों कीं, ब्राह्मणेतरांच्या हक्कांचें संरक्षण करण्याची कोणतीहि सूचना पुढें आल्यास ब्राह्मण लोक तिचा विचार नुसत्या सहानुभूतीनेंच नव्हे तर थोड्याबहुत दिलदारीनेंही करण्यास तयार आहेत. कै. ना. गोखले

यांनीं आपल्या भाषणांतून व लेखांतून आणि मृत्युसमयीं करून ठेविलेल्या स्वराज्य-योजनेंतून ब्राह्मणेतरवर्गाच्या हक्कांचें संरक्षण करणें योग्य आहे, असें ठिकठिकाणीं प्रतिपादिलें असल्याचें प्रसिद्धच आहे. आणि लो. टिळकांनींहि लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं मुसलमान बंधूंच्या महत्त्वाकांक्षेसंबंधानें जे उद्‌गार काढले ते लक्षांत घेतले म्हणजे स्वराज्याच्या बाबतींत ब्राह्मणेतरांना किती प्रेमळपणानें बागविण्यास ते तयार आहेत, हें दिसून येते. 'कायदेकौन्सिलांत उद्या एक वेळ सगळेच ब्राह्मणेतर आले तरी मला चालतील, पण तेथें लोकनियुक्त हिंदु लोकांचें प्राबल्य असलें पाहिजे. परक्यांचें किंवा सरकारनियुक्तांचें प्राबल्य नसलें पाहिजे,' हे त्यांचे शब्द कोणाहि ब्राह्मणेतरानें विसरूं नये. हे शब्द अगदीं शब्दशः कोणी घेणार नाहीं ते तात्पर्यार्थानेंच घेतले पाहिजेत हें कोणाहि समंजस मनुष्यास सांगण्याचें कारण नाहीं. पण या अतिशयोक्तीच्या मुळाशीं खऱ्या राष्ट्रीय भावनेचें बीज आहे हें कोणासहि नाकबूल करितां यावयाचें नाहीं"...

"आम्हांस आज इतकेंच सांगावयाचें आहे कीं, जातवार निवडणुकींचें तत्त्व राष्ट्रीय दृष्ट्या आम्हांस संमत नसलें तरी ज्या कोणास ही हौस पुरवून घ्यावयाची असेल त्यानें ती खुशाल पुरवून घ्यावी, आम्ही त्याच्या आड येऊं इच्छित नाहीं...ब्राह्मण लोकांना मात्र या तत्त्वाचा अंगीकार करण्याची इच्छा नाहीं, आम्ही ब्राह्मण म्हणून आम्हांला इतके प्रतिनिधी द्या, असें ते कधींहि मागणार नाहींत व तसे दिले तरी ते घेणार नाहींत. मग सर्व कायदेकौन्सिलांत एकहि ब्राह्मण न आला तरी चालेल. आहेत–आमचे इतर जातवाले आहेत–ते आम्हां ब्राह्मणांच्या हक्कांचें रक्षण करितील अशी आमची पक्की खात्री आहे." (केसरी, १८ सप्टेंबर १९१७, स. टि. खंड ५, पान १८२–१८३, व १८५). हे विचार स्वराज्यातील हक्कांच्या संदर्भात टिळकांनी मांडले होते. त्यात जातवार हक्काचा प्रश्न राजकीय सुधारणेआड येऊ नये म्हणून टोकाची भूमिका घेण्याची त्यांची तयारी होती. राष्ट्रीय चळवळीत हा भेद आड येऊ नये, सर्वांनी एकत्र नांदावे, एकत्र लढावे हाच त्यांचा हेतू होता. पण जातिभेदातीत समाज असलेले राष्ट्र ही कल्पना त्यात नव्हती. टिळकांच्या सामाजिक विचारांची चर्चा करताना पुढे ह्याचा अधिक मागोवा घेऊ.

संमीलित, समावेशक, परंतु एकात्म राष्ट्र

सारांश, टिळकांच्या मताप्रमाणे भारतातील राष्ट्रकल्पना मूळ हिंदू राष्ट्रापासून समावेशक भारत राष्ट्रापर्यंत विकसित होत गेलेली संकल्पना आहे. इतिहासाचे, प्राचीन परंपरेचे, वेदांती तत्त्वज्ञानाचे भान त्या संकल्पनेत आहे. हिंदुत्वाचा वारसा ती नाकारीत नाही. उदार हिंदुत्वाच्या गाभ्यावर विकसित होणारी ती समावेशक राष्ट्रकल्पना आहे. टिळकांना वेदांत व देशभक्ती यांच्यात जसा अंतर्विरोध दिसत नव्हता तसा हिंदुत्व व

राष्ट्रीयत्व यांच्यातही तो दिसत नव्हता. समाज हा जिवंत घटक आहे, तो वेळोवेळी बदलत्या परिस्थितीशी जमवून घेतो. राष्ट्रीयत्व हीही समाजाचीच अवस्था असल्याने तीही विकसनशील व स्थितिसापेक्ष असली पाहिजे, ही टिळकांची राष्ट्रवादाची कल्पना होती. बेलारी येथे ५ मे १९०५ रोजी केलेल्या भाषणात टिळकांनी हेच सांगितले होते. ते म्हणाले होते, " The first duty of an Indian patriot is to ask if the people of India are of one nation. The answer that came to the lips of everyone is that India was one nation...The task of an Indian patriot is not easy; he should not be daunted by difficulties for the development of character consisted in conquering difficulties which are after all of human creation. There is no conflict between Vedantic ideals and patriotic ideals. Progress means that adapting to the changed circumstances at each time. Society being a living organisation, it was unnatural if it could not adapt itself to altered circumstances. The social organisation in India is not surely dead, it is probably slumbering and sleep is no death and there is sure to be a waking sooner or later. Patriotism in India involves nationality and welding of races. The limits should be widened, the ideal of a composite patriotism should be attained. "
(Mahratta, 7 May 1905, स. टि. खंड ७, पान ५४८.)

म्हणून भारतीय देशभक्तीचे अंतिम उद्दिष्ट एकात्म, एकजीव झालेले भारतीय राष्ट्र निर्माण करणे हे आहे, हाच टिळकांचा राष्ट्रसिद्धांत होता. तो इतिहासात पाय रोवून उभा असला तरी वर्तमान आणि भविष्याचे त्याला भान होते. भारतातील सर्व समाजगटांकडे वेदांती समदर्शित्वाने पाहिले आणि समाजव्यवहार व राजकारण केले तर हे उद्दिष्ट साध्य करणे अशक्य नाही, असा टिळकांचा आशावाद होता.

३

राष्ट्रजागृतीचे माध्यम : राष्ट्रीय शिक्षण

टिळकांच्या जीवनकार्याची सुरुवात शिक्षण-क्षेत्रापासून झाली, हा काही योगायोग नव्हता. तत्कालीन देशस्थितीची जाणीव होऊन तीच जाणीव आपल्या देशबांधवांमध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षणापासून प्रारंभ केला पाहिजे, ही टिळक व त्यांचे समवयस्क सहकारी गोपाळ गणेश आगरकर यांची स्वतःचे कॉलेज-शिक्षण घेतल्यानंतर पूर्ण विचारांती व चर्चेनंतर झालेली धारणा होती. श्री. न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या टिळक चरित्राच्या पहिल्या खंडात टिळक व आगरकर यांचा संवाद दिलेला आहे. त्यानुसार टिळक आगरकरांना म्हणाले होते, " आपणां दोघांत चालू स्थितीचें किंवा सर्वांगीण शिक्षण हातीं घ्यायला हरकत नाहीं ना ? शिक्षणासारख्या पवित्र कार्यांत तर आपला ' कॉमन प्लॅटफॉर्म ' आहे ना ? " त्यावर आगरकर म्हणाले होते, " आहे. कॉमन प्लॅटफॉर्म आहे. ठीक. टिळक, ठीक सुचविलेंत. ठरलें. आमच्या देशाचें शिक्षण आम्हींच हातीं घ्यावयाचें, ठरली तर एकवाक्यता. " याविषयीची आणखी माहिती देताना केळकरांनी लिहिले आहे, " सुशिक्षित लोकांनीं समाजाला विशेष रीतीनें उपयोगी पडावें असें टिळकांचें मत प्रथमपासूनचें होतें. समाजाची सेवा करावयाची तर ती करण्यांत दोन मार्ग, जुन्या पिढीला उपदेश करणें व नव्या पिढीला शिक्षण देणें. " (टिळक चरित्र, खंड १, पान ९८). याच निश्चयानुसार टिकळ-आगरकर–चिपळूणकर यांनीं जानेवारी १८८० मध्यें ' न्यू इंग्लिश स्कूल ' स्थापन करून आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यास प्रारंभ केला.

टिळकांच्या या निर्णयामागे तत्त्वविचार कोणता असावा, याचा अंदाज त्यांच्या

'गीतारहस्या'त ज्ञानी लोकांच्या कर्तव्यासंबंधी जो विचार केला आहे त्यावरून करता येतो. तसेच 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या लेखमालेत देशसेवेसाठी काय केले पाहिजे याचीच टिळकांनी प्रामुख्याने चर्चा केली होती. टिळकांनी त्यात म्हटले होते की, "आपल्या देशाची हल्लीची स्थिति कशी आहे, ती इतकी निकृष्ट होण्याचें कारण काय व सुधारण्यास कोणते उपाय करावेंत याचा सुशिक्षित मनुष्यानें विचार केला पाहिजे." टिळकांनी शिक्षणपद्धतीकडे देशहिताच्या, राष्ट्रबांधणीच्या दृष्टीने पाहिले होते. ब्रिटिश सरकारच्या शिक्षणपद्धतीवर त्यांनी केलेली टीका त्यांच्या राष्ट्रीय दृष्टिकोणातून आलेली होती. राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेचा उगमही त्यातच होता. राष्ट्रजागृती, राष्ट्रनिर्मितीला लागणारे सांस्कृतिक प्रबोधन, राजकीय कार्यकर्त्यांची निर्मिती हीच त्यांच्या राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय उत्सव या उपक्रमांची तीन उद्दिष्टे होती.

राष्ट्रीय आत्मबोधाची गरज

ज्ञानी लोकांनी तत्त्वदर्शनाचे कार्य केले पाहिजे हे सूत्र सांगताना धारवाड येथे केलेल्या भाषणात टिळक म्हणाले होते, "स्वराज्यप्राप्तीचा पहिला उपाय म्हणजे ओळख पटणें हा होय. ही ओळख पटण्यासाठीं भगवद्गीतेंत 'ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः' म्हणून सांगितलें आहे. ज्ञानी असतात तेंच तत्त्वदर्शन करून देत असतात. हें ज्ञान मिळवण्यासाठीं राज्यकर्त्यांकडे धावूं नका. राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता ही ओळख पटवून देण्यासाठीं आहे. म्हणून राष्ट्रीय शिक्षण हें अंतिम साध्याचें पाहिलें साधन होय." टिळकांच्या स्वतःच्या भावना शिक्षणकार्यात किती गुंतलेल्या होत्या, याची कल्पना त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देताना जे पत्र लिहिले होते, त्यातील पुढील वाक्यावरून येण्यासारखी आहे. त्यांनी लिहिले होते, "(राजीनाम्याचा) हा निश्चय करताना मला माझ्या भावनांशी महान् संघर्ष करावा लागला, हें मी आपल्याला खात्रीनें सांगतो. खरोखर मी आतां माझ्या जीवनाचें ध्येयच सोडीत आहे." (स. टि. खंड ६, पान ७२) टिळक शिक्षणाला एवढे महत्त्व देत होते. राष्ट्रीय शिक्षण या विषयावर बोलताना दि. २७ फेब्रुवारी १९०८ रोजी सोलापूर येथे झालेल्या त्यांच्या भाषणात ते म्हणाले होते, "राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या अगर स्वरूप सांगावयास समर्थांनीं केलेला उपक्रम लक्षांत आणला पाहिजे. आपण कोण, आपली स्थिति काय आहे, पुढच्या पिढीनें काय करावें, पोट कसें भरावें, देशाची कामगिरी काय आहे याची ओळख करून देणारें शिक्षण राष्ट्रीय शिक्षण होय." (स. टि. खंड ६, पान ८९६.)

टिळकांनी राजकीय हक्कांसाठी शिक्षण आवश्यक आहे हे अनेकदा सांगितले होते. १८९७ मध्ये दुष्काळावावत कार्य करण्यावद्दल प्रा. अच्युतराव साठे यांच्यावर इंग्रज सरकारने खटला भरला होता. त्यानिमित्त पेण येथे गेले असता जी शेतकऱ्यांची

प्रचंड सभा झाली होती तींत टिळक म्हणाले होते, " अशिक्षित बांधवांस बरोबर घेऊन त्यांचे हक्क कोणते हें सुशिक्षितांनीं त्यांना समजावून दिले पाहिजे. इंग्रजी शिक्षणापासून जर काही फायदा करून घ्यावयाचा असेल तर तो हा होय. सुशिक्षित मंडळींनें खालच्या लोकांस आपल्या शिक्षणाचा फायदा करून दिला पाहिजे व त्यांस त्यांच्या हक्कांची पुरी ओळख करून दिली पाहिजे." सारांश, लोकांची हक्क-संपादनाची चळवळ व राष्ट्रीय भावनेचा परिपोष यांच्याशी टिळक शिक्षणाचा संबंध जोडू पाहात होते. यासंबंधीची एक आठवण सेनापती बापट यांच्या चरित्रात (लेखक– नी. शं. नवरे) दिली आहे. " श्री. बाळूकाका कानिटकर यांनी स्वराज्य प्राप्तीसाठी ग्रामीण शिबिरे घेण्याचा उपक्रम सुरू केला. त्यावेळी टिळक त्यांना म्हणाले, ' शाब्बास ! मला हेंच हवं होतं. जळत्या क्रांतिकारकांकरवीं खेडीं उठविण्यासाठींच आम्ही ' समर्थ विद्यालय ' काढलं. जमलं नाही. " इत्यादि. (पान ३४७.) यासाठीच टिळकांनी शिक्षण क्षेत्राला आपल्या जीवनात पहिले स्थान दिले होते. ब्रिटिश सरकार देत असलेल्या शिक्षणाची चिकित्सा व त्यातील गुणदोष टिळकांनी सतत लोकांपुढे मांडले होते. त्यांची मांडणी करावयाची झाल्यास असे म्हणता येईल की, टिळकांच्या शिक्षणविषयक विचारात त्याला अग्रस्थान आहे.

टिळकांनी ' केसरी ' चे संपादक झाल्यावर राष्ट्रीय शिक्षणविषयक जे विचार व्यक्त केले किंवा त्यासंबंधी जी भाषणे केली त्यांचा मुख्य रोख सरकारच्या शिक्षणपद्धतीने राष्ट्र निःसत्त्व, ध्येयशून्य व स्वत्वहीन कसे होत आहे, इंग्रज सरकार खडेंघाशी करणारे कारकून किंवा दुय्यम अधिकारी निर्माण करण्यासाठी शिक्षण कसे देत आहे हे लोकांना सांगण्यावर व राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेमागे लोकमत उभे करण्यावरच होता. ही झाली टिळकांच्या विचाराची एक बाजू. राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना स्पष्ट करणे, शैक्षणिक क्षेत्रात सरकारने कोणते धोरण आखले पाहिजे, यासंबंधी आपली मते सांगणे ही दुसरी बाजू होती. या गोष्टी अशा काही परस्पर निगडीत होत्या की त्यातून लोकमत तयार होऊन राष्ट्रीय शिक्षणाला अधिक पाठिंबा मिळत असे.

इंग्रजी शिक्षणाच्या फायद्यांची नोंद करीत असतानाच त्या शिक्षणामुळे होत असलेल्या नुकसानीचे स्वरूप स्पष्ट करून इंग्रजी शिक्षणाच्या मोहात पडलेल्या पिढीचा भ्रम नाहीसा करणे हे टिळकांचे उद्दिष्ट होते. ' परके राज्यकर्ते आपल्याला शिक्षण कांहीं मोक्षप्राप्तीकरितां देत नाहीत, उदरनिर्वाहाशी त्याचा संबंध असतो ', हे सांगताना टिळक म्हणाले होते, " इंग्रजी राज्यामुळे आम्हांस जे कांहीं फायदे झाले त्यापैकीं शिक्षणाचा फायदा मुख्य होय, असें म्हणण्याचा सर्वत्र परिपाठ आहे, व तो कांहीं अंशीं खरा आहे. शाळाखात्याची रचना, खेडोखेडीं स्थापन झालेल्या शाळा, तेथील चुना देऊन पांढरीं केलेलीं शाळागृहें व चार-चार पांच-पांच रुपयांवर ठेवलेल्या असिस्टंट मास्तरांपासून तों दोन-तीनशें रुपये मिळविणारे हायस्कूलचे हेडमास्तर,

शाळांतून सर्व जातींच्या लोकांस येण्यास ठेवलेली मोकळीक, इत्यादि गोष्टी लक्षांत आणल्या म्हणजे न्या. चंदावरकरांसारख्यांचेहि डोळे दिपून गेले असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. अशा तऱ्हेच्या शाळा व शिक्षणपद्धति इंग्रजी राज्यापूर्वी हिंदुस्थानांत प्रचलित नव्हती ही गोष्ट निर्विवाद आहे. पण एवढ्यामुळें हल्लीच्या राज्यांत जें आम्हांस शिक्षण मिळत आहे तें उपयुक्त अगर हितकारक आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं. नेटिव्ह लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देऊन त्यांस आपल्या बरोबरीचें करावें, असें म्हणणाऱ्या मिल्ल प्रभृति ग्रंथकारांचे हेतु काय असतील ते असोत; त्याबद्दल आज चर्चा करण्याचें कारण नाहीं, आम्हांस हल्लीं जें शिक्षण मिळत आहे तें कसें आहे, एवढ्याचाच विचार करावयाचा आहे. आणि तसा विचार केला म्हणजे हल्लींचे शिक्षण अहितकारक आणि परिणामीं निरुपयोगी आहे असें आढळून येईल. देशांतील शाळांतून जें शिक्षण द्यावयाचें तें कांहीं मोक्षप्राप्तीकरितां देत नाहींत, मोक्षप्राप्तीचा मार्ग ज्यांस स्वीकारावयाचा असेल त्यांच्या शाळा दुसऱ्या ठिकाणींच ठेविल्या पाहिजेत. देशांतील शिक्षण वास्तविक म्हटलें म्हणजे देशांतील लोकांची उन्नति होण्यासाठींच आहे. जेणेंकरून देशांतील लोकांचें उद्योगधंद्यांचें ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची सोय होईल, त्यांची नीति व देशाभिमान वाढेल, स्वतंत्र रीतीनें आणि इभ्रतीनें दिवस काढतां येतील, आणि राजकीय व सामाजिक बाबतींत हितकारक कल्पनांचा प्रसार होऊन, लोकांस आपली स्थिति सुधारण्यास किंवा जास्त सुखकारक करण्यास सांपडेल. अशा प्रकारचें शिक्षण देशांतील सर्व लोकांस मिळणें जरूर आहे. याखेरीज शिक्षणाचा दुसरा मोठा उपयोग म्हटला म्हणजे स्वधर्म, स्वदेश यांबद्दल त्याच शिक्षणानें एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांच्या मनांत उत्पन्न झाली पाहिजे. सारांश, जेणेंकरून राष्ट्रांतील पुरुष, स्त्रिया व मुलें अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिकदृष्ट्या राष्ट्रांची एकजुटीनें उन्नति करण्यास प्रवृत्त होतील तें खरें शिक्षण होय. अशा प्रकारचें शिक्षण आमच्या देशांत कितपत चालू आहे याचा विचार केला असतां हल्लींच्या शिक्षणाची अनुपयुक्तता सहज नजरेस येईल." (केसरी, ८ ऑक्टोबर १९०१, स. टि. खंड ३, पान १७७–१८८)

इंग्रजी शिक्षणपद्धतीवर चौफेर टीका

ब्रिटिश सरकारच्या शिक्षणपद्धतीवरील टिळकांच्या टीकेत सर्वसाधारणपणे जे मुद्दे असत त्यांची नोंद त्यांच्या 'हिंदुस्थानातील शिक्षणाची दिशा' या दि. ८ ऑक्टोबर १९०१ च्या 'केसरी'तील अग्रलेखात त्यांनी सारांशरूपाने केली होती.

"हल्लींच्या शिक्षणपद्धतींत होत असलेली देशी भाषांची अवहेलना, नीति व धर्म-शिक्षणाचा अभाव, उद्योगधंद्यांची नव्या तऱ्हेची माहिती मिळण्याचा असंभव, कोणत्याही प्रकारे विद्येची खरी अभिरुचि उत्पन्न होण्यास जीं साधनें लागतात त्यांचा

अभाव आणि देशासंबंधानें एक प्रकारचा जो योग्य अभिमान उत्पन्न व्हावयास पाहिजे तो उत्पन्न होणें तर दूरच, पण तो उत्पन्न न होण्याबद्दल घेतलेली खबरदारी हे हल्लीच्या शिक्षणपद्धतीतील ठळक दोष होत."

हे दोषदिग्दर्शन करताना देशातील शिक्षणाची दिशा कोणती असावी याचे स्पष्टीकरणही टिळकांनी या लेखात सूत्ररूपाने केले होते. 'देशाभिमान वाढविणारे, राष्ट्रीय शिक्षण, राष्ट्रीय शील व नीतिमत्ता निर्माण करणारे धर्मशिक्षण, लोकांना उदरनिर्वाहासाठी, औद्योगिक विकासासाठी तयार करणारे धंदे-शिक्षण, विद्वत्तेची, संशोधनाची दिशा दाखविणारे उच्च शिक्षण टिळकांना हवे होते. त्यावरोबर लोकांना स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणारे राजकीय शिक्षण त्यांना पाहिजे, होते. हे शिक्षण सक्तीचे असावे व सरकारने त्यासाठी होईल तो खर्च सोसला पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. याच चार पाच अंगांनी टिळकांचे शिक्षणविषयक विचार समजून घेण्यासारखे आहेत.

राष्ट्रीयत्व खच्ची करणारे शिक्षण

लॉर्ड कर्झन यांच्या शिक्षणविषयक धोरणावर टीका करताना ब्रिटिश देत असलेल्या शिक्षणात जो बदल होत होता, त्याचे स्वरूपही टिळकांनी स्पष्ट करून सांगितले होते. त्यांनी लिहिले होते, "उदार शिक्षणानें लोकांची मनें सुसंस्कृत होऊन लोक अधिकाधिक हक्क मागावयास लागले तर तो सुदिन समजूं, असें या देशांत पाश्चिमात्य शिक्षण ज्यांनीं पहिल्यानें सुरू केलें त्यांचें मत होतें. पण लॉर्ड कर्झन यांस तें धोरण कसें आवडणार ? त्यांना आमच्या डोक्यावर सदैव नाचावयाचें आहे; तेव्हां त्यांनी अशी युक्ति काढली कीं, हिंदुस्थानांतील सर्व शिक्षण एकतंत्री करून खासगी शाळांस पूर्वीप्रमाणें स्वातंत्र्य न देता देशांतील सर्व विद्यार्थी एकाच शिस्तींत किंवा कैदेंत तयार करावे. युनिव्हर्सिटीचा नवा कायदा केला त्याचा हेतु तरी हाच. पाश्चिमात्य शिक्षणामुळें हिंदुस्थानांतील विद्यार्थिवर्गाची डोकीं भणाणून जाऊन स्वतंत्रतेच्या किंवा राष्ट्रीय हिताच्या अगर चळवळीच्या ज्या अनेक कल्पना त्यांच्या मनांत येतात त्या हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हिसची जुलमी राजसत्ता अबाधित राहण्यास अपायकारक आहेत, हें तत्त्व लॉर्ड कर्झन यांनीं ओळखून ठेवलें होतें; व पाश्चिमात्य शिक्षण अजीबात बंद करणें जर शक्य असतें तर ती गोष्ट त्यांनीं प्रथम केली असती. पण तसें करण्याचे दिवस निघून गेल्यामुळें ती गोष्ट शक्य नव्हती. तेव्हां कर्झनसाहेबांनीं अशी युक्ति काढली कीं, शिक्षणाच्या शाळा बंद करूं नयेत, पण सर्व शिक्षणखातें एका मुठींत आणि तेंहि सरकारच्या मुठींत आणून त्यावर अशी देखरेख ठेवावी कीं, बिशाद आहे त्यांतून एकहि विद्यार्थी असा बाहेर पडूं नये कीं, ज्याचें डोकें वर सांगितलेल्या स्वतंत्रतेच्या किंवा राष्ट्रीय जागृतीच्या कल्पनेनें भणाणून जाईल." ('हे आमचे गुरुच नव्हेत !' केसरी, ७ नोव्हेंबर १९०५, स. टि. खंड ३, पान २४५.)

पारतंत्र्य मजबूत करणारे शिक्षण

इंग्रजी शिक्षण करीत असलेल्या जुलमाचे वर्णन करताना टिळकांनी लिहिले होते, "शिकाल तर आमच्या पद्धतीप्रमाणें शिका, नाहींपेक्षां तुम्हांस परीक्षेस बसूं दिलें जाणार नाहीं, आणि नोकऱ्याहि देणार नाहीं. अशा प्रकारचा जुलूम सध्या सरकारनें मांडलेला आहे. जुलूम हा शब्द आम्ही जाणूनबुजून वापरीत आहोंत; कारण आमची अशी समजूत आहे कीं, शारीरिक जुलमापेक्षां मानसिक जुलूम अतिशय भयंकर असतो ! पंचतंत्रांत एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, कोणाहि शत्रूस जिंकावयाचें असल्यास त्याच्याजवळचीं हत्यारें हिसकावून घेण्यापेक्षां साधल्यास त्याची बुद्धि भ्रष्ट करणें अधिक फायदेशीर असतें. इंग्रज सरकार आपलें वर्तन अलीकडे याच तत्त्वावर ठेवूं लागलें आहे. इंग्रजी शिक्षणामुळें नवीन पिढी बिघडत चालली–म्हणजे स्वतंत्रता व राजकीय हक्क प्राप्त होण्याकरितां इच्छा बाळगूं लागली किंवा उद्योग करू लागली हें काहीं चांगलें नव्हे, असें वाटून मुळांतच या गोष्टीचा बंदोबस्त केल्यास बरें अशा समजुतीनें सरकारी अधिकारी–मग ते गोरे असोत किंवा काळे असोत–आपआपलीं कामें सध्यां करीत आहेत." (केसरी, २९ जानेवारी १९०७, स. टि. खंड ३, पान २६२–२६३.)

शेळपट शिक्षण घेऊ नका

सरकारी शिक्षण शेळपट करण्यात आले आहे, असा आक्षेप घेऊन याच लेखात टिळकांनी म्हटले होते, "सरकारी शाळांतून हल्लीं जें शिक्षण मिळतें तें केवळ कारकुनी पेशाचें आणि त्यांतल्या त्यांतहि शिळपटी कारकुनी पेशाचें मिळत असतें. देशांतील सर्व तरुण पिढीस जर हेंच शिक्षण मिळत राहील, तर देशाचें डोकें कधींहि वर निघण्याचा संभव नाहीं....नवीन पिढीस वायकी बनविण्याचा क्रम सरकारनें पत्करला आहे तेवढा वस्स आहे. ज्या गृहस्थांस आपलीं मुलें याच क्रमानें वाढलेलीं पाहिजे आहेत त्यांनीं सदर मुलें पाहिजे तर सरकारी शाळेंत खुशाल पाठवावीं, पण ज्यांना या गोष्टीचा आतां वीट आला आहे किंवा येत चालला आहे त्यांनीं नवीन खासगी शाळा काढण्याची खटपट चालू ठेवली पाहिजे." (स. टि. खंड ३, पान २६३–२६४.)

गुलामी कायम ठेवण्याचा हेतू

अशा रीतीने टिळकांनी इंग्रजी शिक्षणपद्धतीचे दोषदर्शन सतत चालविले होते. गुलामी कायम ठेवू इच्छिणाऱ्या या शिक्षणाचे स्वरूप उघड करताना ते सांगत असत, "हिंदुस्थान देश इंग्लंड देशाच्या शेंपटाप्रमाणें कायमचा विलायतेच्या अंकित राहावा, हिंदुस्थानांतील उद्योगधंदे विलायतेंत करतां येतील तितके विलायतेस न्यावे, आणि हिंदुस्थानांतील प्रजा सुशिक्षित झाली तरी तिच्या अंगांत स्वाभिमान, स्वावलंबन

इत्यादि गुण फारसे उत्पन्न होऊं नयेत; कारण ते उत्पन्न झाले तर परकीयांची अनियंत्रित राज्यसत्ता फार दिवस टिकावयाची नाहीं, असें आमच्या सरकारचें धोरण आहे. हिंदुस्थानांतील राज्यकारभार चालविण्यास शिकलेलीं माणसें सरकारला पाहिजे आहेत, पण एका ठराविक यत्तेपलीकडे यांचें शिक्षण जावें अशी आमच्या सरकारची बिलकुल इच्छा नाहीं. मोठा इंजिनियर, मोठा डॉक्टर, मोठा इतिहासकार, शोधक रसायनज्ञ, किंवा पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता, मोठा न्यायाधीश, अथवा योद्धा अगर पंडित हिंदुस्थानांत निर्माण होण्याची या सरकारास जरूर नाहीं, व तशी त्यांची इच्छाहि नाहीं. हीं माणसें बिलायतेंतून इकडे यावयाचीं आहेत, आणि त्यांच्या हाताखालीं काम करण्याइतकें ज्ञान आम्हांस असलें म्हणजे बस्स आहे, अशी आमच्या सरकारची समजूत आहे; आणि त्या समजुतीप्रमाणें सरकारी विद्याखात्याचें काम चालू आहे." (केसरी, २७ नोव्हेंबर १९०६, स. टि. खंड ३, पान २५२.) ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषयक धोरणातला साम्राज्यवादी स्वार्थ अशा रीतीने टिळक स्पष्टपणे लोकांपुढे मांडत होते.

चाकरी करून भाकरी

या इंग्रजी शिक्षणाची परिणती काय होईल, हे स्पष्ट करून सांगताना टिळक म्हणाले होते, "शिक्षण म्हणजे एक प्रकारचा चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे. हें शिक्षण नव्हे. ही एक प्रकारची हमाली आहे व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होतां उलट अवनति होण्याचा संभव आहे; किंबहुना झालीही आहे. ही गोष्ट विचारी पुरुषांच्या उत्तरोत्तर अधिकाधिक नजरेस येत चालली आहे." याच सेवावृत्तीबरोबर इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांत लाचारी व पोटभरूवृत्ती कशी निर्माण होत होती, याचाही टिळक सतत उल्लेख करीत. "सरकारास प्रिय तितकें बोलून व नुसती पोपटपंची करून स्वस्थ हरि हरि म्हणत आम्ही बसलों तरी पोटाचा खळगा भरून निघण्यास पुरेसें इतकें द्रव्य आमच्या प्रस्तुतच्या विद्येनें आम्हांस मिळणार आहे." नेटिव्ह अंमलदारांच्या मानसिक गुलामगिरीचे कारण त्यांचे इंग्रजी शिक्षण हेच आहे, हा मुद्दा मांडताना टिळक अनेकदा सांगत, "नेटिव्हास इंग्रजी राज्यांत नेहमीच खालच्या प्रतीच्या जागांवर रखडत पडून बढतीकरितां सदैव साहेबांच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें अशा प्रकारें तोंडापुरतें गोड बोलण्याची संवय पुष्कळ विद्वान लोकांसहि झालेली असते, आणि ही संवय एकदां जडली म्हणजे पेन्शन घेऊन घरीं बसल्यावरहि बहुतेकांची सुटत नाहीं, इतकेंच नव्हे तर मुद्दाम साहेब लोकांकडे हेलपाटे घालून त्यांच्या तोंडासारखें हे कधीं कधीं त्यांच्यापुढें बोलत असतात."

औद्योगिक शिक्षण नाही

टिळकांचा दुसरा टीकेचा मुद्दा म्हणजे इंग्रज सरकार व्यावसायिकदृष्ट्या जीवनाला उपयुक्त ठरणारे शिक्षण देत नाही, उद्योगधंदे, विज्ञान, तंत्रज्ञान यांना उत्तेजन देणारे शिक्षण देत नाही, हा असे. टिळकांच्या वेळी ब्रिटिश सरकार भारताची आर्थिक लूट कशी करीत आहे, भारताचे आर्थिक शोषण कसे केले जात आहे, यासंबंधीचे विचार दादाभाई नवरोजी, न्या. माधवराव रानडे, रमेशचंद्र दत्त इत्यादी विचारवंत सतत मांडत होतेच. आर्थिक राष्ट्रवादाचा, भारतीय अर्थकारणाचा सिद्धांत एक प्रकारे त्या वेळी मांडला जात होता. टिळकांनी वृत्तपत्रांतून व व्यासपीठावर याच विचारसरणीचा जोरदार पुरस्कार चालविला होता. स्वदेशीला व बहिष्काराला देशी उद्योगधंद्यांची जोड दिली पाहिजे, देशी भांडवल निर्माण करून देशी उद्योगधंदे व व्यापार सुरू झाला पाहिजे, लोकांनी झीज सोसून स्वदेशीला उत्तेजन दिले पाहिजे, यासाठी राष्ट्रीय शिक्षणाशी, टिळक स्वदेशीचा प्रचार जोडीत असत. त्याच अनुषंगाने शिक्षणपद्धतीवर टीका करीत. त्यांची भाषणे व लेख एका बाजूने लोकांसाठी व दुसऱ्या बाजूने सरकारसाठी असत. लोकांसाठी केलेल्या भाषणात लोकांना प्रश्नाची उकल करून सांगणे, लोकांनी काय करावे याचे मार्गदर्शन करणे, यावर प्रामुख्याने भर असे. सरकारला उद्देशून केलेल्या भाषणात लोकांचे कसे नुकसान होत आहे, सरकार कसा वचनभंग करीत आहे आणि काय करणे सरकारचे कर्तव्य आहे, ते न केल्यास त्याचे काय परिणाम होतील याची स्पष्ट चर्चा केलेली असे.

राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांची उद्दिष्टे समजावून सांगताना टिळक म्हणत, "आज शंभर वर्षांत आम्हांला आगकाडी कशी करावी हे समजलें नाहीं, ह्यास मोठी विद्वत्ता लागते अशांतली गोष्ट नाहीं. सोलापुरांत गवताच्या काड्या करतात, पण आमच्या देशांत गवताची कमतरता नाहीं, म्हणून हा धंदा वाढविल्यास परदेशी काड्या पुष्कळ कमी येऊं लागतील. साखरेचा धंदा असाच आहे. मॉरिशस येथील उंसाइतका चांगला उंस आमच्या देशांत आहे. तेथील उंसाइतकी साखर पुण्याच्या आसपासच्या उंसांत असते असें त्या उंसाचें पृथक्करण करून पाहतां दृष्टोत्पत्तीस आलेलें आहे. साखरेच्या पायीं सहा कोट रुपये आपण परक्यांच्या पदरांत टाकतों, असें का व्हावें? काय येथें ऊस नाहीं, कां यंत्रे मिळत नाहींत? याचें कारण हें शिक्षण आम्हांस मिळत नाहीं. जर्मनींत असा प्रकार नाहीं. तेथें व्यापारी खात्याकडूनच कोणाच्या धंद्याची कशी स्थिति आहे आहे ह्याची चौकशी करण्यांत येते व बुडणाऱ्या धंद्यांस उत्तेजन देऊन त्यांचें पुनरुज्जीवन करण्यात येतें. इंग्रज सरकार आपल्या देशांत असेंच करीत आहे. पण इकडे सरकार तसें करीत नाहीं. ही चूक असो वा तसें मुद्दाम करण्यांत येत असो, एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, सरकार या बाबतींत कांहीं करीत नाहीं, म्हणून आपण स्वस्थ बसतां कामा नये." (३ मार्च १९०८ चे बार्शी येथील व्याख्यान,

स. टि. खंड ६, पान ९०६.)

व्यावसायिक शिक्षण नाही

"शिक्षणाचा खरा उपयोग असा आहे कीं, प्रत्येक धंद्यांतील माणसास त्यामुळें आपआपला धंदा जास्त चांगल्या रीतीनें करता आला पाहिजे. सुताराला शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याला कारकून करावयाचा नाहीं. तर त्याला आपला सुताराचा धंदा जास्त चांगला करता यावा म्हणून शिक्षण द्यावयाचें. पूर्वी न सुचलेली क्लृप्ति काढून आपला धंदा सुधारता यावा म्हणून शिक्षण द्यावयाचें. बैल व म्हैस यांच्या मुलांना शिक्षण द्यावें लागत नाहीं, चारा खायला, पाणी प्यायला शिकवावें लागत नाहीं... शेतकऱ्यांना फार तर तीन-चार यत्तांचें शिक्षण मिळतें, पण हें शिकून त्यांना फायदा काय? त्यांना नांगराची सुधारणा सांगत नाहीत. बीं कसें पेरावें वगैरे शिकवीत नाहींत." (पंढरपूर येथील भाषण, १५ नोव्हेंबर १९०७, स. टि. खंड ६, पान ८८६-८८७.)

औद्योगिक तंत्रशिक्षणाचा आग्रह

भारताच्या औद्योगिकीकरणासाठी तंत्रशिक्षणाची गरज आहे व त्यासाठी जपानचा आदर्श पुढे ठेवून भारतातील तरुणांना परदेशात पाठवून तंत्रशिक्षण देण्याची व्यवस्था सरकारनेच केली पाहिजे, अवश्य त्या सवलती दिल्या पाहिजेत, हा मुद्दा वारंवार व आग्रहाने टिळक मांडत असत. 'धंदेशिक्षण व सरकार' या विषयावर लिहिलेल्या 'केसरी' तील लेखात त्यांनी लिहिले होते, "हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति होण्यास काय केलें पाहिजे, हें सरकारास कळत नाहीं असें नाहीं; पण राज्यांतील लोक अधिक सुखी व्हावेत यापेक्षां राज्याची मर्यादा अधिक वाढवून त्याचा दरारादि अधिक वाढावा इकडे सरकारचें लक्ष अधिक असल्यामुळें म्हणा किंवा हिंदुस्थानची औद्योगिक उन्नति कांहीं अंशीं इंग्लंडच्या व्यापाऱ्यांस प्रतिकूल असल्यामुळें म्हणा, या प्रश्नाचा व्हावा तसा सरकारकडून विचार होत नाहीं...जिल्ह्याजिल्ह्यांतून लहान लहान नवे धंदे लोकांस शिकविण्याकरितां किंवा बुडत चाललेले धंदे सुधारण्याकरितां ज्या शाळा पाहिजेत, त्या निघाल्याखेरीज देशाची औद्योगिक उन्नति कधींहि व्हावयाची नाहीं. हें काम खर्चाचे आहे, व तें कसें करावें याचा कित्ताहि जपाननें घालून दिला आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, धंदेशिक्षणावरील हल्लींच्या ठरावांत यासंबंधानें सर्व हवाला स्थानिक सरकारवर देण्यापलीकडे हिंदुस्थान सरकारनें कांहींच केलेलें दिसत नाहीं. जे उद्योगधंदे देशांत निघाल्यानें परदेशांतून इकडे येणारे पदार्थ कमी होऊन, देशांतील कच्चा माल देशांतच खपेल, अशा प्रकारचे लहानसहान कारखाने सर्व देशभर ज्या योगानें निघतील, अशा प्रकारचा मोठा उद्योग हातीं घेण्यास हिंदुस्थान सरकार तयार नाहीं. इतकेंच नव्हे तर, देशाची औद्योगिक पहाणीहि करण्यास सरकार तयार आहे

असें दिसत नाहीं." (२६ जानेवारी १९०४, स. टि. खंड ३, पान २०९–२१०.)

हिंदुस्थान सरकारने परदेशात शिक्षण घेण्यासाठी भारतीयांना पाठवण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी १० शिष्यवृत्या देण्याचे ठरविले. या निर्णयाचे स्वागत करून परंतु त्याचा अपुरेपणा स्पष्ट करून सांगताना 'दहाच स्कॉलरशिपा' या अग्रलेखात टिळकांनी म्हटले होते, "आजपर्यंत या बाबतीतलें सरकारचें औदासीन्यच आमचे धंदे बुडण्यास कारणीभूत झालें आहे; आणि यापुढें उद्योगधंद्यांची उन्नति व्हावयाची असेल तर ती सरकारनें आपण होऊनच केली पाहिजे. किंबहुना हें त्याचें कर्तव्य आहे असें आम्ही सांगतों; आणि या बाबतींत जो लहानसा आरंभ आज सरकारनें केला आहे तोच पुढें अधिक वाढून जपानप्रमाणें हिंदुस्थान देशहि उद्योगधंद्यांत पुढें सरसावेल अशी आम्हांस उमेद आहे. जपानी लोकांइतकेंच बुद्धीचें व शरीराचें सामर्थ्य आम्हांमध्ये आहे आणि आमचे राज्यकर्तेहि जपानी राज्यकर्त्यांपेक्षा अधिक सुधारलेले आणि शहाणे आहेत. तेव्हा जपानपेक्षां जास्त नाहीं तरी जपानइतकी उद्योगधंद्यांची सुधारणा येथें व्हावयास हरकत नाहीं. आमच्या सरकारनें परकीपणा मात्र सोडला पाहिजे म्हणजे झालें." (२ फेब्रुवारी १९०४, स. टि. खंड ३, पान २१५.)

कृषिशिक्षण व धंदेशिक्षण

हिंदुस्थान हा शेतकीप्रधान देश आहे व येथील ८० टक्के लोकसंख्या शेतीवर निर्वाह करते, हे लक्षात घेऊन टिळकांनी धंदेशिक्षणाला कृषिशिक्षणाची जोड दिली पाहिजे, हाही मुद्दा मांडला होता. याविषयी विवेचन करताना टिळकांनी लिहिले होते, "हिंदुस्थानांतील शेंकडा ऐंशी इतकी लोकसंख्या शेतकीवर निर्वाह करणारी आहे, असें जर ठरलें आहे तर, ही एवढी लोकसंख्या शेतकीच्या उद्योगावरच येऊन कां पडली व ती तशी पडल्यावर तिच्या तरणोपायास मार्ग कोणता याचा विचार, ज्या सरकारच्या गंगाजळींतील मुख्य घटक शेतकऱ्याचा पैसा हा होय, त्यानेंच कराव्यास पाहिजे. कृषिशिक्षण व धंदेशिक्षण याचा निकट संबंध असा येतो कीं, कृषिशिक्षणाचा हेतु हातीं असेल तेवढ्या जमिनींत चांगलें व पुष्कळ धान्य कसें पिकवावें हा होय, व धंदेशिक्षणाचा हेतु देशांतील उद्योगधंदे वाढवून शेतकीच्या ओघांत सापडून दुर्दशेकडे वहात जाणाऱ्या जितक्या लोकांस परावृत्त करतां येईल तितक्यांस वाचविणें हा आहे. म्हणजे कृषिशिक्षण व धंदेशिक्षण जें आज आम्ही मागत आहो तें देशांतील साधारणतः मध्यमप्रतीहूनहि खालच्या लोकांच्या हिताकरितां मागत आहों; व ही मागणी अशा स्वरूपाची असल्यामुळें एक वेळ राजकीय हक्काची मागणी नाकारणें सरकारास शोभेल, परंतु कृषिशिक्षण व धंदेशिक्षण यांजबद्दलची मागणी नाकारणें त्यास कधींहि शोभणार नाहीं...अशा स्थितींत हातीं असलेल्या टीचभर जमिनीचीच लागवड करून शेतकरी आपला चरितार्थ चालविण्यास समर्थ होईल, असें शिक्षण त्यास

देणें जरूर आहे." (केसरी, ७ जून १९०४, स. टि. खंड ३, पान २२३–२२४.)

औद्योगिक व शेतकी शिक्षणाप्रमाणे त्याकाळी दिल्या जाणाऱ्या विद्यापीठ शिक्षणावर व ते देणाऱ्या विद्यापीठावर टिळकांनी वारंवार हल्ले चढवून त्यांच्यातील दोष दाखविले होते. टिळकांच्या टीकेत प्रामुख्याने दोन मुद्दे असत. पहिला विद्यापीठातील विद्वत्तेचा दर्जा वाढवून त्यात संशोधक, तज्ज्ञ, विचारवंत निर्माण झाले पाहिजेत. तसे होत नव्हते. विद्यापीठे ही परीक्षा घेऊन पदव्या देणाऱ्या कंपन्या झाल्या होत्या. दुसरा म्हणजे विद्यापीठांवर सरकारी अंकुश ठेवून ती आपल्या ताब्यात ठेवण्याचा सरकारच प्रयत्न होता. लॉर्ड कर्झन यांनी विद्यापीठ विधेयक आणून हा प्रयत्न विशेषत्वाने केला. त्यासंबंधी टिळकांनी आपला निषेध व्यक्त करताना स्पष्टपणे लिहिले होते, "न्याय, संयुक्तिकपणा किंवा युनिव्हर्सिटीचें खरें हित या दृष्टीनें पाहिलें असता हल्लींचें बिल दांडगाईचें आणि अरेरावीपणाचें आहे एवढें लोकांच्या स्पष्ट रीतीनें निदर्शनास आलें आहे. मग सरकार काय पाहिजे तें करो." (केसरी, २९ डिसेंबर १९०३, स. टि. खंड ३, पान १४६.)

याआधी युनिव्हर्सिटी कायद्याच्या अहवालाबद्दल टिळकांनी लिहिले होते, "युनिव्हर्सिटीच्या व्यवस्थेंत सरकारचा अधिक तावा कसा राहावा, नोकरीसाठीं जरूर त्यापेक्षां अधिक ग्रॅज्युएट बाहेर न पडण्याची काय तजवीज करावी, कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अंगीं वेताबाताचाच स्वाभिनान राहील अशा प्रकारची कोणती शिस्त कॉलेजांत ठेवावी, किंवा खाजगी शाळा आणि कॉलेजें यांच्यावर कोणत्या प्रकारची देखरेख असल्यानें सरकारी शाळांतील किंवा कॉलेजांतील विद्यार्थी तयार होतील इत्यादि प्रश्नच कमिशनास महत्त्वाचे वाटले आहेत व त्यांचाच ऊहापोह त्याच्या रिपोर्टांत झाला आहे. अर्थात् हें सर्व विवेचन व खटपट सरकार के वास्ते झालेली आहे." (केसरी, २९ ऑगस्ट १९०२, स. टि. खंड ३, पान १४४.)

सारांश, विद्यापीठे हे सरकारी हमालखाने होत आहेत, हा टिळकांच्या टीकेचा मुख्य रोख होता. कारण सुरुवातीला सरकारला सेवकवर्ग पुरविण्यासाठी म्हणून स्थापन झालेल्या विद्यापीठांतून काही बुद्धिमान् विद्यार्थ्यांची दृष्टी अधिक दूरवर जाऊन इंग्रजी राज्यकारभारांतील दोष त्यांना अधिक दिसू लागले व देशाच्या भवितव्याचा ते स्वतंत्रपणे विचार करू लागले, असे सरकारच्या नजरेस आले. हे राजकीयदृष्ट्या अनिष्ट आहे असे ब्रिटिश सरकारला वाटू लागले. म्हणून विद्यापीठे ही सरकारच्या ताब्यात अधिकाधिक आणली पाहिजेत, असा विचार कर्झनसारख्या पक्क्या साम्राज्यवादी प्रशासकाच्या मनात आला असल्यास नवल नाही. टिळकांनी १८९४ पासूनच विद्यापीठांबद्दल लिहावयास सुरुवात केली होती. त्यात विद्यापीठे कशी असावीत, यासंबंधीचे आपले विचार त्यांनी व्यक्त केले होते. त्यावेळी टिळक मुंबई विद्यापीठाचे सदस्य होते. त्या काळात देशी भाषांच्या उत्तेजनासाठी विद्यापीठांनी काय केले पाहिजे, यासंबंधी

लिहिताना टिळकांनी म्हटले होते, " देशी भाषांच्या दुर्दशेमुळें एकंदर तरुण पिढीच्या शिक्षणाला जें भलतेंच वळण लागलें आहे व तेणेंकरून मुलांच्या कोंवळ्या मनांवर जो दुष्ट परिणाम होत आहे त्यामुळें देशी भाषांचा प्रश्न वस्तुतः दुसऱ्या पुष्कळ प्रश्नांच्या मुळाशीं आहे असें आतां पुष्कळांस वाटूं लागलें आहे. हल्लींच्या शिक्षणानें तरुण मंडळी निःसत्व होत आहे व तेणेंकरून म्हणाविणाऱ्या मंडळींतील स्वाभिमान, कर्तृत्व-शक्ति व उत्साह नाहींसा झाल्यासारखा झाला आहे ही गोष्ट सर्वांस कबूल आहे. पण हें शिक्षणाचें ओझें असह्य होण्यास विषयांची दुर्बोधता किंवा बाहुल्य वस्तुतः कारण नसून इंग्रजीसारख्या परकी भाषेंत ते विषय शिकविण्याची पद्धतीच मुख्य कारण आहे हें मात्र अजून पुष्कळांच्या लक्षांत येऊ लागलें नाहींसें दिसतें. तथापि जों जों या विषयाचा खल होईल तों तों ही गोष्ट अधिक अधिक प्रत्ययास येईल व तिचा प्रतिकार करण्याला देशी भाषांना उत्तेजन देऊन सर्व प्रकारचें शिक्षण देण्यास त्यांना पात्र करणें हा एकच उपाय आहे अशी सर्वांची खात्री होईल...या विषयाचा पुरता खल करून सर्वांस समाधानकारक योजना करण्यास सेनेटची एक कमिटी नेमावी व तिनें वरील सर्व अडचणी मनांत आणून सूचना सेनेटपुढे मांडावी. " (केसरी, ४ डिसेंबर १८९४, स. टि. खंड ३, पान १३५.)

खरे विद्यापीठ कोणते ?

" शास्त्रांचा अभ्यास सतत व मनन करणारे पुष्कळ विद्वान ज्या ठिकाणीं राहातात व त्यांची कीर्ति ऐकून दूरदूरचे शेंकडों विद्यार्थी विद्यार्जनाकरितां जेव्हा त्यांजपाशीं येतात तेव्हां एखाद्या स्थळास विद्यापीठ, विद्यामंदिर अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते. हल्लीं सुधारलेल्या राष्ट्रांतूनहि हाच प्रकार आढळून येतो. " अशी प्रस्तावना करून टिळकांनी भारतात त्याकाळी असलेल्या विद्यापीठांविषयी लिहिले होते, " गेल्या ५० वर्षांच्या अनुभवावरून आतां असें दिसून येत आहे कीं, दुधानें ज्याप्रमाणें ताकाचें अनुकरण करावयाचें त्याप्रमाणें युरोपियन विद्यापीठांचें आमच्या देशांतील युनिव्हर्सिट्या हें अनुकरण होय...युनिव्हर्सिटींत परीक्षा घेऊन बी. ए., एम्. ए.चे शिक्के ठोकण्या-पलीकडे दुसरें कांहीं काम चालत नाहीं. चान्सेलरपासून सिंडकेटपर्यंत जो तो आपल्या धंद्यांत गुंतलेला. हल्लींच्या युनिव्हर्सिटीस विद्यामंदिर म्हणण्यापेक्षां परीक्षा घेण्याकरितां रजिस्टर झालेली कंपनी म्हटलें तरी चालेल. गव्हर्नरसाहेब हे त्या कंपनीचे मुख्य डायरेक्टर होत. आणि मुंबईतील बॅरिस्टर किंवा इतर धंद्यांचे लोक हे सदर कंपनीचे व्यवस्थापक आहेत. अशा कंपनीचें सर्टिफिकेट मिळवून बाहेर पडलेलीं माणसें विद्यार्जनांत न गुंतता आपल्या ' व्यवसायात्मक ' बुद्धीचा इतर धंद्यांत उपयोग करूं लागल्यास त्यात कांहीं नवल नाहीं. " (केसरी, २५ फेब्रुआरी १८९६, स. टि. खंड ३, पान १३९.)

सरकारी कावा : राष्ट्रीयत्वाचा नाश

लॉर्ड कर्झन यांच्या शिक्षणविषयक धोरणाचा कावा समजून सांगताना टिळकांनी म्हटले होते, "सर्व शिक्षणाच्या दोऱ्या होतां होईतों आपल्या हातीं ठेवाव्या अशी सरकारास अनिवार इच्छा झाली आहे, अशा वेळीं नवीन कॉलेजें निघणें हें किती दुर्घट काम आहे याची कल्पना सहजच्चे होणार आहे व शिक्षणक्रम सर्वथा सरकारच्या हातीं गेला म्हणजे त्याचे परिणाम आपल्या राष्ट्रीयत्वास किती घातक होतील हें निराळें सांगावयास नकोच. दोहोंत दोन मिळविले असतां चार होतात ही गोष्ट समजणें जितकें सोपें आहे तितकेंच एखाद्या देशांत परकीय सरकारच्या हातीं शिक्षण जाणें म्हणजे त्या देशांतील राष्ट्रीयत्वाचा नाश होणें ही गोष्ट समजणेंही सोपें आहे." (केसरी, २३ फेब्रुआरी १९०४, स. टि. खंड ३, पान १५२.)

हे आमचे गुरूच नव्हेत !

टिळकांनी विद्यापीठांप्रमाणेच व विद्यापीठांत व कॉलेजांत शिकवणाऱ्या त्या काळच्या परकीय प्राध्यापकांच्या मनोवृत्तीवर व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवरही कडक टीका केली होती. या विषयावर टिळकांनी 'हे आमचे गुरूच नव्हेत !' हे तीन लेख लिहिले होते व ते त्यांतील स्पष्टवक्तेपणासाठी व कटू सत्यकथनासाठी गाजले होते. टिळकांनी लिहिले होते, "तरुण पिढीस राष्ट्रहिताच्या गोष्टी समजावून सांगणें आणि तरुणपणापासूनच तदनुकूल आरचण करण्याची त्यांच्या मनाचीं प्रवृत्ति करणें हेंच खऱ्या विद्यागुरूचें कर्तव्य होय. राजाचा नोकर म्हणून – परकीय राजाचा नोकर म्हणून – लोभानें वांधला गेलेला अथवा त्या लोभाचा अनेक वर्षें मनावर परिणाम होऊन विचार व मन संकुचित झालेला शिक्षक खरा विद्यागुरुहि नव्हे. हिंदुधर्मशास्त्रात गुरूला जो मान द्यावा म्हणून सांगितलें आहे त्यासहि तो पात्र होत नाहीं. आमच्या देशांत सरकारनें जीं कॉलेजें व युनिव्हर्सिट्या काढल्या आहेत त्यांत सरस्वतीदेवीस राजसत्तेची दासी बनविली आहे! आणि लॉर्ड कर्झनसाहेबांनीं तर हें दास्यत्व चिरकाल कायम ठेवण्याचा बंदोवस्त केला आहे ! आमच्या युनिव्हर्सिट्या व कॉलेजें म्हणजे सरकारच्या ताटाखालचीं मांजरें होत...हिंदुस्थान सरकारनें ठरविलेलें धोरण–सिमलापरिषदेंत ठरलेले नियम – अमलांत आणण्याकरितां नेमलेले ते गोरे अधिकारी आहेत...आमचे विचार कोते करण्याकरितां, आमच्या मनाची, बुद्धीची वाढ परकीय राज्यकर्त्यांना जितकी पाहिजे तितकीच ठेवण्याकरितां परकीय राज्यकर्त्यांनीं उत्पन्न केलेलीं ही मारक–यंत्रें होत."

मिल्टन, शेक्सपीयर शिकविणारे गुरू

"हिंदुस्थानवर ज्या परकीय लोकांचा अमल आहे त्यांच्या जातीचे हे (गुरु)

असून या राज्यकर्त्यांचें राजकीय धोरण शिक्षणाच्या द्वारें नवीन पिढीच्या मनांत बिंबविण्याकरितां यांचा अवतार आहे...मिल्टन, शेक्सपियर किंवा बेक शिकवणारे हे गुरु आहेत खरे, पण राष्ट्राच्या वाढीचीं तत्वें अथवा राष्ट्रीय चळवळीचें बीज जर आमच्या तरुण पिढीस शिकवावयाचें असेल तर तें या सरकारी कॉलेजांतील गुरूपासून मिळावयाचें नाहीं." (१७ ऑक्टोबर १९०५, स. टि. खंड ३, पान २३२–२३३–२३४.)

"जिंकलेल्या लोकांना जेते लोक अथवा त्यांनी नेमलेले शिक्षक राष्ट्रधर्माचीं खरीं तत्वें सांगतील, ही गोष्ट मनुष्यस्वभावाच्याच विरुद्ध आहे; आणि ही गोष्ट लक्षांत आणूनच सरकारी कॉलेजांतील प्रिन्सिपालास किंवा प्रोफेसरांस आम्ही राष्ट्रीय बाबतींत काय विचारावें आणि काय विचारूं नये याचा निर्णय केला पाहिजे. स्वतंत्र देशांतले स्वतंत्र गुरु आणि परकीय अमलाखालीं परकीय राज्यकर्त्यांनीं जिंकलेल्या लोकांस मेहरबानीनें शिक्षण देण्याकरितां नेमलेले परकी गुरु, यांत जमीन-अस्मानाची तफावत आहे." (केसरी, २४ ऑक्टोबर १९०५, स. टि. खंड ३, पान २३७.)

सार्वजनिक चळवळी व विद्यार्थी

'हे परकीय प्राध्यापक विद्यार्थ्यांनी राजकीय वा सार्वजनिक चळवळींत पडूं नये असा आग्रह धरीत असतात. त्यांना विरोध करण्याचें हें आणखी एक कारण आहे', हे टिळक सांगत असत. टिळकांनी लिहिले होते, "विद्यार्थ्यांनीं सार्वजनिक चळवळींत पडूं नये अशा सबबीवर स्वदेशी मालाच्या चळवळीपासूनहि त्यांना अलिप्त राखण्याचा जे प्रयत्न करतात त्यांस गुरु म्हणावें कीं पोटभरू म्हणावें, याचा वाचकांनीच निकाल करावा. हे आमचे गुरु नव्हेत. ए. बी. सी. शिकविण्याकरितां, इंग्रजी भाषा शिकविण्याकरितां, ऑफिसात खर्डेघाशी आम्हांस शिकवण्याकरितां हे नेमलेले सरकारी नोकर होत." (केसरी, दि. १५ ऑक्टोबर १९०५, स. टि. खंड ३, पान २३६.) याच मुद्याचे अधिक विवेचन करताना पुढे टिळकांनी म्हटले होते, "शाळेच्या विद्यार्थ्यांनीं विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळींत पडूं नये, मोठ्यांनीं राजाचे नोकर म्हणून पडूं नये आणि म्हाताऱ्यांनीं पेन्शनर म्हणून पडूं नये; एतावता जन्मल्यापासून मरेपर्यंत चुकून एखादा मनुष्य गेल्यास जावा; बाकी सगळे—

बाल्ये राजगुरूर्येता यौवने भृतिदो नृपः।
तथा पेन्शनदाता च न हिंदुः प्रभुरात्मनः॥

या राजनीतीच्या तत्त्वांत चिरडून जाऊन जन्मल्यापासून मरेपर्यंत एकसारखें दास्यत्वांत मुरलें जावें, आणि एक पिढी अशी मुरली म्हणजे तिचे अनुवंशिक संस्कार दुसऱ्या पिढीस मिळून अशा रीतीनें राष्ट्रभक्तिशून्य पुरुषांची सरकारी नोकरीकरितां परंपरा तयार व्हावी." (केसरी, २४ ऑक्टोबर १९०५, स. टि. खंड ३, पान २३९.)

विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांनी ज्या गोष्टी शिकावयाच्या त्यातच धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबींचा समावेश होतो, असे सांगून टिळक म्हणत, "यासाठी आमचे असें ठाम मत आहे कीं विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळींत पडूं न देण्याचा नियम करणें म्हणजे एक प्रकारें राष्ट्राचें नुकसान – राष्ट्राचा घात करणें होय. विद्यार्थ्यांनीं आपला सर्व वेळ या कामीं लावावा असें कोणीहि म्हणत नाहीं. त्यांचें कर्तव्य अनेक बाबतींत ज्ञान मिळविण्याचें आहे, पण त्या बाबतींतच सार्वजनिक हिताचा किंवा चळवळीचाहि समावेश होतो. राष्ट्राच्या उन्नतीकरितां ज्या चळवळी चालू आहेत त्यांत पडून व त्या पाहून त्यांच्या शक्याशक्यतेचा किंवा अधिकउण्या फायद्या–गैरफायद्याचा विचार विद्यार्थ्यांनीं विद्यार्थिदशा संपण्यापूर्वीच आपल्या मनाशीं करून ठेवला पाहिजे. असें करण्यास जें गुरु सरकारचे नोकर म्हणून. . . .सवड देणार नाहींत ते त्यांचे गुरु नव्हेत, शत्रू होत; आणि प्रल्हादानें म्हटल्याप्रमाणें त्यांस 'पापतरूं'ची किंवा आम्हीं म्हटल्याप्रमाणें 'पोटभरूं'ची उपमा देण्यास बिलकुल हरकत नाहीं." (केसरी, ७ नोव्हेंबर १९०५, स. टि. खंड ३, पान २४७–२४८.)

सरकारी अनुदानाची गुलामी

ब्रिटिश सरकारने शिक्षणखात्यातर्फे खाजगी शिक्षणसंस्थांना अनुदान देण्यास सुरुवात केली. पण या अनुदानावरोबरच सरकारी बंधने शिक्षणसंस्थांवर येऊ लागली. टिळकांनी या अनुदानाबद्दल इशारा दिला. त्यांनी सांगितले होते, "आम्हीं खाजगी शाळांच्या द्वारें हें उंटाचें पिल्लूं घरांत घेतलें तर आमच्या पोराबाळांस विकून त्यांस गुलाम केल्याचें अपयश लवकरच आम्हांस आपल्या माथीं घ्यावें लागेल." (स. टि. खंड ३, पान २७६.) सरकारी अनुदानाविषयी टिळकांनी सरकारला उद्देशून लिहिले होते, "सरकारी शाळेवर जे पैसे खर्च होतात ते आम्ही दिलेल्या करांपैकींच आहेत, हे लक्षांत आणिलें म्हणजे सरकारी सर्क्युलर निव्वळ जुलमाचें आणि अन्यायाचें असें कोणाच्याहि ध्यानांत येईल. आम्हीं आपलीं मुलें शिकण्याकरितां सरकारी शाळांत पाठविलीं म्हणजे तीं कांहीं सरकारास विकलीं नाहींत, किंवा शाळेबाहेर मुलांच्या वर्तनावर देखरेख करण्याचा हक्क सरकारकडे सोपविला नाही. हें सरकारनें लक्षांत ठेवलें पाहिजे. आईबापांनीं आपल्या मुलीस देवास वाहून मुरळी केली तरी तिजवरील पालकत्वाचे आई–बापांचे हक्क कमी होत नाहींत अथवा काढता येत नाहींत, असें जें सरकार म्हणतें तेंच सरकार शाळेबाहेर विद्यार्थ्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवण्याचा अधिकार विद्यार्थी सरकारी आणि बिनसरकारी शाळांत शिकतात म्हणून, त्यांच्या आई–बापांस किंवा पालकांस नाहीं म्हणून ठरवितें हें आश्चर्य नाहीं काय ?. . .सरकारकडून पोटास मिळवीत आलेले त्यांचे नोकर–मग ते सेल्सीसाहेब असोत अथवा पांडू शिपाई असो–पाहिजे तर सरकारचा हा हुकूम शिरसावंद्य

मानोत, परंतु विद्यार्थ्यांच्या आईवापांनीं, पालकांनीं किंवा सरकारवर सर्वस्वीं अवलंबून नसलेल्या शाळेच्या व्यवस्थापकांनीं सरकारचे असले हुकुम मानणें म्हणजे सत्याचा, न्यायाचा, स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा उपमर्द करणें होय. शिस्त कोणास नको आहेसें नाहीं. पण शिस्तीच्या नांवावर सरकार जेव्हां आपले कांहीं अंतस्थ हेतु साध्य करण्याकरितां आमच्या मुलांवर निष्कारण सक्ती करण्यास तयार होतें, तेव्हां मात्र सरकारच्या या चोंबडेपणावद्दल चीड आल्याखेरीज राहात नाहीं." (केसरी, दि. ३० जुलै १९०७, स. टि. खंड ३, पान २७६–२७७.) म्हणून खाजगी शाळांनी सरकारी मदतीच्या चतकोर तुकड्यासाठी सरकारची ही गुलामगिरी पत्करू नये, असे सांगून टिळक म्हणत, "स्वतंत्र रीतीनें आपल्या हिमतीवर त्यांनीं आपले लोकशिक्षणाचें काम चालविलें पाहिजे. सरकारनें आपल्यास हुकमी नोकर मिळावे म्हणून ज्या शाळा अथवा नोकरखाने काढलेले आहेत त्यांचें अनुकरण करण्याकरितां स्वार्थत्याग करणारे रँग्लर-सारखे विद्वान् आम्हांस नको आहेत, किंवा खाजगी शाळांस जो लोकाश्रय मिळत आहे तोहि एवढ्याकरितां नाहीं. सरकारची गुलामगिरीच करावयाची, तर मग चतकोर भाकरी घेऊन तरी कां ? सगळी तरी घ्या ! आणि गुलामगिरी किंवा गुलामगिरीसारखें अनुकरण करावयाचें नसलें तर ज्यांनीं तीन चतकोर भाकरी दिली ते एक चतकोर देण्यास नाकबूल वा असमर्थ आहेत असेंहि नाहीं. सरकारची बुद्धि नीट नाहीं ही गोष्ट खरी आहे व सरकार रागावल्यास केवळ ग्रँटच बंद करील इतकेंच नव्हे, तर खासगी शाळेंतील मुलें युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला येऊं देणार नाहीं असा संभव आहे. पण आतां याकरितां भिऊन काय उपयोग ?..." (केसरी, ३० जुलै १९०७, स. टि. खंड ३, पान २८०.)

टिळकांच्या या निर्वाणीच्या इशाऱ्यावरून हे स्पष्ट होते की, केवळ लोकाश्रयावरच अवलंबून असणारे राष्ट्रीय शिक्षण कसे सुरू करता येईल, हा विचार टिळकांच्या मनात घोळत होता. राष्ट्रीय शिक्षण हे स्वावलंबी झाले पाहिजे तरच ते 'राष्ट्रीय' राहील, ही टिळकांची भूमिका होती. म्हणून टिळकांनी एकदा सांगितले होते, "शिक्षण राष्ट्रीय होण्यास तें राष्ट्रातील लोकांच्या हातांतच राहिलें पाहिजे."

ब्रिटिश साम्राज्यवादी अरेरावी

टिळकांनी ब्रिटिशांच्या शिक्षणपद्धतीवर टीका करताना भाषिक दृष्ट्या मूलभूत असा अगदी वेगळा मुद्दा उपस्थित केला होता. सर हेन्री कॉटन या ब्रिटिश विचारवंताने ब्रिटिश साम्राज्यवादाचा पुरस्कार करणाऱ्यांचा जो वर्ग त्याकाळी ब्रिटनमध्ये होता त्याच्या साम्राज्यवादी वृत्तीवर टीका करणारा एक लेख लिहिला होता. टिळकांनी त्या लेखातील मतांना दुजोरा देऊन ब्रिटिशांची बादशाही अरेरावी कशी चालू आहे याचे मार्मिक विवेचन 'केसरी'तील एका लेखात केले होते, त्यात टिळकांनी म्हटले

होते, "आपल्याहून कमी प्रतीच्या किंवा कमी सुधारलेल्या लोकांबद्दल तुच्छ-बुद्धि मनांत धरणें किंवा अशा लोकांशीं उर्मटपणानें किंवा अरेरावीनें वागणें हा नीतिदृष्ट्या मोठा दुर्गुण होय. हल्लींच्या साम्राज्याच्या व्यवस्थेनें इंग्रज तरुण अधिकारीवर्गांत हा दुर्गुण बळावत चालला आहे; आणि त्याचा जर वेळींच प्रतिकार झाला नाहीं तर या वाढत चाललेल्या दुर्गुणानें इंग्रजी राष्ट्र कधींहि खालीं आल्याखेरीज राहाणार नाही. भगवद्गीतेंतील दृष्टांत घ्यावयाचा असल्यास ही आसुरी संपत् आहे आणि कालगतीनें तिचा शेवटीं ऱ्हास झाल्याखेरीच कधींहि रहावयाचा नाहीं. जी गोष्ट राष्ट्रीय नीतिदृष्ट्या गर्ह्य आहे, जिच्यामुळें जिंकणाऱ्या राष्ट्रांतील लोकांच्या मनांत दुर्गुणांचा प्रादुर्भाव होतो ती गोष्ट राजकीयदृष्ट्या, कधींहि बरोबर असूं शकत नाहीं. राजकीय नीति व राष्ट्रीय नीति यांची जोड जर कोणी तोडूं इच्छिल तर त्या कृत्याचें अनिष्ट फळ त्याला मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं." (स. टि. खंड ३, पान २२७.) टिळकांचे म्हणणे असे की, 'साम्राज्यवादी अरेरावीचें सुख क्षणिक आहे, आतां तें कांहीं काळ मिळेल पण ती अरेरावी राष्ट्रीय चारित्र्यांत मुरेल व त्याचे वाईट परिणाम पुढें इंग्लंडला भोगावे लागतील.' ते म्हणत असत की, "गुलामगिरी हा धंदाच असा आहे कीं, गुलामांचा धनी त्यामुळें आपणांस कितीहि कृतकृत्य समजत असला तरी, गुलामावरोवर धन्याची स्वतंत्रता त्यामुळें कमी होत असते. व्यक्तिमात्रास लागू असणारा हा नियम राष्ट्रासहि लागू आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रास कायमच्या गुलामगिरींत ठेवल्यानें दोन्हीहि राष्ट्रें सारखींच अधःपतन पावतात. वैभवाच्या, मर्दुमकीच्या किंवा अभिमानाच्या भरांत ही गोष्ट विजयी लोकांच्या लक्षांत येत नाहीं, पण त्यामुळें राष्ट्रीय नीतिशास्त्राचे जे कांहीं अपरिहार्य नियम आहेत त्यांस कोणत्याहि तऱ्हेचा बाध येत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इंग्रजी साम्राज्याची सांप्रतची स्थिति शोचनीय आहे; आणि हल्लीं संचार करीत असलेल्या साम्राज्यकल्पनेच्या पिशाचास जर लवकर गति मिळाली नाहीं तर नीतिमत्तेला सोडून नुसत्या तरवारीच्या जोरावर इंग्रजी साम्राज्य कधींहि चिरस्थायी व्हावयाचें नाहीं, गळ्यांत धोंडा घातलेल्या पुरुषाप्रमाणें तें अनीतीच्या समुद्रांत गटांगळ्या खात तळास जाईल हें निर्विवाद आहे." (केसरी, १३ डिसेंबर १९०४, स. टि. खंड ३, पान २३०.)...सर हेन्री कॉटन यांनी त्यांच्या लेखात ब्रिटिश भारतात देत असलेल्या पाश्चात्य शिक्षणाचे खरे स्वरूप वर्णिले होते. त्यांचे म्हणणे असे की, या शिक्षणाने भारतीयांची नीतीची बंधने सुटत चालली असून मेंढपाळ नसल्यामुळे सैरावैरा भटकणाऱ्या मेंढरांसारखी त्यांची स्थिती झाली आहे. टिळक धार्मिक व नैतिक शिक्षणाचा आग्रह करीत असल्यामुळे त्यांनी या मताचा पुरस्कार करून आपल्या लेखात म्हटले होते, "राष्ट्रांतील लोकांत अशा प्रकारची सामाजिक, नैतिक व धार्मिक अनावस्था उत्पन्न होणें ही एक राष्ट्रीय आपत्तीच होय आणि अशा

प्रकारची आपत्ति आम्ही हिंदी लोकांस देत असलेल्या पाश्चात्त्य शिक्षणानें हिंदुस्थानांत उत्पन्न झाली आहे. ही स्थिति राज्यास कधींहि हितकारक होऊं शकत नाहीं... हिंदुधर्माचा व नीतीचा पाया ज्या तत्त्वांवर रचलेला आहे त्या तत्त्वांत हल्लींच्या शिक्षणानें कांहीं फेरफार झाला पाहिजे व होईल यांत शंका नाहीं. पण राजकीय स्वातंत्र्य किंवा राष्ट्रीय अस्तित्व जोंपर्यंत हिंदुस्थानास मिळालें नाहीं तोंपर्यंत त्यांच्या हातून त्यांची उन्नति कितपत होईल याबद्दल शंकाच आहे." (स. टि. खंड ३, पान २२९.)

इंग्रजी विद्येचे फायद : स्वातंत्र्यप्रेम व भौतिक शास्त्र

त्याकाळच्या इंग्रजी सरकारने सुरू केलेल्या शिक्षणपद्धतीवरील टिळकांच्या चौफेर टीकेचे स्वरूप हे असे होते. पण ही टीका करताना इंग्रजी विद्येने जे काही नवे प्रवाह, स्वातंत्र्याचे जे नवे विचार आणले, त्यांचे भान त्यांना होते. 'तें वाघिणीचें दूध आहे, पण तें पचलें पाहिजे' असे ते म्हणत. 'इंग्रजी इतिहास, इंग्रजी शास्त्रें, इंग्रजी राज्यपद्धत, इंग्रजी वाङ्मय यांची हिंदुस्थानांतील लोकांस एकदां ओळख झाली म्हणजे माणसाच्या रक्तास चटावलेल्या वाघाप्रमाणें हिंदी लोक स्वातंत्र्याचे, स्वतंत्र संस्थांचे आणि सांपत्तिक वैभवाचे भोक्ते बनतील, व असें झालें म्हणजे स्वार्थाकरितां हिंदुस्थानांत आलेल्या इंग्रजी लोकांच्या साम्राज्यास धक्का असेल", ही काही इंग्रज लोकांनी भारतात नवी शिक्षणपद्धती सुरू करण्याचे वेळी घेतलेली शंका खोटी नव्हती, हे टिळकांनी कबूल केले होते. त्यांनी म्हटले होते, "विद्या आणि शिक्षण ह्या दोन शक्तिच अशा आहेत कीं, बुद्धिमान माणसांस त्यांच्या योगें वाटेल तें सामर्थ्य येऊं शकतें. स्वतंत्रतेकरितां लढणाऱ्या लोकांचा इतिहास वाचून आपणहि स्वतंत्रतेकरितां धडपड करावी असें ज्यास वाटणार नाहीं तो विद्यार्थी नव्हे, पशु होय. विद्यादेवीची या श्रद्धेनें आणि विश्वासानें जो उपासना करील त्यास ही देवी प्रसन्न झालीच पाहिजे; आणि अशा रीतीनें सदर देवीची प्रसन्नता करून घेणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें काम आहे. कळणें आणि उमजणें, पोटात जाणें आणि मुरणें यामध्यें भेद जो आहे तो हाच होय. अर्थात् ज्या इंग्रजी मुत्सद्यांनीं पाश्चिमात्य शिक्षण प्रथमतः या देशांत सुरू केले त्यांना ही भीति होतीच की, हें वाघिणीचें दूध पिऊन हिंदुस्थानांतील लोक केव्हां ना केव्हां तरी तयार होऊन स्वराज्याचे हक्क मागूं लागतील." (स. टि. खंड ३, पान २५६.)

स्वातंत्र्यप्रेम ही जशी पाश्चात्त्य शिक्षणाची देणगी होती, तसेच टिळकांनी हेही आवर्जून सांगितले होते की, "बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानांतील न्यायव्याकरणादि प्राचीन शास्त्रें किती जरी उपयोगी पडत असलीं तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था, राजनीति, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्परसंबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचें ज्ञान लागतें त्या विषयांचें शिक्षण या आमच्या

जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाहीं. आणि मिळणेंही शक्य नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं देशाभिवृद्धीस उपयोगी पडणारीं हीं शास्त्रें व हे विषय नवीन सिद्ध केलेले आहेत; आणि पाश्चिमात्य राष्ट्रांचा एकंदर इतिहास पाहिला तर त्यांच्या वाङ्मयांत व शिक्षणक्रमांत याच विषयांना प्राधान्य दिलेलें आढळून येतें." (केसरी, ४ डिसेंबर १९०६, स. टि. खंड ३, पान २५५.)

राष्ट्रीय शिक्षणाचे उद्दिष्ट

सारांश, टिळकांनी तत्कालीन शिक्षणपद्धतीविरुद्ध टीकेचे मोहोळ उठविले तरी त्याचे उद्दिष्ट स्वातंत्र्यप्रेम निर्माण करणाऱ्या, लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यास उपयोगी पडणाऱ्या, राष्ट्रीय परंपरा, चारित्र्य, स्वाभिमान यांची जाणीव करून देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणासाठी लोकांची मने तयार करावयाची हेच होते टिळकांच्या राजकीय जीवनाचे उद्दिष्टही हेच होते. राष्ट्रीय शिक्षणाकडे त्यांनी स्वराज्याचे पहिले साधन म्हणून पाहिले यातील बीज हेच होय. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाविषयीच्या आपल्या कल्पना वेळोवेळी मांडल्या, त्या विकसित होत गेलेल्या दिसतात. केवळ वेगळ पुस्तकी शिक्षणक्रम रूढ करणे किंवा तो शिकवणारे माध्यम निर्माण करणे हा त्यांचा हेतू नव्हता. राष्ट्रनिर्मितीची, राष्ट्रीय पुनरुत्थानाची प्रक्रिया म्हणून राष्ट्रीय शिक्षणाकडे ते पहात होते. राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या देताना टिळकांनी लिहिले होते, "प्रत्येक स्वतंत्र देशांतील सरकार आपल्या प्रजेस जें शिक्षण देतें किंवा देऊं इच्छितें तें राष्ट्रीयच असतें. देशांतील तरुण पिढी देशाचें राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल, अशा प्रकारें त्यांस शिक्षण देणें हें त्या देशांतील विद्याखात्याचें कर्तव्य आहे, आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असें म्हणतात." (केसरी, २७ नोव्हेंबर १९०६, स. टि. खंड ३, पान २५०.) दुसऱ्या एका ठिकाणीं 'राष्ट्रीय शिक्षण म्हणजे देश ओळखण्यास शिकणें' असे टिळकांनी सांगितले होते. राष्ट्राच्या 'स्व' ची आणि 'स्वत्वा' जाणीव करून देणे हे राष्ट्रीय शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दि. २१ मार्च १९०८ ला सुरू झालेल्या पुणे जिल्हा सभेच्या बैठकीत राष्ट्रीय शिक्षणासंबंधीचा जो ठराव टिळकांनी मांडला होता तो असा होता, "(अ) राष्ट्राच्या गरजा व इष्ट साध्य लक्षांत आणून 'या अन्वयें हल्लींच्या शिक्षणपद्धतींतील दोष नाहींसे करून शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां चालू शिक्षणसंस्था सुधारणें व स्वावलंबनाच्या तत्त्वावर निव्वळ लोकांच्या ताब्यांतील शिक्षणसंस्था काढणें अवश्य आहे, असें या सभेचें मत आहे." हा ठराव मांडताना टिळक म्हणाले होते, "राजकीय नाही राष्ट्रीय – ज्यानें राष्ट्राकरितां मी वेळ आल्यास मरेनदेखील अशी बुद्धि उत्पन्न होईल असें राष्ट्रीय शिक्षण दिलें गेलें पाहिजे. लहान मुलांचीं अंतःकरणें देशप्रीतीनें भारून टाकणें, आमच्यावरील अभ्र काढून टाकणें हा प्रस्तुतच्या शिक्षणाचा उद्देश

नाहीं. तो राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे. लगाम लोकांच्या हातात व आपण घोड्यावर ही स्थिति नको. लगाम आपल्याच हातांत असला पाहिजे. सरकारच्या मुठींत आपलें शिक्षण नको. इंग्रजी राज्यांत स्वतंत्रपणाच्या कल्पना ते येऊं देणार नाहींत. हरएक बाबतींत आपला गळा दुसऱ्यांच्या ताब्यांत नको. या गोष्टीचा आता आम्हांला वीट आला आहे. आम्हांला स्वतंत्र राष्ट्रांत आहेत असल्या शाळा स्थापावयाच्या आहेत." (धुळे येथील भाषण, २८ एप्रिल १९०८, स. टि. खंड ६, पान ९१४–९१५.)

सामाजिक-राजकीय जाणीव

राष्ट्रीय शिक्षणाचे दुसरे उद्दिष्ट विद्यार्थ्यांत राजकीय व सामाजिक जाणीव वाढविणे, विस्तृत करणे व इतिहासाचा त्याच्या अनुषंगाने अभ्यास करणे हे असले पाहिजे, असे टिळकांनी अनेकदा स्पष्टपणे सांगितले होते. राष्ट्रीय चळवळीत निर्माण झालेल्या नव्या सिद्धांतांचे बाळकडू विद्यार्थ्यांना पाजले पाहिजे, ही टिळकांची भूमिका होती. ती स्पष्ट करताना टिळक म्हणत, "आज इतकी वर्षें उहापोह करून राष्ट्रीय सभेनें, पन्नास वर्षें मेहनत करून दादाभाईनीं, आणि दहापंधरा वर्षें श्रम करून दत्तांनी (रमेशचंद्र दत्त) जे सिद्धांत स्थापित केले आहेत ते सिद्धांत लहानपणींच, आमच्या मुलांना आम्हीं शिकवावें कीं नाहीं? मला असें वाटतें की, देशाच्या राजकीय व सामाजिक वगैरे परिस्थितीचें व ती स्थिती सुधारण्यासाठीं ठरलेल्या सिद्धान्तप्राय उपायांचें ज्ञान मुलांना लहानपणापासूनच करून देणें अत्यंत आवश्यक झालें आहे, राजकीय सिद्धांताचें व सामाजिक प्रमेयांचें विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणें हेंच राष्ट्रीय शिक्षणाचें बीज होय. प्रजेचे हक्क काय असतात, त्यापैकीं आपणास किती आहेत हें जसें मुलांना समजलें पाहिजे, तद्वतच जातिभेद, जातिद्वेष, जातिमत्सर यांच्या योगानें आमचा देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेंहि ज्ञान राष्ट्रीय शाळेंतील मुलांना मिळालें पाहिजे. जातिभेद मोडण्याची आवश्यकता किती आहे हें आमच्या विद्यार्थ्यांस समजलें पाहिजे. जाति–जातींचे तंटे न होऊं देण्याची खबरदारी घेणें हें आपलें सर्वांचें आद्य कर्तव्य आहे. ही गोष्ट राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यांत आली पाहिजे. प्रस्तुत परिस्थिति लक्षांत घेऊन राष्ट्रीय विद्यालयांत सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षणाचीहि सोय झाली पाहिजे." (बेळगाव येथील भाषण, १९०७, स. टि. खंड ६, पान ८९२.) राष्ट्रीय शिक्षणातून निर्माण करावयाच्या हक्कांच्या जाणीवेसंबंधी टिळकांनी स्पष्टपणे मतप्रदर्शन केले होते. त्यांनी लिहिले होते, "(१८५८ चा) राणीचा जाहीरनामा हा आमच्या हक्कांचा पाया आहे, हें मुलांस समजलें पाहिजे. मुलांस असल्या गोष्टी कळूं नयेत, तीं अडाणी राहावींत म्हणून सरकारचे प्रयत्न चालू आहेत. दर साल मोबदल्याशिवाय

तीस कोटि रुपये परदेशांत जातात. ह्यामुळें आम्ही दरिद्री झालों आहोंत. ह्या गोष्टी लहानपणीं समजल्या म्हणजे त्या जशा मनांत ठसतात तशा मोठेपणीं ठसत नाहींत. म्हणून हें शिक्षण शाळांमधून द्यावयास पाहिजे." सारांश, देशस्थितीची सर्वांगीण जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांना राष्ट्रसेवेसाठी प्रवृत्त करावे, हा महत्त्वाचा हेतू राष्ट्रीय शिक्षणामागे आहे, हेच टिळकांचे सांगणे असे.

पाश्चात्त्य विज्ञानाची गरज

राष्ट्रीय शिक्षणात केवळ भावनेवर भर आहे, त्याला विज्ञानाची, प्रगतिशील विचाराची, विद्वत्तेची बैठक नाही, असा त्याकाळी आक्षेप घेतला जाई. या आक्षेपातील फोलपणा व खोडसाळपणा खोडून टाकण्यासाठी टिळकांनी वेळोवेळी स्पष्टीकरण केले होते. नोव्हेंबर १९०७ मध्ये बेळगाव येथे केलेल्या भाषणात ते म्हणाले होते, "राष्ट्रीय शाळांतून विद्यार्थ्यांस उडाणटप्पूपणा करण्यास उत्तेजन मिळतें व राष्ट्रीय पक्ष पाश्चात्त्य शास्त्रें शिकविण्यास तयार नाहींत, असे मिथ्या आरोप कोणी कोणी पक्षांधतेनें करतात, परंतु राष्ट्रीय पक्षाला शिक्षणाचा सर्व झरा राष्ट्राच्या ताब्यांत हवा आहे. तरुण पिढीनें विद्वान, बुद्धिमान्, निश्चयी व शरीरसामर्थ्यानें युक्त व्हावें इतकीच आमची इच्छा नाहीं, तर आमच्या तरुणांनीं पाश्चात्त्य शास्त्रांत पारंगत व्हावें अशीहि आमची प्रबळ इच्छा आहे. हीं पाश्चात्त्य शास्त्रें आमच्या विद्यार्थ्यांस शिकविण्याच्या कामीं ज्या दिवशीं हरकत होईल, त्या दिवशीं हिंदुस्थानचा भाग्योदय सरला आहे, असें मी समजेन." (स. टि. खंड ६, पान ८९३.)

विद्वत्तेची परंपरा आवश्यक

राष्ट्रीय शाळांचा दर्जा वरचा राहिला पाहिजे, असा टिळकांचा आग्रह असे. विद्वत्तेची राष्ट्रीय व प्राचीन परंपरा आपण जपली पाहिजे, असा त्यांच्या सांगण्याचा इत्यर्थ असे. राष्ट्रीय शिक्षणावर केलेल्या एका भाषणात ते म्हणाले होते, "राष्ट्रीय शाळांतून शिक्षणाचा दर्जा कमी करावयाचा आहे, असें मुळींच नाहीं. राष्ट्रांत विद्वान् लोक निपजतील तितके पाहिजे आहेत. राष्ट्रांत विद्वान् नसणें म्हणजे तें राष्ट्र बुडालें समजावें. इंग्लंडसारख्या देशांत मार्गदर्शक असे मुत्सद्दी विद्वान् आहेत आणि म्हणूनच त्यांचा उत्कर्ष झाला आहे. सरकारला बुडवितां येणार नाहीं अशी विद्वत्तेची परंपरा आपली आहे."

धर्मशिक्षणाची निकड

इंग्रजी शिक्षणपद्धतीत धर्मशिक्षण नाही, हा तिचा एक मोठा दोष आहे, असें टिळक म्हणत असत. त्यासंबंधी ते एकदा म्हणाले होते, "नुसतें व्यावहारिक शिक्षण मनुष्यास

मनुष्यपणा आणण्यास पुरें होत नाहीं. धर्मांत जीं मोठीं तत्त्वें असतात त्यांचें अध्ययन पापापासून मन परावृत्त होण्यासाठीं फार जरूर आहे. धर्म आपणांस ईश्वराचें स्वरूप शिकवतो. मनुष्य करणी करील तर परमेश्वर होऊं शकतो, असें आपल्या धर्मांत सांगितलें आहे. उद्योग केल्यानें मनुष्य जर परमेश्वर होऊं शकतो, तर गोऱ्या लोकांप्रमाणें आपणांस शहाणे व कर्तृत्ववान् होतां येणार नाहीं काय ? धर्मामुळें तंटे होतात असा कित्येकांचा आक्षेप असतो. पण मी विचारतों, धर्मांत तंटा करावा असें कुठें सांगितलें आहे ? पृथ्वीवरील सर्व धर्मांत अत्यंत सहिष्णु, ज्यानें त्यानें आपआपल्या धर्मानें वागावें व सर्वांशीं प्रेमानें वागावें असें सांगणारा जर कोणाचा धर्म असेल तर तो हिंदु धर्म होय. या नवीन राष्ट्रीय शाळांमधून हिंदूंस हिंदु धर्माचें, मुसलमानांस त्यांच्या धर्माचें, अशा रीतीनें धर्मशिक्षण देण्याचा विचार आहे. निरनिराळ्या धर्मांतील व पंथांतील विरोध कसा नाहींसा करावा, हेंहि शिक्षण येथें देण्यांत येईल." (३ मार्च १९०८, वाशीं, स. टि. खंड ६, पान ९०५.)

सोलापूर येथे भाषण करताना टिळकांनी हाच मुद्दा मांडलेला आढळतो. ते म्हणाले होते, " आम्ही ज्ञान संपादन करतों त्यांत धर्माची बिलकुल ओळख नसते. २० वर्षें शिक्षण मिळाल्यावर मग धर्माचा अभ्यास करावा लागतो. धर्माचा उपयोग होत नाहीं, त्यासंबंधीं ज्ञान मिळत नाहीं, धर्म तुच्छ वाटतो, अशा तऱ्हेच्या मनाच्या स्थितींत तयार झालेले शिक्षित लोक कर्तव्यपराङ्मुख होतात असें आढळून आलें आहे. पण सरकार परकी असेपर्यंत हा दोष सरकारास काढतां येणार नाहीं. याचा परिणाम मुसलमान, लिंगायत, जैन, ब्राह्मण यांना धर्मशिक्षणाकरितां स्वतःस निराळी तजवीज करावी लागली हा झाला. धर्मशिक्षण कसें मिळेल याचा निरनिराळ्या जमातींना विचार करावा लागला आहे. धर्मशिक्षणाचा अभाव ही पहिली उणीव आहे." (स. टि. खंड ६, पान ८९७.)

देशी भाषांतून शिक्षण

टिळकांनी एक महत्त्वाचा विचार, पण तुलनेने कमी वेळा मांडलेला आढळतो, तो म्हणजे देशी भाषांतून शिक्षण देण्याचा. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळांनी परदेशी भाषेच्या अभ्यासाचे ओझे विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून काढून टाकले पाहिजे, असे सांगून ते म्हणाले होते, " आज इतकीं वर्षें हिंदुस्थानांत राहून सुद्धा एकाहि साहेबास मराठी भाषेंत तास-दोन तास चांगलें भाषण करतां येत नाहीं; पण आमच्या ग्रॅज्युएटांस मात्र इंग्रजींत उत्तम बोलतां आलें पाहिजे अशी सक्ती आहे. इंग्रजी बोलतां अगर लिहितां येणें म्हणजे सुशिक्षित होणें अशी शिक्षणाची व्याख्या झाली आहे. पण नुसतें भाषाज्ञान हें खरें ज्ञान नव्हे. परकी भाषा इतक्या उत्तम रीतीनें शिकावी लागण्याचा जुलूम दुसरीकडे कोठेंहि नाहीं. आम्हाला परकी भाषेंतून ज्ञान

संपादन करावें लागत असल्यामुळें सात-आठ वर्षांत मिळण्यासारख्या ज्ञानासाठीं आम्हांस वीस-पंचवीस वर्षें खर्चावीं लागतात. इंग्रजी अजीबात न शिकून आमचें भागावयाचें नाहीं; पण ज्ञान मिळविण्यास साधन म्हणून त्या भाषेंत प्रावीण्य मिळविण्याचें आम्हांस बिलकुल कारण नाहीं...हा व्यर्थ कालापव्यय होऊं नये म्हणून या शाळेंत (राष्ट्रीय) शिक्षण स्वभाषेंतून–मराठींतून–देण्याचें आम्हीं योजिलें आहे." (वाशीं, ३ मार्च १९०८, स. टि. खंड ६, पान ९०४.)

टिळकांनी दि. ४ डिसेंबर १८९४ रोजी 'केसरी'त 'देशी भाषांची दैना' हा लेख लिहून देशी भाषांची दैना दूर करून त्यांना उर्जितावस्था आणावयाची असेल तर काय केले पाहिजे, याची चर्चा केली होती. त्यावेळी त्यांनी म्हटले होते, "देशी भाषांच्या प्रश्नाचा आमच्या सद्यःस्थितीशीं किती निकट संबंध आहे याचा जों जों अधिक विचार होईल तों तों त्या प्रश्नाचें वास्तविक महत्त्व दिसूं लागेल. केवळ दाईच्या स्तनपानावर जशी बालकांची नीट जोपासना होत नाहीं, त्याप्रमाणेंच परकी भाषेंतून दिलेल्या उष्ट्या व निःसत्त्व शिक्षणानें मुलांचीं मनें कधींहि सुसंस्कृत व्हावयाचीं नाहींत व तीं तशीं झाल्याशिवाय त्यांच्या हातून मोठेपणीं कोणतीहि कर्तबगारी घडावयाची नाहीं, अर्थात् देशी भाषांचा प्रश्न एकंदर भावी संततीच्या हिताला मूलभूत आहे." (स. टि. खंड ३, पान १३४.)

राष्ट्रीय शिक्षणाची दुसरी लाट

१९०८ साली व १९१७ साली राष्ट्रीय शिक्षणावर बोलताना टिळकांनी आत्मकथनपर विचार व्यक्त केलेले आढळतात. १८८० साली शिक्षण-क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर मागे वळून सिंहावलोकन केल्यासारखे हे विचार आहेत. १९०८ साली राष्ट्रीय शिक्षणाची दुसरी लाट आल्यासारखे त्यांना वाटत होते. कारण पहिली लाट विष्णुशास्त्री चिपळूणकर–आगरकर आदि सहकाऱ्यांबरोबर त्यांनीच आणली होती. विष्णुशास्त्रींच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त केलेल्या भाषणात टिळक म्हणाले होते, "शिक्षणाच्या प्रश्नाच्या दृष्टीनें पहातां, शास्त्रीबुवांनीं स्थापलेल्या शाळेच्या वार्षिक रिपोर्टांत 'Education of the people to be useful, must be in the hands of the people themselves.' (लोकांस द्यावयाचें शिक्षण उपयुक्त करावयाचें असेल तर त्या शिक्षणाचा तावा लोकांकडेच असला पाहिजे.) अशा प्रकारचें वाक्य आहे. या वाक्यासंबंधानें त्या वेळीं वाद झाला होता व मीं तेव्हां हजर होतों. शास्त्रीबुवांच्या हयातींत एकदां अशी वेळ होती कीं, डेक्कन कॉलेजसारखी संस्था-दुय्यम प्रतीचें शिक्षण आमच्यावर सोंपविण्यास सरकार तयार होतें, तेव्हां प्राथमिक शिक्षणाकडे पैसा खर्च करण्याचा त्यांचा विचार होता, पण तेव्हांचा काळ आतां बदलला आहे. पुढें सत्ताधाऱ्यांची छाप बिनसत्ताधाऱ्यांवर पडली. राष्ट्रांतील सुशिक्षित लोकांनीं शिक्षणाचें

काम आपल्या हातांत घेऊन आपल्याला वाटेल तसें शिक्षण द्यावें हा तेव्हांचा हेतु होता. या हेतूशीं आतां पुढें काय झालें हें मीं सांगत बसत नाहीं. तें आतां आपल्या सर्वांनाच दिसतें आहे...आम्हांला करारी देशभक्त निर्माण करावयाचे आहेत. अधिकाऱ्यांना हें नको आहे...शास्त्रीबुवांच्या वेळच्या व आत्ताच्या परिस्थितींत फरक पडलेला आहे. तेव्हां सध्यां काय परिस्थिति आहे हें लक्षांत घेऊन राष्ट्रीय शिक्षणाची आलेली दुसरी लाट आपण फुकट जाऊं देणार नाहीं, अशी आशा आहे." (पुणें, ३० मार्च १९०८, स. टि. खंड ६, पान ९१२–९१३.)

टिळकांचे शिक्षण-प्रसाराचे स्वप्न

१९१७ साली बेळगाव येथे मराठा शिक्षण परिषदेत शैक्षणिक विषयावर बोलताना टिळकांनी सांगितले होते, "माझी कॉलेजांतील परीक्षा पास झाल्यावर मी प्रथम शिक्षणाची बाब हातीं घेतली...देशांतील प्रत्येक पुरुष, स्त्री, मुलगा व मुलगी यांना शिक्षण मिळाल्याशिवाय कोणताहि देश ऊर्जितावस्थेला येऊं शकत नाही हें आतां सिद्ध झालें आहे. लोकांची कितीहि उत्कट इच्छा असली तरी ती पुरी होण्याला सरकारच्या साहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. देशांतील शिक्षण सक्तीचें व मोफत करणें हें सरकारचें कर्तव्य आहे. ज्यामागें लोक ज्ञानसंपन्न होतील व लोकांतील देशभक्ति वाढेल, असेंच शिक्षण सरकारनें दिलें पाहिजे. जपाननें याच तत्त्वांचा अंगीकार करून आपली उन्नति करून घेतली व तें राष्ट्र आज या सुधारणांमुळें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या बरोबरीला जाऊन बसलें आहे. आम्हांस शिक्षण मोफत पाहिजे याचें कारण आमची दैन्यावस्था नव्हे. आम्ही श्रीमंत झालों तरी शिक्षण हें मोफतच दिलें पाहिजे. आम्ही न्यू स्कूल काढलें त्या वेळीं या कामीं मदत करण्यास सरकार तयार होतें. पण मागाहून 'लोकांना शिक्षण दिलें तर ते राजकीय हक्क मागतील' अशी सरकारची समजूत झाली. 'हक्क मागतील' असे मोघम कशाला? लोकांनी हक्क मागावे म्हणूनच आम्ही सरकारजवळ शिक्षण मागतों! ही गोष्ट उघड उघड आहे. आम्ही 'अ, आ, इ, ई' करितां कांहीं शिक्षण मागत नाहीं. उगाच लपवालपवी करण्यांत काय हशील आहे? मला एकदां मोठ्या साहेबानें विचारलें होतें कीं, 'तुम्ही स्वराज्य मिळवल्यावर पहिली गोष्ट कोणती कराल?' मीं उत्तर दिलें कीं, 'पहिल्यानें मीं शिक्षण सक्तीचें व मोफत करीन'...सरकारवर लोकमतांचा दाब बसेल तेव्हांच हा प्रश्न सुटणार आहे. म्हणून सरकारवर लोकमताचा पगडा कसा बसेल तें प्रथम पाहिलें पाहिजे...शिक्षणाची सक्ती पाहिजे असेल तर सरकारवर सक्ती करण्याची ताकद आली पाहिजे...आपले हक्क काय आहेत, याची जाणीव ज्या शिक्षणानें प्राप्त होईल तेच खरें शिक्षण होय! नुसत्या पाटीवर रेघोट्या ओढतां येणें हें खरें शिक्षणच नव्हे!" (स. टि. खंड ६, पान ९२०–९२२.)

जपानचा आदर्श

त्याकाळी जपानने राष्ट्र म्हणून थोड्याच काळात प्रगती केली तिचा टिळकांच्या सर्वच लेखनात वारंवार उल्लेख येत असे. त्या प्रगतीचे बीज जपानच्या शिक्षणविषयक धोरणात आहे, अशी त्यांची खात्री होती व म्हणून 'केसरी'त जपानच्या शिक्षणावर दोन अग्रलेख आले होते. ते टिळकांनी लिहिलेले वाटत नाहीत, पण त्यातील विचार-साद्दश्य त्यांच्या शैक्षणिक विचाराशी जुळणारे आहे. त्यांत दिलेली माहिती या विचारांची पुष्टी करणारी आहे. त्यावरून त्या काळच्या राष्ट्रवादी पिढीपुढे जपानचा आदर्श कसा होता, हे समजून येते.

"चाळीस वर्षांपूर्वी जपान व हिंदुस्थान या दोन्ही देशांच्या स्थितींत पुष्कळ साम्य होतें. दोन्ही एशिया खंडांतील देश, आचारविचार, रीतिभाति बऱ्याच सारख्या, पाश्चात्त्य शास्त्रें व कला यांचें अज्ञानामुळें युरोपियन राष्ट्रांशी टक्कर देण्यास असमर्थ, देशांतल्या देशांत तंटे बंडाळ्या यांचा सुकाळ असल्यामुळें व्यवस्थित राजसत्तेच्या सुखास मुकलेले व काकदृष्टी खिस्ती राष्ट्रांच्या भक्ष्यस्थानीं पडलेले किंवा पडू पाहाणारे, अशी हिंदुस्थान व जपान या दोन्ही राष्ट्रांची सन १८५८ सालीं स्थिति होती. परंतु तीच गेल्या चाळीस वर्षांत किती बदलली आहे हें सर्वविश्रुत आहे. एक राष्ट्र आज पूर्ण स्वतंत्र होऊन पहिल्या प्रतीच्या युरोपियन राष्ट्रांच्या बरोबरीनें वागू लागलें आहे, व दुसऱ्या देशांतील लोक दरवर्षी नवीन नवीन संकटाखालीं चेंगरून जाऊन हताश होत्साते आजचा दिवस कसा जाईल एवढ्याच विवंचनेंत आहेत. एका देशांतील लोक जगभर आपला व्यापाररोजगार पसरून आपल्या देशाची माहिती व भरभराट वाढविण्याच्या खटपटींत आहेत, व दुसऱ्या देशांतील माणसें एकमेकांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढून तंटे माजविण्यांत, विधवांची लग्नें लावण्यांत, चेनबाजी करण्यांत किंवा पाश्चात्त्य दिखाऊ चालीरीतींचें अनुकरण करून देशांतून बाहेर जाणाऱ्या संपत्तीचा ओघ वाढविण्यांत गुंग झालेले आहेत. हें जें महदंतर दिसून येतें त्यास दुसरीं कारणें असतील, तथापि दोन्ही देशांतील शिक्षणक्रमांतील अंतर हे मुख्य कारण असलें पाहिजे. सबब जपानांतील शिक्षणपद्धति कशी आहे हें समजल्यास आपल्या येथील शिक्षणक्रमांत काय दोष आहेत व ते दूर करण्यास काय केलें पाहिजे हें चांगलें समजेल. दुसरें, येथें उपलब्ध नसलेल्या विद्या व कला परदेशांत जाऊन शिकून येण्यांला आमच्यामध्यें बरीच मंडळी तयार झाली आहे व त्यांपैकीं पुष्कळांना युरोपांत दोन तीन वर्षें राहाण्याला पुरेसें द्रव्यानुकुल्य नसल्यामुळें जपानसारख्या गरीब देशांत जाणें अधिक सुलभ होण्याचा संभव आहे. अशा लोकांना जपानांत कोणत्या प्रकारचे व किती शिक्षण मिळतें व त्यास काय अडचणी आहेत हें समजल्यास पुष्कळ उपयोग होईल, असें वाटल्यावरून ही त्रोटक माहिती दिली आहे. यापेक्षां जास्त खुलासा पाहिजे असेल त्यानें मुंबई येथील जपानचे कॉन्सल किंवा इतर माहितगार गृहस्थांकडून माहिती

करून घ्यावी."

"सन १८७२ सालीं जपानचे बादशहाचे हुकुमानें एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत पुढील वाक्य होतें. 'सरकारचा असा हेतु आहे कीं, देशामध्यें यापुढें शिक्षणाचा इतका प्रसार झाला पाहिजे कीं तेणेंकरून ज्यामध्यें एकही निरक्षरी कुटुंब राहिलें आहे असा एकहि गांव किंवा ज्यामध्यें एकतरी माणूस अक्षरशत्रू आहे असें एकहि कुटुंब देशांत राहतां कामा नये.' हा जाहीरनामा आधुनिक जपानी शिक्षणपद्धतीचा पाया होय, म्हटलें तरी चालेल, व एकंदर शिक्षणखात्याची व्यवस्था वरील तत्त्वाला अनुसरूनच हल्लीं चालू आहे. प्रत्येक मुलास व मुलीस शिक्षण दिलेंच पाहिजे असा कायद्यानें निर्बंध केला आहे व तें शिक्षण निव्वळ व्यावहारिक असतें."

"आमचे येथील होतकरू मुलांनीं जपानांतील व्यापारी शाळेंत राहून येथें दुर्लक्ष असलेली विद्या स्वदेशी घेऊन येणें फायद्याचें आहे. शुक्राचार्यांपासून विद्या संपादन करण्याकरितां कचानें किती हाल सोसिले, हें मनांत आणिलें असतां हल्लीं परदेशांतून नूतन विद्या व कला शिकून येणें अगदीच सोपें आहे व आमची तरुण मंडळी अगदींच निर्बुद्ध व निःसत्व झाली नसेल, तर त्यांना तें अशक्य असेल असेंहि नाहीं. असो. या स्थळीं यापेक्षां जास्त माहिती देता येत नाहीं. ज्यांस जिज्ञासा असेल, त्यानें जास्ती चौकशी करून व एक वेळ डोळ्यांनीं सर्व गोष्टी पाहून खात्री करून घेतली पाहिजे. औद्योगिक उन्नतीकरितां केवळ कागदी सभा स्थापणें किंवा कोरडी लेक्चरें देणें उपयोगी नाहीं. आरंभीं सांगितल्याप्रमाणें सविस्तर व विश्वसनीय माहिती मिळवून पद्धतवार प्रयत्न झाला तरच आमचा कांहीं तरणोपाय आहे. नाहीं तर आजपर्यंत सामाजिक बाबतींत परस्परसुधारणा करण्याची खटपट झाली तीच अवस्था औद्योगिक चळवळीची होईल. हिंदुस्थानांतील प्रजेचें दारिद्र्य इतक्या झपाट्यानें वाढत आहे कीं, आमच्या पुढाऱ्यांनीं धान्योत्पादनाचे नवीन मार्ग लवकरच शोधून न काढल्यास कांहीं वर्षांनीं लोकांची काय स्थिती होईल याची कल्पनाहि करवत नाहीं. लोकांचें दारिद्र्य दूर करा म्हणून आजपर्यंत कॉंग्रेससारख्या सभांतून व अर्जद्वारें सरकारपुढें तोंड वेंगाडलें, पण त्याचा कांहीं उपयोग होतोसा दिसत नाहीं. आपली आपणच तरतूद केली पाहिजे. स्वावलंबन हा मंत्र पाठ केल्याखेरीज आमची कोणत्याहि प्रकारें उन्नति होणारी नाहीं. एवढी इशारत आमच्यांतील लोकाग्रणींना आज पुरे आहे." (केसरी अग्रलेख, दि. २ व ९ जानेवारी १९००.)

अरविंद घोष आणि राष्ट्रीय शिक्षण

टिळकांनी आपल्या भाषणांत व लेखांत त्यावेळी बंगालमध्ये सुरू झालेल्या राष्ट्रीय शिक्षणाचे उल्लेख केलेले आढळतात. बंगालमधील त्यावेळच्या राष्ट्रीय पक्षातील अग्रणी

श्री. अरविंद घोष यांच्या विचारप्रवर्तनात राष्ट्रीय शिक्षणाचे समग्र तत्त्वज्ञान व कार्यक्रम, त्याची दिशा यांचे विवेचन येत असे. टिळकांच्या विचारास पोषक असे ते विचार असत. अरविंदांनी त्याकाळी पुणे–मुंबई येथे या विचारावर भाषणे केली होती. पैकी मुंबईत झालेल्या सभेत अरविंदांनी जे विचार मांडले होते त्याचे त्यावेळच्या 'केसरी'च्या मुंबईतील 'अनंत' या वार्ताहराने दिलेले वृत्त पाहाणे या संदर्भात उपयुक्त ठरेल. अरविंद घोष गिरगावात १५ जानेवारी १९०८ रोजी झालेल्या भाषणात म्हणाले, "राष्ट्रीय शिक्षण राष्ट्रीय पद्धतीनें राष्ट्रीय देखरेखीखालींच द्यावयाचें असा कलकत्ता येथें पास झालेला ठराव आहे, व त्यांतील एकहि शब्द गाळतां येत नाही. (National Education must be on National Lines and under National Control) ह्या संबंधानें असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं, आम्हीं 'राष्ट्रीय' हे नांव शिक्षणास कां देतो ? ह्या मंडळींचें म्हणणें असें कीं, आधी आमचें राष्ट्रच नाहीं. आम्हांस राष्ट्र ही कल्पनेतील गोष्ट आहे. प्रत्यक्ष नव्हें. हिंदुस्थान देशांत हजारों जाति आहेत, शेकडों पंथ आहेत, नाना तऱ्हेचीं मतमतांतरें आहेत. तेव्हां राष्ट्रीय ह्या शब्दाचा उपयोग हिंदुस्थानसंबंधानें करणें म्हणजे त्यांत कांहींच अर्थ नाहीं. ह्या विचारांच्या लोकांस आधीं राष्ट्र म्हणजे काय हेंच समजत नाहीं. ह्यांचें म्हणणें काय कीं, निरनिराळ्या जाति व धर्मपंथ नाहींसें कराल तेव्हांच राष्ट्र बनेल. देशांतील सर्व लोक एका जातीचे, एका धर्माचे होतील तेव्हांच राष्ट्र बनेल. हें म्हणणें खोटें आहे. धर्म, जाति ही राष्ट्रीयत्वाला लागणारी कायमची अंगें नव्हत. भूगोलावरून पाहिलें तर हिंदुस्थान हा एक मोठा देश आहे असें दिसून येईल. परंतु त्याला 'राष्ट्र' ही संज्ञा देता येत नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु आमचें असे म्हणणें आहे कीं, भूगोलावरून पाहिलें तरी हिंदुस्थान हा देश मूळचाच दुसऱ्यापासून अलग आहे, ही गोष्ट त्याच्या राष्ट्रीयत्वाचें एक अंग आहे. हिंदुस्थानसारखाच मूळचा अलग देश इटली तीस वर्षांत स्वतंत्र राष्ट्र बनला. हिंदुस्थानची आंतर्बाह्य रचना, राहणी, धर्म वगैरे इतर जगापासून सर्वच भिन्न आहेत व तीं फार प्राचीन कालापासून आहेत..."

मातृभूमीची महती

"अर्थात राष्ट्र ही जिवंत, सचेतन अशी वस्तु आहे, तुम्ही बनवून झालेली राष्ट्र ही कांही वस्तु नव्हे. तिची वाढ ही झालीच पाहिजे व ती उन्नतावस्थेप्रत पोचलीहि पाहिजे. मग ती हजार वर्षांत पोचों वा बीस वर्षांत पोचों. माणसाचे जसे सूक्ष्म, स्थूल व कारण असे तीन देह आहेत, तसेच ते राष्ट्राचेही आहेत. आमच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें चर्मचक्षूंनीं दिसणाऱ्या नुसत्या स्थूल देहाचें वर्णन केल्यानें माणूस समग्र जाणला जात नाहीं. व त्याच्या तिन्ही देहांचा विचार करावा लागतो व तेव्हांच माणसासंबंधाचें ज्ञान होतें. जशी माणसाची तशीच राष्ट्राची गोष्ट आहे. आपल्या राष्ट्राचा विचार करावयाचा

म्हणजे प्रथम आपल्या मातृभूमीचा विचार करावयाचा. हिमालयापासून कन्याकुमारी-पर्यंत ज्याचा विस्तार, पूर्वपश्चिम समुद्रांनी ठरविलेली ज्याची सीमा, ज्यांत नर्मदा, गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी वगैरे नद्या वाहात आहेत, प्राचीन शहरें आहेत, उंच उंच घुमटांची देवालयें आहेत, रमणीय वाडे आहेत, असा पृथ्वीचा भाग ज्याला आज हिंदुस्थान म्हणतात तो, आमचें राष्ट्र म्हटल्याबरोबर आम्हांपुढें उभा राहतो व हेंच आमच्या राष्ट्राचें स्थूल शरीर होय. बाबू बंकिमचंद्र यांनीं रचलेलें 'वंदे मातरम्' हें आमच्या राष्ट्राच्या स्थूल शरीराचें वर्णन होय. हिंदुस्थानांत वास करीत असलेल्या तेहतीस कोटि लोकांचीं सुख-दुःखें, त्यांच्या व्यावहारिक वासना, वगैरेंचा समावेश राष्ट्राच्या सूक्ष्म शरीरांत होतो. वर नमूद केलेल्या शरीरांत कालमानानें नानातऱ्हेचे फेरबदल झाले तरी बीजरूपानें अविनाशी असा कायमचा अणु असतो व तो सर्वांचें आदिकरण असल्यानें त्यांतूनच भावी गोष्टी घडून येतात."

राष्ट्रीय शिक्षणाची जुनी परंपरा

"राष्ट्रीय शिक्षण म्हणजे ही एखादी नवीन गोष्ट आम्ही सुरु करतो असें नाहीं. त्याची सुरुवात आमच्या पूर्वजांनींच करून ठेवली आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या योगानें शिवाजीमहाराजांची थोरवी कायम राहील. अशोकाचा मोठेपणा व अकबराची कीर्ति दिगंतरीं दुमदुमत राहील. प्राचीन ऋषींचें वैभव सर्व जगाच्या निदर्शनास येईल. जी जी म्हणून उपयोगाची व महत्त्वाची गोष्ट आहे तिचा अव्हेर राष्ट्रीय शिक्षणांत आम्ही करीत नाहीं. अशा रीतीनें राष्ट्रीय शिक्षण सरकारी शाळांतून मिळत नाहीं. सरकारी शाळांतून पुष्कळ युरोपियन विचारांचें ओझें आमच्या विद्यार्थ्यांवर लादलें जातें. युरोपियन आचारविचार व एकंदर युरोपियन राहणी आमच्या आचारविचारांहून अगदीं भिन्न आहेत. आता इतकें खरें कीं, प्राचीन व अर्वाचीन सुधारणेचा विचार करीत असतां हल्लींच्या युरोपियन सुधारणेचा विचार आपणांस अजिबात बाजूला ठेवता यावयाचा नाहीं. आमची सुधारणा आम्ही करीत असतां पाश्चिमात्य सुधारणें-तील ग्राह्य तेवढ्या गोष्टी आपणांस घेतल्याच पाहिजेत. परंतु त्यामुळें आपल्या मुळांना धक्का बसणार नाहीं एवढी खबरदारी आपण घेतली पाहिजे. जपानप्रमाणें पाश्चिमात्य सायन्सचा आपण उपयोग करून घेणें जरूर आहे, परंतु तें काम करीत असतां आपल्या पूर्वजांच्या कृतीकडे अजिबात डोळेझांक करणें बरोबर होणार नाहीं..."

अनुभव घेऊन पहा

"राष्ट्रीय पद्धतीनें राष्ट्रीय शिक्षण देतांना आमचें लक्ष भावी हिंदी राष्ट्र बनत आहे ह्याकडे विशेष असतें. राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करीत असतांना निरनिराळ्या शिक्षण-

पद्धतींचा सर्व बाजूंनीं विचार करावा लागतो. प्रो. परांजपे म्हणतात त्याप्रमाणें नुसत्या गणिताची गोष्ट घेऊन चालणार नाहीं. हें हिंदी राष्ट्र इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें मोठें केव्हां होईल हा विचार राष्ट्रीय शिक्षण देण्यांत असतो. आमचीं मोठीं माणसें इतर राष्ट्रांतील मोठ्या लोकांच्या तोडीचीं कशीं होतील, हा विचार आमचा सतत असतो. आमच्या शाळांतून पाचव्या यत्तेपर्यंत मुलांना देशी भाषेंतून शिकवितों. इंग्रजीच्याद्वारें मुलांस शिकविणें हे घातुक आहे. निरनिराळे सर्व विषय शिकवण्याइतकें देशी भाषेंत पुरेसे शब्द नाहीत, असा आक्षेप घेण्यांत येतो. त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, अनुभव घेऊन पहा." (केसरी, दि. २१ जानेवारी १९०८.)

राष्ट्रजागृती, राष्ट्रनिर्मिती

टिळकांच्या सर्व जीवनकार्याची उद्दिष्टे राष्ट्रजागृती, राष्ट्रनिर्मिती व हक्क संपादनासाठी लोकांना संघटित करणे ही होती. स्वातंत्र्य व स्वराज्याचा हक्क हे अंतिम उद्दिष्ट होते. त्यामुळे राष्ट्रीय जाणीव करून देणारे साधन म्हणून शिक्षणाचा त्यांनी विचार केलेला आढळतो. लोकांना आपल्या हक्काची, राष्ट्रीय समस्यांची, राजकीय सिद्धांतांची जाणीव लहानपणी करून देऊन राष्ट्राच्या आर्थिक अभ्युदयासाठी त्यांना प्रवृत्त करणे, उद्यमशील बनवणे हे त्यांच्या शिक्षणविषयक विचारांचे शेवटचे टोक आहे. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना ही गंगोत्रीसारखी आहे पण स्वराज्याच्या सामूहिक प्रयत्नांनी हक्क संपादनाच्या चळवळीतून करावयाचा लढा हा त्या गंगोत्रीचा विशाल प्रवाह आहे. टिळकांचे वर ग्रथित केलेले सर्व विचार वाचताना दिसते ते त्यांचे देशभक्तीने ओतप्रोत भरलेले अंतःकरण व राष्ट्रमुक्तीच्या स्वप्नाने झपाटलेले मन. टिळकांना 'अंगावरी दाट लोकर भारी' हे शिकविणारी क्रमिक पुस्तके, शिक्षक किंवा शाळा नको होत्या. सरकारला चाकर पुरविणाऱ्या युनिव्हर्सिटया त्यांना नको होत्या, तर राष्ट्राला काय पाहिजे, राष्ट्राची इभ्रत, संपत्ती कशी वाढेल, राष्ट्राची छाप इतरांवर कशी बसेल, हे शिकवील ते शिक्षण टिळकांना हवे होते. जपान-जर्मनीची उदाहरणे ते सतत देत ते याचसाठी. उलट इंग्लंडच्या बोटीमागचे हिंदुस्थान होडगे व्हावे अशी इंग्रज सरकारची इच्छा होती व तसा प्रयत्न होता. टिळकांना हिंदुस्थान इंग्लंडबरोबरीची आगबोट व्हावी, असे वाटत असे म्हणून 'लोकाश्रयावर राष्ट्रीय शिक्षण चालविले पाहिजे' इथपासून 'सक्तीच्या शिक्षणासाठी लोकमताचा सरकारवर दबाव आणला पाहिजे,' इथपर्यंत ते पोहोचले होते. जसजशी राष्ट्रीय चळवळ समर्थ व देशव्यापी बनत होती तसतसे टिळकांचे शिक्षणविषयक विचार बदलत होते, हाच वर दिलेल्या विचारांचा निष्कर्ष आहे. राष्ट्रीय चळवळीचे ज्ञानाच्या क्षेत्रातील, शिक्षणाच्या क्षेत्रातील कृतिप्रेरक मार्गदर्शक विचार, हेच या विचारांचे स्वरूप आहे.

४

आर्थिक राष्ट्रवादाची पायाभरणी

'केसरी'चे संपादक म्हणून १८८८ मध्ये टिळक प्रत्यक्ष नियमित लेखन करू लागले तेव्हा त्यांचे लक्ष भारताच्या राजकारणावरोबरच आर्थिक प्रश्नांकडे गेले. 'केसरी'च्या प्रारंभीच्या लेखनात इंग्रजी राज्याची समीक्षा असे. त्या समीक्षेत स्वाभाविकपणे इंग्रजी राज्यव्यवस्था व त्याच्याशी निगडीत प्रश्न येत असत. या विचारसरणीत हिंदुस्थानची इंग्रजी राज्यात होत असलेली पिळवणूक, हिंदुस्थानचे दारिद्र्य या दोन गोष्टींची सतत चर्चा असे. ती चर्चा करण्यामागे टिळकांचे दोन हेतू असावेत. एक तर इंग्रजी राजवटीचे मायावी स्वरूप लोकांना समजून सांगावे व दुसरा म्हणजे आपले आर्थिक हितसंबंध सांभाळण्यासाठी जनतेचे मार्गदर्शन करावे. आणि तिसरा हेतू—जो टिळकांच्या सर्व चळवळीत प्रमुख असे तो म्हणजे अर्थातच असंतोष चेतविण्याचा. टिळकांनी एका अग्रलेखात म्हटले होते, "दारिद्र्य व ज्ञान एकत्र आलीं म्हणजे त्यांची लगेच चकमक उडून ठिणगी पडते." (१३ डिसेंबर १८९२.) नेमकी ही ठिणगी टाकण्याचीच टिळकांची सारी भूमिका होती.

याच हेतूने भारताच्या आर्थिक पिळवणुकीचे ज्ञान व त्यांतून सुटण्याचा मार्ग यासंबंधी 'केसरी'तून त्यांनी विपुल लेखन केले. 'शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय?' असे त्यांच्या एका अग्रलेखाचे शीर्षक आहे. त्या लेखात त्यांनी सरकारला इशारा दिलेला स्पष्ट होता. "शेतकऱ्यांची हल्लींची दरिद्रावस्था अशीच कायम राहिली तर, पुढेंहि ह्याच प्रकारें दंगेधोपे खास उत्पन्न होतील. दुष्काळांत लाखों लोक आज मुकाट्यानें उपासमार होऊन प्राणास मुकतात; पण इंग्रजी राज्यपद्धतीचें लोकांना जसजसें ज्ञान उत्पन्न होत जाईल तसतशी दारिद्र्याचीं कारणें काढून टाकण्या-

कडे त्यांच्या मनाची जास्त प्रवृत्ति होत जाईल. सर्व देशांतील प्रजाच अन्नास महाग होऊन दंगा करण्यास प्रवृत्त झाली म्हणजे मात्र वेळ कठीण येणार आहे. ती आल्यावर मग कांहीं इलाज चालणार नाहीं; करितां आतांच सावध व्हावें हें बरें." (स. टि. खंड ३, पान २९९.) टिळकांच्या या लेखात दिलेली ही धोक्याची सूचना त्यांचे मनोगतच व्यक्त करीत होती.

भारतात १८७२ पासून पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची विपदावस्था लोकांना कळली व दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त, माधव गोविंद रानडे आदि राजकीय जाणीव असलेल्या बुद्धिमंतांनी ब्रिटिश राज्याचे स्वरूप लोकांपुढे मांडावयास सुरुवात केली. एक प्रकारे भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाचा तो प्रारंभ होता. दादाभाई नौरोजी यांनी भारताचे द्रव्यशोषण कसे होत आहे, हे सांगणारे पुस्तक लिहिले व इंग्लंडमधील जनतेला तेथे राहून भारताच्या दारिद्र्याची व त्याच्या पिळवणुकीची सतत माहिती दिली. ब्रिटिश सरकारने आर्थिक परिस्थितीची चौकशी करण्यासाठी जे रॉयल कमिशन नेमले होते त्याच्यापुढे दादाभाईंची साक्ष झाली. टिळकांनी 'केसरी 'तून त्या साक्षीची जनतेला माहिती दिली. टिळकांनी लिहिले होते, "मि. दादाभाई नौरोजी यांनी आपल्या साक्षीत आकड्यांनीं, युक्तीनें आणि अन्य प्रमाणांनीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, इंग्रजी राज्यपद्धत म्हणजे आम्हांस निःसत्व करून सोडणारा एकच चरक आहे. उदाहरणार्थ, इंग्रजी व्यापारच घ्या. हा सर्व व्यापार इंग्लिश व्यापाऱ्यांच्या हातांत आहे व त्याचा फायदाहि तेच घेतात; पण याहिपेक्षां पेन्शनें व पगार म्हणून युरोपियन लोकांस ओझेंच्या ओझीं जे रुपये द्यावे लागतात त्यानें आमचें दुहेरी नुकसान होत आहे. जें काम एखाद्या चांगल्या नेटिव्हाकडून घेतल्यानें पहिल्यानें जे पगाराचे पैसे आमच्या देशांत राहिले असते ते युरोपियनांच्या घरांत जात आणि फिरून ते भांडवलाच्या रूपानें हिंदुस्थानांत येऊन व्यापारात किंवा रेल्वे गुंतत असल्यामुळें त्यांचें व्याजहि सालोसाल आम्हांस भरावें लागतें. मारवाडी एखाद्यास कर्ज देऊं लागला म्हणजे पन्नास रुपये देऊन शंभराचा रोखा लिहून घेतो आणि पुनः एक वर्षाचें व्याज आधींच कापून घेतो अशी आख्यायिका आहे; पण इंग्रज लोकांची जी प्रत्यक्ष राज्यपद्धत आमच्या डोळ्यांपुढें आहे ती याहूनहि भयंकर आहे. दरवर्षी हिंदुस्थानांतून वीस पंचवीस कोटि रुपये आम्हांस त्यांचा कांहीं मोबदला न मिळतां विलायतेस जातात. आणि तेच रुपये भांडवलाच्या रूपानें पुन्हा हिंदुस्थानांत परत येऊन पहिल्या वर्षी पंचवीस कोटि तर दुसऱ्या वर्षी नवे पंचवीस कोटि आणि पहिल्या वर्षी दिलेल्या पंचवीस कोटि रुपयांपैकी जी रक्कम देशांत भांडवल म्हणून परत आली असेल तिचें व्याज, अशा रीतीनें आमच्या संपत्तीचा ऱ्हास होत चालला आहे. इतके पैसे दरवर्षी देशाबाहेर जात असतां कोणाची सुवर्णभूमि कंगाल होणार नाहीं ? इंग्लंड देश एवढा श्रीमंत आहे, पण तो देखील अशा व्यवस्थेनें पाच-पन्नास वर्षांत भिकेस

लागेल. बरे, पैसे गेले ते गेले, पण त्याबरोबर आमच्या अकलेचा, हिमतीचा आणि शौर्याचाहि ऱ्हास व्हावा अशी सरकारनें व्यवस्था ठेविली आहे. तलवारीचें पाणी ज्याप्रमाणें तलवार म्यान्यांत ठेविल्यानें नाहींसें होतें, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या अंगच्या पाण्याची स्थिति आहे. सर्व हिमतीचीं आणि कर्तबगारीचीं कामें इंग्रज लोकांनीं आपल्या हातांत ठेविलीं आहेत. ब्रह्मदेशावर चाल करून जावयाचें असलें, किंवा चित्रळवर स्वारी करावयाची असली अथवा प्लेग हटविण्याचें काम करावयाचें असलें, तर तें देखील सरकार आम्हांस सांगत नाहीं. मुसलमानी राज्यांत अशा तऱ्हेचा जुलूम होत नव्हता. खुद्द काबूलच्या सुभेदारांचें काम देखील एका नेटिव्हाकडे होतें; पण आतां एखाद्या रामोशाचें देखील बंड मोडण्यास साहेबाची योजना होते, आणि ती कां, आमच्या अंगीं शौर्य नाहीं म्हणून नव्हे, तर आम्हांला हीं कामें देऊन आमच्या अंगच्या गुणांचा विकास होऊं देण्याची सरकारची इच्छा नाहीं म्हणून! या राज्यव्यवस्थेचा परिणाम असा झाला आहे कीं, हिंदुस्थानांत आम्ही तीस कोटि माणसें असून बंदिवानाप्रमाणें जखडलेलीं व निरुत्साह झालेलीं आहों. सारांश, इंग्रजी राज्यव्यवस्था उत्तम तर खरीच, पण तिचें सर्व धोरण आमच्या लोकांस नामर्द करण्याकडे आहे व हा दोष नेटिव्ह लोकांस राज्यकारभारातील जोखमीचीं कामें सांगून युरोपियनांप्रमाणेच त्यांस मोठ्या पगाराच्या जागा दिल्याखेरीज नाहींसा व्हावयाचा नाहीं, असें मि. दादाभाई नौरोजी यांनीं निर्भीडपणें व शांतपणें सांगितलें." (केसरी, २० एप्रिल १८९७, स. टि. खंड ३, पान ५९९–६००).

टिळक अशा रीतीने ब्रिटिश राज्यनीती कशी लुटारूपणाची आहे हे सांगण्यासाठी अनेक वेळा सरकारी अर्थसंकल्प, उदारमतवादी व भारतावद्दल सहानुभूती व्यक्त करणारे ब्रिटिश नेते, विचारवंत यांचे लेख, त्यांची पुस्तके यांचा उपयोग करीत. या सर्व लेखनाचे मुद्दे म्हणजे इंग्रज सरकारने आमचे उद्योगधंदे ठार केले आहेत, देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळत नाही, जपानप्रमाणे औद्योगिक तंत्रविज्ञान, कलाकौशल्य यांचे आम्हाला शिक्षण मिळत नाही, हिंदुस्थान सरकारचे लष्करी खर्चाचे ओझे दरिद्री भारताला वाहावे लागत आहे इत्यादी असत. भारतीय अर्थकारण हे मुख्यतः शेतीचे अर्थकारण आहे आणि ही शेती निकृष्ट होत चालली आहे, शेतकरी कंगाल होत आहे, दुष्काळात लक्षावधी माणसे मरत आहेत, सरकार जमीन महसूल अफाट प्रमाणाम वसूल करीत आहे, जमिनीची मालकी काहीतरी निमित्त करून सरकार आपल्याकडे घेत आहे इत्यादी मुद्दे मांडून शेतकऱ्यांचे प्रश्न टिळकांनी सतत सरकारपुढे मांडले व पुढे दुष्काळाच्या निमित्ताने शेतकऱ्यांना जागृत करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. तसेच स्वदेशीची चळवळ, परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याची चळवळ, देशी उद्योगधंद्याना उत्तेजन देणारे लेखन टिळकांनी सातत्याने केलेले आढळते.

तत्कालीन अर्थशास्त्रीय विचारवंत न्या. रानडे, दादाभाई नौरोजी, रमेशचंद्र दत्त यांच्या सिद्धांतांचा व निष्कर्षांचा टिळकांनी सतत पाठपुरावा केला. टिळकांनी सुगम व जोमदार भाषेत हे सिद्धांत मांडून लोकशिक्षणाचे काम केले. त्याचा उपयोग करून लोकमताचे पाठबळ देणे, वेळ पडेल तेव्हा लोकक्षोभाचे रान उठविणे, सरकारचा पिच्छा पुरविणे, सरकारच्या समर्थकांचे वस्त्रहरण करणे हे कार्य टिळकांनी सातत्याने केले. एका परीने टिळकांनी भारताचा आर्थिक राष्ट्रवाद जिवंत केला, त्याला धार आणली व त्याला लोकक्षोभाची धग लावून सरकारला सतत चिंताग्रस्त ठेवले. टिळकांचे आर्थिक विषयावरचे सर्व लेखन म्हणजे लोकांना व लोकनेत्यांना वळण लावण्यासाठी, दिशा दाखविण्यासाठी केलेले व्यवहारनिष्ठ लेखन आहे. ते सुबोध आहे, प्रत्ययकारी आहे, अनुभवाच्या भट्टीत भाजून बाहेर आलेले आहे.

आर्थिक साम्राज्यवादाची उपपत्ती

दुसऱ्या प्रकरणात उल्लेखिल्याप्रमाणे 'केसरी' मध्ये राष्ट्र-कल्पनेच्या विकासक्रमाची चर्चा करणारे पाच लेख 'आमचेंच पण कळेल तेव्हां' या शीर्षकाखाली फेब्रुवारी–मार्च १९०६ मध्ये प्रसिद्ध झाले होते. या लेखमालेत ब्रिटिश राष्ट्रवादाला आर्थिक शोषणाचे ध्येय कसे प्राप्त झाले याची सुगम उपपत्ती सांगणारा जो लेख आहे त्यात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी अर्थकारणाचा उगम कसा झाला, याची चर्चा आहे. टिळकांच्या आर्थिक विचार-प्रतिपादनात या निष्कर्षाला गाभ्याचे स्थान आहे. त्या लेखात त्यांनी राष्ट्रधर्म व पंथवर्चस्व या राष्ट्रवादाच्या प्रेरणा क्षीण झाल्यावर देशाची आर्थिक समृद्धी व त्या देशातील व्यापाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध यांना कसे मोक्याचे स्थान प्राप्त झाले व सर्व देशच दुसऱ्या राष्ट्राच्या आर्थिक शोषणात कसा सहभागी होऊ लागला, याची मीमांसा केली आहे. ती मौलिक आहे. ब्रिटिश साम्राज्यवादी अर्थनीतीचे नेमके मर्म पकडणारी आहे.

"निरनिराळे धर्म व पंथ स्थापण्यांत येऊन निरनिराळ्या पंथांत वर्चस्व स्थापण्याकरितां पुढें लठ्ठालठ्ठी सुरू झाली. लठ्ठालठ्ठीचा सहजवृत्त्या कंटाळा आला, व त्याबरोबरच पूर्वीचे उदात्त विचार व मनोविकार युरोपनें पहिल्यानें झुगारून दिले. अधिभौतिक उन्नति अर्थात् शरीराच्या सुखोपभोगाची पराकाष्ठा यांतच युरोपचें सांप्रत सर्व उदात्त व मनोविकार (ideals) एकवटलेले आहेत. ज्यावेळीं राष्ट्रांचे कर्तव्यकर्म सर्व व्यक्तींची चैन चालविणें एवढेंच होऊन बसतें त्यावेळीं संसारी क्रियांची व्यवस्था अव्याहत चालविण्याचें काम राजकुलावर सोपवून धर्मविचारांत राष्ट्र किंवा लोक गुंग होऊन राहणें दुरापास्त होतें. सर्वांत अत्युत्तम जी गोष्ट मानली जात असेल त्या गोष्टीचा राष्ट्रांतील सर्व लोक व्यक्तिशः आपापल्या योग्यतेप्रमाणें आपणांस हिस्सा मिळतो कीं नाहीं हें पाहत असतात. अधिभौतिक गोष्टी पूर्वी गौण मानल्या

होत्या, अर्थात् त्या गोष्टींना व्यवस्थित स्वरूप देण्याचें काम महत्त्वाचें समजलें जात नसून तशाच विशेष प्रसंगाशिवाय राज्यव्यवस्थेसंबंधानें लोक उदासीन होते, पण ज्यावेळीं आधिभौतिक गोष्टींनाच सर्वांत अग्रस्थान मिळालें त्यावेळीं आधिभौतिक खात्याकडे अर्थात राज्यव्यवस्थेकडे लोकांनीं अधिक लक्ष पोंचविलें, व हें खातें आस्ते आस्ते आपल्या ताब्यांत घेतलें. अर्वाचीन युरोपांत अधिभौतिक उन्नतिबरोबरच प्रजासत्तात्मक राज्याचा उद्भव झाला आहे, हें ध्यानांत घेतलें म्हणजे आमच्या वरील म्हणण्याचें मर्म वाचकांस समजून येईल. आधिभौतिक उन्नतींत लोकसत्तात्मक राज्यव्यवस्थेची तत्त्वें पुढें आणल्यानें या कामीं इंग्लंडास पुढारीपणा मिळाला आहे."

या मूलगामी परिवर्तनामुळे इंग्लंडची मूल्येच बदलली, असे सांगून या लेखात टिळकांनी म्हटले होते, "उमीचंदास फसविणारा क्लाइव्ह व अयोध्येच्या बेगमांचा छळ करणारा द्रव्यलोभी हेस्टिंग्ज यांची इंग्लंडवर उपकार करणारांत गणना होत असून देशाभिमान्यांच्या यादींत त्यांचें नांव विशेषेंकरून झळकत आहें. आधिभौतिक उन्नति, त्या उन्नतीबरोबरच लोकांनीं आपल्या हातीं घेतलेली राज्यव्यवस्था व त्याबरोबरच लोकांची शारीरिक चैन सर्वांत अधिक वाढविणारा तो सर्वांत मोठा देशाभिमानी ही कल्पना, या त्रयीनें इंग्लंडच्या अर्वाचीन इतिहासाला सांप्रतचें स्वरूप दिलें आहे. इंग्लंडचें साम्राज्य, जिंकलेल्या लोकांना निरंतर ताब्यांत ठेवण्याची पद्धत व त्यासंबंधाची उत्सुकता, नवीन प्रांत जिंकून ते आपल्या ताब्यांत ठेवण्याची हौस, व नवीन प्रांत जिंकावयास नाहीं सांपडले तरी निदान तेथील व्यापार हस्तगत ठेवण्याची उत्कंठा, या सर्वांचें वर्म वरील त्रयींत आहे."

ही मूल्येच बदलल्यामुळे राजनीतीही बदलली व ती आर्थिक साम्राज्यवादी झाली, अंकित प्रदेशाकडे पाहाण्याची दृष्टी कशी बदलली हेसुद्धा त्या लेखात टिळकांनी स्पष्ट केले होते. "एखादा देश जिंकला न जिंकला तों सुखोपभोगाच्या लुटीसाठीं इंग्लंडचे सर्व राष्ट्रच्या राष्ट्र त्याच्या मागें लागतें. पूर्वी राजकुल व त्याचे संबंधी एवढ्यांच्या इच्छा तृप्त केल्या म्हणजे जिंकलेल्या राष्ट्राला दुसरा कांहीं उपसर्ग होत नसे, व विजयी राजकुलाचा मानपान करण्याचा बोजा जिंकलेल्या राजकुलाच्या खाजगी दौलतीवर प्रायः पडत असे. त्यामुळें इतर सर्व राष्ट्राला जयापजयामुळें किंवा जित व जेते या नवीन नात्यानें विशेष उपाधी चिकटत नसत. पण आतां इंग्लंडचें राज्य दुसऱ्या देशांत होण्याबरोबर इंग्लंडांतील शेटसावकार आपल्या बँका तेथें स्थापून जिंकलेल्यांच्या कर्जबाजारीपणाचा फायदा घेण्यास तयार. इंग्लंडांतील आचारविचारांचें सांप्रत पालटलेलें स्वरूप असें आहे, व इंग्लंडनें जिंकलेल्या राष्ट्रांवर ओढवलेल्या संकटांचें स्वरूप वरील फेरबदलाप्रमाणें अथात् पूर्वीहून फार भिन्न झालें आहे."

कंपनी सरकारचे द्रव्यशोषण

ईस्ट इंडिया कंपनीच्या अमदानीत हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिती कशी बदलत गेली, याचा आढावा घेणारे ४–५ लेख टिळकांनी १९०२ मध्यें 'केसरी'त लिहिले होते. त्यांत १७५७ साली प्लासीच्या लढाईमुळे कंपनीचे वर्चस्व कसे वाढले व १७६५ पासून म्हणजे मोंगल बादशहापासून बंगालच्या दिवाणाचा हक्क मोठ्या शिताफीने मिळविल्या वेळेपासून, ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार कसे बनले व नवीन सरकारच्या अधिकाऱ्यांनी कसा धुमाकूळ घातला, तसेच त्यांनी आपली तुमडी भरून घेण्यासाठी किती अनन्वित कृत्ये केली इत्यादि गोष्टींचा ऊहापोह केलेला होता. टिळकांनी कंपनी सरकारच्या कारभारात हिंदुस्थानचे सांपत्तिक स्थित्यंतर कसे झाले, याचाही आढावा घेतला होता. वर दिलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या उपपत्तीशी हा इतिहास किती तंतोतंत जुळतो व टिळकांची ही मीमांसा कशी इतिहाससिद्ध आहे, हे सहज कळून येईल.

कंपनी सरकार व इंग्रज सरकार यांच्यातील सत्तांतराचा आढावा घेऊन भारताच्या झालेल्या द्रव्यशोषणाची चर्चा देखील टिळकांनी त्या लेखमालेत केली होती. त्यांनी लिहिले होते, "गेल्या शतकाच्या आरंभापावेतों तरी लूट, व्यापार व पगार अशा प्रकारच्या जळवांनीं द्रव्यशोषणाचा कार्यक्रम सुरू होता. १८ व्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानचा व्यापार बुडविण्यासाठीं कायदे अमलांत येऊ लागले. देशांतून बाहेर जाणाऱ्या मालावर शेकडा ६२·२ पावेतो जकात ठेवून देण्यांत आली आणि अशा रीतीनें व्यापाऱ्यांच्या व देशी कारागिरांच्या नरडीस नख देण्यात आलें. परंतु या देशाचा माल परदेशीं जाऊ नये असें घडवून आणण्यापुरती कंपनी सरकारच्या नामदार डायरेक्टकरांची हाव नसून या देशांतील लोकांनी विलायती माल सारखा विकत घेत राहावें अशा तऱ्हेची त्यांस स्थिति यावी, अशी त्यांची पराकाष्ठेची इच्छा होती. ही त्यांची इच्छा सिद्धीस गेली हे कोणासहि आम्हीं सांगण्याचें कारण नाहीं."

"...१८३० च्या सुमारास जवळ जवळ पन्नास हजार पौंडांचा विलायती माल इकडे येत असे. तोच आतां १९०० सालीं ६,११,१३,५८४ पौंडांचा म्हणजे जवळ जवळ ९२ कोटि रुपयांचा परदेशी माल हिंदुस्थानांत आला. तयार केलेला माल इकडून तिकडे जाण्याचा बंदच झाला होता; निव्वळ कच्चा मालच इकडून परदेशीं जावा अशी व्यवस्था कंपनी सरकारच्या नामदार डायरेस्टरांनी १८ व्या शतकाच्या अखेरीच्या पूर्वीच करून ठेवली होती...१९ व्या शतकाच्या अखेरीस आमचा व्यापार असें म्हणण्यास फारशी जागा उरलेली नाहीं, परकी लोकच विलायतेशीं व्यापार करीत आहेत व त्या व्यापारावर श्रीमंत बनत आहेत. याप्रमाणें एकंदरीत व्यापाराची ही शोचनीय स्थिती आहे."

"१८३० च्या सुमारास मॉंटगॉमरी मार्टिन नांवाच्या इंग्रज गृहस्थानें कंपनी सरकारच्या शोषाचा हिशेब अदमासानें केला होता. त्यानें तीस लक्ष रुपये प्रतिवर्षी

परदेशीं जात आहेत व मुद्दलावर १२ टक्के व्याज आकारल्यास ही रक्कम किती फुगत आहे याचा अंदाज काढला आहे. तो असें म्हणतो कीं ३० वर्षांत वरील दराप्रमाणें एकंदर ७२ कोटि ३९ लक्ष पौंड कंपनी सरकारनें हिंदुस्थानांतून शोषून घेतले. ...हल्लीं हा द्रव्यशोष ३० लाख पौंडांपासून ३ कोट पौंड अथवा ३ कोट रुपयांपासून ४५ कोट रुपयांपर्यंत वाढलेला आहे!" (केसरी, २५ नोव्हेंबर १९०२, स. टि. खंड ३, पान ७१–७३.)

भारताच्या दारिद्र्याचे निवारण

टिळकांनी याच लेखात कोणत्याही देशाच्या आर्थिक धोरणाचे यशापयश किंवा दिशा अजमाण्यासाठी कोणते आधार–सूत्र असावे तेही सांगितले होते. त्यांनी लिहिले होते, "कोणत्याही राष्ट्राच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करावयाचा असतां त्या राष्ट्रांतील लोकांचा चरितार्थ कशावर अवलंबून आहे, प्रत्येक मनुष्य स्वतःकरितां म्हणून जितकें द्रव्य उत्पन्न करण्यासाठीं अथवा मिळविण्यासाठीं खटपट करितो, त्यापैकीं त्यास किती मोठ्या भागाचा उपभोग घ्यावयास सांपडतो, हें पहाणें जरूर आहे. तसेंच सरकारच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करावयाचा असतां राष्ट्रांतील संपत्ति वाढविण्यासाठीं सरकारनें कोणकोणते उपाय अमलांत आणले आहेत व आपल्या अमलाखालीं असलेल्या लोकांस अधिक द्रव्यार्जन करतां येण्याच्या कामीं कसकसें साहाय्य केलें आहे हें पाहाणें आवश्यक आहे. तथापि वर दिलेल्या गोष्टी बहुतांशीं परस्परांवर अवलंबून आहेत आणि सरकार म्हणजे प्रजेच्या कल्याणासाठीं अस्तित्वांत आलेली संस्था अशा दृष्टीनें पाहूं गेल्यास प्रजेच्या सांपत्तिक स्थितीच्या मुळाशीं सर्वतोंपरी सरकारचें धोरणच असतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं." (स. टि. खंड ३, पान ६८–६९.)

हिंदुस्थानच्या भरभराटीची दंतकथा

भारतातील ब्रिटिश राज्यामुळे तेथील सांपत्तिक स्थिती सुधारत आहे, असा आभास निर्माण करण्याचे प्रयत्न त्यावेळी ब्रिटिश अधिकारी करीत असत. म्हणून अनेकदा इंग्लंडमधील काही विचारी गृहस्थ, भारताचें ब्रिटिश अभ्यासक यांच्या लेखांचा, पुस्तकांचा वेळीवेळी आधार घेऊन हा भ्रमाचा भोपळा फोडण्याचा टिळकांनी प्रयत्न केलेला होता. तसेच गोपाळराव गोखले, दिनशा वाच्छा प्रभृती भारतीय उदारमतवाद्यांनी सरकारकडे जे अभ्यासपूर्ण निष्कर्ष धाडले होते, त्यांचाही उपयोग टिळकांनी आपल्या या भ्रमनिरसनाच्या लेखनासाठी केलेला होता, किंबहुना 'हिंदुस्थानचे दारिद्र्य' या विषयावर सार्वत्रिक चर्चा, वादविवाद होऊ लागले होते. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर विविध उपायांची चर्चा करताना हे दारिद्र्य वारंवार लोकांपुढे

मांडले जाई. या दारिद्र्यविषयक चर्चेविषयी टिळकांनी लिहिले होते, " वादविवादाला सुरुवात झाली आहे, व प्रत्येक प्रश्नाचा पुरा खल झाल्याशिवाय हल्लींची सुशिक्षित लोकांच्या मनाची अस्वस्थता नाहींशी होणें शक्य नाहीं. नुसत्या अरेरावीच्या उत्तरानें समाधान होण्याचा मनु आतां राहिला नाहीं. आमच्यांतील पुढाऱ्यांनीं प्रत्येक प्रश्नाचा सार्वजनिक दृष्ट्या विचार केला असल्यामुळें, व हाती सत्ता नसल्याकारणानें, वाद-विवादांत खात्रीनें जय मिळावा अशा रीतीनेंच योग्यायोग्य गोष्टींची निवड करून आपली बाजू ते बळकट करीत आहेत. त्यामुळें हिंदुस्थानच्या भरभराटीच्या निवळ दंतकथांचा काळ फार वेळ टिकणार नाहीं. "(' हिंदुस्थानच्या भरभराटीची दंतकथा ', केसरी, २३ सप्टेंबर १९०२, स. टि. खंड ३, पान ६३७.)

याच संदर्भात " ईस्ट अँड वेस्ट "च्या अंकात थॉर्बर्न यांनी जो लेख लिहिला होता त्याचा दाखला याच लेखात टिळकांनी दिला होता. त्यांनी म्हटले होते, " १९०१ च्या खानेसुमारीच्या आकड्यांवरून पाहातां त्याच्या मागच्या दहा वर्षांत जवळ जवळ दोन कोटि लोक दुष्काळामुळें मृत्युमुखी पडले असें दिसतें. बहुधा सर्वच शेतकऱ्यांची हीनावस्था आहे, असा १८८० व १९०४ च्या दुष्काळ कमिशनानींनीं आपल्या पुढच्या पुराव्यांवरून अभिप्राय दिला आहे. एवढ्यासाठीं सर्व इलाख्यांमध्यें लोकांच्या खऱ्या स्थितीची चौकशी झाली पाहिजे. " तसेच ' हिंदुस्थानचें दारिद्र्य ' यासंबंधी मि. डिग्बी यांच्या पुस्तकाचा आधार घेऊन टिळकांनी आकडेवारी सादर केली होती. डिग्बींनी हिंदुस्थानातील लोकांच्या प्राप्तीचे मान दरसाल किती असते या विषयावर त्या पुस्तकात ऊहापोह केलेला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, " दक्षिणेंतील गरीब कुणब्यास पोटास दरसाल निदान १८ शिलिंग म्हणजे निदान १४ रुपये लागतात असा स्पेन्ससाहेबांचा अदमास आहे. प्राप्तीचें मान पाहिलें तर त्याहिपेक्षां कमी. हिंदुस्थानांत श्रीमंत लोक जो फाजील पैसा खर्च करतात त्या मानानें गरिबांची प्राप्ति कमी धरली म्हणजे कोट्यवधि गरीब लोकांस दर माणशीं सालीना १३ शिलिंग म्हणजे हल्लींच्या भावानें सुमारें ९।।। किंवा फार झाले तर दहा रुपये पडतात... हिंदुस्थानांतील लोकांच्या खऱ्या स्थितीबद्दल रिपोर्ट आपल्या दफ्तरांत दाबून ठेवून विलायतेंतील लोकांस स्टेटसेक्रेटरीसारखे अधिकारी कसें फसवितात हें आतां चांगलें उघडकीस आलें आहे. " (केसरी, दि. १४ जानेवारी १९०२, स. टि. खंड ३, पान ६१६–६१७.) असेच इंग्रजी अर्थनीतीचे विवरण ना. गोपाळराव गोखले यांनी रॉयल कमिशनपुढे झालेल्या त्यांच्या साक्षीत केले होते. टिळकांनी गोखल्यांचे त्यासाठी अभिनंदन करणारा लेख लिहिला होता. त्यात म्हटले होते, " साक्षींतील मुख्य मुद्दा म्हटला म्हणजे असा होता कीं, हिंदुस्थान सरकार जो खर्च करितें त्याची पद्धति मित-व्ययाची आहे किंवा उधळेपणाची आहे...राज्यकर्त्यांचा परकीपणा, परकीयांनी नोकऱ्यांचा घेतलेला मक्ता व पूर्वेकडील देशांत असलेले ब्रिटिश राज्याचे राजकीय

हितसंबंध इत्यादि गोष्टींमुळें प्रजेच्या पैशाची फार नासाडी होते...इंग्रजी राज्याचा परिणाम आज एक दिसून येत आहे खरा, तो हा कीं आमच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा विरून जाऊन उंबरातल्या किड्याप्रमाणें आमची स्थिति होणार...इंग्रजी राज्य म्हणजे एक मोठा रूळ असून, तो आमच्या डोक्यावरून फिरविला जात आहे व सर्वांची योग्यता सारखीच, परंतु क्षुद्र अशी होणार आहे." (केसरी, ११ मे १८९७, स. टि. खंड ३, पान ६०८–६१०.)

याच संदर्भात अमेरिकेचे उदारमतवादी पुढारी व त्यावेळी अमेरिकी राष्ट्रपतिपदासाठी उभे असलेले मि. ब्रायन यांनी हिंदुस्थानच्या भेटीत प्रत्यक्ष पहाणी करून जे निष्कर्ष काढले होते त्यांचा पुरावा ब्रिटिश राज्यनीती कशी जाचक व द्रव्यशोषण करणारी आहे हे सिद्ध करण्यासाठी १९०६ मध्ये वेळगाव येथे केलेल्या भाषणात टिळकांनी सादर केला होता. ते म्हणाले होते, अमेरिकेचे प्रेसिडेंट होण्याच्या लायकीचे अशा ब्रायनसाहेबांनी आमच्या दाव्याचा निकाल आमच्या म्हणण्याप्रमाणें दिला आहे. त्यांनीं असा स्पष्ट निकाल दिला आहे कीं, जरी आमच्या देशांत शांतता नांदत असली तरी ह्या शांततेसाठीं द्याव्या लागणाऱ्या किंमतीनें हिंदुस्थान देश भिकेस लागला आहे." केसरीने एका अग्रलेखात मि. ब्रायन यांच्या त्या भाषणाचा सारांश दिला होता. त्यात म्हटले होते, "हिंदुस्थान सरकार रशियन सरकाराप्रमाणेंच अनियंत्रित व जुलमी आहे. इतकेंच नव्हे तर दोन बाबींत जुलमी रशियन सरकारहून अधिक वाईट आहे. हिंदुस्थानांत परक्यांचें राज्य आहे. रशियांतील अधिकारी रशियनच आहेत, परकी नाहींत. दुसरें असें कीं करांपैकीं बराच मोठा भाग हिंदुस्थानांतून बाहेर जातो. रशियन सरकार लोकांकडून जे पैसे गोळा करते ते सर्व रशियांतच राहातात. विलायत खर्च या नांवाखालीं पंचवीस कोट रुपये इंग्लंडला पाठविण्यात येतात, आणि चारपांच कोट रुपये युरोपियन अधिकाऱ्यांचा पगार जातो. एवढा दांडगा द्रव्यशोष कोणतें राष्ट्र सहन करू शकेल? उत्पन्नांच्या मानानें पाहिलें असतां हिंदुस्थानावरील करांचें ओझें इंग्लंडच्या दुप्पट आहे. इंग्लंडांतील दरमाणशीं सरासरी उत्पन्नाच्या एकविसांशाइतकें आहे."

भारताच्या दारिद्र्याची ही कहाणी हा १८७० पासून पुढे ३०–४० वर्षें राष्ट्रवादी विचारवंतांच्या अभ्यासाचा, चिंतनाचा व प्रचाराचा नित्य विषय झाला होता. त्यातूनच भारताच्या राष्ट्रीय चळवळीला आर्थिक आशय येत गेला. ब्रिटिश नीती ही द्रव्यशोषणाची आहे व इंग्रजी राज्य व्यवस्था व भारतातील इंग्रज अधिकारी त्या धोरणाची अंमलबजावणी करणारे अधिकारी आहेत, हे चित्र लोकांपुढे सतत मांडण्याचे कार्य वृत्तपत्रांनी केले. 'केसरी' त्यात अग्रेसर होता.

अवाढव्य लष्करी खर्च

टिळकांच्या आर्थिक लेखनात सरकारच्या खर्चातील खातेवार उधळपट्टीचा समाचार घेण्यात येत असे. त्यात अवाढव्य लष्करी खर्च हा एक मुद्दा असे. या खर्चाची राजकीय पार्श्वभूमी सांगताना टिळकांनी लिहिले होते, "इंग्लंडची साम्राज्याची हांव कमी होणें आतां शक्य नाहीं व या हांवेच्या पायीं हिंदुस्थानला इंग्लंडची कोठी म्हणून हरएक प्रकारचें सामान जय्यत तयार ठेवावें लागत आहे. सोल्जरांना पोसून, शिकवून तयार करून इंग्लंठच्या हवाली करणें हिंदुस्थानचें कर्तव्य आहे. आयत्या वेळीं तेथील काळें-गोरें सैन्य पाहिजे त्या ठिकाणीं लढाईस पाठविणें हिंदुस्थानास जरूर आहे ...इंग्लंडच्या साम्राज्याच्या पसाऱ्यावरोर त्या कामगिरीचा बोजा वाढत जाणार यांत शंका नाहीं." (केसरी, १५ एप्रिल १९०२, स. टि. खंड ३, पान ६२८.)

'लष्करी खर्चाचें ओझें' या लेखात त्यांनी म्हटले होते, "लष्कराचा वाढत जाणारा खर्च ही एक आमच्या दुर्दैवानें गरीब रयतेपासून घेतलेल्या कराचे पैसे नाहींसे होण्याची मोठी खिंडच झाली आहे...हिंदुस्थानच्या रक्षणाकरितां व हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्य सुरक्षित ठेवण्याकरितां सुमारें ६० हजार गोरें सैन्य या देशांत ठेवतात... इतकें गोरें सैन्य हिंदुस्थानच्या खर्चानें ठेवणें म्हणजे या गरीब देशास विनाकारण नागवणें होय. हिंदुस्थानच्या दरएक गोऱ्या शिपायामागें दरसाल ७॥ पौंड म्हणजे ११२ रुपये हिंदुस्थान सरकारकडून विलायत सरकार घेत असतें. म्हणजे दरसाल सुमारे ५ लाख पौंड म्हणजे सुमारें ७५ लाख रुपये हिंदुस्थान सरकारास द्यावे लागतात." (केसरी, २९ एप्रिल १९०२, स. टि. खंड ३, पान ६३१.)

या विषयासंबंधी दि. ११ मार्च १९०२ च्या अंकातील संपादकीय स्फुटात म्हटले होते, "संपत्तीचें शोषण व अवाढव्य लष्करी खर्च हे दोन प्रश्न यांमुळें या देशांत अत्यंत महत्त्वाचे होऊन बसले आहेत. तथापि या प्रश्नांसंबंधानें आजपर्यंत झालेली खटपट बहुतेक व्यर्थच झाली आहे. इंग्लंड व हिंदुस्थान यांचा पैशाचा संबंध जेथें येईल तेथें इंग्लंडचें या देशाशीं असलेलें वर्तन अगदीं अन्यायाचें झालेलें आहे. कोलोनियल ऑफिसाचा सर्व खर्च इंग्लंड देतें, पण इंडिया ऑफीसांतील स्टेट सेक्रेटरीपासून तो पट्टेवाल्यापर्यंत सर्वांचा पगार हिंदुस्थानवर लादला आहे. सर्व जगभर पसरलेल्या साम्राज्याचें, वसाहतींचें व इतर हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठीं इंग्लंडला मोठें आरमार नेहमीं तयार ठेवावें लागतें. त्याच्या खर्चासाठी आस्त्रेलीयाकडून ४५,००० पौंड घेतात, व कानडा प्रांतापासून मुळींच घेत नाहींत. आणि हिंदुस्थानावर मात्र २,६२,५०२ पौंड खर्च लादलेला आहे. कानडा प्रांतांतील प्रजेनें बंड केलें, तें इंग्रजांनीं इंग्रजी शिपाई पाठवून मोडलें व त्याचा सर्व खर्च इंग्लंडनें सोसला, इकडे आमच्या सरकारच्याच शिपायांनीं बंड केलें, तें मोडण्यास आमच्याच पंजाबी शिपायांनीं

मदत केली, व सर्व प्रजा राज्यनिष्ठ राहिली. पण त्या सर्वांचा खर्च हिंदुस्थानच्या प्रजेवर लादला. इराण वगैरे देशांत ब्रिटिश वकील ठेवण्याचा खर्च तर परवापर्यंत हिंदुस्थानच्या लोकांकडून घेण्यांत येत असे, इकडे हिंदुस्थानचें परशत्रूपासून व बंडापासून संरक्षण करण्यासाठीं म्हणून गोरें सैन्य ठेवलेलें आहे. परंतु वस्तुतः तें आशिया खंडांतील इंग्रजी साम्राज्याचे उपयोगासाठींच ठेवलेलें आहे. म्हणजे हें सैन्य पोसावयाचें काम आमच्याकडे व तें लढाईस वाटेल तिकडे नेण्याचें काम इंग्लंडकडे, असा हा श्रमविभाग आहे. चिनाशीं झगडण्याचें काम असो, आफ्रिकेतील बंडावा मोडावयाचा असो किंवा ब्रह्मदेश घशांत टाकावयाचा असो, त्यावेळीं मदत हिंदुस्थानच्या पैशाची व शिपायांची घ्यावयाची, अशी इंग्लंडची आजपर्यंतची वहिवाट होती, अलीकडे मात्र कांहीं लढाईतील खर्च इंग्लंडांतील तिजोरींतून मिळू लागला आहे. बरें, इतकें असून सरकारचा लष्करी खर्च म्हणजे प्रजेस झेपेल असा आहे, असें मुळींच नाहीं. सन १८८५ सालापर्यंत वार्षिक लष्करी खर्च १६ कोटींचा होता. तो १८९० सालीं २२ कोटि झाला. व तो आता सुमारे २७ कोटि झाला आहे. म्हणजे गरीब शेतकरी वर्गापासून सरकारास येणारा जमिनीचा सर्व सारा सरकारचें एकटें लष्करी खातेंच खाऊन बसतें. लष्करी खर्चाच्या या भयंकर वाढीस कांहींतरी आळा घातला पाहिजे, अशी सुशिक्षित पुढाऱ्यांची आज पुष्कळ वर्षांची ओरड आहे, पण त्यांच्या ओरडीपासून कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील दुष्काळ व प्रजेचें दारिद्र्य जसें आहे तसा लष्करी खर्च सारखा अव्याहत वाढतच चालला आहे."

परदेशी लुटीचा तिसरा मार्ग : व्यापार

इंग्रजी राज्याने केलेली आर्थिक पिळवणूक जनतेला समजावून सांगत असताना भारतीय विचारवंत नेहमी भारताचे शासन 'एका हातांत तलवार व एका हातांत तराजू' या मार्गाने ब्रिटिशांनी ताब्यात घेतले, असे सांगत. टिळकांनीं 'औद्योगिक पारतंत्र्य' हा लेख १८९४ मध्ये 'केसरी'त लिहिला होता. त्यात म्हटले होते, "राजकीय पारतंत्र्य किंवा धार्मिक वा सामाजिक पारतंत्र्याची चर्चा जेवढी होते तेवढी औद्योगिक परावलंबनाची—औद्योगिक पारतंत्र्याची चर्चा या देशांत होत नाहीं." टिळकांनी औद्योगिक प्रश्नांची ती चर्चा तर सुरू केलीच, पण त्याबरोबर इंग्रज लोक भारताचा व्यापार कसा बुडवीत आहेत, हेही प्रखरपणे सांगावयास सुरुवात केली होती. १८९१ साली पुण्यात जी औद्योगिक परिषद झाली तिच्यासंबंधी 'केसरी'ने आपल्या अग्रलेखात म्हटले होते, "विद्येचा प्रसार प्रथमतः ज्या वर्गात झाला त्यांचा व्यापाराशीं विशेष संबंध नसल्यामुळें किंवा इतर दुसऱ्या कोणत्याहि कारणामुळें आमच्या व्यापारधंद्याची इंग्रजी राज्यांत जी दुर्दशा होत चालली आहे व ज्यामुळें हजारों लोक मागधोटा एकीकडे ठेवून नांगर ओढण्यास लागले आहेत तिकडे आपले विशेषसे लक्ष गेलें

नाहीं. आमची सत्ता गेली, आम्हांस मोठमोठी कामें मिळत नसल्यामुळें आमच्यांत उमेद राहिली नाहीं, आमचीं शस्त्रास्त्रें काढून घेतल्यामुळें आम्ही नामर्द झालों व आमचे शूर सरदार काम नसल्यामुळें अफू-गांजा वा दारूस बळी पडूं लागले, समाज बंधनें सुटलीं. वगैरे गोष्टी जितक्या शोचनीय आहेत तितक्याच किंबहुना त्याहून जास्त आर्थिक ऱ्हासाच्या गोष्टी होत. कोणताहि देश आणि विशेषकरून हिंदुस्थानसारखा जुना देश नुसत्या शेतकीवर कधींहि भरभराटीस यावयाचा नाहीं. या कामीं अजून सुधारणा होण्यास बरीच सवड आहे, ही गोष्ट आम्हांस मान्य आहे, तथापि लोहार, सुतार, नावाडी, कोमटी वगैरे वगैरे धंद्यांचे लोक बुडत जाऊन व्यापाराच्या बाबतींत राजकीय बाबतीपेक्षांहि पैशाचा पूर विलायतेकडे जास्त वहात आहे, उद्योगधंदे बुडाले, पत गेली, भांडवल नाहींसें झालें. वाफेच्या राक्षसाबरोबर टक्कर देण्याची शक्ति राहिली नाहीं, व्यापाराच्या कृती, कला व कौशल्यें यांचें नवें ज्ञान संपादन करण्याचें दुरापास्तच, परंतु जुनेदेखील हळूहळू विसरून जाऊं लागलों, राष्ट्रीय व्यापार काय व त्याच्या बाबतींत आपले प्रतिस्पर्धी कोण आहेत याचें ज्ञान नाहीं आणि त्यामुळें ते आपल्या व्यापारास भराभर हस्तगत करीत चालले आहेत आणि उद्योगाबरोबर लक्ष्मीहि आपल्या देशास सोडून चालली आहे." (केसरी, २५ ऑगस्ट १८९१.)

औद्योगिक विकास आणि व्यापार यांचे परस्परसंबंध स्पष्ट करताना टिळक भारताचा कापड-उद्योग व व्यापार यांचे उदाहरण नेहमी देत. 'आमचे उद्योगधंदे ठार कसे झाले?' हे सांगताना टिळकांनी लिहिले होते, "कंपनी सरकारनें तराजू एका हातांत ठेवून दुसऱ्या हातांत राजदंड धारण केला, त्या वेळीं हिंदुस्थानचा माल परदेशीं पुष्कळच खपत असे. हिंदुस्थान तलम सुताच्या कापडाबद्दल, तसेंच रेशमी लोंकरीच्या कापडाबद्दल फार प्रख्यात होतें...हे कंपनी सरकारच्या विलायती डायरेक्टरांस पसंत पडलें नाहीं, आणि त्यांनीं १७६९ सालीं कच्च्या मालास उत्तेजन द्यावें व पक्का माल होतां होईल तों होऊं देऊं नये अशा अर्थाचा हुकूम फर्माविला, या वेळीं त्यांनी असेंहि कळविलें कीं, कोष्टयांस कंपनीच्याच कारखान्यांत काम करण्यास भाग पाडावें व तें काम करण्यास तयार नसल्यास त्यांना अधिकाऱ्यांनीं शिक्षा द्याव्या!...१७६९ मधील हिंदुस्थानांतील आपल्या अधिकाऱ्यांस सोडलेला हुकूम हा प्रयत्नांचा पहिला हप्ता होय. कोष्ट्यांस आपणांस वाटेल त्या कामास वाटेल तेव्हां लावण्याचा कंपनी सरकारच्या अधिकाऱ्यांस अधिकार असल्यामुळें देशी लोकांचे कारखाने बुडत चाललेच होते. त्यांत आणखी या एका अन्यायाची भर पडल्यामुळें कारखाने साफ बुडाले. इकडे तयार झालेल्या मालावर अशा तऱ्हेनें भयंकर जकात बसविण्यांत आली, परंतु इंग्लंडमध्ये तयार झालेला माल मात्र २॥ टक्के जकातीवर इकडे येत असे. त्यांनीं देशांतल्या देशांत पाठविल्या जाणाऱ्या देशी मालावरदेखील जबर जकात बसविली.

कच्च्या मालावर ५ टक्के जकात बसविण्यांत आली व पुढें त्याच्या वस्तु बनविल्यास त्यांच्यावर १५ पासून १७ टक्केपावेतों जकात घेण्यांत येत असे !...ही जकात वसूल करण्यासाठीं ठिकठिकाणीं रस्त्यावर व गांवाबाहेर अशीं नाकीं बसविलेलीं होतीं व नाकेदार फार प्रामाणिक असल्यामुळें, त्यांना बक्षिसी देण्यांतच व्यापाऱ्यांचा जीव दमून जाई. अशी देशांतील अंतःस्थिती असल्यामुळें व्यापार बुडत चालला, व त्याबरोबरच कला-कौशल्याचा ऱ्हास जारीनें होत चालला ! याचा अर्थात् परिणाम म्हणजे विलायती माल चोहोंकडे फडकूं लागला...हिंदुस्थानांतील व्यापार ठार झाला अथवा येथील लोकांचे उद्योगधंदे बुडाले, यांत नवल नाहीं." (केसरी, ११ नोव्हेंबर १९०२, स. टि. खंड ३, पान ६९८–६९९.)

स्वदेशीसंबंधी टिळक जेव्हा लिहीत व व्याख्याने देत तेव्हा व्यापार व उद्योगधंदे इंग्रजांनी कसे बुडविले, याचे विवेचन ते नेहमी करीत. १९०६ साली बेळगाव येथे दिलेल्या भाषणात टिळक म्हणाले होते, "विलायतेत पूर्वी कापसाचें एक बोंडहि पिकत नव्हतें व हल्लींहि पिकत नाहीं. इकडे कापूस पिकत होता व वस्त्रेंहि होत होतीं. पण हल्लीं कापूस पिकविण्याची हमाली तेवढी आम्हांकडे राहिली असून, वस्त्रें करण्याचें काम मँचेस्टरनें पत्करलें आहे. नागपूर, बंगाल इत्यादि सर्वच प्रांतांतील कापडाचा धंदा बसत चालला व मँचेस्टरांत रोज नव्या नव्या गिरण्या उत्पन्न होऊं लागल्या. आमच्या लोकांना धंद्यात बरकत नाहीं एवढेंच वाटे. कीड कोठें लागली हें त्यांना समजलें नाहीं. मँचेस्टरचें वैभव वाढविण्यास सरकारची अतिशय मदत झाली आहे. तेथील मजुरांच्या पोटांत आमच्या कोष्ट्यांच्या तोंडांतील अन्न जाऊन पडूं लागलें." (स. टि. खंड ६, पान ६१८–६१९.)

शेतकऱ्यांची निकृष्टावस्था

भारताच्या दारिद्र्याचा विचार करू लागलेल्या सुशिक्षितांच्या पहिल्या पिढीचे भारतातील शेतकऱ्यांच्या स्थितीकडे प्रथम लक्ष जाणे स्वाभाविक होते. टिळकांपूर्वी सार्वजनिक जीवनांत आलेल्या न्या. रानडे यांनी १८७१ साली ते पुण्यास आल्यावर (१८७० मध्ये पुण्यास सुरू झालेल्या) सार्वजनिक सभेच्या कामात लक्ष घालावयास सुरुवात केली. त्यांच्याच प्रेरणेने महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीचे काम या सभेने अंगावर घेतले व १८७३ साली हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या स्थितीचे हृदयद्रावक वर्णन केले होते व ती सुधारण्यासाठी काही उपाय सुचविले होते. १८७५ मध्ये कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांनी पुणे जिल्ह्यात प्रथम दंगे केले व ते नंतर नगर, नाशिक वगैरे भागांत पसरले. या दंग्यांची चौकशी पुण्याचे त्यावेळचे नेते सार्वजनिक काका यांनी सार्वजनिक सभेच्या वतीने केली, त्याबाबत काय केले पाहिजे याचे उपायही सुचविले. पुढे मुंबई सरकारनेही कमिशन नेमले.

त्यानंतर लगेच १८७६ साली महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. यासंबंधीही सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकात न्या. रानडे यांनी माहितीपूर्ण लेख लिहिले होते. अशा रीतीने महाराष्ट्रांत नव्या सुशिक्षित वर्गाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांत प्रत्यक्षपणे लक्ष घालून होता होईल तेवढे सरकारला हलविण्याचे कार्य सुरू केले होते. १८८७ साली टिळकांनी 'केसरी' चे संपादकपद घेतल्यानंतर १८७२ मध्ये पुन्हा दुष्काळ पडला. तेव्हा प्रथम टिळकांनी 'केसरी' तून सरकारी धोरणावर टीका करण्यास व जनमत शेतकऱ्यांच्या बाजूने वळविण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचे टिळकांनी रेखाटलेले शब्दचित्र जिवंत होते. त्यांनी लिहिले होते, "हिंदुस्थानांतील एकोणीस-विसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें जमिनीवर चालतो; पण जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरीवर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ह्याचा विचार केला म्हणजे अंगावर कांटा उभा राहतो. घरात अठराविश्वें दारिद्र्य! कर्जाचा बोजा डोईवर इतका कीं, घरदार, गुरेढोरें गहाण पडलीं तरी सालअखेर कशी मजल पोहोंचेल ह्याची पंचाईत! सरकारदस्त तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहीं तर जमिनीचा लिलाव होण्याची पाळी यावयाची. त्यांत अवर्षण, टोळधाड, वगैरे अवांतर अरिष्टें अलीकडे वरचेवर कृपादृष्टि करू लागल्यामुळें दोन-चार वर्षांनीं यमस्वरूपी दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच! वर्षांतून आठ महिने उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसें तरी जीवित कंठावें, व शेवटीं ऐनवेळीं पावसानें टाळा दिला म्हणजे सावकारांचें घर पाहावें अशी बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति पाहून कोणास वरें कींव येणार नाहीं? पूर्वी अशा प्रसंगीं सावकार लोक उदारपणानें शेतकऱ्यास मदत करीत, व वेळीं राजे लोकहि सूट देत; पण अलीकडे तेहि मार्ग बंद झाले. शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनासे झाले; कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळींच भरंवसा नाहीं. सरकार तर बोलून चालून व्यापारी, तेव्हा सुट्टीची गोष्टच नको. पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी व त्यांची मुलें-माणसें उपाशीं मरोत किंवा तुरुंगात जावोत, सरकारदस्त नेमलेल्या तारखेच्या आंत कचेरींत भरलाच पाहिजे. यंदा सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळ इतका आहे कीं, सध्याच लोक दोन पैशाला गाई-बैल विकूं लागले, तरी सरकार-देणें थकलें काय, तें तेवीस रुपयेच! आणि ही स्थिति येण्याला कारण सावकार लोकांचा जुलूम अशी सरकारची पक्की समजूत झाली!... सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारनें शेतपेढ्या काढल्या, व स्वतःच सावकारी करण्यास सुरुवात केली." (केसरी, २ फेब्रुआरी १८९२, स. टि. खंड ३, पान २८३–२८४.)

टिळकांच्या शेतीविषयक लेखनात शेतकऱ्यांची गाऱ्हाणी, त्यांचे प्रश्न प्रामुख्याने असले तरी त्याचा सर्व रोख सरकारच्या दिशेने असे. सरकार शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितीला कसे कारणीभूत होत आहे, हेच सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. सावकार

किंवा खोत यांच्या प्रश्नातही हाच दृष्टिकोण प्रामुख्याने आढळून येतो. शेतकऱ्यांचे सारा व पाटबंधाऱ्यांचे प्रश्न, जमिनीची मालकी, शेतीला उपयुक्त जोडधंदे, दुष्काळ निवारणात असणारे शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न आदि सर्व बाबतींत शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल, हीच भूमिका हिरीरीनें टिळक मांडत. शेतकऱ्याचे हित हा भारताच्या अर्थकारणाचा कणा आहे, हेच त्यांचे तत्त्व होते. त्यांनी म्हटले होते, " शेतकीची निकृष्टावस्था म्हणजे आमच्या राष्ट्राचीच निकृष्ट अवस्था होय. हिंदुस्थानांत शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. त्याच्यावरील मालिन्याचा पगडा दूर करता आला तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल. "

इंग्रजी राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती

शेतकऱ्यांची दुःस्थिती सुधारण्यासाठी इंग्रज सरकारने काय केले पाहिजे, ते त्यांच्यासाठी काय करीत नाही, हाच टिळकांच्या लिखाणाचा सूर असे. नमुन्यासाठी ३ ऑक्टोबर १८९९ रोजी ' केसरी 'त लिहिलेला स्फुट लेख पाहाण्यासारखा आहे. त्यात टिळकांनी म्हटले होते, " हिंदुस्थानात शेतकऱ्यांची स्थिती कशी सुधारावयाची, त्यांस सावकारांकडून जें कर्ज काढावें लागतें तें न काढण्याची किंवा निदान हलक्या व्याजानें तें त्यांस मिळण्याची कशी तजवीज करतां येईल, आणि एकंदरीत त्यांची स्थिति सुधारून ते खाऊन पिऊन सुखी कशानें राहातील, हा प्रश्न हिंदुस्थान सरकारपुढें आज बरीच वर्षें आहे. महाराष्ट्रांतच शेतकऱ्यांची स्थिति वाईट आहे असें नाहीं तर पंजाबांत व इतर ठिकाणींहि असाच प्रकार आहे. लष्करांतील चांगले शिपाई या शेतकरी वर्गांतूनच सरकारास मिळतात व लष्करांतील नोकरी संपल्यावर बहुतेक शिपायांची उमेद अशी असते कीं, आपाआपल्या गांवीं जाऊन तेथें शेतवाडी करून सुखानें राहूं, परंतु वस्तुस्थिति पाहिली असतां हें सुख त्यांस बहुधा प्राप्त होत नाहीं. पेशवाईंत असा प्रकार नव्हता. मुलुखगिरी करून दोन पैसे मिळवून आले असतां खेडेगांवांत बसून त्याचा स्वस्थपणें उपभोग घेण्यास व शेतकी करून सुखानें राहाण्यास दक्षिणेंतील कुळंब्यांस सांपडत असे. पण आतां तो सर्व प्रकार बदलला आहे. देशांत चोहोंकडे शांतता झाल्यानें लोकसंख्या वाढली, युरोपियन व्यापाऱ्यांच्या चढाओढीनें इकडील व्यापारधंदे बसले आणि लष्करांत पूर्वी जितक्या लोकांचा प्रवेश होत होता तितका आतां होत नाहीं. यामुळें जमिनीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त झाली आणि सारा देण्याची वगैरे पूर्वी जी सवलत असे, ती जाऊन त्याऐवजीं वाढते सारे दरसाल नियमित वेळीं तिजोरींत रोख भरणा करावे लागतात. अशा स्थितींत शेतकरी लोकांस सावकारांची जरूर अवश्य वाटूं लागते, आणि एकदां कूळ सावकाराच्या हातांत गेलें म्हणजे कोळ्याच्या जाळ्यांत पडलेल्या माशीची जशी स्थिति होते, तद्वत त्याचा प्रकार होऊन जातो. सारांश, इंग्रजी राज्यामध्ये शेतकरीवर्गाची स्थिति

दिवसानुदिवस जास्त जास्त निकृष्ट होत चालली आहे. ही सुधारण्याचा खरा मार्ग म्हटला म्हणजे त्यांस शेतकींतून काढून जितके उद्योगधंदे मिळतील तितके मिळवून देणें, व शेतकीचीच सुधारणा करून उत्पन्न वाढवणें हा होय. पण ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या मनांत पूर्णपणें उतरत नाहीं. तेव्हा त्यांनीं जे उपाय योजले आहेत ते अर्थातच निराळ्या तऱ्हेचे आहेत. ते उपाय कोणते हें मागें आम्ही अनेक वेळां सांगितलेंच आहे. डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलीफ ॲक्टप्रमाणें सावकाराचे जितके हातपाय मोडतील तितके मोडण्याचा प्रथम प्रयत्न झाला. त्यानंतर कॉन्ट्रक्ट ॲक्टमध्ये नुकतीच सुधारणा करण्यांत येऊन कुळंबी व सावकार यांच्यामधील करार इतर करारांप्रमाणें करार करणाऱ्या कुळंब्यांस प्रतिबंधक मानले जाऊ नयेत, असा कायदा झाला. पण एवढ्यानें सरकारची तृप्ति झाली नाहीं. आतां नवीन बूट असा निघाला आहे कीं, शेतकऱ्यास आपली जमीन शेतकऱ्यांखेरीज दुसऱ्या कोणास सरकारचे परवानगीखेरीज विकूं देऊं नये, व पांहिल्यानें या कायद्याचा अनुभव पंजाबांत घेण्याचें ठरलेलें असून त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत एक बिलहि आलें आहे. शेतकरी सावकाराकडून कर्ज काढतो ते गरजेकरितां काढतो. व ही त्याची गरज जोपर्यंत कायम राहील तोपर्यंत त्यास कर्जाची गरज पडणारच, आणि तशी जरूर पडली म्हणजे त्यांस हा नाहीं तर तो सावकार बघावा लागणारच. तेव्हां शेतकऱ्याची गरज ज्या योगानें कमी होईल असे उपाय पहिल्यानें योजले पाहिजेत, आणि इतकें करूनहि गरज राहिली तर हलक्या व्याजानें पैसे मिळण्याची तजवीज झाली पाहिजे. तात्पर्य, देशांतील उद्योगधंदे वाढवणें आणि शेतकऱ्यांस हलक्या व्याजानें पैसें देण्याकरितां पेढ्या काढणें हे दोनच त्यांस ऋणमुक्त करण्याचे खरे उपाय आहेत, व अक्कलकोट संस्थानांत यापैकीं दुसऱ्याची योजना चालूं आहे, ही त्या संस्थानच्या मानानें मोठी समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे. शेतकऱ्यानें शेतकऱ्यांखेरीज दुसऱ्या कोणास जमीन विकूं नये असा कायदा केल्यानें सावकार शेतकरी बनेल किंवा शेतकऱ्यांपैकीच कोणी एखादा सावकार होईल यापेक्षा दुसरा कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. पृथ्वीवरील मनुष्यास पृथ्वी फिरते हें जसें कळत नाहीं तशी सरकारची स्थिति झाली आहे. इंग्रजी राज्यपद्धतीमुळें ज्या ज्या शेतकऱ्यांच्या गैरसोयी झालेल्या आहेत—सारे वाढले आहेत, उद्योगधंदे बुडाले आहेत, इत्यादि—त्या सरकारास दिसत नाहींत आणि त्याखेरीज इतर बाबतींत म्हणजे सावकारावर हल्ला करून शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याची परोपकारबुद्धि सरकारच्या मनांत जागृत आहे. रोगाचें मूळ शोधून काढून तें नाहींसें करण्याचें सोडून देऊन त्याचीं लक्षणें तेवढीं नाहीशीं करणेंचे उद्योगास तेवढें सरकार लागलें आहे. याचा परिणाम कांहीं वेळ चांगला दिसेल. पण अखेरीस अशी स्थिति होईल कीं, शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची मुळेंहि छाटलीं गेलीं नाहींत, तर तीं भिंत फोडून बाहेर पडतील अणि अखेरीस त्यांस विपन्न दशेंतच राहणें भाग पडेल.लॉर्ड कर्झन यांनी हिंदुस्थान

संबंधानें ज्या बारा प्रश्नांचा विचार करण्याचें योजिलें आहे त्यांतलाच हा एक प्रश्न आहे असें त्यांनीं सांगितलें आहे, व आमची अशी आशा आहे कीं, तडकलेल्या भिंतीस गिलावा करण्याचा प्रयत्न न करतां ज्यांमुळें शेतकऱ्यांची भिंत तडकत चालली आहे तें कारणच ते नाहींसें करतील." (स्फुट, केसरी, ३ ऑक्टोबर १८९९.)

दुष्काळ-निवारणाचा खास उपाय

टिळकांच्या काळात महाराष्ट्रात जे दोन मोठे दुष्काळ झाले त्याचे निमित्त करून शेतकऱ्यांचे अनेक मूलभूत महत्त्वाचे प्रश्न त्यांनी सरकारपुढे मांडले. त्याच्यामागे लोकमत उभे केले. ते उग्र केले. प्रतिकाराची धग त्याला दिली. त्याची चर्चा पुढे येणारच आहे. परंतु भारतातील लोकसंख्येचा केवळ शेतीवर उदरनिर्वाह होणार नाही, त्याला जोडधंद्यांची जोड दिली पाहिजे, हा महत्त्वाचा मुद्दा या निमित्ताने टिळकांनी सतत मांडला. भारताचे इंग्रज हितचिंतक वेडरबर्न यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये हा विषय मांडला होता. टिळकांनी त्यास दुजोरा देताना पुन्हा एकदा आपले म्हणणे मांडले. टिळकांनी लिहिले होते, "इंग्रजांच्यासारख्या सुधारलेल्या राज्यकर्त्यांची तीस कोट प्रजा एक पावसानें डोळे वटारल्याबरोबर अन्नान्न दशेस लागते, याचा दोष प्रजेपेक्षां राज्यकर्त्यांकडेच अधिक आहे. पाऊस पडत नाहीं म्हणून दुष्काळ पडतो या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं व संपत्तीचा पुरवठा व वाटणी कशी होते, या संबंधानें अर्थशास्त्राचीं तत्त्वें ज्यांस यत्किंचित माहीत आहेत ते असल्या सबबी कधींहि ऐकणार नाहींत. एक वर्ष एखाद्या प्रांतांत पाऊस नाहीं पडला म्हणून काय झालें. रयत सुखवस्तु असून तिच्या अंगांत जरी कांहीं त्राण असेल तर आगबोट व आगगाड्यांनीं देशांत आलेलें धान्य विकत घेऊन लोक आपल्या प्राणांचें सहज संरक्षण करतील. दहा वर्षें काम करून एक वर्ष पुरेल इतकीहि शिल्लक लोकांजवळ पडत नाहीं हेंच दुष्काळ पडण्याचें खरें बीज आहे. इंग्रज सरकारच्या शहाण्या राज्यकर्त्यांच्या अमलांत रयतेस अशी स्थिति कां यावी याचा विचार होऊन ती स्थिति दूर करण्यास जे उपाय योजावयास पाहिजेत तिकडे सरकारनें आधीं लक्ष पुरविलें पाहिजे. हिंदुस्थानची जमाबंदी कांही लहान नाहीं. व जरूर लागल्यास सरकारांस या कामाप्रीत्यर्थ हलक्या व्याजानें लागेल तेवढें कर्जही मिळू शकेल. सरकारची इच्छा मात्र पाहिजे. इच्छा आहे तेथें उपायहि सांपडतो, अशी एक इंग्रजींत म्हण आहे. त्याप्रमाणें सरकारची इच्छा असल्यास हिंदुस्थानांतील दुष्काळाच्या कारणांचा परिहार लागणार नाहीं असें नाहीं, परंतु आमच्या दुर्दैवानें तशा प्रकारची उत्कट इच्छा सरकारास अद्याप झाली आहे असें दिसत नाहीं. तोपर्यंत गरीब व असहाय्य प्रजेच्या हातून दुष्काळांत दीनवाणें तोंड करून मरण्यापलीकडे कांही पुरुषार्थ होईल असें आम्हांस वाटत नाहीं...."

"शेतकीखेरीज हिंदुस्थानांतील लोकांस कांहीं धंदा राहिला नाहीं. पूर्वीचे व्यापारधंदे विलायती मालाच्या चढाओढींत सर्व बुडून गेले आणि लोकसंख्या तर इतकी वाढली कीं शेतकींतून सरकार सारा व कर मागून लोकांस वर्षभर पोटास पुरेल इतकीहि प्राप्ति होत नाहीं, मग दुष्काळाची गोष्ट तर राहू द्याच. अशी हिंदुस्थानची हल्लींची स्थिति आहे. अशा स्थितींत देशांतील लोकांस नवीन उद्योगधंदे काढून दिल्याखेरीज अथवा पूर्वीचे धंदे उर्जितावस्थेस आणल्याखेरीज दुष्काळ टाळतां येणार नाहीं, असा लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांच्या बोलण्याचा आशय होता." (केसरी, १० एप्रिल१९००.)

पाटबंधाऱ्यांचे प्रश्न

भारतीय शेतकऱ्याचे जीवन पावसावर अवलंबून असते. तेव्हा शेतीला नियमित पाणी कसे मिळेल ही त्याची नेहमीची काळजी असते. शेतकऱ्याची ही गरज पाटबंधाऱ्यांचे पाणी त्याला मिळत गेले तर भागेल. हा प्रश्न खर्चाचा असतो. त्याला तांत्रिक ज्ञानही लागते. तंत्रज्ञ लागतात. तेव्हा हा प्रश्न सरकारनेच हाती घेतला पाहिजे व त्यासाठी अवश्य तो खर्च केला पाहिजे, ही भूमिका टिळकांनी दुष्काळाच्या निमित्ताने सरकारपुढे मांडली होती. प्रजेचे हक्क, प्रजेच्या गरजा, प्रजेची दुःखे, गाऱ्हाणी व अन्याय हे सरकारपुढे वृत्तपत्राद्वारे मांडणे हाच लोकांचा आवाज उठविण्याचा मार्ग असतो. लोकमताला टिळकांच्या राजकारणात महत्त्व असल्यामुळे अशा लेखनाचा उद्देश दुहेरी असे. देशाच्या प्रश्नाची सार्वजनिक चर्चा घडवून लोकशिक्षण करणे व सरकारवर दबाव आणणे. या दृष्टीने टिळकांचे सर्व लेखन केलेले असे. त्यात पुनरुक्ती, पुनरुच्चार व पुनर्मांडणी असे. पण ती सहेतुक असे. घणाघाताने लोकमत घडविणे ही टिळकांची नीती होती. दुष्काळानंतर पाटबंधारे कमिशनसंबंधी टिळकांनी लिहिलेल्या लेखात हेच दिसून येईल.

"दुष्काळासारख्या प्रसंगांतून तरी त्यांचा (शेतकऱ्यांचा) हल्लींहून अधिक बचाव होणें शक्य आहे, व हे उपाय योजण्यास केवळ खर्चाचीच अपेक्षा असल्यामुळें तेवढा खर्च करून दुष्काळाचें स्वरूप प्रजेस हल्लींहून कमी भयंकर करावें अशी सरकारास विनंती करणें अगदीं वाजवी होय. या विशेष उपायांपैकी मुख्य एक उपाय म्हटला म्हणजे पाटबंधारे बांधणें व विहिरी वगैरें खणून पिकास पाण्याचा पुरवठा अबाधित होईल असें करून पर्जन्यावर हल्लीं शेतकीचें असलेलें अवलंबन कमी करणें हा होय. परंतु सरकारकडून पाटबंधाऱ्यांचे कामावर किंवा विहिरी खणण्यावर जितका खर्च व्हावा तितका खर्च अद्याप होत नाहीं. पब्लिक वर्क्स म्हणजे सार्वजनिक हिताचीं कामें करण्याकडे सरकारचे हातून दरवर्षी जो खर्च होतो त्यापैकीं बराच खर्च आगगाड्यांचे रस्ते तयार करण्यावर होतो. व पाटबंधाऱ्यांचे वाट्यास या खर्चाचा फारच स्वल्प अंश येतो. उदाहरणार्थ, गेल्या तीन सालांत म्हणजे १८९८, १८९९,

१९०० या सालीं सर्व हिंदुस्थानांत मिळून आगगाड्यांचें रस्ते करण्याकडे जवळ जवळ २६ कोट रुपये खर्च झाला. परंतु तोच पाटबंधाऱ्याचे कामावर सुमारें सव्वादोन कोटिच काय तो झाला. मुंबई इलाख्यापुरतें पाहिलें असतां हल्लीं एकंदरीनें फारच थोडी जमीन, कालवें, पाटबंधारे अगर खासगी विहिरी यांचे खालीं भिजत आहे असें दिसून येईल. शेतकीखात्याचे रिपोर्टावरून पाहतां एकंदर इलाख्यांतील ब्रिटिश हद्दींत जवळ जवळ आठ कोट एकर शेतकीची जमीन आहे. पैकीं सुमारें दोन कोट सत्तर लक्ष एकर जमिनींत पीक होतें. त्यापैकी फक्त सुमारें चौतीस लक्ष एकर जमिनींत पावसाखेरीज इतर पाण्यावर पीक होतें. " (केसरी, १९ नोव्हेंबर १९०१.)

शेतसाऱ्यातील अन्याय्य वाढ

इंग्रज सरकार व शेतकऱ्यांचे प्रश्न हा टिळकांच्या आर्थिक लेखनाचा महत्त्वाचा विषय होता. पण त्याला राजकीय असंतोषाची धार देण्याचा, शेतकऱ्यांना स्वतःच्या हक्कासाठी संघटित करण्याचा ते प्रयत्न करीत होते. दुष्काळ हे त्याचे प्रक्षोभक कारण असे. ते निमित्त असे. प्रजेची मने ब्रिटिश राज्याविषयी अस्वस्थ करणे, यावरच त्यांचा साऱ्या लिखाणाचा रोख असे. कोणताही प्रश्न निवडताना त्यातील प्रक्षोभकता ते जोखीत. सरकारी धोरणाचा काळजीपूर्वक अभ्यास करून, त्यांतील अधू अंगे शोधून त्याच्यावर चौफेर हल्ला करण्याची टिळकांची पद्धती होती. कोणत्याही लहानशा, क्षुल्लक वाटणाऱ्या प्रश्नाचे ते समर्थपणे राजकीय भांडवल करीत. त्यातून ते रान उठवीत. जमिनीचा सारा हा शेतकऱ्याच्या आर्थिक जिव्हाळ्याचा विषय. रत्नागिरी जिल्ह्यात वाढविलेल्या साऱ्याच्या निषेधार्थ त्यांनी १८९२ मध्ये 'हा सारा वाढविणें कीं जुलूम ?' हा लेख लिहिला होता. त्यांनी म्हटले होते, " जमिनीचा सारा वाढविणें हा एक उत्पन्न वाढविण्याचा मार्ग आहे, व जोपर्यंत जास्त सारा रयतेकडून निघत आहे तोपर्यंत सरकार आपण होऊन कांहीं एक करण्यास प्रवृत्त होणार नाहीं. जमिनीच्या मालकास केवळ जमीन वाहणाराकडून जास्त कोणताहि हक्क प्राप्त होत नाहीं व सर्व जमिनीची मालकी खुद्द सरकारकडेच आहे, हें तत्त्व जमीन महसुलाच्या कायद्यांत अगदीं गुपचूप व बेमालूम नमूद केलें आहे, त्यामुळें सरकार मागेल तेवढा सारा देऊन पाहिजे तर जमीन वापरावी, नाहींतर सोडून द्यावी, अशी आमच्या शेतकऱ्यांची स्थिति झाली आहे.' (केसरी, ८ नोव्हेंबर १८९२, स. टि. खंड ३, पान २८८.)

शेतसाऱ्याच्या वाढीसंबंधी आणखी एका अग्रलेखात टिळकांनी लिहिले होते, " शेतकरी लोकांची इंग्रज सरकारच्या राज्यात निकृष्टावस्था होण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकींच वारंवार वाढत जाणारा शेतसारा हें एक होय. ज्या गांवांत शेतकीवर उदरनिर्वाह करणारीं पूर्वी दहा-दहा माणसांचीं पन्नास कुटुंबे किंवा पाचशें माणसें होतीं तेथे आतां जवळ जवळ त्याच्या दुप्पट माणसें झालेली आहेत. आणि जमीन कांहीं

त्या प्रमाणानें वाढलेली किंवा सुधारलेली नाहीं. अशा स्थितींत सरकारनें दर तीस वर्षांनीं साऱ्याचें मान दुप्पट, तिप्पट किंवहुना पांच-सहापट वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे पहिल्या मोजणीच्या चुका दुरुस्त करणें नव्हे, तर शेतकऱ्यांनी आपल्या मेहनतीनें आणि खर्चानें पहिल्या मोजणीनंतर जें उत्पन्न वाढविलें असेल तें सर्व त्यांच्या कडून हिसकावून घेऊन त्यांची दुर्दशा करण्यासारखें होय. पहिल्या मोजणीच्या वेळीं जमिनी वरकस लागल्या होत्या, त्यांची सुधारणा या मोजणीच्या वेळीं त्यापैकीं पुष्कळ शेतजमिनी झालेल्या आहेत. पण ही सुधारणा ढगांतून पाऊस पडून किंवा सूर्याच्या उष्णतेनें आपोआप घडून आलेली नाहीं, अथवा सरकारनें कालवे, बंधारे बांधून किंवा अन्य तऱ्हेनें मदत करून घडवून आणलेली नाहीं. असें असतां सरकारनें फेरपहाणीच्या वेळीं कांहीं तरी सबबी लावून असल्या जमिनीवरील सारा वाढविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे गरीब लोकांनीं पोटासाठीं मेहनत करून संचित केलेल्या द्रव्याचा अपहार करण्यासारखेंच आहे. सरकारचें हें वर्तन अयोग्य आहे." (केसरी, २४ ऑक्टोबर १८९९, स. टि. खंड ३, पान ३०८.)

जमीन-मालकीचा प्रश्न

जमीन-मालकीचा शेतकऱ्यांचा हक्क सरकार हिरावून घेत आहे असा इशारा देणारा लेख टिळकांनी १९०१ मध्ये लिहिला होता. त्यावेळी लँड रेव्हेन्यू कोड दुरुस्त करण्याचे बिल सरकारने आणले होते. 'जमिनीची मालकी बुडाली' या लेखात सरकारचा हा अन्याय वेशीवर टांगताना टिळकांनी म्हटले होते, "हिंदुस्थानांत आजपर्यंत पुष्कळ राजे झाले; पण या देशांतील शेतकऱ्यांना निव्वळ उपरी कुळांची स्थिति आणण्याचा कोणीं प्रयत्न केलेला नव्हता. शेतकऱ्यांची उपजीविका जमिनीवर तर खरीच, पण 'माझी जमीन' म्हणून एक प्रकारचें आपल्या जमिनीबद्दल जें प्रेम त्याच्या ठायीं वसत असतें तें तो आपणास जमिनीचा मालक समजतो म्हणून होय. उत्तरोत्तर आमच्या इलाख्यांतील सर्व शेतकऱ्यांस मालकाच्या ऐवजीं मजूरदार बनविण्याचा सरकारचा इरादा आहे. आणि मौज अशी आहे कीं, हें सर्व कृत्य शेतकऱ्यांच्या कल्याणाकरितां आहे अशा झोंकावर व डौलावर त्याची मांडणी करण्यांत आली आहे." (केसरी, १८ जून १९०१, स. टि. खंड ३, पान ३१९ व ३२१.) असे सांगून या लेखात टिळकांनी 'प्रतिकाराच्या तयारीस लागा' असा लोकांना इशारा दिला होता. "हें जें संकट आलें आहे त्याच्या प्रतिकारार्थ ठिकठिकाणच्या लोकांनीं अर्जे करणें हा एकच मार्ग आहे." असे सांगून त्या विरोधाचे सूत्रवाक्यही त्यांनी सांगून टेवले होते. "जमिनीच्या बाबतींत लोकांच्या हक्कावर दरोडा पडून त्यांची मनें बेदिल न व्हावींत या धोरणानें खुद्द महाराणी सरकारांनीं १८५८ च्या जाहीरनाम्यांतहि 'जमिनीवरील प्रजेच्या सर्व हक्कांचें आम्ही यथायोग्य परिपालन करूं व

या बाबतींत नवीन कायदे करितांना आणि जुन्यांची अंमलबजावणी करितांना लोकांचे हक्क व त्यांच्या चालीरीति यांकडे पूर्ण लक्ष देऊं' असें स्पष्ट आश्वासन दिलें असल्यानें, हल्लीं सारखें बिल पुढें आणण्यांत मुंबई सरकारची राजनीति दृष्ट्या घोड्याएवढी चूक कशी होत आहे हेंहि पुण्याच्या अर्जांत स्पष्टपणें दाखविलें आहे." याच बरोबर मुंबई सरकारला त्यांनी इशाराही दिला होता की, "तेव्हां अशा स्थितींत प्रजापीडन–संतापापासून उत्पन्न होणारा अग्नि अधिक धुमसूं न देतां, राजाची लोभबुद्धि हाच प्रजेचा मुख्य शत्रु आहे, हें ध्यानात आणून हट्टास न पेटतां हल्लींचें बिल माघारें घेऊन मुंबई सरकार आपला शहाणपणा व मुत्सद्दीगिरी व्यक्त करील, अशी आम्हांस आशा आहे." (केसरी, २० ऑगस्ट १९०१, स. टि. खंड ३, पान ३५१–३५३.)

राज्यव्यवस्थेवर ठपका

दुष्काळांवर जेव्हा टिळक लिहीत त्यावेळी दुष्काळाची कारणे सांगताना शेतीच्या प्रश्नातील महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा तर करीतच परंतु इंग्रज सरकारची राज्यव्यवस्था, नोकरशाहीची बेफिकीर वृत्ती त्याला कारणीभूत होती हेही सांगण्यास ते विसरत नव्हते. दुष्काळाची कारणे स्पष्ट करताना टिळकांनी म्हटले होते, "हिंदुस्थानांतच दुष्काळामुळें कोट्यावधि लोकांची उपासमार कां व्हावी ह्याचा उलगडा झाला पाहिजे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें कारण सांप्रतची राज्यव्यवस्था होय. 'राजा कालस्य कारणम्' अशी जी संस्कृतांत म्हण आहे ती अक्षरशः खरी होय. सांप्रतच्या राज्यपद्धतीचें स्वरूपच असें आहे कीं, त्यामुळें रयत निवळ पिळून निघत असून, येथील संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे अव्याहत व जोरानें वाहात चालला आहे. तुंबडी लावून अंगांतील रक्त शोषून घेतलें असतां जसा निवळ हाडांचा पिंजरा शिल्लक राहातो, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व सत्व इंग्लंडकडे वाहत चाललें असून गुलामस्वरूपी पाण्याचीं पितरें मात्र येथें शिल्लक राहिलीं आहेत...जर खरी सहानुभूति असेल, शाब्दिक कळकळ दाखवून आमची थट्टा करावयाची नसेल, तर लष्कराचा खर्च कमी करा, हिंदुस्थानांतून इंग्लंडकडे वाहत चाललेल्या संपत्तीचा ओघ अंशतः तरी मागें फिरवा, आणि जमिनीचा सारा हलका करून रयतेची स्थिति सुधारा म्हणजे दुष्काळाच्या वेळीं रयतेचें हाल होऊं नयेत अशी तुमची इच्छा असल्याविषयीं लोकांची खात्री होईल." (केसरी, ८ मे १९००, स. टि. खंड ३, पान ४४७ व ४५०.)

शेतकऱ्यांच्या चळवळीची पूर्वतयारी

टिळकांच्या या शेतकीविषयक लेखांचे महाराष्ट्राच्या राजकीय चळवळीतील महत्त्व वर्णन करताना 'केसरी'ने ३१ जुलै १९२८ रोजी महाराष्ट्रात झालेल्या प्रचंड शेतकरी

परिषदेच्या निमित्त लिहिलेल्या अग्रलेखात म्हटले होते, "लोकमान्यांनीं शेतकऱ्यांच्या चळवळीविषयीं १९०१ सालीं जे विचार प्रकट केले त्यावरून त्यांना शेतकऱ्यांची चळवळ कशा प्रकारें व्हावयास हवी होतीं, हें दिसून येतें. न्या. रानडे व सार्वजनिक काका यांची चळवळ म्हणजे रयत व सरकार यांच्यांत मध्यस्थी करून रयतेच्या तक्रारी सरकारास कळविणें व सरकारकडून रयतेच्या हितार्थ सुधारणा घडवून आणणें इतक्यापुरतीच होतीं. सार्वजनिक सभा अशी मध्यस्थी करण्याच्या हेतूनेंच स्थापन झाली होती. लो. टिळकांनीं एक पाऊल पुढें टाकलें व जिल्ह्याच्या, तालुक्याच्या व खेड्यांच्या पुढाऱ्यांनीं लोकांस जागृत करून त्यांना आपले हक्क समजावून सांगावे व त्यांचेकडून चळवळ करवावी, आपल्या हक्कांचें संरक्षण कसें करावें हें त्यास शिकवावें अशा प्रकारची चळवळ सुरू केली व याच चळवळीची आणखी परिणती होऊन शेतकरी स्वतःच आपल्या हक्काला जपण्यास तयार होईल ही कल्पना त्यांना होती हें स्पष्ट दिसतें." सारांश, टिळकांचे हे सर्व लेखन म्हणजे शेतकऱ्यांच्या राष्ट्रीय चळवळीची नांदी होती.

शेतकऱ्यांतील जागृती

'केसरीं'तून त्याकाळी टिळक शेतकऱ्यांचे प्रश्न स्वतः तर मांडीत असतच, पण लोकांचे लेखही छापत असत. 'एक शेतकरी' या नावाने 'केसरी'त आलेल्या 'शेतकऱ्याची प्रार्थना' या लेखाचे उदाहरण देता येईल. शेतकऱ्याचे प्रश्न काय आहेत याची चर्चा करून शेतकरी सहाय्यकारी मंडळी काढण्यात 'केसरी'करांनी पुढाकार घ्यावा, अशी सूचना त्या लेखात करण्यात आलेली होती.

"(१) हिंदुस्थानांत लोकसंख्या आहे त्यांतील दर एक शंभरांत ८० पेक्षां जास्त संख्या फक्त शेतकऱ्यांचीच आहे, (२) शेतकरी वर्ग आमच्या महाराष्ट्रांत आहे त्याची स्थिति आजमितीला आहे ती येणेंप्रमाणें : (अ) शंभर शेतकऱ्यांत निदान चाळीस तरी आणि वर्षांतील चार महिने शुद्ध उपास काढीत असतो, (ब) शेंकडा पन्नास इतक्या शेतकऱ्यांस अंगभर कपडा कधींच मिळत नसतो. (क) शेंकडा साठ पासून सत्तर शेतकऱ्यांजवळ हवींत तितकीं आऊतांचीं जनावरेंच आधीं नसतात, (ड) शंभर शेतकऱ्यांपैकीं ऐंशीजण सावकाराजवळून जबरदस्त व्याजानें किंवा बाजारभावापेक्षां सवाईनें सवंग माल आगाऊ विकून सरकार-चावडी भागवीत असतात, (इ) शेंकडा नव्वद शेतकरी कर्जांत रुतलेले असे आहेत, (ई) आणि दर शंभरांत तीस तरी शेतें मेहनत मशागतीशिवाय पिकविली जातात व त्यामुळें राष्ट्रीय धान्योत्पादनांत तेवढी आणि सालोसाल खोट पडत जाते...."

"अशी सांप्रत आम्हां शेतकऱ्यांची स्थिति आहे. गेल्या पांच वर्षांत तीन दुष्काळ काढण्याचें आमच्या नशिबीं आल्यामुळें आम्हां शेतकऱ्यांची दुर्दशा झाली ती वर्णनहि

करतां येत नाहीं. आम्ही शेतकरी पुरेपुरे मोडकळीस आलो आहो. देव, सरकार आणि आमचे विद्वान देशबंधु या तिघांचा काय तो आधार आम्हां शेतकऱ्यांस असावयाचा परंतु देव तर आमच्यावर सर्वस्वीं कोपलेला. नाहींतर त्यानें पाऊस कां मुबलक व वेळेवर दिला नसता ? सरकार आमचे मायबाप पण त्यानें आम्हांस ऋणमुक्त करण्यासाठीं कायदा काढल्यानें आम्ही शेतमुक्त झालों आणि आतां जीवनमुक्त होण्याच्या मार्गावर लागलों आहे. आतां तर आमच्याच कल्याणासाठीं आम्हांस अपुरी कुळें व बिनमालकीचे गुलाम बनविण्याचा सरकारचा मोठ्या कळकळीनें प्रयत्न चालू आहे. जास्त बोलण्याची सोय नाहीं. पोटांत भडभडून येतें, पण बोलावें तरी कोणापाशीं ?

आम्हां शेतकऱ्यांना आमच्या पुढाऱ्यांमार्फत साह्य पाहिजे ते येणेंप्रमाणें :—

(अ) आऊतांच्या जनावरांचा पुरवठा, (ब) खावयास लागणारें धान्य उसनवार, (क) खुरपणें वगैरे किरकोळ खर्च, (ड) बांधबंधारे घालण्यासाठीं साह्य, (ई) विहीर–दुरुस्ती व खोदाई, (फ) सावकाराच्या देण्याची तर्तूद (ग) सरकारसाऱ्यासाठीं कुमक, (ह) आमचा माल खपविण्याची तजवीज (श) बी-बियाणांची मदत, (ज) आउतें, खत वगैरेंची माहिती, (के) कपडालत्ता.

अशा अकरा बाबींचे आम्हास साह्य देण्यासाठीं खर्चिलेली रक्कम तुमची तुम्ही परत घ्या, वर पाहिजे तर सारा मोबदला घेण्यालाहि कमी करूं नका, परंतु सावकार, व्यापारी यांच्या लुटींत आम्ही दहा रुपयांस नागविले जातो तर तुम्ही मंडळ्या स्थापून आमचें पांच रुपये तरी वाचवा, लहानसहान रकमांसाठी २० आणि २५ रुपये आम्ही व्याज भरतो, तेथें १२ पडतील असें तरी करा." (केसरी, दि. ९ जुलै १९०१.)

औद्योगिक पारतंत्र्याची कारणमीमांसा

टिळकांच्या आर्थिक लेखनात ब्रिटिश राज्यात झालेला औद्योगिक ऱ्हास, देशी उद्योगधंदे इंग्रजी राज्यात कसे रसातळास जात आहेत याची कारणमीमांसा, भारताने औद्योगिक पारतंत्र्य नाहीसे करून उत्कर्ष कसा साधावा याचे विवेचन, स्वदेशी उद्योग धंद्याचा विस्तार व स्वदेशी चळवळीचे औद्योगिकदृष्ट्या समर्थन, स्वदेशी औद्योगिक विकासाविषयीच्या कल्पना या सर्व विषयांचा उहापोह प्रामुख्याने केलेला आहे. याबाबत त्यांचे जे विचार होते तेही विखुरलेले व भाषणांत व्यक्त केलेले आहेत. पण त्यातील आधारसूत्रे निश्चित करता येतात. भारतीय आर्थिक राष्ट्रवादात " स्वदेशीला जे स्थान होते त्याचे कारण ती चळवळ केवळ नकारात्मक नव्हती. त्या चळवळीनें भारताच्या औद्योगीकरणाला सहानुभूति-सहाय्य देण्याचे व सरकारचे लक्ष वेधण्याचे महत्त्वाचे कार्य केले होते. म्हणून टिळकांनी एकदा म्हटले होते की, ' स्वदेशीचे व्रत गिऱ्हाईक निर्माण करते.' किंबहुना टिळक याहीपुढे जाऊन म्हणाले होते, " स्वदेशी हा परमेश्वरी आदेश आहे. मोठमोठ्या पगाराच्या जागा मिळविणें हा स्वराज्याचा अर्थ

नसून, देशांतील उद्योगधंदे वाढवून राष्ट्रीय संपत्तींत भर टाकणें हाच स्वराज्याचा खरा अर्थ आहे." हे भाषण कुर्ला (मुंबई) येथे दि. २३ डिसेंबर १९१९ साली म्हणजे आयुष्याच्या अगदी शेवटी केलेले आहे. (स. टि. खंड ६, पान ६६५.)

१९०६ साली 'स्वदेशी व आमचा व्यापार' या विषयावर बोलताना टिळकांनी आपल्या औद्योगिक सुधारणेविषयीचे एक सूत्र सांगितले होते. "विलायतेशीं टक्कर द्यावयाची तर ती विलायती साधनांनींच दिल्यावाचून आम्हांस यश यावयाचें नाहीं. आम्ही इकडे सगळीकडे गिरण्या उभारल्या पाहिजेत." हा औद्योगिक विकास करावयाचा असेल तर त्यास काय काय करावे लागेल याचेही सुबोध विवेंचन टिळकांनी या भाषणात केले होते. ते म्हणाले होते, "आमच्या कारागिरांत व साबकारांत त्यांच्या त्यांच्या धंद्याचें ज्ञान वृद्धिंगत झालें पाहिजे. आम्हांस परदेशांत देखील पेढ्या स्थापन कराव्या लागतील. जपाननें तसें केलें आहे. नव्या कल्पना, नवे शोध यांचें आपण पूर्ण ज्ञान संपादन करून त्याचा लाभ आमच्या देशाला करून दिला पाहिजे. ज्या ठिकाणीं व्यवस्थितपणें कारखाने निघून चालण्यास अडचणी येण्यासारख्या नसतात, अशा ठिकाणच्या कारखान्यांत भांडवल गुंतविण्यास मागेंपुढें पाहू नका," (स. टि. खंड ६, पान ६२० व ६२२.) या विवेचनावरून जपानचा आदर्श ठेवून स्वावलंबी, आधुनिक, औद्योगिक उन्नती हे टिळकांचे ध्येय होते, हे स्पष्ट होते.

टिळकांनीं "औद्योगिक पारतंत्र्य' याविषयी १८९४ मध्ये लिहिलेल्या लेखात इंग्रजी राज्याने आम्ही कसे परावलंबी झालेलो होतो, याचे विवेचन केले होते. त्यांनी लिहिले होते, "इंग्लिश लोकांचे राज्य येथें स्थापन होण्यापूर्वी आपल्या देशांत आपल्यास लागणारे सर्व जिन्नस आपण उत्पन्न करीत होतों...हल्लीं आमचे लोक नुसता कच्चा माल उत्पन्न करण्याचे मात्र अधिकारी होऊन बसले आहेत. पक्का माल सर्व पश्चिमेकडून येत आहे. आणि यामुळें आम्हांस सर्वस्वीं परकीयत्व प्राप्त झालें आहे. इंग्लिशांस अमुक हक्क आहेत ते आपल्यास नाहींत म्हणून आपण धडपडतों, आपल्यास वाटेल तसा व्यवहार करितां येत नाहीं म्हणून चरफडतों आणि त्याबद्दल आक्रोशहि करितों. पण आपण सर्वदा लंगडे होऊन ज्याच्या योगानें आपल्या कर्तृत्वाचे सर्व अवयव लटके पडत चालले आहेत, व जे अनावर झाले असतां आपल्या नाड्या आंखडण्यास फारशी दिवसगत लागावयाची नाहीं, तें औद्योगिक पारतंत्र्य व ह्या पारतंत्र्याचें पूर्ण स्वरूप यांची ओळख आपण करून घेत नाहीं आहों. या कारणानें ही पारतंत्र्यरूपी बेडी आपल्यास विशेषच जखडीत चालली आहे, ही गोष्ट मात्र दुःसहतर होय. तेव्हां आपण याहि पारतंत्र्याच्या चक्रामध्यें सांपडलों आहों. हें जितकें लवकर समजेल तितकें जास्त चांगलें." (स. टि. खंड ३, पान ६८२–६८३.) टिळकांना आंद्योगिक पारतंत्र्याची जाणीव वाढवून राष्ट्रीय चळवळीस आणखी बळ द्यावयाचे होते व दिशा द्यावयाची होती. याहीबाबत न्या. रानडे ह्यांनी जे देशाला मार्गदर्शन सुरू केले होते,

त्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना टिळकांनी म्हटले होते, " रा. ब. रानडे हे हिंदु समाजास व विशेषतः विद्वद्वर्गास आपल्या अपरंपार विद्या संग्रहानें, पोक्त आणि दूरदर्शी विचारांनीं आणि शुद्धाचरणानें वंदनीय झाले आहेत, हें आमच्यासारख्यांनी सांगावयास नको आहे. त्यांचे विचार सर्व काळीं आम्हांस पसंत पडतात अशी जरी दुर्दैवानें आमची स्वतःची स्थिति नाहीं, तथापि बहुतेक प्रसंगीं शेंकडा नव्व्याण्णव असेंदेखील आम्ही म्हणू शकतों, त्यांचे विचार व त्यांची भाषणें आदर करण्याजोगीं व अमलांत आणण्याजोगीं असतात. हें आम्हीं मोठ्या आनंदानें कबूल करितों. त्यांच्या नेहेमीच्या पद्धतीप्रमाणें ' हिंदुस्थानचे कारखाने ' हा निबंध पोक्त विचारांनीं ओतप्रोत भरलेला आहे. " (स. टि. खंड ६, पान ६८३.) औद्योगिक बाबतीत भारत व युरोप यांच्या स्थितीचे तुलनात्मक वर्णन करताना टिळकांनीं याच लेखात म्हटले होते, " आमची जमीन, आमचे हात व आमचें डोकें हे आमचे सारथी आणि युरोपियन लोकांकडे पाहिल्यास त्यांच्या लगामी उष्णता, विद्युत्, रसायन, वाष्प, मरुत् इत्यादी महान् महान् दिव्य राक्षस लागले असून, त्यांच्या सहाय्यानें युरोपियन लोकांचे हात, पाय, डोकें व डोळे इत्यादि अवयव फारच मोठाले झाले आहेत. तेव्हा आम्हांस उद्योगाच्या रणभूमीवर उभें ठाकावें लागत आहे तें नुसत्या मानवी शक्तीच्या जोरावर हें प्रथमतः लक्षांत आणलें पाहिजे. " (केसरी, २५ सप्टेंबर १८९४, स. टि. खंड ३, पान ६८४.)

उद्योगधंदे कसे ठार झाले ?

टिळकांनी इंग्रज सरकारवर जी औद्योगिक बाबतीत टीका केली होती त्यात भारतातील उद्योगधंदे त्यांनी ठार केले, इंग्लंडमधील कारखानदारांना उत्तेजन देण्यासाठी तेथील सरकार कसे अन्याय धोरण आखते व भारतातील औद्योगिक विकासाकडे कसे दुर्लक्ष करते हे तीन मुद्दे प्रामुख्याने असत. ब्रिटिश वसाहतवादी अर्थव्यवस्था हाच भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाला प्रखरता देणारा, साम्राज्यासंबंधी चीड उत्पन्न करणारा मुख्य मुद्दा असे.

विणकामाच्या धंद्याचे उदाहरण देऊन इंग्रज सरकारची घातकी नीती टिळकांनी स्पष्ट केली होती. त्यांनी म्हटले होते, " गेल्या शंभर वर्षांत आमच्या देशांतील विणकामाचा धंदा बुडालेला आहे. कोणी बुडविला म्हणाल तर, आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांनींच होय. आणि आमचें असें म्हणणें आहे कीं तो त्यांनीं जाणूनबुजून बुडविलेला आहे. विलायतेंत अद्याप कापसाचे एक बोंडहि पिकत नाहीं....वाफेचा माग जेव्हां विलायतेस निघाला तेव्हां त्याची माहिती इकडच्या लोकांस देऊन त्याचा प्रसार या देशांत करणें हें या सरकारचें कर्तव्य होतें, पण ती गोष्ट जाणूनबुजून त्यांनीं केली नाहीं म्हणून बहिष्कार-योग अवलंबन करण्याची आज लोकांस जरूर वाटू लागली आहे. "

(केसरी, १४ नोव्हेंबर १९०५, स. टि. खंड ३, पान ७०२ व ७०४.)

ब्रिटिश राजनीती कापडाच्या धंद्याबाबत इंग्लंडमधील कापड–कारखानदारांच्या कशी कह्यात गेलेली होती, कापडावर कर बसविण्यात तेथील स्टेट सेक्रेटरीवर मँचेस्टर कारखानदारांनी कसा दबाव आणला होता, त्याची हकीकत त्यावेळी 'केसरी' च्या ९ जानेवारी १८९५ च्या अंकात अग्रलेखात दिली होती. त्यावरून इंग्रजी राजनीती व आर्थिक धोरण कसे परस्परसहाय्यक होते, हे दिसून आले होते. त्या लेखात म्हटले होते, "आयातमालावर जकात बसूं लागली तेव्हां म्यांचेस्टारवाल्यांमध्ये मोठा हाहाकार उसळून गेला. आयातमालापैकीं ४० टक्के म्यांचेस्टरचें कापड व त्यावर ५ टक्के कर बसला कीं इंग्रजी गिरणीवाल्यांचें नुकसान होणार. आधींच देशी गिरण्यांच्या चढाओढीनें चीन, जपान व थोडाबहुत हिंदुस्थान येथें म्यांचेस्टरचा माल कमी खपू लागला होता व त्यांत ही जकातीची भर पडली कीं म्यांचेस्टरवाले ठार बुडालेच म्हणावयाच. इंग्रज लोक हिंदुस्थानांत आले ते व्यापाराकरितां, राज्य मिळविलें तेंहि व्यापाराकरितां, व हल्लीं एवढा राज्यभार शिरीं वाहण्याचा त्यांनीं पत्कर घेतला आहे तोहि आपल्या स्वदेशीयांच्या व्यापारवृद्धिसाठींच. असें असतां सर्व इंग्रजी व्यापारांत अग्रगण्य जे म्यांचेस्टरचे गिरणीवाले त्यांच्या पायावर धोंड पाडणारा कायदा हिंदुस्थान सरकारानें करूं लागावें हें त्यांचें केवढें साहस. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशासारखेंच हें वर्तन आहे. असें म्यांचेस्टरवाल्यांस साहजिकपणें वाटू लागलें व त्यांनीं तावडतोब स्टेट सेक्रेटरीस गळ घालून त्याजकडून आयातमालावर जकात बसावयाची असेल तर म्यांचेस्टरचें कापड त्यांतून वगळलें पाहिजे असा हिंदुस्थान सरकारास सक्त हुकूम फर्माविला. स्टेट सेक्रेटरीला म्यांचेस्टरच्या कारखानदारांची इतकी भीड कां पडावी अशी प्रथमदर्शनीं शंका येते. पण तिचें उत्तर थोडें आहे. हल्लींच्या लिबरल पक्षाकडे ल्यांक्याशायर येथील कमींत कमी पन्नास सभासद आहेत, व म्यांचेस्टरच्या व्यापाऱ्यांस नाखूष करणें म्हणजे या सभासदांचा विरोध संपादन करून तेवढीं मतें आपल्याकडून उलटपक्षाकडे घालविण्यासारखें होतें. यामुळें स्टेट सेक्रेटरीला आली पंचाईत. कापडावर जकात बसवूं द्यावी तर आपलीं पन्नास मतें जाऊन प्रधानमंडळ कमजोर होतें, आणि न द्यावी तर हिंदुस्थानच्या तिजोरींतील तूट कशी भरणार?" (केसरी, १ जानेवारी १८९५.)

धंदेशिक्षण व तंत्रविज्ञान

उद्योगधंद्यांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा आणखी एक विषय आधुनिक तंत्रविज्ञान व त्याचे शिक्षण. टिळकांना विलायतेशी विलायती साधनांनीच टक्कर द्यावयाची होती. कापडधंदा व साखरकारखाने यांचे आधुनिक तंत्र आपण मिळविले पाहिजे, याचा आग्रह त्याचसाठी ते धरत. मोठे व लहान उद्योग यांच्या तांत्रिक गरजा वेगळ्या

असतात, पण दोन्हींच्या गरजा भागविणारे तांत्रिक शिक्षण मिळाले पाहिजे, पिढीजात धंद्यांचे आधुनिकीकरण झाले पाहिजे, असा टिळकांचा महत्त्वाचा मुद्दा होता. त्यांनी लिहिले होते, " हिंदुस्थान देशांत पूर्वी जे जिन्नस तयार होत होते ते बहुतेक सर्व आतां परदेशांतून येऊ लागले आहेत, आणि ते परदेशांत ज्या पद्धतीनें तयार होतात त्या पद्धतीचें ज्ञान आमच्या कारागिरांस झाल्याखेरीज आमच्या देशांतील धंदे पुन्हा कधींहि उर्जितावस्थेला यावयाचे नाहींत. ही गोष्ट निर्विवाद आहे. " तसेच प्रथम देशाची औद्योगिकदृष्ट्या पहाणी केली पाहिजे, हे सांगताना टिळकांनी म्हटले होते, " देशांतील कच्चा माल बाहेर किती व कोणत्या प्रकारें जातो आणि तिकडे त्याचें कोणत्या प्रकारच्यें रूपांतर होऊन तो आपल्या देशांत परत येतो याची पहिल्यानें पुरी चौकशी झाली पाहिजे. अशी चौकशी झाल्याखेरीज कोणत्या ठिकाणीं कोणता नवा धंदा करतां येईल हें सांगतां यावयाचें नाहीं...कोणत्या प्रांतांत किंवा जिल्ह्यांत कोणत्या प्रकारचा कच्चा माल तयार होतो किंवा मिळतो व त्याचे काय काय पदार्थ तयार करता येतात, याची पहाणी सरकारनें आधीं केली पाहिजे. अद्याप कोणत्याहि इलाख्यांत अशा प्रकारची औद्योगिक पहाणी झालेली नाहीं...ठरीव औद्योगिक उन्नति होण्यास ज्या गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे त्या गोष्टी करण्यास सरकार तयार नाहीं. " (केसरी, २६ जानेवारी १९०४, स. टि. खंड ३, पान २०८–२०९.) भारतातील १० विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन औद्योगिक शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णय १९०५ मध्ये हिंदुस्थान सरकारने घेतला. त्याचे निमित्त करून टिळकांनी उद्योगधंद्यांविषयी सरकारी धोरण कसे असमाधानकारक आहे, हे पुन्हा लिहिले होते. त्यातही जपानचा आदर्श त्यांच्यापुढे होताच. त्या लेखात त्यांनी म्हटले होते, " राज्यकारभाराच्या इतर बाबतींत सुधारणा करण्यास जो पैसा हिंदुस्थान सरकार आतां खर्च करणार तोच उद्योगधंद्यांच्या सुधारणेकडे पहिल्यानें लावणें इष्ट आहे. जपान आपला पैसा याच प्रकारें खर्च करीत आहे व जपानचें उदाहरण आमच्या म्हणण्याची सत्यता पूर्णपणें सिद्ध करीत आहे. हिंदुस्थान सरकारचे डोळे मात्र अद्याप पुरे उघडले नाहींत, त्यास इलाज नाहीं. दहा स्कॉलरशिपा ठेवण्यापुरते तरी ते किलकिले झाले आहेत याचेच सध्यां समाधान मानून घेतलें पाहिजे. देशांतील उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करणें हे कांहीं लहान सहान काम नव्हे. पोलिसांची सुधारणा करण्याकरितां जो पैसा खर्च करावयाचा त्यापेक्षा तोच पैसा उद्योगधंद्यांच्या उत्तेजनास लावला तर त्यापासून देशांतील लोकांचें अधिक हित होईल हे निर्विवाद आहे. देशांतील लोकांजवळ संपत्ति झाली तर मग ती रक्षण करण्यास पोलिसांचा उपयोग. पण संपत्तीचाच ऱ्हास होऊ लागला तर पोलिसांची सुधारणा झाली काय आणि न झाली काय, सारखीच ! ..."

" आजपर्यंत या औद्योगिक बाबतींतले सरकारचे औदासिन्यच आमचे धंदे बुडण्यास कारणीभूत झालें आहे; आणि यापुढें उद्योगधंद्यांची उन्नति व्हावयाची असेल तर ती

सरकारनें आपण होऊनच केली पाहिजे. किंवहुना हें त्याचें कर्तव्य आहे असें आम्हीं समजतों. आणि या बाबतींत जो लहानसा आरंभ आज सरकारनें केला आहे तोच पुढें अधिक वाढून जपानप्रमाणें हिंदुस्थानदेशहि उद्योगधंद्यांत पुढें सरसावेल, अशी आम्हांस उमेद आहे. जपानी लोकांइतकें बुद्धीचें व शरीराचें सामर्थ्य आम्हांमध्यें आहे, आणि आमचे राज्यकर्तेहि जपानी राज्यकर्त्यांपेक्षां अधिक सुधारलेले आणि शहाणे आहेत. तेव्हां जपानपेक्षां जास्त नाहीं तरी जपानइतकी उद्योगधंद्यांची सुधारणा येथें होण्यास हरकत नाहीं. आमच्या सरकारनें परकीपणा मात्र सोडला पाहिजे म्हणजे झालें. हल्लीचा सरकारचा उपक्रम चांगला आहे. आता पुढें स्थानिक सरकारच्या हातांत जी तजवीज करावयाची राहिली आहे ती जर नीट झाली तर यापासून देशाचें पुढेंमागें पुष्कळ हित होईल, अशी आम्हांस आशा आहे." (केसरी, २ फेब्रुआरी १९०४, स. टि. खंड ३, पान २१२ व २१५.)

आर्थिक विचाराचे राष्ट्रवादी स्वरूप

इंग्रजी राजनीती ही आर्थिक पिळवणूक करणारी व इंग्रजी नोकरशाही व कारखानदार यांच्यासाठी व्यूहरचना करणारी नीती आहे, हे सांगणे हेच त्यावेळी राष्ट्रहिताने प्रेरित झालेल्या राष्ट्रीय विचारवंतांचे उद्दिष्ट होते. त्यामागे वर्गीय वा आर्थिक तत्त्वज्ञानाची दृष्टी नव्हती. समान शासनामुळे निर्माण झालेले समान राजकीय हित व त्यातून आलेले वसाहती अर्थकारण यामुळे ही आर्थिक हिताची जाणीव निर्माण झालेली होती. शोषितांचे, अर्थपीडितांचे समान दुःख हीच त्यामागची प्रबळ प्रेरणा होती. न्या. रानडे, रमेशचंद्र दत्त आदींनी भारताच्या आर्थिक ध्येयांना व्यापक राष्ट्रीय बैठक दिली. आधुनिक दृष्टिकोण दिला. राष्ट्रीय सभा, सार्वजनिक सभेसारख्या प्रादेशिक व स्थानिक सभा या संस्थांनी त्याला पद्धतशीर स्वरूप दिले. टिळकांसारख्या नेत्यांनी या आर्थिक गाऱ्हाण्यांमागे, विचारांमागे लोकांची शक्ती उभी केली. सामाजिक जाणीव जोपासली. त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. राष्ट्रीय पातळीवर लोकांना समजेल अशा सुगम भाषेत टिळकांनी त्याला वादविवादाचे स्वरूप दिले. इंग्रजी नोकरशाही व सरकार यांना युक्तिवादाने, लोकसामर्थ्याने पेचात पकडले. इंग्रजी भांडवलदार, राजकारणी लोक व नोकरशाही ही आर्थिक पिळवणुकीच्या बाबतीत कशी एकच आहेत, हे सतत लोकांना सांगितले. दादाभाई नौरोजी व ना. गोपाळराव गोखले यांच्यासारख्यांनी इंग्लंडमधील जनतेला भारताच्या द्रव्यशोषणाची, दारिद्र्याची कहाणी सतत सांगितली. टिळकांनी स्वदेशी, औद्योगिक उन्नती व बहिष्कार यांचे परस्परसंबंध सतत जोडून राष्ट्रीय आकांक्षेशी, स्वातंत्र्याच्या आंदोलनाशी आर्थिक राष्ट्रवादाचा संबंध जोडला. टिळकांची याविषयीची व्यूहरचना कशी होती हे स्पष्ट करताना एकदा तेच म्हणाले होते, "हल्लीचे मोठें संकट गाढ दारिद्र्य आहे, त्यांतून सुटण्याचा उपाय

सांगणें हे हल्लीचें मुख्य कर्तव्य आहे. हें दारिद्र्य, उपासमार काढून टाकण्यासाठीं स्वदेशी चळवळ सुरू झाली आहे. आमच्या देशाला विघातक असें जें सरकारचें धोरण आज अनेक वर्षांपासून या देशांत चालू आहे याची प्रगति अडविणें हें स्वदेशीचें मुख्य काम होय. हें एक शस्त्र आहे....आजची स्वदेशी चळवळ अधिक व्यापक आहे. फक्त म्यांचेस्टरचीं धोतरें बंद करण्यापुरती आजची चळवळ नाहीं. तर आम्हांस गोऱ्यांचे सर्व हक्क मिळावेत व त्यांनीं ते न दिल्यास त्यांजकडून आम्हीं अडवून घ्यावे म्हणून आजची स्वदेशी चळवळ निघालेली आहे. आमच्या जुन्या-नव्या उद्योगधंद्यांना जर कायमचें ऊर्जित स्वरूप यावयाचें असेल तर कर बसविणें, वसूल करणें व खर्च करणें वगैरे कांहीं बाबी आपल्या हातीं बऱ्याच अंशानें आल्याबाचून तसें होणें शक्य नाहीं." ('स्वदेशींतून स्वराज्य,' स. टि. खंड ६, पान ६२५ व ६२७.) भारताच्या आर्थिक राष्ट्रवादाचे उद्दिष्ट, दिशा व व्यूहरचना यांचे सुस्पष्ट निवेदन टिळकांच्या या उद्‌गारात सामावलेले आहे.



५

६

भारतातील लोकयुगाचा तत्त्वविचार

टिळकांच्या राजकीय जीवनाची 'लोक' हीच आद्य प्रेरणा होती. टिळकांच्या सर्व राजकीय चिंतनात, तत्त्वविचारात व प्रत्यक्ष केलेल्या लढ्यांत लोक आणि लोकमत यांनाच महत्त्व होते. 'ब्रूट फोर्स' हा शब्द वापरण्यावरून श्री. गोपाळराव गोखले यांच्याशी टिळकांचा जो वाद झाला त्यात टिळकांनी म्हटले होते, "आमच्या मतें 'लोकमत' हें आमचें आद्य दैवत होय, अंतिम दैवत नव्हे. आमच्या बंधूंचा व आमचा मुख्य भेद आहे तो हाच होय." 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या प्राचार्य गोळे यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या परीक्षणासाठी व परिचयासाठी टिळकांनी एकूण ७ लेख लिहिले होते, त्यांत त्यांनी हाच दृष्टिकोण मांडलेला होता. ब्राह्मणांनी अहंकार न बाळगता सामान्य जनतेशी समरस झाले पाहिजे, त्यांच्यात मिसळले पाहिजे असे टिळकांनी त्यात म्हटले होते. "इंग्रजी विद्येनें ब्राह्मणांच्या अंगीं जो विनाकारण अहंपणा उत्पन्न झाला आहे तो त्यांनीं सोडला पाहिजे. सर्व प्रकारच्या, सर्व दर्जाच्य सर्व जातींच्या लोकांत मिसळून किंवहुना त्यांच्यांत व त्यांच्याप्रमाणें राहूनहि त्यांनीं आपली स्थिति कशी सुधारावी, हे त्यांस आम्हीं समजावून दिलें पाहिजे. हे लोक पशु आहेत. म्हणून त्यांचा तिरस्कार करणें कांहीं पुरुषार्थ नाहीं, त्यांचा व आमचा गळा एके ठिकाणीं बांधलेला आहे; व अखेरीस आम्हांस जर कोणी तारणार किंवा मारणार असला, तर हेच तारतील किंवा मारतील...खिस्ती मिशनरी लोकांस कुळंब्या-माळ्यांत अगर महारापोरांत मिसळण्यास जर लाज वाटत नाहीं, तर आमच्या सुशिक्षित तरुण लोकांस ती कां वाटावी हें आम्हांस धळत नाहीं. लोकांत मिसळणें,

त्यांना त्यांच्या हिताच्या गोष्टी समजावून सांगणें, परदेशांत जाऊन म्हणा अगर स्वदेशांत राहून म्हणा जेणें करून आपलें कल्याण होईल त्या सर्व गोष्टी घडवून आणण्याचा प्रयत्न करणें, आशा न सोडतां यावज्जीव एकसारखी दूरदृष्टि ठेवून उद्योग करणें आणि सर्वांस पुढें घेऊन जाणें, हा खऱ्या देशहिताचा मार्ग आहे." (केसरी, २८ जुलै १८९६, स. टि. खंड ५, पान ६८०–६८२.) सुशिक्षित वर्ग व सामान्य लोक यांच्या विचारांत व मनात अंतर वाढत चालले आहे, ते अत्यंत अपायकारक आहे, असा इषाराही टिळकांनी इंग्रजी शिकलेल्यांना दिला होता. टिळकांच्या या लोकप्रेमाला तत्त्वविचाराची बैठक होती. ती आध्यात्मिकही होती आणि राजकीयही होती.

लोकसंग्रहाचे तत्त्वज्ञान

टिळकांच्या या लोकनिष्ठेचा आत्मिक विचार त्यांनी 'गीतारहस्या'त स्पष्ट केला आहे, असे म्हणावयास हरकत नाही. त्यातील 'संन्यास व कर्मयोग' या प्रकरणात म्हटले आहे, "ज्ञानी पुरुष हे लोकांचे डोळे होत, आणि ते जर आपलें काम सोडतील तर जग आंधळें होऊन लोकांचा सर्वतोपरी नाश झाल्याखेरीज राहाणार नाहीं. ज्ञानी पुरुषांनींच लोकांना ज्ञानी करून उन्नतीस आणलें पाहिजे. स्वतःच्या आत्म्याचें जें कल्याण त्या आत्म्याच्या कल्याणार्थ यथाशक्ति झटणें याचाहि समावेश होत असल्यामुळें लोकसंग्रह करणें हेच ब्रह्मात्मैक्यज्ञानाचें खरें पर्यवसान होय. चातुर्वर्ण्य व्यवस्थेप्रमाणें प्राप्त झालेली आपली कर्मे निष्काम बुद्धीनें कशीं करावीं याचा प्रत्यक्ष लोकांना धडा घालून देणें असा 'लोकसंग्रह' या गीतेंतील पदाचा अर्थ होतो. टिळकांनी समर्थ रामदासांची कामगिरी वर्णन करताना म्हटले होते, "देश व देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्वप्रकारें धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों. आज जन्मलेल्या हजारों लोकांचा आत्मा व माझा आत्मा भिन्न नाहीं. सगळ्या मनुष्यांचा आत्मा एकच आहे. तो मीच आहे. मी तो आहे हें ओळखणारा अधिक तत्त्वज्ञ व देशाचा अधिक हितकर्ता आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. जे आपल्या देशाकडे पाहात नाहींत, आपले हजारों देशबांधव विपन्नावस्थेंत असतां जे नाक धरून घरांत बसतात ते ढोंगी आहेत. अशा प्रकारची बुद्धि उत्पन्न करावी लागते. राष्ट्र जिवंत होण्याची वेळ येते तेव्हां या तत्त्वाची ओळख करून घ्यावी लागते." टिळकांच्या राष्ट्रीय उत्थानाच्या, लोकजागृतीच्या व लोकशिक्षणाच्या ध्येयवादाचे हे आध्यात्मिक अधिष्ठान होते, असे यावरून स्पष्ट अनुमान काढता येते.

राजकीय संकल्पना – 'लोकमत'

टिळकांच्या तत्त्वविचारात 'लोक आणि लोकमत' या संकल्पनांना प्राणभूत महत्त्व

होते. भारताच्या राजकारणात लोकांना जागृत करून लोकमत प्रभावी करून सत्तेचा गुरुत्वमध्य त्यांनी राजसत्तेकडून लोकमताकडे नेला, हे त्यांचे ऐतिहासिक कार्य होते. ब्रिटिश शासनाखाली प्रथमच राजकीय व शासकीय दृष्ट्या एकत्रित आलेल्या भारतीय जनतेला टिळकांनी राजकीय व्यक्तित्व मिळवून दिले. भारतीय जनतेचा आवाज त्यांनी सतत वृत्तपत्रांत, न्यायालयांत, सभासम्मेलनांत, खुल्या व्यासपीठावर घुमविला. असे करण्यामागे टिळकांची तर्कनिष्ठ विचारसंगती होती. टिळकांनी ब्रिटिश राज्याचे फायदे सांगताना म्हटले होते की, "आमच्या देशाला सध्यां नवा मनु मिळाला आहे. त्यामुळें सर्व प्रकारें नव्या वळणाचे प्रकार सुरू झाले आहेत व नव्या वळणाचे प्रकार सुरू झाले म्हणून हक्काच्या नव्या नव्या बाबी आणि ते संपादण्याचे नवे नवे प्रकारहि अमलांत आणावे लागत आहेत. त्याबद्दल जर कोणी मागील काळच्या वर्तणुकीचा किंवा स्थितीचा दाखला देऊन आमच्या प्रयत्नांचा प्रतिकार करील तर आमच्या मतें तो खचित दोषी होईल. असो, साधारण मनुष्याला सुद्धां जर खुद्द सरकारला बरोबरीच्या माणसांप्रमाणें आपल्या मनांतील शंका किंवा आपणांस रास्त वाटत असलेल्या गोष्टींबद्दलची मागणी करितां येते व प्रसंगविशेषीं जाबहि घेता येतो तर पाश्चिमात्य शिक्षणांच्या योगानें व तद्द्वारां परिचित झालेल्या अनेक इतर प्रकारांमुळें आम्ही राजकीय हक्कांची मागणी केली, राजकीय व्यवस्थेचा विचार करू लागलों व राजकीय सुखाभिलाषाकडे आमच्या मनाची साहजिक प्रवृत्ति होऊ लागली तर त्यांत विशेषसें नवल नाहीं. सारांश, सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येकाच्या डोक्यांत राजकीय विचार घोळूं लागतील व राजकीय सुधारणेप्रीत्यर्थ प्रयत्न करण्याची त्याला हांव सुटेल तर त्यांत गैर नाहीं. आम्हांला राज्यकारभारांत घ्या, आमची सल्लामसलत ऐका, तुमच्यांतले हे दोष काढा, अमुकांचा संग्रह करा, अमका कर हवा आणि तमका नको, येथे तुम्ही चुकतां, तिकडे तुमचें लक्ष पोहोचत नाहीं इत्यादि गोष्टी उघडपणें सरकारांस सांगण्याचा आमचा हक्क आहे. हें तत्त्व आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांस कबूल आहे व त्याप्रमाणें प्रजेचें म्हणणें ऐकावयास मिळण्याची त्यांनीं आपणहून प्रजेस साधनें दिलीं आहेत. वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य आणि उच्च शिक्षणाच्या सोयी यांचा मुख्य हेतु हाच आहे."

सारांश, इंग्रजी राज्यपद्धतीतच राजा व प्रजा असे दोन राजकीय घटक अंतर्भूत आहेत, हे गृहीत धरून टिळक भारतीय राजकारणात लोकांचे हक्क, लोकमत, लोकहिताकडे लक्ष देणारा राज्यकारभार, लोकहिताचे संरक्षक सरकार यांचा पुरस्कार करू लागले होते. राजा व प्रजा अशी ही वाटणी होती. राजाचे सार्वभौमत्व टिळक नाकारीत नव्हते, पण ते मान्य करून लोकांसाठी हक्क-संपादनाचे कार्य करू इच्छीत होते. प्रजेचा कैपक्ष घेणारे नेते म्हणून स्वतःचे नेतृत्व उभारीत होते. उपलब्ध असलेल्या वृत्तपत्रे व शिक्षण या दोन साधनांचा त्यासाठी उपयोग करावयाचा व लोकमताची

उठावणी करावयाची, हे टिळकांनी टाकलेले पहिले पाऊल होते. कांग्रेसला लोकाभिमुख करणे व तिला लढाऊ राजकारण करावयास भाग पाडणे व तिला प्रजेच्या हक्कांची सनद देण्यास भाग पाडणे ही त्यांची दोन उद्दिष्टे होती.

'जनतेला कांहीं हक्क असतात, ते शांततेनें मिळविणें आतां शक्य होणार आहे व प्रजेची ही नवीन राजकीय अवस्था आहे. ही हिंदुस्थानांत पूर्वी कधींहि नव्हती, आतां ती निर्माण झाली आहे. तसेंच कायद्याचें राज्य, लेखन-स्वातंत्र्य, स्वातंत्र्याची अभिरुचि हीं इंग्रजी राज्याचीं वैशिष्ट्येंच असून राजकारणाचा घाट कसा बदलला आहे, हे टिळकांनी स्पष्ट केले होते. पुढें टिळकांनी व्हिक्टोरिया राणीच्या राजवटीच्या हीरकमहोत्सवानिमित्त जी लेखमाला लिहिली, तीत इंग्रजी राज्याचा आढावा घेऊन भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून त्याचे वर्णन केले होते. त्यांनी लिहिले होते, "राणीसरकारचें आमच्यावरील असलेलें खरोखरीचें प्रेम १८५८ सालच्या त्यांच्या जाहीरनाम्यावरून चांगलें सिद्ध होतें. या जाहीरनाम्याच्या पहिल्या मसुद्यांत 'हिंदुस्थानांतील प्रजेच्या रीतिभातींत किंवा धर्मांत फरक करण्याचा राणी सरकारचा अधिकार आहे,' अशा अर्थाचे शब्द होते. पण हा कागद जेव्हां राणीसाहेबांकडे गेला तेव्हां या शब्दांबद्दल आपली नापसंती प्रदर्शित करून त्यांनीं आपले मुख्य प्रधान लॉर्ड डर्बी यांस असें लिहिलें कीं, हा जाहीरनामा लॉर्ड डर्बी यांनीं आपल्या उत्तम भाषेंत पुनः लिहावा; आणि तो लिहितांना असें लक्षांत ठेवावें कीं, पूर्वेकडील कोट्यवधि लोकांत त्यांच्यावरील राज्य करणारी स्त्री भयंकर बंडाचा मोड करून राज्यकारभार हातीं घेतांना आपल्या राज्यकारभाराचें धोरण काय हें सांगत आहे; आणि पुढें कांहीं वर्षांनीं तिचे अधिकारी ज्या गोष्टी करणार आहेत त्यांबद्दल त्यांस अभिवचनें द्यावयाचीं आहेत. असा जाहीरनामा म्हटला म्हणजे तो धर्मादार्यानें, प्रेमळपणानें, आणि परोपकारबुद्धीनें भरलेला असला पाहिजे व राणीच्या राज्यापासून पुढें लोकांस काय फायदे होतील तेहि त्यांत नमूद असलें पाहिजे.' राणीसाहेबांचे हे विचार समजल्यानंतर लॉर्ड डर्बी यांनीं हा जाहीरनामा त्यांच्या सांगण्याप्रमाणें नव्यानें लिहून काढला. तरी देखील तो राणीसाहेबांपुढें आला तेव्हां त्यांनीं त्यांत 'रयतेच्या कल्याणाविषयीं सर्व शक्तिमान परमेश्वर सामर्थ्य देवो.' हें वाक्य आपण आपल्या हातांनीं लिहून तो पुरा केला. हा जाहीरनामा म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्कांची मुख्य व महत्त्वाची सनद होय. ही सनद जोपर्यंत कायम आहे तोपर्यंत आमच्या राजकीय हक्कांसंबंधाच्या मागण्या केवळ कायदेशीरच नव्हे तर त्या ईश्वरी व बादशाही संकेताच्या आहेत, अर्थात् सर्व प्रकारें योग्य व न्यायाच्या आहेत, यास दुसऱ्या प्रमाणाची जरूर नाहीं." (केसरी, २९ जानेवारी १९०१, स. टि. खंड ३, पान ४९.)

हक्क-संपादनाची व्यूहरचना

या राजकीय भूमिकेच्या आधारावर व प्रजापक्षाचे पुरस्कर्ते व संघटक म्हणून टिळकांनी आपले सर्व राजकीय धोरण ठरविलेले होते. त्यांनी जे एक तंत्र विकसित केले किंवा राजकारणाचा जो एक कित्ता किंवा नमुना (मॉडेल) तयार केला त्याचे प्रारंभीचे एकमेव उद्दिष्ट या जाहीरनाम्याचा हक्काची सनद म्हणून वापर करून लोकमताच्या दडपणाने, वेळ पडल्यास आंदोलनाने, प्रतिकाराने जनतेच्या हक्कांच्या मागण्या पुढे रेटणे हेच होते. 'स्वराज्य हा माझा जनसिद्ध अधिकार आहे' हे त्याचे शेवटचे टोक होते. मधला सगळा संघर्ष विविध अवस्थांतून गेला. पण जेवढी कायद्याची मोकळीक असेल तेवढी वापरून व लोकमताची आच लावून नोकरशाहीला अस्वस्थ करण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले.

टिळकांचा राजकीय नमुना

टिळकांचा राजकीय नमुना (मॉडेल) हे लोकशाही मार्गाने हक्क संपादन करण्याचे तंत्र आहे. त्यांनी जी शस्त्रे निवडली किंवा निर्माण केली ती राजकीय असंतोष निर्माण करण्यासाठी होती. ती गुप्त नव्हती, पण हिंसात्मक क्रांतीचीही नव्हती. टिळकांचा एका क्रांतिकारकाशी झालेला संवाद कै. न. चिं. केळकरांनी लिहिलेल्या टिळक-चरित्रात दिलेला आहे. तो रचलेला असला तरी त्यातील विचार टिळकांचेच आहेत. त्यात टिळकांच्या असंतोषाच्या राजकारणामागे असलेली त्यांची भूमिका स्पष्ट दिसते.

" इतिहासांतील पुष्कळ बंडांचें असेंच असतें. तीं उद्भवतात. तुम्हांला मी दैववादी वाटेन. पण त्यांत साधनेंहि आयत्या वेळीं तशींच तयार होतात. प्रत्यक्ष बंडाच्या बाबतींत मी दैववादी असलों तरी त्यामागची तयारी म्हणून वाटते त्याबाबत मी उद्योग वादी आहे. माझ्या मतें हल्लींच्या स्थितींत कधीं काळीं जें बंड होईल किंवा न होईल त्याची तयारी म्हणजे आज पिस्तुलें आणून तीं तरुण लोकांत वाटून देणें किंवा बाँबचे कारखाने काढणें नव्हें, तर सार्वत्रिक व सामुदायिक असंतोष निर्माण करणें होय. पाणी तापवून अधिकाधिक उष्ण करण्यासारखा आपला मार्ग असावा. काडी पेटविल्यानें हात भाजेल व लागलीच तर कोठेंतरी थोडीशी आग लागेल. तिनें डोळे दिपले तरी परिणाम कांहीं होणार नाहीं. आग न लागतां, डोळे न दिपतां, आधण येण्यापर्यंत पाणी तापवितां येते व त्यानेंच पाक निष्पत्ती होते. आजच्या बंडाची माझी कल्पना इतकीच आहे कीं, देशांतील अधिकाधिक लोकांनीं सकारण रीतीनें असंतुष्ट बनावें आणि जो लहानसहान स्वार्थत्याग करावा लागेल तो करावयास शिकून ज्या ज्या ठिकाणीं परकी राज्याचा देहास स्पर्श होईल तेथें तेथें त्याच्या शक्तीचा प्रतिकार करावा पण तुम्ही जी बंडखोरी परदेशाहून घेऊन आलेले आहांत ती आज या देशांत उपयो-

गाची नाहीं इतकेंच मी आज तुम्हांला म्हणेन." (न. चिं. केळकरकृत टिळक चरित्र, खंड ३, भाग ८, पान ११ ते १४.)

सारांश, जेथे जेथे परकी सत्ता जनतेची छळवणूक व अन्याय करीत असेल तेथे तेथे जनतेच्या पक्ष घेऊन जनतेबरोबर राहावयाचे व प्रस्थापित राजवटीविरुद्ध असंतोष निर्माण करावयाचा ही टिळकांची क्रांतीच्या राजकारणाची कल्पना होती. टिळकांवर १९०८ साली भरलेल्या राजद्रोहाच्या खटल्यात ते म्हणाले होते, "लोकसमूहाचीं मनें चेतविल्याचा माझ्यावर आरोप आहे; परंतु मीं कोणाचींहि मनें चेतविलीं नाहींत. फक्त हिंदी समाजामध्यें प्रचलित विषयांबद्दल जें लोकमत बनत चाललें होतें तें एकत्र करून मीं तें लेखांमध्यें ग्रथित केलें आहे. हा कांहीं राजद्रोह नव्हे. मीं आपलें कर्तव्य केलें आहे. माझ्या समाजांतील लोकमत सर्वांसच मान्य असलें पाहिजे असें नाहीं. परंतु तें लोकमत प्रदर्शित करण्याचा वर्तमानपत्रकारास हक्क आहे." (स. टि. खंड ६, पान १९५.)

लोकमत हे आद्य दैवत

लोकमत हा टिळकांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. त्यातूनच त्यांची राजकीय आंदोलने निर्माण झाली होती. त्यांच्या सर्व राजकीय व्यूहरचनेचा भर व रोख लोकमतावर होता. टिळकांनी लोकमताची महती सांगताना म्हटले होते. "आमच्या मतें लोकमत हें आमचें आद्यदैवत होय, अंतिम नव्हे. आमच्या बंधूंचा व आमचा जो मुख्य मतभेद आहे तो हाच होय. सुशिक्षितांनीं लोकांचें पुरस्कर्तृत्व पत्करलें पाहिजे खरें, पण तें पुरस्कर्त्याचें काम लोकमताची पायमल्ली किंवा उपमर्द करणें हें नव्हे. आपलीं मतें कांहींहि असोत; पण तीं लोकांवर न लादतां लोक पुढें जाण्यास किती खुषी आहेत, त्या बेतानेंच त्यांच्या पुढारीपणाचें काम केलें पाहिजे. लोकांबद्दल खरी कळकळ पाहिजे. असें जें ब्रॅडला साहेबांनी मागें एकदा म्हणून दाखविलें होतें, त्याचा अर्थहि हाच होय. आमचे सुशिक्षित लोक हा अर्थ विसरून फुकट आपणांस व राष्ट्रीय सभेस लोकांच्या उपहास्यतेस पात्र करून घेत आहेत. याचें आम्हांस फार वाईट वाटतें." (केसरी, २६ नोव्हेंबर १८९५, स. टि. खंड ४, पान ४२५.)

राजकीय दृष्ट्या सामान्य जनमताचे महत्त्व टिळक लोकांपुढे मांडीत असत. राजकारणाचा मोहोरा सामान्य जनतेकडे वळविण्यासाठी व सामान्य लोकमताचा शह राजसत्तेला देण्यासाठी आधी समाजातील पुढाऱ्यांना व पुढारलेल्या वर्गाला सामान्य लोकांचे राजकीय व सामाजिक महत्त्व पटले पाहिजे. टिळकांचा हाच प्रयत्न असे. त्याकाळी 'टिळकांच्या मागे तेल्या-तांबोळ्यांची, भटा-भिक्षुकांची, पतंग उडविणाऱ्या मुलांची गर्दी असते,' असा आरोप केला जाई. त्या आरोपाला उत्तर देताना टिळक म्हणाले होते, "इंग्रज राज्यकर्ते जर कशाची पर्वा करीत असले, तर ती बी. ए., एम्.

ए. च्या मतांची नव्हे, त्यांस असें पक्कें ठाऊक आहे कीं, ही युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेली मंडळी स्वतः कुचकामाची आहे! सरकार जर कशाची पर्वा करीत असलें तर ती आम्ही वर सांगितलेल्या लोकमताची होय. आमच्या विद्वानांस ज्या गोष्टी कळतात, त्यापेक्षां दसपटींनें जास्त गोष्टी युरोपियन अधिकाऱ्यांस कळण्याइतके ते विद्वान आहेत; आमच्या टुरटुरीनें आम्ही सरकारास जागे करणार, हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे, व नुसत्या विद्वानांच्या ओरडीस ते कधीहीं भीक घालावयाचें नाहीं. करितां ज्या कोणास खऱ्या विद्येचा संस्कार झाला असेल त्यानें आपल्या देशाच्या खऱ्या हिताच्या काय गोष्टी आहेत त्याचा विचार करून त्याप्रमाणें उदमी, व्यापारी, कारागीर, कारकून, सरदार, जहागिरदार, इनामदार, शेतकरी वगैरे लोकांचें मत आपणांस अनुकूल करून घेतलें पाहिजे. खरें लोकाग्रणित्व यांतच आहे, लोकांस जनावरें म्हणण्यांत नाहीं! आमच्या शाळांतून, कॉलेजांतून आणि युनिव्हर्सिटींतून बाहेर पडलेल्या लोकांस हें तत्त्व पुरतेपणीं अद्याप कळूं लागलें नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. मूठभर ग्रॅज्युएटांनीं आपलें मत तें लोकमत असें म्हणून समाजाशीं बेपर्वाई वागणें म्हणजे आपणांस मिळालेल्या विद्येचा दुरुपयोग करणें होय. ज्यास म्हणून देशाचें अथवा लोकांचें खरें कल्याण करावयाचें असेल, त्यानें हा वृथाभिमान सोडून देऊन लोकांत मिसळलें पाहिजे, आणि लोकांचें मत नीट नसल्यास तें सुधारून घेतलें पाहिजे." (केसरी, १२ नोव्हेंबर १८९५, स. टि. खंड ४, पान ४१७-४१८.)

केसरी : लोकमताचे मुखपत्र

लोकमताची संघटना करण्यासाठी टिळकांनी जी आयुधे वापरली त्यात वृत्तपत्र हे मुख्य होते. १८८८ साली टिळकांनी 'केसरी'चे संपादकपद स्वीकारल्यावर केसरी हे लोकमताचे मुखपत्र व्हावे, या दिशेनेच त्याची वाढ करण्याचा, त्याच दृष्टीने त्याला भाषेच्या, मजकुराच्या दृष्टीने आकार देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. त्यामुळे टिळकांची विषयांची निवड, मांडणी, भाषेतील आवेश, संवादशैली ही राजकीय नेत्याची व शिक्षकाची होती. १९०२ साली 'केसरी'च्या वाटचालीचे सिंहावलोकन करताना टिळकांनी आपली लेखनामागची भूमिका स्पष्ट केली होती. त्यात म्हटले होते, "आम्ही केसरींत जे लेख लिहीत असतों ते केवळ राज्यकर्त्यांकरितां नसून, आमच्या मनांतले विचार, आमच्या मनांतील तळमळ किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनांत उतरावी एवढ्याकरितां आहेत व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला, तर आमचे श्रम फुकट गेले असें आम्ही समजूं. लेखणीच्या टोकानें व मषीपात्राच्या साहाय्यानें पांढऱ्यावर नुसतें काळें करण्याचा आमचा इरादा नाहीं. आमच्या लेखांचा अशा प्रकारचा परिणाम होण्यास अवश्य अशी जी भाषा तीच आम्ही वापरीत असतों. अशा प्रकारचे लेख सरकारी अधिकाऱ्यांस प्रिय होत

नाहींत हें आम्हांस माहीत आहे; किंवहुना दुसऱ्या कांहीं कारणानें वातावरण क्षुब्ध झालें असतां, वड्याचें तेल वांग्यावर या न्यायानें अशा प्रकारचे लेख लिहिणारांस अधिकाऱ्यांच्या अवकृपेचीं फळें भोगावीं लागतात याचाहि आम्हांस अनुभव आहे. पण त्यामुळें आमचें कर्तव्य करण्यास आम्ही कधींहि मागेंपुढें घेणार नाहीं." (केसरी, ११ फेब्रुआरी १९०२, स. टि. खंड ६, पान २०–२१.)

टिळकांच्या 'केसरी'चे हे झुंझार स्वरूप सरकारला सहन होणें शक्य नव्हते. टिळक लोकमत-शिक्षणाच्या या माध्यमाचा ज्यांच्यासाठी उपयोग करीत होते त्या नव्या जागृत बहुजन समाजात 'केसरी'चा संदेश स्फूर्तिदायक ठरत होता किंवा मराठी भाषेच्या बाहेर त्याची ख्याती पसरली होती. टिळकांचे राजकीय प्रतिस्पर्धी नेतृत्व व इंग्रज नोकरशाही आणि त्यांची हस्तक असलेली अँग्लो-इंडियन पत्रे ही टिळकांच्या लढाऊ नेतृत्वाला विरोध करीत होती. एकाच वेळी टिळकांना या तीन आघाड्यांवर लढावे लागत होते. टिळकांची रणनीती स्पष्ट होती. कायद्याने जेवढी सीमा घालून दिली तिच्या टोकाशी उभे राहून लोकांवरील अन्याय, त्यांची दुःखे, राज्यकर्त्यांचे जुलुमी कायदे किंवा कृत्ये ही सतत 'केसरी'तून लोकांपुढे मांडून लोकमत आपल्याला अनुकूल करून घ्यावयाचे आणि वेळ पडली तर पुढे जाऊन, कायद्याची सीमा ओलांडून उदार इंग्रजी न्यायपद्धतीला आव्हान द्यावयाचे व आपली भूमिका न्यायालयापुढे मांडून पुन्हा लोकमताचा आवाज उठवायचा. १८९७ व १९०८ च्या आक्षेपार्ह लेखांवरून सरकारने भरलेल्या राजद्रोहाच्या खटल्यांत टिळकांनी हेच तंत्र यशस्वीरीत्या वापरले व वृत्तपत्रस्वातंत्र्य, मतप्रतिपादनाचे स्वातंत्र्य यांचा पुरस्कार केला व सरकारला वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य मान्य करावयास भाग पाडले. १८९७ साली टिळकांवर इंग्रज सरकारने आक्षेपार्ह लेखांसाठी खटला भरला. त्यात झालेली शिक्षा भोगून आल्यावर टिळकांनी जो 'पुनश्च हरि ॐ' या शीर्षकाचा अग्रलेख लिहिला, त्यात 'कायद्यांची सीमा किती असते, हे न्यायालयाकडून ठरविणे हा आपला मार्ग आहे व आहे त्या मोकळिकीचा पुरेपूर फायदा घेऊन लोकमत प्रतिबिंबित करणे हेच आपले धोरण राहील', अशी त्यांनी निधडी घोषणा केली. टिळक म्हणत, "इंग्रजी राज्यांत सरकारकडून प्रजेस जे हक्क मिळाले आहेत त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. हे हक्क कोणते हें लोकांस समजावून देण्याची व त्याप्रमाणें त्यांस सरकारला मागणी करण्यास सांगण्याचीहि आवश्यकता आहे, त्याबद्दलहि मतभेद नाहीं, इतकें झाल्यावर नेमस्तपणा व जहालपणा तो कशांत राहाणार? बोलण्याची आणि लिहिण्याची इयत्ता जी कायद्यानें ठरली जाईल ती दोघांसहि मान्य केली पाहिजे. आतां भेद राहिला तो एवढाच कीं, लोकांस कोणचे हक्क मिळाले पाहिजेत याबद्दल त्यांची व सरकारची समजूत घालण्यांत जो एकनिष्ठपणा दाखविला पाहिजे तो ठेवावयाचा, किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याची गैरमर्जी झाली किंवा होईल

म्हणून भीतीनें आम्हांस जी गोष्ट खरी वाटत आहे ती कायदेशीर रीतीनें बोलल्याबद्दलहि 'क्षमस्व परमेश्वर' म्हणून प्रार्थना करून मोकळे व्हावयाचें. सरकारनें आम्हांस बोलण्याची व लिहिण्याची जी मोकळीक दिली आहे ती त्यास जास्त वाटल्यास तें केव्हांहि कमी करण्यास समर्थ आहे. परंतु ज्या कालीं कायद्याप्रमाणें जितकी मोकळीक दिली असेल तिचा पूर्ण फायदा घेऊन लोकमत जागृत करण्याचें व सरकारपाशीं आम्ही मागत असलेल्या हक्कांचें समर्थन करण्याचें जें काम आम्ही पत्करलें आहे तें काम निर्भयपणें चालविणें आम्हांस जरूर आहे. आम्हांस दिलेली मोकळीक आधींच कमी झालेली आहे. आणि त्यांत नेमस्त आणि जहाल असे भेद करणें म्हणजे आज जी पेज पिण्यास आपणांस मिळत आहे तींतही आणखी पाणी ओतून 'वाः, ही काय गुळचट झाली आहे' असें म्हणून मिटक्या मारीत बसण्यासारखें आहे. केसरीकारांचें मन जाल्याच अशा मार्गाकडे प्रवृत्त झालें नसल्यामुळें त्यांस हा मार्ग पसंत नाहीं हें सांगावयास नकोच." (स. टि. खंड ६, पान १२–१३.)

हे केसरीचे धोरण स्पष्ट करून कायद्याविषयीची भूमिका स्पष्ट करतांना टिळकांनी लिहिले होते, " सरकार कायदे फिरविण्यास पूर्ण समर्थ आहे, व प्रजेस ज्या ज्या वेळीं जे जे कायदे असतील ते ते मानले पाहिजेत, हें तत्त्व आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. आम्हांस बेकायदेशीर कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं. आजपर्यंत किंवा १८९७ पूर्वी आम्हीं जे लेख लिहिले ते त्या वेळच्या कायद्यानें जी मोकळीक दिली होती तिचा पूर्ण फायदा घेऊन लिहिलेले होते. ती मोकळीक सरकारास जर फाजील वाटत होती तर त्यांनीं तो कायदा रीतीप्रमाणें बदलून मग आम्ही नव्या कायद्याप्रमाणें चालतों कीं नाहीं तें बघावयाचें होतें. पण तसें न करितां आम्ही मोकळीक दिली व तिचा अर्थ जरी अमुक होतो असें स्पष्टपणें कायदेकौन्सिलांत सांगितलें, तरी आमच्या मनांतील निराळा होता अशा सबबीवर पूर्वीच्या कायद्याप्रमाणें चालणाऱ्या माणसास एकदम खड्ड्यांत घालण्याचा अपूर्व मार्ग सरकारनें स्वीकारला. आमच्या हातांत शस्त्रें नाहीत व तीं घेण्याचेंहि आमच्या मनांत नाहीं; परंतु सरकारनें जी मोकळीक दिली असेल तिचाच पूर्ण उपयोग करून, आमचे सार्वजनिक कर्तव्य बजावण्याचा आमचा इरादा आहे. सरकार आम्हांस किती मोकळीक देतें तें सरकारनें एकदां इमानेंइतबारें आम्हांस सांगावें; म्हणजे आम्ही त्याप्रमाणें वागूं. आम्हांस ज्या कांहीं गोष्टी कर्तव्य आहेत त्या राजद्रोहाच्या नाहींत, त्या शब्दानें कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याबद्दल काय तो वाद आहे. करितां ही मर्यादा जर सरकार एकदां कायमची ठरवील तर त्यांत आमचें हितच आहे. मर्यादा कितीही संकुचित असली तरी, त्याची आम्ही काळजी करीत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे की संकुचित मर्यादेंतच आपले सर्व विचार व्यक्त करणें यांतच जास्त कसब आहे. मैदानावर कसरत करण्यापेक्षां वाटल्यांवर टेबल ठेऊन त्यावर कसरत करणाराची

करामत जास्त हें सर्वत्रांस माहीत आहे, व तोच न्याय प्रस्तुतस्थलींहि लागू आहे. सरकारनें मात्र आपली मर्यादा काय ती निश्चित ठरवावी व तींत पुन्हा फेरबदल करणें असल्यास कायद्यानें करावा, बळी घेऊन करूं नये, एवढीच काय ती आमची सरकारास विनंती आहे. कायदेशीर मोकळिकीची एकदा इयत्ता ठरली म्हणजे त्या इयत्तेंत वागण्यास आम्ही तयार आहों. त्या इयतेचा जितका फायदा घेता येईल तितका घेण्यास मात्र आम्ही कधींहि कचरणार नाहीं; किंबहुना तसा फायदा घेणें हें आमचें एक प्रकारें कर्तव्यच आहे, असें आम्ही समजतों." (केसरी, ४ जुलै १८९९, स. टि. खंड ६, पान ९–१०.)

सरकारशी संघर्ष करून मिळालेल्या हक्कांचा जास्तीत जास्त उपयोग करीत हक्कविस्तार करीत जावयाचा हे टिळकांचे तंत्र होते. ते यशस्वीरीत्या त्यांनी वापरले व वृत्तपत्रस्वातंत्र्याचा व राजकीय हक्कांचा लढा पुढे चालविला. त्यामुळे इंग्रज नोकरशहा व राज्यकर्ते अस्वस्थ व अंतस्थरीत्या क्षुब्ध होते. याचे अनेक पुरावे आता इंग्रज सरकारच्या तत्कालीन कागदपत्रांत मिळतात. १८८८ पासून टिळक जे लेखन करीत होते त्याच्याकडे गुप्त पोलिसांचे व सरकारचे बारीक लक्ष असे. त्याची कात्रणे लगेच सरकारी गृहखात्यात जात व कायदेशीर उपाययोजना करता येईल की नाही, याचा विचार सुरू होई.

लोकपत्र करण्याचे प्रयत्न

'केसरी'त सामान्य जनांचे प्रश्न मांडले जावेत व ते लोकपत्र व्हावे, ही टिळकांची इच्छा होती. तरच त्याला राजकीय वजन येईल ही त्यांची कल्पना असल्याने इंग्रजी शिकलेल्या मर्यादित वाचकवर्गाऐवजी टिळकांनी राजकीय दृष्ट्या जागृत होत चाललेला नवा मध्यमवर्ग, औद्योगिक कामगार, शेतकरी यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न केले व 'केसरी' हे लोकपत्र केले. त्यासंबंधी त्यांनी म्हटले होते,

"मराठी वर्तमानपत्रांस एक प्रकारची नवीन दिशा लावण्याचा 'केसरी' कारांचा प्रयत्न होता. ही दिशा कोणती याबद्दल थोडेसें येथें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. वीस वर्षांपूर्वी इंग्रजी शिकलेल्या लोकांस वर्तमानपत्रांत एखादा लेख लिहिणें असल्यास तो इंग्रजींतच लिहावा असें वाटत असे; आणि मुंबईच्या वजनदार इंग्रजी-मराठी पत्रांत लेख लिहिणारे जे त्यावेळचे प्रसिद्ध लेखक असत तेहि लेखणीपेक्षां पेनचाच बहुतेक सर्वत्र वापर करीत, वर्तमानपत्रांतून अशा रीतीनें उत्कृष्ट इंग्रजी लेख आले म्हणजे त्यांतील कल्पना अगर विचारसरणी सामान्य मराठी वाचकांकरितां कोणी तरी मराठींत भाषांतर करावी अशी त्या वेळची पद्धत होती. व त्याचें ठळक उदाहरण कोणास पहाणें असल्यास, सार्वजनिक सभेच्या इंग्रजी त्रैमासिकांतील निबंध मराठींत करण्याचा जो प्रयत्न झाला होता, तो पहावा म्हणजे लक्षांत येईल. इंग्रजींतील लेख

प्रधान आणि मराठींतील गौण अशी स्थिति असल्यावर सदर लेखांच्या वाचकवर्गाची व्याप्तीहि इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या पलीकडे फारशी गेली नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. त्या वेळच्या व हल्लींच्या काळांत मोठा फरक म्हटला म्हणजे हा कीं बीस वर्षांपूर्वी हा मराठीं वर्तमानपत्रांतून लेख लिहिणारे प्रसिद्ध गृहस्थ आपले लेख मुख्यत्वेंकरून इंग्रजी शिकलेल्या लोकांकरितांच आहेत असें समजत आणि त्या वर्गास ते पसंत पडले म्हणजे आपलें काम झालें असें मानीत. पण आज ही स्थिति जाऊन त्याऐवजीं इंग्रजी शिकलेल्या वर्गापलिकडे अर्धवट इंग्रजी किंवा मराठी लिहितां-वाचतां येणाऱ्यांचा जो एक मोठा वर्ग आहे व त्या वर्गांत देशांतील बहुतेक सर्व कर्त्या व दक्ष लोकांचा समावेश होतो, तो वर्ग आपला वाचक आहे, त्याच्या हिताहिताची चर्चा आपणांस कर्तव्य आहे व त्यांची स्थिति कशी सुधारेल हें केवळ इंग्रजी शिकलेल्यांच्याच दृष्टीनें नव्हे, तर या मोठ्या वर्गाच्या दृष्टीनेंहि आपण त्यांच्यापैकींच एक असें समजून आपणांस पाहिलें पाहिजे अशी वर्तमानपत्रांच्या लेखकांची स्पष्ट किंवा अस्पष्ट समजूत झाली आहे व होत चालली आहे...पूर्ण इंग्रजी शिकलेल्या लोकांखेरीज इतर वर्गाचें म्हणणें काय आहे, त्याचे कांहीं आक्षेप असल्यास ते संयुक्तिक आहेत कीं नाहींत, हें त्यांच्यापैकींच आपण एक आहों व आपणांस जो कांहीं उद्योग करावयाचा आहे तो त्यांच्या हिताकरितांच आहे, आणि तो त्यांस बरोबर घेऊनच केला पाहिजे, अशा समजुतीनें पहाण्याची किंवा त्याबद्दल वर्तमानपत्रांत चर्चा करण्याची केसरीनें सुरुवात केली नसल्यास, निदान प्रघात तरी पाडला असें म्हणण्यास हरकत नाहीं." (केसरी, ११ फेब्रुआरी १९०२, स. टि. खंड ६, पान १८–१९.)

लोकाभिमुख वृत्तपत्रे ही टिळकांची नीती त्यांच्या लोकमतावरील श्रद्धेतूनच निर्माण झाली होती. पण टिळकांनी एका लेखात म्हटले होते कीं, 'सरकार व लोक दोघांचीं मनधरणी एकदम करणें दुर्घट होय असा जुना श्लोक आहे.' त्याप्रमाणेच झाले. टिळक लोकमत सरकारपुढें मांडत असताना इंग्रज नोकरशाही व तिची बाजू घेणारी हिंदुस्थानातील अँग्लोइंडियन पत्रे टिळकांवर नाराज झाली. तसेच अनेक वेळा सरकारची बाजू उचलून धरणारे त्यावेळचे डॉ. भांडारकरांसारखे पुढारी टिळकांना दूषणे देऊ लागले. टिळक कडक भाषेत लिहितात, हा त्यांचा आक्षेप असे. जी कडक भाषा टिळक-विरोधकांविषयी लिहिताना किंवा त्यांच्या आरोपांना उत्तरे देताना टिळक वापरीत, तशीच कडक भाषा नोकरशाही व इंग्रजी वृत्तपत्रे यांना उत्तर देताना वापरत असत. टिळक म्हणत, 'हा ज्याचा त्याचा स्वभावधर्म आहे.'

'केसरी' विरोधकांवर जे हल्ले करी त्याविषयी लिहिताना टिळक म्हणाले होते, "सरकार व लोक या दोघांचीही मनधरणीं एकदम करणें दुर्घट होय, असा जुना श्लोक आहे. पण सर साहेबांचा हा नित्य उद्योग असल्यानें यांत ते केव्हां ना केव्हां तरी फसावयाचेच. लोकांच्या सुदैवानें हल्लींच्या प्रकरणांत हें त्यांचें बिंग पूर्णपणें बाहेर

पडलें आहे, व सार्वजनिक दृष्ट्या त्याचा जितका परिस्फोट आणि निषेध करतां येईल तितका करणें हें आमचें कर्तव्य होय. गरिबांच्या चुकांपेक्षां मोठ्यांचींच पातकें लोकांस अधिक भोगावीं लागतात आणि एवढ्याकरितां गुन्हेगाराचा मोठेपणा व त्याच्या गुन्ह्यावरील टीकेचा कडकपणा यांचें प्रमाण व्यस्त न ठेवतां सम ठेवण्याची 'केसरी'-कारांची वहिवाट आहे. टीकाकार 'केसरी'कर्ते वृद्ध होत चालले असले तर सर साहेब कांहीं तरुण होत चालले नाहींत. पण हा वृद्धतरुणत्वाचा प्रश्नच नव्हे. सार्वजनिक कामांत पुढाकार घेण्यास जे तयार होतात त्यांनीं आपलें वर्तन देशाशीं बेइमानीपणाचें न ठेवण्याची पहिल्यानेंच खबरदारी घेतली पाहिजे, आणि ही खबरदारी घेण्यास जर ते चुकतील—मग ती चूक दुर्बुद्धीनें होवो किंवा दुधखुळेपणानें होवो—तर आपल्या चुकीवर कोणी कितीहि कडक टीका केली तर त्यावद्दल त्यांना विषाद वाटता कामा नये. सार्वजनिक कामांत पुढें येणें हें एक प्रकारें असिधाराव्रत आहे, आणि तें जर सर साहेबांच्या हातून योग्य रीतीनें पार पडत नसलें तर त्यांनीं आपला सर्व काल प्रिस्क्रिप्शनें लिहिण्यांत घालणें बरें, असें आम्ही त्यांस नम्रपणें सुचवितों. आमचा त्यांचा कांही द्वेष नाहीं, व असण्याचें कांहीं कारणहि नाहीं. सार्वजनिक कामांत नेटानें पुढाकार घेण्यास ते स्वभावतःच नालायक आहेत, याला आतां दुसरा कांहीं पुरावा नको, व अशा नालायक पुरुषाच्या सार्वजनिक दोषावर होणारी टीका जितकी कडक असेल तितकी चांगलीच. सर भालचंद्र हे आमचे कोणीहि लागत नाहींत. पण त्यांच्या ठिकाणीं जर आमचे कोणी काके-मामे असते तरीहि असत्पक्षाचा अभिमान धरल्यावद्दल त्यांस भारतांतील प्रसिद्ध धनुर्धराप्रमाणें नम्रतापूर्वक कडक टीकारूपी देहांत शासन देण्यासहि आम्हीं मागेंपुढें पाहिलें नसतें. 'केसरी' माणसांचा अभिमानी नाहीं, मतांचा अभिमानी आहे. हें अनेक वेळां आमच्या वाचकांच्या प्रत्ययास आलेलें आहे, आणि सध्याचे 'केसरी'कार वृद्ध होवो वा मरो, वड्या लोकांचीं घाणेरडीं गुप्त कृत्यें जगापुढें मांडून त्यांतील ढोंगीपणा कडक टीकेच्या रूपानें लोकांच्या मनांत ठसविण्याची 'केसरी'ची वहिवाट—किंवा पाहिजे तर त्यास खोड म्हणा—नेहमीं कायमच राहील." (केसरी, २४ सप्टेंबर १९०७.) हा उल्लेख डॉ. भालचंद्रपंत भाटवडेकर यांनी 'परदेशी साखरेविषयीं लोकांत गैरसमज निर्माण करण्यासाठीं साखर तयार करण्याच्या प्रक्रियेंत हाडांच्या भुकटीचा उपयोग करण्यात येतो असा प्रचार स्वदेशीचे प्रचारक करीत असतात,' असा आरोप केला होता, त्या संदर्भात लिहिलेल्या 'पुनश्च सर आणि साखर' या लेखातील आहे.

असेच उत्तर वेळगावच्या प्रांतिक सभेविषयीच्या लेखात दिनशा वाच्छा यांना टिळकांनी दिले होते. "मि. वाच्छा यांनीं आपल्या भाषणाच्या अखेरीस देशी वर्तमानपत्रांवर जे कित्येक सद्गृहस्थांकडून वृथा आरोप करण्यांत येत असतात त्यांचेंहि चांगलें खंडण केलें आहे व आमच्या विनचक्षुबंधूंनीं उसने डोळे घेऊन तरी वाचावे

अशी आम्ही त्यांस मुद्दाम शिफारस करितों. रावबहादुर जठार यांनीं देशी वर्तमान-पत्रकारांस नुकताच जो पोक्त उपदेश केला होता त्यावर आम्हीं केलेली टीका ज्यांस पसंत नव्हती त्यांसच मि. वाच्छा यांनीं या विषयासंबंधानें काढलेले उद्‌गार मान्य आहेत. हें पाहून आम्हांस फार संतोष होतो. कारण यावरून येवढें निर्विवाद सिद्ध होतें कीं व्यक्तिद्वेषामुळें सत्याच्या किरणांचें कधीं कधीं वक्रीभवन झालें तरी अखेरीस हे किरण सरळ होण्याचा संभव असतो. तेव्हां मि. वाच्छा यांच्या लेखानें हा एक आमच्यावर उपकारच झाला असें म्हटलें पाहिजे. नेटिव्ह वर्तमानपत्रें कडक लेख लिहितात असें आमच्या लोकांनीं म्हणणें म्हणजे एक प्रकारें घरबुडवेपणाचाच धंदा पत्करण्यासारखें आहे. इंग्रजी राज्यपद्धति पूर्णतेस आली आहे, असें खुद्द इंग्रज लोकहि म्हणत नाहींत, मग आमची गोष्ट कशाला ? अशा राज्यपद्धतींतील दोष पाहून ज्यांचें अंतःकरण जळत नाहीं त्यांनीं वर्तमानपत्रकारांचा धंदा करू नये, हेंच चांगलें. त्यांतूनहि इंग्रजी वर्तमानपत्रें प्रत्यहीं आम्हांस एकसारख्या शिव्या देत असतां आम्हीं मठ्ठासारखें स्वस्थ राहावें हें भ्याडपणाचें लक्षण होय, असें जें मि. वाच्छा यांनीं म्हटलें आहे तें सर्वांशीं खरें आहे. कडक, संयुक्तिक लेख आणि राजद्रोही लेख यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे, व इंग्रजी पत्रकारांनीं शिव्या देण्याचा व निलाजरेपणाणें आम्हीं त्या ऐकण्याचा जोपर्यंत मक्ता घेतला नाहीं तोपर्यंत रा. ब. जठारासारख्यांचा पोक्त उपदेश आमच्या कामीं पडावयाचा नाहीं हें अगदीं उघड आहे. आम्हीं जो लेख लिहितो तो नेहमीं आम्हांस एखादी गोष्ट अप्रिय वाटत असते म्हणून लिहितो, व तो अशा बुद्धीनें लिहितो कीं, त्यामुळें आमच्या मनोवृत्तिप्रमाणेंच आमच्या वाचकांच्या मनोवृत्ति व्हाव्या. लोकमताची जागृति करणें अथवा तें उत्पन्न करणें अशी जी वर्तमानपत्रकारांचीं मुख्य दोन कामें आहेत तीं चांगल्या रीतीनें बजावण्यास निःस्पृह व कडक लेख लिहिणें अत्यंत जरुरीचें आहे व असल्या लेखांबद्दल देशी वर्तमान-पत्रकारांस जे लोक दूषण देत असतील त्यांनी या बाबतींत इंग्रजी वर्तमानपत्रकारांचें वर्तन कसें आहे तें लक्षांत आणावें, व मग आपल्या जिव्हेचा व लेखणीचा उपयोग करावा येवढीच त्यांस आमची विनंती आहे." (केसरी, २१ मे १८९५.)

अँग्लो-इंडियन पत्रांची आगलावी

अँग्लो-इंडियन पत्रे टिळकांविरुद्ध सरकारचे मन कलुषित करण्यासाठी निंद्य लेख लिहीत असत. टिळकांनी त्यासाठी न्यायालयात फिर्यादी केल्या. पण इंग्रजी पत्रांच्या टीकेचा समाचार ते स्वतःच्या पत्रात व त्यांच्या संपादकांना पत्रे पाठवूनही घेत असत. 'टाइम्स ऑफ इंडिया' सारखे वृत्तपत्र म्हणजे 'अँग्लो-इंडियन लोकांचें कुलुंगें कुत्रें आहे', अशी अत्यंत कडक टीका टिळकांनी केली होती. 'काळ' वरील खटल्यानंतर १९०४ साली टिळकांनी जो अग्रलेख लिहिला होता, त्यात अँग्लो-इंडियन पत्रांनी

सरकारवर आणलेल्या दडपणाचा इतिहास देऊन म्हटले होते, "टाइम्स किंवा इतर इंग्रजी अधिकारी कांहींही म्हणोत, आम्ही सरकारास स्पष्टपणें कळवतो कीं, कर्झनशाही आमच्या गळ्याभोवतींचे गुलामगिरीचे पाश अधिकाधिक दृढ करीत चाललेली आहे." पत्रकारांचें कर्तव्य स्पष्ट करून सांगताना टिळकांनी याच लेखात लिहिले होते, "सरकारवर कडक टीका केल्यानें त्यांचा रोष आमच्यावर झाला, तर त्याची आम्हांस परवाहि नाहीं. सरकारच्या जुलुमी राज्यपद्धतीवर कडक टीका करावयाची नाहीं तर वर्तमानपत्र काढावें तरी कशाला? सारांश, आमची मतें व भाषा कितीहि कडक असो, तो मनाचा धर्म आहे. ज्याचें अंतःकरण जसें जळत असेल त्याप्रमाणें तो बोलेल किंवा लिहील." (केसरी, २७ सप्टेंबर १९०४, स. टि. खंड ४, पान ७९४.)

नोकरशाहीची शस्त्रे : राजद्रोहाचा आरोप

टिळक लोकमताचे प्रखर रूप सरकारला दाखविण्यासाठी जे कडक लेख लिहीत असत तो राजद्रोह आहे, त्यामुळे सरकारविषयी द्वेष निर्माण होतो, अशी नोकरशाहीने भूमिका घेतली. १८९७ साली खटला भरला. तेव्हापासून १९०८ पर्यंत टिळक न्यायालयात व बाहेर आपला लढा लढत होते व वृत्तपत्र-स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत होते. 'काळ', 'भाला' इत्यादी पत्रांवर महाराष्ट्रात व 'वंदे मातरम्,' 'युगांतर' सारख्या पत्रांवर बंगालमध्ये सरकार खटले भरीत होते. टिळकांनी राजद्रोहाचे वर्णन 'नोकरशाहीच्या हातात असलेला गळफास' असे केले होते. १९०६ साली श्री. भास्कर बळवंत भोपटकर यांच्या 'भाला' पत्रावर खटला भरून त्यांना जेव्हा दंड व शिक्षा झाली, तेव्हा टिळकांनी वृत्तपत्रकार व राजद्रोह या विषयावर आपली मते स्पष्टपणे मांडली होती. त्यात म्हटले होते, "राजद्रोह या शब्दाचा अर्थ म्हटला म्हणजे राजाचा द्रोह, अर्थात् राजाचा पाडाव करून त्याचा अधिकार किंवा सत्ता नष्ट करण्याची बुद्धि हा होय. जेव्हां अशा प्रकारची बुद्धि प्रजाजनांपैकीं कोणाच्या मनांत संचारलेली असते तेव्हां तो मनुष्य राजाचा शत्रु होतो, आणि त्या शत्रूचा नाश करणें हें सरकारचें कर्तव्य बनतें. शत्रु प्रबळ असल्यास लढाई करून त्याचा नाश करावा लागतो, आणि आपल्या मुलखांतीलच एखादा दुसरा इसम असल्यास राजद्रोहाच्या आरोपावर त्यास तुरुंगांत ठेवावें लागतें किंवा हद्दपार करावें लागतें. हा स्वसंरक्षणाचा उपाय होय, व या मार्गाचें कोणाहि राजानें किंवा सरकारनें अवलंबन केल्यास त्यास दोष देतां येणार नाहीं. सन १८९८ सालापूर्वी राजद्रोहाची व्याख्या अशाच प्रकारची होती. 'सरकारचा हुकूम तोडा, शस्त्रें घ्या आणि सरकारविरुद्ध उठा' अशा प्रकारचा जोंपर्यंत कोणी उपदेश करीत नाहीं तोपर्यंत त्याचा लेख किंवा भाषण कितीहि कडक असलें तरी त्याच्या हातून राज-

द्रोहाचा गुन्हा होत नाहीं, अशी राजद्रोहाची तेव्हां पिनल कोडांत व्याख्या होती. ही व्याख्या पहिल्यानें केसरीवरील खटल्यांत स्ट्रॅचीसाहेबांनी शब्दांची ओढाताण करून बदलली. आणि तेव्हांपासून द्रोह म्हणजे द्वेष, द्वेष म्हणजे अप्रीति, अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव, प्रीतीचा अभाव म्हणजे प्रीति नसणें, आणि युक्लिडच्या पहिल्या प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें राजावर प्रीति नसणें म्हणजे राजद्रोह, अशा प्रकारच्या कोट्या सुरु झाल्या. पुढें १८९८ सालीं पिनल कोड दुरुस्त करून सरकारानें या कोट्यांस लोकमतांत न जुमानता केवळ आपल्या मनगटाच्या जोरावर कायद्याचें स्वरूप दिलें. या नव्या कायद्याप्रमाणें राजद्रोह हा गुन्हा पूर्वी जो राजाविरुद्ध बंड करण्यास चिथावण्याचा होता तो केवळ राजाच्या बेअदबीचा होऊन बसला आहे. हल्लीं राजद्रोहाची अशी व्याख्या आहे कीं, जो कोणी शब्दानें, लेखानें, चित्रानें किंवा दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेनें लोकांच्या मनांत सरकारबद्दल 'शत्रुभाव', द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न करील तो राजद्रोही समजला जाईल. यास अपवाद म्हणून जें एक कलम दिलें आहे त्यांत सरकारवर कडक टीका करण्याची मोकळीक दिली आहे, पण तीहि इतकी मर्यादित आहे कीं, अशा प्रकारची टीका करतांना लेखकानें किंवा वक्त्यानें सरकारबद्दल लोकांच्या मनांत 'द्वेषबुद्धि अगर तिरस्कार' उत्पन्न न होईल याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे, असें त्यांत लिहिलें आहे. सारांश, १८९८ सालीं जेव्हां हा कायदा पास झाला तेव्हांच या देशातील लेखकांच्या व वक्त्यांच्या गळ्याभोंवतीं सरकारनें दोरी गुंडाळून ठेवलेली आहे."

राजद्रोहाचे स्वरूप व्यापक झाले असल्याचे सांगून टिळकांनी पुढे म्हटले होते की, "राजद्रोह हा आतां बेअदबीचा गुन्हा झाला आहे, आणि जोपर्यंत युरोपियनांप्रमाणें नेटिव्हांस आपल्या जातीची ज्यूरी मागण्याचा कायद्यानें अधिकार दिलेला नाहीं तोपर्यंत खटला करण्याचा मात्र अवकाश कीं, सरकारविरुद्ध लिहिणाऱ्या कोणाहि लेखकांस किंवा वक्त्यांस शिक्षा ही ठेवलेलीच समजावी! कारण सरकारबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला कीं राजद्रोह होतो, असा कायदाच झालेला आहे; आणि तिरस्कारबुद्धि या सदरांत अपमान, थट्टा, अनादर, किळस या सर्वांचा समावेश सहज करतां येण्यासारखा आहे. सन १८९८ सालीं स्ट्रॅचीं साहेबांना शब्दांची ओढाताण करावी लागली पण ९८ सालच्या पिनल कोडांतील दुरुस्तीनें आतां तशा प्रकारचा वाक्छल किंवा वाक्पांडित्य कोणत्याहि जज्जांस करण्याची जरुरी नाहीं. त्यानें फक्त ज्यूरीस एवढेंच सांगावयाचे कीं, 'या लेखानें सरकारबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल कीं नाहीं; होईल असें वाटत असल्यास, आरोपी राजद्रोही आहे, नाहीं तर नाहीं.' (केसरी, ४ फेब्रुआरी १९०६, स. टि. खंड ४, पान ८०५ व ८०३.)

नोकरशाही व वृत्तपत्रे

पत्रकार – लोकनेता म्हणून टिळकांचे व नोकरशाहीचे हे युद्ध शेवटपर्यंत चालू होते. टिळकांवर राजद्रोहाची तलवार सतत टांगलेली असे. भारतातील नोकरशाही व लोकपक्ष यांच्यात उघड युद्ध चालू आहे, अशी मुळीच टिळकांची कल्पना होती. टिळक हा लढा वर्तमानपत्रात व बाहेर आंदोलने उभी करून चालवीत होते. टिळकांनी उपस्थित केलेला मुद्दा असा की, निर्भयपणाने व मोकळेपणाने आपली मते सरकारपुढे व लोकांपुढे सतत मांडणे हा पत्रकारांचा हक्क आहे. अर्थात् नोकरशाहीला टीका केलेली आवडत नाही. तरीही लोकमत हे वृत्तपत्रातून मांडणे हे पत्रकाराचे कर्तव्य असते. आणि त्याला जर नोकरशाहीने अडथळा केला किंवा मनाई केली तर पर्यायाने हा लढा जनता आणि नोकरशाही यांच्यातील होतो. म्हणून टिळक १९०८ च्या खटल्याच्या वेळी आपल्या बचावाच्या भाषणात म्हणाले होते, 'बेफाम व बेजबाबदार नोकरशाही व जनता यांच्यातील हा लढा आहे.' १९०८ चा खटला हा टिळकांनी वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी केलेल्या संघर्षाचाच एक भाग होता. असे म्हटले पाहिजे. म्हणून त्या खटल्यातील बचावाच्या भाषणांत टिळकांनी व्यक्त केलेले विचार अत्यंत मौलिक आहेत. त्यातील महत्त्वाचा सारांश येथे दिला आहे. टिळक म्हणाले होते, "हे लेख टिळकांनें लिहिलेले आहेत, सबब ते राजद्रोही असलेच पाहिजेत असेंहि कांहींचें मत असेल परंतु टिळकानें लिहिलेले लेख, कीं दुसऱ्या कोणीं लिहिलेले लेख यांच्याशीं ज्यूरीला कांहीं कर्तव्य नाहीं. इंग्लंडमध्यें ज्या प्रकारचें मुद्रणस्वातंत्र्य व कायद्यानें लोकांस दिलेलें आहे त्या प्रकारचें मुद्रणस्वातंत्र्याचे कायदेशीर हक्क इकडील लोकांसहि असतां, त्यांचें तुम्ही योग्य प्रकारचें रक्षण करणार कीं नाहीं हा प्रश्न आहे. दोन पक्षांमध्यें खडाजंगी वाद चालला असतां प्रतिपक्षास उत्तर देण्याच्या उद्देशानें लेख लिहिलेले आहेत. प्रत्येक जातीच्या लोकांचे निरनिराळे विचार व मतें असतात. माझ्या देशबांधवांचे जे विचार व जीं मतें आहेत तीं प्रसिद्ध करण्यास मला पूर्ण मुभा आहे. माझ्यावर दया करा किंवा माझ्यावर थोडी मेहरबानी दाखवा, अशा प्रकारचें माझें मुळींच मागणें नाहीं. मीं जें जें कांहीं लिहिलें आहे त्याची पूर्ण जबाबदारी घेण्यास मी तयार आहे. मीं एखादी गोष्ट वेडाच्या लहरीमध्यें लिहिली, सबब मला माफी करा, असें माझें बिलकुल म्हणणें नाहीं. मीं ज्या प्रकारचे लेख लिहिले आहेत तसे लेखच या प्रसंगीं लिहावयास पाहिजे होते, आणि असे लेखच लिहिणें सार्वजनिक हित-रक्षणार्थ अवश्य होतें असें माझें धडधडीत ठाम मत असल्यामुळें माझ्या कर्तव्यास स्मरून मीं हे लेख लिहिले आहेत. असें माझे म्हणणें आहे. सरकारच्या व लोकांच्या, दोघांच्याहि हितसंरक्षणार्थ मीं ज्या प्रकारच्या सूचना व इशारा दिलेला आहे, त्याच प्रकारच्या सूचनांची व इशाऱ्याची या प्रसंगीं जरूर होती असें मला वाटतें. माझ्या लेखांचा तुम्ही अशा प्रकारें मोकळ्या मनानें विचार कराल, तर निर्दोषी असाच निकाल

तुम्हांस द्यावा लागेल. मी सरकारच्या मर्जीतील मनुष्य नाहीं हें मी जाणून आहे. परंतु सरकारच्या गैरमर्जीतला मनुष्य जरी असलो व तुमचीहि जरी माझ्यावर गैरमर्जी असली, तरी सरकारच्या किंवा गैरमर्जीचा खटल्याशीं कांहीं संबंध नसल्यामुळें, माझ्यासारखा सरकारचा गैरमर्जीतल्या मनुष्याला देखील न्याय मागण्याचा हक्क आहे व योग्य तो न्यायच करणें हें तुमचें कर्तव्य आहे." (स. टि. खंड ६, पान १७१.)

राज्यसुधारणेविषयी इशारा द्यायचा व काही सूचना करावयाच्या असल्यास सरकारी अधिकाऱ्यांना खाजगीरीत्या भेटून त्या करणे टिळकांना शक्य होते, असे सुचवणाऱ्यांना उत्तर देताना टिळक या भाषणात म्हणाले होते, "तुम्हांला असें वाटेल कीं, मला जर सरकारास उपदेश करावयाचा होता तर मीं सरकारी अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर जाऊन तो त्यांच्या कानांत सांगावयाचा होता; परंतु तें काम वर्तमानपत्रकारांचें नाहीं. मला जें काय म्हणावयाचें आहे तें मी वर्तमानपत्रांतच म्हणतों. मला जें काय म्हणावयाचें असतें तें मी वर्तमानपत्राद्वारे मांडतों. अधिकाऱ्यांना भेटीं देण्याकरितां कांहीं मला वेतन देण्यांत येत नाहीं किंवा भेटीमध्यें मला कसें वागविण्यांत येईल हेंहि मला समजत नसतें. लोकहिताच्या बाबींत मी आपले विचार निर्भीडपणें प्रसिद्ध करतों; व त्यांच्यांतच माझ्या सर्व समाजाचीं मतें समाविष्ट आहेत, आणि तसें केलें म्हणजे मीं आपलें कर्तव्य केलें असें समजतों. उच्छृंखल अधिकारीवर्ग व प्रजाजन यांच्यामध्यें वर्तमानपत्रकार हे मध्यस्थ आहेत आणि लोकमत काय आहे हें सरकारच्या ते नजरेस आणतात; हेंच देशाच्या राज्यकारभारांत अत्यंत आवश्यक आहे. लोकमत काय आहे हें सांगण्यास जरी सरकारपाशी अधिकारीवर्ग असला तरी अधिकाऱ्यांची प्रवृत्ति वस्तुस्थितीचा विपर्यास करून दोषैकदृष्टीनें पहावयाचीच असते. वाटेल तशा प्रकारचें खाजगी मत निर्भीडपणें जसेंच्या तसें प्रतिपादन करण्याची मोकळीक असली तरच एखाद्या गोष्टीबद्दल मत बनविण्यामध्यें कांहीं राम आहे. असलें मत आपल्या मनांतच कोंडून ठेवावयाचें असेल तर मत बनवावयाचें तरी कशाला?" (स. टि. खंड ६, पान १९१.)

पत्रकारांचे कर्तव्य

लोकजागृती हे पत्रकाराचे मुख्य ध्येय असते, हा मुद्दा स्पष्ट करताना टिळकांनी सांगितले होते, "लोकांच्या हितासाठीं व सरकारच्या उपयोगासाठीं जर वर्तमानपत्र चालवावयाचें आहे तर दुसरा कोणताहि विचार कर्तव्याच्या आड येऊ देतां कामा नये. द्रव्यार्जनाच्या दृष्टीनेंच आम्हीं वर्तमानपत्रें काढिलीं नाहींत. प्रचलित प्रश्नांचा व लोकहिताच्या बाबींचा ऊहापोह करण्याकरितां व देशांत लोकमत जागृत करण्याकरितां आम्हीं वर्तमानपत्रें काढिलीं आहेत. आमचें म्हणणें लोकांस रुचो वा न रुचो, सरकारास आवडो वा न आवडो, आम्हांस एखाद्या विषयावर आमचा निकाल तावडतोब व वेळच्या वेळेवर

द्यावयाचा असतो. कांहीं अनन्वित प्रकार जर आज घडला व माझें पत्र जर उद्यां प्रसिद्ध व्हावयाचें असलें, तर मला त्यावर माझे विचार उद्यांच प्रसिद्ध केले पाहिजेत. कदाचित् ते बरोबर असतील किंवा असणार नाहींत. मनुष्य चुकीस पात्र आहे आणि विशेषेंकरून ज्यास तावडतोब व तात्कालिक स्फूर्तीनें एखाद्या प्रसंगावर लिहावयाचें असतें, त्याच्या हातून चुका कधीं कधीं घडतातच. निरनिराळ्या पक्षांचें पत्रकार आपआपल्या बाजूनें एखाद्या गोष्टीचा खल करितात. त्यांतील कोणत्या पक्षाचें म्हणणें खरें, कोणत्या पक्षाचें खोटें, असा निष्कर्ष लोक काढितात. सार्वजनिक वादविवाद व चर्चा करण्याचा हक्क आहे म्हणूनच असें करतां येतें, तेव्हां वर्तमानपत्रकारांचें कर्तव्य हें असें आहे. तें काम करीत असतांच प्रस्तुत लेख लिहिले होते आणि सरकार-विरुद्ध द्रोह उत्पन्न करण्याचा लिहिणाराचा हेतु नव्हता. हा माझ्या म्हणण्याचा इत्यर्थ आहे." (स. टि. खंड ६, पान १९२.)

जुलमी राजवटीपासून संरक्षण

सरकारी राज्यकारभारावर टीका करण्याचे स्वातंत्र्य हिंदुस्थानात का आवश्यक आहे, याचे स्पष्टीकरण करताना टिळकांनी या भाषणात सांगितले होते, "सर्वतोंपरी जुलमी Despotic पद्धतीनेंच जोंपर्यंत हिंदुस्थानांत राज्यकारभार चालविण्यांत येतो तोंपर्यंत तक्रार करण्याचा आम्हांस हक्क पोहोंचतो. मुद्रणस्वातंत्र्याची ज्याला कांहीं किंमत कळते अशा राष्ट्राच्या हातीं सांप्रत हिंदुस्थानची राज्यसूत्रें आहेत. हें स्वातंत्र्य मिळविण्याच्या झगड्यामध्यें त्या राष्ट्रांतील कित्येक अमोलिक नररत्नांच्या आहुति पडल्या आहेत. मुद्रणस्वातंत्र्यानें येथील उन्मत्त अधिकाऱ्यांस जरी गैरसोय झाली तरी सद्गृहस्थहो, एतद्देशीय लेखकांस पाठीशीं घालून त्या उन्मत्त अधिकाऱ्यांपासून त्यांचें रक्षण करणें हें तुमचें कर्तव्य आहे. आमच्या स्वातंत्र्याचे तुम्हीच पालक व पोषक आहां." (पान १८७.)

ज्यूरी : मुद्रणस्वातंत्र्याचे रक्षक

"उघड उघड टीका करूं दिली तर अधिकाऱ्यांची गैरसोय होते. त्यांनीं कित्येक वर्षें सतत जुलमी व निरंकुश सत्तेचा अंमल चालविला आहे. आमचा त्याच्याशीं लढा आहे. बेफाम व बेजबाबदार अधिकारीवर्ग व प्रजापक्ष यांमधील हा तंटा आहे, तुमचें म्हणजे, ज्यूरींतील पंचांचें आम्हांस पाठबळ पाहिजे असें तुम्हांस आमचें सांगणें आहे. ह्या कामांत इंग्लंडांत ज्यूरींनीं जी कामगिरी बजाविली आहे, ती तुम्हीं येथें बजाविली पाहिजे. सन १७९२ मध्ये इंग्रजी ज्यूरींची काय मते होतीं तें मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. राजद्रोह कशांत आहे व कशांत नाहीं हें ठरविण्याचा हक्क आपला आहे, असें स्थापित करण्यास त्यांना कित्येक वर्षें निकरानें झगडावें लागलें. कायदे कितीहि कडक

असोत, त्यांचा कडकपणा त्यांच्याबरोबर. प्रस्तुत प्रश्न कायद्याचा नसून ज्यूरींच्या हक्कांचा आहे. ज्यूरींत सर्व पंच हिंदी गृहस्थच असते तर आमची अशी पक्की खात्री आहे कीं कायदे कितीहि निष्ठुर असले तरी न्यायप्राप्तीमध्ये त्या निष्ठुरपणाची यत्किंचित् मात्रा चालली नसती, आणि म्हणूनच तुम्हांस 'मुद्रणस्वातंत्र्याचे रक्षक' असें म्हणतात." (पान १८७.)

नोकरशाही म्हणजे सरकार नव्हे !

टिळकांनी या भाषणात आणखी दोन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले होते. पहिला मुद्दा असा की, नोकरशाही म्हणजे सरकार नव्हे. दुसरा मुद्दा असा की, यामुळेच नोकरशाहीवर टीका करणे हा राजद्रोह ठरत नाही. नोकरशाही ही सार्वभौम नसते. तिला बदलणे किंवा ती जुलुमी व अकार्यक्षम असल्यास त्यासंबंधीच्या सूचना सरकारास करणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे.

पहिल्या मुद्याचे स्पष्टीकरण करताना टिळक या भाषणात म्हणाले होते, "सरकारचे अधिकारी' म्हणजे काहीं सरकार नव्हे. 'सरकार' हा शब्द राजकीय सत्तेवद्दल तात्त्विक शब्द आहे. सरकारची सत्ताच नष्ट व्हावी असें म्हणणें निराळें आणि सध्यांच्या अधिकारीवर्गाच्या सत्तेमध्यें फेरबदल व्हावा हें म्हणणें निराळें. कांहीं लोकांना हल्लींच्या अधिकारीवर्गाच्या हातांमध्यें जी सत्ता आहे ती योग्य आहे असें वाटत असेल; काहींना अधिकारीवर्गाच्या सत्तेमध्यें फेरफार व्हावा असें वाटत असेल; परंतु ज्याला जें वाटत असेल त्याला तें उघडउघडपणें जगासमोर मांडण्यास मोकळीक असली पाहिजे. मुद्रण-स्वातंत्र्याचा दुसरा उपयोग तरी काय?" (स. टि. खंड ६, पान २११.) 'कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' या शब्दांचाहि अर्थ तुम्हांस स्पष्ट करून सांगितला पाहिजे. न्यायखात्यांतले अधिकारी किंवा सत्ता चालविणारे व अंमल चालविणारे अधिकारी या कोणत्याहि एका किंवा दोन्ही अधिकारीवर्गाला 'कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' असें म्हणतां येणार नाहीं. 'सरकार' किंवा Government या शब्दाचा वरील शब्दसमुच्चयांतील अर्थ फार तात्त्विक प्रकारचा आहे. Government या शब्दाची पिनल कोडमध्येहि एके ठिकाणीं व्याख्या दिलेली आहे. त्या व्याख्येमध्यें एखाद्या पोलिस-शिपायाचा देखील समावेश होतो. पिनल कोडांतील या संकुचित अर्थाप्रमाणें पाहिलें तर एखादा पोलीसचा शिपाई आपलें कर्तव्य नीट बजावीत नाहीं इतकें म्हटलें तरी देखील राजद्रोहाचा गुन्हा होईल. परंतु 'कायद्यानें प्रस्थापित झालेलें सरकार' या कलमांतील 'सरकार' या शब्दाचा अर्थ पिनल कोडांतील व्याख्येप्रमाणें घ्यावयाचा नाहीं. 'सरकार' या शब्दाचा अर्थ व्यापक व विस्तृत आहे. हिंदुस्थानांतील इंग्रजी सरकारचें अस्तित्व सध्यांच्या वेजबाबदार अधिकारी मंडळावरच (Bureaucracy) अवलंबून आहे, असें म्हणतां येणार नाहीं. अधिकारी मंडळाकडून राज्य

चालविण्याची सध्यांची पद्धति नष्ट झाली तरी इंग्रज सरकारचें अस्तित्व कायम रहाण्यास हरकत नाहीं. कारभार चालविण्याची जी एखादी विवक्षित पद्धति अमलांत असते तिला 'सरकार' असें नाव देतां यावयाचें नाहीं. सबब एखाद्या विवक्षित राज्य-पद्धतीवद्दल द्वेष किंवा तिरस्कार उत्पन्न झाला, तरी त्याला राजद्रोह किंवा कायद्यानें प्रस्थापित झालेल्या सरकारवद्दल द्वेष-बुद्धि असें म्हणतां यावयाचें नाहीं. एका राज्य-पद्धतीपेक्षां दुसरी राज्यपद्धति जास्त चांगली आहे असें मत प्रतिपादन करण्याचा पूर्ण हक्क कोणासहि असतो. आतां एका मनुष्याचें मत सर्वांसच कबूल किंवा ग्राह्य होईल असें नाहीं. मतवैचित्र्य हें असावयाचेंच; परंतु मतवैचित्र्याप्रमाणें वाटेल तें मत प्रतिपादन करण्याला कायद्यानें पूर्ण मुभा आहे. प्रगति किंवा सुधारणा व्हावयास पाहिजे असेल तर मतप्रदर्शनास पूर्ण मोकळीक पाहिजे. ज्याला त्याला आपल्या मताची छाप लोकांच्या मनावर बसवून बहुमत आपल्या बाजूला ओढून घेण्यास पूर्ण मोकळीक आहे. सरकार सुद्धां असूं नये असें मत प्रतिपादन करण्याचाहि हक्क सर्वांना आहे. 'सरकारच असूं नये' असें म्हटल्यानें सरकारवद्दल द्वेष किंवा अप्रीति उत्पन्न होत नाहीं." (स. टि. खंड ६, पान १६९.)

भारतातील लढा

टिळक शेवटी म्हणाले होते, "अधिकारी वर्ग व लोकपक्ष याधला हा वाद पुरातन काळापासून चालत आलेला आहे. हा प्रश्न सरकारच्या अस्तित्वाबद्दलचा नसून राज्य चालविण्याच्या पद्धतीवद्दलचा आहे. एका बाजूस लोकांचा पक्ष व दुसऱ्या बाजूस प्रचंड सामर्थ्यवान् अधिकारीवर्ग यांच्यामध्यें निकराचा लढा सुरू झाला आहे. तेव्हां या देशांतील राज्यकारभाराचा कांहीं भाग आमच्या वाट्यास यावा अशा प्रकारच्या आमच्या खटपटींत आम्हांस–मला व्यक्ति या नात्यानें नव्हे– सर्व हिंदुस्थानवासियांस आपलें पाठबळ द्या, असें आपणापाशीं माझें मागणें आहे. प्रसंग मोठा आणीबाणीचा प्राप्त झाला आहे. आम्हांस मदतीची अपेक्षा आहे; आणि ती देण्याची संधि आपल्या हातीं आलेली आहे. माझें एकट्याचें हित म्हणजे मोठी बाब नाहीं. या देशांतील आयुर्मर्यादेप्रमाणें माझी आयुर्मर्यादा जवळ जवळ भरत आली आहे. दहा गेले, पांच उरले अशापैकीं माझी गोष्ट आहे, परंतु पुढील पिढ्या तुमच्या निर्णयाकडे निरखून पहातील व तुम्ही योग्य निकाल दिला कीं नाहीं हें ठरवितील, ही गोष्ट ध्यानांत ठेवा. मुद्रण-स्वातंत्र्याकरितां एतद्देशीय पत्रकर्त्यांनीं चालविलेल्या लढ्याच्या इतिहासांत तुम्हीं दिलेला निर्णय चिरस्मरणीय होऊन बसेल, तुमच्यावर मोठी महत्त्वाची जबाबदारी आहे. फिरून फिरून मी आपणांस सांगतों कीं, हा व्यक्तिविषयक प्रश्न नाहीं. जरी तुमच्यापैकीं एक गृहस्थ पुढें येऊन धिटाईनें असें म्हणेल कीं, मीं जें लिहिलें तें बरोबर आहे, तरी मला त्यापासून समाधान वाटेल." (स. टि. खंड ६, पान २८२.)

सारांश, १९०८ च्या खटल्यात टिळकांनी न्यायालयातच लोकमत व्यक्त करण्याच्या वर्तमानपत्रकारांच्या हक्कासाठी त्यांनी सुरू केलेल्या लढ्याचे नोकरशाहीस आव्हान दिले होते. त्याआधी नोकरशाहीला टिळकांनी लोकमताची दहशत अनेक शासकीय प्रकरणे लढवून बसविली होती. त्यांचे वर्णन पुढे एका प्रकरणात येईल. येथे स्पष्ट करण्याचा मुद्दा एवढाच की लोकमताचा प्रभाव, प्रतिष्ठा व दरारा टिळकांनी निर्माण केला होता. तसाच कायदा हा लोकमताची संमती घेऊन, त्याची कदर करून केला पाहिजे, हा मुद्दाही टिळकांनी उपस्थित केला होता. १९०१ साली मुंबई सरकारने जमीन–महसुलाच्या कायद्यात बदल करण्याचे घोषित केले, तेव्हापासून टिळकांनी हा उपक्रम सुरू केला. यातही प्रजापक्ष व सरकार यांच्यातील हा वादाचा मुद्दा आहे, असे कल्पून टिळक प्रजापक्षाच्या बाजूने उभे राहिले होते, आणि 'केसरी'तून त्यावेळी त्यांनी लिहिले होते, "हें बिल पास झालें असतां सावकार बुडणार आणि सरकारी धन होणार. पेनच्या एका झपाट्यानें लाखों शेतकऱ्यांचे मालकीहक्क बुडवून त्यास मजूरदार करणें राजकीयदृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या सारखेंच अपायकारक आहे." या बिलाविरुद्ध शेतकऱ्यांनी सरकारकडे अर्ज पाठवावे, सभा घ्याव्या, पुढाऱ्यांनी लोकमत संघटित करावे, असे टिळकांनी आवाहन केले. त्याचा उपयोग होऊन सरकारकडे मुंबई इलाख्यातून ९०० अर्ज आले. त्यापैकी ६३० अर्जांवर किमान ५२००० शेतकऱ्यांच्या सह्या होत्या, अशी माहिती केसरीतून टिळकांनी दिली. त्यांच्या अंदाजाप्रमाणे किमान लाख-दीड लाख लोकांनी आपले विरोधी मत व्यक्त केले. यावर सरकारने 'ही सावकारांची चळवळ आहे,' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली तेव्हा त्याला उत्तर देताना टिळकांनी लिहिले होते, " बिलाविरुद्ध झालेली चळवळ सावकारांनी केलेली आहे. स्टेट सेक्रेटरीसाहेबांचें हें म्हणणें ऐकून त्यांच्या धाष्टर्याची कोणासहि कल्पना होणार आहे. बिलाविरुद्ध ठिकठिकाणच्या शेतकरी लोकांकडून इतके अर्ज आले असतां या चळवळीस पुनः सावकारांची चळवळ म्हटलेलें पाहून कोणाचेंहि मनांत संताप उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. दुसरीकडे शेतकऱ्यांच्या सभेची जी हकिगत दिली आहे, तिजवरून शेतकऱ्यांचें खरें मत काय झालें आहे तें सहजच कळून येणार आहे. मुंबई सरकार तरी या चळवळीस 'सावकारांची चळवळ' समजत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. लोकमतास न जुमानतां जर हें बिल सरकार पास करून टाकणार असेल तर, फारच मोठी चूक होणार आहे, असें आम्हीं नम्रपणें सुचवितों. लोकांचें या बाबतींतील कर्तव्य काय हें आम्ही मागेंच कळविलें आहे. ह्या बिलाचें दुसरें वाचन होण्यास आतां अवकाश अगदीं थोडा राहिला आहे. तथापि, तें पास झाल्यास लोकांस जमीन नांगरणारे मजूर किंवा भिक्षेकरी बनावें लागेल. ही गोष्ट लक्षांत आणून अजूनहि ज्या गांवांतील लोकांनीं अर्ज वगैरे कांहीच केले नसेल त्यांनी 'हें बिल आम्हांस अगदीं नापसंत आहे. तें माघार घ्यावें' अशा अर्थाची तार तावडतोब येथें गव्हर्नरसाहेबांकडे

पाठविण्यास चुकूं नये. यावेळीं जर लोक कर्तव्य करण्यास हयगय करतील, तर त्याचे दुष्परिणाम त्यांस भोवल्यावांचून रहाणार नाहींत." (केसरी, २० ऑगस्ट १९०१.)

शेवटी मुंबई सरकारने हे बिल पास करून घेतले तेव्हा टिळकांनी म्हटले होते की, "लोकमत दुर्बल आहे, सरकारवर त्याचा पगडा बसण्याइतकें लोकांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण त्याकरितां स्वस्थ बसून उपयोगी नाहीं." अशा रीतीने लोकमताचे प्रकटीकरण व संघटन टिळकांनी सुरू केले. दुष्काळाच्या वेळीही हा उपक्रम त्यांनी केला होता. त्याची चर्चा पुढे एका प्रकरणात यावयाची आहेच.

लोकमताची कल्पना

त्यावेळी पराभव झाला तरी प्रजेचे मत ही राजकीय संकल्पना टिळकांनी रूढ केली व लोकमतापुढे राज्यकर्त्यांनी नमले पाहिजे, हा सतत आग्रह धरला. याचवेळी राजकीय दृष्ट्या आपल्याला लोकमताच्या आधारे बदल घडवून आणावयाचे, हे स्पष्ट करण्यासही त्यांनी सुरुवात केली होती. 'सनदशीर व कायदेशीर' या लेखात टिळकांनी हे मत व्यक्त केले होते. "आम्हांस दोन गोष्टी करावयाच्या आहेत. (१) लोकमत बदलणें आणि (२) सदर बदललेल्या लोकमताचा राजसत्तेस शह देणें. ही दुसरी गोष्ट विलायतेंत राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांस प्राप्त करून घ्यावयाची नसते, त्यांच्या देशांतील राजसत्तेच्या घटनेप्रमाणें, किंवा कॉन्स्टिटयूशन अगर सनदेप्रमाणें तो हक्क त्यांना मिळालेलाच असतो; आणि त्यामुळें तो हक्क बजावण्यास लोकमत बदलण्याचा ते जो प्रयत्न करतात तो त्यांच्या देशांतील राजसत्तेच्या घटनेला अनुसरून म्हणजे कॉन्स्टिट्यूशनल अगर सनदशीरच समजला जातो. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास कॉन्स्टिट्यूशनप्रमाणें लोकमताचा पगडा राजसत्तेवर असतोच व त्यामुळें लोकमत बदललें हे त्या कॉन्स्टिटयूशनला धरून किंवा सनदशीर होतें. आमची म्हणजे हिंदी प्रजेची गोष्ट तशी नाहीं. हिंदुस्थानांतील राजसत्ता अनियंत्रित आहे, लोकमताचा तिजवर कॉन्स्टिटयूशनप्रमाणें पगडा नाहीं. किंबहुना हा पगडाच कसा संपादन करावयाचा हाच मुख्य प्रश्न आहे." (केसरी, ५ मार्च १९०७, स. टि. खंड ४, पान ४५२.)

लोकमताकडून लोकसंघर्षाकडे

कायद्याला लोकमताची संमती पाहिजे. पण त्यासाठी राज्यपद्धती बदलावी लागते, ही टिळकांची भूमिका होती. जेथे नोकरशाहीची अधिकारशाही आहे, जेथे नोकरच राजे झालेले आहेत, अशा देशात लोकांना हक्क हवे असतील तर बेकायदेशीर कायदा मोडून त्यासाठी दिली जाणारी शिक्षा भोगून प्रतिकार केला पाहिजे, हे टिळक सांगत होते. ज्या देशात घटनाच नाही तेथे घटनात्मक राजकारण असूच शकत नाही, हे टिळक गोखल्यांना त्यावेळी सांगत होते. 'सनदशीर व कायदेशीर' या लेखात त्यांनी

म्हटले होते, "हल्लींच्या स्थितींत कायदा करणें आमच्या हातचें नाहीं. तेव्हां आमचे प्रयत्न इतिहासास, मामुली वहिवाटीस, प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस धरून नीतिदृष्ट्या जरी योग्य असले, तरी ते 'कायदेशीर' किंवा 'बेकायदेशीर' ठरविणें ही केवळ सरकारच्या इच्छेची गोष्ट आहे...अशा वेळीं आमचे प्रयत्न बेकायदेशीर असे म्हणण्यापेक्षां कायदा जुलमी असें म्हणणें भाग पडेल...आतां एवढें खरें कीं, कायदा मोडला गेला तर शिक्षा होणारच. परंतु कायदा जर जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे; एरवीं इलाज नाहीं. नीति आणि कायदा यांची जेव्हां फारकत होते तेव्हां असेच प्रकार घडून यावयाचे." (केसरी, दि. ५ मार्च १९०७, स. टि खंड ४, पान ४५५.)

प्रतिकाराची सिद्धता

लोकमताला धुडकावून कायदा केला गेला तर काय करावयाचे, या प्रश्नाला टिळकांनी दिलेले हे उत्तर होते. लोकांना स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष करावा लागेल, हेही टिळक लोकांना सांगत होते. "हक्क मिळविण्याला कारण तुमचा निश्चय होणार आहे एवढें बस्स आहे. अंतःकरणें जळत असतील, तर सरकारास दहा वर्षांत हक्क द्यावे लागतील, अशा तऱ्हेचा मार्ग स्वीकारावा लागेल. हा मार्ग कांट्यांचा आहे. आम्हीं निश्चय केला तर अशक्य नाहीं, तुम्ही इंग्रज सरकारचें राज्य आपणहून चालवीत आहांत. तुमच्या हातून जुलूम करण्याची हातोटी सरकारास साधली आहे. याकरितां ज्या वेळीं तुम्ही एकजुटीनें प्रयत्न कराल त्या वेळीं हें राज्य तुमचेंच आहे." (स. टि. खंड ६, पान ७३८). "सरकारवर रुसून बसा....रुसाल तें मनासारखें घडून येईपर्यंत रुसा, गोष्ट शेवटाला लागेपर्यंत रुसा. मग सरकार कितीहि बलाढ्य असो. ते तुम्हांला 'काय पाहिजे' म्हणून येऊन विचारील...रुसणें बेकायदेशीर नाहीं." (स. टि. खंड ६, पान ७३४.)

लोकराज्य व स्वराज्य

टिळक ज्या स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क मागत होते त्यात लोकांचे स्थान काय होते? टिळकांच्या राजकीय सिद्धांताचे हे दुसरे टोक होते. त्याची चर्चा टिळकांनी 'स्वराज्य व सुराज्य' या लेखात केली होती. त्यात ते म्हणाले होते, "स्वराज्य म्हटलें म्हणजे अनेक तऱ्हेच्या कल्पना मनामध्यें उभ्या राहातात. स्वराज्यातील 'स्व' शब्दाचा अर्थ निवळ स्वदेशी राजाचें राज्य असा नव्हे, तर 'स्व' म्हणजे प्रजा ह्यांच्या तंत्रानें चाललेलें राज्य असा होय. लोकांच्या तंत्रानें व त्यांच्या हिताकरितां तें राज्य चाललें पाहिजे. आज सर्वत्र जी चळवळ चालू आहे, ती प्रजेचा पगडा राज्यकारभारावर असावा एवढ्याकरितांच होय, आणि त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या लोकांस थोडें-

बहुत यशहि येत चाललें आहे. आम्हांसहि तीच गोष्ट प्राप्त करून ध्यावयाची आहे... सुराज्यानें स्वराज्याची वाण भरून येत नाहीं असें जें म्हणतात त्याचा अर्थ हाच होय." (केसरी, ९ एप्रिल १९०७, स. टि. खंड ४, पान ६३–६४.):.१९१५ साली ही टिळकांनी हिंदी स्वराज्य संघावर जी लेखमाला लिहिली त्यातही याचाच पुनरुच्चार केला होता. त्यांनी लिहिले होते, "लोकांचें खरें सौख्य कोणत्या प्रकारच्या राज्य-व्यवस्थेंत आहे असा प्रश्न निघाल्यास इतिहास किंवा दूरदर्शी शहाणपणा यांचें त्यास एकच उत्तर आहे. तें हें कीं, लोकांच्या सल्ल्यानें जी राज्यव्यवस्था चालते तीच त्यांस हितावह व प्रिय असते." (केसरी, ३० नोव्हेंबर १९१५.)

सारांश, टिळकांनी आपल्या राजकीय जीवनाच्या प्रारंभी राजा विरुद्ध प्रजापक्ष ही भूमिका घेऊन लोकपक्षाची, लोकमताची संकल्पना रूढ करून लोकमताभोवती आपले सर्व राजकारण केंद्रित केले. वृत्तपत्रे ही लोकमताची संवाहक असतात नि पत्रकारांना ते लोकमत व्यक्त धरण्याचा अधिकार आहे, नव्हे, त्यांचे ते कर्तव्य आहे हे नोकरशाहीला बजावले व लोकमताचा वचक व दहशत निर्माण केली. कायदे करताना लोकमताची कदर केली पाहिजे, हे राज्यकर्त्यांना सांगितले. लोकमत दुर्लक्षून कायदा केला तर त्याचा नैतिकदृष्ट्या प्रतिकार केला पाहिजे, या कल्पनेपर्यंत टिळक पोचले. 'स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क आहे' हे सांगताना 'लोकांच्या सल्ल्यानें चालणारें तेंच स्वराज्य' ही कल्पना टिळक मांडू लागले. भारतातील राजकारणात लोकयुग निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी आपल्या विचार-प्रतिपादनातून, राजकीय आंदोलनातून केले. म्हणूनच टिळक हे राजकारणातील लोकयुगाचे निर्माते ठरले.

६

राजकीय असंतोषाची पेरणी

"जो ओरड करीत नाहीं, तो संतुष्ट, असा या राज्याचा सिद्धांत आहे. तुम्हांला ज्या गोष्टी जाचत असतील त्यांची ओरड केल्याशिवाय या काळीं दाद लागणें शक्य नाहीं," असे टिळक एकदा म्हणाले होते. (वरणगाव येथील भाषण, २३ फेब्रुआरी १९१८, स. टि. खंड, ६, पान ६०१.) लोकमताची उठावणी केली तर राज्ये कोसळतात, ही टिळकांची श्रद्धा होती. ब्रिटिश राज्याचे प्रतीक असलेली नोकरशाही हे टिळकांचे पहिले लक्ष्य होते. 'ब्रिटिश राज्याचीं सर्व दुबळीं अंगें टिळकांनीं अभ्यासलीं आहेत आणि टिळक हेच भारतातील इंग्रजी राज्याविरुद्ध रचल्या गेलेल्या कटाचे मुख्य सूत्रधार आहेत;' असे मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनी १९०८ साली टिळकांवर केलेल्या खटल्याचे समर्थन करण्यासाठी भारतमंत्री मोर्ले यांना लिहिलेल्या गुप्त पत्रात म्हटले होते. सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनी 'भारतातील असंतोषाचे जनक' असे टिळकांचे सार्थ वर्णन केले होते, तर या गव्हर्नरांनी टिळकांच्या राजकीय आकलनशक्तीचे नेमके वर्णन केले होते. फरक एवढाच होता की, टिळक ज्या ब्रिटिशविरोधी कटाचे सूत्रधार होते, तो गुप्त नव्हता. ते साम्राज्यशाहीविरुद्ध त्यांनी पुकारलेले उघड युद्ध होते. टिळकांचे राजकीय तत्त्वज्ञान व त्यांची ब्रिटिशविरोधी व्यूहरचना ही लोकांना बरोबर घेऊन जाणारी होती. भारतीय राष्ट्रवादाचाच साम्राज्यशाहीशी सुरू झालेला तो संघर्ष होता.

टिळकांनी १९०६ एप्रिलमध्ये 'विश्ववृत्त' मासिकात लिहिलेल्या 'आशेची निराशा व निराशेची आशा' या त्यांची राजकीय दिशा दाखविणाऱ्या लेखात आपल्या पूर्वीच्या

पिढीचे राजकारण कसे कुंठित झाले आहे व आता राजकारणाला नवे वळण कसे द्यावयास हवे, याचे उत्कृष्ट विवरण केले होते. " हिंदुस्थानांतील जिंकलेल्या प्रजेस साम्राज्याच्या नागरिकांचे पूर्ण हक्क न देतां अर्धवट किंवा पुरे पंगु आणि निःसत्त्व करून ठेवणें हेच साम्राज्याच्या दृष्टीनें खऱ्या मुत्सद्दीपणाचें काम होय. अशा विचाराचा तूर्त सर्व गोऱ्या लोकांत संचार व फैलाव झालेला आहे." (स. टि. खंड ३, पान १११.) हा टिळकांचा निष्कर्ष होता व राज्यकर्ते उदार बुद्धीने काही हक्क भारतीयांना देतील, ही आशा सोडून निराश न होता निर्वाणीच्या धैर्याने राजकीय चळवळीस आता निराळे वळण लावले पाहिजे, असे टिळकांनी त्या लेखात सांगितले होते.

संघर्षाची तयारी

सारांश, 'समजुतीच्या, न्यायाच्या किंवा विनंतीच्या मार्गाने आता नोकरशाही अधिकार देण्यास तयार होणार नाही. अधिकारीवर्ग बेगुमानपणे व बेफाम रीतीने वागत आहे. म्हणून संघर्ष अटळ आहे, त्याच्या तयारीस लागले पाहिजे,' ही टिळकांनी भूमिका घेतली होती. १८९५ ते १८९८ या काळात टिळकांनी महाराष्ट्रांत दुष्काळ-निवारण, प्लेग, आदि सार्वजनिक संकटांच्या वेळी लोकपक्षाची भूमिका निर्भयपणे मांडून या लढ्याचा प्रारंभ केला होता. १८९८ साली त्यानिमित्त तुरुंगवास भोगून बाहेर आल्यावर टिळकांच्या राजकीय जीवनातील संघर्षाचा दुसरा कालखंड सुरू झाला होता. १९०८ साली दुसऱ्या राजद्रोहाच्या खटल्यात टिळकांना जी ६ वर्षांची शिक्षा झाली त्यावेळी टिळक हे अखिल भारतीय नेते झाले होते. ते भारतीय असंतोषाचे जनक झाले ते याच काळात. काँग्रेस हे त्यांचे त्यावेळचे आयुध होते. काँग्रेसच्या मार्फत टिळक राष्ट्रीय व्यासपीठावर आले होते. काँग्रेसलाच लढाऊ राज-कारणाची भूमिका घेण्यास टिळकांनी भाग पाडले. याच काळात टिळक हे युद्धमान भारतीय राष्ट्रवादाचे झुंझार प्रतीक झाले. टिळक ही भारतीय क्रांतितेजाची मूर्ती झाली. या काळात टिळकांनी कोणती तात्त्विक भूमिका घेतली होती? क्रांतिवादी राष्ट्रवादाचा कोणता तत्त्वविचार टिळकांनी मांडला होता? हे पाहण्यासारखे आहे.

इंग्रजी राज्याविषयीची भूमिका

टिळकांची इंग्रजी राज्याविषयीची भूमिका हाच टिळक व जुना पक्ष यांच्यातील मतभेदाचा पहिला मुद्दा होता. टिळकांचे आकलन स्पष्ट होते. टिळकांचे म्हणणे होते की, 'भारतातील इंग्रजी सत्तेचे तीन आधार आहेत. पहिला ब्रिटिश बादशहा, दुसरा ब्रिटिश जनता व तिचे प्रतिनिधित्व करणारे पार्लमेंट आणि तिसरा भारतातील नोकर-शाही. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल संपून ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. ब्रिटिश राज्याच्या वतीने इंग्रज नोकरशहा

भारतावर राज्य करू लागले. या राज्यावर पार्लमेंटचा तत्त्वतः दावा असला तरी प्रत्यक्षतः बेजबाबदार व जुलमी पद्धतीने नोकरशाहाच भारतात राज्य करीत आहेत. ही नोकरशाही बेजबाबदार व अनियंत्रित आहे. भारतात होत असलेल्या राष्ट्रवादी चळवळीला ती दडपून टाकत असून तिने या कामी इंग्रजी वर्तमानपत्रांना हाताशी धरले आहे. ब्रिटिश भांडवलदार व कारखानदार यांच्या आर्थिक हितसंबंधांत ती गुंतलेली आहे. म्हणून भारतीय जनतेला राज्यकारभारात सहभागी करून घेणे हाच ब्रिटिश नोकरशाहीची सत्ता नियंत्रित करण्याचा एकमेव मार्ग आहे. भारतातील संघर्ष इंग्रज नोकरशाही व भारतीय जनता यांच्यातील आहे.' टिळकांचे असंतोषाचे व निषेधाचे सर्व राजकारण त्यांच्या या समजुतीवर आधारलेले होते. मागच्या प्रकरणात १९०८ च्या खटल्यातील टिळकांच्या बचावाच्या भाषणाचा जो सारांश दिला आहे, त्यात त्यांनी हाच मुद्दा निर्भयपणे मांडलेला होता. उघड उघड टीकेने इंग्रज अधिकारी चिडत व त्यांनी जो जुलमी व निरंकुश सत्तेचा अंमल चालविला होता, त्याविरुद्ध लोकमत तयार होत जाई. ब्रिटनमध्येही त्याचे पडसाद उमटल्याविना राहात नसत. इतकेच नव्हे तर आशियांतील इतर राष्ट्रवादी चळवळींशीही टिळक त्याचा संबंध जोडीत होते.

आशियाई राष्ट्रवादाची पार्श्वभूमी

भारतातील वर्धिष्णू राष्ट्रवादाचा संघर्ष ब्रिटिश साम्राज्यवादाशी आहे, पण तो संघर्ष केवळ भारतापुरताच मर्यादित नाही, राष्ट्रजागृती होत असलेल्या इतर आशियाई देशांशीही तो संबंधित आहे, ही पार्श्वभूमी टिळकांनी लॉर्ड कर्झनवरील अग्रलेखात स्पष्ट केली होती. कर्झन हे ब्रिटिश साम्राज्यवादाच्या अहंकाराचे नोकरशाहीतील प्रतीक होते. त्यांचे वर्णन करताना टिळक म्हणाले होते, " जें काय करूं तें आम्ही म्हणजे लोक करूं, हिंदुस्थानावर सदैव राज्य करण्याची सनद परमेश्वरानें त्यांस दिली आहे, हिंदुस्थानांतीलच नव्हे तर आशिया खंडांतील लोकांनीं पश्चिमात्य राष्ट्रांच्या चिरकालीन दास्यत्वांत राहणें यांतच त्यांचा तरणोपाय आहे; या मगरमिठींतून सुटण्याची त्यांनीं कधींहि आशा धरूं नये. केल्यास ती सफळ होण्याचा बिलकुल संभव नाहीं; अशा तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षेनें घेरलेले किंवा पछाडलेले हे तरुण व्हाइसरॉय जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या कारकीर्दीत आम्हांवर काय काय संकट ओढवतें याची आम्हांस बरीच काळजी पडली होती...सात वर्षांपूर्वी आशिया खंडांतील देशांची जी दीनवाणी स्थिति होती ती जाऊन जपानच्या विजयानें आजमितीस सदर राष्ट्रांच्या मनांत आपल्या उत्कर्षाचा अंकुर उद्भवून तो वाढीस लागला आहे. सारांश, गेल्या सात-आठ वर्षांच्या आशिया खंडाच्या इतिहासाकडे लक्ष दिलें, तर लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या पुस्तकांतून जी भाकिते केलीं आहेत तीं बहुतेक खोटीं ठरल्यासारखीं झाली आहेत व

दिवसेंदिवस अधिक होत आहेत. अशा स्थितींत कोणाहि विचारी पुरुषाच्या मनांत आपल्या मतांवद्दल शंका निर्माण झाली असती; पण लॉर्ड कर्झन यांचा स्वभावच निःशंक पडल्यामुळें त्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या ऐतिहासिक गोष्टीचा विचार न करतां आपल्या राज्यकारकीर्दीचें धोरण पूर्वी ठाम केलेल्या मतांप्रमाणेंच चालवून हिंदुस्थानच्या उन्नतीची गाडी आपल्या हातून होईल तितकी मागें सारण्याचा प्रयत्न केला आहे. अशा कृत्रिम दाबादाबीनें राष्ट्राची पीछेहाट होण्यापेक्षां त्याच्या अंगीं असलेल्या वाढीच्या शक्तीस अधिक उसळी येते, असा ऐतिहासिक अनुभव आहे."(केसरी, २९ ऑगस्ट १९०५, स. टि. खंड ३, पान ८८५–८८६.)

सगळे ब्रिटिश सारखेच !

साम्राज्यवादी नीतीबाबत टिळकांचा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत असा होता कीं, ब्रिटनमधील कॉन्झर्वेटिव्ह वा लिबरल कोणताही पक्ष घेतला तरी हिंदुस्थानातील इंग्रजी राज्याबाबतचे त्याचे धोरण एकच असते. त्यांनी म्हटले होते, "दोघांच्याहि हातांचीं बोटें लोखंडाच्या सळईइतकीं बळकट व कडक आहेत. भेद एवढाच कीं, एक आपली वज्रमुष्टी उघडी ठेवून आमच्या डोळ्यांपुढें तिचें वारंवार प्रदर्शन करितो आणि दुसरा आपल्या लोहमय मुष्टीवर मखमलीचा मऊ हातमोजा चढवून मुष्टीचें वज्ररूप हरएक वेळीं आमच्या नजरेपुढें आणीत नाहीं...हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यसत्ता अबाधित चालली पाहिजे, अर्थात् हिंदुस्थानास एकराष्ट्रीयत्व जितकें कमी होईल तितकें चांगलें हें तत्त्व दोन्ही पक्षांसहि एकसारखेंच मान्य आहे; आणि म्हणूनच कितीहि विनवण्या केल्या तरी नुसत्या विनवणीनें कोणत्याहि पक्षाकडून महत्त्वाचे किंवा फायदेशीर हक्क आम्हांस मिळणें दुष्कर होय." (केसरी, २२ मे १९०६, स. टि. खंड ३, पान ९००–९०१.) ब्रिटिश मुत्सद्यांचे हिंदुस्थानाविषयीचे धोरण एकच असते, हा मुद्दा मांडताना टिळकांनी आणखी एकदा लिहिले होते, "इंग्रजी राज्याचें विलायत हें आदिपीठ तर खरेंच; पण हिंदुस्थान हा त्या साम्राज्याचा आशिया खंडांतील मेरू असून युरोपियन राष्ट्रांचीं एशिया खंडांतील सर्व कारस्थानें या मेरूभोंवतीं फिरावयास लावावीं ही महत्त्वाकांक्षा इंग्रजी मुत्सद्यांत पूर्णपणें वास करीत आहे व गेल्या कांहीं वर्षांत म्हणजे लिबरल पक्ष पडल्यापासून अशा प्रकारच्या महत्त्वाकांक्षेस विशेष जोर येत चालला आहे." (केसरी, २५ फेब्रुआरी १९०२, स. टि. खंड ३, पान ५८.)

ब्रिटिश नीतीतील अंतर्विरोध

परंतु दोन्ही पक्षांच्या ब्रिटिश राजनीतीविषयींच्या धोरणांत मूलभूत तात्त्विक फरक असल्याने उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे सोंग घेणाऱ्या लिबरल पक्षाला आपल्या साम्राज्यवादी धोरणाचे समर्थन नैतिकदृष्ट्या कठीण जाई. त्यात एक अंतर्विरोध व विसंगती

असे. टिळकांनी या विसंगतीवर सतत प्रकाशझोत टाकून त्यातील ढोंग लोकांपुढे मांडले. जे मवाळ पक्षीय अशा लिबरल पुढाऱ्यांवर विश्वास ठेवून आपले धोरण ठरवीत असत, त्यांची राजकीयदृष्ट्या त्यांना गैरसोयीची असणारी भूमिका कशी चूक आहे, हे टिळक सतत मांडीत असत. जॉन मोर्ले हे भारतमंत्री असताना टिळकांनी टीकेची संततधार त्यांच्यावर धरली होती. मोर्ले यांच्या वेदांतावर झोड उठविताना टिळकांनी लिहिले होते, " लोकव्यवहारांतील गोष्टी धर्मबुद्धीनें चालत नसतात. स्वार्थ हा एकटाच या व्यवहाराचा नियमन करणारा राजा किंवा बादशहा आहे असें म्हटलें तरी चालेल...मुत्सद्दी आणि योद्धा ह्यांमध्ये जसा एक प्रकारचा फरक आहे तसाच मुत्सद्दी व तत्त्ववेत्ता यांमधील भेद होय. मोर्लेसाहेब अधिकारारूढ झाले म्हणजे गरीब हिंदुस्थानला कांहीं हक्क मिळतील अशी जी आम्ही आशा करीत होतों ती वरील भेद विसरल्यामुळें किंवा माहीत नसल्यामुळें करीत होतों. हा भेद इंग्रज लोकांस पक्का समजतो व म्हणूनचे मोर्लेसाहेब स्टेट-सेक्रेटरी झाल्यावर त्यांच्यापैकीं कित्येकांस हे मुत्सद्दी कसे काय होतात याची चिंता पडली होती. पण बंगालची फाळणी लोकमताविरुद्ध असली तरी, ती कायम ठेवली पाहिजे, असें जेव्हां त्यांनीं निक्षून उद्‌गार काढले, तेव्हां विलायतेंतील व येथील इंग्रजांस कळून चुकलें कीं, 'बेटा तत्त्ववेत्ता तर खराच पण मुत्सद्दीहि आहे!'...हातांत घेतलेल्या विषयाला मोहक स्वरूप कसें द्यावें आणि स्वार्थाला सजवून क्षणभर तरी परमार्थाचें स्वरूप कसें आणावें या बाबतींत मात्र तत्त्वज्ञाच्या विद्वत्तेचा–तो खरा मुत्सद्दी असेल तर–चांगला उपयोग होतो. बाकी मुत्सद्दी म्हटला म्हणजे त्याला मणभर तात्त्विक विचार एका बाजूस ठेवून व्यवहारदृष्ट्या साध्यासाध्यतेचा व शक्याशक्यतेचा विचार करावा लागतो...आमचें तर स्पष्ट असें मत आहे कीं, मि. मोर्ले हे आपणांस कांहीं महत्त्वाचे हक्क देतील अशी जी कित्येकांची आशा आहे ती अगदीं व्यर्थ होय...हें राजकारस्थान आहे, तत्त्वज्ञान नव्हे, ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये; आणि ती न विसरतां जर आम्हीं उद्योग केला, तरच त्यांत आपणांस केव्हां ना केव्हां तरी यश येईल. खरें राजकारण, खरें देशकार्य यांतच आहे आणि हाच आपल्या खऱ्या उन्नतीचा मार्ग होय." (केसरी, १८ सप्टेंबर १९०६, स. टि. खंड ३, पान ९०६, ९०७, ९०९.)

उदारमतवाद्यांचे राजकीय डावपेच

उदारमतवादी नेत्यांचा राजकारणात फूट पाडण्यासाठी कसा उपयोग करून घेण्यात येत आहे, याच्यावर 'केसरी' ने प्रकाश टाकला होता. मोर्ले यांचे पार्लमेंटातील भाषणच त्यांनी एका अग्रलेखात उद्‌धृत केले होते. " मोर्लेसाहेब असें म्हणतात, ही (राष्ट्रीय) चळवळ वरवर दिसणारा फेस आहे कां खरोखर बुडापर्यंत पोहोचलेली प्रचंड लाट आहे, हें अद्याप ठरलेलें नाहीं. तथापि ही चळवळ हाणून पाडण्यास आम्ही

चळवळ करणारांचे पाठींत लाकडें मारण्याचे कायदे करीत असून शिवाय दुसरी एक युक्ति काढली आहे. ती युक्ति म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व नेमस्तांपुढें कांहीं तुकडे टाकून आमचे सभोवार गोळा करून नेमस्तांनीं राष्ट्रीय पक्षाचे परस्पर लचके तोडावे ही होय. मि. मोर्ले ह्यांनीं आपल्या भाषणांत उघडपणें असें सांगितलें आहे कीं, राष्ट्रीय पक्षास हाणून पाडण्याकरितां नेमस्तांना आम्हीं आमचे सभोवार गोळा करणार व आजच ही युक्ति फलद्रूप जरी झाली नाहीं तरी थोडी अधिक लालूच दाखवून त्यांच्या तोंडांत आमचा लगाम अडकविल्याशिवाय आम्ही राहाणार नाहीं. मासा गळीं सापडावा म्हणून गळाला जसें थोडें आमीष लावलेलें असतें त्याप्रमाणें नेमस्त गळीं सापडावे म्हणून कायदेकौन्सिलाची सुधारणा व बड्यांचीं सल्लागार मंडळें आम्हीं निर्माण केलीं आहेत. या सुधारणा कायमच्या नसून तात्पुरत्या म्हणजे मासा कितपत गळीं सापडतो हें पहाण्यापुरत्या आहेत. त्या आमिषाला भुलून जर नेमस्त पुढारी राष्ट्रीय सत्तेवर भुंकू लागले तर ठीकच झालें. पण एवढ्यानें न भागल्यास खरा अधिकार आज हातीं यावयाचा नाहीं व पुढेंहि नेटिवांच्या हातीं न जाईल असा बंदोबस्त ठेवावयाचा हें तत्त्व ध्यानांत ठेवून थोडासा अधिक पिंड नेमस्तांच्या पुढें टाकूं." (केसरी, २९ ऑक्टोबर १९०७.)

ब्रिटिश परंपरेतील अद्वैत

टिळकांनी १९०८ च्या खटल्याचे वेळी बचावाचे जे भाषण केले त्यांत 'ब्रिटन-मधील विचारस्वातंत्र्याचे हक्क मी मागत आहे,' असे म्हटले होते. ब्रिटिश जनतेच्या स्वातंत्र्यप्रेमाला हे आवाहन होतेच, पण त्यांच्या स्वदेशात एक नीती व वसाहतीय देशात दुसरीच नीती आहे, हेही त्यांना ध्वनित करावयाचे होते. टिळक त्या भाषणात म्हणाले होते, "डीन ऑफ सेंट असाफच्या खटल्यांत ज्याच्याकरितां अर्स्किनसाहेब निकरानें झगडले तोच प्रश्न आज आपणांपुढें आहे. १७९२ त ज्याच्याविषयीं विलायतेंत इतकें रण माजलें तोच हा प्रश्न आहे. त्या रणसंग्रामांत जे इंग्रज वीर लढले त्यांस १८ व्या शतकांत विजयश्रीनें माळ घातली व त्यांनीं संपादन केलेलें मुद्रण-स्वातंत्र्य त्यांचे हल्लीचे इंग्रज वंशज आज उपभोगीत आहेत. हाहि खटला त्याच मासल्याचा आहे. म्हणून या प्रश्नाचा शांत चित्तानें विचार करा, इतकेंच माझें आपणां-पाशीं मागणें आहे. मराठी भाषा येत नसल्यामुळें तुमची गैरसोय झाली आहे हें मी जाणून आहे; परंतु मराठी जाणणाऱ्या ज्यूरीपाशीं नाहीं अशी एक सोय आपणांपाशीं आहे आणि ती म्हटली म्हणजे परंपरागत चालत आलेल्या संप्रदायांचा तुमच्या ठायीं वसत असलेला तुमचा अभिमान! पुष्कळ काळपर्यंत निकरानें झगडून तुम्हीं आपल्यास मुद्रण-स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें आहे आणि आमच्या लोकांपेक्षां तुमच्या लोकांना या स्वातंत्र्याची किंमत अधिक वाटते, असा मला पूर्ण भरंवसा आहे. एका बाजूस

लोकांचा पक्ष व दुसऱ्या बाजूस प्रचंड सामर्थ्यवान अधिकारीवर्ग यांच्यामध्यें निकराचा लढा सुरू झाला आहे. तेव्हां या देशांतील राज्यकारभाराचा कांहीं भाग आमच्या वांट्यास यावा अशा प्रकारच्या आमच्या खटपटींत आम्हांस – मला व्यक्ति या नात्यानें नव्हे–सर्व हिंदुस्थानवासियांस आपलें पाठबळ द्या, असें आपणांपाशीं माझें मागणें आहे. प्रसंग मोठा आणीबाणीचा प्राप्त झाला आहे, आम्हांस मदतीची अपेक्षा आहे; आणि ती देण्याची संधि आपल्या हातीं आलेली आहे. माझें एकट्याचें हित म्हणजे मोठी बाब नाहीं. या देशांतील आयुर्मर्यादेप्रमाणें माझी आयुर्मर्यादा जवळ जवळ भरत आली आहे. दहा गेले, पांच उरले, अशापैकीं माझी गोष्ट आहे, परंतु पुढील पिढ्या तुमच्या निर्णयाकडे निरखून पाहातील व तुम्ही योग्य निकाल दिला कीं नाहीं हें ठरवतील, ही गोष्ट ध्यानांत ठेवा. मुद्रण-स्वातंत्र्याकरितां एतद्देशीय पत्रकर्त्यांनीं चालविलेल्या लढ्याच्या इतिहासांत तुम्हीं दिलेला निर्णय चिरस्मरणीय होऊन बसेल, तुमच्यावर मोठी महत्त्वाची जबाबदारी आहे. फिरून फिरून मी आपणांस सांगतो कीं, हा व्यक्तिविषयक प्रश्न नाही. जरी तुमच्यापैकीं एक गृहस्थ पुढें येऊन धिटाईनें असें म्हणेल कीं, मीं जें लिहिलें तें बरोबर आहे, तरी मला त्यापासून समाधान वाटेल." (स. टि. खंड ६, पान २८२.)

नोकरशाहीची उर्मट प्रतीके

टिळकांनी 'हिंदुस्थानातील असंतोष हा ब्रिटिश जनतेविरुद्ध नसून गेल्या १५० वर्षांतील जुलमी सत्तेविरुद्ध आहे,' असे सांगितले व इंग्रजी राज्यात जुलूम कसा होतो, हे सांगण्यास सुरुवात केली. वेडरबर्न यांच्या लेखाच्या आधारे टिळकांनी हा मुद्दा १८९३ मध्ये एका लेखात प्रथम मांडला होता. इंग्रजी राज्यव्यवस्थेतील विविध खाती हा जुलूम कसा करीत आहेत याच्यावर तपशीलवार व प्रसंगोपात चर्चा त्यांनी पुढेही सतत केली. त्या लेखात टिळकांनी म्हटले होते, "एखाद्या अधाशी राजाप्रमाणें लोकांचें सर्व स्वातंत्र्य व अधिकार सरकारचीं निरनिराळीं खातीं पूर्णपणें बळकावून बसलीं आहेत. या राक्षसी खात्यांच्या जुलमांतून देवतेची सुटका होईल अशी योजना करणें हे विलायतेंतील लोकांचें पहिलें कर्तव्य आहे." टिळकांनी सरकारी कारभारांतील अनेक गैरप्रकार उघडकीस आणून नोकरशाहीचे खरे स्वरूप लोकांपुढे मांडावयास सुरुवात केली. वेळोवेळी इंग्रजी पत्रकार, विचारवंत किंवा माजी सनदी नोकर ब्रिटिश राज्यासंबंधी विचार प्रकट करीत असत, त्यांचा अनुवाद प्रसिद्ध करून टिळक ब्रिटिश नोकरवर्गावर सतत प्रकाशझोत टाकीत असत. सर रिचर्ड गार्थ नावाच्या कलकत्त्याच्या निवृत्त न्यायाधीशांनी हिंदुस्थानातील नोकरशाहीसंबंधी जो लेख लिहिला होता त्याचा अनुवाद टिळकांनी असाच प्रसिद्ध केला होता. त्यात म्हटले होते, "सर रिचर्ड गार्थ यांचे म्हणणें असें कीं, लोकांमध्ये असंतोष निर्माण होण्यास सरकारी अधिकाऱ्यांचें

गैरवर्तन हें मुख्य कारण होय. लोकांच्या मतांची व रीतीभातींची कांहीं एक पर्वा न करितां मनःपूत वर्तन करण्याचा मोठमोठ्या युरोपियन अधिकाऱ्यांनीं विडाच उचलला आहे असें दिसतें. लोकांचे हक्क बुडवावे, त्यांची स्वतंत्रता काढून घ्यावी, त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करावें आणि न्यायाच्या कोर्टानें केलेले ठरावहि धाब्यावर बसवून लोकांचें म्हणणें सर्वस्वीं झुगारून द्यावें असा अधिकाऱ्यांचा हल्लीं क्रम आहे. व हिंदुस्थानच्या लोकांपेक्षां ज्या ठिकाणीं कमी राजनिष्ठ लोक असतील तेथें आपली झोटिंगपाच्छाई कधींहि चालावयाची नाहीं. इंग्लंडांतील लोकांना याचा अनुभव नाहीं. यामुळें त्यांना वरील म्हणणें कदाचित् वरोवर वाटणार नाहीं." रिचर्ड गार्थ यांनी म्हटल्याप्रमाणें जे उन्मत्त व उर्मट नोकरशहा व पदाधिकारी होते त्यांच्यावर टिळक टीकास्त्र सोडीत असत. असंतोषनिर्मितीचे त्यांचे ते एक तंत्र होते.

निर्भय चिकित्सा

टिळकांनी या दृष्टीने लॉर्ड हॅरिस, लॉर्ड सँड्हर्स्ट, लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींचा निर्भीडपणे आढावा घेणारे लेख लिहिले होते त्यावरून त्यांची वैचारिक भूमिका व जनहितावर त्यांचे असलेले लक्ष यांचा प्रत्यय येतो. या गव्हर्नरांची आरती ओवाळणारे जे हांजी-संप्रदायाचे भारतीय नेते होतें त्यांच्यावरही टिळकांनी कडक टीकास्त्र सोडले होते, त्यात मोठमोठी मंडळी सापडली. या टीकेमागची टिळकांची भूमिका समजून घेतली पाहिजे.

लॉर्ड हॅरिस यांच्या मुंबईच्या गव्हर्नरपदाची कारकीर्द कशी होती, हे सांगताना टिळकांनी म्हटले होते, "ज्या पुणें शहरांतील दंगे लॉर्ड हॅरिस यांच्या राज्यकारभार करण्याच्या वाईट पद्धतीनें उपस्थित झाले, जेथील हिंदु लोकांस राजद्रोही हें विशेषण मिळालें आहे आणि जज्ज व ज्यूरी यांनीं सोडून दिलें असतांहि खटल्यांत सांपडलेल्या जेथील हिंदु लोकांवर पुनः हायकोर्टात काम चालविण्यास सरकार तयार झालें आहें; किंवहुना ज्या शहरावर प्युनिटिव्ह ऊर्फ जादा पोलिसांची धाड यावयाची आहे, व येथील सार्वजनिक सभेची आज होत असलेली मानहानि आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहात आहोंत, तेथील ब्राह्मणांपैकीं दोन तरी गृहस्थ लॉर्ड हॅरिस यांच्या स्मारकाच्या सभेस, खासगी नात्यानें कां होईना, पण जाण्यास तयार व्हावे हें महाराष्ट्राची राजधानी म्हणवणाऱ्या पुणें शहरांतील लोकांस अत्यंत लांच्छनास्पद नव्हे काय?" लॉर्ड हॅरिस यांनी उघडपणे शिव्या दिल्या होत्या, असे असताना त्यांचा गौरव करण्याची काही लोकांना बुद्धी झाली, त्याचीं कारणे सांगताना टिळकांनी म्हटले होते, "शास्त्रांत पिते तरी अनेक प्रकाराचे सांगितले आहेत. कोणी जन्म देतो म्हणून पिता, कोणी विद्या देतो म्हणून, कोणी मुंज करतो म्हणून; कोणी नोकरी देतो म्हणून; कोणी भाकरी देतो म्हणून आणि ह्याच न्यायानें कोणी रावबहादुरादि पदव्या देतो म्हणून.

या न्यायानें लॉर्ड हरिस हे सहज कित्येकांच्या पितृस्थानापन्न झाले आहेत." (केसरी, २९ जानेवारी १८९५, स. टि. खंड ३, पान ७९७ व ७९९.)

लॉर्ड हॅरिस या मुंबईच्या गव्हर्नरांचे स्मारक करण्यासाठी त्यांचे मित्र व भाट यांनी जी चळवळ सुरू केली, तिचा उपहास करताना टिळकांनी एका लेखात लिहिले होते, "त्यांच्या (हॅरिससाहेबांच्या) कारकीर्दीत अन्यायाच्या गोष्टी घडल्या असतील त्यांची एखादी जंत्री बनवून, एखाद्या काल्पनिक कारागिराकडून हॅरिससाहेबांची कृति हुबेहूब वठेल अशा तऱ्हेचा एखादा पुतळा करून तो योग्य ठिकाणीं बसविण्याची तजबीज करावी. असें ध्यान साधण्यास कारागीर फारच कसबी पाहिजे, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु असा एखादा कारागीर सांपडणार नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं...असा नवगुणालंकृत पुतळा करणें तो राजेरजवाडे, संस्थानिक, जहागीरदार, इनामदार वगैरे पैसेवाल्या लोकांच्या मदतीनें बिलकुल करूं नये. दर घरटीस रुपया, आठ आणे वर्गणी करून वर्गणीची रक्कम उभी करावी व ज्यांच्या कृतीनें दक्षिणेंतील शहाण्यासुरत्या लोकांचें शहाणपण बुडालें असें त्यांचें म्हणणें आहे, त्या दाक्षिणात्य लोकांच्या राजधानींत ज्या ठिकाणीं आमची अक्कल गेली असेल त्या ठिकाणीं तो ठेवावा, अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे. ही सूचना करण्यास हॅरिससाहेबांबद्दल आमचें असलेलें प्रेम हेंच खरोखर कारण आहे." (केसरी, ६ नोव्हेंबर १८८४, स. टि. खंड ३, पान ७६४–६५.)

सँड्हर्स्ट यांची महत्कृत्ये

असेच महाराष्ट्राच्या दुष्काळात, प्लेगमध्ये जुलमी अधिकाऱ्यांना जुलूम करू देण्याबद्दल लॉर्ड सँड्हर्स्ट यांना टिळकांनी दोषी ठरविले होते. त्यांच्या गैरकृत्यांची यादी करताना टिळकांनी लिहिले होते, "आपल्या हाताखालील अधिकारीवर्गास स्वैरपणानें वागू दिलें आणि लोकांनीं जेव्हां जेव्हां त्यांच्याविरुद्ध कांहीं तक्रारी केल्या तेव्हां तेव्हां लोकांस किंवा लोकांच्या पुढाऱ्यांस थप्पड मारून खालीं बसविलें. पुण्यांतील खून, सिन्नर-मुंबई दंगे, वर्तमानपत्रांवर राजद्रोहाच्या फिर्यादी, फॅमिन-कोड लोकांस समजावून देण्याबद्दल सार्वजनिक संस्थांवर झालेली इतराजी, आणि निरपराधी मनुष्यांस जुने कायदे हुडकून काढून, संशयावरून कैदेंत टाकणें किंवा त्यांजविरुद्ध काडीइतका देखील पुरावा नसतां त्यांस प्रतिबंधांत ठेवणें हींच त्यांचीं महत्कृत्यें होत. अशा कृत्यांबद्दल गव्हर्नरसाहेब म्हणून कोणाचेहि आभार मानण्याचे दिवस आतां राहिले नाहींत." (केसरी, १३ फेब्रुआरी १९००, स. टि. खंड ३, पान ८३७.)

नोकरशहांचे उपहास-चित्र

लॅन्सडाऊन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय आपली पाच वर्षांची कारकीर्द संपवून

स्वदेशी परत जात असताना टिळकांनी त्यांची 'शून्याकृति' व्हाइसरॉय अशी संभावना केली होती व त्यांना उद्देशून लिहिलेल्या उपहासगर्भ लेखात म्हटले होते की, "अँग्लो-इंडियन पत्रकार लॅन्सडाऊनसाहेबांची फार तारीफ करीत आहेत तें ठीकच. सरकारच्या ठरीव भाटांनीं व्हाइसरॉयपासून तो पोलिस कॉन्स्टेबलापर्यंत प्रत्येक गोऱ्या कामदारांची नेहमी स्तुति करीत असणेंच स्वाभाविक आहे. पण, हिंदुस्थानच्या राज्यकारभारासारखा जबरदस्त बोजा पाच वर्षें शिरावर वाहिल्यानंतर शेवटीं आपल्या निस्सीम भक्तांकडूनहि पाणचट प्रशंसेपेक्षां अधिक कांहीं सर्टिफिकेट मिळूं नये हें पाहून लॅन्सडाऊनसाहेबांस खरोखरच वाईट वाटल्यावांचून राहाणार नाहीं. आपण हिंदुस्थानांतून गेलों तरी ज्यांचे खिसे भरले त्यांनीं प्रत्युपकारार्थ जमविलेल्या साठ-सत्तर हजारांच्या योगानें आपला दगडी पुतळा आपल्या कलकत्त्याच्या मैदानावर थंडीवारा खात उभा राहील, एवढी एक लॅन्सडाऊनसाहेबांना समाधान मानण्यास जागा आहे खरी, पण वस्तुतः त्याचा काय उपयोग ?...ज्या लोकांच्या पैशावर आपण पांच वर्षें चैन मारली त्या लोकांचें आपण कांहींएक हित केलें नाहीं, तर उलट अतोनात नुकसान केलें. ही लॉर्डसाहेबांच्या मनांतील खुरखुर आमच्या मतें स्वार्थपरायण बंदीजनांनीं दिलेल्या शेंकडों पुतळ्यांनीं किंवा मानपत्रांच्या भेंडोळ्यांनीं नाहींशी व्हावयाची नाहीं, ही गोष्ट त्यांसहि माहीत असलीच पाहिजे." (स. टि. खंड ३, पान ७७२.)

अशीच टीका मुंबई सरकारच्या कायदेकौन्सिलचे पहिले सभासद सर जेम्स मॉंटिथ यांच्याबद्दल लिहिताना टिळकांनी केली होती. त्यांनी स्पष्टपणे लिहिले होते की, "सर जेम्स मॉंटिथ यांच्याबद्दल चांगलें लिहिण्यासारखें आमच्या मतें कांहीं एक नाहीं, अथवा ते नोकरी संपवून विलायतेस चालते झाले याबद्दल खेदहि प्रदर्शित करण्याचें कारण नाहीं...ज्या अधिकाऱ्याच्या कारकीर्दीत अरेराबीपणास ऊत आला त्याच्या कृत्याबद्दल, आपलें मत विरुद्ध असतांहि तो नोकरी संपवून विलायतेस जाण्यास निघाला म्हणजे भराभर आमच्या पुढाऱ्यांनीं हातांत साखरेचीं ताटें घेऊन त्याचें तोंड गोड करण्याकरितां त्याच्या भोंवताली गोळा व्हावें हें आपलीं मतें हृदयांत बिंबलीं नसल्याचें अथवा आपल्या पोचटपणाचें चांगलेंच प्रदर्शन आहे...मॉंटिथसाहेब जातात म्हणून रडण्यापेक्षां हसणें चांगलें. किंबहुना मॉंटिथसाहेबांच्या मताचे अधिकारी हिंदुस्थानांतून लवकर नाहींसे होतील, इतकेंच नव्हे तर पुढेंहि हिंदुस्थानांत कमी कमी येऊन अखेर मुळींच येणार नाहींत, तो आम्ही सुदिन समजूं." (केसरी, स्फुट सूचना, ८ ऑगस्ट १९०५, स. टि. खंड ३, पान ८९१ व ८९२.)

गावठी साहेबांची लाचारी

अशा भेदक टीकेचे वार टिळक नोकरशाहीवर करीत असत, त्याचबरोबर त्या नोकरशाहीचे लांगूलचालन करणाऱ्या भारतीय नेत्यांचा व राजनिष्ठ सेवकवर्गाचाही ते

सतत उपहास करीत. हे गावठी साहेब कसे लुब्रेपणाने व लाचारीने वागत, याचे वर्णन टिळकांनी केले होते. त्यांच्या मनोवृत्ती कशा पालटतात, हे सांगताना टिळक म्हणाले होते, "मोठ्या पगाराची व हुद्याची जागा मिळाली म्हणून त्यांची चित्तवृत्ति ताळ्यावर रहात नाहीं आणि सुविचार व दूरदर्शीपणाचा त्यांच्या ठिकाणीं लोप होतो. एकाएकीं स्वप्नीं नसते ती चांदरात पडूं लागली, सर्व लोक अदबीनें वागूं लागले, खेडेगावांतील रस्त्यानें चालूं लागले म्हणजे दुतर्फा सर्वांकडून मान वाकून सलाम व रामराम होऊं लागले, मेजवान्यांचे थाट उडून जाऊन त्यात श्रेष्ठ प्रकारचा बहुमान होऊ लागला म्हणजे एतद्देशीय कामगारास वाटूं लागतें कीं, 'आपण कोणी लोकोत्तर पुरुष आहोत.' लोकांनीं चांगलें म्हणावें ही त्यास हांव सुटते, खोट्या लोकप्रियतेचें व्यसन होऊन बसतें. आमचे सुशिक्षित अधिकारी गांवंढळ बनतात. या नोकरीच्या पोटीं साहेब लोकांची खुशामत करणें, त्यांची थुंकी झेलणें व थाप ठोकून देणें वगैरे दुसरेहि दुर्गुण त्यास जडतात." इंग्रज नोकरशहांचा अशा तऱ्हेने उपहास करताना त्यांच्या ओंजळीने पाणी पिणारा व लाचारीने लोकांत मिरवणारा गावठी साहेबांचा वर्ग हाही टिळकांच्या टीकेच्या विषय होत असे. त्याचप्रमाणे इंग्रज नोकरशहांनी स्वतःचे महत्त्व वाढविण्यासाठी जो आरती संप्रदाय या देशात पोसला होता त्याचेही वस्त्रहरण टिळकांनी वेळोवेळी केले होते. उदाहरणार्थ, सँड्हर्स्टचे कौतुक करण्याचा घाट जेव्हा मुंबई इलाख्यातील काही नेते मंडळी घालत होती तेव्हा टिळकांनी त्यांचा लुब्रेपणा लोकांपुढे मांडला होता. ते म्हणाले होते, "सर भालचंद्र किंवा भावी न्यायमूर्ति चंदावरकर यांच्या पोचटपणाबद्दल आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. त्यांच्या पोचटपणाबद्दल नांवें ठेवणें म्हणजे परमेश्वरानें कोल्ह्यास धैर्य दिलें नाहीं म्हणून ईश्वरास दोष देण्यासारखें आहे. आम्ही यांस पुढारी समजतों हीच आमची चूक आहे. बाकी सरकारास असलीं माणसें हवींच आहेत व अशाच माणसांस त्यांच्याकडून बहादुरकी. 'सर'की, अथवा इतर सन्मान मिळावयाचा! जुलमी अंमलदाराचा अगर राजाचा स्वभावच असा असतो कीं, ते आपल्याजवळ जीं माणसें बाळगतात तीं अशीं असावीं कीं, त्यांस कोणी शालजोडींतील मारले, तरी त्यांनीं शालजोडीच्या मऊपणाचीच तारीफ करीत राहावें!"

पोचटपणाचे पुतळे

"आमच्या राज्यकर्त्यांकडून जे हक्क आम्हांस प्राप्त व्हावयाचे आहेत ते तंटा करून आम्हांस मिळावयाचे नाहींत व दांडगाई करण्याचें आमच्या अंगांत सामर्थ्यहि नाहीं, ही गोष्ट आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. पण दांडगाई आणि तंटा न करणें म्हणजे हल्लीचा क्रम स्वीकारणें नव्हे. आमच्या थोबाडींत मारणाऱ्या गृहस्थाच्या उलट थोबाडींत मारण्याची आमच्या अंगांत शक्ति नसेल अशा वेळीं थोबाडींत मारलेली

मुकाट्यानें सहन करून वसणें इंच अधिक शहाणपणाचें होईल. पण आपल्या अंगांत शक्ति नसली म्हणून थोबाडींत मारणाऱ्या गृहस्थाची आरती करण्यास आम्हीं तयार व्हावें हें आमच्या मतें आमच्या स्वभावाच्या पोचटपणाचें लक्षण होय...पोचटपणा नेहमींच तिरस्कारार्ह होय...नेटिव्ह लोकांचे पुढारी म्हणजे पोचटपणाचे पुतळे, असें यांच्या वर्तनावरून कोणीहि इंग्रज जर म्हणूं लागला, तर त्यांत कांहीं चूक होणार नाहीं." (केसरी, २० फेब्रुआरी १९००, स. टि. खंड ३, पान ८३९–८४१.)

उन्मत्त व जुलमी नोकरशाहीच्या भारतातील पुरस्कर्त्यांचा वा स्तुतिपाठकांचा टिळकांना राग होता. कारण त्या नोकरशाहीला आपल्याला जनतेचा पाठिंबा आहे असे खोटे नाटक करण्याची त्यांच्यामुळे संधी मिळत होती. हा वर्ग पोसण्याचा त्यांचा हेतू तोच होता. ब्रिटिश राजवट त्यामुळे वळकट करण्याचे नोकरशहांचे धोरण असे. किंबहुना त्यांची राजनिष्ठा हा भारताच्या वर्धिष्णू राष्ट्रवादाचा फार मोठा काळिमा होता. या दृष्टीने या वर्गाचा टिळक सतत धिक्कार करीत असत.

ब्रिटिश राज्याचे प्रतिमाभंजन

सनदी नोकरांच्या या उपहासास, नेटिव्ह अंमलदारांच्या वर्णनास किंवा पोचट पुढाऱ्यांच्या व आरती–संप्रदायाच्या धिक्कारास टिळकांच्या काळात राजकीय असंतोषाच्या दृष्टीने मानसशास्त्रीय महत्त्व होते. कारण ब्रिटिश राज्याची एक लोकार्षक प्रतिमा बनवून जनमत गुंगवीत ठेवण्याचा इंग्रज राज्यकर्त्यांचा प्रयत्न होता. त्यांच्या राज्याचे हे लोक आधारस्तंभ होते. टिळक सतत प्रतिमाभंजन करून, उपहास करून या आधारस्तंभांना सुरुंग लावत होते. त्यासाठी ते भेदक उपहास, वक्रोक्ती इत्यादि सर्व भाषिक अलंकारांचा उपयोग करीत होते. हे त्यांचे जसे संपादकीय शब्दकौशल्य होते, तसा निधडेपणा व निर्भयपणाही होता. ब्रिटिश नोकरशाहीविरुद्ध टिळकांनी जे उघड युद्ध सुरू केले होते, त्याचा तो अपरिहार्य भाग होता. ब्रिटिश नोकरशहांनी कसे धोरण ठेवले पाहिजे, यासंबंधी टिळकांच्या स्पष्ट अपेक्षा असत. टिळक म्हणत असत, "सनदी नोकरांनीं एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राज्यकारभारांत ज्या सुधारणा करणें जरूर आहे त्यांस अडथळा करणें जरूर नाहीं. राणी सरकारांनीं आपल्या प्रजेस जीं अभिवचनें दिलीं आहेत तीं पाळण्याचा किंवा त्याप्रमाणें सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा." पण टिळकांनी असेही म्हटले होते की, "इंग्रजी राज्यांत ज्या कांहीं सुधारणा व्हावयाच्या असतील अथवा लोकांस हक्क मिळावयाचे असतील ते लोकांनीं क्रमाक्रमानें संपादन केले पाहिजेत. हे हक्क अथवा सुधारणा इंग्रजी राज्याच्या मजबुतीस अथवा चिरस्थायित्वास अपायकारक आहेत, ही समजूत अगदीं चुकीची आहे. कारण खुद्द महाराणीसरकारांनींच या सुधारणांचा उल्लेख केला असून, क्रमाक्रमानेंच त्या आपल्या प्रजेस मिळतील असें अभिवचन दिलें आहे; व राणीसाहेबांचे

शब्द निरर्थक अथवा फसवणुकीचे असतात असें जोपर्यंत कोणीहि मानीत नाहीं, तोपर्यंत सदर हक्क संपादन करण्याची आमची चालू असलेली खटपट कोणीहि राजद्रोही आहे, असें म्हणणार नाहीं. आपल्या मुलानें चांगलें ज्ञान संपादन करून संसार चालविण्याच्या कामीं आपणांस मदत करावी अशी ज्याप्रमाणें प्रत्येक गृहस्थाची इच्छा असते, त्याप्रमाणेंच दयाळु राणीसरकारची आपल्या प्रजेबद्दल इच्छा आहे. इंग्रजी राज्य चालविण्याचें व कायम राखण्याचें सामर्थ्य आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं आहे हें ज्यावेळीं लोकांच्या प्रत्ययास आलें त्यावेळीं वर दिलेलें अभिवचनहि राणी सरकारांनीं दिलेलें आहे. तेव्हां तें वचन पाळल्यानें राज्याच्या कायमपणास कोणत्याहि प्रकारें धोका येईल, ही कल्पना देखील करणें वाजवी नाहीं पण 'खर्चणाराचें खर्चतें आणि कोठावळ्याचें पोट दुखतें' अशी जी आमच्यांत म्हण आहे त्याप्रमाणें राणी सरकारच्या मनांतले विचार नाहींत ते दुर्दैवानें आमच्या अँग्लो-इंडियनांच्या मनांत पूर्णपणें बिंबलेले दिसून येतात. राज्यांतील मोठमोठ्या हुद्यांच्या व महत्त्वाच्या जागा सर्व सनदी नोकरांनीं भरलेल्या असल्यामुळें ते राणी सरकारच्या राज्याचे 'कोठावळे'च आहेत असें म्हटलें तरी चालेल." (केसरी, १९ फेब्रुआरी १८९५, स. टि. खंड ३, पान ७७८.) टिळकांचे हे विचार १८९५ मधील आहेत. राणीच्या जाहीरनाम्याची सनद पुढे करून नोकरशाहीवर टीका करीत राहाण्याची आणि असे करणे म्हणजे राजद्रोह नाही हे सांगण्याची भूमिका टिळकांनी प्रथमपासून घेतली होती. ती १९०८ पर्यंतच्या खटल्याच्या भाषणातही त्यांनी पुन्हा मांडली. कायद्याच्या कक्षेत राहून जळजळीत टीका कशी करता येते, याची ही उत्तम उदाहरणे आहेत.

इंग्रजी पत्रांचा समाचार

इंग्रज नोकरशाहीचे भारतातील आधारस्तंभ म्हणजे इंग्रजी वृत्तपत्रे. या अँग्लो-इंडियन पत्रकारांचे खोडसाळ व आगलावे लेख हा टिळकांच्या प्रखर टीकेचा आणखी एक विषय होता. टिळक म्हणत, "हीं पत्रें नोकरशाहीनें व ब्रिटिश भांडवलशाहीनें भारताच्या राष्ट्रीय चळवळीवर विषारी टीका करण्यासाठीं व नोकरशाहीचें समर्थन करण्यासाठीं पदरीं ठेवलेलीं कुलंगी कुत्रीं आहेत." १८९७ च्या रँड खुनानंतर टिळकांना हा अनुभव आला होता. यासंबंधीचे टिळकांचे लेख अत्यंत कडक भाषेत लिहिलेले असत. त्याचे समर्थन टिळकांनी १९०८ च्या खटल्यातील बचावाच्या भाषणात केले होते. टिळक म्हणाले होते, "आपआपल्या मतांची वाटेल त्या प्रकारें लोकांसमोर मांडणी करण्याला कायद्याने प्रत्येक मनुष्यास मुभा आहे. कांहीं युरोपियन वर्तमानपत्रांना मात्र आपलीं मतें बेधडकपणें वाटेल तशीं प्रकट करण्याचा अधिकार आहे आणि हिंदी वर्तमानपत्रकारांना मात्र तसें करण्याचा अधिकार नाहीं, असा कायद्यामध्ये तरी उघड रीतीनें पंक्तिप्रपंच केलेला नाहीं. हिंदी वर्तमानपत्रांचे प्रतिस्पर्धी जे

अँग्लोइंडियन पत्रकार त्यांनीं या आणीबाणीच्या प्रसंगीं आमच्यावर कोणत्या तऱ्हेचा गहजब उडवून दिला होता याची तुम्हांस कांहीं कल्पना करितां यावी म्हणून मीं वर्तमानपत्रांचें एक भलें मोठें पुडकें दाखल केलें आहे. प्रथम आघात जितक्या जोराचा होतो, तितक्या जोरानें प्रत्याघातहि होत असतो; असा नैसर्गिक शक्तीचा कायदा आहे ...हिंदी वर्तमानपत्रकारांनीं प्रगट केलेले विचार व लढविलेला कोटिक्रम हे फाजील कडक, गैरशिस्त किंवा बेफाम आहेत कीं काय, हें ठरविण्यास हिंदी वर्तमानपत्रकारांचे प्रतिस्पर्धी जे अँग्लो-इंडियन पत्रकार त्यांचे लेख, विचारसरणी आणि कोटिक्रम किती बेफाम, गैरशिस्त आणि उद्दामपणाचा होता, याच्याकडे पूर्ण लक्ष पुरविलें पाहिजे... इंग्लंडांतील अधिकारारूढ पक्ष जर असें म्हणेल कीं, आम्हीच तेवढें सदोदित राज्य करणार तर तें बेकायदेशीर होईल. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानमध्ये गोरे पत्रकार राज्यकर्त्यांचे नातलग व जातभाई म्हणून त्यांनाच फक्त आपलें मतप्रदर्शन करण्याची मोकळीक व हिंदी पत्रांस मात्र बंदी असा भेदभाव करून चालावयाचें नाहीं, असा कायदा नाहीं, हा न्याय नाहीं." (स टि. खंड ६, पान २१०–२११.)

टिळकांचे हे लेख किती जळजळीत असत, याचे नमुने पाहाण्यासारखे आहेत. 'मुंबईच्या टाइम्सचा बेशरमपणा' हा लेखाचा मथळाच खूप बोलका आहे. "विलायतेंत प्रमुख प्रमुख दैनिक पत्रकर्त्यांच्या ऑफिसांत वर्तमानसाराचे प्यारे लिहिण्याचें काम ज्यांस मिळेल कीं नाहीं याची शंका, अशा प्रकारें अँग्लो इंडियनांची (सिव्हिल सर्व्हिससारखी दुसरीं कामें करण्यास नालायक ठरलेलीं) पोरें इकडे येऊन एखाद्या अँग्लो-इंडियन पत्राचीं एडिटरें झालीं म्हणजे मग त्यांच्या उद्दामपणास, घमेंडखोरीस, आणि अहंमन्यतेस सीमा नाहींशी होऊन हव्या त्या बाबतींत आणि बाटेल तेव्हां आपला पोक्त उपदेश या देशांतील लोकांस देण्यास तीं नेहमीं एका पायावर तयार असतात...हिंदुस्थानवर जे गोरे लोक एकसारखे चरत आहेत त्यांचे बगलबच्चे व हस्तक म्हणून हे धृष्ट एडिटर स्वजातीयांच्या साहाय्यानें पुढें आलेले असतात; आणि यांची कातडी गोरी असल्यामुळें हे शिरजोरपणानें व लब्धप्रतिष्ठितपणानें मोठमोठ्या नेटिव्हांवरहि तोंड सोडण्यास कचरत नाहींत. ही धृष्टता, हें साहस आणि हा कावेबाजपणा कातडीच्या रंगाच्या जोरावर आहे, विद्वत्तेच्या, सौजन्याच्या किंवा विवेकीपणाच्या जोरावर नाहीं हें आम्ही ओळखून आहों आणि म्हणूनच मोरोपंतांच्या शब्दांनीं 'निज नीचपण प्रकटिसि तूं श्वान भल्याबरीहि भुंकोन' अशी या पत्रकारांस आम्ही इशारत देत आहों व आमच्या देशबंधूंस अशी विनंति करीत आहों कीं, या कुत्सित, गर्विष्ठ व आपमतलबी पत्रकारांच्या टीकेस किंवा ओरडण्यास तुम्ही काडीइतकी देखील भीक घालूं नका. 'अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रकार हे नेटिव्ह लोकांच्या अभ्युदयाचे पक्के द्वेष्टे असून, हरप्रयत्नानें ते आपल्या उन्नतीच्या आड येणार' असें नेटिव्ह लोकांस आतां पक्कें समजून चुकलेलें आहे...टाइम्सकार असे समजत असेल

कीं, असल्या खोडसाळ व कुत्सित लेखांनीं आपण विलायतेच्या लोकांचा गैरसमज करूं, पण तीहि गोष्ट आतां शक्य नाहीं असें आम्ही त्यास निक्षून सांगतों." (दि. ११ सप्टेंबर १९०३, स. टि. खंड ४, पान ७९६–७९७ व ८०१.)

टिळक हे मराठीत तर लेख लिहीतच, पण अनेकदा इंग्रजी पत्रांच्या संपादकांना पत्रे पाठवून त्यांना चोख उत्तर देत असत. आघाताइतकाच प्रत्याघात जोराचा पाहिजे हा टिळकांच्या प्रतिकाराचा नियम असे. त्यामुळे या लेखांतील तिखटपणा, जळजळीतपणा व उपहास तितकाच परिणामकारक ठरे.

टिळकांनी असंतोषाची बीजे पेरण्यापूर्वी स्वतःच्या कष्टांनी व कौशल्याने जनमानस जनसंपर्काच्या चळवळींनी ढवळून काढले. जनसंपर्क निर्माण केला. राष्ट्रीय उत्सव, राष्ट्रीय शिक्षण, प्रासंगिक चळवळ व केसरीतील नित्य लेखन यांनी जनतेच्या मनाशी ते भिडले. टिळकांच्या वाणीत, त्यांच्या शब्दांत तळमळ, देशभक्ती प्रतीत होई. टिळकांचे आवाहन कृतीला असे, प्रयत्नवादाला असे. टिळकांचे जळणारे अंतःकरण त्यांच्या एका भाषणात प्रतिबिंबित झालेले होते. त्या भाषणात ते म्हणाले होते, "मी उद्योगवादी आहे. कोणी देईल तें घ्या. नाहीं दिलें तर स्वस्थ बसा. असा कोणाचा समज असल्यास माझा समज तसा नाहीं. भित्रेपणांत शहाणपणाची भर पडली म्हणजे त्याला सावधगिरी म्हणतात. तसला सावधपणा सोडून द्या सावधपणा मुळींच नको असें माझें म्हणणें नाहीं. पण उमेदीवरोवर व स्वार्थत्यागावरोवर असणारी सावधगिरी पाहिजे; भित्रेपणावरोवर असलेली सावधगिरी नको असें माझें म्हणणें आहे...लाला लजपतरायांच्यावर झालेल्या जुलमाचा नुसत्या शब्दांनीं निषेध करण्यास देखील मुंबईकरांस अजून फुरसत होत नाहीं. हें जर तुम्हांला असाह्य झालें नसेल तर राष्ट्र जितकें लवकर मरेल तितकें वरें! या गोष्टी जर तुमच्या अंतःकरणाला झोंबत नसल्या तर हें राष्ट्र मेलेलें काय वाईट! घोडा आजारी झाला व तो वरा होण्याची आशा अगदीं राहिली नाहीं तर घोड्याला गोळी घालून ठार मारीत असतात, त्याप्रमाणें या राष्ट्राचें होईल तर बरें! वेदना तरी नकोत. मृत लोकांनीं या भूमीला भार होण्यापेक्षां दुसरीं कोणीं माणसें येऊन ती सनाथ करतील." (पुणे येथील भाषण, १७ सप्टेंबर १९०७, स. टि. खंड ६, पान ४०.)

टिळकांचे हे उद्‌गार त्याकाळची स्फोटक देशस्थिती व त्यांच्या मनाची आर्तता दाखविण्यास पुरेसे आहेत. टिळकांनी या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या राजकीय मोहिमा यशस्वी झाल्या, याचे कारण त्यांची ही तळमळ व त्यांचे संघटन व प्रचारकौशल्य हेच होते.

७

टिळकांच्या राजकीय मोहिमा

टिळकांनी राजकीय असंतोषाची पेरणी पूर्वयोजनेने केलेली आढळते. त्यांच्या सर्व राजकीय जीवनात एक सुसंगती, कालबद्धता व उपक्रमशीलता आढळते, याचे कारण त्याचा त्यांनी मनात योजलेला एखादा आराखडा असावा. लोकमताभोवती तो केंद्रित होता. सामान्य जनांचे प्रश्न हाती घेणे, सामान्य जनतेच्या भावनांशी जवळीक साधणे, स्वार्थत्याग, लोकहिताची तळमळ, निर्भयपणा, साहस ही वैशिष्ट्ये असलेले नेतृत्व स्वतःच्या उदाहरणाने समाजाला देणे ही टिळकांच्या नेतृत्वाची शैली १८९५ पासून म्हणजे पुण्यात भरलेल्या काँग्रेस अधिवेशनापासून जनतेच्या नजरेत भरू लागली होती. श्री. न. चिं. केळकरांनी टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडात म्हटले आहे, "टिळकांचें सार्वजनिक चरित्र हें जर एकाद्या कमानीसारखें मानलें तर सामान्य जनसमाजाचा पाठिंबा हा त्या कमानीचा 'चाबीचा दगड' म्हणतां येईल." १८९५ साली टिळकांचे लोकनेतृत्व उदयाला आले. पुढच्याच वर्षी १८९६ मध्ये महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यावेळी टिळकांच्या लोकनेतृत्वाचा कस, त्यांचे कस व कल्पकता लोकांना दिसून आली. लोकांत असंतोष पेरत त्यांना नोकरशाहीशी सामना देण्यास तयार करण्याइतके धैर्य प्रदान करण्याचे काम टिळकांनी त्यावेळी केले. कायद्याच्या चौकटीत राहून 'केसरी'च्या माध्यमातून अगदी वेगळ्या पण आधुनिक तंत्राने दुष्काळनिवारणातील ही राजकीय मोहीम टिळकांनी उभी केली.

मोहिमेची स्वतंत्र वैशिष्ट्ये

कोणताही संघटित राजकीय पक्ष हाताशी नसताना केवळ स्वतः जमविलेल्या अनुया-

यांच्या व स्थानिक नेत्यांच्या सहाय्याने टिळकांनी ही मोहीम परिणामकारक केली, हे या मोहिमेचे पहिले वैशिष्ट्य होय. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सुशिक्षितांना त्या शेतकऱ्यांच्या प्रश्नात लक्ष घ्यावयास लावून त्यांच्या जागृतीसाठी, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी प्रत्यक्ष कार्य करावयास लावले. न्या. रानडे यांनी प्रत्येक प्रश्नाचा सांगोपांग, सखोल व प्रत्यक्ष पाहाणीवर आधारलेला अभ्यास करण्याची परंपरा सुरू केली होती. टिळक त्या परंपरेच्याही पुढे गेले. ते ज्ञान, ती माहिती त्यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोचवली व आपल्या वर्तमानपत्रातून तिचा प्रचार केला. तिसरे वैशिष्ट्य असे की, दुष्काळ-पीडितांना त्यांचे हक्क, त्यांना मिळू शकणाऱ्या सवलती यांची माहिती करून देऊन 'आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी तगादा लावा, सरकारी अधिकाऱ्यांना न भिता त्यांच्याकडे न्यायासाठी धरणे धरा,' अशा तऱ्हेची शिकवणूक देऊन सामान्य जनतेला या चळवळीत गोवले व सम्मीलित केले. या मोहिमेचे चौथे वैशिष्ट्य म्हणजे सरकारी अंमलदारांनी लोकांची गाऱ्हाणी लक्षात घेऊन ती सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे व कायद्यानुसार जे करणे शक्य आहे ते सर्व सरकारी अधिकाऱ्यांनी केले पाहिजे, ती त्यांची जबाबदारी आहे, असे टिळकांनी त्यांना खडसावयास सुरुवात केली. 'सरकारी नोकर हे जनतेच्या सेवेसाठी, सोयीसाठी आहेत व कायद्याने जे सांगितले ते त्यांनी केलेच पाहिजे,' असा घोशा टिळकांनी या चळवळीपासून सुरू करून नोकर-शाहीला आपले योग्य ते स्थान दाखविण्यास सुरुवात केली. या चळवळीचे पाचवे वैशिष्ट्य म्हणजे टिळकांनी प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात जे स्थानिक पुढारी असतात त्यांना लोकसेवेच्या या पद्धतीची दीक्षा दिली व नवी दिशा दाखविली. सहावे वैशिष्ट्य म्हणजे टिळकांनी ही सर्व मोहीम 'केसरी'तून चालविली. त्यामुळे भाषिक वृत्तपत्रे हीच जनतेची प्रातिनिधिक असतात, त्यांचा आवाज हाच जनतेचा खरा आवाज असतो, हे या चळवळीने सिद्ध केले. किंबहुना आपले सर्व संपादनकौशल्य पणाला लावून सरकारच्या बातम्या काढणे, दुष्काळाची माहिती देणे, जनतेची गाऱ्हाणी वर्तमानपत्राकडे मागवणे वगैरे मार्गांनी जाऊन टिळकांनी 'केसरी' हे लोकपत्र केले. त्याची दखल सरकारी अधिकाऱ्यांना घ्यावी लागली. 'केसरी'ची स्वयंसिद्ध महती किंवा स्वयमेव मृगेन्द्रता पटविली. ती टिळकांना पुढे जाचकही ठरली. पण आंदोलनाची सगळी धग, जिवंतपणा कायम ठेवण्याचे काम टिळकांनी 'केसरी' मार्फत केले, हे या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. म्हणून या काळातील 'केसरी'च्या कार्याचे वर्णन करताना श्री. न. चिं. केळकरांनी टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडात म्हटले आहे. "केसरीने' या चळवळींत सारें रान हालवून सोडलें. या चार-पाच महिन्यांतील 'केसरी'चे अंक पाहिले तर कोणासहि असें दिसून येईल कीं, निम्मा, तीन हिस्से 'केसरी' याच चळवळीच्या हकीकतीनें भरून गेलेला आहे." या सर्व वैशिष्ट्यांमुळे टिळकांनी रचलेली ती मोहीम म्हणजे आदर्श राजकीय मोहीम होती, असे म्हटले पाहिजे.

टिळकांनी या दुष्काळनिवारण मोहिमेची सुरुवात दि. २० ऑक्टोबर १८९६ च्या अंकात आलेल्या संपादकीय स्फुटापासून केली. दुष्काळाची चाहूल कशी लागते आहे, त्याचे स्वरूप उग्र कसे होत जाणार आहे, त्यासाठी सरकारने काय केले पाहिजे, या सर्व मुद्यांची चर्चा या लेखात केलेली होती. मुंबई इलाख्यात दुष्काळासंबंधी काय करता येईल याची जंत्री टिळकांनी दिली होती. लोकांनीही काय केले पाहिजे, याची चर्चा देखील केली होती. त्यात टिळकांनी म्हटले होते,

" हल्लींच्या काळांत लोकांचीं कर्तव्यें दोन प्रकारचीं आहेत. एक, सरकार धान्याचा भाव नियंत्रित करू शकत नाहीं, तो करवणें, आणि दुसरें फॅमिन रिलीफ कोडांत ज्या ज्या गोष्टी सरकारनें कराव्या म्हणून लिहिलें आहे त्या प्रत्येक तालुक्यांत किंवा जिल्ह्यांत नीटपणें होत आहेत कीं नाहीं याचा शोध ठेवून सरकारास वेळोवेळीं जागे करण्याकरितां दरएक ठिकाणीं तेथील सभ्य गृहस्थांनीं एक कमिटी नेमणें. सारांश, ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं हा दुष्काळ संपेपर्यंत सरकारच्या कृत्यावर सारखी नजर ठेवून लोकांच्या गरजा सरकारच्या कानीं घातल्या पाहिजेत, फॅमिन इन्शुअरन्स फंड गिळून टाकणाऱ्या सरकारास पैशाची सबब सांगता यावयाची नाहीं, व सरकार ती सांगणार नाहीं अशी आमची खात्री आहे. दुष्काळाचा आम्हीं विमा उतरला असून त्याबद्दल दरसाल दीड कोटी रुपयांची रक्कम आम्ही गेली पंधरा सोळा वर्षें भरीत आलों आहों. आम्ही आमच्या हातून जें काम करावयाचें तें करूंच, पण त्याजबरोबर या रकमेचा योग्य विनियोग सरकारच्या हातून होतो कीं नाहीं हें पाहणें आमचें कर्तव्य आहे, व तें कर्तव्य महाराष्ट्रांतील ठिकठिकाणचे लोक बजावतील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे. फॅमिन रिलीफ कोड लागू करून तें नीट अंमलांत आणा अशी ओरड चहूकडून मोठ्या सक्तीनें सुरूं केल्याखेरीज आमचें सरकार लवकर जागें व्हावयाचें नाहीं. खानदेशांत जळगावांतून व धुळ्याहून अशा तऱ्हेचे एक दोन अर्ज सरकारकडे गेले आहेत, पण एकदोन अर्जानीं कांहीं काम व्हावयाचें नाहीं, अशा तऱ्हेचे हजारो अर्ज गेले पाहिजेत, व जरूर पडल्यास ठाण्याच्या कातकरी लोकांप्रमाणें कलेक्टरसाहेबांस समक्ष भेटून खरी स्थिति त्यांच्या नजरेस आणली पाहिजे. एरवीं गत्यंतर नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें आपण आपलें काम बजावलें म्हणजे सरकारास फॅमिन कोडाप्रमाणें आपलें काम करावयास सांगण्यास आपणास एकप्रकारचा विशेष हक्क प्राप्त होतो हेहि विसरतां कामा नये." (केसरी, २० ऑक्टोबर १८९६.)

दुष्काळात मिळणाऱ्या सरकारी सवलती पदरात पाडून घेण्यासाठी लोकांना टिळक 'केसरी'तून सतत मार्गदर्शन करीत होते.

" प्रत्येक गांवांतील लोकांनीं आपल्या गांवांतील पीक दहा-अकरा आणे तरी

बुडालें आहे अशी कलेक्टरची किंवा मामलेदाराची खात्री करून देण्यास मात्र तयार असलें पाहिजे. फॅमिन रिलीफ कोडाचीं वर सांगितलेलीं कलमें शेतकऱ्यांस लागू करण्यास सरकारची निराळी परवानगी आतां नको आहे. फॅमिन रिलीफ कोड ह्यास लँड रेव्हिन्यू कोडाप्रमाणें जरी कायदेकौन्सिलनें केलेल्या कायद्याइतकें महत्त्व नसलें तरी सरकारी ठरावापेक्षां जास्त, निदान तितकी तरी फॅमिन कोडाची खास योग्यता आहे. करितां कोणीहि रेव्हिन्यू अधिकारी किंवा गांव-कामगार साऱ्याकरितां सक्ति करूं लागले; तर लोकांनीं त्यांस खुशाल असा जवाब द्यावा कीं, 'यंदा आमच्या गांवांत अकरा-बारा आणे पीक बुडालें आहे, करितां तूर्त साऱ्याची तहकुबी व पुढें माफी मिळाली पाहिजे.' मात्र असा जवाब देतांना आपल्या गांवांत पीक बुडालें आहे याबद्दल आपली खात्री असली पाहिजे. आठ आण्याच्या वर ज्यांच्या हातांत पीक पडलें आहे त्यांस साऱ्याची तहकुबी किंवा माफी मिळण्याचा संभव नाहीं. यासंबंधानें नाणें-मावळांतील दोन-चारशें लोक या आठवड्यांत पुण्याच्या कलेक्टरसाहेबांकडे गेले होते व त्यांनीं पाटील-कुळकर्णी साऱ्याबद्दल तगादा करीत असल्याचें कळविलें. तेव्हां कलेक्टरसाहेबांनीं असा जबाब दिला की, 'ऐपत असेल त्यानें सारा दिला पाहिजे, ज्यांस ऐपत नसेल त्यांची पुढें तजवीज पाहूं.' दुसऱ्या कोणत्याहि जिल्ह्याचे कलेक्टर असेंच उत्तर देतील. सारांश, लँड रेव्हिन्यू कोडाचीं सक्तीनें सारा वसूल करण्याचीं कलमें दुष्काळांत लागू करूं नयेत अशी सरकारची इच्छा व ठराव आहे, व यासाठीं फॅमिन कोडांतहि मुद्दाम सहा कलमें घातलीं आहेत (१३७–१४२). याकरितां आतां निराळा हुकूम नको. पिकें बुडाल्याबद्दल लोकांनीं आपला पुरावा तयार ठेवावा व कोणी सारा मागावयास आल्यास त्यास वर सांगितल्याप्रमाणें जबाब द्यावा. इतक्याउपर कोणी अधिकारी दांडगाई करूं लागल्यास तीस न जुमानतां थेट सरकारपर्यंत त्याची दाद मागावी. अन्यायानें जर, आपणास कोणी बुचाडूं लागले तर मग तो कितीहि मोठा अधिकारी असला तरी, कायदेशीर रीतीनें काम चालवून आपली दाद लावून घेणें हें आपलें कर्तव्य आहे." (स. टि. खंड ३, पान ४७४.)

जसजशी दुष्काळनिवारणाची मोहीम नोकरशाहीला जाचक होऊ लागली तसतसा तिचा तोल सुटू लागला. नोकरशाही दांडगाईने वागू लागली. तेव्हा टिळकांनी लिहिले होते, "लक्षांत ठेवा कीं, हें राज्य कायद्याचें आहे, दांडगाईचें नव्हे. भांडणें झालें तरी कायदेशीर भांडावयास पाहिजे; तसें आपण भांडूं तेव्हांच आपणांस कांहीं हक्क मिळतील. असो; या गोष्टीचें प्रत्यक्ष उदाहरण तारीख १३ रविवार रोजीं उंबरगांव पेठ्यांत खत्तलवाड येथें सुमारें दोन हजारांवर कोळी, वारली आणि पांढरपेशे लोकांची जी जंगी सभा झाली तेथें घडून आलें. ठाणें जिल्ह्यांतील कोळी, वारली वगैरे लोक एके ठिकाणीं जमून दंगा करितात अशी सरकारची समजूत झाल्यामुळें या सभेस महालकरी, पोलिस, फौजदार आणि मि. दुबोले असिस्टंट कलेक्टर हे स्वतः हजर

होते, व बंदुका भरून सभेभोंवतीं पोलिसांनीं गराडा दिला होता. मनांत हेतु कीं, कोणी एखादा शब्द चुकून बोलला किंवा कांहीं थोडीशी गडबड केली कीं गोळी घातलीच ! अशा स्थितींत सभा कशी काय पार पडते याची सर्वांस मोठी काळजी होती, पण सार्वजनिक सभेच्या दुष्काळकमिटीचे सेक्रेटरी प्रो. साठे हे येथून मुद्दाम त्या सभेकरितां येथें गेले होते. त्यांनीं असिस्टंट कलेक्टरांसमोर 'तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास सारा देऊं नका' असें त्रिवार लोकांस समजावून सांगितलें. किंबहुना लोकांस गोळ्या घालण्याच्या तयारीनें जे पोलिस आले होते त्यांचीच प्रो. साठे यांचें तीन तास चाललेलें अस्खलित भाषण शांततेनें लोकांनीं ऐकण्याच्या कामीं चांगली मदत झाली असें म्हटलें तरी चालेल." (स. टि. खंड ३, पान ४६६–४६७.)

निर्भय व्हा

ही चळवळ आता लोकांत पसरली होती. लोक निर्भय होऊन पुढे येऊ लागले होते. टिळकांच्या 'मोहिमे'चा हा उत्कर्षबिंदू होता. खत्तलवाडच्या याच सभेचा वृत्तांत देताना टिळकांनी लिहिले होते, "त्यावर प्रो. साठे यांनीं असें सांगितलें कीं, 'आजचें साहेबांचें स्वरूप उग्र आहे व तें कांहीं विशिष्ट कारणाकरितां झालेलें आहे; करितां आणखी दहा-पांच दिवसांनीं तुम्ही त्यांजकडे जा, त्यांस आपल्या पिकांचे हिशेब दाखवा म्हणजे ते तुमची हटकून दाद घेतील' असें सांगितलें. सारांश, सरकारच्या मनांतून सारा वसूल केला पाहिजेच असें नाहीं, तुम्हीं मात्र आपले प्रयत्न सिद्धीस जाईपर्यंत उद्योग सोडतां कामा नये, असें प्रो. साठे यांनी रयतेस सांगितलें; व ते म्हणाले कीं, 'पोलिस बंदुका घेऊन आले आहेत, पण त्यांना भिण्याचें कारण नाहीं. भ्याल तितके फसाल. न भितां, न डगमगतां, कायदेशीर रीतीनें काम चालू द्या; म्हणजे भुकेलेल्या कोळी व बारली लोकांना बंदुकीच्या गोळ्या न मिळतां भाकऱ्या मिळतील.' येणेंप्रमाणें सभेचें काम आटोपलें. प्रो. साठे हे पुढें डहाणू, उंबरगाव, पनवेल, पेण, नागांव, रोहें वगैरे ठिकाणीं जाऊन लोकांस फॅमिन रिलीफ कोडाची माहिती करून देणार आहेत. तरी तेथील पुढारी लोकांनीं त्यांस अवश्य मदत करावी." (स. टि. खंड ३, पान ४६८.)

एका बाजूला लोकमताचा चाप लावून दुसरीकडे टिळक सरकारला सतत पेचात पकडत होते. टिळकांचे दुष्काळातील सरकारसंबंधाचे लेखन कायद्याची मर्यादा न ओलांडता सरकारचे हेतू व निष्क्रियता उघडकीस आणणारे होते. दुष्काळाच्या सुरुवातीस टिळकांनी लिहिले होते, "दुष्काळांत प्रजेचें राजानें संरक्षण केलेंच पाहिजे. त्यांतून आमच्या सरकारनें आमच्याकडून पैसे घेऊन दुष्काळाचा विमा उतरिला आहे; त्यामुळें तर दुधांत साखर पडल्यासारखेंच झालें आहे, आधींच मायबाप सरकार आणि त्यांत विमा उतरलेला, मग काय? दुष्काळांत सर्वांचेच जीव सरकारनें

वचाविले पाहिजेत, व सरकारास ही गोष्ट मान्य आहे, किंबहुना खुद्द महाराणी-साहेबांचाच असा हुकूम झालेला आहे कीं, दुष्काळांत लोकांस मरूं देऊं नका. आतां यापेक्षां आपणांस जास्त तें काय पाहिजे ? आमचे पैसे सरकारजवळ आहेत, व सरकार आपलें कर्तव्य करण्यास तयार आहे; मग आम्ही उपाशी मेलों तर त्याचा दोष आमच्याकडे नव्हे काय ? कोणीं म्हणतील कीं, सरकार उगीच बोलतें आहे, पण हातानें कांहीं करणार नाहीं. ठीक आहे; असेंहि होईल, नाहीं कोणीं म्हणावें ? आमच्या सरकारच्या ठायीं सर्व कांहीं संभवतें ही गोष्ट खरी आहे; पण आमची लोकांस एवढीच सूचना आहे कीं, बाबांनों, आतां या बाबतींत सरकारजवळ विनाकारण भांडून कांहीं उपयोग नाहीं, सरकार काय करणार हें सरकारनेंच प्रसिद्ध केलें आहे. रानें केव्हां मोकळीं करावयाचीं, दुष्काळाप्रीत्यर्थ लहान-मोठीं कामें केव्हां व कशीं काढावयाचीं, फुकट अन्न कोणास द्यावयाचें, कोष्टी वगैरे कारागीर लोकांस कशी मदत करावयाची, अनाथ मुलांची काय व्यवस्था करणार इ. इ. पुष्कळ गोष्टींबद्दल फॅमिल रिलीफ कोडामध्यें सरकारनें नियम बांधून टाकिले आहेत." (केसरी, १७ नोव्हेंबर १८९६, स. टि. खंड ३, पान ४३९-४४०.)

पहिले आर्जवे करणारे लेखन झाल्यावर टिळकांनी त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांच्या गाऱ्हाण्यांसंबंधी लिहावयास सुरुवात केली. त्यांनी लिहिले, " नगर, भिंगार, संगमनेर येवलें, मालेगांव, सोलापूर, विजापूर वगैरे ठिकाणीं स्थिति उत्तरोत्तर फारच वाईट होत चालली आहे हें तेथल्या कलेक्टरांच्या रिपोर्टावरूनच उघड दिसत आहे. तथापि आमच्यामधील कित्येक अधिकारी इतके खमंग आहेत कीं, ते या लोकांस दाराशीं उभे करण्यास देखील तयार नाहींत. अलिबाग, केळवेंमाहीम, एरंडोल, वांबोरी, तळोदे येवलें वगैरे ठिकाणांहून आमच्याकडे जीं पत्रें आलीं आहेत (त्यांपैकींच आज कित्येक प्रसिद्ध केलीं आहेत) यावरून चोहोंकडील लोक बरेच क्षुब्ध व हवालदिल झाल्या-सारखे दिसतात; व याकरितां आमची सरकारी अधिकाऱ्यांस विनंति अशी आहे कीं, त्यांनी व विशेषतः डेप्युटी कलेक्टरांसारख्या नेटिव्ह अंमलदारांनीं अशा वेळीं फारच सलोख्यानें व प्रेमभावाने वागलें पाहिजे. पोटाकरितां कावलेल्या लोकांवर गोळ्या घालणें अथवा त्यांसच चाबकाखाली मारणें अगर 'तुम्ही धट्टेकट्टे दिसतां, खडी फोडण्यास जा, नाहीं तर उपाशी मरा' किंवा 'गुरेंढोरें विकून सारा भरा' अशीं उद्दामपणाचीं उत्तरें देणें अत्यंत चुकीचें व असमंजसपणाचें आहे. लोकांस काय उपाशी मरावयाचें, ते चाबकाच्या तडाख्याखालीं किंवा गोळ्यांनीं मरतील, मरण जर कोणीकडून चुकत नाहीं, तर मग जे हक्क व ज्या सवलती सरकार देऊं म्हणून म्हणत आहे, त्यांची योग्य मागणी करीत असतां विनाकारण गोळ्या घातल्यानें जीव गेला तर काय वाईट, असें कोणासहि वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. मामलेदार, डेप्युटी कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांनीं ही गोष्ट विशेष रीतीनें लक्षांत ठेविली पाहिजे. (स. टि. खंड ३, पान ४४४.)

सरकारची दोन तोंडे

याच वेळी टिळक लोकांच्या स्थानिक पुढाऱ्यांनी दुष्काळनिवारणासाठी काय करावे याचे मार्गदर्शन करीत होते. एका बाजूला नोकरशाही व दुसऱ्या बाजूला अडाणी शेतकरी यांच्यामधील दुवा म्हणजे लोकांचे पुढारी होत, त्यांनी धाडसाने पुढे येऊन लोकांची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडली पाहिजेत, हे सांगताना टिळक म्हणाले होते, "तालुक्यांत चार आणे पीक असलें कीं ह्यांनीं आठ आणे रिपोर्ट केलाच. असल्या अधिकाऱ्यांची इतउत्तर रयतेनें बिलकुल भीड बाळगतां कामा नये. आजचा प्रसंग पोटाबरचा आहे हें नीट लक्षांत ठेवा, व अशा वेळीं जर तुम्हांस हक्कानें मिळण्या-सारखी सरकारी मदत तुम्हीं मागून घेतली नाहींत, तर तुम्ही जगलेत काय आणि मेलेत काय सारखेच, असें इतर देशांतील लोक तुम्हांस म्हणतील हेंहि विसरूं नका. सारांश, मुकाट्यानें बसण्याचे हे दिवस नव्हेत. सरकारची माया कांहीं विचित्र आहे, या सरकारास दोन तोंडें, बाजू अगर स्वरूपें आहेत. एक शिवाचें आणि दुसरें विष्णूचें. पैकीं शिवाचें रुद्र स्वरूप दाखवून सरकारी अधिकारी लोकांस भिववीत असतात, पण या परीक्षेंतून मंडळी एकदां बाहेर पडली म्हणजे विष्णूचें सौम्य स्वरूप दिसावयास लागतें. करितां ठिकठिकाणच्या लोकांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं होईल तितकें करून रयतेस आपल्या हातून जी मदत होण्याजोगी असेल ती करण्यास मागें-पुढें पाहू नये. दरएक गांबांत किंवा तालुक्यांत कमिटी करून पुढाऱ्यांनीं करावयाचीं कामें बरींच आहेत व तीं सर्व अशीं आहेत कीं, सुशिक्षित लोकांच्या मदतीखेरीज तीं गरीब रयतेस यावयाचीं नाहींत." (स. टि. खंड ३, पान ४७१.)

पुढाऱ्यांनी करावयाच्या कामांची यादी देऊन टिळकांनी पुढे लिहिले होते, "ही कामें थोडींबहुत करण्याचा उद्योग करील त्यावर अधिकाऱ्यांची थोडीबहुत गैरमर्जी होईल, व जुन्नरास परवां एका शहाण्या असिस्टंट कलेक्टरनें ज्याप्रमाणें कांहीं जणांवर फिर्याद केली तशीहि फिर्याद करण्यास कांहीं अधिकारी मागेंपुढें पहाणार नाहींत. पण असल्या गोष्टीस आतां भिऊन उपयोगाचें नाहीं, किंबहुना योग्य रीतीनें रयतेच्या पोटाकरितां भांडत असतां एखाद्यास तुरुंगांत जाण्याचा जरी प्रसंग आला तरी हरकत नाहीं; पण ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं या वेळीं मनापासून झटलेंच पाहिजे असें त्यांस आग्रहपूर्वक आमचें सांगणें आहे. हे राज्य कायद्याचें व ओरडीचें आहे, कायदा सरकारनें केला आहे. ओरड करण्याचें काम आमचें आहे व तें जर आम्ही नीटपणें केलें नाहीं, तर त्याचा सर्व दोष आमच्या माथीं येणार आहे." (केसरी, २२ डिसेंबर १८९६, स. टि. खंड ३, पान ४७२.)

टिळकांनी या मोहिमेत अनेक सुशिक्षित पदवीधरांना सामील करून घेतले होते. फॅमिन कोडाचे मराठी भाषांतर करून ते गावोगाव वाटण्यासाठी व त्यातील तरतुदी

शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी हे तरुण गेले. त्यांपैकी काही जणांवर खटलेही झाले. पण शेतकऱ्यांच्या दुःखाला व अडचणींना त्यामुळे वाचा फुटली व सुशिक्षित लोकांना त्यांच्या परिस्थितीची कल्पना आली. पुढे झालेल्या शेतकरी चळवळीची पायाभरणीच या आंदोलनात झाली, हे तिचे फार मोठे यश म्हटले पाहिजे. टिळकांनी 'केसरी'तून सुशिक्षितांना सतत आवाहन करून त्यांचे सहकार्य मिळवले, हे त्यांचे महत्त्वाचे कार्य होते. टिळकांनी सुशिक्षितांना सांगितले होते, "फॅमिन रिलीफ कोडाचीं कलमें लोकांस समजावून देण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं गुन्हा नाहीं इतकेंच नव्हे, तर अशा प्रयत्नास गुन्ह्याचें स्वरूप आणण्याची खटपट करणारे कलेक्टर किंवा त्यांच्या हाताखालील अधिकारी आपणास उपहासास्पद करून घेऊन आपला मूर्खपणा व कोती बुद्धि कशी प्रगट करितात हें तिहींपैकीं जो दोन खटल्यांचा निकाल दुसरीकडे दिला आहे त्यावरून दिसून येईल. फॅमिन रिलीफ कोड जितका सरकारी अधिकाऱ्यांकरितां आहे तितकाच रयतेकरितां आहे, व त्या कोडांत जे हक्क अगर सवलती रयतेस द्याव्या असें सांगितलें आहे त्या मिळण्यासाठीं रयतेस उद्योग करावयास सांगणें हें आमच्या मतें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य आहे; व हीच गोष्ट अखेर कोर्टाची पायरी चढून सिद्ध झाली हें पाहून आम्हांस फार समाधान वाटतें." (केसरी, दि. १९ जानेवारी १८९७, स. टि. खंड ३, पान ४७७.)

"शेतकरी किंवा मजूर लोक अगदीं अज्ञान व गरीब असतात हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. यांच्याकरितां खरा उद्योग सुशिक्षित लोकांनींच केला पाहिजे व तो जर तालुक्यांतील पुढारी लोक करणार नाहींत तर आमच्या देशाचें दुर्दैवच अद्याप संपलें नाहीं, असें म्हणावें लागेल. पिकें बुडालीं, गुरें मरत चाललीं व लोक देशोधडीस लागून अन्नावांचून मरूं लागले अशी स्थिति कांहीं ठिकाणीं झाली आहे आणि इतर ठिकाणीं होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. अशा वेळींहि जर गरीब रयतेच्या साहाय्यार्थ पुढारी लोक झटणार नाहींत, तर ते लोकांच्या अभिशापास आपणांस पूर्णपणें पात्र करून घेतील असें म्हणणें किमपि अयोग्य होणार नाहीं. लोकांनीं एवढी गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्या देशांत सार्वजनिक कामें करण्यास माणसें मिळत नाहींत त्या देशांतील लोकांची स्थिति निकृष्टच असली पाहिजे." (स. टि. खंड ३, पान ४७०–४७१.)

सारांश, टिळकांची दुष्काळनिवारणासाठी केलेली राजकीय मोहीम ही त्यांच्या राजकारणाला सामान्य जनहिताचे अधिष्ठान देणारी चळवळ ठरली. टिळकांचे राजकारण हे लोककारण आहे, हे प्रस्थापित करणारी ती चळवळ ठरली.

शेतकऱ्यांचे इतर प्रश्न

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांत या काळानंतर टिळकांनी हरतऱ्हेने लक्ष घातले. हिंदु-

स्थानात शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे ही तर त्यांची श्रद्धा होतीच. दुष्काळाचा विचार करताना त्यांनी शेतीची चर्चाही केली होती. "पाऊस न पडल्यामुळें दुष्काळ पडतो, यासंबंधानें कोणचाच वाद नाहीं...मद्रास, बंगाल, ब्रह्मदेश या प्रांतांतून तेथील लोकांना पुरून आम्हांस पुरेसें धान्य यंदा उत्पन्न झालेलें आहे; पण तें धान्य विकत घेण्यास आमच्या रयतेपाशीं पैसेच नाहींत. उन्हातान्हांत दिवसभर खडी फोडावी तेव्हां सहा दिडक्या दृष्टीस पडावयाच्या आणि मग दाणे विकत घेण्याची वात! अशी निकृष्ट स्थिति आमची कां व्हावी? वर्षाच्या अखेरीस सरकार-सारा देऊन टाकल्यावर रयतेपाशीं कांहींच शिल्लक न राहून नवीन सालच्या प्रारंभीं धुतलेल्या तांदळाप्रमाणें आम्हांस नागडें-उघडें कां व्हावें लागतें? तेव्हां दुष्काळ कां पडतो याचीं कारणें शोधावयाचीं नसून, दुष्काळाचा धक्का सोसण्याइतकें त्राण प्रजेंत कां नाहीं, या निकृष्ट स्थितीच्या कारणांचा विचार करावयाचा आहे. बऱ्या स्थितींतील शेतकरी म्हणून जे नावाजलेले ते आज बायकामुलांसह दुष्काळी कामावर खडी फोडत आहेत." (केसरी, ८ मे १९००, स. टि. खंड, ३, पान ४४६.)

दुष्काळावरचे टिळकांचे लेख या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. टिळकांनी शेतकऱ्याच्या वाढीची तितक्याच निकडीने चर्चा सुरू केली. राष्ट्रीय सभेने हा प्रश्न त्यावेळी उपस्थित करून ठराव केला होता. श्री. रमेशचंद्र दत्त यांनी लॉर्ड कर्झन यांना चार अनावृत्त पत्रे पाठविली व या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले. टिळकांनी केसरीत चार अग्रलेख लिहून लोकांना या प्रश्नाची माहिती दिली. टिळकांनी म्हटले होते, "वास्तविक पहातां शेतसाऱ्याचा प्रश्न फारच विकट व वादग्रस्त नाहीं. परंतु आज त्यास असें अनिष्ट स्वरूप येण्यास मुख्यतः दोन कारणें झालेलीं आहेत. पहिलें कारण असें कीं, हिंदुस्थान सरकारनें जमीनमहसुलाच्या बाबतींत अनिवार लोभ बाळगून अशीं कांहीं विलक्षण तत्त्वें लागू केलीं आहेत कीं, तीं हिंदुस्थानांत आजपर्यंत होऊन गेलेल्या स्वदेशीय किंवा विदेशीय राजांच्या अमलाखालीं कधींहि लागू करण्यांत आलेलीं नव्हतीं. फार काय पण आजमितीस अमेरिका किंवा युरोप खंडांतील सुधारलेलीं स्वतंत्र राष्ट्रे यांमध्येहि तीं बहुधा अमलांत असलेलीं आढळत नाहींत. दुसरें कारण असें आहे कीं, हिंदुस्थानांतच निरनिराळ्या प्रदेशांत धान्याच्या निरनिराळ्या पद्धति अमलांत असून जमीन महसुलांच्या तत्त्वांची व्हावी तशी एकवाक्यता अद्याप करण्यांत आलेली नाहीं. या दोहोंपैकीं पहिलें कारण हेंच अर्थात् विशेष महत्त्वाचें होय." (केसरी, २५ डिसेंबर १९०८, स. टि. खंड ३, पान ५११–५१२.)

शेती सुधारण्यासाठी मुंबई सरकारची कांहीं योजना तयार होत असल्याची माहिती एका सरकारी अधिकाऱ्याने दिल्यावर टिळकांनी आपले याविषयीचे विचार एका अग्रलेखात मांडले होते. "शेतीची सुधारणा म्हणजे नुसत्या पिकाची सुधारणा नव्हे, तर त्या पिकापासून पुढें जो माल तयार होतो तो माल तयार करण्याचेहि कारखाने

या देशांत निघाले पाहिजेच...शेतकरी वर्गास खऱ्याखुऱ्या फायद्याचें शिक्षण मिळण्याची तजवीज होऊन त्याप्रमाणें या देशांतील शेतकरीवर्ग या कामांत सरकारनें तयार केला पाहिजे. जपान वगैरे राष्ट्रांत जेथें स्वराज्य आहे तेथें अधिकारीवर्ग आणि शेतकरीवर्ग यांच्यामध्यें एक प्रकारची सहानुभूति असून शेतकऱ्यांचें खरें कल्याण कशानें होईल इकडे अधिकाऱ्यांचें लक्ष असतें. तसा प्रकार आमच्याकडे होणें आवश्यक आहे; आणि तो होण्यास शेतकी खात्याची रचना रेव्हिन्यू, ज्यूडिशियल किंवा पोलीस खात्याहून निराळी पाहिजे."... (केसरी, २२ ऑक्टोबर १९०३, स. टि. खंड ३, पान ३८२–३८३.)

शेतकरी व कामगार यांच्या सहाय्यकारी पेढ्या हिंदुस्थान सरकारने काढण्याचे ठरवून १९०३ साली कायदेकौन्सिलपुढे एक बिल मांडले. या बिलाचा हेतू स्तुत्य असला तरी ते 'परस्परं समर्पयामि' अशा स्वरूपाचे आहे, असे टिळकांनी म्हटले होते. त्याविषयीच्या लेखातही शेतकी खर्चासाठी लागणाऱ्या भांडवलाची चर्चा टिळकांनी केली होती. पण सरकारला शेतीसाठी खर्च करावयाची इच्छा नाही अशी टीका करून टिळकांनी असे मत मांडले होते की, "सरकारचा ओढा परभारें काम भागविण्याकडे असल्यामुळें हें बिल बाहेर पडलें आहे. व आमचें मत कितीहि प्रतिकूल असलें तरी, तें पास होईल यांत शंका नाहीं. तथापि, आमच्या शेतकऱ्यांचें शिक्षण, त्यांची सध्याची सामाजिक स्थिति वगैरे लक्षांत आणतां अनुभवांतीं परस्पर सहाय्यकारी मंडळ्यांची युक्ति आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें निरुपयोगीच ठरेल, आणि अखेरीस लोकांच्या म्हणण्याप्रमाणें शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास त्यांस हलक्या व्याजानें पैसे मिळण्याची योजना होऊन खेड्यांतील लोकांस करतां येईल अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांचीच देशांत अभिवृद्धि करावी लागेल अशी आम्हांस खात्री आहे...म्हणूनच हल्लींच्या बिलाची दिशा भ्रांतिमूलक असून परिणामीं त्यापासून कधींहि इष्टसिद्धि व्हावयाची नाहीं." (केसरी, १७ नोव्हेंबर १९०३, स. टि. खंड ३, पान ३९३–३९४.) यातही शेती व उद्योगधंदे हे परस्परसहाय्यक झाले पाहिजेत हा दृष्टिकोण व सरकारने अधिक खर्च करण्याची मागणी या दोन गोष्टी समान असत. टिळकांच्या सर्व लिखाणात सरकार करीत असलेली उपेक्षा, हेळसांड किंवा अन्याय वा जुलूम हे मुद्दे सतत असल्यामुळे त्या प्रश्नांची मौलिक चर्चा दुय्यम ठरे व भर सरकारविरोधावर राहात असे. लोकांचे हक्क–मग ते कोणत्याही वर्गातले असोत–जपण्याची, रक्षिण्याची बुद्धी मुख्य असे.

खोतांच्या हक्कांची चर्चा करताना टिळक जमिनीची मालकी कसणाऱ्या शेतकऱ्याकडे जावयास हवी, या आधुनिक तत्त्वाचा उल्लेख करून म्हणाले होते, "अर्थशास्त्राचें असें एक तत्त्व आहे कीं, शेत करणारा प्रत्येक मनुष्य आपआपल्या जमिनीच्या तुकड्याचा मालक असला म्हणजे त्याला जमिनीची सुधारणा करण्याची उमेद येऊन त्याच्या

श्रमाचें पूर्ण फळ त्यास मिळतें; इतकेंच नव्हे तर, एकंदर देशाचें उत्पन्न वाढून देश अधिक श्रीमंत व सुखी होतो. अर्थशास्त्राचें हें तत्त्व अगदीं अक्षरशः खरें आहे. प्रत्येक शेतकरी प्लेटोच्या युटोपिया अथवा काल्पनिक देशांतील रहिवाश्यांप्रमाणें जर विद्यासंपन्न असून आपलें हित पाहाणारा असेल, तर वरील अर्थशास्त्राच्या तत्त्वानें पुष्कळ लहान लहान सुखी कुटुंबें होऊन त्यामुळें देशास व राज्यास बळकटी येईल. पण जोंपर्यंत शेकडा पांच लोकांसहि लिहितां-वाचतां येत नाहीं इतकेंच नव्हे तर हरएक बाबतींत कोणी तरी नायक, पुढारी अगर कर्ता पुरुष असल्याखेरीज कोणचाहि धंदा करण्यास जे लोक प्रवृत्त होत नाहींत, अशा स्थितींतल्या लोकांस वरील अर्थशास्त्राचें तत्त्व लागू करणें म्हणजे लहान मुलास एक मोठा दगड उचलण्याचें काम सांगण्याइतकेंच मूर्खपणाचें होय." (स. टि. खंड ३, पान ४०२.) म्हणून खोतांच्या हक्कांचा विचार करून टिळकांनी सरकारच्या त्या विलाचा धिक्कार केला होता. त्यांनी म्हटले होते, "जी गोष्ट त्यांस न्यायानें अथवा न्यायाच्या कोर्टामार्फत करून घेतां येत नाहीं, तीच गोष्ट न्यायाचा आव आणून नुसत्या दांडगाईनें करण्यास सरकार प्रवृत्त झालें आहे. करितां, ही दांडगाई कितपत चालण्यासारखी आहे, आपणांस त्याच्या विरुद्ध कांहीं प्रतिकार करण्यासारखा आहे कीं नाहीं, असल्यास तो कोणता, ह्याहि प्रश्नांचा आपल्यास येथें विचार केला पाहिजे. आमचें असें मत आहे कीं, ही दांडगाई करण्याचा सरकारास अधिकार नाहीं व मागें ज्याप्रमाणें सरकारवर फिर्यादी करून खोत लोकांस आपले हक्क शाबीत करून घेतां आले, त्याप्रमाणें आतांहि करणें कदाचित् भाग पडेल." (केसरी, २१ मार्च १८९९, स. टि. खंड ३, पान ४१५–४१६.) हे बिल स्टेट सेक्रेटरींनी नापसंत केले, त्यामुळे त्यावेळी ते मुंबई सरकारने परत घेतले. पण पुढे १९०३ मध्ये नवे खोती बिल मुंबई सरकारने पुढे आणले. त्यावेळी त्यातील काही तरतुदी कशा अन्यायकारक आहेत, याची चर्चा टिळकांनी एका अग्रलेखात करून सरकारी अमलदारांचे काय धोरण असते हे उघडकीस आणले. सरकारी नोकरशाहीचे डावपेच कोणते, याच दृष्टीने याही वेळेस विचार झाला. पुढे मात्र या विषयावर टिळकांनी काही लिखाण केलेले आढळत नाही.

सारांश, टिळकांनी महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीद्वारे कायदेशीर व सरकारला प्रभावी लोकमताची दहशत निर्माण करणाऱ्या जनआंदोलनाचा पाया घातला. लढाऊ आंदोलनाची राजकीय प्रथा निर्माण केली. आदर्श राजकीय मोहीम वृत्तपत्राद्वारे चालवून, सुशिक्षितांना शेतकऱ्यांच्या प्रश्नात लक्ष घालावयास लावून, त्यासाठी न्या. रानडे व सार्वजनिक काका यांनी केलेल्या अभ्यासाचा व तपश्चर्येचा उपयोग करून टिळकांनी आपल्या लोकनेतृत्वाची पायाभरणी केली व देशाला लढाऊ नेतृत्व आता हवे आहे व ते कसे कालप्रभावी ठरू शकेल ते स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध केले. पुढे

१८९८ मध्ये रँडच्या खुनाला उत्तेजन दिल्याचे निमित्त करून टिळकांना सरकारने तुरुंगात टाकले. खरे म्हणजे टिळकांचे उगवते नेतृत्व खच्ची करण्याचा तो प्रयत्न होता.

स्वदेशीची राष्ट्रव्यापी मोहीम

१६ ऑक्टोबर १९०५ ला इंग्रज सरकारने बंगालची फाळणी जाहीर केली. भारतीय राष्ट्रवादाचे युद्धमान स्वरूप या फाळणीच्या निर्णयामुळे दिसले. राष्ट्रीय एकतेच्या भावनेची ज्योत ज्वालेसारखी उफाळून आली. या बंगभंगातून स्वदेशी व परदेशी मालाचा राष्ट्रीय बहिष्कार या भारतीय राष्ट्रवादाला रचनात्मक व लढाऊ स्वरूप देणाऱ्या दोन चळवळी निर्माण झाल्या. टिळकांनी या बंगभंगाच्या आंदोलनाचा राष्ट्रीय भावनेच्या उठावणीसाठी भरपूर उपयोग करून घेतला. बंगाल हा एक राहील तर तो शक्तिमान् ठरतो, त्याची फाळणी केली तरच ते शासकीय व राजकीय दृष्ट्या उपयुक्त ठरेल ही इंग्रज सरकारची या निर्णयामागची भूमिका होती. लॉर्ड कर्झन हे त्यावेळी व्हाईसरॉय होते. ते पक्के साम्राज्यवादी होते. केवळ प्रशासनाच्या दृष्टीने एकांगी विचार करून सरकारने हा निर्णय घेतला होता. भारतातील राजकीय हवामान तापले आहे, या निर्णयाचे प्रतिकूल परिणाम होतील, याचा विचारही सरकारने केला नव्हता. त्यामुळे त्याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. बंगालची जनता खवळली. टिळकांनी ही चळवळ केवळ बंगालची राहू शकत नाही, ही राष्ट्रीय भूमिका घेतली आणि राजकीय असंतोषात भर टाकण्याची उत्तम संधी आहे, हे हेरून ताठपणाने ते उभे राहिले. १९०५ ते १९०८ पर्यंतचे या काळातील टिळकांचे लेखन हे अत्यंत तेजस्वी व इंग्रजी साम्राज्यशाहीविरुद्ध जहाल भूमिका घेणारे होते. याच काळात 'राष्ट्रीय पक्ष' नावाचा लढाऊ राष्ट्रवाद्यांचा पक्ष त्यांनी निर्माण केला व काँग्रेसच्या व्यासपीठावरून केलेल्या भाषणांतून सर्वत्र लढाऊ राष्ट्रवादी किंवा निःशस्त्र प्रतिकारवादी भूमिका घेतली. त्या त्यांच्या विचारसरणीचा परामर्श पुढच्या एका स्वतंत्र प्रकरणात घ्यावयाचा आहेच.

'स्वदेशी व राष्ट्रीय बहिष्कार' या संलग्न कल्पना आहेत. त्या परस्परपूरक आहेत. टिळकांनी बंगभंगाच्या त्या योजनेचा निषेध करताना या चळवळींचा पुरस्कार केला. सुरुवातीला हे आंदोलन निषेधात्मक राहिले, पण पुढे विधायक स्वरूपाचा आर्थिक राष्ट्रवाद उदयास आला. त्याचे स्वरूप मागे एका प्रकरणात पाहिलेच आहे. टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराची मोहीम कशी चालविली, हे या प्रकरणात पाहावयाचे आहे. टिळक स्वदेशीच्या मोहिमेकडे चार अंगांनी पाहात होते. पहिले अंग, स्वदेशी हे देशभक्तीचे आचरण करावयास शिकविणारे राष्ट्रीय व्रत म्हणून. दुसरे स्वदेशीला परदेशी मालावरील बहिष्काराची जोड देऊन त्याचा इंग्रजविरोधी शस्त्र म्हणून वापर. तिसरी बाजू राजकीय होती. बहिष्कारामुळे इंग्रजी व्यापारावर प्रतिकूल परिणाम होऊन ब्रिटिश

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
2200

सरकार भारतीयांना अधिक हक्क देण्यास तयार होईल, असे टिळकांना वाटत होते. आणि चौथी बाजू म्हणजे इंग्रजी मालावर बहिष्कार टाकल्यामुळे त्या वस्तू भारतात तयार करण्यासाठी स्वदेशी उद्योगधंदे काढण्यास चालना मिळेल. म्हणजे औद्योगिक विकासाचा पाया घातला जाईल. अशा चार बाजूंनी टिळकांनी या काळात विचार मांडले व लोकांना स्वदेशीचे व्रत घ्यावयास लावले. स्वदेशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारे उपक्रम केले. किंबहुना टिळक म्हणत, "हल्लींचें मोठें संकट गाढ दारिद्र्य हें आहे. त्यातून सुटण्याचा उपाय सांगणे हें आमचें मुख्य कर्तव्य आहे. हें दारिद्र्य, ही उपासमार काढून टाकण्यासाठीं स्वदेशी चळवळ सुरू झाली आहे." (केसरी, १० ऑक्टोबर १९०६.) स्वदेशीला एक आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीही होती. कारण ज्या ठिकाणी राष्ट्रवादी चळवळी त्या काळात सुरू झाल्या होत्या त्या ठिकाणी साम्राज्यवादी आर्थिक शोषणाविरुद्ध चळवळी सुरू झाल्या होत्या. त्यांचाही टिळकांनी स्वमतप्रचारासाठी उपयोग करून घेतला.

स्वदेशीचा पूर्वेतिहास

टिळकांनी 'स्वदेशी' चळवळीच्या पहिल्या वर्षानिमित्त जो लेख लिहिला होता त्यात स्वदेशीची चळवळ महाराष्ट्रात २५ वर्षांपूर्वी सुरू झाली होती, तिचा आढावा घेतला होता. त्यात म्हटले होते, "महाराष्ट्रात स्वदेशी चळवळ पंचवीस तीस वर्षांपूर्वी कै. गणेश वासुदेव जोशी यांनी प्रथम सुरू केली पण त्यावेळीं ही चळवळ परिपाकास येण्यास अनुकूल स्थिति नसल्यामुळें विचारांचें प्रतिबिंब आचारांत विशेषसें दिसून आलें नाहीं. पुढें कै. नामजोशी यांनीं औद्योगिक सभा व प्रदर्शनें वरींच वर्षें भरवून स्वदेशी चळवळीचें एक तऱ्हेचें पुनरुज्जीवन केलें. त्यावेळीं औद्योगिक उन्नतीच्या विचारांना सर्व लोकांची संमति व सहानुभूति मिळाली ही गोष्ट खरी, पण विचार-सृष्टींतून ती चळवळ रोजच्या प्रत्यक्ष सृष्टींत उतरण्यास लोकांची त्या चळवळींविषयीं जीं उत्कंठा उत्पन्न व्हावयास पाहिजे होती ती त्यावेळीं उत्पन्न झाली नव्हती. औद्योगिक उन्नति हा एक पुष्कळ इतर मार्गांपैकींच एक आहे, असें त्यावेळीं लोकांना वाटून सर्व लोकांची त्या विषयावर एकदृष्टी झालेली नव्हती. किंबहुना स्वदेशी तत्त्वांचा सांप्रत जितक्या निरनिराळ्या दिशांनीं ऊहापोह झालेला आहे तितक्या प्रकारांनीं स्वदेशीचीं तत्त्वें व स्वरूपें लोकांच्या दृष्टीस त्यावेळीं पडलीं नव्हतीं. स्वदेशी चळवळीला हीं निरनिराळीं अंगें त्यावेळीं नव्हती व आजच उत्पन्न झालीं अशांतला प्रकार नाहीं. स्वदेशी चळवळीचें विराट स्वरूप पाहण्याची त्यावेळीं विचारी लोकांच्या मनांत उत्कंठा उत्पन्न झालेली नव्हती, वेदांतांतील वैराग्याचीं तत्त्वें कायमचींच ठरलेलीं आहेत, पण वैराग्य अंगीं भिनण्यास संसारांत तसाच कांहीं भयंकर प्रसंग येऊन गुदरावा लागतो."

"स्वदेशी तत्त्वें नवीन नसलीं तरी राष्ट्रावर तसाच प्रसंग येऊन गुदरल्याशिवाय राष्ट्राला डोळे असूनहि या तत्त्वाकडे पाहण्याची लायकी नसते. राष्ट्रीय सभेनें गेल्या एकवीस वर्षांत जो मार्ग स्वीकारला त्या मार्गाविषयी लोकांच्या मनांत निराशा वाणली नसती तर गेल्या एक वर्षांत स्वदेशी चळवळीचा जो प्रसार झाला तो झाला नसता. प्लेग, दुष्काळ यांच्या परंपरेनें लोकांच्या मनांत स्वतःच्या दारिद्र्याविषयीं जी भयंकर चिंता उत्पन्न केलेली आहे, त्या चिंतेवर जर राष्ट्र हेरपळलें गेलें नसतें तर स्वदेशी तत्त्वांना इतक्या प्रेमानें कवटाळण्यास आमचा देश यावेळीं कधींच सरसावला नसता. लोकांचें दारिद्र्य गेल्या चारपाच वर्षांत नवीन उत्पन्न झालें, अशांतला भाग नाहीं. पण या चारपाच वर्षांत आम्हीं पुरें दरिद्री झालो आहों, याची खूण लोकांना पक्की पटली. क्षयरोगास ज्यावेळीं प्रारंभ होतो व पहिल्या दुसऱ्या स्थितींतून ज्यावेळीं रोगी जात असतो त्यावेळीं क्षयरोग अंगांत असतांहि व एखाद्या दुसऱ्या नामांकित वैद्यानें 'तूं क्षयरोगी आहेस' असें रोग्यास समजावून सांगितलें तरी क्षयरोगास जो पुढें प्रत्यक्ष वळी पडावयाचा असतो तोच मनुष्य आपल्या शरीरांत शिरलेल्या त्या मृत्यूकडे डोळेझांक करून रोजच्या सुखासमाधानांत निमग्न असतो. क्षयरोगाची प्रत्यक्ष छाया शरीरावर उमटल्याशिवाय इतरांनीं कितीहि सांगितलें तरी तरणोपायाविषयीं तो क्षयी लोलुपच होत नाहीं. प्लेग व दुष्काळ यांनीं जर थोडकीशी कामगिरी, वाइटांतून चांगलें निघतें या दृष्टीनें, हिंदुस्थानासंबंधीनें बजावली असेल, तर ती हीच होय कीं, आमच्या क्षयरोगास आमच्या शरीरांत गुप्तपणें संचार करू न देतां क्षयरोगाची अकाळविकाळ मूर्ति प्रत्यक्ष आमच्यापुढें उभी केली. आमच्यांतील विचारी पुरुषांनीं गेलीं पंचवीस वर्षें राष्ट्रोन्नतीचे म्हणून ठरविलेले मार्ग चुकीचे ठरलेले, दुष्काळ व प्लेग या जोडगोळीनें गांजलेला जनसमूह नवीन एखाद्या तरणोपायासंबंधानें उत्सुक व उन्मुख झालेला, अशा तऱ्हेची आमच्या देशाची स्थिति स्वदेशी चळवळीच्या पूर्वीची होती. या चळवळींचीं बीजें लोकांच्या मनांत चांगलीं खोल जाऊन वसण्यास जशा प्रकारची जमीन पूर्वी तयार व्हावयास पाहिजे होती तशाच प्रकारची जमीन राष्ट्रीय सभेच्या निराशेमुळें व लोकांवरील संकट-परंपरेनें आपोआप तयार झाली होती."

परराष्ट्रांची उदाहरणे

स्वदेशीला अनुकूल अशी आंतरराष्ट्रीय परिस्थिती कशी निर्माण झाली आहे याचे विवेचन करताना टिळकांनी लिहिले होते, "गेल्या बारा वर्षांत जगांत इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, जपान वगैरे देशांत जी विचारक्रांति चाललेली होती, त्यामुळें स्वदेशी चळवळीचें निरनिराळे अवयव विधात्याच्या भट्टींत तयार होत होते. जर्मनीमध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना बऱ्याच अंशीं पूर्णत्वास जाऊन त्या कल्पनेच्या बुडाशीं सांप्रतच्या स्वदेशी चळवळीचीं तत्त्वें कशीं आधारभूत आहेत, हे सिद्ध झालें होतें. फ्रान्स, अमेरिका,

जपान वगैरे राष्ट्रांनीं फ्रीट्रेड अथवा खुला व्यापार यांचीं तत्त्वें झुगारून दिलीं असतां स्वदेशी तत्त्वांनीं राष्ट्राचें खरें हित होतें असें स्वतःच्या उदाहरणांनीं जगाच्या अनुभवास आणलें होतें. खुद्द चेंबरलेन-बल्फर साहेबांनीं याच स्वदेशी तत्त्वांचा सांगोपांग ऊहापोह केल्यामुळें स्वदेशी तत्त्वांच्या खरेपणाविषयीं हिंदुस्थानांत कोणाच्याहि मनांत शंका राहिली नाहीं. आयर्लेण्ड, स्विट्झर्लेण्ड, पोलंड यांसारख्या लहानसान व निर्बल देशांनींहि सिनफेन पॉलिसी उर्फ 'आमचे आम्हीच' या तत्त्वाच्या धोरणांची अंमलबजावणी करून स्वतःच्या दीन स्थितींतहि चांगला फायदा करून घेतला. चीनसारख्या अवाढव्य पण निजलेल्या राष्ट्रांतहि ह्या स्वदेशी तत्त्वांनीं सामर्थ्य उत्पन्न केलें. अशी गेल्या बारा वर्षांत सर्व जगांत विचारक्रांति घडून आली. कांहीं तरी तरणोपाय पाहिजे म्हणून हिंदुस्थानचे लोक परमेश्वराचा धावा करीत तरणोपायाची वाट पाहात उन्मुख होऊन बसलेले, अशा स्थितींत जगांतील सर्व जिवंत राष्ट्रांनीं आपआपल्या बुद्धिसामर्थ्यानें व कर्तबगारीप्रमाणें स्वदेशी चळवळीचे निरनिराळे अवयव उत्तम रीतीनें घडवून या चळवळीची सुबक मूर्ति निर्माण करून चेंबरलेनसारख्या मुत्सद्यांच्या हातांतूनच ती आमच्या पुढें प्रगट करविली असतां आम्ही जर या नवीन अवतीर्ण झालेल्या शक्ती-पुढें लोटांगणें घातलीं नसतीं तर आमच्यासारखे हतभागी कोणीच ठरले नसते." (केसरी, १६ ऑक्टोबर १९०६.)

स्वदेशीची आर्थिक बाजू

स्वदेशीमुळे आर्थिकदृष्ट्या काय परिणाम होतील याची चर्चा त्यावेळी चालू होती. स्वदेशीवर त्याकाळचा नेमस्त पक्ष प्रारंभी काही आक्षेप घेत असे. त्यात एक आक्षेप असा होता की, बंगालमध्ये स्वदेशी चळवळीने आर्थिक नुकसान झाले आहे, स्वदेशी चळवळीच्या पहिल्या तीन चार महिन्यांतच दीड-दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे, कारण स्वस्त परकीय मालापेक्षा महाग स्वदेशी माल घ्यावा लागत असल्यामुळे जनतेचा जास्त पैसा खर्च होतो. या आक्षेपाला टिळकांनी समर्पक उत्तर दिले होते, "पहिल्यानें क्षणभर आपण असें गृहीत घेऊं कीं, जो विलायती माल एक रुपयास मिळतो तोच स्वदेशी घेतल्यास त्यास चार आणे जास्त म्हणजे सव्वा रुपया द्यावा लागतो. म्हणजे पांच कोट रुपयांचा स्वदेशी माल घेतल्यास गिऱ्हाइकांस एक कोट रुपये अधिक पडले किंवा कांहीं आक्षेपकांच्या म्हणण्याप्रमाणें एक कोटींचें नुकसान झालें. परंतु अशा रीतीनें विचार करतांना दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. ती ही कीं, चार कोटींचा विलायती माल घेतला तर चार कोटींच्या चार कोटि विलायतेस जातात आणि तितकाच देशी माल पांच कोट रुपयांस खरेदी केला तर सर्व पांच कोट रुपये स्वदेशांत राहातात! अर्थात् पांच कोटींचा स्वदेशी माल घेण्यांत एक कोटीचें नुकसान होतें ही समजूत चुकीची आहे.

गिऱ्हाइकांस एक कोट रुपये जास्त पडतात हें खरें; पण देशांतल्या देशांत राहून त्याचा अखेर विनियोग भांडवलाच्या रूपानें नवीन कारखाने काढण्यांतच होत असतो. स्वदेशी चळवळीनें किंवा परदेशी मालावर जकात अधिक बसविल्यानें देशांतील उद्योगधंद्यांस जें उत्तेजन मिळावयाचें त्याचा मार्ग हाच होय. जकात वाढवून किंवा स्वदेशी माल घेण्याचा लोकांनीं निग्रह केल्यामुळें किंमती वाढून कारखानदारांस आपल्या मालावर जो फायदा मिळतो, तोच फायदा सदर कारखाने वाढविण्यांत किंवा दुसरे कारखाने घालण्यांत भांडवलाच्या रूपानें तो खर्च करीत असतो; आणि अशा रीतीनें नवीन कारखाने काढून देशांतल्या देशांत जास्त माल निघू लागला म्हणजे पुनः किमती कमी होऊन परकीय मालाच्या किमतीवरोबर देशांतील मालाची किंमत होऊन व्यापाराचें समीकरण नीट बसतें. स्वदेशी चळवळीनें मालाच्या किमती चढून लोकांचें नुकसान होतें, असा जो कित्येक आक्षेप घेतात तो व्यापाराच्या समीकरणाची ही क्रिया नीट न समजल्यामुळें होय. सप्रतिबंध ऊर्फ संरक्षित व्यापार आणि स्वदेशी चळवळ हीं दोन्हीहि स्वदेशी व्यापार वाढविण्याची कृत्रिम साधनें आहेत; व त्या दोहोंचाहि अखेर परिणाम असा आहे कीं, परदेशी मालावर जकात बसविल्यामुळें किंवा त्यास बहिष्कार टाकल्यानें स्वदेशी वस्तूंची किंमत वाढून त्यायोगें कारखानदारांच्या हातांतील भांडवल वाढतें; आणि हें भांडवल वाढलें म्हणजे नवीन कारखाने निघून स्वदेशी मालाच्या किमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या किमतीवरोबर होतात." (केसरी, १२ डिसेंबर १९०६, स. टि. खंड ४, पान ५४६–५४७.)

स्वदेशीचे राष्ट्रीय व्रत

टिळकांनी असे म्हटले होते की, स्वदेशीचें व्रत गिऱ्हाईक निर्माण करते, म्हणजे देशभक्तांनी जर स्वदेशी माल वापरायचे ठरविले तर स्वदेशात निघणाऱ्या उद्योगातून तयार होणारा माल खपेल. म्हणून स्वदेशी हे भारताच्या औद्योगिक उन्नतीला उपयुक्त ठरणारे व्रत आहे. 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' या गीतेतील वचनाचा आधार देऊन टिळक सामान्य जनतेला स्वदेशीसाठी अल्प स्वार्थत्याग करण्यास तयार व्हा, असे सांगत होते. त्यांनी याविषयी लिहिले होते, "तीस कोट प्रजेच्या हिंदुस्थान देशास तो कितीहि गरीब असला तरी अशा रीतीनें तीस कोट रुपये भांडवल जमविणें अशक्य नाहीं. याच तीस कोट लोकांपासून हिंदुस्थान सरकार दरसाल कराच्या रूपानें शंभर-सव्वाशें कोटि रुपये उत्पन्न करीत आहे, व स्वदेशी उद्योगधंद्यांच्या संरक्षणार्थ परदेशी मालावर जर सरकारनें जास्त जकात बसविली असती, तर लोकांवर या जकातीचें ओझें सारखें वांटून गेल्यानें तें त्यांच्या लक्षांतहि आलें नसतें. सरकारी कराच्या रूपानें हें ओझें जसें लोकांवर वांटलें गेलें असतें तसें स्वदेशी चळवळीमुळें वाढलेल्या किमतींच्या रूपानें तें लोकांवर आतां वांटलें जात आहे. फरक एवढाच कीं,

जी क्रिया सरकारच्या हुकमानें झाली असती तीच आतां बहिष्कार योगानें किंवा लोकांच्या निश्चयानें होत आहे. देशांतील उद्योगधंदे वाढण्यास या क्रियेची सर्वत्र अपेक्षा आहे, इतकेंच नव्हे तर, त्याखेरीज गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत किमती वाढल्यानें लोकांचें नुकसान झालें असें प्रतिपादन करणें साहसाचें व असमंजसपणाचें लक्षण होय. पैसा देशांतल्या देशांत रहातो ही गोष्ट प्राधान्येंकरून लक्षांत ठेविली पाहिजे. दहा कोटि रुपये अजीबात या देशांतून जाण्यापेक्षां या देशांतील कांहीं लोकांच्या खिशांतील एक कोटि रुपये या देशांतील पण दुसऱ्या लोकांच्या खिशांत पडून जर दहाच्या दहा कोटि रुपये देशांत रहात असतील, तर त्यांत एकंदर राष्ट्राचें हितच आहे. आतां एवढी गोष्ट खरी कीं, देशी मालाची किंमत विनाकारण चढणार नाहीं अशी या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे; व तशी तजवीज म्हटली म्हणजे मुख्यत्वेंकरून स्वदेशी मालाची सार्वजनिक भांडवलानें ठिकठिकाणीं दुकानें काढणें हीच होय, व त्याप्रमाणें हल्ली उद्योगहि चालू आहे. तसेंच स्वदेशी मालाचा जितका जितका जास्त व लवकर पुरवठा करतां येईल तितका करण्याविषयीं व्यापाऱ्यांनीं झटलें पाहिजे. पण ही गोष्ट होईपर्यंत कांहीं काळ तरी स्वदेशी मालाची किंमत थोडीबहुत जास्त पडणारच, आणि ती गिऱ्हाइकांनीं सोसली पाहिजे. देशांतील उद्योगधंद्यांच्या उत्तेजनार्थ लोकांनीं कांहीं दिवस जो स्वार्थत्याग करावयास पाहिजे तो हाच होय; आणि तो करण्याचा निश्चय करणें हेंच स्वदेशी चळवळीचें किंवा बहिष्कार–योगाचें रहस्य आहे. स्वदेशी चळवळ म्हणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे, त्यांत थोडी गैरसोय आहे व ती लोकांनीं सोसली पाहिजे." (केसरी, १२ डिसेंबर १९०५, स. टि. खंड ४, पान ५४८.)

इंग्रजी पत्रांना उत्तर

स्वदेशी-बंगभंग-बहिष्कार यांची राजकीय मोहीम सुरू झाल्यावर 'केसरी'ने दुष्काळाचे वेळी केले, तसेच प्रसिद्धीचे कार्य केले. या चळवळीचा अनेक दृष्टींनी पाठपुरावा केला. स्वदेशी चळवळ व बहिष्कार ही जोडगोळी स्वराज्याच्या चळवळीचा एक भाग आहे, या जाणिवेने इंग्रजी राज्याला प्रतिकूल असा प्रचार सुरू केला. अपेक्षेप्रमाणे इंग्रजी वृत्तपत्रे या चळवळीबद्दल गैरसमज पसरविण्यासाठी खोट्या बातम्या छापू लागली. टिळकांनी या पत्रांना उत्तरे द्यावी व स्वदेशीच्या स्वयंसेवकांना प्रोत्साहन द्यावे, असा उपक्रम सुरू झाला. बंगालमधील चळवळीच्या बातम्या 'केसरी'त देऊन लोकांत उत्साह निर्माण करण्याचा टिळकांनी सतत प्रयत्न केला. टिळकांनी लिहिले होते, "आज परदेशी माल वापरल्याखेरीज आपलें चालणार नाहीं, बंगाली लोकांचा निश्चय तरी कोठें टिकणार आहे, अशा प्रकारचे कांहीं अजागळ आक्षेप या चळवळीविरुद्ध येऊं लागले आहेत, व 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया'स तर ही गोष्ट

सिद्धीस जाणें शक्यच दिसत नाहीं. परंतु हे सर्व विचार कोत्या मनाचे व एकपक्षीय तरी आपमतलबीपणाचे आहेत. अशी कोणती जगांत चळवळ आहे कीं तिचें फळ अगदीं तात्कालिक आपणांस मिळतें ? काँग्रेस आज २० वर्षें झटते आहे, पण वर निर्दिष्ट केलेल्या गचाळ आक्षेपकांनी ' भिकेनें राज्य मिळेल कां ? ' असा कधीं प्रश्न केला आहे काय ? कायदेकौन्सिलांतून बजेटावर आमचें मेंबर जेव्हां चरचरीत भाषणें करतात, तेव्हां ' इतका चरचरीतपणा कशाला ? ' असा कोणी त्यांस प्रश्न विचारतो काय ? नाहीं. आमचें तर असें मत आहे कीं, स्वदेशी मालाबद्दलची जी चळवळ आहे, ती अशा प्रकारची आहे कीं, ती थोडी जरी सिद्धीस गेली तरी तितक्या प्रमाणानें ती देशास फायदेशीरच होणार. ती सर्वांशीं सिद्धीस जाईल तो सुदिनच. पण पावआणा जरी ती सिद्धीस गेली तरीहि त्यांत आमचें हितच आहे. देशी माल वापरण्याचा निश्चय मात्र करा व जितक्या बाबतींत तो शक्य तितक्या बाबतींत तो अंमलांत आणा, म्हणजे झालें. पुढें काय होईल याबद्दल तुम्हांस काळजी नको. " (केसरी, स्फुट सूचना, २९ ऑगस्ट १९०५.)

चळवळीच्या यशाचा पुरावा

बंगालमधील चळवळ ही तोंडाची बडबड व सोडा वॉटरचा फेस असून आता जिरावयास सुरुवात झाली आहे, या इंग्रजी पत्रांच्या टीकेला उत्तर देताना टिळकांनी लिहिले होते, " बंगाल्यांची चळवळ निव्वळ फेसासारखी जर आहे व ती जर नाहींशी व्हावयास लागली आहे तर ती मूर्खपणाची असून त्यामुळें अँग्लोइंडियनांची मनें बिथरलीं आहेत असें आपल्या लेखांनीं व बातमीदारांच्या पत्रांनीं दाखविण्याचा एवढा त्यांनीं अट्टाहास कां करावा बरें? हे पत्रकार कांहींहि म्हणोत व कसेंहि लिहोत, ज्याअर्थी ते डोळे चोळावयास लागले आहेत त्याअर्थी बहिष्काराचें अंजन त्यांस चांगलेंच झोंबलें आहे हें उघड होय. "

याच लेखात ' स्टेट्समन ' व ' कॅपिटल ' या पत्रांच्या बातमीदारांनी बाजारपेठेची पाहाणी करून जी आकडेवारी दिली होती तीच टिळकांनी चळवळीच्या यशाचा पुरावा म्हणून सादर केली. त्या बातमीपत्रात म्हटले होते, " गेल्या वर्षी या महिन्यांत त्यांचा जितका माल खपला होता, त्याच्या एक-तृतीयांश, एक चतुर्थांशावर कोणाचाहि माल अजून खपलेला नाहीं व यापुढें विलायती माल पाठवूं नका, देशी कापड असेल तर पाठवा, अशा त्यांच्या अडत्यांच्या तारा त्यांच्याकडे दररोज येत आहेत. शेंकडा बारा याप्रमाणें विलायती कापडाची किंमत कमी केली असतांना ही स्थिति आहे. कलकत्त्याहून बंगाली जिल्ह्यांत विलायती कापड गेल्या सालीं सप्टेंबरमध्यें किती गेलें व यंदाच्या महिन्यांत किती खपत आहे याचें स्वरूप स्टेट्समनच्या पुढील कोष्टकावरून कळून येईल :

जिल्हा	गेल्या वर्षांच्या सप्टेंबरातील खप रु.	यंदाच्या चालू महिन्यांतील खप रु.
यशोहर	३०,०००	२,०००
बोग्रा	१,७००	२००
डाका	५,०००	२,०००
आरा	१,५००	२००
हजारीबाग	१०,०००	५००
नडिया	१५,०००	२,५००
मालडा	८,०००	१,३००
भरद्वान	६,०००	१,०००

खुद्द कलकत्यांतच विलायती कापड विकणाऱ्या दुकानदारांची तर याहून जास्त होलांडी उठली आहे. स्टेट्समनच्या वातमीदारानें दुकानांत जाऊन 'कसा काय खप आहे?' असा प्रश्न करताच दुकानदारानें आपली पैशांची पेटी पालथी घालून रोजच्या विक्रीचे जमलेले पैसे कोणीं आठ पैसे, कोणीं दहा पैसे, वरील वातमीदारांस दाखविले. दुसऱ्या फेरींत हा वातमीदार परदेशी मीठ, चिरुट, साबण बटनें, बूट, वगैरे विकणाऱ्यांच्या दुकानांत गेला होता. मिठाचे व्यापारी पूर्वी निरनिराळ्या जिल्ह्यांत दर महिन्यास दहा हजारापासून पन्नास हजार मणांपर्यंत मीठ पाठवीत असत. पण हल्लीं हा व्यापार बहुतेक बसला असून गेल्या महिन्यांत तेथून विलायती मीठ जिल्ह्यांत फारच थोडें रवाना झालें. चिरुटाचा खप शेंकडा ५० बसला आहे व इतर विलायती जिन्नसांचीहि हीच स्थिति झाली आहे. कॅपिटल पत्रानेंहि अशी विश्वसनीय वातमी प्रसिद्ध केली आहे की, मारवाडी व्यापारी यापुढें मॅन्चेस्टरचा माल मागविण्यास तयार नसल्यामुळें विलायती कापडाची देवघेव बहुतेक नाहींशी झाली आहे. यापुढें मॅन्चेस्टरहून माल केव्हांहि मागवावयाचा नाहीं व जो व्यापारी तो मागवील त्यास व्यापारी देवघेवीचा व जातीचा बहिष्कार घालावयाचा असा बडा बझार व डाका पत्ती या दोन पेठांतील दुकानदारांनीं सभा भरवून पक्का निश्चय केला आहे." (केसरी, २९ सप्टेंबर १९०५.)

भेडसावणीस जुमानू नका

इंग्रजी पत्रे ज्या अर्थी प्रतिकूल टीका करू लागली आहेत किंवा उपहास करू लागली आहेत त्याअर्थी या चळवळीचा चाप इंग्रज व्यापाऱ्यांना घट्ट बसला आहे, असा निष्कर्ष टिळकांनी काढला व त्यांनी लिहिले, "बीस वर्षांपूर्वीचे किंबहुना दहा वर्षांपूर्वीचे दिवस आतां राहिले नाहींत. सरकार पूर्ण शक्तिमान असून, निर्भय आहे हें खरें;

पण इंग्रजी व्यापाऱ्यांचें जर नुकसान होऊं लागलें, तर हेंच सरकार हातपाय हलविल्या-वांचून राहील, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजी राज्य आणि इंग्रजी व्यापार या दोन्ही गोष्टी एकमेकांस इतक्या लागून आहेत कीं, शंकर पार्वतीच्या देहाप्रमाणें त्यांचा बहुतेक एकजीवच झाला आहे. तेव्हां इंग्रजी व्यापार कायम राखण्याकरितां इंग्रज लोक हिंदु लोकांच्या तक्रारींचें थोडेंबहुत तरी निवारण करतील, यांत शंकाच नाहीं. असें असतां ' टाइम्स ऑफ इंडिया 'सारखीं भुतें जीं नाचत आहेत, तीं केवळ सकृद्दर्शनीं भीति दाखवून आमच्या लोकांकडून बहिष्कार-योगाचा आरंभच बंद पाडण्याकरितां होय; आणि यांस न जुमानतां आम्हीं जर सत्यसंकल्पानें व निश्चयानें आपल्या कामास सुरुवात केली, तर हींच शहाणीसुतीं पत्रें उद्यां आमच्या निश्चयाची तारीफ करून आमचें म्हणणें कांहीं तरी ऐकलें पाहिजे, असें म्हणूं लागतील. सारांश, आज जें आम्हांस कांहीं करा-वयाचें आहे तें ' टाइम्स 'सारख्या पिशाचाच्या शापास, भेडसावणीस अगर जळफळीस न जुमानतां आम्हीं केलें पाहिजे. हे मायावी पत्रकार पराचा कावळा करून हजारों विघ्नें आपल्यापुढें उभी करतील." (स. टि. खंड ४, पान ५७३.)

बहिष्काराचे प्रभावी शस्त्र

बंगालच्या फाळणीमुळे नोकरशाहीचे अंतरंग उघडे पडले होते व त्यामुळेच राष्ट्रीय-त्वाची जाणीव संघटित रूप घेत होती, लढाऊ होत होती. राजकीय असंतोषाची धग वाढली होती. याचवेळी भारताच्या एकात्म राष्ट्रीयत्वाला आकार देता येईल, ही टिळकांची भूमिका होती. राजकीय आंदोलनाला राष्ट्रीयत्वाच्या जाणिवेचा आधार मिळाल्यास त्यांचा पराभव होणे अशक्य होते, ही टिळकांची खात्री होती. म्हणून टिळकांनी निर्वाणीचे लेखन या काळात सुरू केलेले आढळते. " वेळ कठिण आहे; जबरीची, अन्यायाची आणि जुलमाची कारकीर्द जारीनें सुरू झाली आहे; लोकांच्या पुढाऱ्यांवर खटले करून किंवा त्यांस हद्दपार करून येथील अधिकारीवर्ग आपल्या अमानुष रोषाचें प्रदर्शन करीत आहे, वगैरे वगैरे सर्व कांहीं खरें आहे. पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आमच्या धैर्याच्या कसोटीचीहि पण हीच वेळ आहे. लोकांच्या पुढाऱ्यांच्या अंगीं जर कांहीं हिंमत किंवा कर्तृत्वशक्ति असेल, तर ते गुण दाखविण्याचा प्रसंग हाच होय. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे कीं, वीर पुरुषाची रणांगणांत आणि वैद्याची सन्निपात झाला असतां परीक्षा होत असते, ' सुस्थे को वा न पण्डितः ' म्हणजे सर्वत्र शांतता असतां शहाणपणाचा कोण डौल मारीत नाहीं ? या न्यायानें आम्ही तरी असें समजतों कीं, आमचें धैर्य कसोटीस लावण्याचा सध्यां प्रसंग आला हें आमचें सुदैव होय; आणि यांतून जर आम्ही पार पडलों तरच स्वराज्याच्या हक्कास आम्ही पात्र आहों, असें सर्व जगाच्या प्रत्ययास येईल. स्वजातीय वसाहतवाल्यांस इंग्रज लोकांनीं एकदां ठेंच लागल्यावर स्वराज्याचे हक्क आपण होऊन

दिले हें खरें आहे. पण हिंदुस्थान कांहीं वसाहत नाहीं; आणि काळी कातडी गोऱ्या कातडीइतकी चिकट असते, असाहि येथील अधिकारीवर्गास अद्याप अनुभव आलेला नाहीं. मग फुकटाफुकटी वसाहतीचा न्याय इकडे कोण लागू करणार ? अर्थात् जें कांहीं करावयाचें तें आम्हींच केलें पाहिजे, आणि तें बहिष्कारादि उपायांखेरीज शक्य नाहीं." (अग्रलेख, दि. ६ ऑगस्ट १९०७, स. टि. खंड ४, पान ५५५.)

बहिष्काराचे शस्त्र आयरिश लोकांपूर्वी अमेरिकन लोकांनी वापरले होते व ते इतिहाससिद्ध शस्त्र आहे हे स्पष्ट करण्यासाठी टिळकांनी अनेकदा लेखन केले. नेमस्त पक्ष या चळवळीस विरोध करीत होता, सर्व परकीय जिनसांवर एकदम बहिष्कार टाकणे शक्य नाही, बहिष्काराने राज्यकर्त्यांविषयी द्वेष उत्पन्न होतो, हे शस्त्र भारतीयांनी वापरण्यासारखे नाही, इत्यादि मुद्दे उपस्थित करून बुद्धिभेद व संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न चालू होता. ही चळचळ काँग्रेसने आपला कार्यक्रम म्हणून हाती घ्यावी या भूमिकेकडे टिळकांना जावयाचे होते. म्हणून टिळकांनी बहिष्काराचा शस्त्र म्हणून कसा उपयोग होऊ शकेल, हे पटवून देण्यासाठी लेखन करायला सुरुवात केली. अमेरिकेच्या अनुभवाचा दाखला देण्यासाठी टिळकांनी एका लेखात लिहिले होते, "स्वदेशी आणि बहिष्कार हीं दोन्ही आवळींजावळीं शस्त्रें आयरिश लोकांच्या हातांत पडण्यापूर्वी पुष्कळ वर्षे अमेरिकेंत गेलेल्या इंग्रजी वसाहतवाल्यांनीं त्यांची मातृभूमि जो इंग्लंड देश, त्याच्याविरुद्ध उपयोगात आणिलेलीं होतीं; यामुळेंच विलायती जुलमी कायद्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य पुढें अमेरिकन लोकांस प्राप्त झालें. इंग्लंड देशानें आपल्या वसाहतवाल्यांस हल्लीं स्वराज्याचे बरेच हक्क दिले आहेत; पण सुमारें दीडशें वर्षांपूर्वी विलायतवाल्यांची अशी समजूत होती कीं, वसाहतवाल्यांनीं केवळ कच्चा माल उत्पन्न करावा आणि तो इंग्लंडांतच विकून, त्या मोबदल्यांत विलायतेंत तयार झालेले व नित्य संसारांत लागणारे सर्व जिन्नस विकत घ्यावे. ही स्थिति व ती तशीच कायमची रहाण्यासाठीं केलेले जुलमी कायदे, हे वसाहतवाल्यांस लवकरच दुःसह झाले, आणि अमेरिकेंतील लोकांना बहिष्कार-योगाचा अंगीकार करावा लागला. पण तेवढ्यावरहि निभेना, तेव्हां पुढें स्वातंत्र्याकरितां लढाई होऊन प्रजासत्ताक राज्याची अमेरिकेंत स्थापना झाली. ही ठेंच लागल्यामुळें पुढें इंग्लंड सावध होऊन इतर वसाहतवाल्यांस त्यांनीं स्वराज्याचे बरेचसे हक्क आपण होऊनच देऊन टाकले. वसाहतवाल्यांच्या या इतिहासापासून हिंदुस्थानच्या लोकांनीं पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. वसाहतवाले जातीचे इंग्रजच होते; तथापि त्यांनीं इंग्लंडचें नाक धरीपर्यंत त्यास स्वराज्याचे हक्क देण्यास इंग्लंड तयार झालें नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, वसाहतवाल्यांनीं उद्योगधंद्यांचें ज्ञान जरी विलायतेहून आपल्याबरोबर अमेरिकेंत नेलें होतें तरी प्रथमतः वसाहत केलेल्या प्रदेशांत शेतकीखेरीज त्यांस दुसरा धंदा नव्हता. हिंदुस्थानची स्थिति याहून अगदीं भिन्न आहे. इंग्रजांनीं हिंदुस्थान देश काबीज करण्यापूर्वी या

देशांतील लोक आपणांस लागणारे कापडचोपड किंवा लोखंडी सामान येथेंच तयार करीत व या धंद्यावर त्या वेळीं लक्षावधि लोक येथें आपला उदरनिर्वाह करीत असता ही स्थिति इंग्रजी राज्यांत राहिली नाहीं. विलायतचे व्यापारी, कारागीर किंवा धंदेवाले यांच्या फायद्याकरितां या देशांतील इंग्रज राज्यकर्त्यांनीं आमचे उद्योगधंदे जाणूनबुजून बुडविले आहेत. आज मँचेस्टर किंवा लँकेशायर येथें जे कोट्यधीश व्यापारी आणि लक्षावधि मजूर भरभराटीस आलेले आहेत, ते सर्व हिंदुस्थान देशांतील लाखोंगणती कोष्ट्यांच्या अन्नांत माती कालवून आलेले आहेत." (केसरी, ६ ऑगस्ट १९०७, स. टि. खंड ४, पान ५५१.)

शेवटी निर्वाणीचा उपाय म्हणून भारतीय जनतेने आता बहिष्काराचाच अवलंब केला पाहिजे, असे सांगून टिळकांनी म्हटले होते, 'आम्ही सर्व प्रकारें दुबळे झालेले आहोंत, आमच्याजवळ शस्त्र नाहीं; सत्ता नाहीं व संघ्या तरी एकीचेंहि पूर्ण बळ नाहीं. वरें, राज्यकर्ते आपण होऊन उदारबुद्धीनें आमच्या लोकांत एकराष्ट्रीयत्वाची बुद्धि उत्पन्न करून आम्हांस स्वराज्याचे हक्क देतील म्हणावें, तर तीहि आशा आतां ठार बुडाली आहे. इतकेंच नव्हे तर, आम्हीं स्वावलंबनाचा धडा आपल्यापुढें ठेवून त्याप्रमाणें उद्योग करावयास लागल्यास, आमचे पाय मोडण्यास येथील अरेरावी अधिकारीवर्ग तयार झालेला आहे. अशा स्थितींत स्वदेशी, बहिष्कार किंवा राष्ट्रीय शिक्षण इत्यादि उपायांखेरीज आम्हांस दुसरें कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं; व या साधनाचा आम्हीं जर उपयोग करून घेतला नाहीं, तर आमच्यासारखे महामूर्ख जगांत कोणी नाहींत, असें म्हणावें लागेल. हा प्रश्न पक्षाभिमानाचा नाहीं, देशाभिमानाचा आहे; व ज्यांस या गोष्टी नको आहेत त्यांनी आपला मार्ग कोणता, हें तरी स्पष्टपणें लोकांपुढे मांडलें पाहिजे. अर्जाचा आणि भिक्षांदेहीचा मार्ग संपला आणि राज्यकर्त्यांच्या औदार्यावरची भिस्तहि लयास गेली! आतां सनदशीर आणि कायदेशीर चळवळीपैकीं स्वदेशी, बहिष्कार वगैरे मार्गच काय ते शिल्लक राहिले आहेत. या मार्गांचा स्वीकार करून आपली उन्नति करून घेण्यास लोकांस आम्हीं शिकविलें पाहिजे. आणि सर्व समाजांत राष्ट्रीयत्वाची कल्पना जागृत करून देशाची उन्नति किंवा अभ्युदय स्वपराक्रमानें प्राप्त करून घेण्यास झटलें पाहिजे." (केसरी, ६ ऑगस्ट १९००, स. टि. खंड ४, पान ५५४–५५५.)

याच सुमारास कलकत्त्यास काँग्रेसचे अधिवेशन व्हावयाचे होते, त्यात हा प्रश्न धसास लागणार होता. काँग्रेसमधील जुन्या पक्षाने ज्या आशावादावर काँग्रेसचे कार्य पहिली २० वर्षें चालविले होते, तो आशावाद धुळीस मिळाला आहे, आता नवी परिस्थिती निर्माण झाली आहे, तेव्हा नवा कार्यक्रम, नवे नेतृत्व यांची देशाला गरज आहे, असे टिळक सांगू लागले होते. लॉर्ड कर्झन ऐकत नाहीत, राज्यकर्त्यांची धुंदी कायम आहे, तेव्हा पार्लमेंटचेही डोळे उघडावयाचे असतील तर इंग्रज व्यापाऱ्यांच्या

हिताला धक्का पोहोचेल, असे काही तरी केले पाहिजे होते. इंग्लंडमधील भारताचे एक मित्र मि. हिंडमनही त्यावेळी सांगू लागले होते, " हिंदुस्थानचें जर कल्याण व्हावयाचें असेल किंवा राज्यकर्त्यांकडून तुम्हांस अधिकाधिक हक्क प्राप्त करून घ्यावयाचे असतील तर ते विलायतेंतील लोकांची नेमस्तपणें विनंति करून प्राप्त व्हावयाचे नाहींत. याकरितां जो उद्योग करावयाचा तो तुम्हींच करारीपणानें, निश्चयानें किंवहुना माथेफिरूपणानें केला पाहिजे. एरवीं गत्यंतर नाहीं. " (केसरी, २२ ऑगस्ट १९०५, स. टि. खंड ४, पान ५६३.)

कर्झनशाहीचा कळस झाला आहे. तेव्हा आता राज्यकर्त्यांना दुखवावयाचे नाही ही भूमिका टाकून देऊन प्रतिकाराची भूमिका घेतली पाहिजे, हे स्पष्टपणे सांगताना टिळक म्हणाले होते, " सरकारास पचतें तितकें स्पष्ट बोलावयाचें आणि यापेक्षां जास्त निर्भीडपणें कोणी बोलूं लागल्यास अथवा ' कृति करा ' म्हणून सांगूं लागल्यास त्याचा उपहास करून, आपला नेभळेपणा झाकावयाचा, यासारखें लोकांच्या पुढाऱ्यांत दुसरें कोणतेंहि लांछनास्पद नाहीं. सामान्य प्रजेचें मन पाहिलें, तर तें प्रस्तुतच्या चळवळीस अगदीं अनुकूल आहे. पण ही चळवळ कोणत्या मार्गानें चालविली असतां सिद्धीस जाईल, हें सामान्य लोकांस वरच्या प्रतीच्या लोकांनीं समजावून दिलें पाहिजे. कोणतीहि चळवळ लोकांच्या अनुकूलतेखेरीज सिद्धीस जात नाहीं, लोक अनुकूल नसल्यास एकटा पुढारी फशीं पडतो, हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. आजची स्थिति याहून निराळी आहे. विलायती मालाविरुद्ध लोकांचीं मनें क्षुब्ध झालेलीं आहेत; फक्त त्याचा फायदा घेऊन या चळवळीस व्यवस्थित रूप देणें शिल्लक राहिलें आहे; आणि तें काम देशांतील पुढाऱ्यांचें आहे. काँग्रेसच्या संस्थेनें वीस वर्षांत जें काम केलें त्यापेक्षां अधिक काम देशी मालाच्या चळवळीस व्यवस्थित रूप आल्यानें होणार आहे. दोन्ही चळवळी कालांतरानें सिद्ध होणाऱ्या आहेत; पण देशी मालाची चळवळ त्यांतल्या त्यांत अधिक लवकर फल देणारी होण्याचा संभव आहे. यासाठीं चळवळीच्या पुरस्कर्त्यांस आमची पहिली सूचना अशी आहे कीं, त्यांनीं काँग्रेसप्रमाणें ही चळवळ सिद्धीस नेण्याकरितां एक राष्ट्रीय संस्था काढावी. काँग्रेस-सभेनेंच हें हातीं घेतलें तर चांगलें; आणि तसें होण्याचा संभवहि आहे; कारण काँग्रेस-सभेस प्रदर्शनाची पुस्ती आज बरेच दिवस जोडण्यांत येत आहे. परंतु काँग्रेस-सभेनें हा विषय हातीं घेतला नाहीं, तरी स्वतंत्रपणें यावद्दल उद्योग करण्यास कोणतीहि हरकत नाहीं. ... "

" इंग्रज सरकार आमच्या प्रयत्नास भिऊन हिंदुस्थानचें राज्य सर्व आमच्या हातांत देऊन चालतें होईल, असें कोणीहि म्हणत नाहीं. पण एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, राष्ट्रीय सभेच्या द्वारें किंवा अन्य रीतीनें केवळ ठराव पास करून किंवा अर्जानें हें सरकार वळेल असें नाही. आमचा निश्चय कृतींत उतरत चालला, अशी

जेव्हां राज्यकर्त्यांची खात्री होईल, तेव्हांच ते आमच्या म्हणण्यास मान देतील आणि याचकरितां देशी माल वापरण्याचा ठराव करण्याच्या नुसत्या सभा करून उपयोगी नाहीं, असें आम्हीं वर म्हटलें आहे. या सभा पाहिजेत, नाहीं असें नाहीं, पण बाणास ज्याप्रमाणें पिसें किंवा बंदुकीच्या गोळीस दारू, तशा प्रकारचा या सभांचा उपयोग आहे. लोखंडी फाळ किंवा गोळी तयार असली म्हणजे या सभा त्यास पिसासारख्या किंवा दारूसारख्या जोडतां येतील. पण जोपर्यंत गोळी अगर फाळ तयार नाहीं तोंपर्यंत वायबाराचा ज्याप्रमाणें नुसता आवाज होतो, तसा क्षणभर गडबड उडून जाण्यापेक्षां या चळवळीचा जास्त कांहीं परिणाम व्हावयाचा नाहीं. 'टाइम्स ऑफ इंडिया 'सारखीं जीं पिशाचें नाचताहेत तीं याच समजुतीवर होत. लोक खवळले आहेत हें त्यांस माहीत आहे, व कदाचित् ही चळवळ विकोपास जाईल अशीहि त्यांस शंका आहे. पण ती शंका मनांतल्या मनांत ठेवून सकृद्दर्शनीं होईल तितके भेडसावणीचे आणि उपमर्दकारक लेख ते लिहीत आहेत. त्यांस न जुमानतां वर सांगितल्याप्रमाणें खऱ्या पंथानें किंवा मार्गानें जाण्याचा निश्चय करून त्याचप्रमाणें कर्म करण्यास जर आम्ही प्रवृत्त झालों, तर लवकरच आमच्या चळवळीची कांहीं तरी दाद घेतली पाहिजे, असें इंग्रजी व्यापाऱ्यांस व राज्यकर्त्यांसहि वाटूं लागून, आमच्या प्रयत्नास यश आल्याखेरीज राहणार नाहीं." (केसरी, १२ सप्टेंबर १९०५, स. टि. खंड ४, पान ५७४–५७७.)

काँग्रेसकडून बहिष्काराचा स्वीकार

सारांश, टिळकांची स्वदेशाची राजकीय मोहीम बंगभंगाच्या निषेधासाठी सुरू झाली पण तिचा वापर इंग्रजी सत्तेशी संघर्ष करण्याचे शस्त्र म्हणून झाला. सरकारशी लढण्याचे ते शस्त्र आहे, ते काँग्रेसने हाती घेतले पाहिजे, हा टिळकांचा आग्रह होता. कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनात दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेसने स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार या तीन ध्येयांचा स्वीकार केला. या अधिवेशनानंतर टिळकांनी कलकत्त्यातच केलेल्या भाषणांत सांगितले होते, "स्वराज्य संपादन करणें हा आमचा अंतिम हेतु आहे. असा सिद्धांत ठरविला असून तें साध्य करण्यासाठीं बहिष्कार हें शस्त्र लोकांच्या हातीं दिलें आहे. स्वराज्याच्या मागणीचा जोराच्या प्रमाणें या शस्त्राचा उपयोग करावयाचा असल्यामुळें स्वदेशी चळवळ ही या शस्त्राची पहिली फेक आहे." स्वदेशी व बहिष्कार या शस्त्रांचे महत्त्व वर्णन करताना टिळकांनी सांगितले होते, "सरकारनें तुमच्या मागणीस नकार दिला तर तुम्ही अशा रीतीनें लढ्यास तयार आहां काय? जर असाल तर तुमच्या मागण्यांस नकार कधींही मिळणार नाहीं हें पक्कें समजा, पण जर तयार नसाल तर तुमच्या मागण्यांस अर्धचंद्र मिळेल, इतकेंच नाहीं तर, तुम्हांस कायमचा नकार मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं. आपणांजवळ हत्यारें नाहींत व त्यांची जरुरीहि पण नाहीं. आपणांजवळ अतिशय तीक्ष्ण असें बहिष्काराचे राजकीय शस्त्र आहे."

स्वदेशी बहिष्काराची प्रगती

अशा रीतीने स्वदेशी–बहिष्काराचे आंदोलन बंगालपुरते मर्यादित न राहता काँग्रेसने ते हाती घेतल्यामुळे त्याला राष्ट्रव्यापी स्वरूप येत गेले. टिळकांनी आंदोलनाची दोन वर्षे पुरी झाल्यावर त्याची प्रगती दाखविणारा एक स्फुटलेख 'केसरी'त लिहिला होता. त्यात म्हटले होते, "स्वदेशी व बहिष्कार यांनीं गेल्या २ वर्षांत केवढें राष्ट्रकार्य केलें, हें आंकडेशास्त्र यांस कळण्यासाठीं गेल्या केसरीतील अग्रलेखांत आंकड्यांचें प्रमाण आम्ही दिलें होतें. १९०६ मार्चअखेरचे सालांत हिंदुस्थानांत जितकें परदेशी कापड आलें, त्याहून तें १९०७ चे मार्चअखेरचें वर्षांत दीड–कोटी रुपयांचें कमी आलें. गेल्या सालीं विलायती कापडाचा भाव तिगास्तापेक्षां सुमारे २० टक्क्यांनीं चढलेला असल्यामुळें मालाच्या किंमतीचा आंकडा त्या प्रमाणानें फुगलेला आहे. मालाच्या किंमतीची ही वाढ हिशेबांत घेऊन परदेशीच्या मालाची मोजदाद रुपयांत न करता सणगांत केली, तर स्वदेशी बहिष्काराच्या जयाचें व विलायती मालाच्या पिछेहाटीचें प्रमाण पांच सात कोटीचें पडेल, असें आंकडेशास्त्रज्ञांस आढळून येईल. स्वदेशी चळवळीच्या प्रभावाचें दुसरें प्रमाण या गणितपंडितांस हवें असल्यास त्यांनीं मुंबईच्या गिरण्यांच्या गेल्या दोन वर्षांतील अपूर्व किफायतीकडे लक्ष द्यावें. मुंबईच्या सूत काढून कापड विणणाऱ्या अकरा व नुसतें सूत काढणाऱ्या नऊ मिळून २० गिरण्यांचे गेल्या २ वर्षांचे हिशोब पाहतां असें दिसून येतें कीं, या दोन सालांत त्यांस एकंदर २, २७, ३६, ००० रुपये नफा झाला. या वीस गिरण्यांचे एकंदर भांडवल २,७२,७७,००० रुपये आहे. म्हणजे या दोन सालांत त्यांस भांडवलावर ८३ टक्के नफा झाला आहे. गिरण्यांचे भागीदारास नफ्याचा शे. ४३ या प्रमाणाचा हिस्सा म्हणजे ९९,०८,००० रुपये वाटण्यांत येऊन बाकीची १,२८,२८,००० ची रक्कम पुनः त्याच धंद्यात घालण्यांत आली. स्वदेशी व बहिष्काराच्या सभा, व्याख्यानें, शपथा व लेख यांस नाकें मुरडून आकडेशास्त्र व अर्थशास्त्र यांवर भिस्त ठेऊन पाऊल टाकणाऱ्या पंडितांस आमचा असा सवाल आहे की, स्वदेशी चळवळ वरील उपायांनी सर्वत्र पसरविली नसती तर मुंबईच्या गिरणीवाल्यांस दोन वर्षांत जवळ जवळ मूळ भांडवलाइतका नफा होऊन गिरण्यांची इतकी भरभराट वाढली असती काय, व भागीदारांतहि दोन वर्षांत जवळ जवळ १ कोटि रुपये खेळले असते काय?' (केसरी, १३ ऑगस्ट १९०७.)

उद्योगधंद्यांची वाढ

'केसरी'त १६ ऑक्टोबर १९०६ रोजी प्रसिद्ध केलेल्या स्वदेशीच्या अहवालात स्वदेशीमुळे उद्योगधंद्यांना कशी चालना मिळाली होती याचे वर्णन केले होते. "मुंबईच्या नवीन स्वदेशी बँकेला एक कोटि रुपयांचें भांडवल मागितलें असतां दीड कोट रुपयांचें

जमतें हें स्वदेशीच्या यशाचें लक्षण नव्हे काय ? साखरेच्या लहानमोठ्या कारखान्या-संबंधानें लोकांत चाललेले विचार व खटपट या पाहिल्या म्हणजें स्वदेशी चळवळीनें एकप्रकारची नवीन जागृति उत्पन्न केली आहे असें तुम्ही म्हणणार नाहीं काय ? आगपेट्यांच्या कारखान्यांची हकिगत ऐका, सावणाच्या कारखान्याची हकिगत वाचा, स्वदेशी टोप्या, स्वदेशी बूट छत्र्या, स्वदेशी बांगड्या, स्वदेशी टाक, स्वदेशी होल्डर्स, स्वदेशी औषधें, स्वदेशी कांचेचें सामान—एक ना दोन शेंकडो स्वदेशी वस्तूंचें नवीन पीक पाहिलें म्हणजे व ह्या वस्तु घेण्याकडे व उत्पन्न करण्याकडे लोकांच्या झालेल्या कलामुळें लोकांचें किती कल्याण करण्याचें सामर्थ्य या जागृतींत आहे याचा विचार केला म्हणजे, दहा वीस वर्षांपूर्वीच स्वदेशी तत्त्वांचा स्वीकार करण्याइतकें आमचें राष्ट्र उन्मुख कां झालें नाहीं, अशी तुमच्या मनाला हळहळ लागून राहात नाहीं काय ? ”

निःशस्त्र प्रतिकाराकडे

टिळकांनी स्वदेशीच्या राजकीय मोहिमेला जी धार दिली ती स्वराज्य व स्वदेशी यांची सांगड घालून आणि बहिष्कार म्हणजे इंग्रजी सत्तेचा निःशस्त्र प्रतिकार आहे हे निर्भयपणे लोकांना सांगून, स्वदेशीचे अर्थकारण, तिची औद्योगिक बाजू जितकी महत्त्वाची होती तितकीच किंवा त्याहून जास्त स्वदेशीचे राजकारण त्यांना महत्त्वाचे वाटत असे. टिळकांचे आवाहन निःशस्त्र प्रतिकाराचे असे हे पुढील दीर्घ उताऱ्यावरून दिसून येईल.

“ इंग्लिश लोकांकडून हा सगळा राजशकट हांकला जात आहे, तो केवळ आपल्या मदतीनेंच होय. आपण सर्व गुलाम आहोत. सर्व राज्यकारभार आमच्या मदतीनें चालला आहे. आम्हीं आपला राज्यकारभार हाती घेण्यास व तो चालविण्यास लागणाऱ्या संघशक्तीचें महत्त्व कळण्याजोगें आम्हांस शिक्षण देण्यास सरकार तयार नाहीं. मुख्य मुद्दा हा आहे कीं, आमचा कारभार आम्हीं केला पाहिजे. मला माझ्या घराची किल्ली पाहिजे आहे, माझ्या घरांतून एखाद्या परक्या माणसाला घालवून देण्यानें भागणार नाहीं. स्वराज्य हें आमचें ध्येय आहे. आमच्या शासन-यंत्रणेवर आमची सत्ता हवी. आम्हांला कारकून म्हणून राहावयाचें नाहीं. सध्या आम्ही कारकून आहोंत आणि सरकारच्या हातांतील बाहुली बनून आमच्यावर जुलूम करण्यास साधनीभूत होत आहोत. सरकार आमच्यावर राज्य करतें, तें त्याच्या उपजत सामर्थ्यानें नव्हे, तर आम्हांला अज्ञानांत व अंधारांत ठेवून तें राज्य करतें, हिंदुस्थानांत आपली संख्या मूठभर आहे हें प्रत्येक इंग्लिश मनुष्य जाणून आहे. आपण सुदृढ आहोत व तुम्ही दुर्बळ आहांत, असें तुम्हांस भासविण्याचा प्रयत्न प्रत्येक इंग्रज करीत आहे. हें राज-कारण आहे. त्यानें आपण आजपर्यंत फसले गेलों. राष्ट्रीय पक्षास जें कांहीं करावयाचें आहे तें हें कीं; तुमचें भवितव्य पूर्णपणें तुमच्या हातांत आहे याची जाणीव करून देणें.

जर तुम्हाला स्वातंत्र्य संपादण्याची इच्छा असेल, तर तें तुम्ही खात्रीनें मिळवाल, पण तशी इच्छा नसेल तर तुम्हांस कायमचें अवनत अवस्थेंत रहावें लागेल. तुमच्यापैकीं पुष्कळांना हातांत शस्त्र धरण्याची इच्छा नसेल, तसा सशस्त्र प्रतिकार तुम्ही राज्यकर्त्यांस करूं शकत नसला तरी तुम्ही स्वार्थत्याग करून सरकारशीं सहकार्य करण्याचें नाकारूं शकत नाहीं काय? याचेंच नांव बहिष्कार. बहिष्कार म्हणजे राजकीय शस्त्र या वाक्यांत हाच अर्थ गर्भित आहे. शेतसारा वसूल करण्यास व शांतता कायम ठेवण्यास आम्ही त्यांना मदत करणार नाहीं. न्यायदानांत त्यांना आम्ही मदत करणार नाहीं. हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर लढण्यास आम्ही जाणार नाहीं, आणि त्यासाठीं आमचें रक्त व द्रव्य सांडणार नाहीं. आम्हाला आमचीं कोर्टें पाहिजेत. वेळ येईल तेव्हां आम्ही करहि देणार नाहीं. या सर्व गोष्टी तुम्ही संघशक्तीनें घडवून आणाल काय? जर घडवून आणाल, तर तुम्हांला उद्या स्वातंत्र्य मिळेल. कांही लोकांनीं राज्यकर्त्यांपाशीं, सबंध भाकरीऐवजीं अर्धी भाकरी मागितली आहे. मी म्हणतो, आम्हांला सबंध भाकरी पाहिजे, व ती याच क्षणीं मिळाली पाहिजे. ती आज जरी मिळाली नाहीं, तरी ती मिळविण्यासाठीं आम्हांला धीर नाहीं असें मात्र समजूं नका, भाकरीचा जो काही अर्धा–मुर्धा तुकडा सरकार देईल, तो मी घेईन, व नंतर उरलेला भाग मिळविण्याचा प्रयत्न करीन. आमचा विचार व आमची कृति यांची दिशा अशी आहे. ती तुम्हीं स्वीकारली पाहिजे, आम्ही ही चळवळ सुरू केली आहे, ती केवळ भावनेनें नाही. सारासार विचारानें केलेली आहे, तो विचार समजावून घ्या आणि आपल्या विचाराचें पाठबळ त्या भावनेला मिळवून द्या, तुम्ही आमचें अंधानुकरण करूं नका. साऱ्या प्रश्नांचा विचार तुम्ही स्वतः करा, आमचा विचार तुम्हीं मान्य केला, तर त्यामुळें आपण आपलें स्वातंत्र्य मिळवूं शकूं अशी आम्हांला खात्री वाटते." (कलकत्ता येथील भाषण, २ जानेवारी १९०७, स.टि. खंड ६, पान ४४७–४४८.)

टिळकांच्या 'स्वदेशी' प्रचार मोहिमेचे यश किती मोठे व मोलाचे होते ते त्यांचे समकालीन श्री. शिवराम महादेव परांजपे यांनी लिहिलेल्या एका लेखावरून समजण्यासारखे आहे. त्यांनी म्हटले होते, "लो. टिळकांनी 'केसरी'मधून स्वदेशी व्रताचा उपदेश करण्याला सुरुवात केल्यापासून लोकांमधील पूर्वीचा उत्साह जास्त जास्तच वाढत चालला. 'केसरी'च्या अग्रलेखामध्ये स्वदेशी चळवळीच्या विषयाची सांगोपांग चर्चा होऊ लागली. आमच्या देशाची हल्लींची स्थिति, लोकांमध्ये शिल्लक राहिलेल्या जुन्या कलाकौशल्याची माहिती, हिंदी उद्योगधंदे वाढीस लावण्याचा सरकारी उदासीन उल्हास, अर्थदृष्ट्या स्वदेशी चळवळीचा अर्थ, संरक्षित व्यापार व स्वतंत्र व्यापारी ही इंग्लंडांतील तत्त्वें हिंदुस्थानांत लागू करावयाची की नाहीं यावद्दल विचार, इत्यादी स्वदेशी चळवळीशीं संबद्ध असलेल्या अनेक प्रश्नांचें सोपपत्तिक विवेचन केसरीतून प्रसिद्ध होऊ लागलें. त्याचा स्वाभाविक प्रतिध्वनि म्हणून निरनिराळ्या ठिकाणीं स्वदेशी

चळवळीच्या ज्या सभा होत असत आणि जीं व्याख्यानें देण्यात येत असत त्याबद्दलचे सारांश केसरीच्या द्वारें सर्वांना जाहीर होऊ लागले. स्वदेशीच्या वर्गण्या, देणग्या, शपथा, प्रतिज्ञा, निश्चय पिकेटिंग, नवीन दुकानें, नवीन भांडवलें, नवीन कारखाने, नवीन जिनसा इत्यादि अनेक नवीन प्रकारांना केसरीमध्ये जागा मिळू लागली. सारांश, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे केसरी वर्तमानपत्र हें स्वदेशी चळवळीची एक एन्-सायक्लोपीडिया बनून गेलें. अशा रीतीनें स्वदेशी चळवळीला महाराष्ट्रामध्ये मोठें प्रोत्साहन मिळालें." (बाल शिक्षण माला, टिळक विशेषांक १९१६, 'लोकमान्य', प्रा. न. र. फाटक या पुस्तकावरून उद्धृत, पान २६९.)

सारांश, दुष्काळनिवारण व स्वदेशी-बहिष्कार यांच्यासाठी टिळकांनी ज्या राजकीय मोहिमा केल्या त्यातून लोकांना सहभागी करूनच स्वराज्याचे हक्क मिळविण्याचे त्यांचे राजकारण आकार घेत गेले. काँग्रेस ही सामान्य जनांसाठी सामान्य जनांचे प्रश्न हाती घेणारी संघटना व्हावी हा टिळकांच्या राजकारणाचा नवा घाट होता. लढाऊ राष्ट्रवादी, लढाऊ जनशक्तीवर आधारलेले बहुजनहिताचे राजकारण यांची दिशा टिळकांनी या दोन आंदोलनांतून दाखविली. इतकेच नव्हे तर राजकारणात टिळकयुग निर्माण केले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात नवा उत्साह, नवा जोम निर्माण केला. याच्या बळावरच काँग्रेसला लढाऊ राजकारणाची दीक्षा टिळकांनी दिली. म्हणून टिळकांच्या या दोन राजकीय मोहिमांना भारताच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे.

८

काँग्रेसला लढाऊ राजकारणाची दीक्षा

महर्षी दादाभाई नौरोजींनी टिळकांना २ नोव्हेंबर १९०४ रोजी पत्र लिहून 'पुढील काळांत राजकारणाच्या क्षेत्रांत राष्ट्रीय सभा हें आपलें एक शस्त्र झालें पाहिजे. आज ती सर्वगुणपूर्ण नाहीं. पण आम्ही हळुहळू तिला सबल करू इच्छितों' असे कळवले होते. टिळक काँग्रेसवर टीका करीत असत, त्याला उद्देशून दादाभाईंनी त्या पत्रात लिहिले होते, 'टीका करावयाची तर ती स्नेहभावाची व उत्तेजनकारक असावी. काँग्रेस आज मोडली तर तें हिंदुस्थानला मोठें संकट ठरेल व अँग्लो-इंडियन लोकांचा तो एक मोठा जय होईल.' ('आधुनिक भारत', आचार्य जावडेकर, १९७९ सालच्या आवृत्तीवरून उद्धृत, पान २६९.) दादाभाईंनी अपेक्षा केली होती की, काँग्रेस हे आपले राजकारणातील शस्त्र व्हावे. नेमके तेच ध्येय ठेवून, पण लढाऊ व क्रांतिकारक लोकशाहीच्या कल्पनेने प्रेरित होऊन टिळक १८९५ पासून काँग्रेसला नवे वळण लावण्यासाठी प्रयत्न करीत होते. किंबहुना १८९२ पासून टिळक काँग्रेसविषयी किंवा तिच्या कामकाजाविषयी जे लिहीत होते त्याला निश्चित दिशा होती, हेतू होता. एक विशिष्ट दृष्टिकोण (approach) होता. किंबहुना काँग्रेसला जुन्या वतनदारांपासून मुक्त करून तिला सामान्य जनतेची चळवळ असे स्वरूप देण्याचे श्रेय टिळकांनाच द्यावे लागेल. यामुळे ते 'लोकमान्य' झाले आणि काँग्रेसही लोकांची झाली. राष्ट्रीय प्रवाहात सर्व जाती, धर्म, भाषा यांना आणण्याचे महान् कार्य टिळकांनी केले. तिला लढाऊ कार्यक्रम दिला व युद्धमान राष्ट्रवादाचे ते स्वतः प्रतीक बनले. टिळकांनी काँग्रेसमध्ये केलेले परिवर्तन त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने आता पाहावयाचे आहे.

राजकीय शैथिल्य

१८८९ साली काँग्रेसच्या अधिवेशनास टिळक प्रथम उपस्थित राहिले. १८८८ मध्ये ते 'केसरी'चे संपादक झाले होते. १८९० च्या जानेवारीमध्ये 'केसरी'तील लेखात त्यांनी काँग्रेसच्या अधिवेशनाची वाचकांना माहिती करून दिली होती. पण १८९२ पासून प्रांतिक सभा व काँग्रेसचे अधिवेशन याच्यासंबंधी टिळकांनी जे लेख लिहिले त्यात लोकांच्या राजकीय संघटनेच्या प्रश्नाची चर्चा केलेली आढळते. पाचव्या प्रांतिक सभेविषयी लिहिलेल्या लेखात टिळकांनी म्हटले होते, "राष्ट्रीय सभेपासून जरी साक्षात् कांहीं फल झालें नसलें तरी तेणेंकरून सर्व देशभर राष्ट्रीय चळवळ सुरू झाली व लोकांना आपआपल्या हक्कांविषयीं अधिक कळकळ वाटू लागली हा कांहीं लहान-सहान फायदा नाहीं. तथापि अजूनहि त्या चळवळींचें खरें स्वरूप पुष्कळांना कळू लागलें नाहीं असें त्यासंबंधानें जनमानसांत जी अत्यंत उदासीनता दिसते तीवरून म्हणावें लागतें. सरकार करील ती पूर्व दिशा, असें म्हणून स्वस्थ बसण्याचा हा काळ नव्हे इतकेंच नाहीं, तर प्रत्येकानें आपण होऊन आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या व लोकांच्या नजरेस आणल्याशिवाय त्यांची कधींहि दाद लागावयाची नाहीं हें इंग्रजी राज्यनीतीचें मुख्य तत्त्व आहे...साधारण लोकांत हें अज्ञान अजून पुष्कळच आहे; व तें कमी करण्याचा आजपर्यंत यथायोग्य प्रयत्न न झाल्यामुळें एकंदर राजकीय चळवळीला शैथिल्य येत चाललें आहे...हें अज्ञान घालविण्यास आपली चळवळ सतत चालू ठेवणें व होईल तितका तिचा विस्तार उत्तरोत्तर वाढवीत जाणें या दोन गोष्टींकडे आमच्या पुढाऱ्यांनीं अवश्य लक्ष द्यावयाला पाहिजे होतें. वर्षांतून एकदां जमणाऱ्या हजार-पांचशें लोकांच्या राष्ट्रसभेनें एखादें मागणें केलें, म्हणजे सरकार लागलीच कबूल होईल असें नाहीं, तर प्रत्येक प्रांतांतून, जिल्ह्यांतून, शहरांतून, इतकेंच काय, पण प्रत्येक खेड्यांतूनहि तशा प्रकारचे अर्ज गेले पाहिजेत. तरच त्या मागण्याला कांहीं वजन येणार आहे. ह्या नैसर्गिक क्रमानें ज्या दिवशीं आमचे प्रयत्न चालू लागतील, तेव्हांच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास पात्र होऊं व सरकारहि आमचें म्हणणें ऐकेल हें प्रत्येक देशहितचिंतकानें लक्षांत बाळगलें पाहिजे." (केसरी, १८ ऑक्टोबर १८९२, स. टि. खंड ४, पान १७८–१७९.)

टिळक जे लोकांचे राजकारण सुरू करू इच्छीत होते त्याचा हा प्रारंभ होता. १८९२ मध्ये राष्ट्रीय सभेचे नागपूर अधिवेशन संपल्यानंतर लिहिलेल्या लेखात त्यांनी म्हटले होते, "आम्हांस काय पाहिजे, आमचा व आमच्या राजकर्त्यांचा कोठें मतभेद आहे व आमच्या मागण्या किती मर्यादित असल्या पाहिजेत, या सर्व गोष्टींचा ऊहापोह होऊन आमचें म्हणणें अगदी विनचूक कागदावर लिहून ठेवण्यास समर्थ झालों आहों. आपणांस काय पाहिजे तें समजू लागणें ही आपल्या उन्नतीची पहिली पायरी आहे. येथून वर चढावयाचें, व उत्तरोत्तर आपले इष्ट हेतु ज्या उपायांनीं साध्य होतील त्या

उपायांची योजना करावयाची. ते उपाय कोणते, ते कोणत्या रीतीनें अमलांत आणता येतील, ते अमलांत आणण्यास रचना व स्वरूप बदललें पाहिजे कीं काय आणि बदलणें असल्यास कोणत्या व कशा प्रकारें बदललें पाहिजे या सर्व गोष्टींचा अद्याप विचार व्हावयाचा आहे." (केसरी, १९ जानेवारी १८९२.)

१८९२ च्या एप्रिल महिन्यात काँग्रेसचे संस्थापक सर ए. ओ. ह्यूम यांनी काँग्रेसच्या सभासदांना उद्देशून एक पत्र पाठविले होते. त्यात देशस्थितीसंबंधी त्यांना काय वाटते व काँग्रेसचे काम कसे चालवावे, यासंबंधी त्यांनी काही विचार मांडले होते. हे पत्र गुप्त होते, पण ते छापले गेले. टिळकांनीही दि. ५ एप्रिल १८९२ च्या 'केसरी'त छापले होते व पुढे त्यावर आपली मते व्यक्त करणारा लेख लिहिला. १६ फेब्रुवारी १८९२ च्या या पत्रात सर ह्यूमनी म्हटले होते, "हल्लींची राज्यव्यवस्था देशास गैरसोईची व भिकेस लावणारी आहे, या गोष्टी तुम्हांस ठाऊक आहेतच व त्यांबद्दल तुम्हांस अंतः करणपूर्वक वाईटहि वाटतें. पण यापासून पुढें जो भयंकार परिणाम घडून येणार आहे त्याचा तुम्हांस विशेषेंकरून तुमच्यातील संपन्न लोकांस उमज पडलेला नाहीं. लोक शांत आहेत, गरीब आहेत, सोशीक आहेत असें दिसून येतें. पण फ्रान्स देशांत राज्य-क्रांति होऊन जेव्हां राजाचा व सरदार लोकांचा फन्ना उडाला त्यापूर्वी २० वर्षे, छे १० वर्षेंच फ्रांस देशांतील लोकहि याचप्रमाणें होते. आमचे लोक अक्षरशून्य असून त्यांस असुक एक गोष्ट साध्य करून घ्यावयाची आहे असें नाहीं, पण फ्रान्स देशांतहि अशीच स्थिति होती. भूक आणि दैन्य या दोन कारणांनीं हें स्वरूप एका दिवसांत पालटलें, आणि मेंढ्याचे कळपचे कळप एकदम लांडगे झाले."

"इतिहासावरून असें दिसून येईल कीं, प्रजा कितीहि गरीब असली तरी उपासमार अन्याय व निराशा यांच्या तावडींत लोक सापडले म्हणजे ते जात्या गरीब असले तरी त्यांचा स्वभाव पालटून ते घोर कर्में करण्यास प्रवृत्त होतात. तुमच्यापैकीं ज्या गृहस्थांनीं या प्रश्नाचा पुरा विचार केला आहे त्यांस ठाऊकच असेल कीं, हजारों लोकांच्या दैन्यावस्थेची अगदीं परमावधी होत आली आहे, आणि प्रति दिवशीं बेबंदशाहीची जननी अक्काबाई वाढत चाललेल्या लोकसंख्येवर आपला जास्त जास्त पगडा बसवीत आहे. आपण ही स्थिति सुधारण्याचा कांही प्रयत्न केला नाहीं तर ज्याप्रमाणें रात्र संपली कीं पुढे दिवस यावयाचाच, त्याप्रमाणेंच यामुळें पुढें मागें कठीण प्रसंग येऊन गुदरेल. उगीच आपल्या मनाची खोटी समजूत करून घेऊं नका, ईश्वरीसत्तेनें तो प्रसंग कदाचित् उशिरा येईल. पण केव्हां ना केव्हां तरी तो आलाच पाहिजे व कदाचित् तो लवकरहि येऊ शकेल. अशा वेळीं सरकार आपलें किंवा तुमचें रक्षण करील असें समजू नका. एकदां सर्व ठिकाणचे शेतकरी लोक विथरले म्हणजे मग त्यांचा प्रतिबंध करण्याची कोणासहि शक्ति नाहीं. या झंजावातापुढें कोणाचाहि टिकाव लागणार नाहीं, आगगाड्या पूल, तारायंत्रें सर्व बंद पडतील आणि जिकडे तिकडे एकच कल्होळ होऊन जाईल.

तुम्ही हजारों लोक माराल, पण जेथें लाखों लोक अशा रीतीनें जिवावर उदार झालेले असतील तेथें हजारांचा काय पाड ? आता पुढाऱ्यांची उणीव दिसते आहे, पण वेळ आली म्हणजे पुढारीहि आपोआप उत्पन्न होतात. मी कांहीं कहाणी रचून सांगत नाहीं. खरोखरच असा प्रकार घडून येईल. तुमच्या पैकीं ज्यांस इतिहासाचें ज्ञान आहे त्यांनाच विचारूं द्या आणि सांगूं द्या कीं, अशा रीतीनें दारिद्र्य व उद्वेग वाढत चालला असतां त्याचा काय परिणाम झाला आहे व होतो तें !..."

" आतां हें जें भावी संकट येणार आहे त्याचा आपणांस प्रतिकार करणें असल्यास राष्ट्रीय सभेनें म्हणजे हिंदुस्थानांतील शहाण्या व अनुभवशीर लोकांनीं आज कित्येक वर्षें श्रम करून राज्यकारभारांत ज्या सुधारणा जरूर आहेत म्हणून ठरविल्या आहेत त्या आपणांस केल्या पाहिजेत. यानें सर्वच कार्य उरकेल असें नाहीं, तथापि वरेंच काम होईल आणि निराशेच्या जागीं आशेचा अंकुर फुटूं लागला म्हणजे दुसऱ्या ज्या कांहीं सुधारणा कर्तव्य आहेत व ज्या अजून आमच्या राज्यकर्त्यांस कळून आल्या नाहींत, त्या करण्यास फुरसत सापडेल. हिंदुस्थानांत आम्हीं हवी तेवढी उरफोड केली, प्रार्थना केली, निषेध केला तरी ज्यांची आम्ही प्रार्थना करतों त्यांची ती ऐकण्याची इच्छा अगर शक्ति नसल्यामुळें आमचे सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत. तेव्हां हल्लींची राज्यव्यवस्था अन्यायाची व अविचाराची आहे हें इंग्लंडांतील लोकांच्या मनांत चांगलें भरवून देऊनच आपली कार्यसिद्धि करून घेण्याचा एक मार्ग राहिला आहे. आज सात वर्षें मी श्रम करून पाहिलें व आतां सरकारचा नाद सोडून दिला आहे. पण त्याबरोबर आपलेंहि हित व्हावें म्हणून प्रयत्न करण्यासाठीं तुमच्या देशबांधवांचे डोळे तुम्हांस उघडतां येणार नाहीं काय ? " (केसरी, ५ एप्रिल १८९२.)

या निर्वाणीच्या भाषेत सर ए. ओ. ह्यूमनी लिहिलेल्या पत्राचा आशय स्पष्ट होता. म्हणूनच संधी मिळताच टिळकांनी ते केसरीत छापले असावे. टिळकांनी या पत्रासंबंधी ' केसरी 'त लिहिताना मि. ह्यूमनी पुन्हा या पत्राबद्दल समर्थनार्थ जे विलायतेतील एका आक्षेपकास उत्तर दिले होते तेही उद्धृत केले होते. ह्यूमनी म्हटले होते, " १८५७ सालीं जे प्रकार झाले ते मीं प्रत्यक्ष पाहिले आहेत. पुन्हा तसला प्रसंग पहाण्याची मला इच्छा नाहीं...अन्नान्नगत, दारिद्र्य, असंतोष आणि दुष्काळ यांनीं हिंदुस्थानांतील लोक इतके गांजून गेले आहेत कीं, त्यांच्या योग्य म्हणण्याचा विचार केला नाहीं तर हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर लवकरच मोठा प्रसंग येऊन गुदरेल. " सारांश, टिळकांनी संधी मिळेल तेव्हा काँग्रेसनें देशस्थितीचा विचार करून सक्रिय झाले पाहिजे, हा विचार मांडला होता.

काँग्रेस ही लोकसंघटना व्हावी

पुढे १८९५ मध्ये पुण्यात काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. त्यावेळी काँग्रेसच्या

पुनर्रचनेचा व ती लोकसंघटना करण्याचा विचार टिळकांनी पुन्हा जोराने मांडला. किंबहुना या अधिवेशनात सामाजिक परिषद राष्ट्रीय सभेच्या मंडपात भरवावी की नाही यासंबंधीचा जो वाद झाला त्यावेळी टिळकांनी लोकमत लक्षात घेऊन हा निर्णय घ्यावा अशीच भूमिका घेतली होती. टिळकांनी त्यावेळी लिहिले होते, "आमच्या दृष्टीनें आमचें खरें हायकोर्ट म्हणजे लोकमत होय. पण सुधारक पक्षाच्या लोकांस तें लोकमत अर्थात्च अडाणी व अग्राह्य वाटतें." (केसरी, २९ ऑक्टोबर १८९५.) पुढच्या लेखात लोकमताचा हा मुद्दा टिळकांनी पुन्हा 'केसरी'त मांडला. त्यांनी म्हटले, "जेणेंकरून सर्व जातींचे, सर्व धंद्यांचे व दर्जाचे लोक राष्ट्रीय सभेस येतील त्या मार्गानें रा. रा. टिळक यांनीं आपला उद्योग चालविला होता. परंतु त्यांचा हा मार्ग सुधारक वर्गास – अर्थात्च पसंत पडला नाहीं. ज्यांस इंग्रजी विद्येचा गंधहि नाहीं ते सर्व अडाणी आणि त्यांचें मत म्हणजे माळ्याकोळ्यांचें मत असा सुधारक वर्गांतील लोकांचा समज आहे. या समजाप्रमाणें राष्ट्रीय सभेचें काम चालविण्यांतहि त्यांनीं आपली वर्तणूक ठेविली आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, भटभिक्षुक अगर माळी-साळी यांचें मत राष्ट्रीय सभेसारख्या महत्त्वाच्या कामीं कांहीं एक उपयोगी नाहीं, असले प्रश्न आमच्यासारख्या सुशिक्षित लोकांनींच सोडवले पाहिजेत. आपल्या विद्वत्तेबद्दल सुधारक वर्गाचा हा अभिमान त्यांच्या मतें अगदीं योग्य असेल, पण राष्ट्रीय सभेचा पाया जर लोकमतावर अवलंबून आहे तर तिच्या कामांत अशा रीतीनें लोकमताची उपेक्षा होणें आमच्या मतें बरोबर नाहीं. सुधारकवर्गास असें वाटतें कीं, रा. रा. टिळक हे लोकांच्या नादास लागून कदाचित आमच्या परिषदेस हरकत आणतील. पुण्यांतील व दक्षिणेंतील बहुतेक लोक सामाजिक परिषदेस विरुद्ध आहेत, हें त्यांस माहीत आहे व म्हणूनच राष्ट्रीय सभेंत जेणेंकरून सदर लोकांचा विशेष भरणा होणार नाहीं, अशी व्यवस्था झाल्यास ती त्यांस पाहिजे आहे. रा. रा. टिळक यांचें मत अर्थात्च या मताच्या विरुद्ध आहे, त्यांचें असें म्हणणें आहे कीं, दरवर्षी राष्ट्रीय सभा जितकी अधिक अधिक लोकप्रिय करतां येईल तितकी करणें हें आपलें कर्तव्य आहे, मध्यम अगर कनिष्ठ प्रतीचे लोक राष्ट्रीय सभेस आले असतां सामाजिक परिषदेचें काय होईल याचा विचार करण्याचीं आम्हास बिलकूल गरज नाहीं. सामाजिक परिषदेचे सोंग कांहीं सुधारकांस गोड वाटावें म्हणून राष्ट्रीय सभेस आजपर्यंत जोडू दिलें आहे, पण राष्ट्रीय सभेचें तें प्रधान अंग नाहीं, इतकेंच नव्हे तर तें नुसतें अंगहि आहे असें म्हणतां येत नाहीं व याकरितां राष्ट्रीय सभेस लोकमत अनुकूल करून घेण्याचे कामीं सामाजिक परिषदेचा विचार करण्याची कोणत्याहि प्रकारें आवश्यकता नाहीं. राष्ट्रीय सभेस सर्व जातींचे, धंद्यांचे, शिकलेले अथवा मागासलेले वगैरे सर्व लोक जेणेंकरून मदत करतील तो उपाय आम्हांस योजला पाहिजे. मग तुमच्या सामाजिक परिषदेचें कांहींहि होवो. हें मत सुधारकवर्गास मान्य नाहीं व आपल्या मताप्रमाणें राष्ट्रीय सभेचें

सर्व काम आपल्या वर्गाच्या बाहेर न जाऊ देण्याबद्दल त्यांचा प्रयत्न आहे. पुण्यांत श्री. बाळासाहेब नातूंच्या पक्षाखेरीज जे दोन पक्ष आहेत त्यांतील खरा भेद याप्रमाणें आहे. एकास लोकमत पाहिजे, मग सामाजिक परिषदेचें कांहींहि होवो, दुसऱ्याला परिषदेस जेणेंकरून धक्का येणार नाहीं तितकें लोकमत ग्राह्य आहे. बाकी राहिलेलें कोळ्यासाळ्यांचें मत त्यांच्या मतें महत्त्वाचें नाहीं व त्याची ते फिकीरहि करीत नाहींत." (केसरी, ५ नोव्हेंबर १८९५.)

याच वेळी 'बूट फोर्स' या गोखल्यांनी वापरलेल्या शब्दावरून टिळकांनी 'जनावरें कोण?' हा लेख लिहून लोकमत हे आमचे आद्यदैवत आहे ही भूमिका मांडली. टिळकांच्या लोकमताच्या आस्थेतूनच त्यांची कांग्रेसला लोकांची चळवळ करण्याचा आग्रह निर्माण झाला होता. पुण्याच्या कॉंग्रेस अधिवेशनापूर्वी लिहिलेल्या आणखी एका लेखात टिळकांनी म्हटले होते, "अकराव्या राष्ट्रीय सभेंत जर याबद्दल योग्य विचार होऊन आम्हीं कांहीं ठराव केला, तर राष्ट्रीय सभेची कौमारदशा पालटून तिला प्रौढावस्थेंत आणण्याचें श्रेय आपणांस प्राप्त होईल. याकरितां या सभेतील सर्व मुखत्यारांस आमची अशी विनंति आहे कीं, या बाबतींत त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या रचनेंत योग्य फेरफार करून कांहीं तरी तजवीज योजण्याचें करावें. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत लोकमत अधिक जागृत व जोरदार झालें पाहिजे. सर्व शेतकरी, कुळंबी, माळी, साळी, कोळी यांस जेव्हां राष्ट्रीय सभेचे ठराव समजून देऊन त्यांच्यात त्या ठरावाप्रमाणें वर्तनक्रम ठेवण्याची बुद्धि जर आम्हांस उत्पन्न करतां येईल तरच राष्ट्रीय सभेचे हेतु तडीस जातील. आम्ही शिकलेले लोक दरवर्षी एकत्र जमल्यापासून कांहीं विशेष व्हावयाचें नाहीं. राष्ट्रीय सभेपासून जे थोडेसे तोटे झाले आहेत, त्यांतला मुख्य तोटा हा होय कीं या सभेनें निरनिराळ्या शहरांतील किंवा प्रांतांतील पूर्वी चालत असलेल्या लहान-मोठ्या राजकीय संस्था बहुतेक मागें टाकण्यासारख्या झालेल्या आहेत. तेव्हां आतां त्या संस्थांपासून कांहीं चांगल्या गोष्टी व्हावयाची आशा राहिली नाहीं, व राष्ट्रीय सभेंत जर सुधारणा झाली नाहीं, तर तिजपासूनहि विशेष फायदे व्हावयाचे नाहींत. अशी स्थिति होऊं नये एवढ्याकरितां राष्ट्रीय सभेची रचना व नियम याचा कांहीं तरी कायमचा विचार यंदाच्या सालीं झाला पाहिजे. यंदाच्या राष्ट्रीय सभेचें खरें कर्तव्य हेंच आहे, असें आम्ही समजतों; व आमच्याप्रमाणेंच दुसऱ्या पुष्कळ गृहस्थांचेंहि मत आहे. आमच्या स्टंडिंग कॉंग्रेस कमिट्या म्हणजे केवळ बाहुलीं आहेत. हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल त्याशिवाय इतर प्रांतांतील स्टंडिंग कॉंग्रेस कमिट्या वर्षभर झोप घेत पडलेल्या असतात व फारच झालें तर, मोठ्या मारामारीनें ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या खर्चाच्या वर्गणीपैकीं थोडाबहुत भाग त्यांच्याकडून मिळतो. अशी स्थिति असणें इष्ट नाहीं हें कोणीहि कबूल करील. राजकीय बाबतींत राष्ट्रीय सभा हेंच काय तें आमचें एक मुख्य दैवत होऊन बसलें

आहे." (केसरी, २५ डिसेंबर १८९५, स. टि. खंड ४, पान २२५.)

रयतेचा सहभाग

टिळक म्हणत असत की, राष्ट्रीय सभेच्या मंडपाचा व जेवणाखाणाचा थाट दिला म्हणजे आपले कर्तव्य संपले असें मानता कामा नये. तिला काही तरी नियमित व व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. त्यांनी म्हटले होते, "प्रो. गोखले यांनी ठराव सुचवाव-याचा, आणि मि. वाच्छा यांनीं त्यास अनुमोदन द्यावयाचें हें आमच्या मतें आतां बस्स झालें. जमिनीचा धारा, जंगल, मीठ व अबकारी वगैरे बाबतींत गरीब रयतेचे काय हक्क आहेत हें त्या रयतेस समजून देण्याच्या उद्योगास आम्हीं आतां लागलें पाहिजे. रयतेच्या गरजा इंग्रज लोकांपेक्षां आम्हांस अधिक चांगल्या रीतीनें कळतात हें खरें असलें तरी, तें तोंडानें सांगितल्यानें कांहीं उपयोग होत नाहीं. रयतेचीं दुःखें रयतेनेंच येऊन सभेंत सांगितलीं पाहिजेत; किंवा निदान ज्यांच्या दुःखाबद्दल सरकारशीं आम्हीं दाद मागतों ते लोक असल्या सभेस हजर तरी असले पाहिजेत. सारांश, राष्ट्रीय सभा घ्या, अगर प्रांतिक सभा घ्या, उत्तरोत्तर अशिक्षित अशा गरीब रयत लोकांत तिचा जितका रिघाव होईल तितका चांगला." (केसरी, १२ मे १८९६, स. टि. खंड ४, पान १८७.)

शेतकऱ्यांचे प्रतिनिधी काँग्रेसच्या अधिवेशनास आले म्हणजे ते आपले प्रश्न नीट तऱ्हेने मांडू शकतील, असे टिळकांना वाटत होते. प्रारंभीच्या काळात प्रांतिक सभा व राष्ट्रीय सभा अशी दोन व्यासपीठे सरकारकडे जनतेची गाऱ्हाणी मांडण्यासाठी होती. प्रांतिक सभेत त्या त्या प्रांतातल्या प्रश्नांचा विचार अधिक तपशिलात जाऊन होई व राष्ट्रीय सभेत राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा होत असे. प्रांतिक सभा ही राष्ट्रीय सभेची पुरवणी झाली पाहिजे. त्यामुळे जनतेला राजकीय विषयांची चर्चा करण्याची गोडी लागते, हा एक फायदा व दुसरा जनतेच्या प्रश्नांचा अधिक तपशीलवार विचार करता येतो हा दुसरा फायदा. असेही टिळकांचे मत होते.

पक्षबांधणी व नेतृत्व

काँग्रेसची पक्ष संघटना जिल्हा-तालुका खेड्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, तरच तिला नित्य संघटनेचे स्वरूप येईल, असे टिळकांचे मत होते, म्हणून टिळकांनी या पक्ष-बांधणीसंबंधी आपल्या सूचना केल्या होत्या. तसेच 'राजकीय कार्य हें सवडीनें किंवा फुरसतीनें करण्याचे काम राहिलेले नाहीं. आतां त्या कामास पूर्णपणें वाहून घेतलेले पुढारी प्रत्येक प्रांतांत, जिल्ह्यांत निघाले पाहिजेत,' असे टिळक म्हणू लागले होते.

"विलायतेतील लोकांचें कोणत्या तरी उपायानें मन वळवून हिंदुस्थानची राज्य-व्यवस्था हल्लीं केवळ अंग्लो-इंडियन लोकांच्या सुधारलेल्या हितैकदृष्टीनें जी चालली

आहे, ती तशी न चालतां राणीसरकारच्या जाहीरनाम्यांत म्हटल्याप्रमाणें एतद्देशीय लोकांच्या हितैकदृष्टीनें चालू होण्याचा योग घडवून आणावा, हा कॉंग्रेसचा मुख्य हेतु आहे. आणि ज्या इंग्रजी मुत्सद्द्यानें या राष्ट्रीय चळवळीस प्रारंभ केला त्याच्या मनांत ही संस्था केवळ दरवर्षी कांहीं भाषणें होऊन ठराव पास करणारी व्हावी असें नव्हतें, हेंहि उघड आहे. राष्ट्रीय सभेस यापुढें जर काही करावयाचें असलें तर तें हेंच होय; आणि राष्ट्रीय सभेचे हल्लींचे पुढारी स्वतः ह्यूम-दादाभाईप्रमाणें सर्व धंदे सोडून जर या उद्योगास लागतील, तर त्यास कांहीं तरी यश येईल इतकेंच नव्हे, तर पुढील पिढीस चांगला कित्ता मिळून राष्ट्रीय सभेच्या भावी उत्कर्षाचा विमा उतरून ठेवल्याचें श्रेय त्यांस प्राप्त होईल. कोणतीहि चळवळ घ्या, ती सिद्धीस नेण्यास अमुक एक तऱ्हेचा उद्योग पाहिजे असें ठरल्यावर, सदर चळवळीच्या पुढाऱ्यांनीं रात्रंदिवस त्या उद्योगास लागलें पाहिजे. लोक वर्गणी देत नाहींत म्हणून रडत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. वर्गणी मिळणें किंवा न मिळणें हें स्वतःच्या उद्योगावर व हिमतीवर अवलंबून आहे. त्याकरितां परिश्रम केले पाहिजेत, हिंडलें पाहिजे; एका ठिकाणीं नाहीं तर दहा ठिकाणीं शब्द टाकला पाहिजे, आणि नाउमेद हा शब्द आपल्या कोशांतून अजीबात काढून टाकला पाहिजे. सर्व देशांतील लोक कळकळीचे असल्यावर पुढाऱ्यांचें कांहीं नाहीं; आणि पुढारी चांगला असल्यास तो आपल्या वर्तनानें व उद्योगानें लोकांच्या अंगांत कळकळ नसली तरी ती उत्पन्न करतो, व कांहीं अंशीं तरी लोकांवर आपली छाप ठेवून त्यांची प्रगति करतो, हें तत्त्व प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासावरून सहज समजण्यासारखें आहे." (केसरी, २४ नोव्हेंबर १९०३, स. टि. खंड ४, पान २४२.)

लोकमत बोलके झाले पाहिजे

राष्ट्रीय सभेचे व्यासपीठ बहुजनांसाठी हवें, तिची संघटना खेड्यापर्यंत पोहोचली पाहिजे, तिच्या पुढाऱ्यांनी आता पूर्ण वेळ कॉंग्रेसच्या कार्यास वाहून घेतले पाहिजे, हे टिळकांचे तीन मुद्दे होते. पण त्याबरोबर कॉंग्रेसने आता आपली मुग्धावस्था सोडून बोलके झाले पाहिजे, असाही टिळक आग्रह धरीत होते.

कलकत्त्याच्या काग्रेस अधिवेशनानंतर १८९७ साली टिळकांनी हा मुद्दा उत्तम व परखड शब्दांत मांडला होता. ते म्हणाले होते, " राष्ट्रीय सभेस आतां बारा वर्षें संपून गेली, तेव्हां मुग्धत्वाची स्थिति संपण्याचा तिचा काळ जवळ आला आहे व लवकरच तिला यौवनदशा प्राप्त होईल. मुग्धत्व व यौवन यांमधील स्थिति विशेष मनोरम असते खरी, तथापि तारुण्यांत सुरू करावयाचें नवीन उद्योग, अंगावर घ्यावयाची नवीन जबाबदारी ह्याविषयीं विचार करण्याची हीच वेळ आहे. राष्ट्रीय सभेस करावयाचें काम अद्याप पुढेंच आहे, व आजपर्यंतचें तिचें आयुष्य सभोंवतालची तयारी करण्यांतच

गेलें असें म्हणावयास हरकत नाहीं. तारुण्याची नवीन तरतरी राष्ट्रीय सभेस आतां दाखवावयास नको काय ? आजपर्यंत राष्ट्रीय सभेचें जसें काम चाललें तसेंच पुढें चालल्यास राष्ट्रीय सभेचे उद्योग निष्फळ ठरण्याचा संभव आहे, अशी मनांत शंका वाटते. आज सतत बारा वर्षें सरकारच्या कानाकपाळाशीं आम्ही सर्वजण ओरडत असतां घुंघुरड्यांच्या ओरडण्यापलीकडे सरकार आम्हांस लेखीत नाहीं, ह्यांतील तात्पर्य काय ? आम्हीं केलेलीं गाऱ्हाणीं सरकारास खोटीं वाटतात कां खरीं वाटून सरकार वहिऱ्यांचें सोंग घेत आहे ? आमचीं गाऱ्हाणीं खरीं किंवा खोटीं हें ठरविण्यास संपूर्ण तपाचा ऊहापोह पुरेसा आहे. आतां आमचीं गाऱ्हाणीं कायदेशीर रीतीनें सरकारच्या डोक्यांत शिरकविण्याच्या प्रयत्नास राष्ट्रीय सभेनें लागलें पाहिजे. खेड्यापाड्यांत राहणाऱ्या, झोपडींत दिवस काढणाऱ्या, सुशिक्षित अशिक्षित सर्व लोकांस उत्तम प्रकारचें राजकीय शिक्षण देऊन, त्यांच्यांत मिसळून, त्यांच्याशीं बरोबरीनें वागून, त्यांच्या हक्कांची त्यांना माहिती करून देऊन, कायदेशीर रीतीनें कसें भांडावें हें त्यांना शिकवून, 'काँग्रेसला तुच्छ मानणें म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा अपमान करणें आहे, प्रजेच्या अंतःकरणांतील कोंवळ्या भागांवर डाग देणें आहे,' अशी राष्ट्रीय सभेचे पुढारी जेव्हां सरकारची खात्री करून देतील तेव्हांच राष्ट्रीय सभा सफळ होणारी आहे. हे नवीन उद्योग करण्यास ही जबाबदारी ओळखून त्याप्रमाणें काम करण्यास व राष्ट्रीय सभेचे सांप्रतचे सर्व उद्योग असेच चालू ठेवण्यास राष्ट्रीय सभेला म्हणजे राजकीय चळवळींना सर्व आयुष्य अर्पण करणारे लोक पाहिजे आहेत." (केसरी, १२ जानेवारी १८९७.) या उताऱ्यावरून टिळकांना राष्ट्रीय सभेच्या कामाला आता नवी दिशा हवी हे सांगावयाचे होते, हे स्पष्ट होते.

राजकीय चळवळीची नवी दिशा : कायदेशीर लढाई

सर ए. ओ. ह्यूम, वेडरबर्न व दादाभाई यांचा दाखला देऊन टिळकांनी म्हटले होते, "पावसाळ्यात बेडूक ओरडतात त्याप्रमाणें वर्षांतून एकदां ओरडून या देशाची राजकीय सुधारणा व्हावयाची नाहीं. त्यासाठीं सातत्यानें व नेटानें खटपट केली पाहिजे. 'ह्यूमसाहेबांचा काँग्रेसभक्तास अखेरचा निरोप' या लेखात टिळकांनी काँग्रेसच्या चळवळीची नवी दिशा स्पष्टपणे सांगितली होती. फक्त ह्यूमसाहेबांच्या निरोपाचे निमित्त केले होते. 'कायदेशीर राजकीय चळवळ १८ वर्षें करूनहि ती यशस्वी होत नसेल तर त्यांत दोष कोणाचा कीं हा मार्ग सोडून दुसरा कोणता मार्ग शोधावयाचा हा खरा प्रश्न आहे. कायदेशीर चळवळ अधिक नेटानें व जोमानें केली पाहिजे,' याच आशयाचा ह्यूमसाहेबांचा आदेश टिळकांनी उद्धृत केला होता आणि पुढे म्हटले होते की, "सरकार म्हटलें कीं, येथूनतेथून सारखेंच; मग तें इंग्रज सरकार असो, पेशवे सरकार असो, किंवा मोंगल सरकार असो. अशा सरकारच्या जुलमाखालीं तुम्हीं

जर मरत असलां तर तो दोष तुमचा होय, सरकारचा नव्हे. कोणत्याहि देशांतील लोकांस त्यांच्या योग्यतेप्रमाणेंच त्यांच्यावर सत्ता चालविणारें सरकार मिळत असतें; हें तत्त्व अठरा वर्षांपूर्वीच मीं तुम्हांस सांगितलें होतें, असें ह्यूमसाहेब म्हणतात. तुम्हांस हल्लींची राज्यपद्धति जर असह्य झाली असेल, तर ती असह्य झाली आहे असें तुमच्या वर्तनानें तुम्ही दाखविलें पाहिजे. वर्षांत एकदां तोंडाची वाफ दवडल्यानें कांहीं कार्य होत नाहीं. तुमचीं भाषणें मोठीं गोड आणि अलंकारिक असतात खरीं; आणि न्यायाच्या दृष्टीनें पाहिलें तर तुमचें म्हणणें सयुक्तिकहि आहे, पण सरकारपासून न्याय मागून घ्यावा, व तो सरकारपासून लवकर मिळावा, अशी जर तुमची इच्छा असेल, तर ती असल्या गुलहौशी भाषणानें किंवा वर्षांतून नाताळांत एकदां एकत्र जमून कंठशोष केल्यानें सिद्धीस जावयाची नाहीं. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत संबंध वर्षभर एकसारखी चळवळ सुरू ठेवून इंग्रज लोकांस सळो कीं पळो केल्याखेरीज 'भीक नको पण कुत्रा आटप' या न्यायानें यांस कांहीं तरी द्या आणि ही ब्याद या देशांतून एकदां जाऊं द्या, अशा पेचांत त्यांस घातल्याखेरीज तुम्हांस यशप्राप्ति व्हावयाची नाहीं. कॉंग्रेस सभा काढली तेव्हां तिचा उद्देश हाच होता; पण दुर्दैवानें आतां तिला वार्षिक श्राद्धाचें स्वरूप प्राप्त झालें आहे! अशानें काय होणार? देशाभिमानाचें वारें सतत कित्येक वर्षेपर्यंत अंगांत एकसारखें खेळून देशाकरितां आपलें तन, मन आणि धन अर्पण करण्यास किंबहुना देशाकरितां संकटहि सोसण्यास जेव्हां तुम्ही तयार व्हाल आणि या कामांत अशा निर्धारानें पडणारे जे लोक आहेत ते जेव्हां एकमेकांवर विश्वास ठेवून परस्परांच्या साहाय्यानें व सल्लामसलतीनें उद्योगास लागतील, तेव्हां कार्यसिद्धीची कांहीं आशा आहे. इंग्लंडांत लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला काय किंवा कॉंझरव्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाला काय, तुम्हांस सारखेंच, एखाद-दुसरी गोष्ट लिबरल पक्षानें वरी केली म्हणून तेवढ्यावरून ते राजकीय हक्कांचें दान अनाहूत तुमच्या पदरांत टाकतील असें समजून हुरळून जाऊं नका. ह्यूमसाहेब म्हणतात कीं, मी तुम्हांस पुनः सांगतों कीं, तुमचें भाग्य तुमच्या हातांत आहे." (केसरी, २९ डिसेंबर १९०३, स. टि. खंड ४, पान २०४.)

या लेखाच्या शेवटी म्हटले होते की, "ह्यूमसाहेबांची ही इच्छा ध्यानीं घेऊन कॉंग्रेसचे जे पुढारी आहेत त्यांनीं कॉंग्रेसचा मोर्चा फिरवून तिला काळानुरूप व मिळालेल्या अनुभवाप्रमाणें नवीन वळण दिलें पाहिजे. एकसारखा उद्योग व चिकाटी हेच गुण कार्यसिद्धि होण्यास आवश्यक आहेत. आणि ते जर कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं दाखविले तर राजकीय हक्काबद्दल जी ही कायदेशीर लढाईची चळवळ सुरू होणार त्यांत पुढाऱ्यांचें अनुकरण करण्यास नवीन पिढींतील पुष्कळ माणसें मिळतील. नाहीं असें नाहीं." वस्तुस्थिती अशी होती की नव्या तरुण पिढीच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी फक्त पुढारी हवा होता. १९०५ साली बंगालच्या फाळणीमुळे जो राजकीय पेचप्रसंग निर्माण

झाला त्यामुळे काँग्रेसला लढाऊ नेतृत्व देण्याची मोहीम टिळकांनी स्वतः हाती घेतली आणि १९०५ नंतर काँग्रेसमध्यें टिळकांच्या नेतृत्वाखाली नवा पक्ष उदयास आला.

जहाल व मवाळवादाचा तत्त्वविचार

१८९२ पासून १९०४ पर्यंत टिळकांनी काँग्रेसला बहुजन लोकांचा पाठिंबा मिळाला पाहिजे, ती लोकांची संस्था झाली पाहिजे यासाठी विचार-प्रवर्तन सुरू ठेवले होते. पुण्यात १८९५ साली स्थानिक राजकीय नेतृत्व प्रस्थापितही केले होते. १९०५ मध्ये त्यांना बंगभंगाच्या आंदोलनाचे वेळी राष्ट्रीय व्यासपीठ मिळाले. तेथे त्यांनी आपले विचार मांडावयास सुरुवात केली.

टिळकांनी राष्ट्रसभेच्या कार्याविषयी, उद्दिष्टांविषयी स्वतःचे विचार मांडावयास सुरुवात केल्यावर स्वाभाविकपणे त्याला जुन्या नेत्यांकडून विरोध होऊ लागला. भिन्नमत प्रदर्शनाचा (chissent) लोकशाही पद्धतीत प्रत्येकाला हक्क असतो. आपल्या मताचा प्रचार करून आपले बहुमत करण्याची अल्पमतवाल्यांना मोकळीक असते, हा लोकशाही कार्यपद्धतीचा विशेष आहे. टिळक ज्या वेळी राजकारण करीत होते त्यावेळी या कार्यपद्धतीचा प्रारंभ झालेला होता. संस्थात्मक जीवन नुकतेच सुरू झाले होते. ज्यांनी हे सुरू केले त्यांना भिन्न मताच्या लोकांचे वर्चस्व सहन होणे शक्य नव्हते. टिळकांनी हा पहिला संघर्ष आपल्या देशात सुरू केला, असे म्हणावयास हरकत नाही. काँग्रेसमध्ये जो नवीन मतप्रवाह टिळक आणू इच्छीत होते त्यातून जहाल–मवाळ असा वाद सुरू झाला. त्या वादाकडे आता इतिहासनिष्ठ दृष्टीने पाहिले तर असे म्हटले पाहिजे की, टिळक–गोखले हे दोन मतप्रणालींचे व दोन राष्ट्रीय प्रवाहांचे प्रतिनिधी होते. त्यांचा हा संघर्ष १८९५ पासून सुरू झाला. पुढे १९१५ मध्ये गोखल्यांच्या मृत्यूपर्यंत तो चालू होता. पण तो वैयक्तिक संघर्ष नव्हता.

ना. गोखल्यांशी आपला मतभेद कोणत्या स्वरूपाचा आहे, याचे विवेचन टिळकांनी एका लेखात केले होते. त्यांत गोखल्यांचे गुणवर्णनही होते. त्यात म्हटले होते, "आपल्या देशाची स्थिति अत्यंत वाईट झालेली आहे व या गोष्टींचा वेळींच जर लोकांनी कांहीं बंदोबस्त केला नाहीं तर आमचा रोग दुःसाध्य होईल, अशी कळकळ ज्यांना मनापासून वाटते आहे, अशांमध्यें ना. गोखले यांची गणना केली पाहिजे. देशस्थितिसंबंधानें इतर कोणाला जितकें वाईट वाटत असेल व कांहीं तरी उपाय योजणें जरूर आहे ह्याविषयीं इतर कोणाला जितकी काळजी वाटत असेल तितकेंच वाईट ना. गोखले यांना वाटत असून, देशाबद्दल तितकीच काळजी तेहि बहात आहेत. कळकळीच्या कमीजास्तपणामुळें नवीन पक्ष व ना. गोखले ह्यांच्या राजकारणांत भेद उत्पन्न झालेला नाहीं. हा भेद स्वभावाचा व विचारसरणीचा आहे; व देशहितासंबंधानें ना. गोखले जसजसा अधिक विचार करीत जातील व जसजसें अधिक महत्त्वाचें काम ते आपल्या

शिरावर घेतील तसतसे त्यांचे विचार नवीन पक्षाच्या वळणावर गेल्यांवाचून रहाणार नाहींत, ना. गोखले यांच्या मनांत एक प्रकारची विशेष कळकळ असल्यानेंच त्यांनीं आपल्या व्याख्यानांतून नवीन जागृतीचें मनःपूर्वक अभिनंदन केलें आहे. नवीन राजकीय विचारांची लाट सर्व देशभर पसरल्यानें त्यांना आनंद होत आहे हें खरें, पण राजकीय चळवळ करण्याची कॉन्स्टिट्यूशनल उर्फ सनदशीर पद्धत सोडून चालावयाचें नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. नवीन पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, गेलीं एकवीस वर्षें राष्ट्रीय सभेनें राजकीय चळवळीची जी दिशा पत्करली ती चुकीची होती. कॉन्स्टिट्यूशनल चळवळ करा म्हणजे सिद्धि होईल, असें चुकीनें सांगण्यांत आलें व भ्रामक साम्यामुळें देश फसला जाऊन राष्ट्राची एकवीस वर्षें फुकट गेलीं." (केसरी, १२ फेब्रुआरी १९०७, स. टि. खंड ४, पान ४३५.)

इष्ट देवतेची आराधना

कॉंग्रेसने इष्ट देवतेची आराधना १८ वर्षें मनोभावे केली पण सरकार काही दाद देत नाहीं, याचे वर्णन करताना टिळकांनी म्हटले होते, "वर्षातून एकदां कां होईना, पण नियमानें आम्हीं अठरा वर्षें एकसारखी ओरड चालविली आहे. कॉंग्रेसच्या सभामंडपांत झालेलीं आमचीं जोरदार भाषणें व ठराव वाचले असतां, कोणासहि आमच्या मागण्या न्यायाच्या आहेत असें वाटावें, इतका आवेश तेवढ्या वेळेपुरता तरी आमच्या अंगांत भरलेला असतो, आणि हिंदुथानच्या निरनिराळ्या भागांतून स्वतःचे पैसे खर्च करून वर्षांतून एक वेळ तरी काग्रेस भरेल त्या ठिकाणीं आम्हीं जात असतों. पहिल्या पहिल्यानें आम्हांला मोठी उमेद होती कीं, ही जी कामधेनूसारखी कॉंग्रेसची संस्था निघालेली आहे, तिच्यापासून आमचें व आमच्या मुलाबाळांचें कोटकल्याण होईल; आणि खरें पाहिलें तर, सरकारासहि या कामधेनूच्या सामर्थ्याबद्दल कांहीं वर्षें बरीच शंका होती, पण आम्हीं व सरकार या दोघांचाहि तो भ्रम नाहींसा होऊन, कॉंग्रेसचें महत्त्व कमी होऊं नये म्हणून तिला औद्योगिक प्रदर्शनाची पुरवणी जोडण्यांत येऊं लागली आहे. हे विचार नवे आहेत असें नाहीं; कॉंग्रेसला जाणाऱ्या मुखत्यारांत जे कांहीं विचारी आहेत त्यांच्या मनांत अशा प्रकारच्या शंका बरेच दिवस येऊं लागल्या आहेत, परंतु त्या उघड रीतीनें व्यक्त मात्र कोणी करीत नाहींत. हें असें कां व्हावें? अठरा वर्षेपर्यंत आम्ही चळवळ चालू ठेवली असतां सरकार आमचें कां ऐकत नाहीं? बरें, ऐकत नाहीं इतकेंच नव्हे, तर उत्तरोत्तर राजकीय पारतंत्र्याची आमच्या मानेभोंवतालची दोरी घट्ट करण्यास सरकार कसें धजावतें, इत्यादि प्रश्न महत्त्वाचे आहेत; आणि कॉंग्रेसच्या खऱ्या हितचिंतकांनीं केव्हां ना केव्हां तरी—पण लवकरच—त्यांचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. कारण कायदेशीर राजकीय चळवळ, किंवा इंग्रजींत ज्याला 'कॉन्स्टिटयूशनल ॲजिटेशन' म्हणतात, हाच

जर आमच्या उन्नतीचा खरा मार्ग असेल, तर ती आम्हांस फलद्रूप झाली पाहिजे; आणि नसेल तर हा पंथ सोडून देऊन दुसरा कोणता तरी श्रेयस्कर मार्ग आपणांस पत्करला पाहिजे. तेव्हां अर्थातच असा प्रश्न निघतो कीं, अठरा वर्षें आम्ही जी राजकीय चळवळ चालविली आहे ती जितक्या जोरानें, नेटानें आणि कळकळीनें चालवावयास पाहिजे आहे तितकी चालवून, निराशेचें खापर आमच्या पदरांत आलें, किंवा आमच्या हातून कांहीं चूक झाल्यामुळेंहि कामधेनु आम्हांस प्रसन्न झाली नाहीं ! सारांश, इष्ट-देवतेची उपासना करण्यांतच आमची कसूर झाली आहे, किंवा देवताच तितकी सामर्थ्यवान् नाहीं, हा प्रश्न आज आमच्यापुढें आहे. "

राष्ट्रीय सभा कोणाची ?

पाश्चिमात्य देशातून भारतात ज्या राजकीय संकल्पना आल्या, त्यात प्रातिनिधिक लोकशाही व राजकीय पक्ष या दोन महत्त्वाच्या आहेत. टिळकांचे म्हणणे असे होते की, राष्ट्रीय सभा ही हिंदुस्थानची प्रातिनिधिक राजकीय सभा असेल तर ब्रिटिश पार्लमेंटरी पद्धतीप्रमाणे त्यात विविध मतांचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय पक्ष असावेत व त्या प्रत्येक पक्षाला आपल्या मतांचा प्रचार करून राष्ट्रीय सभेच्या कार्यास दिशा व विचारास वळण लावण्याची संधी मिळावी. म्हणूनच काँग्रेसच्या राजकीय चळवळीची दिशा आता बदलली पाहिजे असे जेव्हा ते म्हणू लागले तेव्हा त्यांनी स्वतःच्या मतानुसार नवा पक्ष संघटित करावयाचे मनात ठरवले. त्या पक्षाची विचारप्रणाली व कार्यक्रम पक्का केला व देशात सर्वत्र व 'केसरी'तून त्याचा धडाक्याने प्रचार सुरू केला. म्हणूनच 'राष्ट्रीय सभा कोणाची' हा प्रश्न उपस्थित करून टिळकांनी लिहिले, " देशांतील लोकमत बदलण्याचा प्रयत्न करण्याची सर्वांस सारखीच मोकळीक आहे व नव्या पक्षानें या मोकळिकीच्या तत्त्वावरच आपलें काम चालविलें आहे. राष्ट्रीय सभा मोडावी, अथवा ही सस्था कायम असतां तिजविरुद्ध दुसरी संस्था स्थापावी, असा त्या पक्षाचा उद्देश नाहीं. आज लोकमत त्यांच्या बाजूला पूर्णपणें नसलें तर थोड्याच काळांत तें आपल्या बाजूचें करतां येईल अशी या पक्षास उमेद आहे व त्याप्रमाणें तो कामहि करीत आहे. हें काम, ही उमेद, हा उद्योग कोणास पसंत नसला तर त्याच्याविरुद्ध मार्गानें प्रयत्न करून साधल्यास त्यानें लोकमत आपल्या बाजूचें करून घ्यावें, त्यास कोणाची हरकत नाहीं. राष्ट्रीय सभा हीं कांहीं वतनदारीची संस्था नव्हे, हें सर्व पक्षांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे. लोकनियुक्त सार्वजनिक सभेंत जे ठराव मंजूर व्हावयाचे ते प्रायः बहुमतानेंच व्हावयाचे आणि एकदा अशा रीतीनें ते मंजूर होण्यापूर्वी ज्यांचें मत त्याविरुद्ध असतें त्यांनींहि हें बहुमत म्हणून मान्य करून त्याप्रमाणें सभेचें वर्तन राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे, प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीचें पहिलें आणि अत्यंत महत्त्वाचें तत्त्व हेंच होय. . .मवाळ पक्ष असो वा जहाल पक्ष असो, नेमस्त असो वा समघात असो, प्रत्येकानें

बहुमत आपल्या बाजूचें करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि बहुमत आपल्या बाजूचें बनलें म्हणजे मग राष्ट्रीय कार्यक्रमांत त्याप्रमाणें खुशाल फेरफार करून घ्यावा. लोकमताच्या ओघावरोबर राष्ट्रीय सभेचें धोरणहि पालटत जाणार, गेलें पाहिजे व जाईल. नेमस्तांच्या वतनदारी ओरडींनें किंवा केवळ जहाल पक्षांच्या म्हणण्यानें हा परिणाम टळावयाचा नाहीं. गेल्या सालीं दादाभाई नवरोजी यांनीं राष्ट्रीय सभेस पूर्वीपेक्षां निराळ्या प्रकारचें वळण दिलें ही गोष्ट सर्वांस माहीत आहे. हाच क्रम पुढें चालेल व चालला पाहिजे. एक प्रकारच्या धोरणानें कार्यसिद्धि झाली नाहीं, तर दुसरें धोरण अंगीकारण्याचा राष्ट्रीय सभेस अधिकार आहे, आणि तें धोरण कोणतें असावें हें सभेतील प्रतिनिधींच्या बहुमतानें अखेर ठरावयाचें आहे. हें बहुमत आपआपल्या बाजूचें व्हावें यावद्दल प्रत्येकानें हवा तो प्रयत्न करावा, पण तें अमक्या प्रकारचें आहे असें सभेत वादविवाद होऊन ठरल्यानंतर सर्व पक्षांतील लोकांनीं तो निकाल बादशाही हुकमाप्रमाणें शिरसावंद्य मानून, राष्ट्रीय कार्यास मनोभावें मदत करणें हें त्यांचें कर्तव्य होय. तुम्हांस जी कांही खटपट किंवा उद्योग करावयाचा असेल तो खुशाल करा, पण हें अखेरचें कर्तव्य विसरूं नका, एवढीच आमची सर्वांस विनंति आहे. ही विनंती किंवा सूचना लोकनियुक्त संस्थांचा इतिहास लक्षांत ठेवूनच केली आहे, हें वरील विवेचचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. हल्लींच्या राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांतील कांहीं गोष्टी नवीन पक्षास मान्य नसल्यास त्यांनीं सदर सभा मोडण्याचा यत्न करणें ज्याप्रमाणें गैर आहे, त्याचप्रमाणें जुन्या पक्षानेंहि आपल्या वतनदारीची दोरी बळकट ओढून धरण्यास लागणें गैरशिस्त होय. राष्ट्रीय सभा ही कोणत्याहि एकाच विशिष्ट पक्षाची अगर पंथाची नसून सर्वांची आहे; आणि त्यांत जें कांहीं काम व्हावयाचें तें काळानें परिस्थितींत झालेला फरक, बहुमत, आणि तडजोड, यांकडे लक्ष देऊनच झालें पाहिजे. गुदस्ता अशाच प्रकारें हें काम झालें, व यंदा कितीहि वाद झाला तरी अखेरीस तोच कित्ता गिरवला जाऊन, राष्ट्रीय सभेचें आणखी निदान एक तरी पाऊल पुढें पडेल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे." (केसरी, दि. २७ ऑगस्ट १९०७, स. टि. खंड ४, पान २९४ ते २९६.)

हा लेख सुरतेस झालेल्या काँग्रेस अधिवेशनापूर्वीचा आहे. याच्या आधी कलकत्त्यास दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली १९०६ साली व त्याआधी १९०५ ला काशीस गोपाळराव गोखले यांच्या अध्यक्षतेखाली जी काँग्रेस अधिवेशने झाली त्यावेळी टिळकांनी आपल्या नव्या पक्षाच्या वतीने स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या तीन सूत्रांचा आग्रह धरून काँग्रेसला कार्यक्रमाधिष्ठित वळण लावण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी गोपाळराव गोखल्यांनी स्वदेशी व बहिकार यांचा पुरस्कार केला होता आणि दादाभाईंनी कलकत्त्याच्या अधिवेशनात स्वतःच्या अधिकारवाणीने स्वराज्याचे ध्येयच आता काँग्रेसने पुढे ठेवले पाहिजे व हा कार्यक्रम स्वीकारला पाहिजे अशी

घोषणा केली होती.

गोखल्यांचा मार्ग

सारांश, टिळक–गोखले यांच्यातील मुख्य मतभेद अंतिम हेतूपेक्षा तो साध्य करण्याचा मार्ग कोणता असावा आणि हक्कसंपादनाच्या या लढ्यात सरकारशी कोणते धोरण ठेवावे यांच्यासंबंधी होता. टिळकांचे म्हणणे असे होते की, इंग्रजी नोकरशाही हीच हक्कसंपादनाच्या लढ्याआड येत आहे. ती विनवण्या करून ऐकत नाही. तेव्हा बहिष्कारासारखी आर्थिक चळवळ केल्याविना त्या नोकरशाहीचा विरोध मोडून काढता येणार नाही. यासंबंधी गोखले काय म्हणतात हे सांगताना टिळकांनी लिहिले होते, " ना. गोखले यांवर आमच्या लोकांपुढें भाषण करून आम्हीं काय करावें हें ठिक-ठिकाणच्या लोकांस येथें समजून सांगण्याचा हा बहुधा पहिला प्रसंग आहे.लोकांना आपलीं मतें समजून सांगताना विरुद्ध पक्षाचा व आपला मतभेद दाखवावा लागतो. इतकेंच नव्हे, तर ज्या विचारसरणीनें आपली मतें सिद्ध होतात त्याहून भिन्न अर्थात् अग्राह्य अशी विरुद्ध पक्षाची विचारसरणी आहे असें दाखवावें लागतें...यांच्या (गोखल्यांच्या) पक्षाची स्वाभाविक स्थिति म्हटली म्हणजे गोऱ्या लोकांशीं मित्रभाव ठेवून युक्तिवादाच्या विनवणींनें राज्यांतील अधिकाऱ्यांकडून आपलीं कामें करून घ्यावयाचीं. परंतु गेल्या कॉंग्रेसच्या बैठकीनंतर इतका गोडवेपणा ठेवणें आतां अशक्य झालें आहे. स्वराज्य—स्वतंत्र वसाहतीतलें स्वराज्य का होईना—हा आपला अंतिम हेतु आहे, असें या पक्षास आतां स्पष्ट म्हणावें लागत आहे. 'स्पष्ट' शब्द आम्हीं मुद्दाम वापरला आहे, कारण यावद्दल या पक्षाच्या बोलण्यांत पूर्वी जर अंधुक दिग्दर्शन होतें तरी प्रधान अंतिम हेतूचें स्थान स्पष्टपणें या गोष्टीस देण्यास ते आतांपर्यंत तयार नव्हते. औद्योगिक बहिष्कार आता यांस ग्राह्य आहे, आणि 'झीज सोसून' स्वदेशी मालास उत्तेजन दिलें पाहिजे, असा अखेरीस कॉंग्रेसचा ठराव झाल्यानें, हेंहि म्हणणें आतां सोडतां येत नाहीं. बरें, या गोष्टी किंवा त्यापासून नैसर्गिकरीत्या निघणारे सिद्धांत सर्वस्वीं कबूल करावे तर सरकारशीं किंवा गोऱ्या अधिकाऱ्यांशीं गोडवेपणा ठेवण्याचें ब्रीद कायम राहत नाहीं. आणि न कबूल करावें तर विचारांची विसंगतता पदरांत येते. अर्थात् दोहों बाजूनीं मोठी पंचाईत होऊन पडली आहे. आणि या कोंडीतून ना. गोखले कोणाची थप्पड न खातां कसे सुटून जातात हेंच पाहाण्यास आम्ही उत्सुक झालों होतों. ना. गोखले आणि नवा पक्ष यांच्यातील भेद फारच सूक्ष्म राहिलेला आहे. आमच्या राष्ट्रांतील लोकांस परदास्याची स्थिति दुःखद वाटणें स्वाभाविक आहे आणि तिचा प्रतिकार करण्यास त्यांनीं मनोभावानें, निश्चयानें व नेकीनें प्रयत्न केला पाहिजे, ही गोष्ट ना. गोखले यांस कबूल आहे." (केसरी, १९ फेब्रुआरी १९०७, स. टि. खंड ४, पान ४४२–४४३.)

टिळकांच्या नव्या पक्षाचा मार्ग

नेमस्त व जहाल यांच्या वादाला कलकत्त्याच्या १९०६ च्या अधिवेशनापासून जास्त जोरात सुरुवात झाली आणि १९०७ मधील सुरतेच्या अधिवेशनात त्यांच्यातील समरप्रसंग घडला. सुरतेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष लाला लाजपतराय व्हावेत, अशी टिळकांच्या पक्षाची इच्छा होती. 'गोखल्यांना मुरली वाजविणारा अध्यक्ष हवा आहे' अशी टिळकांची टीका होती. त्यामुळे डॉ. रासबिहारी घोष यांस अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. या अधिवेशनातील समरप्रसंग, त्यावर झालेली उलटसुलट टीका हे जरी तात्कालिक अभिनिवेशाचे व संदर्भाचे भाग सोडले तरी नेमस्त व जहाल हा वाद या निमित्ताने निकराचा झाला. त्यावेळी टिळकांनी लिहिलेल्या लेखातून नेमस्त-जहाल वादातील विवाद्य मुद्यांची चर्चा केलेली आढळते व काँग्रेसला लढाऊ वळण देण्याच्या त्यांच्या उद्दिष्टांसंबंधी त्यांच्या पक्षाने केलेली प्रगती कळते. दि. ३ डिसेंबर १९०७ च्या 'केसरी'त टिळकांनी लिहिले होते, "राष्ट्रीय सभा मोडावयाची नाहीं अशी नव्या पक्षाची पूर्ण इच्छा आहे; पण या इच्छेचा फायदा कोठपर्यंत घ्यावा याचा जुन्या पक्षानें नीट विचार केला पाहिजे.... नव्या-जुन्या पक्षांचा हा तंटा नव्या पक्षास यश येईपर्यंत कायम राहाणार असें आम्ही मागेंच लिहिलें आहे, आणि अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे दिवा जातांना जसा मोठा होत असतो तद्वतच यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीची स्थिति आहे असें म्हणावें लागतें. नवा पक्ष उतरोत्तर बळावत चालला आहे आणि लवकरच राष्ट्रीय सभेचीं सूत्रें त्याच्याच हातांत गेलीं पाहिजेत. सामान्य लोकसमूह नव्या पक्षाचाच आहे. मेथा, वाच्छा यांच्यासारखी काही वतनदार मंडळी मात्र जुनें-डोळे झांपणें लावूनच वाळूच्या घाण्याभोवतीं अद्याप घिरट्या घालीत आहेत. परंतु त्यांनीं कितीहि घिरट्या घातल्या आणि हा घाणा कितीहि जोरानें ओढला तरी वाळूचें तेल यांच्या हातून निघत नाहीं, ही गोष्ट आतां सिद्ध झालेली आहे. अर्थात् इष्ट सिद्धीकरितां दुसरी कांहीं उपायांची योजना केली पाहिजे, घाण्यांतील वाळू काढून त्यांत तीळ किंवा भुईमूग घातले पाहिजेत, हें आतां लोकांस कळूं लागलेलें आहे आणि सरकारच्या भीतीने, मवाळपणाच्या वृथाभिमानानें किंवा आपणास प्राप्त झालेलें वैभव अगर सरकारच्या दरबारांतील मान्यता कमी होईल या शंकेने, कांहीं लब्धप्रतिष्ठित गृहस्थ आज वीसपंचवीस वर्षें रुळलेला मार्ग सोडून जाण्यास यंदाच जरी तयार नसले, तरी अखेरीस लवकरच त्यांस नव्या पक्षास येऊन मिळावें लागेल, असा आमचा भरवंसा आहे किंबहुना ऐतिहासिक प्रगतीचा हा मार्गच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं."

"कित्येकांनी तर अशी सूचना केली आहे कीं, जहाल आणि मवाळ यांचें केव्हां ना केव्हां तरी जर फाटणारच तर नव्या पक्षानें आजच राष्ट्रीय सभेंतून बाहेर पडून

नागपुरास नवी जहालांची राष्ट्रीय सभा कां भरवूं नये? मुंबईच्या राजाचा कावा पहातां अशा तऱ्हेचा प्रश्न उद्‌भवणें कांहीं गैरवाजवी नाहीं. तथापि जर शांतपणें विचार केला तर असें आढळून येईल कीं, यंदा नाहीं तरी पुढील सालीं, पुढील सालीं नाहीं तर एक दोन वर्षांत हल्लींच्याच राष्ट्रीय सभेंत नवीन पक्षाचें वर्चस्व होणें पूर्णपणें संभवनीय व शक्य आहे. हल्लीं काळाचा ओघ फिरला आहे, त्याच्या जोरापुढें जुन्या पक्षाचीं मतें फार दिवस टिकणें शक्य नाहीं. आणि हें जर खरें आहे तर राष्ट्रीय सभा नव्या पक्षानें सोडून देण्यापेक्षां तींतच राहून लवकरच तेथें आपलें वर्चस्व स्थापित करणें इष्ट होय, असें आम्हांस वाटतें. नव्या पक्षास जें काम करावयाचें आहे तें हल्लींच्या कॉंग्रेसमध्यें होत नाहीं, ही गोष्ट खरी, पण तेवढ्यामुळें हल्लीं आहे ती कॉंग्रेस मोडावी असें आमच्यानें म्हणवत नाही." (केसरी, ३ डिसेंबर १९०७, स. टि. खंड ४, पान ३०७–३०८.)

याचा निष्कर्ष असा की नव्या पक्षाच्या बाजूस लोकमत झुकले आहे आणि लवकरच तो आपले कॉंग्रेसवर वर्चस्व प्रस्थापित करील, असा विश्वास सुरत कॉंग्रेसच्या आधीपासूनच टिळकांना वाटू लागला होता. दि. १० डिसेंबरच्या 'केसरी'त टिळकांनी सुरतेस लाला लजपतराय कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले पाहिजेत, अशी सूचना केली होती. त्या लेखांत त्यांनी म्हटले होते, "राष्ट्रीय सभा ही हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या बतीनें सरकारजवळ हक्क मागण्याकरितां भांडण्यासाठीं निर्माण झालेली आहे. सरकारास किंवा सरकारी अधिकाऱ्यांस रुचेल अथवा ते चिडले जाणार नाहींत अशा रीतीनेंच जर राष्ट्रीय सभेचें काम चालावयाचें असेल, तर ही सभा हवी तरी कशाला, असा सहजच प्रश्न निघतो. भुलथापीनें, गोडीगुलाबीनें, लांगूलचालनानें, नेमस्तपणानें, फुस–लावणीनें किंवा स्तुतीनें – बुद्धि-पुरस्सर स्तुतीनें किंवा राजनीति म्हणून अंगीकारिलेल्या स्तुतीनें – मारवाडी सरकार फसून जाईल आणि स्वराज्याच्या हक्काची भिक्षा आमच्या पदरांत टाकील, अशी जर अद्याप कोणास आशा वाटत असेल, तर त्याची गणना महामूर्खांत केली पाहिजे. राष्ट्रीय सभेला वैधव्यांत ठेवावयाची किंवा सनाथ राखावयाची अशा प्रकारचा हा प्रश्न आहे. सरकारला चिडवावयाचें नाहीं अशा रीतीनें वागणाऱ्या व तितकेंही करून एखाद्या वेळेस सरकार चिडलें असतां सरकारची क्षमा मागून मोकळे होणाऱ्या लोकांच्या हातून राष्ट्रीय कार्यभाग आतां उरकत नाहीं, दांडगाईचे पण कायद्याचे, अडवणुकीचे आणि निग्रहाचेच मार्ग आपल्या कार्यसिद्धीकरितां आम्हांस स्वीकारले पाहिजेत; आणि अशा रीतीनें वागत असतां सरकार चिडलें किंवा उपटशाहीचे कायदे करून आम्हांवर जुलूम करूं लागलें, तर सदर कायदे मोडून त्या कायद्याचे जे वाईट परिणाम असतील ते सोसून आम्हीं आपली कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे; हें तत्त्व लोकांच्या हृदयांत बाणूं लागलें आहे. सर फिरोजशहा मेथा किंवा ना. गोखले यांनीं

या प्रगतीच्या मार्गाला आड येऊन देशाच्या भाग्योदयाचा विरोध करणें म्हणजे भगवान् सहस्ररश्मी उदयाला आला असतां त्याचें प्रखर तेज, त्याच्या आड आपला हात करून, निवारण करण्याइतकेंच साहसाचें व अविचारीपणाचें होय. हा उद्योग सफल होणें आतां शक्य नाहीं. यंदाच्या राष्ट्रीय सभेंत बहिष्काराचे वगैरे प्रश्न येतीलच, पण त्या सर्वांच्या प्रारंभीं पहिला प्रश्न वर सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीय सभा सोवळी करावयाची का सनाथ राखावयाची हा आहे." (केसरी, १० डिसेंबर १९०७, स. टि. खंड ४, पान ३११ व ३१३.)

खरा तंटा कशात होता?

दि. १० डिसेंबर १९०७ च्या म्हणजे सुरत कॉंग्रेसच्या आधी एक आठवडा लिहिलेल्या 'खरा तंटा कशात आहे?' या लेखात टिळकांनी सरकार चिडेल म्हणून लाला लजपतराय यांना अध्यक्ष करण्यास मवाळ तयार नाहीत अशी टीका करून मवाळांचा भ्याडपणा उघडकीस आणला होता. टिळकांनी या लेखांत म्हटले होते, "(सरकार चिडेल) हा मंत्रच पायाशुद्ध नसून अनर्थकारक आहे असें नव्या पक्षाचें मत आहे. स्वदेशी, बहिष्कार आदि करून निःशस्त्र प्रतिकाराचे जे मार्ग आहेत ते हिंदुस्थानच्या लोकांनीं गेल्या २–३ वर्षांत थोड्या बहुत अंशानें तरी स्वीकारले आहेत. लोकांमध्ये जागृति उत्पन्न झालेली आहे. ही गोष्ट सरकारास समजली आहे, पण त्या जागृतीचा ओघ नव्या पक्षाच्या मार्गानें न वहातां अधिकारीवर्गास आवडेल अशा भिक्षांदेहीच्याच जुन्या मार्गानें वाहविण्याची सरकार खटपट करीत आहे. एवढ्याच करितां 'आतां आम्ही मवाळास हातीं धरणार' असें मोर्लेसाहेबांनीं कंठरवानें प्रतिपादन केलें आहे. कोणतेहि सरकार आपल्या प्रजेस राजकीय हक्क अडविल्याखेरीज खुषीनें देत नाहीं. हें तत्त्व आतां सर्व लोकांस कळून चुकलें आहे."

दोन पक्षांची अध्यक्षाच्या निवडीच्या प्रश्नावर जी पहिली चकमक झाली त्याबद्दल टिळकांनी लिहिले होते कीं, "नव्या पक्षाच्या गृहस्थावर खासगी द्वेष, मत्सर, आदि दुर्गुणांचा आरोप करणें म्हणजे आपल्या बुद्धिमांद्याचें जगापुढें जंगी प्रदर्शन करणें होय. राष्ट्रीय सभा नागपुराहून काढून सुरतेस न्या किंवा सुरतेहून सर फेरोजशहांच्या बंगल्यांत भरवा, नव्या-जुन्या पक्षांच्या मतांतील हा विरोध आतां टाळणें अशक्य आहे. हा तत्त्वाचा तंटा आहे. इतउत्तर हिंदुस्थानांत राजकीय चळवळींचें धोरण कोणतें असावें याचा हा वाद आहे. व्यक्तींचा नाहीं. प्रांताचा नाही किंवा गोखले–टिळकांचा नाहीं. स्वदेशी, बहिष्कार यांच्यासारख्या अशस्त्र प्रतिकाराच्या कल्पना राष्ट्राच्या, लोकांच्या मनांत नेहमींच उद्भवतात असें नाहीं. सुदैवानें बंगालच्या फाळणीमुळें व इतर कारणांनीं त्या लोकांच्या मनांत सध्या जागृत झालेल्या आहेत. सरकार चिडेल म्हणून या जागृतीचा विरोध करून देशद्रोहाचें पातक संपादन करूं

नका, अशी सर्वांस आमची आग्रहपूर्वक विनंति आहे."

खरी अडचण कोठें आहे?

जहाल व मवाळ यांच्यात प्रकृतीचा व प्रवृत्तीचा फरक होता. त्यामुळे हक्क-प्राप्तीसाठी मार्ग कोणता स्वीकाराचा यासंबंधीही त्यांच्यात मतभेद होते. याआधी सांगितल्याप्रमाणे गोडब्याने सरकारचे मन वळवून आपले हक्क मिळवावेत, ही नेमस्तांची भूमिका होती. टिळकांनी 'खरी अडचण कोठें आहे?' या लेखात उत्तम रीतीने जहाल व मवाळ यांच्यातील फरक सांगितला होता. त्यांनी लिहिले होते, "इंग्रज सरकार कायदेशीर आहे, सनदशीर आहे आणि जात्याच स्वातंत्र्यप्रिय असून बलिष्ठही आहे. अशा सरकारपुढें आम्हीं क्षुद्र लोकांनीं उर्मटपणें वागून कांहीं उपयोग नाहीं. सिंह धिमा खरा. पण रागावला म्हणजे त्याची तब्येत सांभाळणें कठीण आहे, करितां त्यास कधीं चुचकारून तर कधीं गोंजारून घेऊनच आम्हीं कार्यभाग साधून घेतला पाहिजे. तब्येत गरम झाली कीं बाजूला व्हावें, प्रसन्न दिसली कीं पुढें व्हावें, गोंगाट करावयाचा तर झोंप मोडेल इतका करूं नये आणि ताडन करावयाचा प्रसंग आल्यास तें शब्दानें करावें असें या पक्षांचें मत असून त्यांची कृतीहि त्याच मासल्याची आहे. हिंदुस्थानांत नाहीं तर पार्लमेंटांत, पार्लमेंटांत नाहीं तर विलायतच्या लोकांपुढें कोटे ना कोठें तरी आपली दाद लागेल आणि नम्रपणाच्या उपायानेंच लागेल, अशा भरंवशावर या पक्षांतील पुढारी गेली पंचवीस-तीस वर्षें काम करीत आलेले आहेत. इंग्रज सरकारपासून त्यांना कांहीं हक्क पाहिजे आहेत. पण त्यांस सरकारनें जर दरडावून असें विचारिलें कीं, 'कां हो! तुम्ही हे हक्क आम्हांस अडवून घेणार काय? बघूं या कसें घेतां ते!' तर लागलीच हात जोडून ते असें सांगणार कीं, 'खाविंद! आमच्यासारख्या निर्बल प्राण्यांनीं अशी आशा धरणें व्यर्थ होय. आम्हांस हक्क पाहिजेत खरें, पण आम्ही ते आपल्याच तंत्रानें घेणार!"

नव्या पक्षाची भूमिका मांडताना टिळकांनी याच लेखात म्हटले होते, "भीक मागून राजकीय हक्क मिळत नसतात; कोणतेंहि सरकार झालें तरी तें स्वार्थसाधुच असतें; एक राष्ट्र दुसऱ्यावर राज्य करतें ते आपल्या फायद्याकरितां राज्य करतें, जिंकलेल्या लोकांच्या फायद्याकरितां नव्हें; राज्यकर्ते स्वजातीय असले तरी देखील ते आपल्या हातांतील अधिकार गोडीगुलाबीनें सोडीत नाहींत; त्यांच्या हातून तसें घडून येण्यास त्यांचें कोठेंतरी अडावें लागतें. 'न हि दुर्योधनो राज्यमधुरेण प्रदास्यति' प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिने ते स्वपराक्रमानें व स्वावलंबनानें मिळविले पाहिजेत. तुम्ही योग्य झाल्यावर आम्ही तुम्हांस सुखानें राज्य देऊन स्वदेशीं परत जाऊं असें कोणी म्हणत असल्यास तो अर्थवाद आहे, 'भूतार्थव्याहृति' नाहीं,

भूलथाप आहे, खरें नव्हे. यांस फसून जाऊं नये. उद्योग करावा – नेटानें करावा, होईल तितकें अडवावें, नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नाहीं. हा प्रश्न स्वार्थाचा आहे, धर्माचा किंवा औदार्याचा नाहीं. राजनीति आहे. धर्मनीति नव्हे. जिंकलेल्या लोकांस जेत्यांनीं आपखुषीनें स्वातंत्र्य दिल्याचें उदाहरण इतिहासांत नाहीं. जपानास जय मिळाल्याबरोबर रानटी होते ते सुधारलेले झाले. शहाणपण सत्तेंत आहे. दैन्यांत नाहीं. स्वातंत्र्य हेंच प्रत्येक राष्ट्राचें अंतिम साध्य आहे. ताकाकरितां भीक मागण्यास जावयाचें तर भांडे लपविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुम्हांस काय पाहिजे तें स्पष्ट सांगा, त्याकरितां इतर राष्ट्रांनीं प्रयत्न केले तसे उघड करा, भिऊं नका. 'भित्यापाठीं ब्रह्मराक्षस' हें ध्यानांत ठेवा, संकटें आलीं तरी डगमगू नका. संकटांखेरीज स्वातंत्र्य नाहीं आणि रात्रीखेरीज सकाळ नाहीं. तुम्हांस जर मिळवावयाचें असेल तर तें तुमच्या निश्चयानें, उद्योगानें अथवा धैर्यानें मिळेल."

सरकार बलिष्ठ असलें तर तें तुमच्या मदतीनें बलिष्ठ झालेलें आहे. तुमच्यांतील भेद हेंच सरकारचें कवच, तुमची दुर्बलता हें त्याचें बल, तुमचें स्वतःबद्दलचें अज्ञान हेंच त्याचें सामर्थ्य, तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेंच आहे. असें या नव्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाचें धोरण व वृत्ति असून, शरीरद्वारां किंवा द्रव्यद्वारां झीज सोसण्यास हा पक्ष तयार आहे. जुन्या पक्षाप्रमाणें केवळ सरकारच्या औदार्यावर भिस्त न ठेवतां प्रजेनें आपल्या हिंमतीवर अधिक भिस्त ठेवावी, त्यांत सरकारशीं विरोध उत्पन्न झाल्यास त्याचा दोष प्रजेकडे नाहीं, सरकारच्या अनुदारतेकडे आहे, असा हा पक्ष लोकांस सांगत आहे." (केसरी, २५ फेब्रुआरी १९०८, स. टि. खंड ४, पान ३६७-३६९.)

उदारमतवाद्यांवर भिस्त

याच वेळी त्यावेळच्या राजकारणात आणखी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित झाला तो म्हणजे इंग्लंडमध्ये लिबरल पक्षाचें मंत्रिमंडळ आलेले असल्यामुळे व लॉर्ड मोर्ले-सारखा तत्त्वज्ञानी भारतमंत्री असल्यामुळे कदाचित या हिंदी लोकांना न्याय मिळेल अशी फिरोझशहा मेथा, ना. गोपाळराव गोखले आदींना आशा वाटत होती. मोर्लेंना दुखवू नये असे त्यांना वाटत होते. पण मोर्ले कितीही उदार असले तरी हिंदुस्थानच्या प्रश्नाचा विचार साम्राज्यवादी दृष्टीने करणारे इंग्रज नोकरशहाच त्यांच्या भोवती असल्याने मोर्ले यांच्या औदार्याचा भारताला काही फायदा होणार नाही, असे टिळकांना वाटत होते. म्हणून गोखले हे मोर्ले यांच्यावर विसंबून राहतात, हीच त्यांची भूल आहे, असे टिळक सतत सांगत होते. टिळकांनी त्यावेळी हा आपला राजकीय अंदाज अनेक वेळा मांडला होता. त्यामागची त्यांची भूमिका सांगतांना टिळकांनी म्हटले होते, "कोणीहि मनुष्य, मग तो मोर्लेसारखा पंडित

असो किंवा हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्यांप्रमाणे अरेराव असो – आपल्या हातांतील अधिकार नाइलाज झाल्याखेरीज सोडण्यास तयार नसतो. तत्त्वज्ञान संपादन केलेली माणसें उदार मताचीं असलीं तरी शाब्दिक वेदांत्याप्रमाणें त्यांच्या आचरणांत हें तत्त्वज्ञान केवळ आत्मप्रेरणेनें उतरत नाहीं, तसें होण्यास बाह्य उपाधींची नेहमीं जरुरी असते, आणि राजकीय बाबतींत अशा उपाधी म्हटल्या म्हणजे लोकांचा असंतोष, आग्रह व अडविण्याचा निश्चय ह्याच होत. नव्या किंवा राष्ट्रीय पक्षाचा मार्ग धोक्याचा आहे, हें आम्हीं कबूल करतों. आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, देशाच्या हितासाठीं उद्योग करणाऱ्या लोकांपैकीं सर्वांनीं नाहीं तर बऱ्याच लोकांनीं तरी अशा प्रकारचा स्वावलंबनाचा व धोक्याचा मार्ग पत्करल्याखेरीज गत्यंतर नाहीं." (केसरी, ३ मार्च १९०८, स. टि. खंड ४, पान ३७३–७४.)

मार्गदर्शक सूत्रे

काँग्रेसमधील वृद्ध नेतृत्व किंवा गोखल्यांसारखे उदारमतवाद्यांवर विसंबणारे नवे नेते यांच्यांत व टिळकांमध्ये हा मूलभूत भेद होता. देशाच्या आकांक्षांना पीनल कोडाच्या मर्यादेत सदैव बसवितां येणार नाही. पण कायद्याच्या मर्यादेत राहून अत्युच्च ध्येये डोळ्यांसमोर ठेवून लोकांच्या हक्कप्राप्तीसाठी लोकांचा असंतोष, हक्कांसाठी आग्रह आणि सरकारशी अडवणूक करण्याचा निश्चय या तीन मार्गांनीं जास्तीतजास्त खटपट केली पाहिजे, ही टिळकांची मार्गदर्शक सूत्रे होती. या सूत्रांनुसार टिळक नव्या पक्षाचे धोरण आखीत होते व काँग्रेसवर प्रभाव पाडीत होते. हिंदुस्थानचे अंतिम ध्येय स्वराज्य आहे, हे काँग्रेसने मान्य केल्यानंतर ते प्राप्त करून घेण्यासाठी पुढची पावले टाकली पाहिजेत, हा कृतीचा आग्रह टिळक धरीत होते काय केले पाहिजे हे सांगण्याचे स्वातंत्र्य टिळक मागत होते. किंबहुना ते विचार मांडून आपला विचार–स्वातंत्र्याचा हक्क प्रस्थापित करीत होते. यासंबंधी टिळकांनी म्हटले होते, "हिंदुस्थानच्या भावी अभ्युदयाची अमुकच मर्यादा पाहिजे, असें ठरविण्याचा, व तो ठराव सर्वांनीं कबूल केला पाहिजे, असा आग्रह धरण्याचा, कोणीहि पुढारी कितीहि शहाणा असला तरी, त्यास अधिकार नाहीं. हा विचार-स्वातंत्र्याचा प्रश्न आहे आणि विचाराचा ओघ अशा रीतीनें जो कुंठित करूं पाहतो तो विचार–स्वातंत्र्याचा शत्रु समजला पाहिजे. ज्या राष्ट्रांत विचार–स्वातंत्र्य अबाधित राहात नाहीं तें राष्ट्र पूर्ण नाहीं तर अर्धवट तरी मेलेलेंच समजलें पाहिजे. सारांश, विचार–स्वातंत्र्य हा राष्ट्राचा आत्मा आहे आणि आत्म्याची उन्नति अमुक एका पायरीपर्यंत झाली पाहिजे असा आग्रह धरणें आत्मविघातक होय. एखाद्या व्यक्तीस किंवा पक्षास दुसऱ्या व्यक्तीची किंवा पक्षाची आकाशांत उंच उडण्याची उमेद

पसंत नसली किंवा अशक्य वाटत असली तरी सर्वांस ती तशीच वाटली पाहिजे, असा त्यानें आग्रह धरून फायदा नाहीं, व या आग्रहांकरितां आपआपसांत फूट पाडणें तर अगदींच अप्रशस्त होय. हिंदी राष्ट्राची बुद्धि पाश्चिमात्य शिक्षणानें, जपानसारख्या देशाच्या उदाहरणानें, आणि पूर्वेतिहासाच्या अभ्यासानें प्रज्वलित होऊन अधिकाधिक स्फुरण पावत चालली आहे. या स्फूर्तीची ज्वाला अमुक इयत्तेपर्यंत वाढली पाहिजे अशी मर्यादा घालणें म्हणजे प्रातःकाळीं उगविणाऱ्या सूर्यनारायणास तूं क्षितिजावरच नेहमीं राहा अशी प्रार्थना करण्यासारखे आहे. एकदा वाढीस लागलेल्या राष्ट्राची महत्त्वाकांक्षा कोणत्याहि उपायांनी खुंटून टाकणें अशक्य आहे."(केसरी, ३ मार्च १९०८, स. टि. खंड ४, पान ३७५–७६.)

टिळकांचा नवा पक्ष हा भारताच्या राष्ट्रीय आकांक्षेचे प्रतीक होत होता. साम्राज्यनिष्ठ राहून राष्ट्राच्या आकांक्षा साध्य होणार नाहीत, तर साम्राज्यात राहून, कायदेशीर लढाई करून लोकांना आपले हक्क मिळवावे लागतील, ही नव्या पक्षाची भूमिका होती. साम्राज्यनिष्ठ देशभक्तांना टिळकांची व त्यांच्या पक्षाची अडचण वाटू लागली होती ' त्यांच्यावरोबर राहिले तर इंग्रच सरकार रागावते. संशयाने पाहते. तेव्हा जहालांना काँग्रेसमध्ये राहून देऊ नये ', असे नेमस्तांना वाटू लागले होते. पण १९०५–१९०८ या काळात वगभंग, स्वदेशी-बहिष्काराची चळवळ व टिळकांचे साहसी लढाऊ नेतृत्व यामुळे जनतेची सहानुभूती नव्या पक्षाकडे होती. इंग्रज सरकार नेमस्तांना उत्तेजन देऊ पाहात होते. इंग्रजी पत्रें टिळकांविरुद्ध सतत लिहीत होती. राजद्रोहाचा, लोकमत चिथविण्याचा आरोप करीत होती. सारांश, एकटे टिळक साम्राज्यवादी नोकरशाही व साम्राज्यनिष्ठ काँग्रेस पुढारी यांच्याशी सामना देत होते. भारतात एका नव्या संघर्षाला सुरुवात झाली होती. १९०६ साली कलकत्ता काँग्रेसचे अधिवेशन झाल्यावर टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व सरकारची अडवणूक (निःशस्त्र प्रतिकार) या चार मुद्यांवर सतत भर देऊन लोकमत उठावणीचा प्रयत्न चालविला होता. त्या काळांत लाला लजपतराय व बिपिनचंद्र पाल यांचे सहकार्य टिळकांना मिळत होते. त्यामुळे देशातील नवे नेतृत्व लाल, बाल, पाल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या त्रयींकडे होते.

राष्ट्रीय पक्षाचा स्वावलंबनाचा मार्ग

टिळकांनी २ जानेवारी १९०७ रोजी झालेल्या कलकत्त्यातील सभेत राष्ट्रीय पक्षाची मार्गदर्शक सूत्रे सांगितली होती. टिळक म्हणाले होते, " अलीकडे आमच्या राजकारणांत दोन नवीन शब्द आले आहेत. ते म्हणजे राष्ट्रीय (जहाल) व नेमस्त (मवाळ). ह्या दोन शब्दांचा कालाशीं दृढ संबंध आल्यामुळे कालमानारूप ह्या शब्दांचे अर्थ फिरतात. जे लोक मागें 'जहाल' होते ते

आज 'मवाळ' झाले आहेत. त्याचप्रमाणें जे आज 'जहाल' आहेत ते उद्यां 'मवाळ' होतील. आज आपण 'जहाल' आहोंत, उद्यां आपली पुढील पिढी आपणां स्वतःस जहाल समजेल व आपणांस 'मवाळ' म्हणेल, म्हणून आपणांस सांप्रत चालू असलेल्या चळवळीचा नीट अभ्यास करून परिस्थितीस अनुरूप असा कार्यक्रम आंखला पाहिजे."

"सध्यां एक गोष्ट सर्वमान्य झालेली आहे, ती ही कीं, सध्यां चालू असलेली इंग्रज राज्यपद्धति आम्हांस मानवत नाहीं. परक्या सरकारनें आमच्या देशाचें वाटोळें केलें आहे ही गोष्ट सिद्ध आहे. लिबरल पक्ष अधिकारारूढ आहे व त्यापासून आमचा बराचसा फायदा होण्याचा संभव आहे. असें नेहमीं विरोधी पक्षाकडून सांगण्यांत येतें. पण तो पक्ष अधिकारावर कायम टिकणार आहे काय? कल्पना करा कीं लिबरल पक्ष उद्यां अधिकाराच्युत झाला, तर त्याचा उदय पुनश्च होईपर्यंत आपण थांबावयाचें कीं काय? ह्यूम ह्यांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'इंग्लंडमध्ये जे लोक लिबरल पक्षाभिमानी असतात तेच लोक हिंदुस्थानांत आल्यावर अनियंत्रित सत्तेचा निःशंकपणें अवलंब करतात.'

"स्वार्थपरायण अँग्लो–इंडियनांचें मुख म्हणजे भारतमंत्री. सर्व अँग्लोइंडियन म्हणजे सर्व नोकरशाही तुमच्या विरुद्ध असतांना भारतमंत्री त्या नोकरशाहीला बाजूला सारून तुम्हांला हक्क देईल काय? तशी त्याला सत्ता आहे काय? नोकरशाहीला अर्ज–विनंत्या करून आपलें सर्व कार्य होणार नाहीं ही गोष्ट आतां दोन्ही पक्षांस सारखीच मान्य झालेली आहे. मतभेद एवढाच कीं, ब्रिटिश राष्ट्रास विनंति करून आपण त्यांचें मन वळविलें पाहिजे अशी जुन्या पक्षाची समजूत आहे. पण नव्या पक्षाची तशी समजूत नाहीं. राष्ट्रीय पक्ष स्वावलंबनाचा नवीन मार्ग सुचवीत आहे. तो यापुढें स्वस्थ बसणार नाहीं."

"राष्ट्रीय पक्षास जें कांहीं करावयाचें आहे तें हें कीं तुमचें भवितव्य पूर्णपणें तुमच्या हातांत आहे याची जाणीव करून देणें. जर तुम्हांला स्वातंत्र्य संपादण्याची इच्छा असेल, तर तें तुम्हीं खात्रीनें मिळवाल. पण तशी इच्छा नसेल तर तुम्हांस कायमचें अवनत अवस्थेंत राहावें लागेल. तुमच्यापैकी पुष्कळांना हातांत शस्त्र धरण्याची इच्छा नसेल, तसा सशस्त्र प्रतिकार तुम्हीं राज्यकर्त्यास करूं शकत नसला तरी तुम्ही स्वार्थत्याग करून सरकारशीं सहकार्य करण्याचें नाकारू शकत नाहीं काय? याचेंच नांव बहिष्कार. 'बहिष्कार म्हणजे राजकीय शस्त्र' या वाक्यांत हाच अर्थ गर्भित आहे."

"सरकारनें तुमच्या मागणीस नकार दिला तर तुम्ही अशा रीतीनें लढण्यास तयार आहां काय? जर तयार असाल तर तुमच्या मागण्यांना कधींहि नकार मिळणार नाहीं हें पक्कें समजा, पण जर तयार नसाल तर तुमच्या मागण्यांस

अर्धचंद्र मिळेल; इतकेंच नाही तर, तुम्हांस कायमचा नकार मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं. आपणांजवळ हत्यारें नाहींत व जरुरीहि पण नाहीं. आपणांजवळ अतिशय तीक्ष्ण असें बहिष्काराचें राजकीय शस्त्र आहे. आपण हें पाहिलें आहे कीं, थोड्या इंग्लिश लोकांकडून हा सारा राज्यशकट हांकला जात आहे, तो केवळ आपल्या मदतीनेंच होय. आपण सर्व त्यांचे गुलाम आहोंत. सर्व कारभार आमच्या मदतीनें चालला आहे....मुख्य मुद्दा हा आहे कीं, आमचा कारभार आम्हीं केला पाहिजे. मला माझ्या घराची किल्ली पाहिजे आहे; स्वराज्य हें आमचें ध्येय आहे. आमच्या शासन-यंत्रणेवर आमची सत्ता हवी. आम्हांला कारकून म्हणून राहावयाचें नाहीं. सध्यां आम्ही कारकून आहोंत आणि परक्या सरकारच्या हातांतील बाहुलीं बनून आमच्यावर जुलूम करण्यास साधनीभूत होत आहोंत."

"शेतसारा वसूल करण्यास व शांतता कायम ठेवण्यास आम्हीं त्यांना मदत करणार नाहीं. न्यायदानांत त्यांना आम्ही मदत करणार नाहीं. हिंदुस्थानच्या सरहद्दीबाहेर लढण्यास आम्ही जाणार नाहीं. आणि त्यासाठीं आम्ही आमचें रक्त व द्रव्य सांडणार नाहीं. आम्हांला आमचीं कोर्टें पाहिजेत. वेळ येईल तेव्हां आम्ही करहि देणार नाहीं. या सर्व गोष्टी तुम्ही संघशक्तीनें घडवून आणाल काय? जर घडवून आणाल, तर तुम्हांला उद्यां स्वातंत्र्य मिळेल. कांहीं लोकांनीं राज्यकर्त्यांपाशीं संबंध भाकरीऐवजीं अर्धी भाकरी मागितली आहे. मी म्हणतो, आम्हांला संबंध भाकरी पाहिजे, व ती याच क्षणीं मिळाली पाहिजे. ती आज जरी मिळाली नाहीं, तरी ती मिळविण्यासाठीं आम्हांला धीर नाहीं असें मात्र समजू नका, भाकरीचा जो कांहीं अर्धामुर्धा तुकडा सरकार देईल, तो मी घेईन. व नंतर उरलेला भाग मिळविण्याचा प्रयत्न करीन. आमचे विचार व आमची कृति यांची दिशा अशी आहे...."(स. टि. खंड ६, पान ४४३–४४–४६-४७.)

सामान्य लोकांचें राज्य हवे

याच तऱ्हेने प्रतिकाराची सिद्धता ठेवा असे टिळक लोकांना समजावून सांगत होते. टिळकांची १९०६--१९०७ या वर्षातील सर्व भाषणे याच आशयाची होती. १९०६ साली बेळगाव व शहापूर येथे टिळकांची तीन व्याख्याने झाली ती देशाच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करणारी व त्यातून पुढचा मार्ग सुचविणारी होती. टिळक म्हणाले होते, "आमचे सरकारी नोकर हे बैल होत. त्यांची वेसण सरकारच्याच हातीं असते... राज्यव्यवस्थेतील एकंदर खातीं आमच्या लोकांच्या हातांनी चालतात. अंगभर काम केल्यानंतर पोटभर भाकरी मागण्याचा सर्वांना हक्क आहे. पोटभर अन्न घाल तर नोकरी करीन, असें आमच्या लोकांनीं का म्हणूं नये? बारा तास काम करून ज्या राज्यांत पोट भरत नाहीं त्या राज्यांत अव्यवस्था व

अन्याय असला पाहिजे, हें उघड आहे. सर्वांचें पोट भरेल अशा प्रकारची राज्य-व्यवस्था कोणती हें कुणब्या-माळ्यांना समजून देण्याचा अवश्य प्रयत्न केला पाहिजे. शेवटी मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, आमची स्थिति असाध्य नाहीं. कारण आमचा देशच अत्यंत सुपीक आहे, तसा तो नसता तर कधींच रसातळाला गेला असता. या भूमीस पूर्वी सुवर्णभूमि असें नांव होतें. आतां सुवर्ण गेलें आहे, व भूमि तेवढी राहिली आहे.... आमची दुस्थिती एकोप्यानें वागल्यानें नाहींशी होणार आहे. " (स. टि. खंड ६, पान ६५२-५३.)

संपाचा मार्ग

सरकारची अडवणूक करण्याचा मार्ग हाच राजकीय हक्क किंवा स्वराज्यशकट मिळविण्याचा मार्ग आहे, असे टिळक उघडपणे सांगू लागले होते.

" पंचवीस वर्षांपूर्वी आमच्या पुढाऱ्यांचें लोकजागृति करणें हें एकच काम होतें. पण आतां पूर्वीचे मार्ग स्वीकारून अस्वस्थ झालेल्या लोकांच्या मनोवृत्तीस व्यवस्थित स्वरूप देणें हें एक आणखी पुढाऱ्यांचें कर्तव्य वाढलें आहे. हल्लीच्या स्थितींत हक्क मिळविण्याचे नवे मार्ग कोणी सांगत नाहीं, म्हणून कित्येकांची कुरकूर आहे. पण ही कुरकूर करण्यांत अर्थ नाहीं. संपासारखे सरकारला अडवून काम करून घेण्याचे मार्ग आहेत, पण या मार्गांचे जर व्यवस्थित रीतीनें अवलंबन करण्याचें जर आमच्या हातून होत नाहीं, तर विनाकारण दुसऱ्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे? हल्लींच्या काळीं परराष्ट्रातील लोकांच्या हक्क-संरक्षणाच्या हालचाली पाहा. सुधारलेल्या राष्ट्रांतील घडामोडींचा इतिहास वाचा आणि मग तरी मार्ग नाहींत असें म्हणा. तुमची उन्नति करून घेणें तुमच्याच हातांत आहे. तुम्हीं उद्योग केलात तर यशस्वी खचित व्हाल, मात्र डोळे उघडा, एवढेच माझें सांगणें आहे." (पुण्यातील भाषण, ३१ ऑगस्ट १९०६, स. टि. खंड ६, पान ४१४-४१५)

९

स्वराज्याचा मंत्रजागर

"सर्वांना सुख व्हावें, लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणें व्यवहार करतां यावा यासाठींच ही स्वराज्याची चळवळ चालू आहे. तुम्ही खेडेगांवचे लोक आहांत तेव्हां तुम्हांला कदाचित वरचे कायदे माहीत नसतील; पण इतर साऱ्या गोष्टी तुम्हांला कळतात. आज आम्हीं सरकारजवळ स्वराज्य मागितलें म्हणजे ते तुम्हांस उलट विचारतात कीं खेडेगांवचे लोक स्वराज्य कोठें मागतात? याकरितां तुम्हांला सरकारजवळ 'स्वराज्य पाहिजे' असा हट्ट धरून बसलें पाहिजे. जो ओरड करीत नाहीं, तो संतुष्ट, असा या राज्याचा सिद्धांत आहे तुम्हांला ज्या गोष्टी जांचत असतील त्यांची ओरड केल्याशिवाय या काळीं दाद लागणें शक्य नाहीं." (विदर्भातील वरणगांव येथील भाषण, २३ फेब्रुआरी १९१८, स. टि. खंड ६, पान ६०१.)

स्वराज्याच्या ध्येयाचा प्रसार करण्यासाठीं टिळकांनी जो १९१६ नंतर तुफानी दौरा केला होता, त्यावेळचे वरणगाव स्टेशनवर जमलेल्या शेतकऱ्यांच्या सभेतील टिळकांचे हे भाषण आहे. याच सभेत टिळक म्हणाले होते, "कोणीं विचारलें कीं, 'तुला स्वराज्य पाहिजे कां?' तर स्वच्छ सांगा कीं, 'होय, मला स्वराज्य पाहिजे.' स्वराज्य म्हणजे काय? तर साहेब जसा आपल्या देशांत राहातो तसें आम्हांस आमच्या देशांत राहाता आलें कीं स्वराज्य झालें. एकी करा, निश्चय करा व स्वराज्य पाहिजे असें परमेश्वराला साक्षी ठेवून म्हणावयास तयार व्हा." (पान ६०२) अडाणी समजल्या जाणाऱ्या हिंदुस्थानच्या ग्रामीण जनतेशी टिळकांचा संवाद १८९६ पासून सुरू होता. त्याची सुरुवात महाराष्ट्रात १८९६ पडलेल्या भीषण दुष्काळाचे वेळी

झाली. त्यावेळी नोकरशाहीकडून सरकारी कायद्यात असलेल्या सवलती मागावयाच्या होत्या. १९१६ पासून नोकरशाहीला बाजूला सारून 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' असे इंग्रज सरकारला बजावून स्वराज्याचे हक्क पदरात पाडून घेण्यासाठी लोकसंघर्ष करावयाचा होता. टिळकांच्या राजकीय प्रवासाचा, राजकीय विचारांचा हा अंतिम टप्पा होता. स्वराज्याचा हा ध्यास निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या शब्दांत व्यक्त झाला. आर्जवी भाषणापासून आव्हानापर्यंत सर्व अवस्था या लढ्यात दिसल्या.

दादाभाईंचा पहिला उच्चार

'स्वराज्य' या संकल्पनेचा काँग्रेसच्या राजकीय व्यासपीठावरून पहिला उच्चार महर्षी दादाभाई नौरोजींनी १९०६ साली कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनातच केला. काँग्रेसने स्वराज्याचे ध्येय आपल्यापुढे ठेवावे, असा त्यांनी संदेश दिला होता. त्याबाबत टिळक म्हणाले होते,

"१९०६ मध्यें परमपूज्य दादाभाई यांनीं ५० वर्षांच्या अनुभवानें असें सांगितलें कीं, किरकोळ मागण्यांनीं फायदा व्हावयाचा नाहीं व फुटकळ मागण्याही उपयोगाच्या नाहींत. आपणांला आतां जें पाहिजे तें स्वराज्य होय. 'स्वराज्य' हाच शब्द त्यांनी वापरला होता. स्वराज्याची ही कल्पना त्यांनीं नवीन सांगितली नाहीं. कल्पना पुष्कळांच्या डोक्यांत असते. पण ती अनुभवानें, अनेक प्रकारच्या माहितीनें व निधड्या छातीनें राष्ट्रापुढें ठेवणारे लोक नसतात. या दृष्टीनें पाहिले असतां परमपूज्य दादाभाईंचें १९०६ मधील भाषण कॉंग्रेसच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाचें भाषण होय. ५० वर्षांच्या आपल्या राजकीय बाबतींत घडलेल्या अनुभवानें राष्ट्रापुढें कायदेशीर स्वराज्याचे ध्येय मांडण्याचें श्रेय दादाभाईंना आहे." (अकोला येथील भाषण, ११ जानेवारी १९१७, स. टि. खंड ६, पान ५१२.)

स्वराज्य-मागणीचा मागोवा

"हे स्वराज्य प्रथम १९०६ सालीं दादाभाईंनी कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेत मागितले. तोपर्यंत या भिंतीवर बुक्क्या मार, त्या खिडकीला धक्का दे, असें चाललें होतें. मुख्य दरवाजा उघडण्याचा मार्ग दादाभाईंनीं दाखवून दिला. मुख्य दरवाजा उघडला म्हणजे साऱ्या खिडक्या आपोआप उघडतां येतील, असें त्यांनींच प्रथम जाहीर केलें ...आम्ही स्वराज्य मागतों म्हणजे बादशहांची सत्ता काढतों, अशांतला मुळींच भाग नाहीं. तसें आमच्या मनांतहि नाहीं. वर बादशहा आहेत तसेंच राहू द्या, फक्त कायदे करण्याचे अधिकार आम्हांस द्या व जे हल्लीं नोकर आहेत ते नोकर या नात्यानें राहू द्या, एवढीच आमची स्वराज्याची मागणी आहे. हे नोकर स्वतःला तोंडानें

नोकरच म्हणवतात. 'सिव्हिल सर्व्हेंट' असें त्यांचें नांव आहे, पण ते वागतात मात्र मालकासारखे! हें आम्हाला नको आहे, आमचे चार प्रतिनिधी कौन्सिलांत बसतील व जो कायदा करतील तो या नोकरांनीं मानला पाहिजे. त्यांनीं तो नाहीं मानला तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार आम्हांला पाहिजे...हा अधिकार म्हणजे स्वराज्य. हें स्वराज्य मागण्याचें कॉंग्रेसनें ठरविलें, पण त्या वेळीं दादाभाईंनी तें मोघम शब्दांतच मांडलें होतें. दोन वर्षांपूर्वी तो मोघमपणाहि गेला असून, कॉंग्रेसनें आपली मागणी स्पष्ट शब्दांत मांडली आहे." (स. टि. खंड ६, पान ५८९-५९०.)

लोकमताची उठावणी

टिळकांनी स्वराज्य-संकल्पनेच्या प्रचार-मोहिमेत असंख्य भाषणे केली. लेख लिहिले. त्या सर्वांतून त्यांनी वेगवेगळ्या वेळी परिस्थितीनुसार स्वराज्याविषयीच्या आपल्या कल्पना मांडल्या, लोकमताची उठावणी करण्यासाठी भावनात्मक आवाहन केले. लोकांना कृतीचा संदेश दिला. स्वराज्याची घटना कशी असावी, स्वरूप कसे असावे, याविषयी आपल्या कल्पना त्यांनी होमरूल लीगच्या प्रचाराच्या वेळी मांडल्या होत्या. त्या सर्व भाषणांचा संकलनात्मक सारांश, येथे दिला आहे. प्रचार म्हणजे पुनरुक्ती आलीच. त्यामुळे ती शक्यतो टाळून हे संकलन केले आहे.

टिळकांनी मांडलेल्या विचारात स्वराज्य-संकल्पनेची भारतीय परंपरा, आधुनिक भारताच्या राष्ट्रीय चळवळीतील उगम व विकासक्रम यांची माहिती आहे. स्वराज्याचा तत्त्वविचार आहे. स्वराज्य-विरोधक कोण व सहाय्यकर्ते कोण याची चर्चा आहे. स्वराज्यप्राप्तीचा मार्ग कोणता, त्यासाठी लोकांनी काय केले पाहिजे, त्या मार्गातील अडचणी कोणत्या याचाही निर्देश आहे. लोकांनी स्वराज्याच्या प्राप्तीसाठी कोणती तयारी केली पाहिजे, त्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत व स्वराज्यासाठी भावनेचे बळ कसे हवे आहे याबद्दल स्फूर्तिदायक भाषणे टिळकांनी केली होती. सरकारी नोकरशाहीला आपला निर्धार कळावा म्हणून टिळकांनी कडक भाषेत इशारे दिले होते. स्वराज्याची अंतर्व्यवस्था व त्याचे प्रश्न यांचीही चर्चा केली होती. या सर्व मुद्यांचा समावेश या संकलनात केलेला आहे.

स्वराज्याची भारतीय परंपरा

"हें स्वराज्यतत्त्व मनुष्याच्या जन्मापासून चालत आलेलें आहे. होमरूल हा शब्द नवीन असेल, पण त्यांतील कल्पना फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कदाचित् निवडणुकीचें स्वरूप नवीन असलें तरी गांवची व्यवस्था पिढीजाद घराण्याकडेच असे. आमचा कायदा म्हणजे मनुस्मृति. ही मनुस्मृति राजानें केलेली नाहीं. उत्कृष्ट पुरुष, साधु व नेते यांच्या सल्ल्यानें कायदे बनत व बदलत. स्वराज्य, वैराज्य

हे शब्द वेदांत आहेत, व त्यांतील कल्पना थोडी निराळी असली तरी ती जुनी आहे. हिंदुस्थानांत अनेक बादशहा झाले असतील पण त्यांनीं ग्रामसंस्था बंद न करतां त्यांना उलट उत्तेजन दिलें. व्यापारविषयक तंटे गावानें तोडावे असा मनुस्मृतींत कायदा आहे. शकुंतलेचा दुष्यंतानें अव्हेर केला, पण निर्णय पचांनी दिला. 'व्यवहरन् नृपः पश्येद् विद्वद्भिः ब्राह्मणैःसह' अशी कायद्याची राजाला स्पष्ट आज्ञा आहे.... स्वराज्य-तत्त्व फार प्राचीन आहे, ही गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध झालेली आहे." (स. टि. खंड ६, पान ५०६-५०७.)

इंग्रजी राज्यपद्धतीचे स्वरूप

"हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा आहे हें आपल्याला माहीत आहे. तो एका विशिष्ट कायद्याप्रमाणें होत असतो. त्याचे नियम ठरलेले आहेत. स्टेट सेक्रेटरीचे अधिकार काय, गव्हर्नरजनरलचे अधिकार काय, त्यांत पद्धतीचे तीन मोठे भाग आहेत. विलायतेत स्टेट सेक्रेटरी साहेब आहेत, हिंदुस्थानांत दिल्लीला गव्हर्नर जनरल आहे, याखालीं इलाख्यापर्यंत एक गव्हर्नर आहे...स्टेट सेक्रेटरी नेमते कोण? आम्ही नाहीं. ही रचना जी रचना जी केली आहे ती कंपनी-सरकारच्या धोरणावर केली आहे. ईस्ट इंडिया कंपनीकडे जेव्हां या देशाचें राज्य होतें तेव्हां व्यापारी तत्त्वावर सर्व व्यवहार चालला होता. कंपनीच्या भागीदारांना पुष्कळसा नफा कसा मिळेल इकडे सगळें लक्ष असे. आणि कंपनीचे जे डायरेक्टर होते ते हल्लींच्या स्टेट सेक्रेटरीच्या जागीं होते. सगळें राज्य चालविण्याचा हा एक मक्ता दिलेला होता म्हणाना....हिंदुस्थानचा राज्यकारभार हा एक त्यांचा व्यापार होता. त्यांतून जितका फायदा मिळेल तितका घ्यावा. कंपनीचे डायरेक्टर विलायतेंत असायचे...इकडे गव्हर्नरजनरलला त्यांचें पत्र यायचें कीं, आम्हाला यंदाच्या सालीं इतका नफा दिलाच पाहिजे. तसा तो उत्पन्न करून आमच्याकडे पाठवा. ही राज्यव्यवस्था. लोकांचें त्याच्यामध्यें हित नाही...पुढें पार्लमेंटनें हा राज्यकारभार आपल्या ताब्यांत घेतला. १८५८ साली जाहीरनामा काढला. तरी त्या जाहीरनाम्याच्या धोरणावर मात्र राज्यधोरण नाही. राज्यधोरण व्यापारी कंपनीच्या धोरणावर. खुद्द राणी सरकारनें ज्या अर्थी आपल्या हातांत राज्याचीं सूत्रें घेतलीं आहेत त्या अर्थी राजा व प्रजा ह्यांच्या प्रकारें राज्याची व्यवस्था प्रजेच्या हिताची असावी. लोकांनीं ह्या तक्रारी पुष्कळ वर्षें चालविल्या. ह्यांत काय उणिवा आहेत हे दाखविणारे आमच्यांत जे पुरुष हयात आहेत, त्यांपैकीं दादाभाई नौरोजी होत." (स. टि. खंड ६, पान ४६०-४६१.)

स्वराज्याचा तत्त्वविचार : लोकप्रतिनिधित्व

वर वर्णन केलेली ब्रिटिश राज्यव्यवस्था बदलून त्याऐवजी ब्रिटिश अंमलाखालीच पण लोकप्रतिनिधींचा नोकरशाहीवर दाब असलेली राज्यव्यवस्था काँग्रेसला हवी होती.

त्याचे स्पष्टीकरण टिळकांनी अनेकदा केले होते. आपली कल्पना स्पष्ट करताना ते म्हणत, "हिंदुस्थानांतील लोकांनीं सरकारकडून कोणते हक्क मागावयाचे किंवा या देशांतील राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची असावी म्हणून आग्रह धरावयाचा, हा स्वतंत्र व विशेष महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानांत धंदेशिक्षणाच्या शाळा काढा, कायदेकौन्सिलांत आमचे जास्त प्रतिनिधी घेऊन त्यांस आणखी थोडे हक्क द्या, अथवा वरिष्ठ प्रतीच्या जास्त जागा नेटिव्हांस द्या, असें म्हटल्यानें काम भागत नाहीं. या वरवरच्या गोष्टी आहेत; आणि ज्याप्रमाणें रोग्याच्या वेदना कमी केल्यानें रोग समूळ नाहींसा होत नाहीं, त्याप्रमाणें हिंदुस्थानास लागलेल्या व्याधीचे केवळ वरवर दिसणारे परिणाम दूर केल्यानें हिंदी प्रजेस कधींहि खरें व शाश्वत समाधान वाटावयाचें नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेबद्दल जेव्हां जेव्हां विचार करण्याचा आणि बोलण्याचा प्रसंग येतो तेव्हां वर सांगितलेल्या बाह्योपाधींकडे लक्ष न देतां प्रत्येकानें मुळाशीं हात घातला पाहिजे. हिंदुस्थानवर सध्या असलेलें इंग्रजी राज्य हें शांततेकरितां जरी अभूतपूर्व असलें तरी तें परकीय आहे, इतकेंच नव्हे तर, सहा हजार कोसांवरून मूठभर परकीय लोक येथें येऊन येथील लोकांवर फारसा विश्वास न ठेवतां त्यांनीं मुख्यत्वेंकरून आपल्या हितांकरितां तें चालविलें आहे, हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे." (केसरी, ८ ऑगस्ट १९०५, स. टि. खंड ४, पान ५०.)

लोकमताचा दाब

ब्रिटिशांनी सुरू केलेल्या राज्यपद्धतीत लोकमताची उपेक्षा कशी होते हे सांगून स्वराज्याच्या मागणीचा अर्थ विशद करताना टिळक म्हणाले होते, "गेल्या शंभर वर्षांत जी नवीन राज्यपद्धति अमलांत आली आहे त्या राज्यपद्धतींत लोकमतांस मुळींच वाव राहिला नाहीं. एक अधिकारी व त्याच्या हुकमतीनें चालणारे नोकरमंडळ व त्यांनीं चालविलेली राज्यव्यवस्था अशी ही पद्धत आहे. पूर्वी ग्रामपंचायती होत्या, प्रत्येक गांव थोड्याबहुत प्रमाणानें स्वावलंबी होतें. वसूल, न्यायमनसुबा वगैरे गोष्टी सुद्धा थोड्याबहुत प्रमाणानें लोकांच्या हातीं होत्या. यामुळें आपल्या लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा व कर्तबगारीचा पूर्ण विकास होण्यास पूर्वीच्या पद्धतींत बराचसा अवकाश मिळत होता. हल्लींची राज्यव्यवस्था पोस्ट, टेलिग्राफ, आगगाड्या, शांतता व एकराष्ट्रीयत्व या दृष्टीनें फार हितावह झाली यांत शंका नाहीं. तथापि लोकसत्तेचा दाब नसल्याकारणानें लोकांस राज्यकारभारांतील आपल्या शक्ति वाढविण्याचा मार्ग राहिला नाहीं, म्हणून हल्लीच्या राज्यपद्धतींत ब्रिटिश अमलाखालींच ब्रिटिश राज्यव्यवस्थेंत आपल्या लोकांना अधिकाधिक अधिकार मिळावे. लोकप्रतिनिधींचा दाब सरकारी अधिकाऱ्यांवर असावा, अशी मागणी आपली राष्ट्रीय सभा सरकारपाशीं करीत आहे. ही मागणी म्हणजेच स्वराज्याची मागणी होय." (स. टि. खंड ६, पान ५२७.)

लोकमताचा आग्रह का ?

'स्वराज्य म्हणजे इंग्रजनिरपेक्ष स्वराज्य नसून राज्याची अंतर्व्यवस्था लोकांच्या तंत्रानें चालावी,' हे टिळकांनी स्पष्ट केले होते पण लोकमताची कदर इंग्रज सरकारने का केली पाहिजे, याचेही स्पष्टीकरण टिळक करीत असत. त्यांचे म्हणणे असे की, "लोकांचें खरें सौख्य कोणत्या प्रकारच्या राज्यव्यवस्थेंत आहे असा प्रश्न निघाल्यास, इतिहास किंवा दूरदर्शी शहाणपण यांचें त्यांस एकच उत्तर आहे. तें हें कीं, लोकांच्या सल्ल्यानें जी राज्यव्यवस्था चालते तीच त्यांस हितावह व प्रिय असते. अल्पवयी मुलगा वयांत येईपर्यंत त्याजवर दुसऱ्याचा दाब असणें व्यक्तिदृष्ट्या आणि समाजदृष्ट्या आवश्यक आहे; पण तोच मुलगा वयांत आल्यावर अशा प्रकारचा दाब त्याला दुःसह होतो. इतकेंच नव्हे तर स्वतंत्रतेनें आपला व्यवहार पहाण्याची त्यास केव्हांच संधि न मिळाल्यास त्याची स्वतःची उमेद खचून जाऊन, अशा प्रकारचे लोक समाजांत वाढल्यानें पुढील पिढीचेंहि अखेर नुकसान होण्याचा संभव असतो.. आमच्या मतें हाच न्याय राष्ट्रासहि बऱ्याच अंशीं लागू पडतो. राष्ट्राच्या अजाणपणाची मर्यादा कायद्यानें ठरलेली नसते व ठरविणें शक्यहि नाहीं हें खरें. पण त्यामुळें त्याला मर्यादा नाहीं असें मात्र म्हणता येत नाहीं, प्रजा सुजाण झाली असतां राजाचा अधिकार मर्यादित असावा लागतो, ही गोष्ट राजकीय नीतिशास्त्राच्या इतिहासावरून आता सर्वत्रांस ग्राह्य झालेली आहे; आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाबरोबरच पाश्चिमात्य राजकीय विचारांचाहि आमच्या देशांत ज्या सरकारनें प्रसार केला त्या सरकारच्या लक्षांत ती आली नसेल असें नाहीं. 'हिंदुस्थान देश आजपर्यंत आमचा राजनिष्ठ नोकर होता,' पण त्याला आता 'राजनिष्ठ मित्र' या नात्यानें वागविलें पाहिजे, असे लॉर्ड हार्डिंज यांनीं नुकतेच जे उद्‌गार काढले त्यांतील बीज हेंच होय." (केसरी, ३० नोव्हेंबर १९१५, स. टि. खंड ४, पान ६५-६६.)

स्वराज्याची विरोधक नोकरशाही

स्वराज्याचा हा अर्थ ब्रिटिश सरकारने मानला तर नोकरशाहीचे वर्चस्व कमी करणे हे ओघानेच आले. हीच मागणी टिळक करीत व नोकरशाही स्वराज्याच्या आड कशी येत आहे, हेही सांगत. टिळकांनी अनेक भाषणांत व लेखात नोकरशाहीविषयी कडक टीका केली होती.

दि. १८ जुलै १९१६ रोजी स्वराज्य संघासंबंधी केसरीत लिहिलेल्या लेखात टिळकांनी विस्तृत रीतीने नोकरशाहीसंबंधी आपली भूमिका मांडली होती. त्यांनी म्हटले होते, "मनुष्य कसाहि असो, अधिकारासनाचा गुणच असा आहे की, त्यावर आरूढ झालेल्या लोकांस स्वतःची सत्ता अबाधित असावी अशी बुद्धि उत्पन्न होत असते. हा गुण किंवा अवगुण अधिकाराचा आहे, माणसाचा नव्हे; आणि याचें

नियमन होण्याकरितांच सुधारलेल्या राष्ट्रांतून अधिकारीवर्गाला लोकांस जबाबदार धरण्यांत येत असतें. आमच्याकडे अधिकारीवर्गावर अशा प्रकारचा दाब आमच्या राज्यव्यवस्थेप्रमाणें ठेवलेला नाहीं. तथापि सरकारी न्यायखात्यास कायद्यानें जी मोकळीक ठेवलेली आहे त्या मोकळिकीप्रमाणें देशांतील अधिकारीवर्गाच्या वर्तनाचें स्वतंत्ररीत्या परीक्षण करून व तें कायदेशीर आहे कीं गैरकायदेशीर आहे हें ठरवून, गैरकायदेशीर असल्यास त्याबाबतींत अधिकारीवर्गापासून प्रजेचें संरक्षण आमच्याकडील न्यायाधीशांस करतां येतें. अधिकारीवर्गाच्या वर्तनावर टीका करण्याचा न्यायाधीशांस जो हा अधिकार आहे तो राज्यव्यवस्था सुरळीतपणें चालण्यास आणि ती प्रजेस संतोषजनक होण्यास फारच उपयुक्त आणि महत्त्वाचा आहे. अधिकारीवर्गाच्या हक्काप्रमाणें न्यायाधीशाचा हा हक्कहि मूळ सरकारपासूनच त्यास प्राप्त झालेला असतो. पण अधिकारीवर्ग आणि न्यायाधीश यांच्यामध्यें या हक्काची जी विभागणी झालेली आहे व ज्या विभागणीमुळें अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनापासून प्रजेचें संरक्षण होतें ती हक्काची विभागणी राज्यघटनादृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे. राज्यघटनेंतील हें तत्त्व कसोटीस लावण्याचे प्रसंग फारसे येत नाहीत हें खरें, पण जेव्हां येतात तेव्हां या तत्त्वाची योग्य अंमलबजावणी होऊन प्रजेस दाद मिळणें राजकीयदृष्ट्या अत्यंत आवश्यक आहे." (केसरी, १८ जुलै १९१६, स. टि. खंड ४, पान ९७.)

स्वराज्याची मागणी कायदेशीर

१९१६ साली टिळकांवर स्वराज्यविषयक आक्षेपार्ह भाषणे केल्याच्या आरोपावरून मुंबई सरकारने खटला भरला होता. मुंबई हायकोर्टाने त्यांना निर्दोष ठरविले तेव्हा टिळकांनी स्वराज्याच्या चळवळीच्या दृष्टिकोणातून 'टिळक सुटले, पुढे काय?' हा अग्रलेख लिहिला होता. त्यात नोकरशाहीवर न्यायमूर्तींनी जे ताशेरे झाडले होते व जो निर्णय दिला होता त्याचा कायद्याच्या दृष्टीने निष्कर्ष कोणता आहे व लोकांनी आता काय केले पाहिजे, हे स्पष्ट करून सांगितले होते. टिळकांनी म्हटले होते, "स्वराज्याची मागणी कायदेशीर ठरली असून ती मागणी केली तर तो राजद्रोह होत नाहीं, असा न्यायालयाचा निकाल सांगतो. म्हणून नोकरशाहीची स्वराज्यांतील अडचण आतां दूर झाली आहे तेव्हां लोकांनी नेटानें कामाला लागावें." टिळकांनी पुढे सांगितले होते, "टिळकांनी उपदेशिलेली स्वराज्याची चळवळ कायदेशीर आहे हें लक्षात घेतां टिळकांची भाषणें व त्यांतील अधिकारीवर्गावरील टीका निर्भीड, कडक, झोंबणारी किंवा अप्रिय असली तरी ती राजद्रोही नाहीं. अप्रीति म्हणजे प्रीतीचा अभाव नव्हे, असें उभयतां न्यायमूर्तींनी स्पष्ट ठरविलें आहे. अधिकारीवर्ग राजसत्तेचा प्रतिनिधि असला तरी, प्रतिनिधीवर कडक टीका केल्यानें कधींच राजद्रोह व्हावयाचा नाहीं,

असें ते म्हणत नाहींत हें खरें. पण हल्लींच्या राजपद्धतींत कायदेशीर रीतीनें सुधारणा करण्याच्या दृष्टीनें राजसत्तेचा प्रतिनिधी जो अधिकारीवर्ग त्याच्या रचनेवर अथवा त्यांच्या कृत्यांवर टीका करून त्यांतील दोषांचें कडक रीतीनें कां होईना पण पूर्ण आविष्करण करणें हें कांहीं राजद्रोहाचें लक्षण नव्हें असें उभयतां न्यायमूर्तींनीं साफ साफ ठरविलें आहे. सरकारी अधिकारीवर्गास हा ठराव पसंत पडणार नाहीं, हें आम्ही जाणून आहों. आपल्या वर्तनावर, आपल्या कामावर, आपल्या शहाणपणावर, आपला अधिकार चालविण्याच्या रीतीवर किंवा आपली ज्या पद्धतीनें नेमणूक होते त्या पद्धतीवर, त्यांत सुधारणा करण्यासाठीं म्हणूनहि जरी कोणीं टीका केली तरी त्यांतील सार ग्रहण करून लोकहितार्थ तिचें अभिनंदन करणारे अधिकारी प्रायः आढळत नाहींत, आणि एखादा आढळलाच तर 'स वै मुक्तो ऽथवा पशुः' हा न्याय त्यास लागू करावा लागेल. अधिकारीवर्गास यासाठीं आम्ही दोष देत नाहीं. कारण मनुष्यस्वभावच तसा आहे. तथापि म्हणजे दोष न दिला तरीहि, प्रजाहित-दृष्टीनें व प्रजेच्या उन्नतीकडे लक्ष देऊन अधिकारीवर्गानें अशा प्रकारची आपल्या वर्तनावरील टीका ऐकण्यास आणि त्यांत दर्शविलेले दोष यथार्थ असल्यास ते काढून टाकण्याच्या कामीं प्रजापक्षास मदत करण्यास शांतपणानें, दूरदर्शीपणानें आणि निष्कामबुद्धीनें तयार झाले पाहिजे अशी लॉर्ड हार्डिंजसाहेबांप्रमाणें आमचीहि त्यास नम्र विनंति आहे. ज्यांवर आपण अधिकार चालवितों त्यांस शहाणे करून अखेर सदर अधिकार त्यांच्या हातून चालविणें हेंच अधिकारीवर्गाचें उच्च ध्येय असलें पाहिजे, आणि तत्सिद्ध्यर्थ स्वतःचे अधिकार सोडण्यासाठीं जो स्वार्थत्याग करावा लागणार, तो करण्यास वेळेवर नजर देऊन तयार असणें यांतच त्यांचें खरें शहाण-पण आहे. लोकांच्या टीकेनें चिडून जाऊन आपलाच अधिकार दृढ व चिरस्थायी करण्याच्या प्रयत्नास लागणें हें खऱ्या मुत्सद्दीपणाचें लक्षण नव्हे."

"स्वराज्याचा रुपया बद्द नाहीं, तो खणखणीत वाजतो हें टिळकांच्या खटल्यानें सर्वांच्या निदर्शनास आलें आहे, आणि आम्हांला सरकार या मार्गांत अडथळा करील अशा प्रकारची भीति उरलेली नाहीं, किंबहुना यापुढें कोणी अशी सबब आणील, तर ती नामर्दपणाची गणली जाईल. तुमच्या मार्गांत जो कांहीं अडथळा होता असें तुम्हांस वाटत होतें तो देशांतील वरिष्ठ न्यायाधीश कोर्टानें निःपक्षपाती बुद्धीनें काढून टाकला आहे. पण यामुळें स्वराज्यासाठीं खटपट करण्याची तुमच्या-वरची जबाबदारी अधिक वाढली आहे, हें पूर्णपणें ओळखण्यास विसरूं नका. आळशी रहाण्यास, हात जोडून स्वस्थ बसण्यास किंवा भित्रेपणानें खोलींत दडून राहण्यास आतांपर्यंत कांहींतरी सबब होती. ही सबब महत्त्वाची होती कीं नाहीं याचा तूर्त आम्ही विचार करीत नाहीं. पण आतां ती सबब गेली, नाहींशी झाली, ही गोष्ट खरी आहे, आणि अद्यापहि जर तुम्ही आपल्या उद्योगांत, चळवळींत, खटपटींत कांहीं कुचराई

कराल, तर स्वराज्याचे हक्क प्राप्त करून घेण्यास तुम्हींच सर्वस्वीं नालायक आहां असेंच म्हणावें लागेल." (केसरी, १४ नोव्हेंबर १९१६, स. टि. खंड ४, पान ९९ ते १०१.)

स्वराज्याच्या आड येणाऱ्या बेजबाबदार नोकरशाहीला बदलल्याविना लोकांना आपले हक्क उपभोगता यावयाचे नाहीत, हेही टिळकांनी स्पष्टपणे सांगितले होते. ते म्हणाले होते, " मुख्य प्रश्न हा आहे कीं, बेजबाबदार ब्युरॉक्रसीची राज्यपद्धतीच चालू राहावयाची का कालमानाप्रमाणें तींत फेरबदल करावयाचा याचें उत्तर सगळें जग आज एकमुखानें असेंच देत आहे कीं, ही ब्युरॉक्रॅटिक राज्यपद्धति बदलून लोकांना जबाबदार अशी राज्यपद्धति स्थापित होणें अत्यंत आवश्यक आहे. स्वतः भारतमंत्री मि. मॅंटिग्यु यांनीं हल्लींच्या राज्ययंत्राचें कोणत्या शब्दांनीं वर्णन केले आहे तें वाचकांस माहीत झालेंच आहे. तेच भारतमंत्री आतां तुमच्या दाराशीं येऊन तुम्हांस सवाल करणार आहेत कीं, हें जुनेंपुराणें व गंजून गेल्यानें योग्य काम न देणारें लोखंडी-लांकडी राज्ययंत्र असेंच चालू ठेवावयाचें, का त्याच्या ऐवजीं ज्याची किल्ली तुमच्या हातांत राहील, असें नवें सोयिस्कर जिवंत राज्ययंत्र तुम्हांस पाहिजे? या सवालाला आहे हीच स्थिति 'उत्तमोत्तम' आहे, असा जबाब कोणी तरी देऊं शकेल काय? सर्व राष्ट्राचें मुख मानल्या गेलेल्या राष्ट्रीय सभेनें सर्व राष्ट्रातर्फे याचें चोख उत्तर दिलें आहे. तेंच उत्तर तुम्हांसहि मान्य नाहीं काय? स्वराज्य पाहिजे का नको, या प्रश्नाच्या उत्तरावर ३१ कोटि लोकांचें कल्याण अवलंबून आहे आणि तें कल्याण साधण्यास सर्वांनी एकमुखानें 'स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आणि तो आम्हांस मिळालाच पाहिजे,' असेंच स्पष्ट उत्तर देणें जरूर आहे. यावर कोणी अशी शंका काढतील कीं, ३१ कोटि लोकांतून एखाद्या विशिष्ट वर्गानें स्वराज्य नको म्हटलें तरी, तेवढ्यानें काय बिघडणार?" (केसरी, ९ ऑक्टोबर १९१७, स.टि.खंड ४, पान १२४.)

टिळक म्हणत असत की, स्वराज्याचे तीन शत्रू आहेत. पहिला वर्ग हिंदुस्थानात नोकरी करून सेवानिवृत्त होऊन इंग्लंडमध्ये परत गेलेला इंग्रज नोकरशहांचा (लॉर्ड कर्झन व मुंबईचे पूर्वीचे गव्हर्नर सिडनहॅम् हे त्यावेळी १९१६ साली भारतविरोधी प्रचार करीत.) दुसरा वर्ग देशांतील ॲंग्लोइंडियनांचा. कारण स्वराज्य देण्यात आले तर त्यांचे हिंदुस्थानातील हितसंबंध धोक्यात येतील, असे त्यांना वाटत होते. तिसरा वर्ग वर सांगितल्याप्रमाणे हिंदुस्थानातील इंग्रज नोकरशहांचा. हिंदुस्थान सरकारकडून लंडनला जाणाऱ्या गुप्त अहवालांतून किंवा हिंदुस्थानातील इंग्रजी वृत्तपत्रांच्या द्वारे हा वर्ग स्वराज्यविरोधी कारवाया करीत असे.

स्वराज्याचे मित्र

पण टिळकांनी ते इंग्लंडच्या दौऱ्यावर गेले असताना तेथील मजूर पक्षाची

मराठी ग्रंथ संग्रहालय

सहानुभूती हिंदुस्थानातील स्वराज्याच्या चळवळीला मिळावी, अशी खटपट केली होती. पहिल्या महायुद्धानंतरचा हा काळ होता. त्यामुळे टिळकांना त्यांच्या मदतीची आशा वाटत होती. हे त्यांच्या भाषणांवरून स्पष्ट होते. विलायतेतील प्रयत्न व हिंदुस्थानातील निकराची मागणी, हे टिळकांच्या स्वराज्याच्या आंदोलनाचे सूत्र होते. ते स्पष्ट करताना टिळकांनी सांगितले होते, 'खटपट कराल, तर सर्व मजूरपक्ष तुम्हांस साहाय्य करील. मजुरांना तुमची सहानुभूति उत्पन्न झाली आहे. त्यांची अशी भावना झाली आहे कीं, हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्याशिवाय साम्राज्य तरणें शक्य नाहीं. शिवाय विलायतच्या मजुरांना असें वाटतें कीं, हिंदुस्थानांतील मजुरांनींहि सुखी रहावें. मजुरांना हातानें कष्ट करून पोट भरण्याची धमक असते. ते तुम्हाला या वेळीं मदत करतील. आजच मजूरपक्ष बराच वळला आहे, पण याहिपेक्षां जोराचे प्रयत्न झाले पाहिजेत. आपल्या मागणीला विरोध करण्यास तेथें अधिकारीवर्गातर्फे लॉर्ड सिडनहॅमसाहेब टपून बसलेच आहेत. त्यांचा मोड झाला पाहिजे. ते श्रीमंत आहेत, त्यांना पैशाचें पाठबळ आहे हें लक्षांत ठेवा, पण त्यांच्या श्रीमंतीला आम्हांला भिण्याचें कारण नाहीं. आमचा पक्ष न्यायाचा आहे व 'यतो धर्मस्ततो जयः' या न्यायानें आम्हांला यश हें आलेंच पाहिजे. इंग्लंड तह करायला लागलें म्हणजे त्यांना आम्हांला असा प्रश्न करतां येईल कीं, तुम्ही काळ्याकुट्ट, रानटी अशा अफ्रिकेंतील शिद्दी लोकांनाहि स्वराज्य द्यायला तयार झाला पण हिंदुस्थानाची बाट काय? त्या वेळीं इंग्लंडला स्वराज्य देण्याशिवाय तोंडच रहाणार नाहीं. पण तुमची बाजू पुढें मांडण्याकरितां विद्वान व हुषार वकील तेथें गेले पाहिजेत. परमेश्वर अनुकूल झाला आहे, त्यानें पाऊस पाडला आहे, पण तुम्ही बी पेरायला तयार आहांत काय? आज सर्व जगाचा इतिहास नवीन तयार होत आहे. अशा वेळीं स्वकल्याणाला जपणें तुमचें काम आहे. दादाभाईंनीं बीज पेरलें, परमेश्वरानें पाऊस पाडला, आतां तुम्ही फळें तरी चाखण्याचें श्रम करणार कीं, स्वस्थ बसणार? या वेळीं निजला तर तुमच्यासारखे अभागी तुम्हीच असें जग म्हणेल, हे ध्यानांत ठेवा. तुम्ही हिंदु असा, मुसलमान असा, बायका असा, पुरुष असा, खिस्ती असा, पारशी असा. या वेळीं प्रत्येकानें या राष्ट्रकार्याला मदत केली पाहिजे. स्वराज्य मागण्यांत भीति उरलेली नाही. हा राजद्रोह ठरणार नाहीं. व्यापारी अनुकूल झाले, आतां तुम्ही उद्योग केव्हां करतां याची परमेश्वर बाट बघत आहे. परमेश्वर असें समजतो कीं, तुम्ही माणसें आहां तर यावेळी माणसासारखा उद्योग करा, आज उद्योग करणार नाहीं तर आम्ही माणसें नाहीं, गुरें आहों असें तुम्हांला कबूल करणें भाग पडेल. प्रयत्न करणार नाहीं तर पुढच्या पिढ्यांचे अभिशाप तुमच्या डोक्यावर बसतील याचा विचार करा. आम्ही कार्य करण्यास तुमच्यापुढें उभे आहों. मदत कराल तर तराल." (खामगाव, विदर्भ येथील भाषण, ८ फेब्रुआरी १९१८, स. टि. खंड ६, पान ५४३-५४४.)

स्वराज्य व सैनिकी शिक्षण

पहिल्या महायुद्धाचे वेळी ब्रिटिशांना सैनिकीकरण करून मदत करण्यामागे टिळकांनी स्वराज्य व सैनिकी शिक्षण ही दोन उद्दिष्टे ठेविली होती. याचे स्पष्टीकरण करताना टिळकांनी स्पष्टपणे सांगितले होते,

" स्वदेशरक्षण हा एक मनात एकदम घुसणारा आणि उत्साहवर्धक मंत्र आहे. मंत्र आहे खरा, पण तो पूर्ण सिद्धीप्रद होण्यास स्वदेश किंवा मातृभूमि या शब्दांनीं ज्या भावना स्वातंत्र्यप्रिय सुधारलेल्या राष्ट्रांच्या लोकांच्या मनांत उद्भवतात, त्याच हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत उद्भवल्या पाहिजेत. नाहींपेक्षां 'नांव सोनुबाई आणि हातांत कथलाचा वाळा' अशा प्रकारची स्थिति व्हायची ! मातृभूमि म्हणजे केवळ ज्या देशांत आपण नुसतें जन्मलों तो देश नव्हे. तसें म्हटलें तर चीन, जपान अगर इंग्लंडहि आमच्यापैकीं एखाद्याची मातृभूमि होऊ शकेल, पण कोणीहि मातृभूमि शब्दाचा तसा अर्थ घेत नाहीं. मातृभूमि या शब्दानें केवळ जन्मदात्रीच नव्हे तर, ज्या जन्मभूमींत आपलेपणानें वागण्याचा आपला हक्क आहे, त्या भूमीचा बोध असतो. आणि हिंदुस्थानवासी लोकांच्या मनांत हिंदुस्थानाबद्दल अशी बुद्धि जागृत करण्यास हिंदुस्थान देशाची राजकीय स्थितीहि तशाच प्रकारची असली पाहिजे किंवा नसल्यास प्रथम करून दिली पाहिजे, हें मग ओघानेंच प्राप्त होतें. तात्पर्य, स्वदेश-रक्षणाबरोबरच स्वराज्य आणि लष्करी शिक्षण या दोनहि गोष्टी सहजगत्या न्यायतः प्राप्त होतात. महायुद्धामुळें बदललेल्या परिस्थितींत हिंदुस्थानांतील लोक लायक असोत वा नालायक असोत, लायक असल्यास ठीकच झालें. नसल्यास त्यांना लायक करून त्यांच्याकडून स्वदेश-रक्षण करवलें पाहिजे. हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न आतां लोकांच्या लायकी-नालायकीवर अवलंबून नाहीं. महायुद्धाचा हा एक अनिवार्य परिणाम आहे असें जें आम्ही म्हणतों यांतील बीज हेंच होय. नोकरशाहीला ही गोष्ट इष्ट वाटत नसेल, पण त्याखेरीज आतां गत्यंतर नाहीं. साम्राज्यरक्षणार्थ हे उपाय योजलेच पाहिजेत, अशी स्थिति आली आहे. आणि या दृष्टीनें विचार केला, तर इष्टसिद्धि होण्यास हिंदुस्थानांतील लोकांस स्वराज्यांचे हक्क देऊन त्यांचे नागरिक सैन्य स्वदेश-रक्षणार्थ किंवा मातृभूमीच्या आणि साम्राज्याच्या रक्षणार्थ आतां शक्य तितक्या लवकर तयार करणें जरूर आहे, असें सिद्ध होतें. " (केसरी, २ जुलै १९१८, स. टि. खंड ४, पान १३७–१३८.)

स्वराज्य आणि राष्ट्रीय पक्षोपपक्ष

सुरत काँग्रेसनंतर टिळकांनी स्वराज्याच्या संकल्पनेसंबंधी हिंदी जनतेत कोणते मतप्रवाह आहेत आणि त्यांची स्वराज्यविषयक धारणा काय आहे याचा उहापोह 'राजकीय पक्षोपपक्ष' या लेखमालेत केला होता. स्वराज्याबाबत पाच मतप्रवाह

असल्याचे टिळकांनी म्हटले होते. पहिला मतप्रवाह इंग्रज राज्यकर्ते जे देतील ते घ्यावे, त्यांच्या इच्छेपलीकडे जाऊ नये असे म्हणणाऱ्या वर्गाचा. हा वर्ग राजकीय चळवळीत पडत नव्हता. या वर्गास इंग्रजी राज्याचे पुरस्कर्ते असे म्हणता येईल. दुसरा वर्ग राजकीय राज्यकर्त्यांच्या उणिवा त्यांच्या नजरेस आणून देण्यासाठी निःस्पृहतेने बोलणारा. पण राजकीय सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्याची त्यांची तयारी नसे. टिळकांनी सांगितलेला तिसरा वर्ग म्हणजे 'स्वराज्यप्रार्थकांचा' म्हणजे राज्यपद्धतीतील दोष कोणते हे सांगून स्वराज्याखेरीज ते सुधारण्याचा दुसरा उपाय नाही, हे स्पष्टपणे सांगणारा. पण राज्यकर्त्यांची प्रार्थना हेच त्यांचे साधन असे. याच्या पलीकडचा चौथा वर्ग म्हणजे स्वराज्य हे स्वातंत्र्याचे पहिले रूप आहे असे समजून ते मिळविणे असल्यास आपल्या उद्योगाने आणि मेहनतीने राज्यकर्त्यांना अडवूनच मिळविले पाहिजे असे म्हणणाऱ्यांचा होय हें स्वराज्य स्वातंत्र्यापेक्षा कमी दर्जाचे आहे, पण अंतिम हेतूच्या बरेचसे जवळ नेणारे आहे, असे मानणारा हा वर्ग स्वराज्यवाद्यांचा होता.

आणि पाचवा वर्ग म्हणजे पूर्ण स्वातंत्र्यवाद्यांचा होय. त्यांचे म्हणणे होते की, स्वतंत्रतेच्या तत्त्वापासून जी प्रेरणा मनामध्ये उत्पन्न होते त्याचा पूर्ण फायदा घेऊन तिच्या प्रोत्साहनाने हिंदुस्थानातील लोकांनी आपली राजकीय प्रगती करावी.

संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार

टिळकांनी राष्ट्रीय पक्षाचे साम्राज्यांतर्गत स्वराज्य हे ध्येय जरी त्यावेळी लोकांपुढे ठेवले असले तरी त्यांनी स्वातंत्र्य की स्वराज्य हा वाद होऊच शकत नाही, असे याच लेखात म्हटले होते, " राष्ट्राच्या अभ्युदयाची परमावधि स्वातंत्र्य–पूर्ण स्वातंत्र्य–अनियंत्रित स्वातंत्र्य होय, हें कोणता देशाभिमानी पुरुष कबूल करणार नाहीं ? पावन प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष रवींद्रनाथ टागोर यांनीहि असेंच प्रतिपादन केलें आहे. आत्म्याला सायुज्य मुक्ति आणि राष्ट्राला स्वातंत्र्य हीं दोन्ही आत्मा व राष्ट्र यांचीं अंतिम साध्यें आहेत. पण मुक्ति मिळण्यास ज्याप्रमाणें काम-क्रोधादि शत्रूंचा संयम करून, समबुद्धित्व संपादन करण्याचें कर्म करावें लागतें, तद्वतच राष्ट्रास आपला अंतिम हेतु साधण्याकरितां राष्ट्रीय कर्माची अपेक्षा आहे, हें विसरतां कामा नये. अंतिम हेतु अमुक असावा असा नियम करणें व्यर्थ होय. अंतिम तो अंतिम, तो उपांतिम होऊ शकत नाहीं, किंवा अंतिमाच्या खालच्या पायरीचाहि असणें शक्य नाहीं, हें तर्कशास्त्रांतील अथवा मानसशास्त्रांतील तत्त्व सर्वांनीं नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. आपण आंब्याचें झाड लाविलें तें मोहराकरितां नव्हे, आम्रफलाकरितां आहे, ही गोष्ट कोणास सांगावी लागत नाहीं. पण आंब्यांचें झाड लावण्याचा उद्योग करतांना दोन गृहस्थ आपआपसांत एकजण 'माझें अंतिम साध्य मोहर आहे'

आणि दुसरा 'माझें अंतिम साध्य आम्रफल आहे,' असा तंटा करून आंब्याची कोय जमिनींत लावण्याचें काम जर सोडून देऊं लागले, तर त्यांस आपण काय म्हणूं? स्वातंत्र्यवादी आणि स्वराज्यवादी यांच्यामधील तंटा अशाच प्रकारचा आहे. स्वराज्य ही स्वातंत्र्याची पायरी आहे व स्वातंत्र्यांत स्वराज्याचा अंतर्भाव आहे; आणि इंग्रज सरकार सध्यां आपल्याला कांहींच देऊं इच्छीत नाहीं. मग स्वराज्यासंबंधीं किंवा स्वातंत्र्यासंबंधी तंटा कशाला? 'स्वातंत्र्य' म्हटलें असतां इंग्रजी राज्यकर्ते अधिक बिचकतील किंवा बिथरतील आणि 'स्वराज्य' म्हटलें असतां कमी बिचकतील किंवा बिथरतील, असा एक कोटिक्रम करण्यांत येत असतों. पण यांत कांहीं अर्थ नाहीं. राज्यकर्त्यांनीं स्वातंत्र्याचें बीं पाश्चिमात्य शिक्षणरूपानें या देशांत प्रथम रोविलें त्यांस त्या बीजाचीं फळें काय येतील, किंवा त्या बीजाचा वृक्ष किती मोठा होईल, हें कळत नाहीं, असें मानणें म्हणजे त्यांच्या पदरीं असमंजसपणाचा आणि आपल्या ठायीं विशेष चाणाक्षपणाचा आरोप करणें होय." (केसरी, १८ फेब्रुआरी १९०८, स. टि. खंड ४, पान ३६२.)

भाषणातही टिळकांनी अनेकदा संपूर्ण स्वातंत्र्याचा निःसंदिग्ध पुरस्कार केलेला होता. उदाहरणार्थ, विदर्भाच्या दौऱ्यातील एका भाषणात टिळक म्हणाले होते, "राष्ट्राचें अगदीं अखेरचें अंतिम साध्य 'स्वातंत्र्य' हें होय. यासंबंधाच्या अपेक्षांचा उल्लेख पूर्वीच झाला आहे. पारमार्थिक गोष्टींत काशीयात्रा हें जसें अंतिम साध्य इहलोकीं आहे तसेंच राजकीय बाबतींत स्वातंत्र्यगंगा हा अंतिम हेतु आहे. जगांत हजारों धर्मक्रांत्या झाल्या, विचारक्रांत्या झाल्या, राज्यक्रांत्या झाल्या, तरी पण या सर्व क्रांत्या पाहून हिंदुस्थान देश या घटकेपर्यंत शाबूत आहे. कोणताहि देश हिंदुस्थानाची बरोबरी करूं शकत नाही. आज हजारों वर्षे आपला देश जिवंत आहे. तो निरंतर परावलंबनांत ठेवण्याकरितां ईश्वरानें ठेवला आहे काय? आपल्या राष्ट्रावर जर ईश्वराची अवकृपा असती तर हें राष्ट्र नामशेष झाले असतें. आपणांस सुदिन दाखविण्याचें परमेश्वराच्या मनांत खास आहे. मी आपल्या प्रेरणेनें हें बोलत नाहीं– वस्तुस्थिति तशी आहे. तिच्या अवलोकनापासून जें कळलें तें मी सांगत आहे." (स. टि. खंड ६, पान ४२५.)

स्वराज्याचे घटनात्मक स्वरूप

टिळकांनी १९१६ साली हिंदी स्वराज्य संघ (होमरूल लीग) स्थापन केल्यावर स्वराज्याविषयी आपल्या घटनाविषयक कल्पना स्पष्टपणे लोकांपुढे मांडल्या होत्या. मॉंटेग्यू कमिशनपुढे त्यांची जी साक्ष झाली त्यावेळी दिलेल्या निवेदनातही त्यांनी त्या स्पष्ट केल्या होत्या. स्वराज्याची मागणी करणे म्हणजे राजद्रोह होय, इथपासून त्या मागणीविषही गैरसमज पसरविण्यात येत होते. वस्तुस्थितीचा विपर्यास केला

जात होता. तेव्हा टिळकांनी स्वराज्य संघाचे माहितीपत्रक काढून, त्याविषयी 'केसरी'त लेख लिहून, आपल्या स्वराज्याविषयीच्या घटनाविषयक कल्पना ढोबळपणाने लोकांपुढे मांडावयास सुरुवात केली. टिळकांची स्वराज्याची संकल्पना लोकशाहीवर आधारलेली, संघराज्यात्मक (फेडरल) होती व त्यांत पार्लमेंटची बीजरूप संस्था, प्रांतिक स्वायत्तता, ग्रामसंस्था इत्यादि आता रूढ झालेल्या मौलिक सूचना होत्या. त्यांचे ऐतिहासिक महत्त्व ध्यानी घेऊन त्यांचा सारांश येथे दिला आहे. स्वराज्याचे ते व्यक्तरूप होणार होते. पण टिळक उदारमतवादी व लोकशाही वृत्तीचे कसे होते हे समजण्यास यावरून मदत होईल. स्वराज्याच्या घटनात्मक तपशिलाचा विचार टिळकांच्या या लेखात आढळतो. तो स्वराज्य संकल्पनेच्या विकासक्रम समजण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे.

टिळकांनी त्या लेखात लिहिले होते, "आम्हीं जे स्वराज्याचे हक्क मागतों, ते इंग्रजी साम्राज्याचा एक अवयव म्हणून मागतों, आणि ते इंग्रज सरकारकडूनच आम्हांस प्राप्त करून घ्यावयाचे आहेत. एवढ्या दोन गोष्टी जर नित्य लक्षांत ठेवल्या तर आमच्या मागणीबद्दल कोणताच गैरसमज होण्याचें कारण राहाणार नाहीं. इंग्रजी साम्राज्यांत जे अनेक देश, प्रांत, वसाहती सामील झालेल्या आहेत त्या सर्वांत एकाच प्रकारची राज्यव्यवस्था आहे असें नाहीं. कोठें लोकांना अधिक हक्क असून, ते आपली सर्व अंतर्व्यवस्था आपल्या प्रतिनिधीमार्फत चालवितात, तर कोठें ती सरकारी अंमलदाराच्यामार्फत चालविण्यांत येते. साम्राज्यव्यवस्थेंत अशा प्रकारचे दोन भेद होण्यास तत्कालीं कांहीं विशिष्ट कारणें घडलेलीं आहेत खरीं; पण हीं कारणें कायमचीं नसून साम्राज्याची जसजशी अधिकाधिक वाढ व भरभराट होईल तसतसे साम्राज्याच्या प्रत्येक घटकावयवास त्या त्या अवयवांतील अंतर्व्यवस्था तत्तद्वासी लोकांच्या संमतीनें चालवण्याचे हक्क मिळाले पाहिजेत, हें ऐतिहासिक तत्त्व सर्वांस मान्य आहे. हिंदुस्थानची सध्यां जी मागणी आहे ती याच प्रकारची होय!" (स.टि. खंड ४, पान ६७.)

लोकमतानुवर्ती राज्य

हिंदुस्थानात जो राज्यकारभार असावा तो लोकमताला अनुसरून चालला पाहिजे, यावर टिळकांचा भर होता, तसेच केंद्र सरकार जरी साम्राज्य सरकारच्या आदेशानुसार चालले तरी प्रांतिक राज्यकारभार लोकमताला प्राधान्य देऊन चालविण्यात आला पाहिजे, असे टिळकांचे म्हणणे होते. थोडक्यात ते प्रांतिक स्वायतता मागत होते. त्यांनी म्हटले होते, "राज्यांतील अंतर्व्यवस्थेसंबंधानें लोकांस जे हक्क द्यावयाचे ते लहान असोत वा मोठे असोत, त्यासंबंधाच्या बाबी तोडून काढून त्या पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत दिल्या पाहिजेत. त्यांत ढवळाढवळ करण्याची संधि सरकारी

अधिकाऱ्यांस असूं नये असें आतां लोकांस वाटूं लागलें आहे. आणि गेल्या तीस वर्षांचा अनुभव पाहिला तर तसें वाटणें अगदीं स्वाभाविकहि आहे. अशा प्रकारच्या दृष्टीनें विचार केला म्हणजे हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेचे इंपीरियल आणि प्रॉव्हिन्शियल—बादशाही आणि प्रांतिक—असे दोन भाग होतात. सर्व देशास जी व्यवस्था एकसारखी लागू असली पाहिजे किंवा जेथें हिंदुस्थानचा परराष्ट्राशीं संबंध येतो ती बादशाही व्यवस्था होय व ती एखाद्या विशिष्ट प्रांतांतील लोकमतानुरूप चालावी असें कोणीहि म्हणणार नाहीं पण याखेरीज प्रांतांप्रांतांतील जी अंतर्व्यवस्था आहे ती त्या त्या प्रांतांतील लोकमतानें चालवल्यास त्यामुळें बादशाही साम्राज्यव्यवस्थेस कोणत्याहि प्रकारचा धोका येण्याचा संभव नाहीं." (स. टि. खंड ४, पान ७२)

"स्वराज्याच्या मागणीचा मुख्य मुद्दा प्रांतिक सरकारच्या अधिकाराद्दलचा व व्यवस्थेबद्दलचा आहे. म्हणून प्रांतिक सरकारच्या घटनेचा विचार करून नंतर हिंदुस्थान सरकारच्या घटनेचा आम्हीं विचार करणार आहों. प्रांतिक राज्यव्यवस्थेपैकीं किती भाग लोकांच्या हातीं असला पाहिजे, याचा निर्णय झाला म्हणजे मग सर्व हिंदुस्थान देशाच्या राज्यव्यवस्थेचा कोणता भाग लोकांच्या हातीं असला पाहिजे, याचा विचार करण्यास ठीक पडेल."

"प्रांतिक सरकारच्या हातांत राज्यव्यवस्थेचा हल्लीं कोणता भाग असतो याचा विचार केला तर, असें आढळून येईल कीं, एकदर हिंदुस्थानच्या वसुलापैकीं कांहीं नियमित भाग किंवा बाबी प्रांतिक सरकारास तोडून दिलेल्या असून, हे पैसे त्यांच्या ताब्यांत दिलेल्या त्यांच्या हद्दींतील कांहीं खात्यांकडे खर्च करण्याचा त्यांस पूर्ण अधिकार असतो आणि त्यांच्या प्रांतापुरते कायदे करण्यास त्यांस मोकळीक असली तरी, या कायद्यांत अखेर हिंदुस्थान सरकारची मंजुरी असावी लागते, सारांश, प्रांतिक सरकार हा हिंदुस्थान सरकारचा एक मक्तेदार आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या मक्तेदाराकडे हिंदुस्थान सरकार कांहीं खात्यांची व्यवस्था तोडून देतें आणि ती चालवण्यास त्यास पूर्ण अधिकार देऊन त्यांच्या खर्चास लागणारी रक्कमहि त्याच्या ताब्यांत देतें. पण साम्राज्याच्या अंतर्गत व्यवस्थेचे हक्क लोकांस देणें असल्यास, निदान हा मक्ता तरी प्रांतिक सरकारास न देतां, लोकांस दिला पाहिजे हें उघड आहे. हल्लींची मक्तेदारीची व्यवस्था निव्वळ अधिकारीवर्गाच्या सोयीची आहे, त्यांत लोकमताचें कोठेंच प्राबल्य नाहीं." (स. टि. खंड ४, पान ७७.)

हिंदुस्थान सरकारच्या रचनेसंबंधी टिळकांनी म्हटले होते, "वेडर्बर्न आणि गुप्त यांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेटचें कौन्सिल सुधारणेसाठीं जी व्यवस्था सुचविली आहे ती थोड्याफार फरकानें आतां म्हणजे सेक्रेटरी ऑफ स्टेटचें कौन्सिल काढण्याचें ठरल्यावर—हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलास लागू करावी, असें आमचें म्हणणें आहे; आणि याप्रमाणें व्यवस्था झाल्यास हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांस लष्करी खातें, इंडियन

सिव्हिल सर्व्हिस, विलायतेंतील गोऱ्या लोकांचें स्वतंत्र मत, या सर्वांचे प्रतिनिधि कायम राहून एकंदर कौन्सिलांत सरकारच्या दृष्टीनें जो स्थिरपणा यावयास पाहिजे तो येऊन, प्रसंगविशेषीं जे अधिकार सरकारच्या ताब्यांत असले पाहिजेत तेहि त्याच्या ताब्यांत राहातील. हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत याखेरीज जे इतर मेंबर असावयाचे ते सर्व लोकनियुक्त असले पाहिजेत; आणि विशेषकरून प्रांतिक सरकारास जीं खातीं तोडून दिलीं आहेत, त्या खात्यांची व्यवस्था तरी निदान या मेंबरांकडे ठेविली पाहिजे. असें झालें म्हणजे प्रांतिक सरकार आणि हिंदुस्थान सरकार यांमध्यें लढा उत्पन्न होण्याचा फारसा संभव राहाणार नाहीं आणि झालाच तर त्याबद्दलचा दोष गव्हर्नरजनरल किंवा त्यांच्या कौन्सिलांतील सरकारी सभासद यांजकडे येणार नाहीं." (स. टि. खंड ४, पान ८३.)

फेडरल पार्लमेंटचे बीज

"हिंदुस्थान सरकारचें कायदेकौन्सिल म्हणजे सर्व हिंदुस्थानच्या भावी पार्लमेंटचें बीज होय. निरनिराळ्या प्रांतांतील प्रांतिक सरकारें प्रांतिक बाबतींत स्वतंत्र व लोकनियुक्त झाल्यावर हिंदुस्थानच्या एकंदर राज्यव्यवस्थेप्रमाणें जें रूप येणार तें कांहीं अंशीं अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत ज्याप्रमाणें प्रत्येक संस्थान कांहीं बाबतींत स्वतंत्र असून, एकंदर सर्व संस्थानांवर अमेरिकन काँग्रेसचा अंमल राहातो तद्वतच वरील व्यवस्था अमलांत आल्यास हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतिक सरकारांवर हिंदुस्थान सरकारचा अंमल राहील. म्हणजे प्रांतिक बाबी प्रांतिक सरकारकडे सोंपविल्या जातील आणि एकंदर सर्व प्रांतांस म्हणजे देशास लागू पडणाऱ्या किंवा त्याच्या हिताहितासंबंधाच्या गोष्टींचा विचार हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलांत होईल. प्रांतिक बाबी कोणत्या आणि सर्व देशाला सामान्य बाबी कोणत्या, तें ठरवण्यासंबंधानें मतभेद असूं शकेल; पण आतांपर्यंत हिंदी स्वराज्यासंबंधानें ज्या सूचना लोकांपुढें आल्या आहेत त्या सर्वांत प्रांतिक आणि सार्वदेशिक हा भेद राखलेला असून, प्रांतिक कार्यकारी कौन्सिलें पूर्ण लोकनियुक्त असून, त्यांच्या ताब्यांत प्रांतिक व्यवस्था द्यावी व सार्वदेशिक प्रश्नासंबंधाचा विचार हिंदुस्थान सरकारकडे असावा, अशा सूचना केल्या आहेत. अर्थात् हिंदुस्थान सरकारचें जें कायदेकौन्सिल तेंच सर्व देशाला लागू पडणाऱ्या प्रश्नाची वाटाघाट करणारें कौन्सिल होणार, किंबहुना हें हिंदुस्थानची पार्लमेंट होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून यांत जे सभासद असावयाचे ते लोकनियुक्तच असले पाहिजेत व हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, धंद्यांच्या किंवा धर्मांच्या लोकांचा त्यांत समावेश झाला पाहिजे, हें उघड आहे." (स. टि. खंड ४, पान ८४.)

ग्रामसंस्थेचे पुनरुज्जीवन

सत्तेचे विकेंद्रीकरण करावयास हवे, पण ते प्रांतिक सरकारच्या हाती पूर्ण सत्ता देऊन झाले पाहिजे. तेथपासून ग्रामसंस्थेपर्यंत सत्ता पोहोचली पाहिजे आणि तीही लोकप्रतिनिधींमार्फत पोचली पाहिजे असे टिळक सुचवीत होते. त्यांनी म्हटले होते, "लोकांच्या पुढाऱ्यांच्या हातीं स्वतंत्र अधिकार पडून त्यांत अधिकाऱ्यांच्या नव्हे तर लोकांच्या देखरेखीखालीं, लोकांच्या सोयीकरितां, लोकांच्या पैशाची व्यवस्था ज्या रीतीनें लावतां येईल, अशा प्रकारचे स्वराज्य आम्ही मागत आहों. हें स्वराज्य जर आम्हांस द्यावयाचें असेल तर निदान सर्व प्रांतिक व्यवस्था तरी लोकनियुक्त पुढाऱ्यांच्या तंत्रानेंच व्हावयास पाहिजे. गांवांतील व्यवस्था गांवच्या लोकांच्या तंत्रानें, तालुक्यांतील व्यवस्था तालुक्याच्या लोकांच्या तंत्रानें, जिल्ह्याची व्यवस्था जिल्ह्याच्या लोकांच्या तंत्रानें, आणि प्रांतांतील किंवा इलाख्यांतील व्यवस्था इलाख्याच्या लोकांच्या तंत्रानें होणें, हें यांतील बीज होय आणि कित्येकांच्या मतें स्वराज्यास जी सुरुवात करावयाची ती ग्रामसंस्थेपासून झाली पाहिजे, हें म्हणणें एकांशीं खरें आहे; पण राज्यघटनेचा कायदा या दृष्टीनें जेव्हां विचार करावयाचा तेव्हां ग्रामसंस्थेपासून आरंभ करण्यांत कांहीं हंशील नाहीं. पूर्वीच्या ग्रामसंस्था ज्या नाहींशा झाल्या त्या राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें नाहींशा झाल्या नाहींत. राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें प्रांतिक सरकारास जे अधिकार मिळाले आहेत त्यांचा उपयोग करून प्रांतिक सरकारनें ग्रामसंस्था बुडवलेल्या आहेत. म्हणून ग्रामसंस्थेचें पुनरुज्जीवन जर करणें असेल, तर राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणे प्रांतिक सरकारास जो अधिकार आहे तो लोकांच्या हातीं असला पाहिजे, अशी प्रथम मागणी केली पाहिजे. प्रांतिक सरकारचे अधिकार एकदां लोकांच्या हातांत आले म्हणजे मग ग्रामसंस्थाच काय, पण तालुका अगर जिल्हासंस्थाहि निर्माण करण्यास लोकांस पूर्ण अधिकार येईल. ग्रामसंस्था हा स्वराज्याचा पाया खरा; पण आम्हांस स्वराज्याची जी मागणी करावयाची ती केवळ पायापुरतीच न करतां, एकंदर प्रांतिक स्वराज्याबद्दल केली पाहिजे, म्हणजे त्यांत अनायासेंच पायाचा समावेश होईल." (स. टि. खंड ४, पान ७८.)

स्वराज्याचा दृढ निश्चय

अशा रीतीने टिळकांनी स्वराज्य-संकल्पनेची प्रकट चर्चा करून लोकमत शिक्षित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. पण ही नुसती संकल्पना प्रबळ करून किंवा तिचा सर्व तपशील ठरवून भागण्यासारखे नव्हते. लोकमताचे सामर्थ्य, 'स्वराज्य आम्ही मिळविणारच' यासाठी निश्चितार्थी लोकमताचे संघटित रूप दाखविण्याची गरज होती. त्यासाठी काँग्रेसचे व्यासपीठ तर होतेच, पण त्याखेरीज दुसरी आघाडी म्हणून टिळकांनी 'हिंदी स्वराज्य संघ' काढला व स्वराज्याच्या प्रचारमोहिमेस प्रारंभ केला.

बंगालच्या फाळणीच्या वेळी टिळकांनी लोकमताचे बळ नुसत्या संख्येत नाही, दृढ-निश्चयात आहे, असे सूत्र ठेवले होते. तेच त्यांनी याही खेपेस लोकांना पुन्हा सांगावयास सुरुवात केली. असे करताना दोन हेतू साध्य करण्याचा टिळकांचा प्रयत्न होता. एक तर नोकरशाहीला वश करण्याचा मार्ग केवळ तर्कशुद्ध मांडणी किंवा युक्तिवाद हा नव्हे, तसे करून स्वराज्याचा हक्क ते देणार नाहीत. तसेच ब्रिटिश पार्लमेंटमधील मुत्सद्यांना भारतातील लोकमत संघटित होत आहे, प्रजा अस्वस्थ आहे, असे जर दाखवून देता आले तर भारतात असलेल्या नोकरशाहीच्या मतावर किंवा त्यांनी दिलेल्या अभिप्रायावर अवलंबून न राहाता ब्रिटिश पार्लमेंट स्वतः भारताच्या प्रश्नात लक्ष घालील. हेच टिळकांना हवे होते. म्हणून स्वराज्याची शिष्टाई करण्यासाठी ते स्वतः इंग्लंडला गेले व तेथील जनतेची व राजकीय पक्षाची सहानुभूती मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

नवा वेदान्त – स्वराज्य

नाशिक येथे भरलेल्या मुंबई प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनात टिळकांनी स्वराज्याच्या ठरावावर केलेल्या भाषणात स्वराज्याच्या कल्पनेमागे लोकांचे भावनात्मक बळही हवे हा मुद्दा स्पष्ट केला होता. ते म्हणाले, "स्वातंत्र्य हा आत्मा आहे. स्वातंत्र्य कधी म्हातारें होत नाहीं. पण आत्मा हा अमर आहे. आमची चळवळ कधी कधी लंगडी पडल्यासारखी वाटत असली तरी त्यांतील आत्म्याचें स्वातंत्र्य हें नित्य, अविनाशी, आपलें पद लोकांना प्राप्त करून देणारें आहें. आत्मा म्हणजे परमेश्वर. त्याच्याशीं तद्रूप पावल्याशिवाय मनाची तळमळ नाहींशी होत नाहीं. एक शरीर जीर्ण झालें तर आत्मा दुसरें शरीर धारण करतो हा गीतेंतील सिद्धांत आहे. नुसती गीता वाचणें हा वेदान्त नव्हे. हा नवा वेदान्त आहे, असें पाहिजे तर म्हणा. स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. हा आत्मा माझ्या हृदयांत जागृत आहे तोपर्यंत मी म्हातारा होणार नाहीं."

"स्वातंत्र्याचें तत्त्व मारलें तरी नाश पावणार नाहीं हें लक्षांत ठेवा. हें स्वराज्य आम्ही मागतों म्हणजे तें आम्हास मिळालेंच पाहिजे. ज्या शास्त्राचें पर्यवसन स्वराज्यांत होतें तें राजकीय नीतिशास्त्र होय, जिचा शेवट दास्यांत होतो ती राजनीतिच नव्हे. राजनीति हा देशाचा वेदान्त आहे. तुमच्यामध्ये आत्मा हा आहेच, मी फक्त मनाला जागृत करणार आहे. कांहीं तर अज्ञानानें, स्वार्थसाधु लोकांच्या प्रयत्नानें व कांहींच्या आपमतलबानें जें पटल उत्पन्न झालें आहे तें दूर करण्यासाठी मी येथें आलों आहे. तें पटल दूर झालें म्हणजे राष्ट्र प्रयत्नाला लागेल."

टिळक वेदान्ती असल्यामुळे त्यांची परिभाषा वेदान्तीच असे. राजकारणात ती त्यांनी वापरली. आत्म्याचे अमरत्व व त्याचा सर्वव्यापीपणा या वेदान्तातून

आलेल्या दोन कल्पना टिळक राजकीय क्षेत्रात अशा रीतीने वापरत होते. स्वातंत्र्याचे अमरत्व व त्याची अपरिहार्यता ही पाश्चात्त्य दृष्टीने किंवा त्या परिभाषेत सांगत. भारतीय संदर्भात याला सामाजिक मानसशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व होते. इंग्रजीसारख्या बलाढ्य व आधुनिक राष्ट्रापासून स्वराज्याचे हक्क मिळवावयाचे असल्यामुळे या वेदान्ती परिभाषेला महत्त्व होते. कारण स्वातंत्र्य ही काही केवळ बौद्धिक संकल्पना नाही, तिचा मानवी भावजीवनाशी व संवेधाशी मूलभूत संबंध आहे. म्हणून स्वातंत्र्याची राजकीय गरज वा अपरिहार्यता मांडणे अपुरे ठरत होते, टिळकांच्या या विवेचनाचा हाच अर्थ आहे.

विलायतेत चळवळ : देशांत प्रचार मोहीम

स्वराज्याचा प्रचार इंग्लंडमध्ये कशा रीतीने केला याचे वर्णन करताना 'केसरी'च्या वार्ताहराला दिलेल्या मुलाखतीत टिळकांनी सांगितले होते, " आमचें विलायतेंतील काम आणि हिंदुस्थानांतील काम हीं दोनहि भिन्न आहेत...हिंदुस्थानांत लोकमत बनवावयाचें असून तें सनदशीर रीतीनें शक्य तेवढें पुढें ढकलणें आमचें हिंदुस्थानांतील काम आहे आणि हें लोकमत ज्या काळीं, जितकें व जसें बनलें असेल तितकें तें वकील या नात्यानें विलायतेंतील लोकांस कळविणें ही आमची विलायतेंतील कामगिरी होय. "

" विलायतेंतील मजूर पक्षाची सहानुभूति मिळविण्याचा उद्योग प्रथम बॅ. बॅरिस्टर यांनी केला. विलायतेंतील सामान्य जनता आणि मजूरपक्ष यांचें आपणांस पूर्ण पाठबळ मिळून हिंदुस्थानच्या मागण्या त्यांच्या साहाय्यानें लवकरच पदरांत पडतील असा माझा भरवंसा आहे. "

" हिंदुस्थानप्रमाणें इतरत्र विलायतेंतहि चळवळ आम्हीं नित्य सुरू ठेवली पाहिजे. विलायतेंत, आणि अमेरिकेंत नव्हे तर युरोपांतल्या इतर देशांतहि आम्ही जर याप्रमाणें उद्योग चालू ठेवला तर थोड्याच वर्षांत हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर सोडविणें 'लीग ऑफ नेशन्स 'ना भाग पडेल...जगाची शांतता व स्वातंत्र्य कायम राखण्यास किंवा वाढविण्यास इतउत्तर राष्ट्रसंघ हें एकच सनदशीर साधन आहे. किंबहुना त्यासाठींच हा संघ निर्माण झालेला आहे. या संस्थेचा आज नाहीं उद्यां पूर्णपणें उपयोग करून घेण्यास, आम्हांस आमची चळवळ पाश्चात्त्य राष्ट्रांतून चालू ठेवली पाहिजे. "

हिंदुस्थानातील स्वराज्याच्या चळवळीची दिशा टिळकांनी याच मुलाखतीत स्पष्ट करून सांगितली होती ते म्हणाले होते, " मॉंटेग्यू विलांत नमूद केलेल्या सुधारणांचा शक्य तितका आम्हीं फायदा करून घेतला पाहिजे. याबद्दलहि मतभेद नाहीं. तें कार्य आम्हीं केलेंच पाहिजे. पण तेवढ्यानें काम भागत नाहीं या सुधारणा इतक्या अपुऱ्या

व मर्यादित आहेत कीं, त्या अमलांत आणण्याच्या कामीं तत्परता व सहकारिता दाखवून स्वराज्य चालविण्याची पात्रता सिद्ध करा, असें आम्हांस सांगणें म्हणजे पायांत खोडा घातलेला असतांहि पळण्याची आपली पात्रता सिद्ध करा, असें आम्हांस सांगण्यासारखें आहे. सबब या कावेगिरीच्या प्रतिकारार्थ आपण एव्हांपासून झटलें पाहिजे, तात्पर्य, आपली मागणी आम्हीं नित्य कायम ठेवली पाहिजे. दिल्याचा तिरस्कार करूं नका, पदरांत घ्या, आणि केवळ तेवढ्यानेंच संतुष्ट न रहातां नोकरशाहीच्या तटबदीस हें जें लहानसें भोंक पडलें आहे तें वाढवून हा नोकरशाहीचा कोटच पाडून टाकण्याचा उद्योग, हा कोट जमीनदोस्त होईपर्यंत निरंतर व उत्तरोत्तर अधिकाधिक उत्साहानें व नेटानें चालू ठेवा, एवढीच लोकांस माझी विनंति आहे." (केसरी, ९ डिसेंबर १९१९, स. टि. खंड ६, पान १४३, १४५, १४६.)

टिळकांच्या स्वराज्य-मोहिमेचे तत्त्वज्ञान व दिशा या मुलाखतीत व आधी उद्धृत केलेल्या भाषणावरून स्पष्ट समजते. टिळकांनी 'स्वराज्य संघ' स्थापन केल्यानंतर स्वराज्याच्या संकल्पनेचा तपशील तर लोकांपुढे मांडलाच, परतु त्याहीपेक्षा लोकांना बरोबर घेऊन ती चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न केला. देशात तिला अनुकूल राजकीय वातावरण निर्माण केले. टिळकांनी या मोहिमेत केलेली सर्व भाषणे म्हणजे लोकशाहीतील राजकीय शिक्षणाचा वस्तुपाठ होता. तोच मुद्दा वेगवेगळ्या थरांतील श्रोत्यांना समजेल अशा भाषेत टिळक मांडत होते. त्यातील काही नमुने अभ्यासण्याजोगे आहेत.

स्वराज्यासाठी लागणारे गुण

या सर्व भाषणांतून स्वराज्यासाठी लागणारा निर्धार, जातीय ऐक्यबुद्धी, संघशक्ती, महायुद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची जाणीव वगैरे मुद्दे वारंवार टिळक ठासून मांडत होते. नागपूर येथे ६ जानेवारी १९१९ रोजी झालेल्या भाषणात टिळकांनी 'स्वराज्यावरील व्याख्यानांचे दिवस गेले असून, आतां आपण हिंमतीनें झुंज देण्याच्या अवस्थेपर्यंत येऊन पोंहोचलों आहोंत,' असे सांगितले होते. ते म्हणाले होते, "स्वराज्याशिवाय दुसरें ध्येय डोळ्यांपुढें ठेवूं नका. आपल्या शक्तीनें, बुद्धीनें आणि कळकळीनें जें जें शक्य असेल तें तें करण्याचा निश्चय करा, असें माझें आपणांस आग्रहाचें सांगणें आहे. एक प्रकारें युद्धाला तोंड लागलें आहे हें ध्यानांत ठेवा. वादविवाद माजविण्यास, मतभेद दाखविण्यास आणि बडबड करण्यास आतां वेळ राहिलेला नाहीं. काँग्रेसमध्यें ठराव पास करून कांहीं होणार नाहीं. काँग्रेसचा ठराव ही जमीन आहे. यावर इमारत उठवावयाची आहे. उद्योगाशिवाय यश येणार नाहीं. यश न आलें तर तें तुमच्या नामर्दपणाचें लक्षण होय, स्वराज्य कायदेशीर ठरलें आहे. स्वराज्य-प्राप्त्यर्थ लोकांचें साहाय्य मागणें हेंहि कायदेशीर होय. असा निकाल

लागलेला आहे. कायद्याची अडचण आड राहिलेली नाहीं, मुसलमान विरुद्ध नाहींत, पक्षभेद नष्ट झालेले आहेत. ही परिस्थिति लक्षांत घ्या. संकटें येतील आणि संकटांशी झुंजल्याशिवाय कोणतीहि गोष्ट साध्य होत नसते. 'संकटं पुनरारुह्य यदि जीवति पश्यति' हे सूत्र लक्षांत ठेवून कार्याला तयार व्हा. कोणतीहि गोष्ट मोबदल्याशिवाय मिळत नाहीं. हा मोबदला म्हणजे हिंमत होय, व्याख्यान ऐकणें हा मोबदला नव्हे. वक्तृत्व पुष्कळ झालें आहे. खरा मोबदला म्हणजे प्रतिबंध आला तरी त्याला दूर सारून सतत उद्योग चालू ठेवणें हा होय. उद्योग हेंच यशाचें कारण आहे. 'स्वराज्य' फुकटची गोष्ट नाहीं. 'मी स्वराज्यवादी आहे. मला होमरूल पाहिजे, माझें सर्व तन-मन-धन या कामीं खर्ची घालण्यास मी तयार आहे.' हें प्रतिपक्षाला सांगण्यास आपण धैर्यानें तयार झालें पाहिजे. आम्ही ही चळवळ करतों यांत आमचा स्वार्थ आहे, असें कित्येकांस वाटतें. स्वराज्याची चळवळ हा कांहीं व्यापार नाहीं कीं पुराण नाहीं. आपणांला या कार्यासाठीं धर्म-बुद्धीनें खटपट केली पाहिजे. आपला धर्म, आपलें जीवित, सारें स्वराज्याशिवाय फुकट होय, ही बुद्धि उत्पन्न झाली पाहिजे. मुसलमानांच्या परिषदेंत जीं भाषणें झालीं त्यांत स्वराज्य ही धार्मिक बाब होय, असें सांगण्यांत आलें. स्वराज्य ही कल्पना पाश्चात्त्य नव्हे. स्वराज्य न मिळेल तर जीवित विफल होईल, धर्म फुकट जाईल, अशी प्रत्येकाची भावना झाली पाहिजे. ध्येया-संबंधानें एकवाक्यता झाली ही सुदैवाची गोष्ट होय, पण पुष्कळ विघ्नें मार्गांत आहेत, मला आमच्या कार्यामध्यें विघ्नें दिसूं लागलीं आहेत. तीं न येतील तर मी परमेश्वराचे आभार मानीन, परंतु आलींच तर तीं दूर करण्याची ताकद मला दे, अशी मी परमेश्वराची प्रार्थना करीन. कांहीं लोकांची अशी उघड बुद्धि झाली आहे कीं, तुम्हांला कांहीं द्यावयाचें नाहीं. ही गोष्ट पक्की ध्यानांत ठेवा. दोन्ही पक्षांचे म्हणणें ऐकून पार्लमेंटला निर्णय करावयाचा आहे. आपला उद्योग पूर्ण कायदेशीर आहे. बेकायदेशीर असें कांहींहि नाहीं. उद्योग इतक्या तऱ्हेचा केला पाहिजे कीं, त्या योगानें हटकून सिद्धि मिळेल. काळ अनुकूल आहे. युद्धामुळें आमची राजनिष्ठा तर कसास लागलीच. पण युद्धानें हेंहि स्पष्ट झालें आहे की, हिंदुस्थानला सुखी आणि संतुष्ट ठेवण्यानेंच साम्राज्याला बळकटी येईल." (स. टि. खंड ६, पान ५०४–५०५.)

मजूर पक्षाची मदत शक्य

स्वराज्याच्या लढ्यात ब्रिटिश मजूर पक्षाची मदत मिळेल, पण हिंदी लोकांनी आपली चळवळ थंड होऊ देता कामा नये, असे सांगताना टिळक म्हणाले होते, "ब्रिटिश मुत्सद्दी तुमच्या पदरांत कांहीं तरी टाकून आजची वेळ निभावून नेण्याच्या विचारांत आहेत. या वेळीं जें कांहीं मिळेल तें तर घ्याच, पण पुनः

वाकीचें राहिलेलें मिळविण्यासाठीं निश्चयानें झटा. 'न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः' हा न्याय लक्षांत ठेवा. या मजूर पक्षाची तुम्हांस मदत मिळेल, पण तो तुमच्या उद्योगावर व निश्चयावर अवलंबून आहे. स्वराज्यासाठीं झगडण्याची ही वेळ आहे. भोजनाची नव्हे. स्वराज्य कोणी देत नाहीं, स्वराज्य घ्यावें लागतें. यावेळीं बुद्धिभेद व फूट होऊ देऊं नका. 'न देवा दंडमादाय रक्षन्ति पशुपालवत्। यं तु रक्षितुमिच्छंती बुद्ध्या संविभजन्ति तम्।' हे वाक्यं लक्षांत ठेवून आपली पात्रता सिद्ध करा. ज्यांच्या मुठींत स्वराज्य आहे त्यांची मूठ उघडण्याचें सामर्थ्य हीच पात्रतेची कसोटी होय. या वेळीं वाहत्या गंगेंत हात धुवून घ्या. नाहीं तर प्रवाह निघून गेल्यावर वाळूचे खडे पदरांत येतील. स्वराज्याचें पूर्ण माप पदरांत पडेपर्यंत झटण्याला किती लोक तयार आहेत तें सांगा. हा तुमचा निश्चय कायम राहील तर मी माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मानीन. ईश्वर तुम्हाला अशीच सद्बुद्धि देवो अशी प्रार्थना आहे." (स. टि. खंड ६, पान ६०९.)

जातिभेद विसरा

स्वराज्याच्या लढाईत सर्व जातींनी, सर्व धर्मीयांनी संघटितरीत्या सामील झाले पाहिजे. जातीजातीतील भांडणें, त्यांचे अधिकार यांचे वाटप या प्रश्नावर स्वराज्य मिळण्यापूर्वीच झगडे सुरू झाले, तर इंग्रज 'तुमच्यांत ऐक्य नाही' या सबबीवर स्वराज्याची मागणी पुन्हा पुढे ढकलतील, ही भीती आहे, असे टिळक सांगत. बेळगावला ११ नोव्हेंबर १९१७ रोजी केलेल्या भाषणात टिळक म्हणाले होते, "स्वराज्याला आपण अपात्र नाहीं. पण प्रत्यक्ष राज्यकारभाराची जबाबदारी आमच्यावर पडून आम्ही स्वराज्य उपभोगण्यास पूर्णपणें पात्र होण्यास आम्हांस चुका करायची संधि द्या, असें सरकारपाशीं आम्ही मागत आहोंत. या वेळीं जाति-जातींचे तंटे उत्पन्न करण्यांत अर्थ नाहीं. ब्राह्मण, जैन, लिंगायत, मराठे, मारवाडी अशा हजारों जाति हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत प्रतिनिधित्व मागूं लागल्यास अनवस्था प्रसंग प्राप्त होईल. राजकारणांत धर्म आड येतां उपयोगी नाहीं. बडोद्याच्या राज्यांत ग्रामपंचायती स्थापन करण्यांत आल्या आहेत, पण त्यांत जातवार निवडणुकीचें तत्त्व मान्य करण्यात आलेलें नाहीं. कायदेकौन्सिलांत प्रतिनिधी निवडून द्यावयाचा म्हणजे तो राजकारणांत हुषार असून लोकसेवा उत्तम रीतीनें बजावील कीं नाहीं, एवढें पाहिलें म्हणजे बस्स आहे. कारण कायदेकौन्सिल म्हणजे कांहीं हिंदुस्थानांतील जातींचे प्रदर्शन नव्हें. देशाची प्रगति होण्यास जातिजातींत मत्सर न वाढतां स्वजातीची उन्नति करून घेण्यासंबंधानें चुरस वाढली पाहिजे. जातवार निवडणुकीनें जाति-मत्सर उत्पन्न होऊन हिंदुस्थानची संघशक्ति नाहींशी होईल. जातवार निवडणुका करून हिंदुस्थानचे हजारों तुकडे पाडावे असें मला वाटत नाहीं.

जातिमत्सरामुळें व संघशक्तीच्या अभावामुळें हिंदुस्थानचें आजपर्यंत अत्यंत नुकसान झालें आहे. इतर प्रांतांत जातवार निवडणुकांचा हा तंटा उपस्थित झालेला नाहीं. महाराष्ट्रांत या वादानें डोकें वर काढावें हें खरोखर देशाचें दुर्दैव आहे. दक्षिणा वाटण्यापूर्वीच भिक्षुकांत तंटा सुरू होण्याचा हास्यास्पद प्रकार न करतां व स्वराज्याचें वाढून आलेलें ताट आपआपसांतील तंट्यामुळें लाथाडून न देतां एकतंत्रानें व एकदिलानें आपण ही मागणी केल्यास परमेश्वर आपणांस या कार्यांत खात्रीनें यश देईल." (केसरी, २० नोव्हेंबर १९१७, स. टि. खंड, ६ पान ५२९–५३०.)

"स्वराज्याची योजना देशांतील सर्व हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन वगैरे धर्मांच्या पुढाऱ्यांनीं पसार केली आहे. यांत कोणत्याहि विवक्षित जातीस अधिक अगर कमी हक्क मिळावे असें मागितलें नाहीं. ही योजना अमलांत आल्यास त्यांत सर्वांचेंच कल्याण आहे. हें स्वराज्य ब्राह्मणांचेंच आहे हें म्हणणें बरोबर नाहीं. भावी स्वराज्यांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांना सारखेच हक्क व त्यांचा दर्जा सारखाच राहील, यांत शंका नको. ब्राह्मणी स्वराज्य होऊन ब्राह्मणांचा वरचष्मा रहाणार, अशी चुकीची कल्पना डोक्यांत भरवून घेऊन देशांतील शहाण्यासुरत्या पुढाऱ्यांनीं ठरविलेल्या योजनेस विरोध करणें योग्य नाहीं. ही दिशाभूल आहे. स्वराज्यांत प्रथमतःच शिक्षण मोफत व सक्तीचें केलें जाईल. मोफत व सक्तीचें शिक्षण देण्यासंबंधानें ना. गोखले यांनीं अविश्रांत श्रम केले. पण सरकारच्याच आग्रहामुळें, हट्टामुळें, पैशाच्या अभावाची लंगडी सबब पुढें आणून, सरकारनें त्यांचे प्रयत्न निष्फळ केले. प्रस्तुतच्या राज्यपद्धतींत मोफत व सक्तीच्या शिक्षणाचें बिल पास होण्याची आशा नाहीं म्हणूनच आम्ही स्वराज्य मागतों. एकमेकांस आपल्या शंका आपण स्पष्टपणें कळवून त्या फेडून घेणें आपलें कर्तव्य आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा भेद पाडूं नका. आपण सर्व एकाच मायभूमीची लेकरें आहोत. सर्वांचे हक्क सारखेच आहेत व सारखेच राहतील. आपसांत भेद पडून ही संधि वाया घालविल्यास आपण देशाचें खास अहितच केल्यासारखें होईल." (केसरी, २३ ऑक्टोबर १९१७, स. टि. खंड ६, पान ५२८.)

महायुद्धाची सुवर्णसंधी

"वेळ मोठ्या आणीबाणीची आहे. महायुद्धानंतर साम्राज्याची जी पुनर्घटना होणार त्यांत स्वराज्यवाद्यांचा जय होऊन ब्युरॉक्रसीस म्हणजे अधिकारीवर्गाच्या सत्तेस उतरती कळा लागते, किंवा स्वराज्यवाद्यांचा पूर्ण नायनाट होऊन अधिकारीवर्गाची अनियंत्रित सत्ता हिंदुस्थानांत पुनः शेंकडों वर्षें तोऱ्यानें नाचत राहते, हें ठरण्याची आतां वेळ आलेली आहे. लॉर्ड पेंटलंड यांच्या भेडसावण्याला भिऊन हिंदुस्थानांतील लोक जर यावेळीं गप्प बसतील, तर घात झाला म्हणून समजा,

आणि आमचा घात म्हणजे ब्युरॉक्रसीचा जय होय! युरोपांतील महायुद्धांत जर्मनी-विरुद्ध एकवटलेलीं सर्व राष्ट्रें आपण सर्व देशांस स्वतंत्रता व स्वराज्य प्राप्त करून देण्याकरितां झटत आहोंत, असें कंठरवानें जगास सांगत आहेत, मग हिंदुस्थाननेंच काय म्हणून मागें राहावें? लॉर्ड पेंटलंड कांहींहि म्हणोत, आज हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त होण्याची वेळ आलेली आहे, हें निश्चित होय. पण स्वराज्याचें हें जांभूळ अचानक तुमच्या तोंडात पडेल असें समजूं नका, किंबहुना हें जांभूळ तुमच्या तोंडात दीर्घकाळपर्यंत, कांहीं शतकेंपर्यंत–अर्थात् बहुतेक केव्हांहि पडूं नये अशी येथील तुमच्यावर अनियंत्रित अधिकार चालविणाऱ्या वर्गाची इच्छा आहे व त्यासाठीं ते काय करण्यास तयार आहेत याचा पूर्वी जरी कित्येकांस संशय आला असला तरी तो संशय दूर करण्याचें श्रेय मोठ्या धैर्यानें आणि धाडसानें लॉर्ड पेंटलंड यांनीं घेतलेलें आहे. लॉर्ड पेंटलंड यांच्या या अविचारी कृत्यानें स्वराज्य प्राप्त करून घेण्याबद्दलच्या आस्थेची, कळकळीची आणि निश्चयाची जी लाट हिंदुस्थानभर आज पसरलेली आहे तीच दृढतर व चिरस्थायी करून, स्वराज्याचे हक्क मिळेपर्यंत ती तशीच कायम ठेवणें हें ह्या वेळचें आपलें कर्तव्य होय आणि तें मोठ्या उत्साहानें, धैर्यानें आणि नेटानें कोणत्याहि प्रकारचा मतभेद मनांत न ठेवतां केवळ मातृभूमीच्या उद्धाराकडे लक्ष देऊन सर्वांनीं पार पाडावें, अशी त्यांस आमची प्रार्थना आहे." (केसरी, २६ जून १९१७, स. टि. खंड ४, पान ११९.)

हक्कांसाठी रुसून बसा!

"हक्कांसाठीं रुसून बसलें पाहिजे, पण कायमच्या स्वरूपाचा कायदा लोकांसाठीं होईल त्या वेळीं जर अंमलदारीच्या जागा दिल्या नाहींत तर रुसून बसा. आज तुमच्या रुसून बसण्याला विचारतो कोण? लष्करी शिक्षण मिळालेले एक लाख लोक राष्ट्रांत रुसलेले आहेत, असें पाहिल्यावर कोणता सेनापति तुम्हाला असंतुष्ट ठेवण्यास धजणार आहे? आजचे सेनापति उद्यां निघून जातील. आजचे लाटसाहेब पांच वर्षांनीं निघून जातील. पण तुम्हां-आम्हांला येथेंच कायमचें राहावयाचें असून राष्ट्ररक्षक सैन्याचें काम पिढ्यानुपिढ्या करावयाचें आहे. एका पिढींत नाहीं तर दुसऱ्या पिढींतहि आमच्या हातांतील बंदूक आम्हांला लष्करी जागा दिल्याशिवाय राहाणार नाहीं."

"परिस्थिति सर्वांनाच पुढें ढकलीत असून, या परिस्थितीच्या ढकलण्यानेंच मॉंटेग्युसाहेब मोर्लेसाहेबांपेक्षां पुढें आलेले आहेत. परिस्थितीचें हें कार्य व परिणाम आपण ओळखला पाहिजे. आणि ही परिस्थिती कायम आहे तोंपर्यंतच आपल्या ध्येयास पूर्णपणें चिकटून राहून आम्ही आपला कार्यभाग उरकून घेतला पाहिजे. अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रें अगर सिडनेहॅमी टोळी आमच्या या निश्चयापासून

आम्हांला भ्रष्ट करण्याचा या वेळीं उद्योग करतील, पण चिलटाप्रमाणें कानांशीं गोड गोड गुणगुणून पाठीस दंश करणाऱ्या हितशत्रूंचे कावे आम्हीं पूर्णपणें ओळखूनच जें काय करावयाचें तें केलें पाहिजे. आमची अशी खात्री आहे कीं, आम्ही आपल्या ध्येयाला जर चिकटून राहिलों तर हल्लीं जो सुप्रभातकाळ आम्हांस प्राप्त झाला आहे, त्यातूनच स्वराज्य-सूर्याचा लवकर उदय होऊन त्याच्या प्रकाशानें हिंदुस्थान देश अधिक सतेज, देदीप्यमान व जिवंत दिसू लागेल." (स. टि. खंड ४, पान १४७–१४८.)

राजकीय ध्येयवादाचे अंतिम रूप

टिळकांनी इंग्लंडमध्ये असताना मजूर पक्षाचे राजकीय महत्त्व पुढे वाढणार आहे, हे हेरून त्याच्याशी संबंध जोडले होते. केवळ एका संपर्कातून स्वराज्याची कल्पना ते पुढे रेटतील, असे टिळकांना कधीच वाटत नव्हते. कारण एक पाऊल पुढे टाकावयाचे आणि आहे त्याचा फायदा घ्यावयाचा, हे टिळकांचे धोरण असल्याने ब्रिटिश पार्लमेंटमधील विरोधी पक्षीयांकडून हिंदुस्थानच्या स्वराज्याचे बिल आणावयाचे, हेच टिळकांचे यावेळी मर्यादित उद्दिष्ट होते, असे श्री. न. चिं. केळकरांनी 'टिळक चरित्रा'च्या तिसऱ्या खंडात म्हटले आहे. (पान ८७.) याच सुमारास टिळकांनी महायुद्धानंतर जी तह परिषद होणार होती त्या परिषदेचे अध्यक्ष मि. जॉर्ज क्लेमंको यांच्याकडे हिंदुस्थानच्या वतीने एक अर्ज केला होता. त्यात टिळकांनी स्वराज्याची मागणी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाच्या आधारे मांडली होती. त्यात म्हटले होते, 'हिंदी राष्ट्रीय सभेनें निवडलेला प्रतिनिधी या नात्यानें माझी एवढीच मागणी आहे की, ब्रिटिश वसाहतींना राष्ट्रसंघांत प्रतिनिधी पाठविण्याचा जो हक्क आहे तसाच हक्क हिंदुस्थानलाहि मिळावा. हिंदी लोक स्वराज्य चालविण्यास पात्र असून ते सुधारलेलें राष्ट्र असल्यानें त्याला स्वयंनिर्णयाचें तत्त्व लावण्यात यावें आणि स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास अनुसरून त्यांनीं आपल्या परिस्थितीला योग्य अशा प्रकारची व लोकसत्ताक राज्यपद्धतीला असलेली आपली राज्यपद्धति ठरवावी. सत्याचें शाश्वत तत्त्व आणि दंडुकेशाहीवर झालेला सत्याचा विजय लक्षांत घेतां हिंदुस्थानविषयीं स्वयंनिर्णयाचें तत्त्व जाहीर करणें न्याय्य व जरूर आहे. असल्या जाहीर वचनानें हिंदुस्थानांतील ३१ कोटि प्रजेचीं अंतःकरणें अत्यंत उल्हासानें व कृतज्ञतेनें भरून येतील हें तर खरेंच. पण याहून महत्त्वाची गोष्ट ही कीं, पार्लमेंटनें हिंदुस्थानसंबंधीं स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा पुकारा केल्यास जगांत शांतता नांदण्याची हमी देतां येईल, हिंदुस्थानची भरभराट होईल आणि आमच्या महान् हिंदी राष्ट्राशीं ब्रिटिश साम्राज्याचा कल्याणकारक संबंध येऊन तो कायम राहील." (न. चिं. केळकरकृत टिळक चरित्र, खंड ३, पान ९५–९६.)

सत्याग्रही टिळक

चिरोलने जे 'इंडियन अनरेस्ट' नावाचे पुस्तक लिहिलेले होते त्यात भारताच्या बदनामीकारक असा मजकूर होता. चिरोल हा ब्रिटिश पत्रकार हिंदुस्थानात १९०५ च्या सुमारास आला होता. त्यावेळचे हे पुस्तक होते. टिळकांनी त्यावेळी सरळ चिरोलवर खटला गुदरला. ब्रिटिश साम्राज्यशाहीला हा खटला टिळकांच्या विरुद्ध जावा, असे वाटत होते. तसा न गेला तर टिळकांचे राजकीय वजन वाढेल, अशी नोकरशाहीला भीती वाटत होती. पण टिळक हा खटला हरले, त्याचा खर्च त्यांना द्यावा लागला. हा खटला टिळकांच्या राष्ट्रकार्याचाच एक भाग होता. भारतीय जनतेने टिळक लंडनमध्ये असतानाच त्यासाठी निधी गोळा करावयास सुरुवात केली होती. हा निधी जवळ जवळ तीन लाख रु. जमला व टिळक इंग्लंडहून परत आल्यावर तो त्यांना अर्पण करण्याचे ठरले. टिळक २६ नोव्हेंबर १९१९ रोजी विलायतेहून मुंबईस परत आले. त्यानंतर टिळकांचे जे ठिकठिकाणी सत्कार झाले त्याला उत्तर देताना टिळकांनी सांगितले, " हल्लीच्या विलाचा फायदा घेऊन त्याच्याच अनुरोधानें आम्हांला पुढील चळवळीची दिशा आखली पाहिजे. "

प्रतियोगी सहकारितेचा पर्याय

ता. ८ डिसेंबर १९१९ रोजी अमृतसर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. पं. मोतीलाल नेहरू हे अध्यक्ष होणार होते. या अधिवेशनासाठी टिळक जात असतानाच ब्रिटिश बादशहांचा सुधारणाविषयक जाहीरनामा प्रसिद्ध झाला. टिळकांनी वाटेतूनच त्यावेळचे भारतमंत्री मॉंटेग्यू व व्हाइसरॉय यांच्यामार्फत बादशहाकडे आभारप्रदर्शक तार पाठविली. व त्यांत होमरूल लीगच्या वतीने 'प्रतियोगी सहकार्या'चे (Responsive Cooperation) आश्वासन त्यांना दिले. अशा रीतीने टिळकांच्या एका राजकीय तत्त्वाचा जन्म झाला. हे राजकीय तत्त्व अपरिचित असल्याने त्याबद्दल पुष्कळ मतभेद झाले. वादविवाद झाले. तेव्हा टिळकांनी स्वतःच त्याला उत्तर दिले. टिळकांनी 'केसरी'त म्हटले होते, 'बादशहाच्या जाहीरनाम्यात सहकारित्वाचा उपदेश नोकरशाही आणि प्रजा या दोघांसहि केलेला होता.' टिळकांच्या मते हा उपदेश प्रजेस करणे जरूर नव्हते. कारण प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टींत प्रजेने आपण होऊन कधी अडथळा आणला नाही, किंबहुना आणणेही शक्य नाही. आजपर्यंत जो अडथळा आणि विरोध झाला तो सर्व नोकरशाहीचा. ही नोकरशाही जर सहकारिता करावयास कबूल असेल व करील, तर प्रतियोगित्वाच्या नात्याने म्हणजे जबाबाला प्रतिजबाब म्हणून लोकही सहकारिता दाखविण्यास तयार आहेत असे बादशहास आश्वासन द्या, असा टिळकांच्या तारेचा अर्थ होता. बादशहांच्या आज्ञेबरहुकूम सहकारिता करण्यास नोकरशाहीची तयारी असल्यास लोकही आपल्या बाजूने सह-

कारिता करण्यास तयार आहेतच. नसल्यास मात्र विरोध करावा लागेल, असा टिळकांच्या तारेचा मथितार्थ होता. टिळकांनी शेवटी असेही म्हटले होते की, 'जाहीरनाम्याच्या जोरावर आम्ही सरकारशी वेळ आल्यास पुन्हा भांडूं.' (न. चिं. केळकर कृत टिळक चरित्र खंड ३, पान ३८–३९.)

राष्ट्रीय पक्षाचे धोरण

टिळकांनी फेब्रुवारी १९२० मध्ये पुण्यास स्वराज्य संघाच्या कार्यकर्त्यांशी विचार-विनिमय करून मॉंटेग्यूच्या जाहीरनाम्याने दिलेल्या सुधारणांविषयीचे आपले धोरण निश्चित केले. जाहीरनाम्यानुसार होणाऱ्या निवडणुकी लढविण्यासाठी राष्ट्रीय पक्षाने टिळकांकडे पक्षाचा निवडणूक जाहीरनामा तयार करण्याचे सोपविले. टिळकांनी जाहीरनाम्याचा कच्चा आराखडा अनेक नेत्यांना दाखविला होता, त्यांत महात्मा गांधी व बॅ. जिनाही होते. मुंबई प्रांतापुरता तो होता. पण इतर प्रांतांचे जाहीरनामे त्यासारखेच होते. हा २१ कलमी जाहीरनामा म्हणजे टिळकांच्या राजकीय विचार-सरणीचे अंतिम स्वप्न होते. त्यात अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी – म्हणजे श्रमिकांचे किमान वेतनाचे दर ठरविणे, राष्ट्रीय स्वयंसेवकांचे सैन्य उभारणे, हिंदुस्थान सरकारच्या नोकऱ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा घेणे, राष्ट्रभाषा ठरविणे, भिन्नधर्मीयांतील व्यवहार सलोख्याचे करणे, हिंदु-मुसलमान ऐक्य दृढ करणे, भाषावार प्रांतरचना करणे, प्रांतिक स्वायत्तता देणे, मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करणे, ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन करणे, वेठबिगाराला बंदी घालणे, धर्मस्वातंत्र्य, धार्मिक सहिष्णुता, स्त्री-पुरुष भेद न ठेवता मतदारसंघांची रचना करणे इत्यादि अनेक पायाभूत तत्त्वांचा पुरस्कार या जाहीरनाम्यांत केलेला होता. कॉंग्रेस लोकशाही पक्षाचे मंत्रवाक्य 'शिक्षण, चळवळ व संघटना' हे राहील, कॉंग्रेसबर अढळ निष्ठा व लोकशाही ही या पक्षाची मूलतत्त्वे राहतील, असेही त्यात म्हटले होते. टिळकांनी स्वराज्याची संकल्पना १९०६ पासून लोकांपुढे मांडली होती. त्या सर्व विवेचनाचा अर्क या जाहीरनाम्यात आला आहे. म्हणूनच टिळकांचे राजकीय मृत्युपत्र असे याचे वर्णन केले जाते.

टिळकांनी आयुष्याच्या शेवटी आपल्या कार्यकर्त्यांसमोर चिरोंल निधीच्या अर्पण-प्रसंगी जे भाषण केले त्यातच त्यांच्या स्वराज्याच्या प्रचाराचे भरतवाक्य होते, असे म्हणावयास हरकत नाही. टिळक म्हणाले होते. " सुधारणांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचा कीं नाहीं हा प्रश्न आतां उरलेला नाहीं. शक्य तितका उपयोग करून घ्यावयाचा व तो करून घेतां घेतां पूर्ण स्वराज्य मिळविण्याची खटपट करावयाची, असें आपलें धोरण निश्चित झालें आहे. सुधारणा थोड्या आहेत. त्यांना मिळणारी सत्ता थोडी आहे. पुष्कळांना भ्रम होता कीं, विलायतेंत स्वातंत्र्याची हवा

आहे म्हणतात तेव्हा टिळक येथें वसाहतीचें स्वराज्य मागतात तर तेथें जातांच स्वातंत्र्य मागतील. पण मी कॉंग्रेसच्या मागणीपेक्षां एक रतीभर कमी मागितलें नाहीं व जास्तहि मागितलें नाहीं. आणि मी स्वातंत्र्य मागितलें नाहीं म्हणून आमच्यातील कित्येक लोकांनीं मला मवाळ ठरविलें. तिकडे (विलायतेंत) याहून अधिक चळवळ झाली पाहिजे. राष्ट्रसंघ हें एखादें सोंग का असेना पण कांहींतरी निमित्त काढून त्याच्यापुढें गेलें पाहिजे. आपलें म्हणणें मांडलें पाहिजे. आणि युरोपीय राष्ट्रांपुढें आमचीं गाऱ्हाणीं मांडावयाचीं असलीं तर कॉंग्रेसशीं आपण असलेला संबंध तोडून चालावयाचें नाही. तिच्याशी ठेवावयाचा, पण तिच्या ठरावांची अंमलबजावणी स्वतंत्रपणें करावयाची. ”

टिळकांनी आपल्या आयुष्यांत ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध भारतात सुरू केलेल्या संघर्षात स्वराज्याच्या मागणीचा पुरस्कार व प्रचार यांना महत्त्वाचे स्थान होते. टिळकांचे श्रेय हेच की, त्यांच्यादेखतच ब्रिटिश सरकारने स्वराज्य देण्याचे तत्त्वतः मान्य केले. टिळकांनी लखनौच्या कॉंग्रेस अधिवेशनात स्वतःचे बहुमत निर्माण करून कॉंग्रेस ही एक राजकीय संघटना म्हणून संघटित केली. नोकरशाहीला तिचा दरारा निर्माण केला व निःशस्त्र प्रतिकाराचा कार्यक्रम कॉंग्रेसला स्वीकारावयास लावून भारतीय लोकशाही क्रांतीचे एक हत्यार पुढच्या पिढीच्या स्वाधीन केले. टिळकांची ही राजकीय कार्यपूर्ती होती. यावरून हेच सिद्ध होते की, टिळक हे भारतीय स्वराज्याचे निर्माते पुरुष होते. भारताच्या लोकशाही राज्यक्रांतीचे अग्रदूत होते.

१०

टिळकांचे सामाजिक चिंतन

टिळकांच्या सामाजिक भूमिकेसंबंधी दोन ठाम मते रूढ झालेली आहेत. टिळक हे सामाजिक दृष्ट्या प्रतिगामी होते, समाजसुधारणांचे ते विरोधक होते हे एक आणि दुसरे म्हणजे राजकीय हक्क मिळाल्यानंतर सामाजिक सुधारणा आपोआप होतील, हा टिळकांचा सिद्धांत होता. अर्थात् पहिले मत टिळकांनी त्यांच्या राजकीय जीवनात जे विविध सामाजिक प्रश्न उपस्थित झाले होते, त्यांच्याविषयी त्यांनी घेतलेल्या भूमिकेवर आधारलेले आहे. दुसऱ्या मतास टिळकांच्या निवेदनाचा निश्चित आधार देता येईल. त्यांनी स्वतः डिसेंबर १९१९ मध्ये 'मुंबई क्रॉनिकल'च्या संपादकांना पत्र पाठवून रॅग्लर परांजपे यांनी पुणे नगरपालिकेच्या मानपत्रासंबंधी घेतलेल्या आक्षेपांना उत्तरे दिली होती. त्यात टिळकांनी स्पष्टपणे म्हटले होते, " सामाजिक पुनर्घटनेचें कार्य राजकीय विमोचन होण्यापूर्वी हातीं घ्यावें असें माझें मत नाहीं. राजकीय विमोचनाला मी जास्त महत्त्व देतों. आपल्या स्वतःच्या भवितव्याला आपल्यास पाहिजे तसें वळण लावण्याची सत्ता असल्याशिवाय आपलें राष्ट्रीय पुनरुज्जीवन (अर्थात् व्यापक अर्थानें) होणें शक्य नाहीं, असें माझें मत आहे; आणि माझ्या आजपर्यंतच्या आयुष्यांत आरंभापासून शेवटपर्यंत मी हेंच मत लोकांना सांगत आलों आहे " (स. टि. खंड ६, पान ८४–८५.) तेव्हा टिळकांची प्राधान्यता कशाला होती, याचे त्यांनीच दिलेले हे निश्चितार्थी उत्तर आहे. पण प्रश्न असा आहे की, आपल्या राजकीय आकलनानुसार, प्राप्त देशस्थितीतील व्यूहरचनेनुसार टिळकांनी राजकारणाला प्राधान्य दिले असले, तरी पत्रकार म्हणून

व पुढारी म्हणून त्या काळी वेळोवेळी निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांबाबत टिळकांनी जी भूमिका घेतली होती, ज्या भूमिकेवरून ते सुधारकांशी संघर्ष करीत होते, ती भूमिका कोणती होती ? याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्या भूमिकेचा एक वैचारिक आकृतिबंध तयार होणे शक्य आहे. कारण त्यांची भूमिका केवळ प्रतिक्रियात्मक किंवा प्रत्युतरात्मक नव्हती. टिळकांचे सामाजिक चिंतन त्यातून प्रकट होत होते.

साधारणपणे तीन साधनांच्या आधारे टिळकांच्या सामाजिक भूमिकेचा आकृतिबंध तयार करता येतो. पहिले म्हणजे टिळकांनी फक्त सामाजिक प्रश्नांविषयी जे लेख लिहिले होते ते. दुसरे साधन टिळकांच्या भूमिकेचे समर्थन करणारे पण त्यांनी न लिहिलेले विचार-सादृश्य असणारे लेख. तिसरे साधन म्हणजे विवाद्य प्रश्नांवर उठलेल्या वैचारिक वादळात टिळकांनी लिहिलेल्या लेखांतून मिळणारी विचारसूत्रे. या सर्वांवरोवरच टिळकांचे व्यक्तित्व व त्यांच्या जीवननिष्ठा यांचेही त्यांच्या सामाजिक भूमिकेत महत्त्वाचे स्थान आहे.

तत्कालीन समाजस्थितीचे चित्र

टिळकांनी लिहिलेल्या 'केसरी'तील इतर व अनेक लेखांतही तत्कालीन समाजस्थितीचे चित्र आढळते. टिळकांनी १८८७ मध्ये 'केसरी'चे संपादकपद संभाळण्यास सुरुवात केली. त्याच वर्षी १० मे १८८७ पासून ६-७ लेख 'हिंदुत्व व हिंदु धर्म यांचे आधुनिक शत्रू' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले होते. ते आमच्या मित्राकडून लिहून आलेला मजकूर 'लि. आ. म.' या त्याकाळी रूढ असलेल्या प्रकारचे होते. त्यापैकी १० मे १८८७ च्या अंकातील लेखात म्हटले होते, "ज्ञानानें, शौर्यानें व धर्मादिक व्यवहारांनीं भिन्न अशा बलाढ्य राष्ट्रांशीं हिंदुस्थानचा संबंध झाला आहे. हें आमच्या हिंदुत्वास व हिंदु धर्मास अनेक प्रकारें बाधक झालें आहे. हें सांगण्याची येथें गरज नाहीं. हिंदु धर्मानें परमश्रेष्ठ असे गणलेले कित्येक गुण या परकीय अमलानें आम्हांस आचरता येत नाहींत. उलट त्यांचा त्याग करून त्याविरुद्ध गुणांचा व्यवहारांत स्वीकार करावा लागतो. धर्मास राजाश्रय तर नाहींच, परंतु राजविरोध असल्यासारखें झालें आहे. त्यामुळें व आमच्या दुर्धर दारिद्र्यामुळें धर्मास ग्लानि येण्याचें मोठेंच भय आहे. जोपर्यंत लोकांत बळकट श्रद्धा आहे, तोपर्यंत याहि राजकीय शत्रूस आमचा धर्म भिणार नाहीं. व म्हणूनच त्या श्रद्धेचें परिपोषण केलें पाहिजे." सारांश, खिस्ती धर्म, खिस्ती राज्यकर्ते व परस्परांचे सहाय्य हा फार मोठा धोका त्या काळी वाटू लागला होता. म्हणूनच त्या काळी स्वामी दयानंद, राजा राममोहन राय, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्यासारख्यांनी धर्मरक्षणाची चळवळ सुरू केली होती. टिळकांच्या सामाजिक विचारातही या संकटाची नोंद आहे,

एवढेच नव्हे तर त्यासंबंधी स्पष्ट मतप्रदर्शनही त्यांनी केलेले आढळते. त्याची चर्चा या प्रकरणात पुढे येईलच. पण त्या काळच्या परिस्थितीचा एक महत्त्वाचा घटक म्हणून त्याचा येथे प्रथम उल्लेख केला.

याच लेखात आपल्या समाजास परधर्मापासून जितका धोका आहे, तितकाच अविचारी, व्यसनी, सुधारकापासून धोका आहे असे म्हटले होते. 'हिंदु लोकांची गृहस्थिती' या शीर्षकाखाली फेब्रुवारी १९०३ मध्ये जे दोन लेख 'केसरी'त प्रसिद्ध झाले होते, त्यामध्ये आत्मनिंदा करणाऱ्या सुधारकांची टीकापद्धती चांगल्या रीतीने वर्णिली होती. त्यात म्हटले होते, "ज्यानें उठावें त्यानें हिंदु समाजाची, गृहस्थितीची, हिंदु स्त्रियांची, धर्माची, जातिभेदाची वगैरें इंग्रज लोकांपुढें निंदाच करीत सुटावें, मग ती कोणी धर्माच्या सबबीवर करो, अथवा कोणी सुधारणेकरितां करो, आमची गृहस्थिती येथून तेथून अन्यायाची, जुलमाची, अविचाराची, अधर्माची आणि निरभिमाननीय झाली असें मात्र होत नाहीं. कोणतीहि समाजव्यवस्था घ्या, तींत दूषणें असतातच. व तो कांटा सूज्ञ मनुष्य पाय कायम ठेवून सोयीनें काढून टाकतो. परंतु आमच्याकडच्या सुधारकांची स्थिति उलट आहे." हा लेख टिळकांचा नसला तरी त्या काळच्या सामाजिक सुधारकांच्या मनःस्थितीचे वर्णन करणारा आहे.

त्या काळांतील सुधारकांत अर्थात अनेक प्रकार होते. त्या पैकी एका वर्गाचे वर्णन करताना त्या लेखात म्हटले होते, "युरोपियनांचे आजार तेवढे चांगले, त्यांत कांहीं उणेपणा राहिला नाहीं, म्हणूनच ते राज्य करतात, ते मद्यमांस सेवन करतात ते शक्ति येण्यासाठीं करतात व आम्हीहि तसेंच केलें पाहिजे किंवा जातिबंधनांतील कोणतेंहि बंधन ज्यांस पसंत नाहीं, ज्यांना धर्म म्हटला म्हणजे ज्याचा त्यानें आपल्या मनानें सर्व धर्मांतील चांगली तत्त्वें निवडून बनवावीं आणि समाजाचीं बंधनें पीनल कोडांत येतील तेवढीं आणावींत, बाकीचीं ज्याच्या त्याच्या इच्छेवर सोडून द्यावीं, हीं हल्लींच्या सुधारणेचीं तत्त्वें आहेत." (केसरी, ३ मार्च १९०३.) असाही सुधारकांचा वर्ग होता.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस खिस्ती धर्मामुळे प्रभावित झालेल्या सुशिक्षितांच्या किंवा खिस्ती धर्मात गेलेल्यांचा एक गट प्रबळ होत होता. टिळकांनी या वर्गाविषयी अत्यंत कठोर टीका केली होती. अशाच एका धर्मांतर केलेल्या रे. करमरकर यांच्या आक्षेपांना उत्तर देताना टिळकांनी लिहिले होते, "खिस्ती लोकांचें व आमचें कोणत्याहि प्रकारें वांकडें नाहीं. मग ते खिस्ती अस्सल असोत किंवा हिंदूंचें खिस्ती झालेले असोत." पण उपाशी पोरे फितवून किंवा दुष्काळात धर्मप्रसार करून खिस्तीकरण चालू झाले होते. त्या संबंधी टिळकांनी कडक टीका केली होती. खिस्ती धर्मांतराची नवी चळवळ हा एक तत्कालीन समाजस्थितीचा महत्त्वाचा घटक होता. टिळकांचा सामाजिक विचार त्यांच्याशी अनुबद्ध होता. सारांश,

ख्रिस्तीकरण, आंग्लीकरण, युरोपियनांचे अंधानुकरण ही त्या काळच्या परिस्थितीची वैशिष्ट्ये होती.

याच अनुषंगाने टिळकांच्या सामाजिक विचारांची समीक्षा केली तर त्यांतील आवेश, चीड, अभिनिवेश, हिंदू धर्माचा टिळकांना वाटाणारा अभिमान किंवा 'जागे व्हा किंवा मरा' या लेखामध्ये व्यक्त झालेली पोटतिडीक समजू शकेल.

सामाजिक विचाराचा आधारघटक : राष्ट्रवाद

टिळकांचे राजकीय जीवन १८८० मध्ये सुरू झाले. तेव्हापासून १९०६ पर्यंतचा काळ हा भारतीय राष्ट्रवादाला ब्रिटिश साम्राज्यशाहीने व अरेरावी नोकरशाहीने दिलेल्या आव्हानाचा काळ होता. लॉर्ड कर्झन हे त्या उर्मट नोकरशाहीचे व साम्राज्यवादी अहंकाराचे प्रतीक होते. हाच भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाचा वा राष्ट्रीय चैतन्याचा हा काळ होता. एका बाजूला सांस्कृतिक अभिमान व दुसऱ्या बाजूला भारतीय समाजाची नवी राष्ट्रीय अस्मिता यांचे टिळक हे लढाऊ प्रतीक मानले जाऊ लागले होते. या राजकीय प्रक्रियेचाही टिळकांच्या सामाजिक विचाराचा परिणाम झाला होता. म्हणूनच यावेळी राष्ट्रीयत्वाचे रक्षण करणारी, 'भारताचे राजकीय ऐक्य अभंग राहावे,' अशी भूमिका टिळकांनी घेतली होती. त्यांनी लिहिले होते, "स्वधर्मावर श्रद्धा, आपलें राष्ट्र पुरातन असून तें ईश्वराच्या कृपेनें जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें होणें शक्य आहे असा दृढविश्वास, अभिमान व भरंवसा, आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग कळकळीनें करण्याची इच्छा व उमेद आणि संघय असल्याखेरीज कोणत्याही सुधारणेचें कार्य तडीस जाणें अशक्य आहे." (केसरी, ५ मे १९०३, स्फुट सूचना.) टिळकांच्या सामाजिक विचारांची बैठक व प्रेरणा ही होती. टिळकांच्या सामाजिक भूमिकेचा पहिला आधारघटक राष्ट्रवाद हाच होता.

राज्यशक्तीवर विश्वास

समाजपरिवर्तन करावयाचे असेल तर लोकमत सुशिक्षित करून, समाजाशी समरस होऊन ते घडवून आणले पाहिजे, समाजाच्या दुःस्थितीवर केवळ तार्किक हल्ले करण्याने ते होणार नाही, ही जशी टिळकांची एक भूमिका होती तशीच कायद्याने समाजसुधारणा होणार नाही, आणि तो करावयाचाच असेल तर स्वकीय सरकारने केला पाहिजे, लोकमताची बैठक कायद्याला दिल्याविना तो यशस्वी होणार नाही, अशीही भूमिका ते मांडत होते. तत्कालीन सरकार हे ब्रिटिशांचे होते. तेव्हा त्यांना आपल्या सामाजिक क्षेत्रात ढवळाढवळ करू देण्यापेक्षा स्वराज्याचे अधिकार मिळाल्यानंतर स्वकीय सरकारने हे सामाजिक कायदे करावेत, तोपर्यंत उदाहरण व शिक्षण हेच लोकपरिवर्तनाचे प्रभावी मार्ग आहेत, असे टिळकांचे मत होते. टिळकांचे

सुधारकांशी जे मतभेद झाले, त्यात दोन प्रकार होते. पहिला म्हणजे आगरकरांशी झालेला विचार-कलह. इहवादी किंवा धर्मनिरपेक्ष समाजसुधारणा टिळकांना पसंत नव्हती. पण आगरकर स्वराज्यवादी असल्याचे टिळकांनीच म्हटले होते. त्या दोघांतला मतभेद इहवादी सुधारणा इष्ट की धर्मनिष्ठ सुधारणा इष्ट यावद्दलचा होता. त्यामुळे सुधारणेचे मार्ग भिन्न होते. टिळकांनी त्यांचे स्पष्टीकरण करताना म्हटले होते, "मतभेद धार्मिक आणि सामाजिक बाबतींत झालेला होता. धर्मदृष्ट्या आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ त्यांनीं सामाजिक बाबतींतही निदानपक्षीं आपल्या लेखांत स्वीकारलेला होता. समाजावर तार्किक हल्ले करणें म्हणजे केवळ पाडापाडीचें काम करणें होय. त्यानें समाजवादीं बंधनें शिथिल होतात, पण नवीं मात्र उत्पन्न होत नाहींत." टिळकांचा सर्व समाजसुधारकांना असणारा विरोध एकाच कारणावरून नव्हता. न्या. रानडे, न्या. चंदावरकर, मलबारी शेट इत्यादी सामाजिक नेत्यांबद्दलचा टिळकांचा विरोध वेगवेगळ्या जातींचा होता. परस्पर सुधारक, दुर्धारक किंवा आंग्लाळलेले तोंडपुजे समाजनेतृत्व हे त्यावेळचे 'केसरी'त वापरले जाणारे वेगवेगळे शब्द, त्यांचा रोख काय होता, हे दाखविणारे आहेत. म्हणून टिळकांचे सर्व लढे हे द्वेषाने चाललेले व्यक्तिकलह होते, असे म्हणणे इतिहासाला धरून होणार नाही.

टिळकांच्या सामाजिक विचारांचा दुसरा आधारघटक म्हणजे त्यांचा राज्यशक्तीवर (State power) असलेला विश्वास व भारतातील राजसत्ता ही भारतीयांच्या हाती असावी म्हणून करावयाच्या प्रयत्नाला प्राधान्य व अग्रक्रम दिला पाहिजे ही त्यांची भक्कम समजूत. हे त्यांचे विचार, त्यांचे इंग्रजी सत्तेविषयीचे, पाश्चात्त्य साम्राज्यवादाविषयीचे त्यांचे आकलन, राजनैतिक डावपेचाची त्यांना असलेली सावध उमज यातून घडलेले आहेत. टिळक एकदा म्हणाले होते, "कोणत्याहि गोष्टीला येथें राष्ट्रीयत्वाचें तेज नाहीं. देश पारतंत्र्यांत पूर्ण बुडून राहिला आहे, तेव्हां पाहिजे आहे काय ? आम्ही एक राष्ट्र आहों, आम्हांला कांहीं या जगांतील कर्तव्य आहे...मनुष्यांचे जे स्वाभाविक हक्क आहेत ते आम्हांला मिळाले पाहिजेत. स्वतंत्रता आम्हांला पाहिजे आहे. आमचा कारभार चालविण्याचा हक्क आमच्या हातांत पाहिजे. या गोष्टी जर तुम्हांला मिळाल्या नाहींत, तर कोणतीहि सुधारणा फलद्रूप होणार नाहीं. तें सगळ्या सुधारणांचें मूळ आहे. सत्ता नाहीं तर शहाणपण नाहीं. नुसतें पुस्तकी शहाणपण सत्तेशिवाय व्यर्थ आहे. अशी जर तुमची समजूत असेल कीं, जे लोक राज्यकर्ते– आमच्यावर राज्य करावयाला आले आहेत ते आमच्यापेक्षा बुद्धीनें आणि विद्येनें अधिक आहेत तर माझी अशी समजूत नाहीं." (नगर येथील भाषण, १ जून १९१६.) टिळकांच्या राज्यशक्तीवर असलेल्या या विश्वासातून 'आधी राजकीय, मग सामाजिक,' ही त्यांची त्या काळातील प्रसिद्ध भूमिका निर्माण झालेली होती.

राष्ट्रीय 'स्व'त्वाचा शोध

टिळकांचा काळ हा राष्ट्रीय पुनरुत्थानाचा काळ होता. राष्ट्रीय 'स्व'त्वाच्या शोधासाठी इतिहास, पूर्वजांची स्मृती, स्वधर्म, वेदांती तत्त्वज्ञान, या सर्वांचा उपयोग करता येईल, अशी टिळकांची कल्पना होती. शिवाजी व गणपती ही उपास्य दैवते म्हणून त्यांनी निवडली, त्याचेही हेच कारण होते. त्यांनी लिहिले होते, "एक धर्म, एक राजा, एक भाषा हीं राष्ट्रीयत्वाचीं प्रधान अंगें आहेत. कोणत्याहि लोकांत ऐक्याची अभिवृद्धि होण्यास जीं अनेक साधनें असतात, त्यापैकींच एक उपास्य दैवत हें एक कारण आहे." राजकीय दृष्ट्या ब्रिटिशांचे समान प्रशासन हे राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे, असे जरी टिळकांचे मत होते, तरी शिवजयंतीच्या उत्सवाकडे ते लोकांत एकराष्ट्रीयत्वाची भावना व राष्ट्राबद्दलचा आपलेपणा, अभिमान जागृत करण्याचे एक साधन म्हणून पाहात होते.

धर्मविचार

टिळकांचा सामाजिक विचार धर्मरक्षणाच्या, धर्मपुनर्स्थापनेच्या संकल्पनेने प्रभावित झालेला होता. हा त्याचा आणखी एक आधारघटक होता. टिळकांचे व्यक्तित्व वेदांती होते. भावपिंड दार्शनिकाचा होता, समाजाचा मूलगामी विचार करण्याचा होता. भारताचे राष्ट्रीय वैशिष्ट्य धर्मविचारात आहे, भारताचे सांस्कृतिक ऐक्य धर्मामुळे कायम राहिले आहे, त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याशी ते अत्यंत निगडीत झालेले आहे, ही टिळकांची भूमिका होती. धर्माला धोका पोहोचविणारी सामाजिक चळवळ त्यांना पसंत नव्हती. हा मुद्दा स्पष्ट करणारी उद्धृतें येथे बानगीदाखल देण्यासारखी आहेत.

अज्ञेयवादावर भाष्य करताना टिळक म्हणाले होते, "हिंदुस्थानची जर कशाबद्दल ख्याति असली तर धर्मविचाराबद्दल होय. हे विचार हल्लीं शास्त्रीय पद्धतीनें आम्हांस सुचले नसतील अगर आम्ही त्याचें प्रतिपादन केलें नसेल, परंतु त्यामुळें त्यांची किंमत कांहीं कमी होते असें नाहीं." (केसरी, ११ ऑगस्ट १८९६) 'आपला धर्म' या विषयावर टिळकांनी लिहिले होते, "आम्हीं गेल्या पांचपंचवीस वर्षांत जे फुकट उपद्व्याप केले त्यांची निरर्थकता आम्हांस भासूं लागली. आमच्या धर्मविचाराला हल्लीं जें वळण लागत आहे तें तसेंच चालू राहून कायम राहिल्यास त्यापासून एकंदर राष्ट्राचें पुष्कळसें हित होणार आहे." (केसरी २३ फेब्रुवारी १८९२) 'स्वधर्म व स्वराष्ट्र' यासंबंधी टिळक एकदा म्हणाले होते, "स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यांस अभिमान वाटत नाहीं त्यांस स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान कोठून असणार? विषय निराळे असले तरी ग्रहण करण्यास मनाची आणि बुद्धीची स्थिति एकाच प्रकारची असावी लागते, हें उघड आहे व एका प्रसंगीं जर ती त्या प्रकारची झाली

तर दुसऱ्या प्रसंगींहि ती तशी होण्यास अडचण पडत नाहीं. धर्मोन्नतीचा व धर्माभिमानाचा जर राष्ट्रीय अभ्युन्नतीशीं कांही संबंध असला तर तो याच प्रकारचा होय. (केसरी, ३ सप्टेंबर १८९६, यदाचा गणपत्युत्सव.)

धर्मरक्षण व धर्मपुर्नस्थापनेचा बीजविचार

यामुळेच टिळकांच्या सामाजिक विचारात धर्मरक्षण, धर्मपुनर्स्थापना किंवा धर्माचें नूतनीकरण यांचा बीजविचार आढळतो. त्यांची ती सुप्त इच्छा वा आकांक्षा असावी, असे वाटते. 'जागे व्हा किंवा मरा' या ख्रिस्ती धर्मांतराविषयी अत्यंत तळमळीने लिहिलेल्या अग्रलेखात टिळकांनी ही भावना व्यक्त केली होती. त्यांचे म्हणणे होते, "आमच्या धर्माचा पाया फार पुरातन असून तो उत्तम तत्त्वांवर रचला आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. तसेंच सत्पक्षाचा भगवत्साह्यानें अखेरीस जय झाल्यावांचून रहात नाहीं असें आम्हांस खुद्द भगवंतांनींच 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।' या गीतावाक्यांत सांगितलेलें आहे. पण एवढ्यावर भिस्त ठेवून आमच्या समाजानें स्वस्थ बसणें हल्लीं प्रशस्त आहे कीं नाहीं याचा नीट विचार करण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे. आधुनिक राज्यपद्धतीचीं तत्त्वें गृहीत धेऊनच आम्हांस धर्माच्या संरक्षणार्थ ज्या कांहीं तजविजी कराबयाच्या त्याच्या तजविजीस लागलें पाहिजे." तसेच 'वेदांतासारख्या व्यापक धर्ममतांत सर्व धर्मांचा अंतर्भाव करून सर्व धर्मांच्या पंथाच्या लोकांचें ऐक्य होणें हें वर्णसंकर करून एक धर्म करण्यापेक्षां अधिक सुखकर व शक्य आहे असें पुष्कळांचें अलीकडे मत होऊं लागलेलें आहे.' याचा विरोध न करता टिळकांनी आपल्या लेखात उल्लेख केलेला होता. तसेच 'केसरी' मध्ये हिंदुधर्माच्या पुनर्रचनेविषयी त्यांनी बाहेरून आलेल्या मजकुराची एक लेखमाला प्रसिद्ध करून त्यावर भाष्य करताना अशा पुनर्रचनेची गरज प्रतिपादली होती. शंकराचार्यांनाही धर्मशासनासाठी धर्मसभा पाहिजे, अशी त्या लेखातून सूचना होती. देवस्थानांच्या कारभारासंबंधी १८९७ मध्ये लिहिताना त्यांनी 'त्यांच्यावर समाजाची सत्ता पाहिजे' असे ध्वनित केले होते. आपला धर्मविचार हा सुसूत्र स्वरूपात त्यांनी कधी मांडला नाहीं. हिंदुधर्माचें स्वरूप-लक्षण सांगून हिंदू शब्दाची व्याख्या करण्याचा फक्त प्रयत्न केला, पण धर्मविहीन समाज (Secular Society) त्यांच्या समाज-कल्पनेत बसत नव्हता, हे निश्चित.

राष्ट्रीयत्व व भारतीय समाजसुधारणा

राष्ट्रीय उत्थान व स्वातंत्र्य ही टिळकांची राजकीय उद्दिष्टे होती. ही दोन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकशाही मार्गाने त्यांना लोकांना बरोबर घेऊन जावयाचे होते.

म्हणून समाजसुधारणेकडे त्यांनी, एकांगी दृष्टीने पाहिले नाही. राष्ट्रीयत्वाचे भान व राष्ट्रनिर्मिती ध्येय सतत ठेवले.

राष्ट्रीय उत्थानासाठी पूर्वजांची स्मृती, इतिहासाचा व समान परंपरेचा अभिमान या घटकांची गरज असते हे जसे टिळक मानीत होते तसेच समान संस्कृतीनेच हिंदुस्थानच्या ऐक्याचा पाया दृढ केलेला आहे असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले होते.

" भारत हा पृथक् समुदायांचा ' गप्पागोंधळ ' किंवा ' मेकॅनिकल कॉंबिनेशन ' आहे, ' हे काहींचे त्यावेळीं असलेले मत टिळकांना मान्य नव्हते. ' भारताचे राष्ट्रीयत्व हे वैदिक धर्माशी निगडीत होते. भारतातील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे राजे राज्य करीत असत. परंतु ते धर्मदृष्ट्या एक होते. आणि तशा दृष्टीनें पाहिलें तर भारतवर्ष त्या वेळचें एक मोठें हिंदुराष्ट्र होतें. ' असे मानणाऱ्या टिळकांनी म्हटले होते, " कोणतीहि सामाजिक सुधारणा स्वीकारतांना आम्ही आमचें मूळ काय हें विसरतां कामा नये आणि तसें होईल तरच आमचें राष्ट्रीयत्व कायम राहून आम्ही प्रगतीच्या मार्गास लागूं. नव्या परिस्थितीला अनुकूल असे फेरफार कोणास नको आहेत असें नाहीं. पण जे फेरफार व्हावयाचे त्यामुळें हिंदुत्वाचा अभिमान नष्ट होऊं नये अशी खबरदारी प्रत्येकानें घेतली पाहिजे. " (केसरी, ५ जानेवारी १९०४.) पण टिळकांचे ' हिंदुत्व व हिंदुराष्ट्र ' हे शब्द संस्कृतिवाचक होते, हे लक्षात घेतले पाहिजे. भारताच्या राष्ट्रीयत्वाचा गाभा व पाया हिंदू संस्कृती हाच आहे, एवढाच त्यांच्या निवेदनाचा अर्थ होता.

विकसनशील संकल्पना : राष्ट्रीय जाणिवेचा प्रवाह

ख्रिस्ती धर्मांतराच्या प्रश्नासंबंधी लिहिताना 'केसरी'च्या स्फुट लेखात टिळकांनी म्हटले होते, "ख्रिस्ती लोकांचें व आमचें कोणत्याहि प्रकारें वाकडें नाहीं. मग ते ख्रिस्ती अस्सल असोत किंवा हिंदूंचे ख्रिस्ती झालेले असोत. हिंदुस्थान ही ज्यांची जन्मभूमि आहे वतिचा उत्कर्ष व्हावा, अशी ज्यांची मनापासून इच्छा आहे ते सर्व आमचे बंधु होत, त्यांचा धर्म, जात किंवा रीतभात कोणतीहि असो." टिळकांनी आपली राष्ट्रीयत्वाची संकल्पना हिंदूंपुरती मर्यादित न ठेवता मातृभूमिनिष्ठ केली होती. फक्त लालूच दाखवून केलेल्या धर्मांतरास त्यांचा विरोध होता. धर्मस्वातंत्र्याचा हक्क म्हणून धर्मरक्षण, ही त्यांची भूमिका होती. ती भारतात असलेल्या सर्व धर्मांसाठी होती. केवळ हिंदूंसाठी नव्हती. तरीही टिळकांची इच्छा वेदांती जीवनदृष्टीचा उपयोग करून भारताला गीतेतील कर्मयोगाच्या आधारावर नवे सामाजिक नीतिशास्त्र देण्याची होती. त्यांचा सामाजिक विचार, राष्ट्रीयत्व व जीवनदृष्टी अशी परस्पर निगडीत होती. टिळक हेच गीताधर्माचे नवे स्फुरण होते. याचे विवेचन पुढे एका स्वतंत्र प्रकरणात केले आहे. पण येथे ते नमूद करण्याचे कारण हे की, टिळकांनी सामाजिक भूमिका केवळ तत्कालीन सामा-

जिक प्रश्नांविषयीच्या त्यांच्या प्रतिक्रियांनी झालेली नव्हती, तर भारताच्या जीवन-तत्त्वज्ञानाचे त्यांचे आकलन, त्यांचा राष्ट्रवाद, भारताच्या संस्कृतीचा अभिमान, त्यांच्या व्यक्तित्वाचा कंद, या सर्वांशी तिचा संबंध होता. म्हणून त्या सर्वांचा एकत्रित विचार व्हावयास हवा आहे. कारण हे सर्व विषय परस्परसंबंधित असे आहेत.

भारतीय समाजरचनेचे रहस्य

धर्म व परंपरेबद्दलच्या टिळकांच्या अभिमानामुळे हिंदूंच्या समाजसंस्था व आचार-धर्म यांच्यात क्रांतिकारक बदल करण्याच्या सूचनेस त्यांचा सहज पाठिंबा मिळत नसे. सुधारणा नको असे त्यांनी कधीच म्हटले नाही, पण जुन्या संस्था बदलताना खोल व व्यापक विचार, लोकमत, अस्तित्वात असलेल्या सामाजिक संस्थांचा सामाजिक उपयोग असा चौफेर विचार सुधारकांनी केला पाहिजे, असा टिळकांचा मुद्दा असे. भारतीय समाजरचनेचे रहस्य आधी समजून घेतले पाहिजे, हे स्पष्ट करताना टिळकांनी लिहिले होते, "इंग्रजी विद्येच्या टांकसाळींत तयार झालेल्या हिंदु विद्वानांपैकीं पुष्कळांत या ज्ञानाचा प्रायः अभावच आढळून येतो. हिंदु समाजाची रचना कोणत्या पायावर झालेली आहे, त्यांतील लोक एखाद्या कामीं जी उत्सुकता दाखवतात त्याची गुरुकिल्ली कोठें आहे या गोष्टीचें ज्ञान शाळांतून, कॉलेजांतून अगर युनिव्हर्सिटींतून नजरेस येत नाहीं व ज्या चुका होतात त्याचेंहि मूळ बीज हेंच होय. एखाद्या मोठ्या यांत्रिक कारखान्यांची कळ ज्याप्रमाणें कांहीं विवक्षित ठिकाणीं असते, त्याप्रमाणें समाजाची स्थिति होते व समाजाचें विराट स्वरूप बदलण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यास तें स्वरूप कोणत्या कारणामुळें प्राप्त झालें ह्याचा विचार केला पाहिजे." समाजरचनेचे हे रहस्य शोधल्याविना, उमजल्याविना समाजसुधारणा यशस्वी होणार नाही, असा टिळकांनी इशारा दिला होता. (केसरी, ३ मार्च १८९६, स्फुट लेख.)

सुधारकांच्या नेतृत्वातील उणिवा

टिळकांनी तत्कालीन सुधारकांच्या नेतृत्वात ज्या उणिवा होत्या, त्याचे वेगवेगळ्या वेळी उल्लेख केलेले आढळतात. त्यात काही समान सूत्रे अशी की, सुधारणेचा मूळ पाया आचार हा आहे. ज्ञान व आचार या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. लोकप्रवर्तनाचे दुसरे साधन म्हणजे शिक्षण. उदाहरण व शिक्षण हीच सुधारणेची, लोकप्रवर्तनाची मुख्य साधने टिळक मानीत असत. (केसरी, २ व २३ ऑगस्ट १८८७.) सुधारणेसाठी टिळक लोकमताचा आग्रह धरीत. "लोकमत सुधारणेच्या दृष्टीने जर मागे पडत असेल, तर ते शिक्षित व संघटित केले पाहिजे. तेव्हां कायदा कायदा म्हणून ज्यांनीं ओरड मांडली आहे त्यांनींहि लोकमत आपल्या बाजूनें करण्याची खटपट केली पाहिजे. बहुमत आपल्या बाजूचें झाल्याखेरीज

हल्लीच्या काळांत कोणत्याहि प्रकरणीं यश येण्याची आशा राहिलेली नाहीं." (केसरी, १८ नोव्हेंबर १८९०.) "आणि जोपर्यंत मिशनरी लोकांप्रमाणें स्वार्थत्याग करून कळकळीनें समाजास पोटाशीं धरण्याचें काम करण्यास कोणीहि सुधारक तयार नाहीं, तोपर्यंत समाजांत जो धर्म प्रचलित आहे त्यावर त्याचा विश्वास नाहीं अथवा जोपर्यंत न्यायमीमांसेच्या जोरावर यंव चांगलें आहे त्यंव चांगलें आहें असें मुखानें वर्षांत एकदा उद्‌गार काढून आपलें कर्तव्य केलें असें म्हणून तो आपलें समाधान करून घेत आहे तोपर्यंत त्याचें किंवा सुधारणेचें पाऊल कधींहि पुढें पडणार नाहीं. सामाजिक सुधारणेसंबंधानें सुधारकांचे हे दोष आम्ही मागें अनेक वेळां दाखविले आहेत." (केसरी, ७ मे १९०३.) लोकशिक्षण, स्वतःचे आदर्श वर्तन, लोकमतप्रवर्तन व समाजाशी आपुलकीचे नाते असणारे व स्वधर्माचा अभिमान असणारे नेते समाजाचे नेतृत्व प्रभावीपणे करू शकतील, हा टिळकांचा विश्वास होता. म्हणून त्यांच्या तत्संबंधीच्या लिखाणाकडे या दृष्टीने पाहिले पाहिजे तरच त्यातील आवेश, उद्वेग, चीड उमजतील.

भास्करराव गोवंडे नावाच्या गृहस्थांनी खिस्ती धर्म स्वीकारला त्यावेळी लिहिलेल्या केसरीतील स्फुटात (१० जुलै १९००) टिळकांनी म्हटले होते, "हिंदुधर्मांत किंवा रीतीरिवाजांत ज्यास सुधारणा करावयाची असेल त्यास 'मी हिंदु आहे व मला हिंदु राहावयाचें असा पहिल्यानें पूर्ण अभिमान पाहिजे. लूथर वगैरे सुधारक अशा प्रकारचे होते."

इंग्रज सरकारची फूस

भारतात स्वातंत्र्यलढ्याच्या काळात जे सामाजिक प्रश्न निर्माण झाले त्यांना अंशतः तरी इंग्रज सरकारची भेदनीती कारणीभूत होती, हे निर्विवाद आहे. हे वेळोवेळी सांगण्यात येत असेच. पण कागदपत्रांच्या आधारे ते आता सिद्धही करता येते. हिंदू-मुस्लीम प्रश्न, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हे असेच दोन महत्त्वाचे सामाजिक प्रश्न होते आणि इंग्रजांची फूटनीती हे संघर्ष सतत पेटते ठेवी. १८९२ पासून हिंदू-मुस्लीम दंग्यांच्या वेळी टिळकांनी हे सतत सांगितले होते की, "ठिकठिकाणचे सरकारी अधिकारी मुसलमान लोकांस जर विनाकारण फूस देणार नाहींत तर हिंदु-मुसलमानांतील पुढारी एकत्र येऊन ते केव्हांच मिटवून टाकतील. मुंबईच्या दंग्यांचे वेळीं आम्हीं जे लेख लिहिले होते, त्यांत हिंदुमुसलमानांतील तंटे मोडण्यास हिंदु, मुसलमान आणि सरकार या तिन्ही पक्षांत एकमत होणें आवश्यक आहे, असें आम्हीं म्हटलें होतें. अद्यापहि आमचें तेंच मत आहे." (केसरी, २ ऑक्टोबर १८९४.) 'समाजांतील फूट' या अग्रलेखात टिळकांनी याही पूर्वी म्हटले होते, "आमच्या देशांत परस्परांत असलेलें वैमनस्य पाहून परकीयांस कां वरें आनंद वाटणार नाहीं? हिंदुस्थानांत

जातिवैचित्र्य पुष्कळ आहे हें जाणून कित्येक इंग्रज हरएक प्रसंगीं जातिवैनमस्य वाढविण्यांतच यत्न करीत असतात. हिंदुस्थानांत दुही माजेल तेवढी बरी, असा या लोकांचा समज झाला असून तसल्याच गोष्टींस ते नेहमीं उत्तेजन देतात." (केसरी, ३१ फेब्रुवारी १८८०.)

समन्वयाचा विचार

टिळकांनी 'केसरी' च्या व स्वतःच्या सामाजिक प्रश्नांविषयी जे सर्वसाधारण स्पष्टीकरण केलेले होते, त्यांचाही येथे उल्लेख आवश्यक आहे. १९०२ साली 'केसरी' च्या प्रगतीचे सिंहावलोकन करताना टिळकांनी लिहिले होते, "केसरीत जुन्या गोष्टी आहेत तशा चालाव्या, त्यांत किंचित्ही व्यंग नव्हतें असें कधींच वाटत नव्हतें, वाटलेंही नाहीं. परंतु नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकांस सांगताना त्यांना केवळ मूर्ख न मानतां, त्यांचें जें कांहीं म्हणणें असेल तें पूर्णपणें लक्षांत घेऊन त्या धोरणानें नव्या जुन्याचा मेळ घातला पाहिजे व त्याकरितां शक्य तितक्या स्पष्ट व निर्भीडपणें कांहीं गोष्टी लोकांपुढें मांडल्या पाहिजेत, असें 'केसरी' कारांचें मत आहे." (केसरी, ११ फेब्रुआरी १९०२.) याआधी १८८८ मध्यें केसरी नुकताच टिळकांच्या नावे निघू लागल्यानंतर जो सिंहावलोकनाचा लेख लिहिला होता, त्यात पत्रकार म्हणून त्यांनी घेतलेल्या भूमिकेचा स्पष्ट उल्लेख होता. त्यांनी म्हटले होते, "इंग्रजी विद्येच्या परिशीलनानें आमची नीति दोनहि पक्षांस सारखीच कळूं लागली आहे. अशा स्थितींत प्रस्तुतचे 'नायक' जर आत्मविद्याभिमानानें आम्हांस भलतीकडेच ओढूं पहातील तर त्यांस वेसण घालून मार्गावर आणण्याचा प्रयत्न आम्हांस 'स्वसंरक्षणार्थ' जरूर करावा लागेल. लोकनायकास जर आपलें नायकत्व कायम ठेवणें असेल तर स्वतः घस सोसून व लोकांस बरोबर घेऊनच त्यानें सुधारणेच्या कृत्यास लागलें पाहिजे. सुधारणा सर्वांस पाहिजे आहे, पण कांहीं एक न करतां दयानंद, मलबारी जो कोणी येईल त्याचा खंडोबा करून आपल्या हातून न झालें तर 'येन केन प्रकारेण' सुधारणेचें घोडें पुढें ढकलण्याची व लोकांत जरी चळवळ झाली, मग ती आपल्याविरुद्ध कां असेना, आपणांस कृतकृत्य मानून घेण्याची शक्कल आम्हांस बिलकुल पसंत नाहीं. लोकप्रवर्तनाचे खरे मार्ग कोणते आहेत याचा विचार आम्ही गेल्या सालींच केलेला आहे." (केसरी, ३ जानेवारी १८८८.) टिळकांची पत्रकार म्हणून किंवहुना सांस्कृतिक संघर्षातील संस्कृतिसंरक्षक मताचे अभिमानी, तत्त्वचिंतक व टीकाकार म्हणून ही भूमिका होती. 'तत्त्व मान्य परंतु तपशील अन्याय' अशी ती होती, असे म्हणण्यापेक्षा 'गरज मान्य, पण गरजवंताच्या मताची, भावनांची, अनुभवाची कदर सुधारकांनी करून लोकानुरंजन, लोकप्रवर्तन, लोकमत-परिवर्तन, समन्वय या भूमिकेतून सामाजिक

प्रश्न हाताळले पाहिजेत' ही टिळकांची भूमिका होती, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. त्यातील त्वेष, आवेश, कलहप्रियता, इत्यादि गुण एकपक्षीय नव्हते. दोन्ही पक्षांनी ते दाखविले होते.

मार्गाबद्दल मतभेद

'समाजसुधारणा आम्हाला हवी आहे पण आमचे मार्ग वेगळे आहेत' असे टिळकांनी वारंवार म्हटले होते. १९१९ मध्ये टिळकांनी रँग्लर परांजपे यांना उद्देशून पत्र लिहिले होते, "जुन्या पायावरच इमारत बांधण्याची इच्छा खऱ्या राष्ट्रीय पुरुषास असते. जुन्या तत्त्वाविषयीं अनादराची बुद्धि बाळगून केलेली सुधारणा विधायक आहे, असें त्यास केव्हांहि वाटणार नाहीं, म्हणूनच कोणत्याहि सुधारणेस हात घालण्यापूर्वी स्पष्ट राष्ट्रीय हिताचें रक्षण करणें व त्यास उर्जितावस्था आणणें हीं कामें तो करीत असतो. १८४०–५० च्या सुमारास हिंदुस्थानांत ज्यांनीं राजकीय चळवळ सुरू केली त्यांनीं राष्ट्रोद्धारापेक्षां राजकीय हक्कासच जास्त महत्त्व दिलें. हल्लींचा राष्ट्रीय पक्ष या प्रश्नाचा विचार अगदी वेगळ्या दृष्टीनेंच करीत आहे. आम्हांस आमच्या संस्था इंग्रजी वनवावयाच्या नाहींत आणि त्यांस सामाजिक आणि राजकीय सुधारणांच्या नांवाखालीं राष्ट्रीयत्वापासून भ्रष्ट करावयाच्या नाहींत. आम्हांला आपली प्रगति करून घेऊन आमच्या राष्ट्रास जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांच्या पंक्तीस वसवावयाचें आहे. आम्ही राष्ट्रीय पक्षाचे लोक जुन्या पद्धतींतील चांगुलपणास योग्य तो मान देऊन व राष्ट्रोद्धारा-करिता व प्रगतीकरितां जरूर ते फेरफार करून राष्ट्रीय भावनांचें रक्षण करण्याची, व उत्तेजन देण्याची हांव बाळगणार हा भेद लक्षांत आणण्याची परांजप्यांनीं क्षिती बाळगली असती, तर समाजसुधारणेच्या संबंधीं माझ्या उद्योगाचा विपर्यास त्यांनीं केला नसता." याचा निष्कर्ष असा की, राष्ट्रीयतेचे पुनरुज्जीवन हे सामाजिक व राजकीय सुधारणेपेक्षा गौण कार्य नाही असे टिळकांचे मत होते. जगातील सुधारलेल्या राष्ट्रांच्या मालिकेत भारताला नेऊन वसवण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती ती राजकीय स्वरूपाची नसून सांस्कृतिक महत्तेवर आधारलेली होती. वेदांती परंपरा असलेला भारत त्यांच्या डोळ्यांसमोर होता. म्हणून त्या राष्ट्रीय अस्मितेला धक्का बसेल, गौणत्व येईल अशी समाजसुधारणा त्यांना नको होती. हा नुसता मार्गाबद्दल मतभेद नव्हता. टिळकांचें उद्दिष्टच व्यापक होते. आयुष्याच्या शेवटी टिळकांनी केलेल्या सिंहावलोकनात व्यक्त झालेली ही टिळकांची मते होती. पण ती १८८७ साली त्यांनी केसरीचे संपादकपद स्वीकारल्यानंतर १८८८ मध्ये केलेल्या सिंहावलोकनाशी किती जुळत होती हे पाहाण्यासारखे आहे. 'केसरी'ला आठवे वर्ष लागताच लिहिलेल्या 'सिंहावलोकन' या अग्रलेखात 'समाजसुधारकांचे जे नेतृत्व त्याकाळी होते तेच उखडून टाकण्याचा 'केसरीकार' प्रयत्न करीत आहेत,' या आक्षेपाचा उल्लेख

करून म्हटले होते, " समाजशकट खड्ड्यांत घालणाऱ्या नायकापेक्षां असले नायक मुळीच नसले तर चांगलें नव्हे काय ? सध्याच्या नामधारी नायकांत व लोकांत अशा प्रकारचा बेबनाव झाला आहे व तो आम्हीं आपल्या लेखांतून व्यक्त करून दाखविण्याचा निरनिराळ्या प्रकारांनीं प्रयत्न केला आहे. त्याचें खरें कारण असें आहे कीं, लोकनायकांच्या अंगीं जे गुण असावेत त्यांपैकीं बहुतेक प्रस्तुत नायकांच्या ठायीं मुळींच वास करीत नाहींत. याचमुळें इंग्रजी विद्यासंपन्न लोकांतहि आज दोन पंथ झालेले आहेत. " (केसरी, ३ जानेवारी १८८८.)

लोकप्रवर्तनाचे मार्ग

रूढीच्या विरुद्ध व सुधारणेच्या अनुषंगाने लोकप्रवर्तन करण्याचे मार्ग कोणते, यावर टिळकांनी ऑगस्ट १८८७ मध्ये दोन लेख लिहिले होते. त्यात त्यांनी समाजसुधारणा ज्यांना करावयाची आहे त्यांनी स्वतः कसे वागले पाहिजे, याचे विवेचन केले होते. त्यांनी म्हटले होते, " आज ज्या राष्ट्रांचें थोडेंबहुत अनुकरण करण्यास आम्ही झटत आहोंत त्या राष्ट्रांतहि ज्या कांहीं अनर्थकारक चाली आहेत त्या मोडून टाकण्यास तिकडील सुधारक कोणत्या उपायांची योजना करतात याचें एक उदाहरण खालीं दिलें आहे. त्यावरून सुधारलेल्या राष्ट्रांतहि रूढ आचार मोडण्यास किती श्रम, काल व खर्च लागतो, याची पेनाच्या एका फटक्यानें हिंदु समाजांतील परंपरागत आलेला प्रघात सुधारूं पहाणाऱ्या आमच्या सुधारकांस थोडीशी कल्पना येईल. " अशी प्रस्तावना करून टिळकांनी युरोपातील मद्यपानाच्या संवयीची व ती कमी करण्यासाठी होणाऱ्या चळवळीची माहिती दिली होती. शेवटी निष्कर्ष काढताना त्यांनी म्हटले होते, " इंग्लंडांतील सुधारकांनीं आमच्याप्रमाणें कधींहि उतावीळपणा दाखविला नाहीं. राष्ट्रांतील अत्यंत रूढ झालेले दुष्ट प्रकार मोडून काढणें झाल्यास ते कार्य लोकांची समजूत घालूनच केलें पाहिजे, व ही गोष्ट कालांतरानेंच साध्य होणार आहे अशी त्यांची खात्री झाल्यामुळेंच या कामीं कायद्याची मदत न घेतां प्रथमतः त्यांनीं मद्यपानविवेक मंडळें स्थापन करण्यास सुरुवात केली. आमच्याकडील सुधारक आपल्याकडे समंजसतेचा मक्ता घेऊन आपल्या पक्षाचे दहा पांच लोक झाले कीं, सर्व राष्ट्रासाठीं कायदा मागूं लागतात, पण उदाहरण व लोकशिक्षण यांचेंच या बाबतींत पुष्कळ साह्य घेतलें पाहिजे व बहुमत जेव्हां आपल्याकडचें होईल तेव्हां कायदा करणें सुकर होऊन तो लोकांस मान्य होईल. लोकांस चांगल्या मार्गास लावण्यास उदाहरण व शिक्षण हीं दोन मुख्य साधनें आहेत. त्यांचा उपयोग करणें ज्यास आवडत नसेल किंवा तसें करण्याची ज्यांचे अंगीं शक्ति नसेल त्यांनीं उगीच वटवट करण्यांत किंवा समाजावर नुसते प्रतिबंध आणण्यांत काळाचा दुर्व्यय करूं नये. कारण त्यापासून कांहीं फायदा न होतां, उलट लोकांचीं मनें मात्र दूषित होतात.

सारांश, लोकप्रवर्तनाचें उदाहरण व शिक्षण हेच मार्ग प्रशस्त व साध्य मानले आहेत व आपणांसहि राष्ट्रीय सुधारणा करणें असल्यास याच मार्गांचा अवलंब केला पाहिजे." (केसरी, ३ ऑगस्ट १८८७.) पुढे दि. २३ ऑगस्ट १८८७ च्या अंकातील याच विषयावरील लेखात त्यांनी म्हटले होते, " आत्महिताचा सर्वस्वीं त्याग न करतांहि इंग्लंडांतील ब्राइट, ग्लॅडस्टन प्रभृति प्रस्तुत लोकप्रवर्तकांप्रमाणें सभा व मंडळ्या स्थापन करून सुधारणा करण्यास अशा लोकांस पूर्णपणें मोकळीक आहे. तितकें त्यांनीं शांतपणें केलें असतांहि बरेंच काम होईल. पण इतकें करण्याचेंहि ज्यांस धैर्य आणि सवड नाहीं त्यांनीं हा सुधारणेचा धंदा सोडून आपल्या खोलींत स्वस्थपणें मिल, कान्ट यांची पारायणें किंवा भाषांतरे करीत बसावें. याहून त्यांची जास्त योग्यता नाहीं व उगाच जर ते आपणांस ओढून चंद्रबळ आणूं पहातील तर लोकांच्या उपहास्यतेस मात्र फुकट पात्र करून घेतील. इंग्रजी विद्येनें सर्वांसच पुस्तकी ज्ञान प्राप्त झालें आहे. सुधारक मात्र या ज्ञानाचा डौल मिरवितात व इतर मिरवीत नाहींत, एवढाच काय तो त्यांच्यामध्ये व इतरांमध्ये भेद. सुधारणेचा किंवा लोकप्रवर्तनाचा मूळ पाया जो आचार याचा दोहोंतही सारखाच किंवहुना सुधारकांत जास्तच अभाव आढळतो. ज्ञान व आचार या दोन गोष्टी अत्यंत भिन्न आहेत. मिलसारख्या तत्त्ववेत्त्यासहि आपले विचार याप्रमाणें कागदावरच ठेवावे लागले तर मग आमच्या सुधारकांनीं इतके उतावीळ कां व्हावें? इंग्रजी विद्येनें उदार कल्पना सर्वांस सारख्याच प्राप्त झालेल्या आहेत, त्याबद्दल वृथा कुणी घमंडी बाळगण्याची जरूर नाहीं. या विद्येनें आपणास माहीत झालेल्या गोष्टींविषयीं आपल्या समाजांत चालू होण्याजोग्या कोणत्या याचा विचार करून, त्याप्रमाणें आचरण करण्याचें ज्यांस धैर्य व सवड आहे अशांनींच पुढारीपण घेऊन बाकीच्यांनीं सुधारणेचा राजीनामा देऊन बाकीची कांहीं उपयुक्त गोष्ट करण्यांत आपल्या कालाचा वा बुद्धीचा व्यय करावा; हेंच युक्तीस व राष्ट्रक्रमास उचित होय." (केसरी, २३ ऑगस्ट १८८७.)

सुधारणेचे मार्ग

१८९५ मध्ये पुण्याच्या काँग्रेस अधिवेशनाचे वेळी सामाजिक परिषदेच्या मंडपातून जो वाद झाला त्याबद्दल लिहिताना सामाजिक सुधारणेचे मार्ग कोणते याची टिळकांनी चर्चा केली होती, ती या दृष्टीने महत्त्वाची आहे. टिळकांचे हे दोन्ही लेख त्यांच्या दृष्टिकोणाची माहिती देणारे आहेत. टिळकांनी म्हटले होते, " आम्हांस तरी सुधारणा कोठें नको आहे? पण ती ज्या ज्या ठिकाणीं 'इसमें मेरा चांदभाई' या न्यायानें मात्र नको. सुधारणा दोघांसहि हवी असली तरी तिचें स्वरूप आणि मार्गहि दोघांच्या मतें निरनिराळे आहेत. केसरीकारांस रावबहादुरांचा मत्सर झाला आहे इत्यादि कांहीं कुत्सित कल्पना रा. ब. च्या कल्याणशिष्यांनीं काढल्या आहेत. जणों

काय केसरीकारांस न्या. रानडे यांची हायकोर्ट जजाची जागाच पटकावयाची आहे. ह्या सर्व मूर्ख कल्पना रा. ब. रानडे ह्यांनीं झुगारून देऊन वादाचें खरें स्वरूप बऱ्याच अंशानें लोकांपुढें मांडिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानितों. आमची अशी समजूत झालेली आहे कीं, इंग्रजी विद्येच्या अव्वल कैफांत आमच्या कांहीं विद्वानांनीं सुधारणेच्या ज्या दिशा अथवा मार्ग शोधून काढिले त्यांपैकीं बहुतेक पंचवीस-तीस वर्षांच्या अनुभवानें आणि सदरील मुदतींत झालेल्या ज्ञानप्रसारानें निरुपयोगी अथवा अप्रयोजक ठरले आहेत अथवा ठरत चालले आहेत. खुद्द रा. ब. रानडे यांचेंच जर आपण उदाहरण घेतलें तर तेवढ्यावरूनहि ही गोष्ट शाबीत होईल. प्रार्थना-समाजाच्या एका अध्वर्यूनें ज्ञानेश्वरांचें चरित्र अथवा भक्तिविजयांतील संतचरित्रें मोठ्या प्रेमळ अंतःकरणानें गाऊं लागावींत, अथवा दुसऱ्या एका गृहस्थानें अद्वैत-मतांचा महिमा गावा हा कांहीं कालाचा लहान-सहान प्रवाह नव्हे—हिंदु धर्म कसा आहे, त्यांत किती गोष्टी इतर धर्मापेक्षां चांगल्या आहेत, हिंदु लोकांच्या रीतिभातीं-पैकीं सकारण अतएव ग्राह्य व निष्कारण अतएव त्याज्य कोणत्या इत्यादि गोष्टींचा खुलासा होण्यास आज जीं साधनें उपलब्ध आहेत तीं पंचवीस तीस वर्षांपूर्वी नव्हतीं. त्या वेळीं असें वाटत होतें कीं, आम्ही आमच्या राज्यकर्त्यांच्या मानानें पाहिलें तर किती वेडगळ आणि किती अडाणी! काय त्या आमच्यांतील जाति आणि काय आमचें अज्ञान; आमच्या बायका तरी काय हो अडाण्यांतल्या अडाणी अशा रीतीनें अर्धांगवायु झालेला हा देश आपलें डोकें वर कसें काढणार? करितां आतां कांहीं विलंब करून उपयोगी नाहीं. स्त्रियांच्या शाळा काढा, विधवांचीं लग्नें लावा, जातिभेद मोडून टाकून सबगोलंकार करा आणि एका निराकार परमेश्वराची दर रविवारीं गुडघे टेकून, डोळे मिटून प्रार्थना करीत जा म्हणजे तो सच्चिदानंद परमात्मा तुमची मनकामना एका क्षणांत पूर्ण करील! पंचविसाच्या ठिकाणीं तीस वर्षे झालीं; आमचे वेडे लोक या उपदेशास तावडतोब भुलून जाऊन देशोन्नतीचा नवा पाया घालतील अशी या पूर्व-सुधारकांची समजूत झाली होती ती हळूहळू नाहींशी होत चालली आणि निराकार परमेश्वराच्या पंथाचा प्रसार करण्यास भक्त मिळावयाचे तेहि निराकारच मिळाल्यामुळें त्या पंथास अजूनपर्यंतहि कांहीं आकार आला नाहीं. विधवाविवाहाची ज्या लोकांनीं प्रवृत्ति पाडण्याचा उद्योग केला तेच स्वतः त्यापासून पराङ्मुख झाले आणि इंग्रजी शिक्षणाचा परिणाम मनुष्याच्या मनावर विपरीत होतो असें इंग्रजी शिकलेल्या विद्वान लोकांच्या स्वेच्छ आचारविचार, आहारविहारादि वर्तनावरून लोकांस पक्कें कळून आलें."

"अपल्या दुसऱ्या व्याख्यानांत रा. ब. रानडे यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें आपल्या सुधारक मंडळीस खिस्ती संताची उपमा दिल्यासारखी केलेलें आहे; व डॉ. भांडारकर यांनींहि सर्वज्ञ बुद्धाच्या वचनानें आपल्या भाषणाचा उपसंहार केला

आहे. कोठें बुद्ध, कोठें लूथर आणि कोठें आमचे सुधारक. ज्या राजविंड्या पुरुषानें आपल्या प्रिय पत्नीचा व राज्याचा त्याग करून लोकांस सन्मार्गाचा उपदेश करण्यांत आपलें आयुष्य घालविलें त्याची योग्यता कोणीकडे आणि आमच्या सरकारी नोकरीमागें धांवणाऱ्या आणि जिव्हाळ्याकरितां आपल्या तर्कांत न झालेल्या गोष्टी करूं इच्छिणाऱ्या सुधारकांची योग्यता कोणीकडे? आमचे बंधु अमृतबझारपत्रिकाकार म्हणतात त्याप्रमाणें सामाजिक सुधारणा म्हणजे सरकारी नोकरींतील कांहीं इसमास पुढें येण्याचा हा एक मार्ग झालेला आहे. बाकी रामदास–तुकारामाच्या गोष्टी त्यांनीं सांगाव्या आणि आम्हीं ऐकाव्या इतकेंच. या भावी धर्मसंस्थापकांपैकीं एकानेंहि पदरास झीज लावून घेतली नाहीं अथवा रामदास–तुकारामाप्रमाणें संसारत्याग केला नाहीं. असल्या लोकांनीं आरंभिलेल्या कृत्यांस यश न येतां त्यांची व त्यांच्या कृत्यांची उपहासता होऊं लागली तर त्यांत अपराध तरी कोणाचा? सामाजिक सुधारणा करण्याचे हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशांतून निरनिराळे मार्ग आहेत ही गोष्ट जर रा. ब. रानडे यांस मान्य आहे तर मग सदर सुधारणेबद्दल महाराष्ट्रांतच त्यांच्या पक्षानें एवढा वखेडा माजविण्याचें कांहीं कारण नव्हतें. आमच्यांतील वेदांती लोकांनीं निरनिराळ्या धर्मपंथांची ज्याप्रमाणें निरभिमानबुद्धीनें एकवाक्यता करून घेतली आहे, त्याचप्रमाणें सामाजिक सुधारकांनीं करून घ्यावयास नको आहे काय? जुनें सोडून सुधारणा व्हावयाची नाहीं. जातिभेद मोडावयाचा असल्यास तो हळूहळू मोडला पाहिजे." (केसरी, २१ जानेवारी १८९६, स. टि. खंड ५, पान १३६–१३८.)

समाजरचनेचा पाया खणू नका

समाजसुधारणा करताना भारतीय समाज ज्याच्यावर उभा आहे तो पाया खणून काढता कामा नये, असा इशारा देऊन टिळकांनी म्हटले होते, "स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे, तो जोपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां कां तो जोम नाहींसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहासता होण्यास कारण होतात! सारांश, समाजरचनेपेक्षां लोकांमध्ये एक प्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे. जुन्यास सोडून जातां कामा नये· असे नुसते शब्द वापरल्यानें हा कार्यभाग होत नाहीं. तो होण्यास जुन्या संस्थांबद्दल खरोखरच योग्य अभिमान वाटावयास पाहिजे. 'योग्य' असें म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, हल्लींच्या काळांत सर्वांशीं अगर सर्वतोपरी जुन्या संस्था चालणें दुर्घट

आहे, हें आम्हांसहि मान्य आहे. पाश्चात्त्य राष्ट्राची व आमची कर्मधर्मसंयोगामुळें जी सांगड पडली आहे तिचा सांखळीच्या दोन्ही दुव्यावर परिणाम झाल्याखेरीज राहावयाचा नाहीं. तथापि तेवढ्यामुळेंच आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुनः नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचें नाहीं, असें मात्र आम्हांस वाटत नाहीं."

"हिंदु समाजाच्या स्वरूपांत अगर रचनेंत फेरफार व्हावयास नको अगर तो व्हावयाचा नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. प्राच्य व पाश्चात्त्य, आध्यात्मिक व आधिभौतिक अथवा वर्णव्यवस्थांकित व यदृच्छाचारप्रवर्तक अशा नव्या-जुन्या सुधारणांचा संयोग झाल्यानें जुन्या समाजरचनेच्या तत्त्वांत कांहीं तरी फेरफार झाला पाहिजे व होईल, हें म्हणणें कोणासहि मान्य करावें लागेल त्याबद्दल वाद नाहीं. वाद काय तो एवढाच कीं, वर ज्या दोन तऱ्हेच्या सुधारणा सांगितल्या त्यांपैकीं एकीचा लोप करून दुसरी स्थापन करावयाची अथवा जुन्या संस्थेतच योग्य असे कांहीं फेरफार करून तिचें पुनरुज्जीवन करावयाचें. रा. ब. रानडे म्हणतात तो मतभेद हाच होय; व याचकरितां प्रसंगविशेषीं मोठाली रणें माजतात. हिंदुस्थान देशांत अनेक जातींचे, पंथांचे व धर्मांचे लोक आहेत. या सर्वांची एकवाक्यता करण्यास एक भाषा, एक धर्म, सर्वांचे एकमेकांशीं अप्रतिबंध रोटी-बेटीव्यवहार यांखेरीज दुसरा मार्ग आहे कीं नाहीं व असल्यास तो कोणता, हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आमच्या देशांत जातहि एक नाहीं व धर्महि एक नाहीं, तर सर्वांची तोंड-मिळवणी कशी होणार, असे विचार मनांत येणें अगदीं सहाजिक आहे; व अव्वल इंग्रजींत या प्रश्नास तें उत्तर मिळालें त्याचेंहि आम्हांस फारसें नवल वाटत नाहीं. पण या पंचवीस तीस वर्षांत हे विचार पालटण्यास बरींच कारणें झालीं आहेत. वेदान्ता-सारख्या व्यापक धर्मांत सर्व धर्मांचा अंतर्भाव करून 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः' या किंवा 'येऽन्य-देवता-भक्ता यजन्ते श्रद्धयन्विताः । तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम्' आणि 'मा हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्' या भगवद्वचनांत सांगितल्याप्रमाणें सर्व धर्मांच्या व पंथाच्या लोकांचें ऐक्य होणें वर्णसंकर करून एकधर्म करण्यापेक्षां अधिक सुखकर व शक्य आहे." (केसरी, २८ जानेवारी १८९६, स. टि. खंड ५, पान १४२-१४३.)

वाक्पांडित्य नको, कृती हवी

समाजसुधारणेचा मार्ग वाक्पांडित्य नसून कृती आहे, ही टिळकांची भूमिका त्यांनी पुण्याच्या तुळशीबागेत विवाहविषयक कायद्यास पाठिंबा मिळविण्यासाठी भरविलेल्या नागरिकांच्या एका सभेत मांडली होती. त्या सभेत विवाहविषयक कायद्याची चर्चा व्हावयाची होती. ही घटना ऑक्टोबर १८९० मधील आहे. त्या सभेत टिळकांनी

आपली समाजसुधारणेसंबंधी भूमिका स्पष्ट करताना सांगितले होते, "आपल्या समाजाची सुधारणा करण्यासाठीं वाक्पांडित्य फार झालेलें आहे. तथापि सुधारणा करावयाची ती कोणाची अशा प्रश्नाचा विचार करतांना आपणांला जनसमूहाची सुधारणा करावयाची हें बीज आहे. याकरितां सुधारणेसाठीं जनसमूहाची व आपली ताडातोड करण्याचा प्रयत्न केल्यास सुधारणा होणें इष्ट नाहीं. सुधारणा ही ज्याची त्यानें सुरू करून आपल्या उदाहरणानें दुसऱ्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाहींपेक्षां रिकामें शब्दपांडित्य करण्याचा कांहीं उपयोग नाहीं. तर सुधारक लोकांकडून सर्व लोकांस सुधारण्याचा उद्देश धरून काय सुधारणा शक्य आहेत व त्या कोणत्या साधनांनीं अमलांत आणाव्या याचा विचार करावा. माझींही मतें सुधारणेस अनुकूल आहेत, परंतु तीं ह्याच तत्त्वास अनुसरून आहेत व म्हणूनच तीं आपणांस अमलांत आणण्यासारखीं आहेत असा माझा समज आहे. त्या तत्त्वांचें स्वरूप अशा तऱ्हेचें आहे कीं, समाजांत सहज करण्यासारखें काय आहे कांहीं अडचणी सोसून अथवा टाकून करण्यासारखें काय आहे व मुळींच करतां येणार नाहीं असें काय आहे? म्हणजे धर्मशास्त्रास अनुसरून कार्याकार्य गोष्टींस विधि, विकल्प व निषेध अशीं तीन बंधनें घालतां येतील. यांत ज्या गोष्टी निषिद्ध मानलेल्या आहेत त्या मुळींच करावयाच्या नाहींत. परंतु ज्याविषयीं विधान आहे अथवा प्रायश्चित्त आहे त्या करण्यास जातिभ्रंशाचा प्रत्यवाय येऊं शकणार नाहीं व तें धर्मसमजुतीच्या उलट जाणेंही होणार नाहीं. असा विचार करून धर्मशास्त्राचें उल्लंघन न करितां ज्या गोष्टी आपणांस करितां येतील त्या आपण पुढें मांडाव्या व त्यांचा आपण विचार करून त्यासंबंधें कांहीं निकाल होत असल्यास पहावा, असा आजच्या सभेचा उद्देश आहे." (केसरी, दि. ४ नोव्हेंबर १८९०, स. टि. खंड ५, पान २४४–२४५.)

याच स्फुटलेखात टिळकांनीं सामाजिक सुधारणेच्या कायद्यासंबंधी चार विचार मतप्रवाह संभवतात, असे म्हटले होते. "आतां सुधारणेसंबंधी लोकस्थितीचा विचार केला म्हणजे चार पायऱ्या दृष्टीस पडतात. एक धर्मगुरूंचे साहाय्य इच्छिणारे, दुसरी जातीच्या मंडळीवर अवलंबून असून सुधारणेचा प्रयत्न करणारे, तिसरी अंशद्वारें सर्वांची सुधारणा करण्यासाठीं कंपनीचा कायदा आपणांस लावून घेणारे व चौथी सर्वस्वीं कायदा मागणारे. हे सर्व मार्ग वस्तुतः पहातां एकच आहेत." याचा निष्कर्ष असा की, राजकारणात जशी सनदशीर चळवळ राजकीय सुधारणांसाठी हवी असे लोकांचे त्यावेळी म्हणणे असे तसेच टिळकांचे म्हणणे होते की, लोकमत अनुकूल करून, धर्मशास्त्रात योग्य तो बदल करून त्याप्रमाणे जाणारी समाज-सुधारणा असावी. परंपरा तोडू नये, ती नव्या परिस्थितीस लागू पडेल अशी करून घ्यावी, हाच याचा मथितार्थ आहे. म्हणून टिळक गौतमबुद्धाने केलेल्या समाज-

सुधारणेचा व श्री आद्य शंकराचार्यांनी केलेल्या धर्मक्रांतीचा आदर्श पुढे ठेवीत आपली समाजसुधारणेची कल्पना त्यांनी गौतमबुद्ध किंवा ख्रिस्ती धर्मसुधारक मार्टिन लूथर यांची उदाहरणे सांगून स्पष्ट केलेली आढळते.

बौद्ध धर्माचे उदाहरण

पुण्यात १७ मे १८९२ रोजी वक्तृत्वोत्तेजक सभेच्या एका समारंभात टिळक' न्या. रानडे व गोपाळराव गोखले या तिघांचीही एकाच व्यासपीठावरून भाषणे झाली होती. त्या सभेत टिळक म्हणाले होते, "आपल्या देशाची स्थिति सध्यां अगदीं पालटून गेलेली आहे, व अशा वेळीं कोणकोणत्या उपायांनीं धर्मरक्षण करावयाचें याचा बौद्ध धर्माच्या इतिहासापासून आम्हीं बोध घेतला पाहिजे. कोणत्याहि धर्माचा ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग अशा दोन शाखा असतात. हा सिद्धांत मुसलमान व ख्रिस्ती या दोन धर्मांस मात्र लागू नाहीं. या उणिवेमुळेंच हे दोनहि धर्म आर्य धर्मापेक्षा कमी योग्यतेचे आहेत, असें मानावें लागतें. ईश्वराच्या एकुलत्या एक मुलावर विश्वास ठेवून येथें काय तो मोक्ष मिळणार, त्या धर्मावर विद्वान लोकांचा सहसा विश्वास बसावयाचा नाहीं. पदार्थविज्ञानादि शास्त्रांच्या प्रसारामुळेंच ख्रिस्ती धर्माची इमारत डळमळूं लागली आहे. यांतील बीजहि हेंच आहे. आमच्या धर्मांतील ज्ञान व कर्म या दोन शाखा घेऊन त्यांची स्थिति पाहिली म्हणजे बौद्ध होण्यापूर्वी कर्ममार्गांत फक्त यज्ञयागादिकांचा व ज्ञानमार्गांत उपनिषदारण्यकांचा समावेश होत असे. परंतु स्त्रियांस व शूद्रांस वेदाध्ययनाचा व वेदोक्त कर्म करण्याचा अधिकार नसल्यामुळें मुक्तीच्या या दोन्ही मार्गांचा त्यांस उपयोग होत नव्हता. अशा वेळीं या दोन्ही वर्गांस या मुक्तीचा मार्ग दाखविणारा धर्म सर्वांस ग्राह्य झाला. वेदास झुगारून दिल्याखेरीज या धर्माची स्थापना होण्यास दुसरा मार्गच नव्हता. करितां जैन, बुद्ध वगैरे धर्मसंस्थापकांनीं वेद आपणांस प्रमाण नाहींत असेंच प्रतिपादन केलें. वेद नाहींत, ईश्वरहि नाहीं आणि जें कांहीं होणें आहे तें आपल्या कर्माचेंच फळ असून कर्माचा नाश करणें हाच काय तो पुरुषार्थ अशा तऱ्हेचे विचार समजूतदार लोकांचेहि होऊं लागले व जातिभेद मोडून टाकून सदाचरणानें वागावें एवढेंच काय तें सामान्य कर्तव्य अशी त्यांची प्रवृत्ति झाली. जैन धर्म व बौद्ध धर्म उत्पन्न होण्यास या समजुतीच कारण झाल्या. परंतु बुद्धाचें सत्चारित्र्य व त्याच्या धर्मास मिळालेला राजाश्रय या दोहोंच्या योगानें जैनधर्म अगोदरचा असतानाहि तो मागें पडून बुद्ध धर्माचीच अखेर सरशी झाली. पण ईश्वर व आत्मा नाहीं असें प्रतिपादन करणारा धर्म फार दिवस टिकणें शक्य नाहीं. योगी झाल्याखेरीज पूर्ण मुक्ती प्राप्त होत नाहीं, हा सिद्धांत सामान्यजनांस कधींहि ग्राह्य व्हावयाचा नाहीं. याकरितां बौद्ध धर्माची एकदा प्रवृत्ति झाल्यावर या गोष्टीकडे त्या लोकांचें लक्ष लागूं लागलें."

"वैदिक धर्माभिमान्यांनीं आपल्या ज्ञानमार्गांत बुद्ध धर्मांतील पायावर व कर्मवादी यांचा समावेश करून पूर्वीच्या यज्ञयागाच्या ठिकाणीं स्मृति व पौराणिक भक्तिमार्गाची योजना करून 'भगवद्गीते'त सांगितल्याप्रमाणें 'स्त्रियां वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्।" अशी स्त्रियांस, शूद्रांस व म्लेंच्छांसहि मोक्षाची वाट मोकळी करून दिली. बौद्ध लोकांचीं मोठमोठीं देवळें होतीं, मठ होते ते मोडून त्यांतच अगर क्वचित् ठिकाणीं त्यासारख्या दुसऱ्या देवळांतून मूर्तिपूजेचें व धर्मसंस्थापनेचें प्रकार सुरू केले. अहिंसेचें तत्त्व वैदिक धर्मांत होतेंच, तें उदयास आणून प्राणिहिंसा सर्वत्र बंद केली. संन्यास कलियुगांत निषिद्ध होता. त्यास आर्यांनी परवानगी दिल्यानें बौद्धांप्रमाणेंच आपले संन्यासी जिकडे तिकडे हिंडूं लागले. बौद्ध धर्माचा राजाश्रय सुटत चालला होता, आणि भिक्षु व भिक्षुणी यांचें प्रस्थ वाढलें असून भिक्षूंवेरीज कुणासहि मुक्ति मिळण्याचा संभव नव्हता. अशा स्थितींत तो धर्म उलटून पाडण्यास कुमारिल, शंकराचार्य आदि करून वैदिक धर्माभिमान्यांस फारशी अडचण पडली नाही. या उलाढालींत ज्ञानमार्गाचें स्वरूप जरी फारसें पालटलें नाहीं तरी कर्ममार्गांत श्रोताचा लोप होऊन पौराणिक कर्में, उपासना, मूर्तिपूजा हीच हिंदु धर्माचीं मुख्य अंगें होऊन बसलीं. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, कबीर, चैतन्य वगैरे भगवद्भक्तांनीं हाच मार्ग पुढें कोणत्या तऱ्हेनें लोकप्रिय केला हें सर्वांस ठाऊक आहे. असो. बौद्ध धर्माच्या इतिहासापासून अशा संकटसमयीं स्वधर्मसंरक्षणार्थ आपल्यास काय केलें पाहिजे याचा आम्ही चांगला बोध घेतला पाहिजे. इंग्रजी विद्येनें आमच्या लोकांचे विचार हल्लीं बदलत चालले आहेत, मुक्ति फौजेसारख्या कळकळीच्या संस्था निघून हिंदुधर्म नाहींसा करण्याबद्दल त्यांचे सारखे प्रयत्न चालू आहेत. व त्या सर्व तद्धर्मीयांस राजाचाहि हस्तें परहस्तें पूर्ण आश्रय आहे. अशा स्थितींत हिंदुधर्माचें रक्षण व्हावें म्हणून प्रार्थना समाजासारख्या संस्था उभारण्याचे प्रयत्न कांहीं लोक करीत आहेत, परंतु त्यांची दिशा ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला असतां बरोबर आहे असें वाटत नाहीं. राजाश्रयाचे साधन आपणांस हल्लीं मिळण्यासारखें नाहीं. परंतु सच्चारित्र्य, खरी कळकळ व सर्वांस मुक्तीचा मार्ग सारखाच उघडा करून देणें या गोष्टी घडवून आणणें अशक्य नाहीं. हल्लीं अतिशूद्र धर्मांतर करतात याचें खरें कारणहि बौद्ध धर्माच्या इतिहासावरून आपल्या लक्षांत येईल. व त्याचा प्रतिकार करण्याचें साधनहि इतिहासावरून आपणांस समजण्यासारखें आहे. आता इतिहासाचें वाचन व मनन होईल तेवढें थोडेंच." (केसरी, १७ मे १८९२.)

या प्रदीर्घ उताऱ्यावरून टिळकांचे तत्कालीन परिस्थितीसंबंधी आकलन काय होते व त्यातून मार्ग काढण्यासाठी काय केले पाहिजे, याविषयीच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट होतात. ख्रिस्ती धर्म व पाश्चात्त्य विचार, त्यांना आश्रय देणारे इंग्रजी राज्य आणि त्यांनी प्रभावित झालेले भारतीय सुधारक, असा हा त्रिकोण टिळकांपुढे होता. म्हणून

समाजसुधारणेकडे ते केवळ डागडुजीच्या व रूढी-प्रतिकाराच्या दृष्टीने पाहात नव्हते तर हिंदू धर्माची आधुनिक काळात पुनर्स्थापना कशी करता येईल, याचा ते शोधही घेत होते. ख्रिस्ती धर्मप्रसारक, दारिद्र्यामुळे घडून येणारे धर्मांतर व पाश्चात्त्य विचारामुळे होणारे आंग्लीकरण यांचा विचार म्हणूनच ते संलग्न रीतीने करीत होते.

धर्मांतरासंबंधी उदार दृष्टिकोण

१८९५ ते १९०० या काळात त्याकाळी झालेल्या काही धर्मांतरांसंबंधी टिळकांनी पोटतिडिकेने लिहिलेले आढळते. त्यांची प्रेरणा धर्मरक्षणाची होती, पण पाश्चात्त्य राज्यसंस्थेच्या भारताने स्वीकारलेल्या धर्मस्वातंत्र्य व धार्मिक वादात किंवा सुधारणेत सरकारने स्वीकाराबयाचे तटस्थ धोरण या तत्त्वांचा त्यावेळी टिळकांनी निःसंदिग्ध पुरस्कार केलेला होता. ख्रिस्ती धर्मप्रचारकांचा धर्मप्रवर्तनाचा किंवा प्रचाराचा अधिकार टिळक नाकारीत नव्हते. फक्त हिंदूचे धर्मस्वातंत्र्यही तितकेच रक्षणीय आहे व ते स्वतः समाजप्रबोधनाच्या व धर्मजागृतीच्या मार्गाने केले पाहिजे, असे टिळकांनी हिंदूंना उद्देशून लिहिलेल्या 'जागे व्हा किंवा मरा' लेखात सांगितले होते. ख्रिस्ती धर्मप्रसारासंबंधी टिळक म्हणाले होते, "आमच्या शेजारी जर ख्रिस्ती अगर मुसलमान असला तर त्याच्याबद्दल आम्हीं व आमच्याबद्दल त्यानें देशबंधुत्वाच्या आणि शेजारपणाच्या नात्यानें अवश्य कळकळ बाळगली पाहिजे. पण हें तत्त्व लागू करतेवेळीं एकमेकांच्या शेजाऱ्यांचा विनाकारण फायदा घेतां कामा नये हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. आमच्या हिंदुस्थानांत धर्मक्रांति अगर क्रांत्या झाल्या नाहींत असें नाहीं. बौद्ध, जैन आणि शीख हे धर्म हिंदुस्थानांतलेच आहेत पण ख्रिस्ती लोक ज्याप्रमाणें अजाणत्या पोराबर झडप घालून आपल्या धर्माची वृद्धि करूं पाहातात, त्याप्रमाणें बौद्ध किंवा जैन धर्माचे लोकांनीं कधींहि केलें नाहीं. धर्मगुरूंस पहिल्यानें गाठून त्यांचा वादात पराभव करणें हेंच धर्मसंस्थापकाचें मुख्य कर्तव्य आपल्याकडे समजतात. श्रीशंकराचार्यांनीं पाखंड मतांचें खंडन करून वैदिक धर्माची जी स्थापना केली ती मंडनमिश्रांशी वाद घालून केली त्यांचीं पोरें फितवून केली नाहीं. व आमच्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांस कांही अभिमान असल्यास त्यांनी हाच मार्ग स्वीकारला पाहिजे असें आमचें मत आहे. ख्रिस्ती लोक आमचे बंधू आहेत हें खरें. पण उद्या आमचा बंधू माझ्या घरांतील द्रव्य अगर बायकापोरें हरण करण्यास प्रवृत्त झाला तर आम्ही त्यास कृतघ्न, दुष्ट, अगर पापी मानणार नाहीं काय? आम्ही मात्र ख्रिस्ती होऊं इच्छीत नाहीं व जोपर्यंत हिंदु धर्मांतील विचार बायबलांत शोधूनहि सापडत नाहींत तोपर्यंत आम्हांस धर्मांतर करण्याची जरूर नाहीं, उलट आमची अशी समजूत आहे कीं, ज्याप्रमाणें जैन आणि बौद्ध धर्मांचा पराभव होऊन अखेर वैदिक धर्माचाच प्रचार झाला त्याप्रमाणें हिंदुस्थान पुन्हा

वैदिक धर्मानुयायी होईल. कोणाच्या धर्मांत हात घालू नये इतकी उदारता हिंदु-धर्मांत आहे. खिस्ती धर्म इतका उदार नसला तर हिंदुधर्मापेक्षा तो निकृष्ट आहे, एवढेंच कारण वस्त आहे." (केसरी, २२ ऑक्टोबर १८९५.)

अशाच आशयाचे विचार पुढे १० जुलै १९०० च्या 'केसरी'त टिळकांनी प्रकट केले होते. पुण्यातील सदाशिवराव गोवंडे यांचे चिरंजीव भास्करराव यांनी खिस्ती धर्म स्वीकारला; त्याचा उल्लेख करून त्या लेखात म्हटले होते, "भास्करराव्जीच्या धर्मांतरानें हिंदु धर्मास मोठीशी खिंड पडेल किंवा खिस्ती धर्मांत मोठीशी भर पडेल असें नाहीं. पण मि. गोवंडे यांच्या धर्मांतरानें समाजांत सुधारक म्हणविणाऱ्यांनीं जो आचरटपणा चालविला आहे तो किती नुकसानीचा आहे, इकडे लक्ष गेल्याखेरीज राहात नाहीं. हिंदुधर्मांत किंवा रीतीरिवाजांत ज्यास सुधारणा करावयाची असेल त्यास 'मी हिंदु आहे व मला हिंदु राहावयाचें' असा पहिल्यानें पूर्ण अभिमान पाहिजे. लूथर वगैरे सुधारक अशा प्रकारचे होते. कोणत्याहि प्रकारचें आवरण नसावें असें वाटून हिंदु रीतीभाती मोडण्यास प्रवृत्त होणें निराळें आणि हिंदुधर्मावर पूर्ण विश्वास असून त्यातल्या त्यांत देशकालानुरूप फेरफार करण्यास झटणें निराळें, हे सुधारक व त्यांचे अग्रणी यांनीं नीट ध्यानांत ठेवले पाहिजे. कोणत्याहि देशास किंवा राष्ट्रास उर्जित दशेस येण्यास एक प्रकारचें कायमचें धार्मिक किंवा सामाजिक वळण लागतें. आमचें पूर्वीचें अशा प्रकारचें वळण होतें पण तें सोडून देऊन आम्ही आपल्या तरुण पिढीस आचाराचें विचाराचें अनावृत्तत्व स्वीकारण्यास एक प्रकारचें उत्तेजन देत आहोंत. सुधारक हा शब्द लोकांमध्यें जो नावडता झाला आहे याचें तरी कारण हेंच आहे. ज्यानीं ज्यांनीं सुधारणेची पताका हातीं घेतली आहे त्या पैकीं एखाद-दुसरी व्यक्ति सोडली तर बाकी सर्व अनावृत्त आचारविचाराचीच मंडळी आहे. अशानें सुधारणेचें पाऊल पुढें पडणार नाहीं. इतकेंच नव्हे तर देशाचाहि निभाव लागणार नाहीं, अशी आमची पक्की समजूत आहे. व त्याच समजुतीमुळें हल्लीं ज्यास सुधारणा म्हणतात त्याचा आमच्यानें स्वीकार करवत नाहीं. भागवतांत सांगितल्याप्रमाणें सर्व समाजव्यवस्था ही स्वैर वर्तनाचें नियमन करण्याकरितांच झालेली आहे. हें नियमन ज्यास हवें आहे त्यानें एखादें बंधन घट्ट झाल्याबद्दलची तक्रार करणें निराळें आणि सर्वच बंधनांचा ज्यास तिटकारा आला आहे त्यांनीं एखादें बंधन मोडून त्याची सुधारणा म्हणून टिमकी वाजविणें निराळें." (केसरी, १० जुलै १९००.)

समाजबंधने आवश्यक

सारांश, समाजसुधारणा ही समाजाला आवश्यक असणारी बंधने तोडणारी असता कामा नये, धर्मबंधनाचे तत्त्व मान्य करून तपशिलात एखादें बंधन मान्य न करणें

किंवा तशी नवी समाजव्यवस्था निर्माण करणे, एवढेच समाजसुधारणेचे उद्दिष्ट असले पाहिजे, धर्माचा व समाज नियमन, नैतिक नियमनाचा संबंध तोडता कामा नये, हा टिळकांच्या म्हणण्याचा अर्थ होता. टिळक हिंदू धर्माचे बंधन हे राष्ट्रीय ऐक्याचा पाया आहे, असा निष्कर्ष यातून काढीत होते. ते धर्म-स्वातंत्र्य मान्य करीत. दुसऱ्याच्या धर्मात ढवळाढवळ करू नये, हे तत्त्वही मान्य करीत पण धर्म-विहीन समाजसुधारणा मात्र त्यांना मान्य नव्हती. म्हणून वैदिक धर्माचे किंवा हिंदु-धर्माचे रक्षण केले पाहिजे, हा टिळकांचा आग्रह होता याची दोन कारणे होती. एक तर हिंदू धर्म हा तत्त्वज्ञानदृष्ट्या श्रेष्ठ धर्म आहे ही त्यांची धारणा होती, व दुसरे म्हणजे धर्म टाळून हिंदू समाज सुधारणार नाही, धर्मक्रांती करून हिंदू धर्म जगविणे शक्य आहे, हा त्यांचा विश्वास होता. म्हणून आद्य शंकराचार्यांचे उदाहरण ते वारंवार देत. हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व वर्णन करताना टिळकांनी एका लेखात म्हटले होते, "आमच्या भरतखंडवासी लोकांची व त्यांतील आर्यधर्मीयांची एकदां अशी स्थिति होती कीं, त्यांच्याकडे डुंकून पहाण्याचीहि कोणाची ताकद नव्हती. हिंदुधर्माच्या पुरातत्त्वाकडे लक्ष दिलें तर हे (इतर) सर्व धर्म म्हणजे अलीकडचीं अर्भकें होत असें म्हणावयास कोणताहि प्रत्यवाय नाहीं. बरें, आर्यधर्म किंवा वैदिकधर्म हा सर्वांहून प्राचीन आहे. इतकेंच नव्हे तर, मनुष्याच्या आत्म्यास कोणत्या उपायांनीं मुक्ति मिळेल याबद्दलच्या विचारांमध्येहि आर्य धर्मासच श्रेष्ठपणा द्यावा लागतो. किंबहुना आत्मानात्म विचाराचें हिंदुधर्म हें माहेरघर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं, व आज इतर धर्मांच्या तडाख्यांतून वैदिक धर्मानें आपला बचाव केला आहे त्याचें मुख्य कारण सदर धर्मांत असलेलीं आध्यात्मिक तत्त्वें व तद्धर्मानुयायांस दिलेली ईश-प्राप्तीच्या मार्गांची व साधनांची स्वतंत्रता हें होय. आमचा हिंदुधर्म पुरातन असून तो आमचा आम्हांस रक्षण केला पाहिजे !"

"सोनें कितीहि चांगलें असलें तरी त्यास वारंवार उजळा देऊन तें ज्याप्रमाणें देदिप्यमान ठेवावें लागतें त्याप्रमाणेंच धर्मतत्त्वांची स्थिति होय. परकीयांनीं स्वधर्मावर केलेल्या आक्षेपांचें निराकरण करून आपल्या धर्मतत्त्वांची योग्यता स्थापना करणें हें देशांतील विद्वानांच्या कर्तव्यापैकींच एक कर्तव्य होय...ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें आमच्या धर्मांतील तत्त्वांपेक्षां उज्ज्वल किंवा उदात्त आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर, कांहीं युरोपियन तत्त्वज्ञांचीहि समजूत आमच्यासारखीच झालेली आहे."

"मिशनरी मंडळ्यांस ख्रिस्ती राष्ट्रांतील खालच्या वर्गाच्या लोकांचें द्रव्यसाह्य असल्यामुळें व इंग्लंड देशाचा अंमल पृथ्वीच्या बऱ्याच भागावर पसरला असल्यामुळें या धंदेवाल्या मिशनरी लोकांचा सुळसुळाट चोहोंकडे बराच मातलेला आहे. धर्म-स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य वगैरे आधुनिक राज्यपद्धतीचीं तत्त्वें आम्हांस मान्य असोत

वा नसोत, तीं फिरवितां येणें अशक्य आहे; व तीं गृहीत धेऊनच आम्हांस आमच्या धर्माच्या संरक्षणार्थ ज्या कांहीं तजविजी करावयाच्या त्या केल्या पाहिजेत. उत्तरोत्तर मिशनरींचा प्रवेश खेडेगावांतूनहि होऊ लागला आहे. हिंदु धर्माच्या अंगीं त्राण आहे, जीव आहे व मुसलमान लोकांच्या समशेरीच्या तडाख्यांतूहि तो बचावला आहे, ही गोष्ट खरी आहे, पण आजचा जो प्रसंग त्याजवर आलेला आहे तो याहिपेक्षा भयंकर होय आणि या वेळीं जर हिंदु समाज आपलें कर्तव्य ओळखणार नाहीं तर मथळ्यावर लिहिलेल्या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें आमची स्थिति होईल, हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं." ('जागे व्हा किंवा मरा' केसरी, २६ फेब्रुआरी १९०१, स. टि. खंड ५, पान २९१–२९३ व २९५.)

अशा रीतीने टिळकांच्या सामाजिक विचारात हिंदू धर्माचे रक्षण, हिंदू समाजाची पुनर्रचना व प्रबोधन आणि समाजपरिवर्तनाचे मार्ग व सामाजिक नेतृत्वाची त्यांची कल्पना यांना प्राधान्य आहे. त्या काळच्या वादविवादाच्या अनुषंगाने टिळकांनी आपल्या या विषयांवरच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. त्या सर्वांचा राष्ट्रीय पुनरुत्थानाशी टिळक संबंध जोडीत होते, किंबहुना राष्ट्रीय पुनरुत्थानालाच टिळक प्रथम स्थान देत होते. 'आधी सामाजिक की आधी राजकीय' ह्या टिळकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नास त्यांच्या राष्ट्रीय उत्थानाच्या संकल्पनेच्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे. टिळकांच्या दृष्टीने राष्ट्राच्या अस्तित्वाचा, राष्ट्रीय उत्थानाचा प्रश्न महत्त्वाचा होता. त्याच्या संदर्भातच समाजसुधारणेची निकड ते दुय्यम समजत होते.

हिंदूंचा सर्वसंग्राहकपणा

भारताच्या राष्ट्रीयत्वाचे बीज हिंदूंच्या औदार्यात आहे, राष्ट्रीयत्वाचे सातत्य त्यामुळे टिकून राहिले आहे, असे टिळक मानीत असत. याच अर्थाने त्यांनी म्हटले होते, "मी जें सांगणार आहे तें कितीहि जुन्या मताचा इसम असला तरी व नव्यासहि पसंत पडेल. 'हिंदु' हा शब्द उच्चारल्याबरोबर त्यांतील सर्वांना एक प्रकारची ईर्षा, एक प्रकारचा आवेश, एक प्रकारचा उत्साह उत्पन्न झाला पाहिजे. धर्माचें खरें रहस्य हेंच आहे. आपण हिंदु आहोंत तर हिंदु धर्माची ध्वजा उभारली म्हणजे त्या धर्माकरितां झगडण्यास आपण सर्वांनीं एकदिलानें झटलें पाहिजे. आपल्यांत धर्मबुद्धि नाहीं, असा आपण आपला गैरसमज करून घेतला आहे. हिंदु धर्म हें एक शरीर आहे. तोडून ठेवलेले हात, तोडून ठेवलेले पाय असे तुटके फुटकळ अवयव नाहींत. मागें एका व्याख्यानांत मीं सांगितल्याप्रमाणें ज्याला वेदादि ग्रथपरंपरा मान्य आहेत, तो हिंदु झाला, व एका पुरुषाचा अवयव झाला हें त्यानें विसरतां कामा नये. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आर्यसमाजी देखील हिंदूंत येऊं शकतो. 'पोट आणि अवयव' ह्या इसापनीतींतील गोष्टीप्रमाणें पोटाशीं इतर अवयवांनी भांडून

चालणार नाहीं. या विचारांच्या विरुद्ध अलीकडे कांहीं होत आहे. ३८ वर्षांचें जे गुरू शंकराचार्य ते विपरीत-बुद्धीनें पछाडले गेले आहेत दुही होऊं देणें, गोंधळ होऊं देणें बरें नव्हे. असें चालू द्यावें हें हिंदु धर्माला व जातीलाहि योग्य नाहीं. शंकराचार्यांचे भांडण होऊं नये म्हणून मीं व इतरांनीं प्रयत्न केला, पण तो विफल झाला आहे. समाजापुढें हें सांगण्याचा संकल्प करूनच आज मी आलों आहे. धर्मांत भेद, फूट होऊं देणें बंद केलें पाहिजे व हिंदु समाज एक राहिला पाहिजे. मिशनरी लोक महाराला म्हणतात, 'तुला हिंदु तुच्छ मानतात, तूं आमच्यांत ये.' तो ख्रिश्चन झाला आणि त्यानें विजार घातली की आम्हांला त्याचा विटाळ होत नाहीं. त्याला कांहीं मग जात राहात नाहीं. तो मग 'साहेब' झाला व 'नाविष्णुः पृथिवीपतिः' म्हणून आम्ही त्याचा मान करावयास तयार होतों. याचा बंदोबस्त झाला पाहिजे. शंकराचार्यांच्या गादीबद्दल तंटा चालला आहे. नुसत्या संन्याश्यानें कशाबद्दल भांडायचें? गादी आहे म्हणून तिच्याकरितां हें भांडण आहे, ही त्यांतली खरी गोष्ट आहे. गादीवरोवर पैसा आहे, वैभव आहे, म्हणून हें भांडण आहे. समाजाच्या वरच्या भागांत, खालच्या भागांत, मधल्या भागांत तंटा आहे. पण हें चांगलें नाहीं. लोकांचे जे नायक, अग्रणी त्यांनी याचा विचार केला पाहिजे, नाहीं तर सगळे दुसऱ्या धर्मांत जाऊन आपल्या धर्माचा ऱ्हास होईल."

"बौद्ध धर्मांतील मोक्षाचीं तत्त्वें हिंदु धर्मांतील तत्त्वांइतकीं उदात्त नाहींत. तरी त्या धर्मांतील लोकांनीं आमच्यापैकीं शेंकडा ८० किंवा ९० लोक एकदां आपल्यांत ओढले होते. त्या वेळीं बाटलेल्या लोकांना परत आपल्या धर्मांत घेऊन बौद्ध धर्मांतील उपयुक्त गोष्टींचा आपल्या धर्मांत समावेश करण्यांत आला. यज्ञांतहि मांसाचा उपयोग करूं नये हे आम्हीं बौद्ध व जैन धर्मापासून घेतलें. आमच्या परंपरेला विरुद्ध न जातां—आणि ही मर्यादा अत्यंत महत्त्वाची आहे—ज्या गोष्टींचा स्वीकार करणें इष्ट वाटेल त्या गोष्टी स्वीकारणें ही आमची फार दिवसांपासूनची प्रवृत्ति आहे. सगळ्या देवांना खोटे मानून ख्रिस्ती देव माना म्हणून सांगितलें तर लोक ऐकणार नाहींत. पण ताबुताला नवस केला म्हणजे तो पावतो, त्याप्रमाणें ख्रिस्ताला नवस करा, तो पावतो म्हणून सांगितलें तर कदाचित् ते ख्रिस्ताला नवस करतील. हिंदूंवर अनेक वादलें आलीं, हिंदु धर्माचा छळ झाला, मध्यंतरीं आम्हांला बौद्धांनीं मागें हटविलें, तरी आमचा धर्म आज जिवंत आहे. हें हिंदु धर्माच्या अंगीं असलेल्या लवचीकपणाचें, सर्वसंग्राहकपणाचें फळ होय. जुने मूर्तिपूजक लोक मागें पडले, ग्रीक लोक, रोमन लोक, ख्रिस्ताच्या पूर्वीचे जुने पंथ, खाल्डिया व इराण यांतील धर्म नाहींसे झालेले आहेत. येथे पळून आलेल्या पारशांचा धर्म हिंदूंनीं बचावला आहे. परंपरा कायम राखण्याच्या युक्तीनें, धैर्यानें आम्ही जिवंत राहिलों आहोंत."
(स. टि. खंड ६, पान ८०७–८०८.)

सारांश, हिंदूंची धार्मिक उदारतेची परंपरा भारताच्या आधुनिक राष्ट्रवादाला उपयुक्त आहे व म्हणून ती जपली पाहिजे, असे टिळकांचे सांगणे असे. टिळक राष्ट्रीय उन्नती व सामाजिक सुधारणा या दोन भिन्न गोष्टी आहेत, असे समजत. त्यामुळे सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज राष्ट्रीय उन्नती होणार नाही, हा सुधारकांचा समज त्यांना गैर वाटे. टिळकांनी म्हटले होते. "खरोखरच राष्ट्राची उन्नति होणें असल्यास ज्या उपायांनीं राष्ट्रीयत्व येतें किंवा वृद्धिंगत होतें तिकडे आपणांस आधीं व अधिक लक्ष दिलें पाहिजे...सामाजिक सुधारणेपेक्षीं कांहीं सुधारणेस आम्ही प्रतिकूल नसतो. सामाजिक परिषदेस किंवा तिच्या पुढाऱ्यांस आम्ही जो दोष देत असतों त्यांतील बीज हेंच होय हिंदु धर्म, हिंदु राष्ट्र हें आमच्या मतें सामाजिक सुधारणेपेक्षां अधिक महत्त्वाचें आहे, व जी कांहीं सामाजिक सुधारणा हवी आहे ती लोकांमध्यें राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्याच्या उद्योगास, अभिमानानें, कळकळीनें व स्वार्थत्यागपूर्वक लागलें असतां सहज घडून येणार आहे असें आम्हांस वाटतें." (केसरी, ५ मे १९०३, स. टि. खंड ५, पान १५९.)

सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक परिषदेत १९०५ साली जे भाषण केले होते त्यावर लिहिताना 'सामाजिक संस्था काळानुसार बदलल्या पाहिजेत व तसें न केलें तर परिस्थितीच्या जोरानें त्या आमच्या इच्छेविरुद्ध पालटतील', असे टिळकांनी म्हटले होते. पण त्यावरोबरच असा इशाराही दिला होता की, "राष्ट्राची उन्नति होण्यास सामाजिक सुधारणा हें एकच साधन नव्हे तर त्यावरोबरच औद्योगिक आणि राजकीय सुधारणा झाली पाहिजे, असें जें महाराजांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं सांगितलें तें सर्व लोकांनीं नेहमीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे...सामाजिक सुधारणा हें राष्ट्रीय उन्नतीचें केवळ एक अंग आहे; अर्थात् या अंगाचा राष्ट्रीयत्वाशीं जर पूर्ण संबंध नसेल तर सामाजिक सुधारणेस केवळ मनःपूत आचाराचेंच स्वरूप प्राप्त होईल हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. आमच्या सुधारकवर्गानें सुधारणेस अवश्य लागणाऱ्या या राष्ट्रीयत्वाच्या दिशेचा नीटसा विचार केला आहे असें दिसत नाहीं...राष्ट्रीयत्वाची दिशा सुटली म्हणजे समाजसुधारणा झाली काय आणि न झाली काय, सारखीच होय. सुधारणा हा शब्दच तारतम्यबोधक आहे." (केसरी, १० जानेवारी १९०५, स. टि. खंड ५, पान १७४–१७५.)

भारताचा राष्ट्रीय जीवनहेतू

टिळक जेव्हां राष्ट्रीयत्व हा शब्द हिंदू धर्माच्या संदर्भात वापरीत तेव्हा त्याचा आशय किंवा रोख सांस्कृतिक वैशिष्ट्य किंवा भारताचे सांस्कृतिक व्यक्तित्व असा असे. टिळकांच्या काळात राष्ट्रवादाची प्रेरणा आध्यात्मिक व्यक्तित्व (Spiritual Personality) ही असे. विवेकानंद, टिळक, अरविंद यांच्या राष्ट्रवादी विवेचनात

'भारताला काही जागतिक जन्महेतू किंवा जीवनहेतू आहे आणि तो जगविण्यासाठी भारत स्वतंत्र झाला पाहिजे,' असा आग्रह असे. राष्ट्रवादी चळवळीची प्रेरणा (Motivation) मानवीय व आध्यात्मिक होती. आचार्य जावडेकरांनी 'आधुनिक भारत' या आपल्या ग्रंथात त्या काळातील राष्ट्रवादी चळवळीचे वर्णन करताना म्हटले आहे. "इ.स. १८७५ पासून १८९५ पर्यंतच्या काळात हिंदी लोकांना आपल्या संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची जाणीव झाली आणि पूर्वी पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रकाशाने सुशिक्षित लोकांची दृष्टी दिपून गेली होती, ती नाहींशी होऊन त्यांना आपल्या कर्तृत्वासंबंधीचा आत्मविश्वास आणि आपल्या राष्ट्राच्या भवितव्यासंबंधी उज्ज्वल आशा वाटू लागली... श्री शिवाजी महाराज ही या धर्मातील आराध्य देवता आणि भगवान् श्रीकृष्णाचा प्रवृत्तिपर कर्मयोग आणि शंकराचार्यांचा अद्वैत सिद्धांत व सनातन धर्मनिष्ठा हे याचे परंपराप्राप्त संस्कृती-धन आहे. याला सामाजिक सुधारणा इष्ट वाटत असल्या तरी आपल्या संस्कृतीचा पाया पाश्चात्त्य संस्कृतीपेक्षा अधिक श्रेष्ठ तत्त्वावर आधारलेला आहे असे वाटत असून सर्व जगाला मार्गदर्शक होण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृतीत आहे, अशी श्रद्धा निर्माण करण्याचे श्रेय याच संप्रदायाला द्यावे लागते."

वेदांताची अपूर्वता

टिळकांनी सामाजिक विषयांची चर्चा करताना वारंवार भारतीय वेदांती तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठत्व मांडले होते. किंबहुना वेदान्ताचे श्रेष्ठत्व पटविणारी एखादी घटना, एखादे भाषण किंवा पुस्तक आढळले तर टिळक त्याचा परिचय 'केसरी' च्या वाचकांना लगेच करून देत. तसेच 'केसरी' त धर्मसंस्थापनेसारख्या विषयावर इतरांचेही अनेक लेख प्रसिद्ध झाल्याचे आढळते. उदाहरणार्थ 'देह आणि आत्मा' या विषयावर लिहिलेला लेख पाहाण्यासारखा आहे. १८७३ मध्ये युरोपात शास्त्रवेत्यांचें जे मंडळ (सोसायटी ऑफ सायकिकल रीसर्च) स्थापन झाले होते, त्याने आत्म्याचे वेगळे अस्तित्व मान्य केले, तेव्हा टिळकांनी लिहिले होते, "आत्मा हें जड पदार्थांच्या मिश्रणाचें किंवा एकीकरणाचें फल नसून तें स्वतंत्र आहे. जड शरीर म्हणजेच आत्मा हें तत्त्व खोटें ठरून आत्म्याचें स्वतंत्र स्वरूप आणि मागें व पुढें असणारें अस्तित्व शास्त्रीय पद्धतीनें ठरविण्यांत आलें आहे. हा सिद्धांत बारीकसारीक क्षुद्र लोकांचा नसून तत्त्ववेत्यांचा व शास्त्रज्ञांचा आहे, हें आपण विसरतां कामा नये. पाश्चात्त्य पंडितांनी तथापि प्रयोगाच्या साह्याने जो सिद्धांत दोन वर्षांपूर्वी ठरविला तोच सिद्धांत हजारों वर्षांपूर्वी आमच्या वेदांत ग्रंथांत नमूद होऊन राहिला होता. प्राचीन उपनिषत्कारांनी विचाराच्या जोरावर हेंच आत्म्याचें स्वरूप सांगून ठेवलें. पण नवीन शिक्षणानें हा वेदान्तांतील सिद्धांत चुकीचा वाटून आमच्यांतील पुष्कळ लोक पाश्चात्त्यांनीं तयार केलेलीं मतें जशींच्या तशीं ग्रहण करून जडवादी बनलेले

आढळतात. नवीन लोक असे दुसऱ्याच्या ओंजळींने पाणी पिणारे, तर जुने शास्त्री सनातन ग्रंथावर हवाला देऊन बसणारे! दोघेहि डबक्यांत साचलेल्या पाण्याप्रमाणें आहेत. दोघांच्याहि ठिकाणीं जिवंत झरा नाहीं. ज्या वेळीं युरोपीय जडवादाचीं मतें इकडे आलीं त्या वेळीं तीं खरीं किंवा आपलीं वेदान्तांतली मतें खरीं, याबद्दल प्रयोग करून आपणांसच याचा उलगडा करता आला नसता काय?...तथापि ही शोध-बुद्धि आमच्यांत उत्पन्न झालेली नाहीं. (केसरी, १९ सप्टेंबर, १९०५, स. टि. खंड ५, पान ५६०-५६१.)

वेदांताची ही महती जगाला पटवून देण्यासाठी वेदान्त मिशन काढावे व जगाला नवे तत्त्वज्ञान द्यावे असे टिळकांना वाटत होते. त्यांनी आपले विचार अनेकदा मांडले होते. स्वामी विवेकानंद, अगम्य गुरू आदींसंबंधी लिहिलेल्या लेखांत त्यांनी हे विचार व्यक्त केले होते. 'वेदांताची आणि उद्योगाची दिशा' या लेखात टिळकांनी म्हटले होते, "योग आणि वेदान्त या दोन अमूल्य देणग्या आमच्या पूर्वजांपासून आम्हांस प्राप्त झालेल्या आहेत, त्या लोकांच्या हातांत देऊन लोकांच्या तोंडाकडे बघूं नका, देणग्या तुमच्या आहेत, तुम्ही त्या लोकांस वांटा आणि सर्व जगास उदात्त विचारांचें वळण दिल्याचें श्रेय मिळवा, असें स्वामींचें सर्वांस सांगणें आहे. राज्य कमावणें किंवा गमावणें हें शारीरिक बलाचें काम आहे; व इंग्रजांपूर्वी ज्या लोकांनीं म्हणजे मुसलमानांनीं हिंदुस्थानवर स्वारी करून आपलें राज्य येथें स्थापिलें, त्याजवरहि वेदान्तानें आपली छाप बसविली होती, आणि अशी छाप बसविली तेव्हांच अकबरासारखे बादशहा निपजले, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. इंग्रजांच्या राज्यांतहि असा प्रकार घडून येणें अशक्य नाहीं. अधिभौतिक शास्त्रांच्या प्रगतीनें वेदान्ताचीं प्रमेयें अधिकाधिक बळकट होत चाललीं आहेत; आणि पाश्चिमात्य राष्ट्रें धर्माचीं कांहीं शास्त्रसिद्ध तत्त्वें आपणांस सांपडावीं अशा उद्योगास लागलीं आहेत. अशा वेळीं आमच्या वेदान्ती धर्माचीं तत्त्वें 'वेदान्त मिशन' काढून ख्रिस्ती मिशनऱ्याप्रमाणें जर सर्व जगास आम्हीं शिकविलीं तर प्राच्य व पाश्चिमात्य विचारांची सांगड घालून देऊन सर्व जगाच्या विचाराचें पाऊल आम्हीं पुढें टाकल्याचें श्रेय आपणांस मिळेल; इतकेंच नव्हे तर, त्याचबरोबर आमच्या देशाबद्दल व लोकांबद्दल पाश्चिमात्य लोकांत सहानुभूति उत्पन्न होऊन त्यामुळें देशकार्यहि सहजरीत्या घडून येईल, असा स्वामींचा उपदेश आहे, व त्यांचें सर्वांस असें सांगणें आहे कीं, ही अमूल्य संधि दवडूं नका, आणि राजकीयदृष्ट्या आपलें वैभव जरी गत असलें तरी, जगाच्या बुडाशीं जीं कांहीं थोर व उदात्त तत्त्वें आहेत त्यांत अवगाहन करण्याच्या अपूर्व आध्यात्मिक शक्तीबद्दल आमची जी पूर्वापार ख्याति चालत आली आहे ती बुडवूं नका; योगानें व वेदान्तानें बुद्धीला जी कांहीं परिपक्वता यावयाची त्याचें खरें चीज यांतच आहे; आणि सध्यांच्या परिस्थितींत गृहस्थाचेंच नव्हे तर वेदान्त्याचेंहि हेंच कर्तव्य होय.'

(केसरी, २७ फेब्रुआरी १९०६, स. टि. खंड ५, पान ५७३.)

टिळक विविध सामाजिक घटनांची समीक्षा करताना नव्या समाजरचनेचा, समाजनियमन करणाऱ्या नव्या व्यवस्थेचा शोध घेत होते, असे वाटते. १३ ऑक्टोबर १८९१ पासून १० नोव्हेंबर १८९१ पर्यंत 'केसरी' मध्ये टिळकांनी एका मित्राकडून आलेले 'धर्मसंस्थापना' या विषयावरचे ८ लेख प्रसिद्ध केले होते व स्वतःची मते २४ नोव्हेंबरपासूनच्या तीन लेखांत व्यक्त केली होती. त्या लेखांत मानवी जीवनाला धर्माची गरज आहे, हे प्रतिपादताना त्यांनी म्हटले होते, "धर्मासारखा इह परलोकीं दुसरा कोणताहि सखा नाहीं. धर्मानेंच मनुष्यमात्राच्या मनांत निश्चय, निरपेक्षा, स्वार्थत्यागबुद्धि आणि परोपकारेच्छा उत्पन्न होतात, असें आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. शास्त्रीय ज्ञानाचा आणि आधुनिक नास्तिक मताचा संयोग घडून त्यांचा संयुक्त प्रचार सर्वत्र झाल्यावर मानवी स्वभावांत काय अंतर पडेल तें पडो. परंतु जोंपर्यंत हें मन्वंतर होण्याचीं चिन्हें क्षितिजावरहि दिसूं लागलेली नाहींत, जोपर्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा धर्मविषयक समजूत अद्याप पालटली नाहीं, जोपर्यंत पीनल कोडाच्या धास्तीनें सर्व मनुष्य स्वभावास आळा घालता येईल हें शक्य वाटत नाहीं, जोपर्यंत नीतीचा व धर्माचा घटस्फोट झालेला नाहीं, तोंपर्यंत धर्म संस्थापनेकरतां झटणें प्रत्येक देशहितचिंतकाचें कर्तव्य आहे. या कामीं जे आपली बुद्धि, श्रम, द्रव्य व देह एकनिष्ठपणें अर्पण करतील ते खरोखरीच अवतारी पुरुष म्हटले पाहिजेत. आमच्याकडील धर्मसंस्थापना म्हटली म्हणजे श्रीमान् जगद्गुरू शंकराचार्य यांची होय." यानंतरच्या दुसऱ्या लेखात जो तो राजसेवेकरता विद्यार्जन करणाऱ्यांबद्दल खेद व्यक्त करून म्हटले होते, "जुन्या संस्था गेल्या, जुने लोक गेले, व त्याबरोबर एकनिष्ठपणें व करारीपणानें काम करण्याची सवय गेली. धर्मसंस्थापनेसाठीं राष्ट्रांतील पहिल्या प्रतीचीं माणसें असावीं लागतात." (केसरी, १ डिसेंबर १८९१).

सामाजिक नेते कसे असावेत ?

समाजसुधारणा हा धर्मसुधारणेचा, धर्मपुनर्स्थापनेचा एक भाग आहे, असे टिळकांना वाटत होते, असे दिसते. १८९२ साली 'सालगुदस्ता' हा वार्षिक सिंहावलोकन करणारा लेख लिहिताना टिळकांनी ही संकल्पना मांडली होती. सामाजिक पुनर्रचना, सामाजिक बंधने, धर्माचे नियंत्रण यांचा एकत्रित व एकसूत्री विचार टिळकांनी कोठे मांडलेला आढळत नाही. पण समाजाचे नेतृत्व तत्त्वज्ञ, त्यागी, आदर्श सदाचरणाच्या, सश्रद्ध पुरुषांनी केले पाहिजे, हा मुद्दा ते संतांची उदाहरणे देऊन सतत मांडीत असत. उदाहरणार्थ 'साल गुदस्ता' याच लेखात टिळकांनी म्हटले होते, "सामाजिक खात्याचा हिशेब बघतां खऱ्या सुधारणेचें बीज जास्त रुजत चाललें आहे असें आढळून येईल. राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सरकारी सत्ता व अधिकार आकुंचित

करून तो लोकांकडे जास्त जाईल अशाकरितां सरकारशीं आपणांस सामना केला पाहिजे, त्याप्रमाणें सामाजिक बाबतींतहि हल्लींच्या व्यवस्थेंत ज्या सुधारणा होणें इष्ट आहेत, त्या घडवून आणण्याकरितां एकदर जुन्या व नव्या लोकांशीं सामना करावा लागतो. परंतु या दोन प्रकरणांत मुख्य भेद असा आहे कीं, राजकीय प्रकरणीं क्रियेचा सर्व भार सरकारवर टाकून आपणांस जसें स्वस्थ बसतां येतें तसें सामाजिक बाबतीत करतां येत नाहीं. ज्या समाजाची स्थिति सुधारण्याचा आपण विचार करीत आहों त्याच्या घटकावयवांपैकींच आपण एक असून, आपणांस जर पुढारीपणा घेणें आहे, तर सदर अधिकारास योग्य अशी हिंमत आपल्या अंगीं असली पाहिजे व असली क्रिया आपल्या हातून घडली पाहिजे. हा भेद महत्त्वाचा आहे व तो उत्तरोत्तर लोकांच्या जास्त लक्षांत येत चालला आहे. लोकांची खरी उन्नति होण्यास शंकराचार्य, बुद्ध, तुकाराम यांसारखे अवतारी पुरुष झाल्याखेरीज गत्यंतर नाहीं, ही गोष्ट लोकांच्या मनांत जास्त जास्त येऊं लागली आहे. इतउत्तर सामाजिक सुधारणेस कोणती दिशा लावावी व खरे पुढारी कोणास म्हणावें, चांगले पुढारी आतां मिळत नसल्यास ते मिळेपर्यंत काय तजवीज करावी, या सर्व गोष्टींचा विचार अजून घाटत आहे; व हल्लींचा क्रम असाच सुरू राहिल्यास त्याचा लवकरच निर्णय होईल. जातीच्या हक्कासंबंधानें मुंबई हायकोर्टानें केलेले एक दोन ठराव आपणांस बरेच अनुकूल आहेत. त्याच पायावर 'धर्मस्थापने'करितां एखाद्या संस्थेची उभारणी केल्यास व तिला योग्य पुढारी मिळाल्यास ह्या कामीं बरेच यश येण्याचा संभव आहे." (केसरी, १२ जानेवारी १८९२, स. टि. खंड ५, पान ५०१–५०२.) याचा अर्थच हा की, टिळकांना धर्मसंस्थापनेचा विचार करणे आवश्यक वाटत होते.

समाजनियमनाची नवी व्यवस्था

पुनर्विवाहाच्या प्रश्नावर शंकराचार्यांचा सुधारकांस प्रतिकूल असा निर्णय लागताक्षणीच शंकराचार्यांविरुद्ध लोकांनी बंड केले. त्यावेळी, टिळकांनी 'केसरी'त एक स्फुट लिहिले १८९६. इंग्लंडमध्ये एक विवाहविषयक कायदा झाला होता. त्यानुसार बायकोच्या बहिणीशी बायको मयत झाल्यास लग्न करण्याची परवानगी देण्यात आली होती. यासाठी ५० वर्षे लोकांना चळवळ करावी लागली. हे उदाहरण देऊन टिळकांनी त्या स्फुटात म्हटले होते की, " पुण्यास शास्त्री व गृहस्थ यांची मोठी सभा भरविली होती, तिचा निकाल सुधारकांस प्रतिकूल झाला. परंतु पुढें तशाच प्रकारें लोकांपुढें हा विषय ठेवून दर दहा पंधरा वर्षांनीं जर पुनः पुनः अशा सभा भरविल्या तर केव्हां ना केव्हां तरी पुनर्विवाहास थोडीबहुत मोकळीक मिळेल. पण येवढा खटाटोप करावा कोणी? एकदा आपल्या विरुद्ध निकाल झाल्यावर इकडे स्वैर वागण्यास मोकळीक झाली. आतां मजल येथपर्यंत येऊन ठेपली आहे कीं, स्वामींस अर्ज

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

उर्फ नोटीस पाठवावयाची ती अशी कीं, तुम्ही विधवाविवाहास परवानगी द्या, नाहींतर आम्ही हवें तसें वागूं. ही पद्धत बंडाची आहे, सुधारणेची नव्हे. हें आम्ही सांगावयास नकोच. वर सांगितलेल्या मेलेल्या बायकोच्या बहिणीशीं लग्न करण्याबद्दल इंग्लंडांत जो कायदा पास झाला त्याच्या हकीकतीवरून आमच्या सुधारकांनीं बराच बोध घेण्यासारखा आहे. हल्लीं समाजाची बरीच अनवस्था होत चालली आहे. राज्यकर्त्यांच्या कायदेकौन्सिलांत लोकांचे पाहिजेत तेवढे प्रतिनिधी नाहींत, व असले तरी विधवाविवाहाच्या कामांत कायद्यानें झालें आहे त्यापेक्षा जास्त करितां येईल कीं नाहीं व करावें कीं नाहीं ह्याबद्दल बरीच वानवा आहे. तेव्हां अशा स्थितींत समाजाला नियमन करणाऱ्या ज्या पूर्वीच्या संस्था आहेत त्यांपैकीं एखादीचें पुनरुज्जीवन करण्याचा आम्हीं उद्योग करावा कीं नाहीं, हा आपल्या पुढें एक मोठा प्रश्न आहे. परंतु त्याचा व्हावा तसा विचार झाला आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. सामाजिक परिषद हें काम करण्यास नालायक आहे, हें आम्हीं पूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे." (केसरी, ११ ऑगस्ट १८९६.)

सारांश, समाजाने स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी किंवा सामाजिक नियमन करण्यासाठी सामाजिक स्वतंत्रता कायम ठेवणारी नवी व्यवस्था निर्माण केली पाहिजे, धर्माचे नियंत्रण जेव्हा नाहीसे होते तेव्हा सरकारच्या हाती सामाजिक कायदे देण्याऐवजी जनतेने स्वतःची, स्वायत्त अशी अनुशासन यंत्रणा निर्माण केली पाहिजे, हे टिळकांचे म्हणणे होते. धर्मसंस्थापनेसाठी ज्या वेळी अवतारी पुरुष नसतात तेव्हा अशा प्रकारचे समाजनियमन करणे अधिक योग्य आहे. टिळक म्हणत की, राजकारणात जशी सनदशीर चळवळ तशी समाजकारणात लोकमतपरिवर्तन घडवून कायदा करून, मगच सुधारणा घडवून आणावी.

सामाजिक नेतृत्वाचे वळण

शंकराचार्य, गौतम बुद्ध, मार्टिन लूथर यांचा संदर्भ टिळकांच्या सुधारणाविषयक लेखांत वारंवार दिला जाई. त्याचे कारण उदाहरण व लोकशिक्षण ही त्यांची सुधारणेची दोन सूत्रें होती. तसेच धर्माचे पुनरुज्जीवन करून भारतातील समाजाला आपल्या हवे ते वळण लावता येईल, असे त्यांना वाटत होते. वेदांत हा भारतीय समाजाचा जीवनविषयक दृष्टिकोण आहे. त्याला कर्मयोगाची जोड दिली तर जुन्या संस्था अजिबात मोडून न टाकता त्यांत परिवर्तन होऊ शकेल, असे टिळकांना वाटत होते. धर्ममतस्वातंत्र्य, धर्माचरणस्वातंत्र्य, उपास्य दैवतांची विविधता व सामाजिक, धार्मिक प्रश्नात राज्यसंस्थेची तटस्थता टिळकांनी मान्य केली होती, तेव्हा टिळक हे 'सामाजिक विचाराच्या दृष्टीने प्रतिगामी होते,' असे म्हणण्यापेक्षा 'ते समाजाच्या कलाने सावकाश परिवर्तन (Gradual social transformation) घडत जावे,

असे मानणारे होते,' असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. टिळकांनी जी तत्कालीन नेतृत्वावर व त्यावेळच्या अनेक सामाजिक प्रस्तावांवर टीका केली, ती या दृष्टीने समजून घेतली पाहिजे.

समाजसुधारकांनी चळवळ कशी करावी, याचे मार्गदर्शन करताना टिळकांनी आपले सुधारकांच्या नेतृत्वाविषयीचे विचार मांडले होते. 'अवलोचति' या विषयावरच्या त्यावेळी गाजलेल्या लेखमालेत टिळकांनी अधिक स्पष्टपणे हे विचार व्यक्त केले होते. (चिंतामणराव वैद्य यांनी लिहिलेली या विषयावरील पुस्तिका 'केसरी'बरोबर फुकट वाटण्यात आली होती श्री. वैद्य हे त्यावेळी ग्वाल्हेर संस्थानात न्यायाधीश होते.) टिळकांनी म्हटले होते, "आपल्या व्यवहाराची व सामाजिक रीतिभातींची सुधारणा करणें असल्यास ती आपली आपणांसच केली पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे, व तसें करण्यासहि मुख्य साधन म्हटलें म्हणजे राजश्री वैद्य म्हणतात त्याप्रमाणें स्त्रिया व मध्यम प्रतीचे लोक यांच्यांत या गोष्टीची विशेष चळवळ सुरू केली पाहिजे हें होय. परकीय सरकार केवळ दहा-पांच लोकांच्या म्हणण्यावरूनच हिंदु लोकांच्या रीतिभातींत कोणताहि महत्त्वाचा फरक कायद्यानें करण्यास धजणार नाहीं हें अगदीं उघड आहे. तेव्हां कायदा कायदा म्हणून ज्यांनीं ओरड मांडली आहे त्यांनींहि लोकमत आपल्या बाजूचें करण्याची खटपट केली पाहिजे. बहुमत आपल्या बाजूचें झाल्याखेरीज हल्लींच्या काळांत कोणास कोणत्याहि प्रकरणीं यश येण्याची आशा राहिली नाहीं. त्यांतूनहि सामाजिक प्रश्नांसंबंधीं आणखी असा विशेष प्रश्न आहे कीं, अमुक गोष्ट करा असें लोकांस सांगणाऱ्या मंडळींच्या उपदेशांत व आचरणांत कांहीं तरी मेळ असावा लागतो, नाहींपेक्षां इसापनीतींतील बैड्रूक वैद्याचा ज्याप्रमाणें उपहास झाला त्याच उपहासास हे उपदेशक पात्र होतात. ह्या दोन्ही अडचणी लक्षांत आणून सुधारणेचा उद्योग चालविला पाहिजे. तसा उद्योग आजपर्यंत झाला नाहीं हें रा. वैद्य यांनीं सुधारणेच्या खटपटीचा जो इतिहास दिला आहे त्यावरून स्पष्ट होतें."

"सुधारलेल्या राष्ट्रांतून अशी रीत आहे कीं, जेव्हां एखादी गोष्ट अमलांत आणणें इष्ट आहे असें कांहीं लोकांस वाटतें तेव्हां लागलीच ते लोक एखादी लहानशी मंडळी स्थापन करितात व जिवापाड श्रम करून स्वार्थाकडे नजर न देतां एकसारखी लोकमत आपल्या बाजूचें करण्याची खटपट सुरू करितात. आमच्या देशापेक्षां विलायतेंत वर्तमानपत्रांचा फैलाव जास्त असून त्यांचें वजनहि अतिशय आहे. तथापि या उद्योगी मंडळीस फक्त वर्तमानपत्रांचेंच साहाय्य पुरेसें वाटत नाहीं. कोणी आपला सर्व धंदा सोडून लोकांस व्याख्यानें देत हिंडतात, कोणी स्वतंत्र पुस्तकें अगर पत्रकें काढून त्यांच्या लाखों प्रती लोकांस फुकट वांटतात, कोणी जागोजाग आपल्या मताच्या प्रसारार्थ मंडळ्या व उपमंडळ्या स्थापन करितात आणि कोणी आपल्या

मतांच्या मंडनार्थ नाटकें लिहून त्यांचा प्रयोग करितात. हे सर्व उपाय अमलांत आणण्यास द्रव्याची किती जरूर आहे हें सांगावयास नकोच. आमच्यांत अशी म्हण आहे कीं, सर्व सोंगें येतात, पण पैशाचें सोंग येत नाहीं; परंतु पाश्चिमात्य देशांतील लोकांची कार्य करण्याची हातोटी कांहीं विलक्षण आहे. एकदां एखादी गोष्ट करावयाची असें त्यांनीं मनांत आणलें म्हणजे मग त्या मताचे लोक आपलें सर्वस्व त्या कामीं खर्चण्यास तयार असतात. त्यांतील असें कोणी म्हणत नाहीं कीं, 'पुनर्विवाह करावा असें आमचें पूर्ण मत आहे व कोणी असा विवाह केल्यास आमचा त्याच्या घरीं जेवावयास किंवा पानसुपारीस जाण्याचा सक्त निश्चय आहे, बाकी आम्हांस पुनर्विवाह करावयास किंवा पुनर्विवाहापासून झालेल्या संततीशीं शरीरसंबंध करावयास सांगाल, तर तेवढी गोष्ट मात्र आमच्या वृद्ध मातोश्रींच्या भिडेखातर आम्हांस करितां येत नाहीं.' पंडिता रमाबाईस हिंदु विधवांची स्थिति सुधारण्याकरितां जी मदत मिळाली आहे ती देखील याच लोकांकडून! तात्पर्य, हातीं घेतलेलें काम कसें तडीस न्यावें याचा कित्ताहि पाश्चात्त्य लोकांकडूनच आपण उचलला पाहिजे, व तो जोपर्यंत आपण उचलला नाहीं तोंपर्यंत सुधारणेची आमची बडबड व्यर्थ आहे; आम्हांस पैशाचा इतका लोभ आहे कीं, लाखों रुपये जवळ झाले तरी तृप्ति होत नाहीं, कृति पहावी तर (चोरून मारून केलेल्या गोष्टी सोडून द्या) घरांत विचारल्याखेरीज एकहि पाऊल पुढें पडत नाही, आणि हिमतीच्या व धैर्याच्या नावानें आंवळ्याएवढें पूज्य! एक मात्र गुण पूर्णपणें आमच्यांत दृष्टीस येतो. आमचे विचार खुद्द मिल्ल व स्पेन्सर यांच्याहि पुढें धाव घेत असतात. आणि 'वाचि वीर्यं द्विजानाम्' या न्यायानें आमची ओरड मात्र खूप चाललेली असते. अशा तऱ्हेच्या सुधारकांस रा. वैद्य यांचीं मतें अर्थातच रुचणार नाहींत हें आम्ही जाणतों, परंतु ज्या अर्थी रा. वैद्यांप्रमाणें आम्हांस या कामीं दुसरा कांहीं इलाज दिसत नाहीं त्या अर्थी कोणाच्या खुषीनाखुषीकडे न पाहतां खरा प्रकार लोकांपुढें मांडला पाहिजे. रा. वैद्य यांनीं स्त्रिया व मध्यम प्रतीचे लोक सुधारणेस अनुकूल करून घेतलें पाहिजे असें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. पण ती गोष्ट सिद्धीस नेण्यास फक्त चांगलीं पुस्तकें वांटूनच पुरें होणार नाहीं. रा. वैद्य यांनीं आपला वेळ, बुद्धि व पैसा खर्च करून आपल्या हातून हाणारी गोष्ट करण्याचें पत्करलें आहे हें ठीकच आहे; परंतु ज्यांस त्यांच्याप्रमाणें सुधारणा होणें इष्ट वाटत आहे त्यांनीं एखादी मंडळी स्थापन करून मिशनरी लोकांप्रमाणें या कामीं लेखन, वाचन व उदाहरण या तिन्ही रीतींनीं यथाशक्ति कां मदत करूं नये, हें आम्हांस समजत नाहीं. पुस्तकापेक्षांहि कीर्तन किंवा व्याख्यानांपासून जास्त उपयोग होतो ही गोष्ट सर्वांस ठाऊकच आहे. त्याचप्रमाणें जागोजाग एकाच कामाकरितां मंडळ्या स्थापन करण्यापासूनहि किती उपयोग होता हें कॉंग्रेसच्या उदाहरणावरून लोकांच्या लक्षांत आलेंच आहे. मग

सामाजिक सुधारणेच्या कामीं या साधनांचा आपण कां उपयोग करूं नये, हें आम्हांस समजत नाहीं. लोकमत राजकीय विषयांत व इतर बाबतींत आमच्या तर्फेनें असणें जरूर आहे. मग सामाजिक बाबतींतच आम्ही त्यांस सोडून कोठें जाणार? करितां पंचवीस तीस वर्षांत कोणत्या गोष्टी घडून येणें शक्य आहेत याचा नीट विचार करून त्याप्रमाणें लेखन-वाचन-उदाहरण द्वारां लोकमत आपल्या बाजूचें करण्यास प्रथमतः उद्योगास लागावें अशी सर्व सुधारणेच्छू जनांस आमची प्रार्थना आहे." (केसरी, १८ नोव्हेंबर १८९० स. टि. खंड ५, पान ६३२-६३३.)

समाजसुधारणेचे नेतृत्व कार्यशील असले पाहिजे, याच्यावर टिळकांचा भर होता. हे वरील प्रदीर्घ उताऱ्यावरून समजून येईल. नेमस्तांना विरोध करताना ते राजकारणात ज्या कार्यप्रवणतेचा आग्रह धरीत तिचाच ते समाजसुधारणेच्या क्षेत्रातही पुरस्कार करीत होते. त्यांना नुसते बोलके सुधारक किंवा स्वतः आचरण न करणारे परस्परसुधारक पसंत नव्हते.

टिळकांचा धर्मविचार

टिळक व तत्कालीन सुधारक यांच्यामधला आणखी एक महत्त्वाचा मतभेदाचा मुद्दा धर्मविषयक भूमिकेचा होता. धर्म ही समाजपरिवर्तन करणारी, समाजाला वळण लावणारी, नैतिक मार्गदर्शन करणारी उपयुक्त संस्था आहे व ती मोडता कामा नये, ही टिळकांची भूमिका होती. धर्मनिंदा, धर्मतिरस्कार तर त्यांनी कधीच केला नाही, पण धर्मव्यवस्था बदलली पाहिजे, कालगती व कालप्रेरणेनुसार आचार बदलले पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे ही त्यांची मते दर्शविणारे अनेक उद्‌गार, वचने आढळतात. धर्मभेद, उपासनापंथांतील विविधता टिळक मानीत असत. ख्रिस्ती व मुसलमान किंवा जैन-बौद्ध या धर्मांविषयी टिळक हेच सांगत. 'हिंदुधर्माचें स्वरूप-लक्षण' नावाचा जो लेख त्यांनी 'चित्रमयजगत्'मध्ये १९१५ साली लिहिलेला होता, त्यात म्हटले होते, "हिंदुस्थानांत राहाणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि धर्माच्या लोकांबद्दल आमची वाईट बुद्धि आहे असें कोणीं समजू नये. चार भावांचीं त्यांच्या उंचीवरून किंवा स्वरूपांवरून पृथक् पृथक् लक्षणें दिल्यास त्यांच्यामध्यें ज्याप्रमाणें वैमनस्य उत्पन्न करण्याचा दोष लक्षण देणाऱ्यावर येत नाहीं; तद्वतच हिंदु धर्माचें पृथक् पृथक् दिल्यानें इतर धर्मांची निंदा होत नाहीं किंबहुना ज्यानें त्यानें आपल्या धर्माप्रमाणें चालावें हेंच त्यास श्रेयस्कर आहें, असें हिंदु धर्माचें कायमचें तत्त्व आहे; या हिंदु धर्माचें किंवा तदनुयायांचें लक्षण दिल्यानें इतर धर्मांस त्यामुळें कमीपणा येणें कधींच शक्य नाहीं, असें आमचें मत आहे." (स. टि. खंड ५, पान २८१.) टिळकांचा धर्मविषयक दृष्टिकोण हा धर्मस्वातंत्र्यावर आधारलेला होता, धर्मविहीन किंवा इहवादी दृष्टीवर आधारलेला नव्हता, हे महत्त्वाचे आहे. इतर धर्मांचे

सहअस्तित्व मानून त्यांच्याविषयी उदार दृष्टी बाळगा, असे त्यांचे सांगणे असे.

धर्माची व्याख्या

धर्माची मूळ कल्पना पारलौकिक मतावर आधारलेली असते. टिळक त्याविषयी म्हणाले होते की, "शब्दाच्या रूढार्थांपैकीं मुख्य अर्थ पारलौकिक आहे. परलोक म्हणजे स्वर्ग, स्वर्गसुख किंवा मोक्ष परमेश्वराच्या कृपेनें किंवा प्रसादानें होतो, ही समजूत सर्व धर्मांत सामान्य असून निरनिराळ्या धर्मांतून परमेश्वराच्या स्वरूपाबद्दलचे आणि त्याची कृपा किंवा प्रसाद संपादन करून घेण्याचे निरनिराळे मार्ग वर्णिलेले असतात." (स. टि. खंड ५, पान २८२.)

धर्माचा व्यवहारात व राष्ट्रजीवनात काय उपयोग आहे, हेही टिळकांनी स्पष्ट केले होते. त्यांनी लिहिले होते, "परमेश्वराची प्राप्ति करून आयुष्याचें सार्थक करणें हा धर्माचा मुख्य विषय होय हें खरें आहे, पण धर्मश्रद्धेनें संसारात किंवा राष्ट्राच्या व्यवहारांत किंवा राष्ट्राच्या इतिहासांतहि पुष्कळ फायदा होतो. इतकेंच नव्हें तर, राष्ट्राच्या उत्कर्षास अशा प्रकारची श्रद्धा राष्ट्राच्या पुढाऱ्यांच्याहि अंगीं असणें अवश्य आहे. हा सिद्धांत हल्लीं सर्वमान्य झाला आहे." (केसरी ३ नोव्हेंबर १९०३, स. टि. खंड ५, पान ७०४.) म्हणून विद्यार्थ्यांना धर्मशिक्षण दिले पाहिजे असेही टिळकांनी म्हटले होते.

पाश्चिमात्य विद्येचा परिणाम

पाश्चात्य शिक्षणाने व विचारानें हिंदुधर्माविषयी अश्रद्धा निर्माण झाली, न्यूनगंड निर्माण झाला. त्याचा परिणाम हिंदुस्थानावर कसा झाला याचे वर्णन टिळकांनी 'आपला धर्म' या लेखात केले होते. "पाश्चिमात्य विद्येची ज्या वेळेस आमच्याकडे पहिल्यानें सुरुवात झाली त्या वेळेस पाश्चिमात्यांचें शास्त्रीय ज्ञान व पद्धति पाहून कांहीं मडळी इतकी दिपून गेली होती कीं, घटपटादिकांची व्यर्थ खटपट अगर द्वैताद्वैतादि काथ्याकूट त्यांस नीरस वाटून त्यांनीं एकदम पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाकडे धांव घेतली. आमचा खरा धर्म कोणता आहे, जीवेश्वराचा काय संबंध आहे, ह्या विषयावर आपणांमध्ये कोणते ग्रंथ आहेत, त्यांत कसा काय विचार केला आहे, या विचाराचा व बाह्य आचाराचा कितपत संबंध अगर कार्यकारणभाव आहे इत्यादि गोष्टींचा विचार न करितां निरीश्वर देवाच्या आधुनिक प्रार्थनेस भुलून या मंडळींनीं नाना पंथ काढले व त्यांचा यथाशक्ति प्रसार करण्याचाहि प्रयत्न केला. परंतु ही प्रवृत्ति लवकरच कुंठित झाली." (केसरी, २३ फेब्रुआरी १८९२, स. टि. खंड ५, पान २७३-२७४.)

हिंदुधर्माची वैशिष्ट्ये

याच पार्श्वभूमीवर टिळकांनी धर्मविचार मांडला होता. तो धर्माविषयीच्या भावुक किंवा अंधश्रद्धेने नव्हे तर तत्त्वविचाराने. टिळकांनी स्वतःबद्दल 'मी भक्त नाही, मी धार्मिक गृहस्थ नाही' असे म्हटले होते. (पुणे येथील भाषण, ५ फेब्रुआरी १९०८, स. टि. खंड ६, पान ८१५.) याच संदर्भात टिळक असेही म्हणाले होते की, "परमेश्वर आणि धर्म यांशिवाय आम्हांला कोणी त्राता नाहीं. हिंदु समाज एके ठिकाणीं ठेवावयाचा आहे व परकीय सरकारच्या राज्यांत परकी लोक आमच्या फुटीचा फायदा घेण्यास सभोंवतीं घिरट्या घालीत असतां एकी ठेवणें निराळें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे...इंग्रजी शिक्षणानें धर्मावर परिणाम होत आहे. राज्यकर्ते परकीय आहेत. परधर्मीयांजबळ मनुष्यबळ आहे व द्रव्यबळ आहे. आम्ही माणसें आहों, पण दरिद्री आहों. पंगु आहों, पण परमेश्वराची आमच्यावर कृपा आहे, नाहींतर इतकीं हजार वर्षें आम्ही राहिलोंच नसतों. हल्लींची स्थिति वाईट आहे. हा इतर धर्मीयांचा किंवा दैवाचा दोष नाहीं, असला तर तो आपलाच अपराध आहे, तेव्हां यत्न करा, न केल्यास मग तुम्हांस दोष भोंवल्यास ईश्वराचा अपराध नाहीं." (पुणे येथील भाषण, १५ सप्टेंबर १९०७, स. टि. खंड ६, पान ८०९.)

धर्माचे महत्त्व

या अनुषंगाने टिळकांचे धर्मरक्षणासंबंधीचे विचार लक्षात घेतले पाहिजेत. समर्थ रामदासांच्या कामगिरीचे महत्त्व सांगताना टिळकांनी हे विचार मांडले होते. तसेच राजकारण, समाजव्यवहार व धर्म यांचा परस्परसंबंधही त्यांनी स्पष्टपणे मांडला होता. "धर्म आणि व्यवहार यांची जोडी कशी घालावयाची हें समर्थ रामदासांनीं शिकविलें. घराचें दार बंद करून उपासना केली कीं काम संपलें, घराबाहेर कोणाचेंहि राज्य असो, बाहेर वाटेल त्या आपत्ति येवोत, त्यांचा धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, असा एक पूर्वी समज होता धर्माचा इतर व्यवहारांशीं कांहीं संबंध नाहीं. राजकीय व्यवहार, देशाची कल्पना यांचा धर्मांत अंतर्भाव नाहीं अशा प्रकारच्या कल्पना किंवा कुकल्पना पूर्वी आमच्यांत शिरल्या होत्या व अलीकडेहि अशी कल्पना आमच्या शाळेंतून शिरली आहे."...

"धर्मामुळें तंटे होतात; हें म्हणणें बरोबर नाहीं; असें म्हणणें वाईट आहे. तंटे होतात. तंटे ज्यांना करावयाचे आहेत, त्यांच्या कृत्यामुळें ते होतात. धर्माचें रहस्य तंट्यांत नाहीं, तें एकी करण्यांत आहे. 'वसुधैव कुटुम्बकम्' हें तत्त्व धर्म शिकवितो. माणसांमध्ये तंटे लावून देण्याकरितां ईश्वरानें धर्म निर्माण केला नाहीं. ज्यांच्या धर्मांत असें सांगितलें नाहीं अशा लोकांनीं हें खूळ उठविलें आहे. इतर धर्म खोटे, इतर धर्मांचे लोक नरकाला जाणार, असें आमचा हिंदु धर्म शिकवीत नाहीं. तंटा

करणारा धर्म आमचा कीं इतरांचा, याचा विचार आपणच करावा. धर्मखेरीज लोकांच्या मनांत चांगल्या कल्पना उत्पन्न होत नाहींत. अति उच्च कल्पना इंग्रजी तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतच सांपडतात, असें प्रतिपादण्याचें आमच्यांतील इंग्रजी शिक्षण मिळालेल्या कांहीं ग्रॅज्युएटांनीं धाडस केलें. पण जुने श्रीसमर्थ रामदासस्वामींचे ग्रंथ वाचल्यास राष्ट्र ही कल्पना, मनुष्य जन्मतःच स्वतंत्र व ते सर्व सारखे आहेत, ह्या कल्पना आपल्या धर्मापासून शिकण्यासारख्या आहेत, असें समजून येईल. ख्रिस्ती धर्मांत असें सांगितलें नाहीं म्हणून अशा तऱ्हेचीं तत्त्वें त्यांना निराळे ग्रंथ लिहून सांगावीं लागतात. पहिल्यानें श्रीसमर्थ रामदासांनीं हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन केलें. या धर्मांत असें तत्त्व आहे कीं, ज्याला मोक्षप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देश-बांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देश व देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्व प्रकारे धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों. उदात्त विचार विकसित करून संसारांतून वरवर नेऊन ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची आहे असें धर्माचें तत्त्व आहे." (सोलापूर येथील भाषण, २६ फेब्रुआरी १९०८, स. टि. खंड ६, पान ९५७–९५८.)

रँग्लर परांजपे यांनी टिळकांच्या तत्त्वज्ञानावर व कार्यावर जे आक्षेप एका लेखात घेतले होते, त्यांना उत्तर देताना लिहिलेल्या लेखात टिळकांनी म्हटले होते, "हिंदु-धर्माइतका आग्रहशून्य धर्म दुसरा कोणताच नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या धर्मांत राहून आत्म्याचें कल्याण करावें असें हिंदु लोक समजतात. आणि असें जर आहे तर हिंदु धर्माचें शिक्षण दिल्यानें राष्ट्रीयत्वाची हानी होईल असें मानणें असमंजसपणाचें लक्षण होय." धर्मांत केवळ परमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याची कृपा संपादन करून घेण्याच्या मार्गाचाच समावेश होतो, असें नाहीं, तर त्याबरोबरच कांहीं सामाजिक, व्यावहारिक व नैतिक आचाराचा आणि आयुष्यांतील प्रसंगविशेषीं कराव्या लागणाऱ्या विधींचा व संस्कारांचाहि त्यांत संग्रह केला जातो, असेही टिळकांनी म्हटले होते.

सारांश, धर्म ही केवळ आध्यात्मिक कल्पना नसून समाजाला वळण लावण्या-साठी, त्याचे शील किंवा चारित्र्य बनविण्यासाठी धर्माचा व्यावहारिक उपयोग होतो, हे टिळकांचे मत होते. त्यामुळे त्यांच्या सामाजिक मतांची घडण होण्यामध्ये किंवा त्यांच्या सामाजिक प्रश्नांविषयींच्या प्रतिक्रियांमध्ये धर्माविषयीची त्यांची ही श्रद्धा अत्यंत महत्त्वाची आहे. हिंदू धर्माविषयींचा त्यांचा अभिमान किंवा परंपरेविषयीची त्यांना वाटणारी आपुलकी याच्यातून निर्माण झालेली होती. 'नीती, करार व कायदा यांची बंधनें समाजावर असतात. तसेच धर्माचेंहि बंधन असतें आणि तें अनुल्लंघनीय असतें,' असे टिळकांनी म्हटले होते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

धर्मबंधनांचे स्वरूप

धर्मबंधनांचे, धर्मसंस्काराचे स्वरूप कशा प्रकारचे असते याचे वर्णनही टिळकांनी केले होते. " धर्मानुयायित्व हा केवळ बुद्धिगम्य ज्ञानाचा परिणाम नसून त्याला बाह्य संस्कारांची नेहमींच अपेक्षा असते...हे आचार किंवा हे संस्कार आयुष्यांत अनेक वेळां करावे लागत असल्यामुळें दर एक वेळीं मी अमुक धर्मांतला आहे असें तत्तत्-धर्मीयांस कळून येतें, व प्रत्येकाच्या धर्मांतील ध्येय त्याच्या डोळ्यांपुढें येऊन धर्मा-वरील त्याची श्रद्धा दृढ होत जाते. स्वधर्मावरील श्रद्धा याप्रमाणें दृढ करणें आणि एका धर्मबंधनानें आपण सर्व बांधिलेले आहोंत हें त्या त्या धर्माच्या अनुयायांस ज्ञान करून देऊन तत्तत्धर्मीयांची संघशक्ति वाढविणें हेच या आचारांचे मुख्य उपयोग होत. " (स. टि. खंड ५, पान २८३.)

हिंदू धर्माचे स्वरूपलक्षण

याच अनुषंगाने टिळकांनी हिंदू कोण याची व्याख्या केली होती. त्यांचे म्हणणे असे होते की, " हिंदु कोणाला म्हणावें, खिस्ती कोणाला म्हणावें याची व्याख्या करितांना निरनिराळ्या धर्ममतांचे केवळ तात्त्विक भेद दाखवून काम भागत नाहीं. त्या त्या धर्मांतील बाह्यविधि व संस्कारहि पहावे लागतात, असें सिद्ध होतें. धर्म किंवा तत्त्वज्ञान यांमधील जो मुख्य भेद आहे तो हाच होय. निर्गुण ब्रह्मात्मा परमेश्वर बनण्यास ज्याप्रमाणें त्यांस सर्व उच्च गुणांची भर घालावी लागते, तद्वतच नुसत्या बुद्धिग्राह्य तत्त्वज्ञानास व नीतिज्ञानास धर्माचें स्वरूप येण्यास त्या ज्ञानास कांहीं विशिष्ट विधि, आचार व संस्कार—मग ते थोडे असोत वा पुष्कळ असोत—यांचा पोषाख चढवावा लागतो किंवा पोषाखाचेंच लौकिकांत अधिक प्रस्थ असतें, असें कोणताहि धर्म पाहिला तर दिसून येईल, " (स. टि. खंड ५, पान २८४.)

" हिंदु धर्मांत आचारांच्या बाबत श्रुति, स्मृति व पुराणें यांना प्रमाण मानतात. वैदिक धर्मामध्ये आचार प्रथम मानला आहे, आचार हें धर्माचें मूळ होय व ' विष्णु हा धर्माचा स्वामी होय, ' असें महाभारतांत म्हटलें आहे. स्मृतिग्रंथाप्रमाणें धर्म-प्रमाणांत सदाचाराची गणना केली आहे. वैदिक आर्य जेव्हा हिंदुस्थानांत आले तेव्हा त्यांचे आचार-संस्कार एकाच प्रकारचे होते. हिंदुस्थानांतील तत्कालीन अनार्य लोकांवर त्यांची कमीजास्त छाप बसली आणि अखेर सर्व अनार्य आणि मिश्र लोकांचा वैदिक धर्मांतच समावेश होऊ लागला. अशा रीतीनें मूळ वैदिक धर्म व्यापक झाला. पण त्याबरोबरच प्रांतोप्रांतींच्या व वैदिक धर्मांत शिरलेल्या लहान लहान समाजांच्या आचारांतहि थोडें थोडें अंतर पडूं लागलें. तेव्हा धर्माचें एकत्व कायम ठेवून या भिन्न भिन्न आचार संस्कारांची कमीजास्त छाप बसलेल्या सर्वांची अविरोधपणें कांहीं व्यवस्था लावणें भाग पडलें. ही व्यवस्था म्हणजेच गुणकर्म झालेली चातुर्वर्ण्यव्यवस्था

होय. परमेश्वराचें ज्ञान किंवा त्याच्या प्राप्तीनें होणारी उपलब्धि चारहि वर्णांस एकच आहे. तेव्हां परंपरेनें जे विधिसंस्कार प्राप्त झाले आहेत ते पाळणें व त्यांचें बंधन धर्मदृष्ट्या उत्पन्न झालें आहे, निव्वळ नीतिदृष्ट्या किंवा राजशासनदृष्ट्या नव्हे, अशी श्रद्धा असणें हे आचारात्मक हिंदु धर्माचें मुख्य लक्षण होय." टिळक वेदांचे महत्त्व सांगताना म्हणत, "कोणत्याहि धर्मांत प्रमाणभूत असा एक ग्रंथ असतो. हिंदु धर्माचा असा ग्रंथ म्हणजे वेद होय. वेदांस प्रमाण मानून व साधनांची अनेकता कबूल करून जर इतर धर्मांतील उपास्य दैवतें स्वीकारली तर हिंदुत्व नष्ट होत नाहीं हें बुद्धास आम्ही दशावतारांमध्यें घातला आहे, यावरून सिद्ध होतें. अशा तऱ्हेनें इतर धर्मांतील उपास्यें आमच्यांत आलीं तर त्या त्या धर्माचीं लक्षणें सोडून येतात."

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानाम् नियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ।

अशी 'हिंदू' धर्माची व्याख्या टिळकांनी केली होती याचा अर्थ असा की, वेदांच्या ठिकाणी प्रामाण्यबुद्धी म्हणजे वेद प्रमाण मानणे, ईश्वरप्राप्तीची साधने अनेक आहेत हे मान्य करणे आणि उपास्य दैवत अमुकच असले पाहिजे असा नियम नसणे हे आमच्या धर्माचे लक्षण होय. या लेखाचा समारोप करताना टिळकांनी 'हिंदू' हा शब्द धर्मदृष्ट्या वापरला. "तत्सदृश जैन व बौद्ध यांच्यासारखे आचारसाध्य असलेले लोक एकदेशस्थ, मूळ एका जातीचे या गोष्टी लक्षांत आणून त्यास 'हिंदु' म्हणतात. हिंदु शब्दाचा अतिव्यापक अर्थ घेतला तर हिंदुस्थानांत राहाणाऱ्या पर-धर्मीय लोकांसहि तो लागू पडतो." (स. टि. खड ५, पान २८९–२९०.)

बौद्ध धर्माचे कार्य

टिळक बौद्ध, जैन, ख्रिस्ती धर्म व हिंदु-मुस्लीम प्रश्न यांचा सामाजिकदृष्ट्या कसा विचार करीत, हे पाहाणे उपयुक्त ठरेल. तो टिळकांच्या धर्मविचाराचाच भाग समजला पाहिजे. टिळकांनी श्रीलंकेत दौऱ्यावर असताना बौद्ध धर्माविषयी जी व्याख्याने दिली ती या दृष्टीने महत्त्वाची आहेत. बौद्धधर्म व वैदिक धर्म यांचा एकमेकांवर कोणता परिणाम झाला होता, याचे विवेचन टिळकांनी कोलंबो येथे दि. ३ एप्रिल १९१८ रोजी दिलेल्या व्याख्यानात केले होते. टिळक म्हणाले होते, "वैदिक धर्म, वैदिक आचार-विचार आणि वैदिक तत्त्वज्ञान या सर्वांचा उगम व प्रचार बौद्ध धर्माच्या अगोदरचा आहे. ही गोष्ट ऐतिहासिक दृष्ट्या सिद्ध झालेली आहे. बौद्ध धर्माचा उदय होण्या-पूर्वीच्या वैदिक धर्मात यज्ञयाग विचार आणि तत्त्वज्ञान विचार असे दोन भाग होते. त्यांतील यज्ञयागादि भागाला संक्षेप देऊन बौद्धिक, आध्यात्मिक व नैतिक उन्नती कडे बौद्ध धर्मानें अधिक लक्ष पुरविलें आणि या बौद्धधर्माचा वैदिक धर्मावर बराच परिणाम झाला. बौद्ध धर्मानें आत्म्याच्या अस्तित्वाचा निषेध केला आहे असें नसून

या भानगडींत न पडतां धर्मानें केवळ नैतिक उन्नति, सामाजिक कर्तव्य यांकडे लक्ष पुरविलें, बौद्ध धर्मानें वैदिक धर्मातील संन्यासाची कल्पना स्वीकारली परंतु त्यावरोबर संन्याशानें समाजांत राहून समाजसेवा करावी, कर्मयोगी व्हावें अशी त्यास दिशा लावली. बौद्ध धर्म व खिस्ती धर्म यांची तुलना करूं पहातां खिस्ती धर्म हा केवळ श्रद्धेवर अवलंबून आहे, परंतु बौद्ध धर्म विचारप्रधान आहे. ऐतिहासिक, भौगोलिक, वांशिक दृष्ट्या विचार करून पाहिलें असतां वैदिक धर्म व बौद्ध धर्म जादा भिन्न नसून बौद्ध धर्म हिंदु धर्माचेंच रूपांतर आहे. आपले धर्मप्रसारक देशोदेशीं पाठवून धर्मप्रसार करण्याची कल्पनाहि बौद्ध धर्मानें नवी काढली नसून वैदिक धर्माचाहि पूर्वी परराष्ट्रांत प्रसार झाला होता. तथापि बौद्ध धर्मामुळें वैदिक धर्मांतील अनेक अनावश्यक आचारांची काटछाट होऊन वैदिक धर्माचें स्वरूप जास्त शुद्ध व जोमदार झालें हें मान्य केलेंच पाहिजे." (केसरी, १६ एप्रिल १९१८, स. टि. खंड ५, पान ८२८.)

खिस्ती धर्मांतरासंबंधी दृष्टिकोण

टिळकांच्या काळी खिस्ती धर्मप्रसाराचे प्रयत्न म्हणून धर्मांतरे होऊ लागली होती. इंग्रजी शिक्षणाचाही परिणाम होत होता. अश्रद्धा व संशयी वृत्ती समाजात निर्माण होऊ लागली होती. स्वाभाविकच टिळकांना आपली प्रतिक्रिया व्यक्त करावी लागत असे. पाश्चात्त्य शिक्षणाने ज्यांची मने विघडली होती त्यांना उद्देशूनच टिळकांनी जास्त लिहिले होते. खिस्ती धर्मप्रसारकांनी विलोभने न दाखविता, भारतातील दारिद्र्याचा, दुष्काळाचा गैरफायदां न घेता गौतम बुद्धाप्रमाणे धर्मप्रवर्तन करून आपल्या मतांचा प्रसार करावा, अशी टिळकांची भूमिका होती. इंग्रजी शिक्षणामुळे सुशिक्षितांना कोणतीच धर्मबंधने नकोशी झाली होती. त्यांची स्थिती 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी झाली होती. खिस्ती धर्मप्रसाराच्या चळवळीस उद्देशून टिळकांनी म्हटले होते कीं, "पृथ्वीवरील सर्व नद्या एकत्र कराव्या अशी कोणी सूचना केल्यास ती जितकी वेडगळ वाटेल तितकीच खिस्ती धर्म सर्वत्र पसरण्याची कल्पना वेदांताच्या दृष्टीनें असमंजसपणाची आहे. किंवहुना आज खिस्ती धर्म सामोपचारानें किंवा बलात्कारानें चहूंकडे स्थापित केला तरीहि कालांतरानें निरनिराळ्या देशांतील खिस्ती धर्मांत इतकें अंतर पडण्याचा संभव आहे कीं, ते निराळेच धर्म आहेत असें कोणास वाटेल." खिस्ती लोकांबाबत वेदांती दृष्टिकोणातून समदर्शी वृत्ती टिळक बाळगत होते. एका लेखात त्यांनी म्हटले होते, "ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें चालून दुसऱ्यास नावें न ठेवतां सर्वांनी मिळून सदाचारानें, सन्निष्ठेनें आणि सद्बुद्धीनें परमात्म्याची ओळख करून घेऊन आपल्या आत्म्याचें हित साधावें हाच काय तो खरा पुरुषार्थ होय. वृथाभिमान जाऊन हा पुरुषार्थ साधण्याची योग्यता मनुष्याचे ठायीं

उत्पन्न होण्यास त्यास वेदांत मार्गाचेंच अवलंबन केलें पाहिजे. एवढ्याच करितां या मार्गास श्रेष्ठत्व आलें आहे. देशकालपरत्वें परमेश्वरास कोठें खिस्त तर कोठें महंमद म्हणत असले तरी साध्य व प्राप्य वस्तु एकच आहे. एवढेंच ओळखावयाचें. आमची अशी उमेद आहे कीं, वेदान्ततत्त्वांचा जसजसा त्यास जास्त अनुभव येत जाईल तसतशी त्यांच्या मनाची खिस्तादी आगंतुक भेद सोडून देण्याकडे अलेरीस खास वृत्ति होईल. वेदान्त कोणासहि आपला धर्म सोडून दुसऱ्याचा धर्म स्वीकारा, असें सांगत नाहीं तर सर्व धर्मांचें रहस्य एक आहे, हेंच त्यातील प्रतिपाद्य होय. खिस्ती धर्मांत अशा प्रकारची तत्त्वें कोठेंच सांगितलेली नाहींत. करितां त्यास वेदान्तापासून जर कांहीं शिकावयाचें असेल तर तें हेंच होय. युरोपांतील पंडित हीं तत्त्वें वेदान्तापासून हळूहळू घेत आहेत. यास प्रो. मॅक्समुल्लर यांचें हल्लीचें पत्र हाच आमच्या मतें बळकट पुरावा होय." हा लेख जर्मन पंडित प्रो. मॅक्समुल्लर यांनी प्रार्थनासमाजिस्टांना उद्देशून एक पत्र पाठविले होते, त्यावेळी टिळकांनी लिहिला होता. (केसरी, ३१ ऑक्टोबर १८९९.)

हिंदू-मुस्लिम समस्या : सामाजिक सामंजस्य हवे

टिळकांच्या राजकीय जीवनात हिंदू-मुस्लिम संबंधाची समस्या ही १८९३ च्या दंग्यापासून ते शेवटी लखनौच्या करारापर्यंत त्यांचा पाठपुरावा करीत राहिली. या काळात त्यांनी जी भूमिका घेतली, त्यातून जे त्यांचे विचार प्रकट झाले, त्यातील राष्ट्रीयत्वाशी निगडीत असलेल्या विचारांचा आलेख राष्ट्रवादावरील प्रकरणात दिला आहे. टिळकांच्या भूमिकेत दंग्यांविषयीची त्यांची भूमिका व मुसलमान समाजाविषयी त्यांची दृष्टी असे दोन भाग उरतात. दंग्याविषयींच्या भूमिकेत प्रासंगिकता असल्यामुळे व इंग्रज सरकारचे धोरण हा त्याच्यातील महत्त्वाचा घटक असल्यामुळे सामाजिक विचाराच्या चिरकालीन दृष्टीने त्याला आता महत्त्व उरलेले नाही. पण तरीही टिळकांची प्रतिक्रिया काटेकोर न्याय, कायदा व सामाजिक उदारता यांच्यावर आधारलेली होती, असे म्हणता येईल...सरकार मग ते कोणतेही असो – कायद्याच्या दृष्टीने सर्व सामाजिक गटांना एकाच न्यायाने वागविणारे हवे. टिळक हाच आग्रह इंग्रज सरकारकडे व त्यांच्या अधिकाऱ्यांकडे धरीत होते. ते म्हणत की, 'या समस्येची उकल सरकार, हिंदु व मुसलमान या तीन पक्षांनी करावयाची आहे. पैकीं सरकारकडे त्रयस्थाची व कायदा व सुव्यवस्था व लोकहित संभाळण्याची, लोकांचें जीवित रक्षिण्याची भूमिका असते. ती त्यानें कठोरपणें, न्यायवृत्तीनें पाळली पाहिजे. सरकारपुढें हिंदु व मुसलमान दोघांना आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे.' १८९३ साली पुण्यात टिळकांनीं हिंदूंची जी सभा भरविली होती, त्यावरुन बरेच राजकीय रण त्याकाळी माजले होते. टिळकांचे म्हणणे त्यांनी 'केसरी' तून मांडले होते. न्या. रानडे यांचा ही सभा

भरविण्यास विरोध होता. टिळकांनी यावेळी हिंदूंची बाजू मांडली होती, असा त्यांच्यावर मुख्य आक्षेप होता. त्याबद्दल 'हिंदु व मुसलमान लोकांत जे दंगे होतात त्यांबद्दल व दोन्ही लोकांतील मित्रत्व वाढविण्यास कोणते उपाय करावेत याबद्दल हिंदु लोकांचें मत सरकारास कळविण्याकरितां फक्त हिंदु लोकांची सभा भरवावी,' असा ठराव पुण्यातील काही नागरिकांनी आपल्या सभेत १ ऑगस्ट १८९३ रोजी केला होता. त्याला अनुसरून ही प्रकट सभा पुढे भरविण्यात आली. त्यासंबंधी लिहिताना टिळकांनी म्हटले होते, " हिंदु-मुसलमान आणि सरकार अशा तीन पक्षांचा या प्रश्नाचा उलगडा करतेवेळीं विचार केला पाहिजे, असें जें आम्ही मागें लिहिलें होतें तें प्रायः सर्वत्रांस संमत आहे. व तिन्ही पक्षांत सरकारची बाजू न्यायाधीशाची असून हिंदु व मुसलमान एका दृष्टीनें पक्षकार आहेत हेंहि त्यास कबूल आहे. इतक्या गोष्टी कबूल असल्यावर फक्त हिंदु लोकांचीच सभा भरून सरकारास हिंदु लोकांचें म्हणणें आज कळवूं नये असें म्हणणारे व हिंदु लोकांची सभा होत असल्यास ती मोडण्याचा आपल्या हातून होईल तितका इमानेंइतबारें प्रयत्न करणारे कांहीं गृहस्थ तरी आम्हांमध्ये कां मिळावें याचें खरें कारण आम्हांस अद्यापहि बरोबर समजत नाहीं. कित्येकांच्या मतें 'ये तु ह्मन्ति निरर्थकं परहितं ते के न जानीमहे' या कोटींतच असल्या गृहस्थांचा समावेश करावा असें आहे. हिंदु-मुसलमानांतील दंग्याचीं कारणें केव्हां तरी हिंदु लोकांच्यातर्फे सरकारपुढें मांडलीं पाहिजेत हें निःसंशय आहे. हिंदु-मुसलमान एकदिलानें वागतील तरच त्यांत आपल्या देशाचें कल्याण आहे ही गोष्ट आम्हांस सर्वस्वीं कबूल आहे; परंतु आमच्या दुर्दैवानें या दोन्ही जातींत जर हल्लीं तंटे होत आहेत तर हिंदु-मुसलमानांच्या पुढाऱ्यांची सभा नुसती भरविल्यानें असले दंगे पुनरपि न होण्यास जे उपाय करावयास पाहिजेत ते सर्व आपोआप घडून येतील, असें आम्हांस वाटत नाहीं. आमच्या सुदैवानें आज हिंदु व मुसलमान यापैकीं एकाच्याहि हातीं राजसत्ता राहिली नाहीं व ज्यांच्या हातांत राजसत्ता आहे ते दोन्ही जातींतील तंटे न्यायानें तोडण्यास कबूल आहेत. इतकेच नव्हे तर, तशा अर्थाचें त्यांचें अभिवचनहि आहे. अशा स्थितींत हिंदु-मुसलमानांचें ऐक्य दिवसानुदिवस वृद्धिंगत होण्यास नुसत्या उदार-बुद्धीपेक्षां न्याय आणि उदार-बुद्धि यांच्या जोडगोळीनें या कामाचा निकाल लवकर व कायमचा लागेल हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. गव्हर्नरसाहेबांनीं मुंबईच्या सभेंत सर्वांना उदार-बुद्धि अंतःकरणांत बाळगण्याबद्दल जो उपदेश केला तो एक प्रकारें योग्यच होता; पण उदार-बुद्धीच्या एकाच चाकानें हा गाडा रेटणें अशक्य आहे. हिंदु लोक हे जात्याच धर्मासंबंधीं जितके उदार आहेत तितके दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतले लोक आढळावयाचे नाहींत; असें असतां जर हिंदु-मुसलमानांमध्यें तंटे होतात तर नुसत्या औदार्यानें ते दंगे मिटतील असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदुस्थानांत ज्या निरनिराळ्या जाति हल्लीं एकमेकांशीं मिळून-मिसळून वागत आहेत त्याचें कारण इंग्रजी राज्याची

न्यायपद्धति हेंच होय व त्या पद्धतीनें हिंदु-मुसलमानांमधील वैमनस्य नाहींसें होऊन कायमचें सख्य जडण्याचा संभव आहे."

"परंतु अशा रीतीनें न्याय होण्यास प्रत्येक पक्षानें आपआपली बाजू सरकारपुढें यथास्थित रीतीनें मांडली पाहिजे; व तें काम हिंदु-मुसलमानांच्या सभा करविल्यानें सर्वत्र पार पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदु व मुसलमान या दोघांच्याहि हातीं हल्लीं राज्यसत्ता नाहीं हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. करितां दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन अखेर जे कांहीं नियम करणें असतील ते करण्याचें काम दोघांनींहि सरकारकडेच सोंपविलें पाहिजे; त्यास दुसरा इलाज नाहीं. आपण असें समजूं कीं हिंदु व मुसलमान पुढारी लोकांची या बाबतींत एकवाक्यता झाली; तरी सदर पुढारी लोक जें कांहीं सांगतील त्याचा खालच्या प्रतीच्या लोकांवर कोणत्या रीतीनें अंमल व्हावा हा प्रश्न शिल्लक राहातो तो राहातोच. सारांश, अखेरीस या बाबतींत सरकारचें वर्तन अमुक एका प्रकारचें असलें पाहिजे व त्यांनीं अमुक एका प्रकारचे नियम केले पाहिजेत असे म्हणणें भाग पडतें. हे नियम सर्वांशीं हिंदूंस अगर मुसलमान लोकांस अनुकूल होतील असें नाहीं व म्हणूनच ते हिंदु-मुसलमान लोकांच्या मिश्र सभेंत पसंत होणें अगदीं दुरापास्त आहे. हिंदूंना ज्या कांहीं गोष्टी पाहिजे आहेत त्या मुसलमानांस नकोत, व मुसलमानांस पाहिजेत त्या हिंदूंस नको आहेत. अशा ठिकाणीं ज्यानें त्यानें आप-आपली बाजू शांतपणें तिऱ्हाइतापुढें मांडून न्याय करून घ्यावा हाच एक उपाय आहे." (केसरी, १९ सप्टेंबर १८९३, स. टि. खंड ५, पान ३७७–३७८.)

हिंदू–मुस्लिम दंग्याचे वेळी सरकारने तटस्थ राहून हिंदू किंवा मुसलमान कोणाच्याही गुंडगिरीला कठोर शासन केले पाहिजे, या आपल्या भूमिकेचा पाठपुरावा करताना टिळकांनी गोवध व मशिदीवरून वाद्ये वाजवत नेणे या त्यावेळच्या हिंदु-मुस्लीम दंग्यांच्या दोन कारणांचा विचार केला होता. त्यातही त्यांची भूमिका न्यायनिष्ठुर होती. 'मुंबई-तील दंगा व सरकारचे कर्तव्य' या लेखात टिळकांनी गोवधाचा विचार केला होता. त्यात म्हटले होते, "कोणत्याहि धर्माचा अभिमान न ठेवतां दोघांसहि आपआपल्या धर्मानें वागण्याची सवलत द्यावी व विनाकारण एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस हरकत करूं लागल्यास, त्यांचें राजानें शासन करावें हेंच शहाणपणाचें तत्त्व आहे. हिंदु लोक गंध लावतात, सोवळ्यानें जेवतात, नागाची पूजा करतात, मूर्ति स्थापतात, गायीस भजतात म्हणून जर मुसलमान लोकांस वाईट वाटून ते दंगा करण्यास प्रवृत्त झाले, तर त्यांस इंग्रज सरकारनें शासन केलें पाहिजे व असें शासन न झाल्यास हिंदु लोकांच्या मनांतील रुखरुख कधींहि नाहींशी न होतां संधि सांपडेल तेव्हां ते मुसलमानांचा सूड घेण्यास प्रवृत्त होतील. उलट मुसलमानांचा प्रकारहि याचप्रमाणें आहे. हिंदु लोक गायीस पूज्य मानतात म्हणून जर ते मुसलमान मोहल्ल्यांत जाऊन खाटकाच्या हातून बलात्कारानें गाय सोडवून आणतील, तर त्यांचाहि इंग्रज सरकारचे

कायद्यानें बंदोबस्त झाला पाहिजे. सारांश, धारवाडी कांड्यांत घातल्याप्रमाणें समतोल एका मापानें हिंदु–मुसलमानांस जेव्हां न्याय मिळू लागेल तेव्हांच दोन्ही जातीतील वैमनस्य नाहींसें होऊन त्या सुखानें नांदू लागतील. इंग्रज सरकारचे कांहीं कामगार हें तत्त्व विसरून जाऊन अनेक वेळां हिंदुस्थानांतील लोकांत कलह लागले तरच इंग्रजी राज्याचें हित आहे, अशा समजुतीनें मुललमान लोकांस फाजील उत्तेजन देत असतात व तोच प्रकार हल्लीं मुंबईस सुरू आहे. हिंदूंनी प्रभासपट्टण येथील लोकांस मदत करण्याकरितां सभा भरवून पैसे गोळा केले. यामुळेंच मुसलमान लोक चिडलें, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे; परंतु या लेखकास असें समजत नाहीं कीं हिंदु लोक धोतर नेसतात म्हणून जर उद्यां मुसलमान लोक चिडू लागले, तर त्यांत मूर्खपणा व दोष कोणाचा? अशा वेळीं मुसलमान लोकांस सरकारनें चांगलीच जरब देऊन ताळ्यावर आणणें जरूर आहे. मुसलमान लोकांस वचकून अथवा भिऊन आम्ही जर आमच्या नेहमींच्या गोष्टी करणें सोडून द्यावयाचें, तर मग इंग्रज सरकारचें राज्य असण्याची बिलकुल जरूर नाहीं. आम्ही जाऊन मुसलमानांच्या पाया पडूं व ते देतील तें खाऊं, पण ही स्थिति जोपर्यंत आली नाही,जोपर्यंत हिंदु लोक इतके हताश अगर नामर्द झाले नाहींत, अगर मुसलमान लोकांचा प्रतिकार करण्याची त्यांच्या अंगांत धमक आहे, तोपर्यंत सरकारास दोन्ही जातींस न्यायानें आणि निःपक्षपातानें वागविणें जरूर आहे." (केसरी, अग्रलेख, दि. २२ ऑगस्ट १८९३, स. टि. खंड ५, पान ३६७.)

सामाजिक सामंजस्य

टिळकांच्या हिंदू–मुस्लिम प्रश्नाविषयीच्या भूमिकेत आक्रमकता नाही. पण 'जशास तसें' ही प्रवृत्ती आहे. पण त्याबरोबरच हिंदू-मुसलमान प्रश्न सोडविण्याचा मार्ग सामाजिक वेदान्त हा आहे, म्हणजे मुसलमानांना बरोबरीच्या नात्याने, समंजसपणा दाखवून वागविले पाहिजे. प्रसंगविशेषी झीज सोसण्यातही तयार असले पाहिजे असें हिंदूंना टिळक सांगत. हे सामाजिक सामंजस्य म्हणजे काय? टिळकांचे म्हणणे असे की, "हिंदु-मुसलमानांतील वैमनस्य इतर कांहीं कारणांमुळें हल्लीं जास्त वाढलें असून कधीं कधीं त्यांच्या मनानें पेट घेण्यास गोरक्षणादिकांची सबब पुरी होते. वास्तविक गोरक्षण हें त्यांचें कारण नव्हे. हिंदु-मुसलमानांमध्ये जो कांहीं स्वभावतःच थोडा द्वैत-भाव आहे, तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदान्ताची अधिक मिसळ झाल्याखेरीज कधींहि पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा नाहीं. यांपैकीं शिक्षणप्रसाराचें काम सरकारनेंच अंगावर घेतलें पाहिजे. दुसरें काम मुसलमान मौलवींच्या हातून होईल; परंतु ह्या दोन्ही गोष्टी घडून येण्यास दिनावधि लागेल; तोपर्यंत गोवध, ताबूत वगैरे बाबतींत कोणाचे कसेकसे हक्क आहेत ते नीट मनांत आणून त्या बाबतींत सरकारनें केलेले नियम कोणाची भीडमुर्वत न धरतां पाळावे असा

बंदोबस्त झाला पाहिजे. दोघांसहि सारख्या सवलती ठेवणें व शांततेचा पहिल्यानें जो भंग करील त्यास योग्य शासन करणें हें हल्लींच्या स्थितींत सलोखा ठेवण्याचे दोन उत्तम उपाय आहेत." (केसरी, ३ ऑक्टोबर १८९३, स. टि. खंड ५, पान ४९३.)

टिळक असेही सांगत की, अमेरिकेत जसे निरनिराळ्या धर्माचे, जातींचे लोक एकत्र राहतात तसेच हिंदू-मुसलमानांना एका राष्ट्रात राहावयाचे आहे. त्यासाठी एकमेकांच्या कर्तृत्वाची, शौर्याची, गुणांची नीट ओळख करून, अहंभाव सोडून ब्रिटिश राज्यकर्ते जी फूस लावीत आहेत तिला बळी न पडता समजुतीने वागले पाहिजे. यासाठी वेदान्त विचारांनी बुद्धी उदात्त झाली पाहिजे. टिळकांनी हा सामाजिक वेदांत सांगताना स्पष्ट म्हटले होते, " हिंदु आणि मुसलमान मिळून दोघेहि आपल्या शक्तीचा उपयोग दोघांच्या साधारण हितासाठी करतील. हिंदुस्थानच्या इतिहासानें अशा रीतीचा ज्यांच्या मनावर परिणाम झाला आहे व ज्यांची धर्म-बुद्धि वेदान्त-विचारांनी उदात्त झाली आहे, त्यांस आपआपसांतील तंट्यांची बारीकसारीक कारणें काढून टाकण्यास पंचाईत पडणार नाहीं. हिंदु-मुसलमान लोकांचें खाणेंपिणें, रीतिरिवाज, संस्कार सोहळे उत्साह आणि विधि हे बऱ्याच गोष्टींत भिन्न आहेत; परंतु एकदां सलोख्यानें आणि मित्रत्वानें वागावयाचें असें निश्चय झाल्यावर एकमेकांनीं एकमेकांच्या सोयीसाठीं व समजुतीसाठीं कांहीं कांहीं गोष्टी करण्यास व कांहीं सोडण्यास कबूल झालें पाहिजे. अकबर बादशहानें गोवध बंद केला होता व निजाम सरकारच्या राज्यांत अद्यापहि तशा प्रकारचा हिंदूंस त्रास होत नाहीं यांतील बीज हेंच होय." (केसरी, १० ऑक्टोबर १८९३, स. टि. खंड ५, पान ३८५.)

कडक धोरण

टिळकांच्या विचारात सलोखा व समंजसपणा व समाजहिताची हिंदू-मुसलमानांत सारखीच जाणीव या तीन गोष्टी होत्या, हे निःसंशय. भारतीय राष्ट्रवादाची सामाजिक घडण याच त्रिसूत्रीवर व्हावयास हवी, असे टिळक सांगत होते. पण हे धोरण अंमलात आणताना एकतर्फी उदारता टिळकांना पसंत नव्हती, हे त्यांनी दंग्यांबाबतच्या आपल्या लिखाणातून वारंवार मांडलेले दिसते. त्याबेळी मुसलमानांना फूस लावून हिंदूंपासून फोडण्याचे इंग्रज सरकारचे धोरण होते. त्यामुळे हे लिखाण अधिक कडक झाले होते. उदाहरणार्थ, 'मोहरम व हिंदूंची वृत्ती' या लेखात पुण्यात १८९४ साली झालेल्या मोहरमच्या सणासंबंधी चर्चा करताना म्हटले होते, " मुसलमान आणि हिंदु यांचे हक्क या राज्यांत सारखेच आहेत व त्यांचा सारखेपणा कायम ठेवून आम्हीं मुसलमानांशीं स्नेह करण्यास कबूल आहोंत, मात्र मुसलमानांनीं हवी तशी दांडगाई करावी, सरकारनें ती चालू द्यावी, याबद्दल आमची नाखुषी सरकारास व मुसलमान लोकांस कळविण्यास जे जे कायदेशीर उपाय असतील, ते जर आम्हीं केले नाहींत तर आमच्या

हक्कांची व सामाजिक अधिकाराची पायमल्ली होण्यास फार उशीर लागणार नाहीं हें प्रत्येकानें पूर्ण लक्षांत ठेवलें पाहिजे. एका गालफडांत मारली तर दुसरें गालफड पुढें करण्याची खिस्ती पुराणांतील – व्यवहारांतील नव्हे – सहिष्णुता दाखवून सहिष्णुतेच्या नावानें आपली अभिमानशून्यता झाकून ठेवण्याचा मूर्खपणा करूं नका, एवढीच आमच्या लोकांस आग्रहपूर्वक विनंति आहे. सर्व धर्म आपणांस सारखे आहेत हें तत्त्व आम्हास कबूल आहे, पण त्यावरोवर महाभारतांत सांगितल्याप्रमाणें 'यो यथा वर्तते, सस्मिन्स्तथा तस्मिन् प्रवर्तयन। नाधर्म समवाप्नोति न चाश्रेयश्च विंदति' हें वाक्यहि आम्हीं लक्षांत ठेवलें पाहिजे. नाहींतर आमचा लवकरच क्षय होऊन जाईल हें उघडच आहे. आमच्या अंगांत प्रतिकार करण्याची शक्ति आहे असें एखाद्यास वाटल्याखेरीज तो आमच्याशीं तसचें बोलणें काय म्हणून लावणार?" (केसरी, स्फुट सूचना, १० जुलै १८९०, स. टि. खंड ५, पान १८८–१८९.)

हिंदू–मुसलमान संबंधात निःपक्षपणे वागा, असे टिळक इंग्रज सरकारला सतत सांगत होते. दोघांचे हक्क समान राहू द्या, असे ते आग्रहाने सांगत असत. ते म्हणत, "सरकार हिंदूंचा पक्षपात करील तर मुसलमानांस चीड येईल व मुसलमानांस पक्षपात करील तर हिंदूंस चीड येईल. हें अगदीं सहाजिक आहे. आमच्या सुदैवानें सरकार हिंदुहि नाहीं आणि मुसलमानहि नाहीं. तेव्हां हिंदु-मुसलमान लोकांसंबंधीं जे कांहीं प्रश्न उपस्थित होतील त्यांचा निःपक्षपाताने निकाल करणें हें त्यास अगदीं सुलभ आहे. इतकेंच नव्हें, हेंच त्यांचें कर्तव्य आहे." (केसरी, २९ ऑगस्ट १८५३, स. टि. खंड ५, पान ३७२.)

सारांश, धार्मिक बाबतीत सरकारने उदासीन असले पाहिजे, कायदा सर्वांना सारखाच लागू केला पाहिजे, ही टिळकांच्या हिंदू-मुसलमान संबंधाची सरकारी नीती कशी असावी यासंबंधीची दोन सूत्रे होती. ती पुढे ठेवूनच त्यांनी या प्रश्नाचा विचार केलेला होता.

स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रश्न

टिळकांच्या काळात उपस्थित झालेला महत्त्वाचा सामाजिक विषय म्हणजे स्त्री शिक्षण व स्त्री–सुधारणा. टिळकांचे या विषयातील विचार पुण्यातील फीमेल हायस्कुलातील शिक्षणक्रम, अबलोन्नती पुस्तकावरील लेखमाला, महर्षी कर्वे यांनी काढलेल्या विद्यापीठासंबंधी त्यांनी लिहिलेले लेख, पुनर्विवाहविषयक विविध लेख यांमधून प्रामुख्याने आढळतात. टिळकांच्या सर्व लेखनात वर्तमानपत्री लेखनातील तत्कालीन अभिनिवेश, प्रतिपक्षीयांचा युक्तिवाद हाणून पाडण्यासाठी उपस्थित केलेले मुद्दे आणि व्यावहारिक व प्रत्यक्षनिष्ठ (प्रॅगमॅटिक) दृष्टिकोण आढळतोच. समाजाच्या दीर्घकालीन रचनेपेक्षा तातडीच्या प्रश्नांकडे टिळकांचे लक्ष जास्त आढळते. त्यामुळे त्या

लेखनाला सामाजिक पूर्वनिश्चित तत्त्वविचाराची बैठक आढळत नाही. हेच टिळकांच्या स्त्री-शिक्षण विचाराबाबत झालेले दिसते. टिळक स्वतःची स्त्री–शिक्षणविषयीची भूमिका स्पष्ट करताना सुधारकांना सांगत, "पाश्चात्त्य विद्येच्या परिशीलनानें सुधारणेच्या अत्युच्च कल्पना तुमच्याच मात्र मेंदूंत कोंदल्या गेल्या आहेत व युष्मदव्यतिरिक्त जनांनीं तुमच्यापुढें आपल्या विचारांची रिपरिप न लावतां मुकाट्यानें तुम्हीं म्हणतां त्यासच मान डोलवावी, नाहीं तर आपल्या विद्येचा राजीनामा द्यावा तर तुम्हांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, तुम्ही ज्या कालामध्ये पाश्चात्त्य विद्येचें अध्ययन केलें तो काल व आजचा काल अगदीं भिन्न आहेत. पाश्चात्य विद्येच्या जास्त प्रसारानें म्हणा, किंवा तुम्हीं जीं कामें गेल्या पांचपंचवीस वर्षांत हातीं घेतलींत व त्यांत तुम्हांस जें यश प्राप्त झालें व तुमचा जो दृढनिश्चय लोकांच्या नजरेस आला त्यामुळें म्हणा, सुधारणेचें अत्युज्ज्वल स्वरूप जरी तुम्हां आम्हांस एकच दिसत आहे तरी प्रस्तुत कालीं आमचें कर्तव्य काय यासंबंधीं तुमचा-आमचा बहुधा अपरिहार्य मतभेद आहे. संसाररूपी शकटाची गति स्त्री व पुरुष या दोन चक्रांच्या आधीन आहे व त्यांतील एक चक्र मागे पडलें तर तो शकट खड्ड्यांत पडेल, स्त्री ही पुरुषाची सहधर्मचारिणी आहे, करितां तिच्या साहाय्यावांचून पुरुष एकटाच जरी पुढें जाऊं म्हणेल तर तें कधींहि शक्य होणार नाहीं. शिक्षणानें ज्याप्रमाणें पुरुष बिघडले त्याप्रमाणें स्त्रियाहि बिघडण्याचा संभव नाहीं, इत्यादि इत्यादि. तुमच्या मतें तुमचीं अनन्योपभोग सुधारणेचीं उच्च अतिउच्च जीं तत्त्वें आहेत त्यांचा प्रत्येक वेळीं जप करून कांहीं उपयोग नाहीं. या तत्त्वांनीं तुमचीं डोकीं इतकीं फिरून गेलीं आहेत कीं, प्रस्तुत आपणांस काय कर्तव्य आहे, याची कल्पनाहि तुमच्या डोक्यांत शिरत नाहीं. एकानें सुधारणेच्या तत्त्वाचें ढोलकें पिटावें व त्याच्या भक्तमंडळीनें त्याच्या भोवतीं वळेंच वेड्याबिद्या उड्या मारून 'अहोरूपमहो ध्वनिम्' असा एक कल्लोळ करावा, याच्या पलीकडे तुमची गति झालेली नाहीं व सुधारणांच्या महातत्त्वांच्या अमलाच्या गुंगींत तुमच्या म्हणण्यांत व वस्तुस्थितींत किती फरक आहे हें तो तुम्हांस दिसत नाहीं. आजपासून हजार-दोन हजार वर्षांनीं मनुष्यमात्राची काय स्थिति झाली पाहिजे किंवा व्हावी, हा विचार सुधारणेच्या कामीं जरी महत्त्वाचा आहे तरी जे खरे सुधारक ते तो विचार आजच अमलांत आणण्याचा कधीं प्रयत्न करीत नाहींत व हाच न्याय प्रस्तुत काळीं लागू पडतो. दोन–चार किंवा दहा–पांच शतकांनीं स्त्रिया पुरुषांप्रमाणेंच स्वतंत्र होऊन रोजगार धंदे करू लागतील, विवाहदास्य जाऊन त्याठिकाणीं समय–स्वतंत्रता येईल व राष्ट्राचीं दोन्हीं अंगें सुशिक्षित व उद्योगी झाल्यानें राष्ट्र सुसंपन्न होऊन उन्नतीस येईल वगैरे गोष्टींबद्दल आमची बिलकुल तक्रार नाहीं. आमचा सध्या प्रश्न इतकाच आहे कीं हल्लीं आमच्याकडे स्त्रियांची जी स्थिति आहे ती सुधारण्यास व विशेषतः त्यास शिक्षण देण्यास आज कोणता उपाय करावा? हा प्रश्न सद्यःस्थितींत इतका आकुंचित झाला

आहे कीं तुमच्या सुधारणेच्या महातत्त्वांच्या पिसांची येथें कांहीं जरूर नाहीं. परंतु आमच्या सुधारक भक्तांस अजून हा भेद कळत नाहीं हें आपलें किंवा त्यांचें एक मोठें दुर्भाग्य समजावयाचें. "(केसरी, १३ जुलै १८८७, स. टि. खंड ५, पान २२१–२२२.)

दूरवरचे ध्येय

स्त्री-शिक्षणक्रमाचा विचार करताना टिळक फक्त मध्यमवर्गीय स्त्रीचाच विचार करीत. किंवहुना विवाहित स्त्रियांना शिक्षण कसे देता येईल, याचाच त्यात जास्त, विचार असे. त्यातही इंग्लंडप्रमाणें व्यावसायिकदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या, अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियाही या सुधारणेतून जन्माला येतील हे टिळक मान्य करीत. त्यांच्यापुढे दूरवरचे चित्र सुधारलेल्या व स्वावलंबी स्त्रीचे होते. त्यांनी म्हटले होते, "इंग्लंडसारख्या देशांत कांहीं स्त्रिया पुरुषांप्रमाणें स्वतंत्र धंदे करण्याकरितां या उत्तर-शिक्षणाची अपेक्षा करितात व पुढें पुरुषांप्रमाणें वकिलीचा, वैद्याचा, एडिटरचा, किंवा कारकुनीचा म्हणा, त्या धंदा करूं लागतात. स्त्रियांनीं अशा तऱ्हेनें पुरुषांप्रमाणें स्वतंत्र धंदे करून त्यांनीं पुरुषांच्या दास्यांतून मुक्त होऊं नये असें आम्ही बिलकुल म्हणत नाहीं. तथापि हा वर्षशतकांचा किंवा सहस्रांचा प्रश्न आहे. जेथें प्रौढविवाह जारीनें चालतात, आणि विवाहसंबंध बहुतेक करारूपी झाला आहे, अशा पाश्चात्त्य राष्ट्रांतहि स्त्रियांनीं स्वतंत्र धंदे करण्याचा प्रचार नुकताच सुरू झाला असून तेथें देखील फीमेल कॉलेजची स्थापना किंवा पुरुष कॉलेजांत त्यांचा प्रवेश गेल्या पांच-पंचवीस वर्षांतच झाला आहे. आमच्या सुधारकांस ही गोष्ट ठाऊक नसेलशी नाहीं. परंतु त्यांना तिकडील सुधारणेचें ताजें लोणी एकदम चाटण्याची अत्युत्कट इच्छा उत्पन्न झाली असावी. शिवाय आमच्याकडची समाजस्थिति मनांत आणितां गृहकृत्यें सोडून स्त्रिया स्वतंत्र धंदा करूं लागण्यास अजून कित्येक शतकांचा अवधि आहे. गृहकृत्यांचें ओझें जिच्यावर पडत नाहीं अशी एखादी श्रीमंत स्त्री आजहि पुरुषांप्रमाणें शिकून ग्रंथकार होण्याची इच्छा धरील; पण श्रीमंत व उद्योग यांचा आमच्याकडे तरी अन्योन्यप्रतियोगीसंबंध असल्यामुळें अशीं उदाहरणें फारच विरळा. त्याचप्रमाणें युरोपियन आहारविहारांचें व ललितकलांचें ज्यांस संसारांत सुख घेतां येईल अशांचीहि संख्या कमीच. तेव्हां ज्या फीमेल हायस्कुलांतील शिक्षण पुरुषांप्रमाणें असून युरोपियन तऱ्हेवर आहे त्या शाळेचा दहा-पांच श्रीमंत लोकांखेरीज कोणासहि उपयोग नाहीं. आमच्या बायकांस लिहितां-वाचतां येऊन त्यांस गृहकृत्यें चांगल्या तऱ्हेनें करण्याचें शिक्षण मिळावें, राहिल्या वेळांत पुराणादि वाचून त्यांनीं आपली आत्मोन्नति करावी व आपणांस संसारांत मदत करावी ही प्रत्येक मध्यम स्थितींतल्या सुशिक्षित पुरुषाची इच्छा आहे."

म्हणजे-स्त्री जीवनाचे हे दूरवरचे चित्र टिळकांना आक्षेपार्ह वाटत नव्हते. फक्त ते आता शक्य नाही हेच त्यांचे म्हणणे होते. टिळकांचा स्त्री-शिक्षणाला विरोध नव्हता.

पुनःपुन्हा त्यांनी लिहिले होते. फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रमावरील पहिल्याच लेखात टिळकांनी म्हटले होते, "प्रथमतः येथें ही एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं, या हायस्कूलची संस्थापना झाल्या दिवसापासून व तत्पूर्वीहि स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल आम्हीं अनेक वेळां लिहिलें आहे. स्त्रीशिक्षण ज्यांस खरोखरच अवश्य वाटतें आहे असे आज पुष्कळ लोक आहेत. परंतु तें शिक्षण आपल्या समाजाची सद्यःस्थिति मनांत आणितां कोणत्या तऱ्हेचें असावें याविषयीं मात्र बराच मतभेद आहे; व तो मतभेद बहुत महत्त्वाचा असल्यामुळें या हायस्कुलासंबंधानेंच आज दोन पक्ष झाल्यासारखे आहेत. फीमेल हायस्कुलाच्या उत्पादकांमध्यें व बाहेरील टीकाकारवर्गामध्यें जो भेद आहे तो वरील प्रकारचाच होय. स्त्री-शिक्षण दोघांसहि हवें आहे, पण त्यांचे मार्ग भिन्न भिन्न असल्यामुळें दोघांत भेद आला आहे. आतां कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, मुख्य उद्देशाबद्दल ऐक्य असतां मार्गवैचित्र्यामुळें अशा तऱ्हेनें एकच उद्देश असणाऱ्या लोकांमध्यें फूट पडूं नये; व प्रथमतः हें म्हणणें मोठें संयुक्तिक आहेसें वाटतें. पण जगामधील सामाजिक, राजकीय किंवा धर्मासंबंधीं आजपर्यंत जे अनेक पक्ष होऊन गेले किंवा झाले आहेत त्यांचा, वरील तत्त्व मनांत जर आणून विचार केला तर 'ऋजुकुटिलनानापथजुषां नृणां एको गम्यः त्वमसि पयसामर्णव इव' अशीच स्थिति आपल्या नजरेस येईल. शिवाय कित्येक गोष्टी अशा असतात कीं, सामान्य तऱ्हेनें त्यांची व्याख्या देतां येत नसून, त्या एका विशिष्ट तऱ्हेनें होतील तरच त्या मान्य होतात. स्त्री-शिक्षणाचा प्रकार आमच्या मतें ह्यांतीलच आहे. ज्याप्रमाणें समाजाची एकंदर व्यवस्था लागणें हेंच राज्यव्यवस्थेचें कर्तव्य असतां राजसत्ताक, प्रजासत्ताक वगैरे एकच उद्देश साधण्याचे अनेक भिन्न मार्ग आहेत, ज्याप्रमाणें एकच ईश्वर प्रतिपाद्य असतां कित्येकांच्या मताप्रमाणें कानीनप्रभूवर विश्वास ठेविल्याखेरीज तो प्राप्तच होत नाहीं, तद्वतच कांहीं अंशीं सामाजिक सुधारणांची स्थिति आहे. देशकालानुरोधानें कोठें कोणती सुधारणा कितपत हितकारक होईल ह्याबद्दल नेहमीं मतभेद रहावयाचाच; व जोंपर्यंत प्रत्येक व्यक्ति किंवा व्यक्तिसमूह आपआपल्या मताचा अभिमान बाळगून दुसऱ्यांचीं मतें तिरस्कार्य समजतात तोंपर्यंत दोन्ही पक्षांमधील अंतर कधींहि कमी व्हावयाचें नाहीं. लोकमत व त्यावर अवलंबून राहाणारी नीति, अनीति इत्यादि सामाजिक बंधनें हीं कालांतरीं व देशांतरीं भिन्न भिन्न असतात ही गोष्ट मान्य आहे. तथापि काल्पनिक स्वमताभिमानानें ऊर्ध्वदृष्टि न होतां लोकाग्रणींनीं आत्मकालीन देशस्थितीस व लोकमतांस अनुसरून सुधारणेचा मार्ग क्रमिला पाहिजे. उदाहरणार्थ, आमच्या स्त्रियांस शिक्षण द्यावें जरी पुष्कळांस वाटत असलें तरी, आपल्या समाजाची स्थिति मनांत आणून तें शिक्षण आपल्याकडे कोणत्या तऱ्हेचे दिलें असतां लोकमान्य होईल याचा विचार त्या कामांत पडणाऱ्या लोकांनीं प्रथमतः केला पाहिजे. लोकमत मागें पडलें असल्यास तें सुधारून घेण्याचा उद्योग करा, पण त्यास सोडून

जाऊं नका. मनुष्यजातीचें अर्धांग अशिक्षित राहिल्यास त्या दोघांचा मिलाफ कधींहि व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट सर्वांस कबूल आहे; पण तेवढ्यामुळें दुसऱ्या अंगास आज पहिल्याला द्यावयाचें तेंच शिक्षण देऊं म्हटल्यास कोणी ऐकणार नाहीं, स्त्री व पुरुष ह्यांचीं कर्तव्यें या जगांत भिन्न भिन्न आहेत, व यामुळें कधींहि एकाचें शिक्षण दुसऱ्याशीं जुळणार नाहीं. पण हा परिणामाचा भेद झाला. पण तत्पूर्वीहि देशकालानुरोधानें या दोन्ही शिक्षणांत भेद अवश्य केला पाहिजे; व तो जितका आमच्या देशांत अवश्य आहे तितका फीमेल हायस्कूलच्या उत्पादकांच्या हातून केला गेला नाहीं असें आमचें पहिल्यापासून म्हणणें होतें. सारांश, त्या हायस्कुलाच्या चालकांमध्यें व आमच्यामध्यें जो भेद आहे तो उद्देशवैचित्र्यामुळेंच पडला आहे; व नुकताच आमच्या बंधूनें जो त्या शाळेंतील शिक्षणक्रम प्रसिद्ध केला आहे त्यावरून तर हा भेद दृढतर होण्यास जास्त कारण झालें आहे. स्त्रियांच्या हायस्कुलांत हल्लीं जें शिक्षण मिळतें त्यांत व पुरुषांस जें त्यांच्या शाळांतून मिळतें यांत फारसा भेद नाहीं; व जर स्त्री व पुरुष यांचीं आमच्या समाजांतील कर्तव्यें मनांत आणिलीं तर असल्या शिक्षणापासून स्त्रियांस (म्हणजे, मुख्यत्वें सुशिक्षित पुरुषवर्ग ज्या स्थितींत अर्थात् मध्यमवर्गांतल्या स्त्रियांस) विशेष फायदा न होतां, त्यांस तसें शिक्षण जुलमानें दिल्यास, समाजाचें अहित मात्र होणार आहे." (केसरी, दि. २७ सप्टेंबर १८८७, स. टि. खंड ५, पान २११–२१२.)

स्त्री-शिक्षणाची भारतीय पार्श्वभूमी

स्त्री-शिक्षणाचे पाश्चात्त्य उदाहरण टिळकांनी जसे वरील उताऱ्यात सांगितले होते त्याप्रमाणे भारताच्या संदर्भात स्त्री-शिक्षणाचा विचार झाला पाहिजे, असाही आग्रह त्यांनी धरला होता. त्यांचे म्हणणे असे होते की, स्त्री-शिक्षणाची कल्पना भारताला नवीन नाही. पूर्वी काही स्त्रिया विद्यासंपन्न झाल्याची उदाहरणे पुराणात आहेत. पण स्त्रियांस शाळांत पाठवून शिक्षण देण्याची कल्पना मात्र इंग्रजांपासून घेतलेली आहे. देश, काल व राजा यांच्या अनुरोधाने पद्धतीत फेरफार झाला पाहिजे, पण टिळकांच्या या शिक्षणाच्या कल्पनेत मध्यमवर्गीय स्त्रियाच होत्या. टिळकांनी 'स्त्री-शिक्षणाची दिशा' या लेखात म्हटले होते, "प्रस्तुतच्या स्त्रीशिक्षणक्रमाच्या पुरस्कर्त्यांइतकेच किंबहुना जास्त स्त्री शिक्षणाचे आम्ही कैवारी आहों व स्त्री-शिक्षणाकडे आमची जात्याच प्रवृत्ति आहे. तथापि हल्लींचा शिक्षणक्रम आम्हांस बिलकुल पसंत नसल्यानें आमच्या प्रतिपक्षीयांनीं बरीच उचल करून आम्हांस विनाकारण युद्धास प्रवृत्त केलें. आमचा मुद्दा इतकाच होता कीं, ज्याअर्थी पुरुषांप्रमाणें स्त्रियांसहि संसारात कांहीं कर्तव्यें ईश्वरानें अवश्य लावून दिलीं आहेत, त्याअर्थी पुरुष व स्त्रिया यांचा शिक्षणक्रम भिन्न भिन्न असला पाहिजे. पुरुषांचा धंदा करू इच्छिणाऱ्या स्त्रियांची संख्या नेहमींच अत्यंत अल्प असणार, तेव्हां साधारण स्त्रीशिक्षणाचा पाया घालणाऱ्या लोकांनीं

केवळ या अत्यंत अल्प वर्गाच्या सोयीकडेच लक्ष देऊन उपयोगी नाहीं. कोणतेंहि राष्ट्र घेतलें तरी स्त्रियांचा आयुष्यक्रम पुरुषांच्या आयुष्यक्रमाहून भिन्न आहे आणि हा भेद आमच्या देशांत तर विशेषच नजरेस येतो. इतउत्तर शिक्षणानें किंवा एकंदर सुधारणेच्या योगानें हा भेद अगदीं कमी होईल तेव्हां होवो, पण हल्लींच्या स्थितीचा विचार करतां सामान्यतः मध्यम प्रतीच्या हिंदु स्त्रियांस जगांत ज्या स्थितींत रहावें लागतें त्या स्थितीस अनुकूल शिक्षण त्यांस दिलें पाहिजे. ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे विवाहितावस्था व गृहकृत्ये हीं स्त्रियांचीं प्रमुख कर्तव्यें असल्यामुळें स्त्रियांच्या व पुरुषांच्या शिक्षणाची दिशा लवकर भिन्नभिन्न करावी लागणार. लेखन व वाचन दोघांना एकाच यत्नेंत दिल्यास हरकत नाहीं, पण पुरुषांप्रमाणें स्त्रियांस १५–१६ वर्षेपर्यंत घोकंपट्टी करण्यास लावणें अत्यंत अहितकारक व स्वभावविरुद्ध आहे." याच लेखात टिळकांनी इंग्लंडमधील हल्लींच्या शिक्षणाचा अनुभव असलेल्या मिस सिव्हेल यांच्या लेखाचा हवाला देऊन असा निष्कर्ष काढला होता की, स्त्रियांस शालेय शिक्षणाखेरीज, घोकंपट्टीखेरीज वेगळ्या प्रकारचें शिक्षण देण्याची गरज आहे. हाच विचार प्रा. धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ साली सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रीय व व्यापक स्त्रीशिक्षणाची दिशा मांडली होती, त्यावर लिहिताना टिळकांनी व्यक्त केला होता. टिळकांनी त्यावेळी असे म्हटले होते की, "हिंदुस्थानांतील शिक्षणांतील मोठा दोष म्हणजे येथें सर्व विद्यार्थ्यांस त्यांच्या त्यांच्या लायकीप्रमाणें पुढें जो आयुष्यक्रम किंवा धंदा स्वीकारावयाचा असेल त्याला अनुकूल असें शिक्षण मिळत नाहीं. पुरुषवर्गांत शिक्षणाचा ज्या ज्या मानानें अधिक प्रचार होईल त्या त्या मानानें त्यांच्या सहधर्मचारिणीहि अधिक सुशिक्षित पाहिजेत, हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं. पण सुशिक्षित म्हणजे काय, याचा विचार केला तर त्यास मिळणारें शिक्षण अनादिकालापासून चालत आलेल्या त्यांच्या गार्हस्थ्य आयुष्यक्रमास लायक असें असलें पाहिजे असें म्हणावें लागतें. आणि हें तत्त्व लक्षांत आणलें म्हणजे स्त्रियांचें शिक्षण देशी भाषेंत व्हावें, त्यांत योग्य प्रतीच्या धर्मशिक्षणाचा समावेश झालेला असावा आणि आमच्याकडील कुटुंबव्यवस्थेस अनुसरून असावें असें म्हणणें प्राप्त होतें. या बाबतींत किरकोळ मतभेद असले तरी सामान्यतः ह्या गोष्टी सर्वांसच मान्य होतील अशाच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं." (केसरी, २ ऑक्टोबर १९१६.)

सारांश, स्त्रियांचे शिक्षण हे पुरुषांसारखे असू नये, कारण त्यांच्या गरजा वेगळ्या आहेत, हा विचार १८८६ साली टिळकांनी मांडला होता. तोच विचार प्रा. कर्वे यांच्या स्त्रियांच्या विद्यापीठाच्या कल्पनेसंबंधी लिहिताना १९१८ सालीही त्यांनी मांडला होता.

विवाहविषयक समस्येचा विचार

स्त्रीच्या जीवनात विवाहाला तिच्या आयुष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे सामाजिक विचारात सुधारणेच्या दृष्टीने समाजाच्या विवाहविषयक दृष्टिकोणाला महत्त्व प्राप्त होते. टिळकांच्या काळी मुलींच्या विवाहावद्दल जे वाद निर्माण झाले त्यावेळी त्यांचे विचार प्रकट झाले. ते विवाद्य ठरले. किंवहुना मुलीच्या लग्नाचे किमान वय कायद्याने ठरविण्यासंबंधी जे वादंग माजले त्यात टिळक गोवले गेले होते. येथेही टिळकांचे स्वतःचे असे दोन महत्त्वाचे मुद्दे होते. एक तर सामाजिक कायदा व लोकमत यासंबंधीचा व दुसरा कायद्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा.

विवाहाचे किमान वय ठरवून ते प्रत्यक्ष उदाहरणाने समाजापुढे मांडले पाहिजे, हा टिळकांचा आग्रह येथेही व्यक्त झाला. २६ ऑक्टोबर १८९० या दिवशी पुण्यात तुळशीबागेत सभा बोलविण्यात आली होती व तेथे सरकारने कायदा करून किंवा अन्य तऱ्हेने पूर्वापासून चालत आलेल्या सामाजिक रीतीभातीस हात घालू नये यासंबंधीचा विचारविनिमय झाला. टिळकांनी या सभेत आपल्या स्वतःच्या ८ सूचना मांडल्या. त्यात मुलीचे वय १६ वर्षांच्या आत करू नये, हुंडा घेण्याची चाल अजिबात बंद करावी, पुरुषाला ४० वर्षांच्या नंतर लग्न करावयाचे झाल्यास त्याने विधवेशी करावे, या समाजसुधारणेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना होत्या. या सभेत सूचना मांडताना टिळकांनी जे भाषण केले त्यात ते म्हणाले होते, "आपल्या समाजाची सुधारणा करण्यासाठीं वाक्पांडित्य फार झालेलें आहे. तथापि सुधारणा करावयाची ती कोणाची अशा प्रश्नाचा विचार करताना आपणांला जनसमूहाची सुधारणा करावयाची हें बीज आहे. याकरितां सुधारणेसाठीं जनसमूहाची व आपली ताडातोड करण्याचा प्रयत्न केल्यास सुधारणा होणें इष्ट नाहीं. ह्यास उदाहरणें हींच कीं, पुनर्विवाहासारख्या निर्विवाद सुधारणा इष्ट असून बहुतेक सुधारकांस त्या आपल्या कुटुंबांत अमलांत आणणें अशक्य वाटत आहे. याकरितां सुधारणा ही ज्याची त्यानें सुरू करून आपल्या उदाहरणानें दुसऱ्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाहींपेक्षां रिकामें शब्दपांडित्य करण्याचा कांहींएक उपयोग नाहीं. तर सुधारक लोकांकडून सर्व लोकांस सुधारण्याचा उद्देश धरून काय सुधारणा शक्य आहेत व त्या कोणत्या साधनांनीं अमलांत आणाव्या याचा विचार करावा. माझींहि मतें सुधारणेस अनुकूल आहेत, परंतु तीं ह्याच तत्त्वास अनुसरून आहेत व म्हणूनच तीं आपणांस अमलांत आणण्यासारखीं आहेत, असा माझा समज आहे. त्या तत्त्वांचें स्वरूप अशा तऱ्हेचें आहे कीं, समाजांत सहज करण्यासारखें काय आहे व मुळींच करतां येणार नाहीं असें काय आहे? म्हणजे आपल्या धर्मशास्त्रास अनुसरून कार्याकार्य गोष्टींस विधि, विकल्प व निषेध अशी तीन बंधनें घालतां येतील. यांत ज्या गोष्टी निषिद्ध मानलेल्या

आहेत त्या सुळींच करावयाच्या नाहींत. परंतु ज्याविषयीं विधान आहे अथवा प्रायश्चित्त आहे त्या करण्यास जातिभ्रंशाचा प्रत्यवाय येऊ शकणार नाहीं, व तें धर्मसमजुतीच्या उलट जाणेंहि होणार नाहीं. असा विचार करून धर्मशास्त्राचें उल्लंघन न करितां ज्या गोष्टी आपणांस करितां येतील त्या आपण पुढें मांडाव्या व त्यांचा आपण विचार करून त्यासंबंधे कांहीं निकाल होत असल्यास पहावा, असा आजच्या सभेचा उद्देश आहे." (केसरी, ४ नोव्हेंबर १८९०, स. टि. खंड ५, पान २४४–२४५.)

याच संदर्भात टिळकांनी सुधारणा–पत्रकावर सह्या करण्याचे आवाहन केले. त्यांचे म्हणणे असे होते की, देशात ठिकठिकाणी सदरहू सुधारणेस लोकमत अनुकूल करण्याचा प्रयत्न करावयाचा व स्वतःच्या उदाहरणाने अशा प्रयत्नाने व त्यापासून होत असलेल्या फायद्यांच्या निदर्शनाने सुधारणेचे पाऊल पुढे पडेल, अशा तऱ्हेने लोकप्रवर्तनाचे काम ब्राह्मण करीत आले आहेत. (याच सभेत न्या. रानडे यांनी भाषण करताना सांगितले होते की, 'टिळकांनी जी सुधारणेची पायरी धरली आहे ही आम्हाविरुद्ध नाही, इतकेच नव्हे तर ते आमच्या पक्षाकडले आहेत असे आता स्पष्टपणे समजले. आता टिळकांचे मत गेल्या वर्षी सामाजिक परिषदेत सांगितलेल्या मताहून निराळे आहे, ही गोष्ट फार आनंदाची आहे. बाकी पूर्वी कायदा नको असे त्यांचे म्हणणे असून हल्ली ते बदलले आहे.') सारांश, उदाहरण व शिक्षण हेच लोकप्रवर्तनाचे मार्ग आहेत, हा टिळकांचा त्यांनी पूर्वी केसरीतून मांडलेला मुद्दा पुन्हा त्यांनी या भाषणात सांगितला होता. तसेच विवाहविषयक सुधारणेला बांधून घेणारे नागरिक मिळविणे व त्यांची संख्या वाढविणे हा त्यांचा एतद्विषयक सुधारणेचा प्रत्यक्ष मार्ग होता.

याच्या आधी मलबारी नावाच्या समाजसुधारकाने विवाहाचे किमान वय निश्चित करण्यासंबंधीचा कायदा मागण्यासाठी जो अर्ज केला होता त्यावर तपशिलाचा विरोध टिळकांनी केला होता, तत्त्वाचा नव्हे, हे लक्षात ठेवले पाहिजे. हे जसे विवाहाचे किमान वय ठरविण्यासंबंधीचे टिळकांचे विचार होते तसेच पुनर्विवाहासंबंधीच्या टिळकांच्या स्वतःच्या काही कल्पना होत्या. एक तर वयाचे चाळिसावे वर्ष झाल्यानंतर पुरुषाने लग्न करू नये आणि करावयाचेच झाल्यास विधवेशी करावे, असे त्यांचे म्हणणे याच सभेत केलेल्या सूचनांत त्यांनी मांडले होते. त्यामुळे विधवा–विवाहाला तत्त्वतः त्यांची संमती होती असे दिसते. पण त्याहीपेक्षा सामाजिकदृष्ट्या टिळकांनी विवाहासंबंधी जे विचार मांडले होते, त्यांना महत्त्व होते. पुरुषांच्या पुनर्विवाहासंबंधी केलेल्या या लेखनात टिळकांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण प्रतिबिंबित झालेला होता. "गाय, म्हैस, घोडा, कुत्रा, वगैरेपैकीं एखादें मेलें किंवा निकामी झालें म्हणजे जसें दुसरें घ्यावयाचें त्याचप्रमाणें एक बायको मेली कीं दुसरी करावयाची अशीच बहुतेकांची कल्पना. लग्नामध्यें 'धर्मे चार्थे च कामे च' असें शपथपुरस्सर जिचे पाणिग्रहण केलें, आपल्या संसाराचा जिनें अर्धा बोजा शिरावर घेतला, पतीच्या सुखदुःखांत वांटेकरी होणें जी

आपलें कर्तव्य समजत होती व जिच्या समागमांत आनंदानें अनेक वर्षे गेलीं, ती काळाच्या फेऱ्यांत सांपडून किंवा अनेक वेळां नवऱ्याच्याच जाचामुळें अकालीं परलोकवासी झाली तर दहा दिवसांच्या आंतच तिला सवत शोधूं लागणें व महिना-दोन महिने झाले नाहीं तोंच किंवहुना तेराव्या दिवशीं पुनः संसारी बनणें ह्यासारखें आपली कृतघ्नता, निर्दयपणा व नीचत्व प्रगट करणारें दुसरें कोणतेंहि कृत्य नसेल. प्रेमातिरेकानें स्त्री-विरह दुःसह होऊन सदा विरक्त होण्याची गोष्ट तर लांबच; पण निदान मनलज्जा बाळगून कांहीं काळ तरी विधुरावस्था पाळण्याचें कोणाच्या मनांत येत नाहीं; इतकेंच नाहीं तर एखाद्यानें तसा निश्चय केलाच तर त्याचें अभिनंदन होण्याचें एकीकडे राहून उलट सर्व आप्तवर्गाकडून मूर्खपणा मात्र पदरीं घ्यावा लागतो.... हें दिसतेंच आहे. बायको म्हणजे एक कामशांतीचें ईश्वरनिर्मित साधन व वरांत कावाडकष्ट करणारी एक मोलकरीण असें मानणारे व एकीची बिल्हेवाट केली कीं लागलीच तिला पार विसरून जाऊन दुसरीबरोबर सर्व सोहाळे भोगण्यास तयार होणारे घोडनवरे ज्यांच्यामध्ये संभावीतपणानें मिरवितात त्यांनी आपल्या मुलीबाळींचा क्रयविक्रय करणाऱ्या व नवरा मेल्यास स्वर्गीत त्याच्या उपभोगाकरितां म्हणून त्याच्या शें-दोनशें बायकांस ठार मारणाऱ्या रानटी लोकांस कां हसावें आम्हांस समजत नाहीं. पहिलाच प्रसंग असेल तर पुनः लग्न केलेलें एक वेळ चालेल. पण केस पिकले, चार-पांच पोरें झालीं, लेकी-सुना घरांत चांगल्या नांदत्या झाल्या, अशांनीहि पुनः आठ-दहा वर्षांच्या सुकुमार मुलीला लेक किंवा नात म्हणून नव्हे, तर सहधर्मचारिणी म्हणून मांडीवर घेणें व तिच्याशीं एखाद्या अल्पवयस्क नवरदेवाप्रमाणें सर्व विलास करणें म्हणजे त्या पवित्र विवाहविधीची, त्या सहधर्मचारिणीची आपल्या पौरुषाची व वृद्धपणाच्या अकलेची निव्वळ थट्टा करणें नव्हे काय ? आमचे हे शब्द पुष्कळांस कडू लागतील पण आपल्या भावी स्थितीविषयीं थोडा तरी विचार केल्यास त्यांचें मूर्खपण त्यांनाच कळून आल्याशिवाय राहणार नाहीं." (केसरी, ८ मार्च १८९२, स. टि. खंड ५, पान २५४.)

सारांश, टिळकांचा स्त्रीच्या वैवाहिक जीवनाविषयीचा दृष्टिकोण सामाजिक कर्तव्याच्या व नैतिकतेच्या निकषांनी तयार झालेला आहे. स्त्रीशिक्षण व विवाह या दोन्ही बाबतीत टिळकांचे तीव्र मतभेद होते. ते तपशिलासंबंधी होते. टिळक एका बाजूला धर्माभिमानाचे कातडे पांघरणाऱ्यांवर टीका करीत आणि दुसरीकडे पुरातन हिंदू धर्माचे पृथक्करण करून त्यातील एकूण नासके-कुसके भाग आपल्या तर्कशास्त्ररूपी सूक्ष्मदर्शक यंत्राने शोधून काढणाऱ्या तीव्र सुधारकांवरही टीकेची झोड उठवीत. धर्माभिमान्यासंबंधी टिळकांनी या लेखात म्हटले होते, "आज आम्हांला एका निराळ्याच विषयाचा प्रस्ताव करावयाचा आहे. संमतिविलाशीं विरोध केल्यापासून सर्व सुधारणांचा अनन्योपभोग घेणारांनीं केसरीला आपल्या कंपूतून हद्दपार केलें व अलीकडे ग्रामण्यामुळें कांहीं धर्माभिमानी म्हणविणाऱ्या सद्गृहस्थांचीहि आमच्यावर खप्पा मर्जी झाली आहे. वस्तुत

असत्य, लबाडी व ढोंग मग तीं कोठेंहि आढळोत, त्याचा वेळच्या वेळीं परिस्फोट करणें हें केसरीचें ब्रीद व त्याकरितांच मुख्यत्वेंकरून त्याचा अवतार झाला आहे. परस्पर सुधारकांच्या पोकळ बडबडीचें खरें स्वरूप लोकांपुढें येणें जितकें इष्ट आहे तितकेंच केवळ लब्धप्रतिष्ठितपणा मिळविण्याकरितां कामापुरतें धर्माभिमानाचें कातडें पांघरून एरवीं यथेच्छ वागणारांचीं काळीवेरीं बाहेर काढणें श्रेयस्कर आहे. सर्वदां एकाच पक्षाचें मंडन करावयाचें असा ज्यांचा बाणा असेल त्यांनीं आपल्या बाजूवर बेतली म्हणजे हवा तसा लपंडाव करू लागावें हें स्वाभाविकच आहे; पण केसरीला कोणत्याहि नव्या-जुन्या पक्षांतील बड्या मंडळीला खूष करण्याची जरूर वाटत नसल्यामुळें व आचारविचार, विसंवादित्व सर्व पक्षांत सारखेंच असल्यामुळें प्रसंगीं सर्वांचा रोष पत्करण्याची पाळी येते, व त्याबद्दल त्याला मुळींच वाईट वाटत नाहीं. ही गोष्ट येथें सांगण्याचें प्रयोजन हें कीं, ज्या विषयावर आज लिहिण्याचा आम्हीं संकल्प केला आहे तो अशाच प्रकारचा आहे. आमच्या लिहिण्यानें नव्या-जुन्या दोन्हीं पक्षांतील पुष्कळ लोकांना वाईट वाटण्याचा संभव आहे, किंबहुना ज्या पुनर्विवाहाच्या प्रचाराविषयीं आम्ही आज लिहिणार तो इतका सार्वत्रिक आणि रूढ होऊन गेलेला आहे कीं, त्याशीं कोणत्या तरी रीतीनें संबंध येऊन पोहोंचत नाहीं असा पुरुष फारच विरळा सांपडेल. तेव्हां एवढ्या मोठ्या जनसमूहानें स्वीकृत केलेल्या प्रघाताला वाईट म्हणणार, त्यापासून खरोखरच आमचें अनहित होत आहे म्हणून हें निराळें सांगावयास नको." (केसरी, ८ मार्च १८९२, स. टि. खंड ५, पान २५२–२५३.)

सुधारणावादातील नवा विचारप्रवाह

सारांश, टिळकांनी सामाजिक सुधारणांना तत्त्वतः विरोध केला नाही. त्यातील तपशिलास विरोध केला होता. तोही या विशिष्ट दृष्टिकोणातून. अर्थात टिळक हे क्रांतिवादी सामाजिक विचारवंत नव्हते, हेही तितकेच स्पष्ट आहे. पण ते परिवर्तनाच्या विरुद्ध नव्हते. विधि, विकल्प व निषेध ही सामाजिक प्रश्नांची तीन अंगे टिळकांनी कल्पिली होती. टिळकांनी फीमेल हायस्कुलाच्या शिक्षणक्रमाविषयी लिहिलेल्या दुसऱ्या लेखात समाजसुधारणावादाचा इतिहास सांगितला आहे. त्यात आपण तपशिलाचे विरोधक आहोत किंवा सुधारणेचा पर्याय सुचविणारे आहोत, असे सूचित केले होते, हे महत्त्वाचे आहे. टिळकांनी म्हटले होते, "मुख्य उद्देश एक असून साधनांसंबंधानें मनुष्यामनुष्यांत मतभेद पडणें अगदीं स्वाभाविक असतांहि आमच्या इकडील 'सुधारकांस' त्याचा प्रतिक्षणीं इतका विसर पडावा, हें अगदीं चमत्कारिक आहे. आजपर्यंत अशी स्थिति असे कीं, एकानें सुधारणा हवी म्हणावें व दुसऱ्यानें नको म्हणावें. पहिल्या वर्गांत तत्कालीन बहुतेक आंग्ल विद्याविभूषित लोक असत व दुसऱ्यांत बाकीच्यांचा अंतर्भाव होत होता. अशा वेळीं एक पक्ष दुसऱ्यास असंस्कृत ठरवून आपलाच पक्ष सप्रमाण आहे, अशी आपल्या मनाची

समजूत करून घेत असे. पुढें इंग्रजी शिकलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस जशी वाढत चालली, व त्या विद्येच्या मदाची पहिली गुंगी निघून गेली, तेव्हां वर सांगितलेल्या साधनवैचित्र्यामुळें होणारा मतभेद स्वभावतःच दृष्टीस पडूं लागला व सुधारणेचीं सूत्रें ज्या मताच्या लोकांनीं ताब्यांत घेतलीं होतीं, त्यांच्या हातून सुधारणेचें काम कसकसें होत आहे, याची चर्चा सुरू झाली. ही चर्चा आमच्या प्राथमिक सुधारकांस अर्थातच रुचली नाहीं. आपल्या विरुद्धपक्षीय लोकांस असंस्कृत म्हणून नालायक ठरविण्याची त्यांची कोटी सहजच लंगडी पडली. बरें, आपल्या कामाची भरभराटी दाखवून विरुद्ध पक्षाचें तोंड बंद करावें, तर तिकडूनहि पंचाईत. अशा तऱ्हेनें दोहोंकडून पेंचांत सांपडल्यावर त्यांच्यापैकीं एकानें अशी युक्ति काढिली कीं, हल्लीं आपल्या कार्यास जे प्रतिबंध करितात त्यांस असंस्कृत असें म्हणतां येत नाहीं तरी 'त्यांस संस्कार असून नसून सारखाच, कारण त्या संस्काराचा ते गैरउपयोग करितात,' अशी कोटी करून आज आपला बचाव करावा. ही कोटी आमच्या प्राथमिक सुधारकांपैकीं बऱ्याच इसमांस पसंत पडली; व त्या अस्त्राचा ते विरुद्ध पक्षावर उपयोग करूं लागले. पण पूर्वीचा विरोध व हल्लींचा विरोध यांतील अंतर मनांत न आणिल्यामुळें, या कोटीचा असा परिणाम झाला कीं, आमच्या सुधारकांसच त्यामुळें द्वितीय नामसंस्कार प्राप्त झाला. आमच्या सुधारकांस हें नांव कितपत आवडत असेल तें असो; परंतु इतकें खचित कीं, तें त्यांस त्यांच्या गुणांवरूनच प्राप्त झालें आहे, व जोंपर्यंत आपल्या मताहून भिन्न मताचे लोक असंस्कृत आहेत अशी त्यांची समजूत राहील, किंवा ती तशी आहे असें ते दाखवितील, तोंपर्यंत त्यांचें वरील नांवहि कायम राहील. सुधारणेच्या कामीं अशी द्वैधी वृत्ति व्हावी ही गोष्ट एकांशीं चांगली नाहीं, हें आम्हांस मान्य आहे. तथापि एकी होणें असल्यास कोणत्या पक्षानें कोणाकडे जावें, हा एक मोठाच प्रश्न असल्यामुळें या प्रश्नाची तडजोड कशी होईल, याची आम्हांस शंकाच आहे. तात्पर्य, अशा बाबतींत मतभेद असणें हें जितकें स्वाभाविक आहे, तितकेंच तो रहाणेंहि आहे असें वाटतें. दोनहि पक्षांचे हेतु चांगले असतील व दोहोंसहि एकच विषय उद्देश्य असेल; तरीहि पण त्या दोनहि प्रक्षांत साधनभेदामुळें मतभेद हा रहावयाचाच, व या दोनहि पक्षांच्या तडजोडीनें जी सुधारणा होईल तीच कायमची असें आम्ही समजतों." (केसरी, ४ ऑक्टोबर १८८७, स. टि. खंड ५, पान २१३–२१४.)

समाजरचनेसंबंधीचे विचार

हिंदूच्या समाजरचनेत वर्णव्यवस्था, जातिभेद, अस्पृश्यता हे तीन विवाद्य विषय आहेत. टिळकांनी या तिन्ही विवाद्य विषयांवर वेळोवेळी आपली मते प्रकट केली होती. साधारणपणे असे म्हणता येईल की, जुन्या समाजशास्त्राला ती प्रतिकूल नव्हती.

परिस्थिती बदलल्याची त्यात जाणीव होती, पण युगमान, कालमान ओळखून जाणीवपूर्वक समाजरचना बदलली पाहिजे, असा टिळकांच्या मतप्रतिपादनात एरवी दिसणारा आग्रह त्यात नव्हता. सामाजिक समानतेच्या पाश्चात्त्य कल्पनांची हिंदुंच्या समाजरचनेकडे अत्यंत चिकित्सक दृष्टीने पाहाण्याची परंपरा न्या. रानडे, आगरकर, आदींनी सुरू केली होती. त्यांच्या सर्व टीकेला प्रत्युत्तर म्हणूनच टिळकांचे बरेचसे लेखन होते. त्यातून त्यांचे याविषयीचे प्रतिक्रिया म्हणून व्यक्त केलेले विचार समजतात पण त्यांची मूलगामी सैद्धांतिक चर्चा फारशी आढळत नाही. तरीही टिळकांनी उपस्थित केलेले मुद्दे समाजशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यांचे संकलन येथे केले आहे.

जातिभेदाची उपपत्ती

जातिभेदाच्या उपपत्तीसंबंधी टिळकांची काही निश्चित मते होती. टिळकांनी म्हटले होते, " जातिभेद खाण्यापिण्याच्या, आचारविचारांच्या वगैरे भेदानें आला आहे असें जें म्हणणें आहे तें अगदीं चुकीचें आहे; व ब्राह्मणांनीं अगर भटाभिक्षुकांनीं हें बंड निर्माण केलें असें म्हणणेंहि तितकेंच किंवहुना त्याहून जास्त अविचाराचें आहे. हिंदुस्थान देशाच्या पुरातन इतिहासाचा ज्यांनीं शोध केला आहे व पूर्वी आर्य लोकांनीं या देशांत ज्या वसाहती केल्या त्याप्रमाणें हल्लीं एका जातीचे लोक पर-जातीच्या लोकांच्या देशांत जेथें जाऊन वसाहती करीत आहेत तेथला प्रकार ज्यांस माहीत आहे त्यांस जातिभेदाचें खरें कारण कळून येण्यास फारसा प्रयास पडावयाचा नाहीं. आमच्या सुदैवानें म्हणा अगर दुर्दैवानें म्हणा, हिंदुस्थानइतकें जुनें राष्ट्र पृथ्वीच्या पाठीवर दुसरें कोणतेंच राहिलें नाहीं. ग्रीस, रोम, इजिप्त, यहुदी आणि पारशी हे लयास जाऊन आज कित्येक शतकें लोटून गेलीं. एक चिनी लोक मात्र आमच्यापेक्षां कमी, पण इतर सर्वांपेक्षां बरेच प्राचीन आहेत. आमच्या राष्ट्राचें हें अतिप्राचीनत्व लक्षांत आणलें असतां त्यांत इतके निरनिराळे भेद कां व्हावें हें सहज लक्षांत येईल. वेदकालीं जे आर्य लोक हिंदुस्थानांत आलें ते मांसाहार निषिद्ध मानीत नसत; तथापि त्यांचा आणि हिंदुस्थानांतील मांसाहारी काळ्या लोकांचा ' वर्ण ' एक नसल्यामुळें व काळे लोक जिंकलेले असल्यामुळें, या दोहोंमध्यें जो भेद राहिला तो अद्यापहि नाहींसा झाला नाहीं. जातिभेदाचें आद्य बीज या वर्णभेदांतच आहे असें आतां पुष्कळ विद्वानांचें मत झालें आहे. "

" हिंदुस्थानांत उत्तरेकडून आलेल्या आर्य लोकांनीं दस्यूंची पारध केली नाहीं हें आमच्यांतील जातिभेदाचें मूळ बीज होय. शूद्रादिकांस आर्यांचे कांहीं हक्क देऊन त्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला व गोडीगुलाबीनें आम्हीं त्यांच्याबरोबर बरींच वर्षें काढलीं; हें उदाहरण आमच्या मतें अमेरिकेंतल्या अगर ऑस्ट्रेलियांतल्या लोकांनीं

घेण्याजोगें आहे. आर्य व दस्यू यांच्यामध्यें जो वर्णभेद झाला तोच पुढें कायम राहून तार्तर, मुसलमान, मंगोलियन आणि सरतेशेवटीं इंग्रज वगैरे अनेक जाति पुढें हिंदुस्थानांत आल्यामुळें तो उत्तरोत्तर जास्त होत गेला. आतां एकदां कोणताहि वृक्ष वाढीस लागला असतां त्यास जशा फांद्या फुटतात त्याप्रमाणें निरनिराळ्या वर्णांच्या ऊर्फ जातींच्या लोकांमधील वर सांगितलेला भेद वाढत जाऊन त्यास हजारों शाखा फुटल्या व चातुर्वर्ण्याच्या ऐवजीं आज हिंदुस्थानांत हजारों जाति झाल्या आहेत. या सर्व जाति एकवट व्हाव्या अशी आशा करणें म्हणजे बहुतेक अमेरिकेंतल्या युरोपियन लोकांनीं निग्रोंशीं सोयरिकी कराव्या असेंच म्हणण्यासारखें आहे. मानवी स्वभावांत किंवहुना मनुष्याच्या रक्तांत ज्या कांहीं समजुती खिळून गेल्या आहेत त्यांपैकींच वर्णव्यवस्था ही एक एक समजूत होय. इंग्रज लोक कितीहि उदार अंतःकरणाचे झाले, नेटिव्हांस त्यांनीं कितीहि आपल्या बरोबरीनें वागविलें, तरी अखेरीस नेटिव्ह तो नेटिव्ह आणि युरोपियन तो युरोपियन राहाणारच. धर्मांतर केलेल्या नेटिव्हांची खिस्ती राज्यकर्त्यांकडून कशी संभावना होत आहे हें लक्षांत आणलें म्हणजे रोटी-व्यवहार किंवा धर्मैक्य हीं दोन जातींची एक जात होण्यास कधींच कारशीं कारणीभूत होत नाहींत हें लक्षांत येईल. याखेरीज दुसरा असाहि एक प्रश्न आहे कीं, निरनिराळ्या जातींत जे कांहीं विशिष्ट गुण आहेत व जे 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें अगदीं सृष्टीच्या आरंभापासून त्या त्या जातींत आढळून येत आहेत, ते कायम राखण्यास त्या त्या जातींतील विवाहसंबंध व सोयरिकी जातींतल्या जातींतच झाल्या पाहिजेत, असा प्रतिबंध नसता तर हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशांत आमच्या अंगचे गुण केव्हांच लुप्तप्राय होऊन आम्ही अगदीं नीच स्थितीप्रत पावलों असतों, असें एका विद्वान् इंग्रज ग्रंथकाराचें म्हणणें आहे. इंग्लंडसारख्या थंड देशांतील सगळे लोक सगळीं कामें करण्यास ज्याप्रमाणें तयार असतात तशी स्थिति उष्ण देशांत कधींहि राहावयाची नाहीं. करितां कोणत्याहि गुणाचें येथें रक्षण करणें असल्यास तो गुण संभाळून ठेवण्याचें काम कांहीं विशिष्ट लोकांनीं आपल्या हातांत घेतलें पाहिजे, व हें काम जे लोक हातांत घेतात त्यांची कांहीं दिवसांनीं एक निराळी जातच बनून जाते. वर भगवद्गीतेंतील जें वचन दिलें आहे त्यांत गुणकर्मविभाग जो सांगितला आहे तो हाच होय. ह्यांत मूळच्या आर्य-दस्यूंच्या वर्णभेदाची भर घातली म्हणजे हिंदुस्थानांतील हल्लींच्या जातिभेदाची उपपत्ति व कारणें कळून येतात. परंतु अलीकडे अलीकडे या विषयावर जे कित्येक लेख येऊं लागले आहेत त्यांस इतिहासाची ओळख नसल्यामुळें म्हणा, अगर सुधारणेचें वारें त्यांच्या अंगांत वरेंच भरलें असल्यामुळें म्हणा, त्यांचें या गोष्टीकडे बिलकुल लक्ष जात नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे!"

जातिभेदाची वर सांगितलेली उपपत्ति जर खरी असेल तर निरनिराळ्या जातींच्या

सोयरिकी होऊन सर्वांची एक जात होण्याची आशा आम्हांस सोडून दिली पाहिजे असें म्हणणें भाग पडतें. हिंदुस्थानच्या भावी उन्नतीच्या साधनांचा ज्यास विचार-कर्तव्य आहे त्यानें जातीची संस्था हल्लीं आहे ती मोडणें अशक्य आहे, असें गृहीत धरूनच आपली पुढील इमारत रचण्यास सुरुवात केली पाहिजे. जातिभेद कधींच मोडावयाचा नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं; पण तो काल इतका लांब आहे कीं, त्यावर अवलंबून बसलें असतां नदीचें पाणी वाहून गेल्यावर पाय न भिजतां मी पलीकडे जाईन, असें म्हणणाऱ्या धनगराच्या पोराप्रमाणेंच आपली स्थिति होणार आहे. जातिभेद न मोडला तरी जातिमत्सर आणि जातिद्वेष पुष्कळ अंशीं किंबहुना अजीबात कमी करणें अशक्य नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, महार, चांभार, मुसलमान, भिल्ल, कोळी इत्यादि सर्व जाति एकाच सरकारच्या अमलाखालीं असल्या-मुळें त्या सर्वांचा हिताहिताचा एक प्रकारचा संबंध जोडला गेला आहे व ज्याच्या त्याच्या सामर्थ्याप्रमाणें ज्यास त्यास वैभवास, अधिकारास किंवा नांवलौकिकास चढण्याचा मार्ग जर खुला राहील तर जातिद्वेषाचें एक मुख्य कारण नाहींसें होईल. त्याचप्रमाणें पूर्वी ब्राह्मणादि उच्च वर्ण, अतिशूद्रादि वर्णास ज्याप्रमाणें नीच समजत तो नीच भाव आतां काढून टाकला पाहिजे; परंतु तो काढून टाकण्यास दोन्ही वर्णांच्या सोयरिकी होण्याची जरूर नाही, व तें शक्यहि नाहीं. ब्राह्मणांनी शूद्रांशीं विवाह करावे असें कोणी प्रतिपादन केल्यास शूद्रादिक अतिशूद्राशीं विवाह करण्यास तयार आहेत कीं काय, असा जो प्रश्न निघतो, त्यांतील बीज हेंच आहे. असले प्रश्न उपस्थित करून आगींत तेल ओतल्याप्रमाणें जातिद्वेषास एक प्रकारचें उत्तेजन देण्याचाच कित्येकांचा क्रम आहे. हा त्यांचा क्रम कदाचित् त्यांच्या दृष्टीनें सद्धेतुक असेल, पण तो चुकीचा व अविचाराचा असल्यामुळें त्याचा विचारी लोकांनीं नेहमीं निषेध केला पाहिजे. असल्या क्रमापासून देशाचें कांही एक हित न होतां उलट अधिकाधिक नुकसान होतें. ज्यांस नुसत्या बोलण्यापलीकडे कांहीं करण्याची उमेद नाहीं त्यांचेच विचार असे निरर्गल धांवत असतात. हल्लींची आपल्या देशाची स्थिति म्हटली म्हणजे निरनिराळ्या जातींच्या अंगीं असलेले गुण वाढविण्याचा प्रयत्न करून त्यांतूनच होईल तितकें राष्ट्राचें हित करून घ्यावयास पाहिजे आहे. बेटीव्यवहाराखेरीज निरनिराळ्या जाति सारख्याच योग्यतेच्या राहूं शकतात, हें ब्राह्मण जातींतील पोटभेदांवरून उघड होतें. हाच नियम सर्वत्र लागू केला असतां हिंदुस्थानची उन्नति होण्यास देशांतील सर्व जातींची एक जात होईपर्यंत वाट पहा-ण्याची कांहींएक जरूर नाही, असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाही. कारकुनी, शिपाईगिरी, व्यापार, शेतकी इत्यादि जे धंदे आहेत ते तूर्त जातिपरत्वें आहेत, तसेच कायम ठेवून धंदा बदलण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यास तसें करतां येण्याची सवड ठेवावी आणि व्यवहारांत ज्याचा त्याचा मान ज्याच्या त्याच्या योग्यतेवर व

गुणावर अवलंबून राहावा, एवढी सध्यां व्यवस्था होणें इष्ट आहे व शक्यहि आहे. ही करण्याकडे जर आमच्या सुधारकांची व संस्थानिकांची प्रवृत्ति होईल, तर त्यापासून नुसत्या बायफळ कल्पनांचा प्रसार करण्यापेक्षां देशाचें पुष्कळ हित होणार आहे. विचारशक्तीस अनावर सोडून जे जे तरंग निघतील ते लेखणीनें अगर तोंडानें सांगणाऱ्या गृहस्थांत आणि बेड लागून किंवा गांजाची चिलीम ओढून बडबडणाऱ्या गृहस्थांत कांहीं विशेष फरक आहे असें आम्ही समजत नाही. आपली स्थिति काय आहे, आपल्या संस्था कशा आहेत, त्या कोणत्या कारणानें उत्पन्न झाल्या, व त्यांत आजमितीस किती फरक होणें शक्य आहे, या सर्व गोष्टींचा विचार करूनच आपला पुढचा रस्ता आपणांस काढला पाहिजे. अशा रीतीनें ज्यास रस्ता काढतां येत नाहीं त्याच्या हातून बावदूकपणाखेरीज कोणचीच गोष्ट तडीस जावयाची नाहीं. जातिबंधनें पूर्वीच्याइतकीं आतां कडक राहाणें शक्य नाहीं ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे; व त्यांपैकी कांही बंधनें तर लवकरच नाहींशी झालीं पाहिजेत, असेंहि आमचें मत आहे. पण तेवढ्याकरितां सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांचे रोटी-बेटी-व्यवहार सुरू झाल्याखेरीज आमची उन्नति कदापि व्हावयाची नाहीं असें म्हणण्यास मात्र आम्ही तयार नाहीं. इतकेंच नव्हे तर असली मतें प्रतिपादन करणें म्हणजे एका अर्थी खऱ्या सुधारणेच्या ओघास थोडासा तरी प्रतिबंध करण्यासारखेंच आहे असें आम्हांस वाटतें." (केसरी, स. टि. खंड ५, पान ११५–११७.)

जातिनिर्मूलन व राजकीय हक्क

टिळकांच्या काळातच महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने डोके वर काढले होते. स्वराज्याची चळवळ आणि त्यातील राजकीय हक्कांची चळवळ यात अन्योन्य संबंध आहे, पण राजकीय हक्कांची चळवळ विशिष्ट जातीसाठी नसून सर्वांसाठी आहे, हे टिळक सांगत होते. विशिष्ट सामाजिक गटाच्या राजकीय हट्टापायी सर्व राष्ट्रीय चळवळीचे गाडे अडवू नका, असेच त्यांचे सांगणे असे. राष्ट्रीय पातळीवर विचार करणाऱ्या नेत्यांचे सर्व विचार संकुचित भावनांचा प्रक्षोभ झाला असताना सर्वांना पटतात असे नाही. विशेषतः ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात टिळकांची भूमिका स्वराज्यवादी होती. तीच ते सतत मांडत होते. एका अर्थाने ती एकाग्र, एकेरी होती. पण ती तशी असणे अपरिहार्य होते. राजकीय हक्क मिळावयाचे असतील तर जात निर्मूलन प्रथम झाले पाहिजे, ही विचारसरणी टिळकांना मान्य नव्हती. त्यासंबंधी त्यांची मते ठाम होती. त्यांनी लिहिले होते, "शिवाजीमहाराजांनी जी स्वराज्यस्थापना केली ती वर्ण-संकर करून केलेली नव्हती. आणि सध्याच्या काळीं इंग्रज साम्राज्यांतर्गत ज्या स्वराज्याची स्थापना करावयाची आहे तें स्वराज्य मिळविण्यासहि वर्णसंकराची वाट पहाण्याचें कारण नाहीं, किंबहुना सर्व जातींत रोटी-बेटीव्यवहार आधीं सुरू झाला

पाहिजे, मग स्वराज्याची गोष्ट बोला, असें जर कोणी म्हणेल तर राजकारणांत तो गैरवाकबगार असून या कामीं त्याची योग्यता जवळ जवळ वेड्याइतकीच गणली जाईल. ब्राह्मण चांभाराशीं लग्न लावील, अस्सल मराठा मांगाशीं विवाह लावील किंवा लिंगायत जैनाशीं शरीरसंबंध करील तेव्हांच खरें स्वराज्य होईल असें कोणीं प्रतिपादन केल्यास तें–ब्राह्मणांची गोष्ट सोडून द्या–ब्राह्मणेतरांपैकीं कोणत्या व किती जातींस–व्यक्तींस नव्हे–मान्य होईल याचा विचार करा. पाश्चिमात्यदृष्ट्या न्याय्य असल्या तरी ज्याला हजारों वर्षांची परंपरा आहे अशा पौर्वात्य समाजांत या गोष्टी रूढ होण्यास निदानपक्षीं पुष्कळ काळ लोटला पाहिजे हें निर्विवाद आहे; आणि त्याचबरोबर दुसरी हीहि गोष्ट निर्विवाद आहे कीं, आमच्यांतील सर्वच वर्णांच्या गुणांचा व हक्कांचा हल्लीं जो संकोच झाला आहे तो दूर करण्यास पाश्चिमात्यदृष्ट्या श्रेयस्कर अशा वर्णविरहित समाजाची जर अपेक्षा ठेवून बसलों, तर नदीचें पाणी वाहत वाहत संपल्यावर मग कोरड्या पायानें मी नदीपार होईन, अशी अपेक्षा ठेवून, नदीच्या कांठीं वाट पाहात बसणाऱ्या धनगराच्या पोराप्रमाणेंच आमची स्थिति होईल, हल्लींची समाजांतील स्थिति अशी आहे कीं, त्यांतील प्रत्येक जात आपणास यथाकाल प्राप्त झालेल्या धंद्यांत यथासंभव स्वतंत्र असून, त्यांपैकीं कोणतीहि जात दुसऱ्या जातींत सामाजिकरीत्या विरघळून जाण्यास तयार नाहीं. पुढेंमागें तसा योग येईल, पण तो सध्यांचा प्रश्न नव्हे. पण जातिभेद जरी मोडला नाहीं तरी जातिद्वेष मोडणें सर्वांसच इष्ट वाटत आहे. म्हणून सर्व जातींच्या उद्योगधंद्यास किंवा भरभराटीस ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या घडवून आणण्यास देशांतील कर्त्या पुरुषांस सर्वांनीं एकसारखीच मदत केली पाहिजे. अशा कर्त्या पुरुषांची जी सभा तीच राष्ट्रीय सभा होय. त्यांत ब्राह्मण आहेत, क्षत्रिय आहेत, वैश्य आहेत, शूद्र आहेत, सर्व वर्णांचे व धर्मांचे लोक आहेत." (स. टि. खंड ५, पान १९८.)

केवळ तार्किक विभागणी

"ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा भेद कसा व कोणत्या शहाण्यानें काढला हें आम्हांस कळत नाहीं. केवळ तर्कशास्त्रदृष्ट्या पाहिलें तर असा भेद करितां येईल; नाहीं असें नाहीं. या मतभेदास किंवा वर्गीकरणास 'डिव्हिजन बायू डायकॉटमी' म्हणजे अस्तिनास्तिरूपी किंवा तत्तदितररूपी विभाग असें म्हणतात. जगांतील कांहीं तरी एखादी विवक्षित वस्तु मुख्य कल्पून तिचा एक वर्ग करावयाचा आणि तदितर सर्व वस्तु दुसऱ्या वर्गांत ढकलून द्यावयाच्या हें यांतील तत्त्व आहे. 'झाडें' आणि 'बिनझाडें' असे सर्व सृष्टीचे याप्रमाणें दोन विभाग करतां येतील, किंवा 'दगड' आणि 'बिनदगड' अशा प्रकारेंहि जगांतील सर्व वस्तूंचा विभाग कल्पितां येईल. 'ब्राह्मण' आणि 'ब्राह्मणेतर' हाहि विभाग अशाच प्रकारचा आहे."

टिळक म्हणत की, आतां भेदच करावयाचा असेल, विभागणीच करावयाची असेल तर सुशिक्षित-अशिक्षित असा केला पाहिजे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद राजकीय हक्कासाठी चाललेल्या चळवळीच्या आड येऊ नये, म्हणून 'कायदेकौन्सिलांत उद्यां एकवेळ सगळेच ब्राह्मणेतर आले तरी मला चालतील, पण तेथें हिंदु लोकांचें प्राबल्य असलें पाहिजे, परक्यांचें किंवा सरकारनियुक्तांचें नसलें पाहिजे", असे उद्‌गार टिळकांनी काढले होते. (केसरी, २८ जुलै १९१७, स. टि. खंड ५, पान १८३.)

जाती व औद्योगिक विकास

५ ते ८ नोव्हेंबर १८९८ रोजी पुण्यात भरलेल्या दुसऱ्या औद्योगिक परिषदेच्या वेळी हिंदूंमधील जातिपद्धतीचा औद्योगिक दृष्टीने विचार करणारा एक निबंध टिळकांनी वाचला होता. त्यात जातिप्रथेचा अगदी स्वतंत्र अर्थ टिळकांनी लावला होता. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे होते की, "जातिप्रथा खरोखरच आपणांस नुकसानकारक वाटत असेल तर ती मोडण्याचा कसा प्रयत्न करता येईल, हें पाहिलें पाहिजे. पण जातिप्रथा नष्ट करणें शक्य नसल्यास तिची जी उपयुक्त बाजू आहे, ती समाजाच्या औद्योगिक विकासासाठीं वापरतां येईल, कारण जातिपद्धतीचे कांहीं चांगले गुण आहेत. ते चांगले गुण कोणते ? खरोखरच त्यांत कांहीं उपयुक्त गुण आहेत काय ? कांहीं पाश्चात्त्य विचारवंतांनीं जातिपद्धतीमुळें औद्योगिक कसब, सचोटी, कला यांचें रक्षण झालें आहे असें म्हटलें आहे. हुकुमशाही राजवट टळली आहे. जातिपद्धतींत कांहीं दुर्गुण आहेत. वरिष्ठ जातींत त्यामुळें श्रेष्ठत्व अहंकार निर्माण होतो व खालच्या जातींत न्यूनगंड येत असतो. जातिप्रथेचा इतिहास पाहिला तर ऋग्वेदांत तिचा उल्लेख आढळत नाही. ग्रामीण जनतेच्या दृष्टीनें या जातींचा विचार केला तर वंशपरंपरागत चालणारे धंदे चालू ठेवण्यासाठीं, त्यांतील कसब पुढच्या पिढीस पोहोचविण्यासाठीं, समाजांतील उत्साह व क्रियेच्या सातत्यासाठीं, त्याच्यांतील व्यावसायिक नीतीसाठीं जातींचा उपयोग झालेला आहे. म्हणून जातिप्रथा ही हिंदूंची ऐहिक उद्दिष्टें असलेली संस्था मानली पाहिजे. जुने कारागिरांचे संघ (गिल्ड) व धंदे करणाऱ्या जाति यांच्यांत बरेंच साम्य होतें. जातिपद्धतीचें मूळ स्वरूप धार्मिक नव्हतें. जातिप्रथेमुळें येणाऱ्या न्यूनगंडाचा धर्माशीं कांहींहि संबंध नाहीं. जात ही औद्योगिक संस्था होती व औद्योगिक बाबतींत तिचा उपयोग ध्यानीं घेतां तिला नाशापासून वाचविलें पाहिजे. जातिप्रथेंत जे सामाजिक सद्‌गुण आहेत त्यांचा उपयोग करून त्यांच्या सहकाराची भावना वाढीस लावली पाहिजे." (स. टि. खंड ७, पान ४७५–४७७.) सारांश, कारागिरांच्या जातींचे संघ म्हणून जातींचे पुनरुज्जीवन झालें तर कामगारांची आर्थिक परिस्थिती बदलण्यास त्याचा उपयोग करता येईल, असे टिळकांचे म्हणणे होते.

ब्राह्मणांची सामाजिक कर्तव्ये

'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या प्रि. गोळे यांच्या त्याकाळी गाजलेल्या पुस्तकावर अभिप्राय व स्वतःचे मत व्यक्त करणारे सात लेख टिळकांनी लिहिले होते. त्यात ब्राह्मण जातींच्या अपकर्षाची चर्चा होतीच. पण नव्या समाजरचनेत त्यांचे कोणते कर्तव्य आहे, याचाही उहापोह टिळकांनी केला होता. सामाजिक, राष्ट्रीय व आर्थिक प्रश्नांचा विचार करताना टिळकांची नजर राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने त्यांची उकल करण्याकडे कशी असे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही लेखमाला आहे. प्रि. गोळे यांच्या या पुस्तकाचा विषय ब्राह्मण जातीचा ऱ्हास हा आहे. टिळक त्या जातीबद्दल समाजरचनेच्या दृष्टीने विचार करीत नव्हते, तर राष्ट्राच्या बांधणीमध्ये ब्राह्मणांचे कार्य काय होते, वा असले पाहिजे व इंग्रजी राज्यामुळे ते कसे पार पाडता येत नाही, याच दृष्टिकोणाने या संस्थेकडे पाहात होते.

उदाहरणार्थ टिळकांनी 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' यासंबंधीच्या चौथ्या लेखांत म्हटले होते, "एकदर हिंदु समाजाचा विचार करितां ब्राह्मणवर्गानें राजकारणी खटपट सोडून स्वतः सुताराचे, लोहाराचे किंवा वैश्याचे धंदे केल्यापासून देशाचा अधिक फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदु समाजाची रचना युरोपांतील समाजरचनेहून अगदीं भिन्न आहे, हें प्रत्येक देशहितचिंतकानें लक्षांत ठेविलें पाहिजे. ब्राह्मणांस आपली स्थिति सुधारावी असें वाटतें त्याचप्रमाणें देशांतील प्रत्येक ज्ञातीस आपआपली स्थिति सुधारत जावी असें वाटणें अगदी स्वाभाविक आहे; व ब्राह्मण ज्ञातींतील लोक जर सर्व धंद्यांतील अग्रेसरत्व आपणांकडेच घेण्याचा प्रयत्न करतील तर त्यांचा व इतर ज्ञातींचा सहज विरोध उत्पन्न होईल. हा विरोध टाळून सर्व जातींस आपआपली स्थिति सुधारण्यास लावणें हें आमचें कर्तव्य आहे; व आम्ही जो कांहीं उद्योग करणार तो लक्षांत ठेवूनच केला पाहिजे. एकाच ज्ञातीनें किंवा एकाच प्रांतांतील लोकांनीं सर्व हिंदुस्थानभर आपलें वर्चस्व स्थापण्याचे आतां दिवस राहिले नाहींत. मराठेशाहीच्या काळांत व हल्लींच्या काळांत मोठा फरक आहे तो हाच होय. त्या वेळीं एकट्या मराठे लोकांनीं सर्व प्रांतांवर आपलें स्वामित्व स्थापण्याचा प्रयत्न केला होता. तसा प्रयत्न होणें आतां शक्य नाहीं. जें कांहीं करावयाचें असेल तें सर्व जातींकरितां व सर्व प्रांतांतील लोकांकरितां. त्यांस बरोबर घेऊन त्यांच्या साहाय्यानेंच केलें पाहिजे. परंतु असें झालें तरी ज्या जातीनें आजपर्यंत राजकारणाच्या कामांत पुढाकार घेतला आहे, त्यांचें महत्त्व कमी होतें असें मात्र समजूं नये. शंभर वर्षांपूर्वी दक्षिणेंतील ब्राह्मणांनीं इतर प्रांत काबीज करण्याच्या कामीं आपलें शौर्य व साहस प्रगट केलें होतें. आतां तसें करतां येणार नाहीं हें खरें. तथापि कोणत्याहि सार्वजनिक हिताच्या कामीं पुढाकार घेऊन वा चळवळ सर्व राष्ट्रभर पसरविण्याचें

काम महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनींच अंगावर घेतलें पाहिजे. जातीजातींत जे विशिष्ट गुण आहेत त्यांचा एकमेकांवर वरचष्मा करण्याच्या कामीं उपयोग न करतां सर्वांचें जेणें करून हित होईल त्याच कामांत उपयोग केला पाहिजे व अशा रीतीनें सार्वजनिक कामें चाललीं तर सर्व लोकांची एकी होण्याचा संभव आहे." (केसरी, ७ जुलै १८९६, स. टि. खंड ५, पान ६६९-६७०). सारांश, येथे टिळकांचा सर्व भर सध्या अस लेल्या विविध जातींच्या गुणांचा उपयोग राष्ट्राच्या पुनरुज्जीवनासाठी कसा करता येईल, यावरच होता.

विविध जातींनी आपले हित संभाळण्याचा प्रयत्न करून देशाच्या विकासासाठी चाललेल्या सामूहिक प्रयत्नात सहभागी झाले पाहिजे, ही टिळकांची विचारसरणीही त्यांनी या लेखमालेत मांडली. जातिजातींत स्पर्धा व वैमनस्य टाळून सामूहिक हिताकडेच लक्ष देणे आता आवश्यक आहे, असा व्यवहारवादी विचार मांडताना त्यांनी म्हटले होते, " हिंदुस्थानांतील धंद्याची वाटणी जातवार झालेली आहे. विलायतेतल्या लोकांप्रमाणें वाटेल त्यास वाटेल तो धंदा कोणी करीत नसे. ही स्थिति बरी किंवा वाईट हा प्रश्न निराळा. आमचें मत असें आहे कीं, जेव्हां सर्व जातींचे धंदे आपणच करण्याची इच्छा ब्राह्मण धरतील तेव्हां इतर जातींचा त्यांच्यावर जो काही थोडाबहुत विश्वास आहे तोहि नाहींसा होईल. सर्वांशी मिळून मिसळून सर्वांचा उत्कर्ष करण्याची इच्छा ब्राह्मणांनीं मनांत ठेवली पाहिजे. निष्काम पुढारीपणा पत्करण्याचें रहस्य यांतच आहे." (केसरी, २१ जुलै १८९६, स. टि. खंड ५, पान ३७५.) तात्पर्य म्हणून टिळक सांगत की, "परकी अंमलाचा वरवंटा जरी आमच्यावर फिरत आहे तरी या वरवंट्यास कोठे कोठे बरेच मोठे खळगे आहेत, ते कोणते याचें नीट अवलोकन करून तेवढ्यापुरती आपली वाढ करण्याचा प्रयत्न केला म्हणजे कांहीं कालानंतर आहे त्यापेक्षां जास्त उद्योग करण्याची शक्ति तुमच्या अंगीं येईल." सारांश, स्वदेशासंबंधी ब्राह्मण जातीचे कर्तव्य काय आहे, यावद्दलची मते टिळकांनी ब्राह्मणांच्या भवितव्याची चर्चा करताना सांगितली होती, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. टिळकांच्या सामाजिक विचाराला राष्ट्रीय व राजकीय बैठक होती ती अशी.

जातिभेदाचा पीळ

जातिभेदांचे निर्मूलन करणे शक्य नाही, पण जातिद्वेष नाहीसा करता येईल व ते काम राष्ट्रीय शिक्षणाच्या, राजकीय सुधारणेच्या चळवळींनी होऊ शकेल, हा विचार टिळकांनी सतत मांडला होता. वेदोक्त प्रकरणाला टिळकांच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात जे महत्त्व आहे ते राजकीय स्वरूपाचे आहे. त्याचा विचार या ठिकाणी अप्रस्तुत ठरेल, पण त्यासंबंधी लिहिताना टिळकांनी जातिभेदांसंबंधी जे विचार मांडले होते किंवा ब्राह्मण व मराठे यांनी राष्ट्रासाठी काय केले पाहिजे, याबद्दल

जे सांगितले होते, ते आजही महत्त्वाचे आहे. जातिभेदाचा पीळ कसा कायम आहे हे सांगताना टिळक म्हणाले होते, "हिंदु लोकांची ज्ञातिधर्मांवरील आसक्ति इतकी दृढ आहे कीं, हिंदूंचे खिस्ती झाले तरी त्यांच्या मनावर परंपरागत आलेले ज्ञातिभेदाचे संस्कार जळलेल्या दोरींत तिचा पीळ जसा कायम राहातो तद्वत् कायम राहातात. हे परंपरागत किंवहुना रक्तमांसगत भेदाभेद अजीबात मोडून टाकून सर्व हिंदुस्थानांतील जातींचा सबगोलंकार करणें इष्ट असलें तरी शेंकडों वर्षेपर्यंत शक्य नाहीं हें कोणासहि कबूल केलें पाहिजे; व आम्ही आजच्या प्रश्नाचा जो विचार करणार आहों तो याच धोरणावर करणार आहों. समाजाच्या स्थितींत जी कांहीं कोणास पालट करावयाची असेल ती व्यवस्थेनें व वेतावेतानेंच केली पाहिजे, व जी पालट करावयाची तीहि अशी असली पाहिजे कीं, तिची उपयुक्तता चटकन् लोकांच्या लक्षांत येईल." (केसरी, २२ ऑक्टोबर १९०१, स. टि. खंड ५, पान १४९.)

या प्रकरणाचा विचारसुद्धा टिळक राष्ट्रीय कर्तव्याच्या दृष्टिकोणातून करीत. "देशाला जीं अनेक प्रकारचीं क्षतें पडलीं आहेत तीं भरून काढण्याची महाराष्ट्रांतील मराठे व ब्राह्मण यांनीं ईर्षा बाळगली पाहिजे," असे ते म्हणत.

उपजातींचे व्यवहार

टिळकांनी जातिभेदासंबंधी लिहिताना जनरूढीचाही विचार केला होता. त्यासंबंधी काय धोरण असले पाहिजे, सुरुवात कशी केली पाहिजे याची चर्चा त्यांनी कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांच्यावर लिहिलेल्या चार लेखांत केली होती. त्यातही समाजाचे व्यवहार कसे चालावेत याचे मार्गदर्शन होते. टिळकांनी म्हटले होते, "कित्येक गोष्टी अशा आहेत की त्या सर्वांस माहीत असतात व त्यांची आवश्यकता प्रत्येक दिवशीं सर्वांच्या अनुभवास येत असतां त्याबद्दल कोणी कोणाशीं बोलत नाहीं. याचें कारण असें आहे कीं त्या गोष्टी पुरातन जनरूढीविरुद्ध आहेत. सर्वांमध्ये लोकापवादाचें भय प्रबल. यापुढें सुधारणेची झळ लावणाऱ्या महावीरांच्या कबरा वसतात असें जरी असलें तरी ज्या गोष्टीपासून सतत नुकसान होत आहे असें वाटतें अशा कोणीतरी (भीत भीत कां होईना) लोकांच्या विचारापुढें आणल्याच पाहिजेत." अशी प्रस्तावना करून टिळकांनी 'देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे या ब्राह्मणातील तीन उपजातींत ऐक्य झाले पाहिजे' असे म्हटले होते. हे सांगताना त्यांनी या जातींचे गुणात्मक मूल्यमापन केले होते. "देशपरत्वें कालमानानें कोकणस्थ, देशस्थ, व कऱ्हाडे यांना कित्येक गुण एकमेकांपासून शिकण्यासारखे आहेत व कित्येक अवगुण एकमेकांकडे काढून टाकण्यासारखे आहेत. परोपकार, दातृत्व, औदार्य या गुणांत कोकणस्थांना देशस्थांचें अनुकरण करणें थोडेंसें अवश्य आहे, असें म्हटल्यास फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. देशस्थांनाहि कोकणस्थांपासून स्वच्छपणा, उद्योगीपणा, धाडसीपणा,

मितव्यय वगैरे गुण घेण्यास वाईट वाटूं नये. कन्हाडे साधारणपणें दोघांच्या मध्ये पडतील असें वाटतें. तथापि दोघांनाहि कन्हाड्यांची टापटीप शिकणें जरूर आहे." या तीन उपजातींत विवाह होण्याची गरज आहे, हे टिळकांचे प्रतिपादन होते. त्यासंबंधी टिळक म्हणाले होते की, " समाजांतील रूढ आचार पालटावयाचे असतील तर आपला पक्ष शास्त्रसिद्ध असला तरीहि धीमेपणानें थोडी अडचण सोसण्यास तयार असलें पाहिजे, व्यक्ति मिळूनच समाज झालेला आहे. आणि कोणाहि व्यक्तीनें आपल्या प्रयत्नाखेरीज समाजाचा ओघ पालटेल अशी अपेक्षा करणें बरोबर नाहीं." (केसरी, ११ जानेवारी १८९१, १३ नोव्हेंबर १९००, स. टि. खंड ५, पान ४ व १३.) हे सर्वसामान्य तत्त्व टिळकांनी येथे सांगितले होते.

ब्रिटिश सरकार आणि समाजसुधारणा

इंग्रज राज्यकर्त्यांना राजकीयदृष्ट्या मवाळ व सामाजिक दृष्ट्या जहाल असे धोरण राज्यकर्ते म्हणून सोयीचे होते. टिळकांचे म्हणणे असे की, समाजसुधारणा करताना समाजात दुही माजविण्याचा इंग्रजांचा हेतू आहे. त्यामुळे राष्ट्रीय चळवळीची आघाडी कमजोर होते. या इंग्रजांच्या नीतीचे वर्णन करताना टिळक म्हणत, " पूर्वी मुसलमानांना रुचेल कां असा प्रश्न करण्यात येत होता. हें कल्पित नाहीं. गोखल्यांना असा प्रश्न करण्यात आला होता. आतां तें संपलें. तेव्हां ब्राह्मणेतरांना रुचेल का? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे."

याच व्याख्यानात टिळकांनी सांगितले होते, " जुटीनें कार्य केलें पाहिजे. मानापमान ठेवूं नका. देशाचें गाडें चिखलांत रुतलें आहे. त्याला वर काढा. मग आपसांत सर्व पाहून घेऊं आपल्यांत ब्राह्मण–ब्राह्मणेतर अशी जी भावना उत्पन्न करण्यांत येत आहे ती चुकीची आहे. देशाला बुडविणारी आहे पाताळाला अंत नाहीं. अपार आहे. मग त्याच्यामध्यें जावयाचें असेल तर खुशाल जा. माझी कांहीं हरकत नाहीं. हल्लीं जी पुंडाई चालली आहे ती बंद झाली पाहिजे. ही पुंडाई कोणाच्या प्रेरणेनें चालली आहे हें मी सांगत नाहीं. त्यांचे हेतु चांगले असतील, वाईटहि असतील, आम्ही वाईटच म्हणणार."

टिळकांनी ब्रम्हदेशाच्या १९०५ मध्ये केलेल्या आपल्या प्रवासात 'राजकीय हक्क व सामाजिक सुधारणा' या विषयावरचे आपले मत मांडले होते. ते म्हणाले होते, " जातिभेदाचा प्रभाव, धर्म-स्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, स्त्रियांस सर्व व्यवहार करण्याची मोकळीक, प्रौढविवाह, काडी मोडणें, खाण्यापिण्याची पूर्ण मुभा वगैरे ज्या ज्या सामाजिक व्यवस्था, सुधारणा म्हणून घडवून आणण्याकरितां हिंदुस्थानांतील कित्येक विद्वान आज पुष्कळ वर्षें खटपट करीत आहेत, त्या सर्व सुधारणा ब्रह्मदेशांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वीच झालेल्या होत्या, असें यावरून सहज लक्षांत येईल. जेव्हां-जेव्हां

या व आपल्या समाजाची तुलना करतां सामाजिक सुधारणेचें राष्ट्रीय दृष्ट्या किती महत्त्व आहे हा प्रश्न सहाजिकच कोणाच्याहि मनांत उद्‌भवेल. कांहीं कारणांमुळें ब्रह्मी लोक इंग्रजांच्या अंमलाखालीं आले असतील पण आपला धर्म, आपला देश, आपला व्यापार या संबंधानें या लोकांत जितकी कळकळ दिसून यावयास पाहिजे होती तितकी, हल्लीं दिसून येत नाहीं. त्यांची सामाजिक स्थिति वर सांगितल्याप्रमाणें अनुकूल नाहीं, तेव्हां अर्थातच सामाजिक सुधारणा व राष्ट्रीय उन्नतीबद्दलची कळकळ या दोन्ही गोष्टींत कायम कार्यकारणसंबंध नाहीं. इतकेंच नव्हे तर विरोधहि असण्याचा संभव आहे, असें स्पष्ट दिसून येतें. सामाजिक सुधारणा नको असें माझें म्हणणें नाहीं. कांहीं अडचणी दूर होऊन आपल्या समाजास त्यापासून कांहीं फायदा होईल, पण राष्ट्रीय किंवा औद्योगिक उन्नति सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज होणार नाहीं असें जें कित्येक विद्वानांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे असें सीलोन, ब्रह्मदेश यांतील बौद्धधर्मी लोकांच्या स्थितीवरून चांगलें प्रत्ययास येतें. देशाची उन्नति व अवनति केवळ सामाजिक सुधारणेवर अवलंबून आहे, असें जें मत आहे तें मला मान्य नाहीं. सामाजिक सुधारणा आधीं कीं राजकीय सुधारणा आधीं, याबद्दल मागें बराच वाद चालू होता व तेव्हांहि कांहीं लोक सामाजिक सुधारणेस महत्त्व देतात तितकें देणें योग्य नाहीं, असें पुष्कळांनीं प्रतिपादन केलें होतें. ब्रह्मदेशांतील स्थितिवरून हें प्रतिपादन खरें होत आहे, असें सिद्ध होतें, एवढेंच काय तें माझें म्हणणें आहे. स्वदेशाबद्दल प्रीति, परस्परांमधील क्षुद्र भेद किंवा द्वेष विसरून जाऊन देशकार्याकरिता जुटीनें काम करावयाची प्रवृत्ति, राष्ट्राचे वैशिष्ट्य कायम राखण्याबद्दल आस्था इत्यादि गुण राष्ट्रीय उन्नतीस अवश्य आहेत. राष्ट्रीय उन्नतीस लागणारे गुण निराळे आहेत व ते जागृत ठेवण्यासहि निराळ्याच दिशेनें प्रयत्न करावे लागतात व हिंदुस्थानची जर उन्नति करावयाची असेल तर याच गोष्टींकडे आपणांस प्रथम लक्ष दिलें पाहिजे." (स. टि. खंड ६, पान १००५–१००६.)

सामाजिक सुधारणा व राष्ट्रीय उन्नती या दोन्ही परस्परांशी निगडीत असल्या तरी राष्ट्रीय उन्नतीसाठी वेगळ्या प्रकारचे सामूहिक प्रयत्न लागतात, हा टिळकांचा मुख्य निष्कर्ष होता.

विचारांचा आकृतिबंध

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे टिळकांचे सामाजिक विचार तत्कालीन परिस्थिती, त्यांचे परंपरागत संस्कार, टिळकांचे व्यक्तित्व यांनी घडविलेले होते. टिळकांची वृत्ती कर्मवादी, कृतिप्रवण होती. त्यामुळे केवळ बोलके सुधारक किंवा परस्पर समाज-सुधारणा व्हावी म्हणून वाक्‌गांडित्य करणारे सुधारक त्यांना मुळीच पसंत नव्हते.

स्वतःला सामाजिक कार्यास का वाहून घेतले नाही, यासंबंधी ते एकदा म्हणाले होते, "प्रत्येकजण कोणती तरी एखादी चळवळ हाती घेऊन ती यशस्वी चालवू शकतो. मीं माझें आयुष्य सर्वस्वी राजकीय चळवळीला वाहिलें आहे. त्यामुळें मला सामाजिक चळवळीकडे लक्ष द्यायला फावत नाहीं. म्हणून त्याचा अर्थ विपरीत करूं नका. राष्ट्रकार्यांत सर्व क्षुल्लक भेदाभेद विसरून गेले पाहिजेत. या मातृभूमीच्या उद्धारार्थ एकदिलानें, उत्साहानें व कळकळीनें झटा." (केसरी, ९ मार्च १९२०.)

सारांश, धर्मश्रद्धा, धर्माच्या पुनर्स्थापनेने सामाजिक पुनर्रचना करण्याची मनात बाळगलेली कल्पना, राष्ट्रीय उत्थानाची उत्कट तळमळ, त्याच्यासाठी राजसत्ता मिळविणारे राजकारण करण्यावर भर, पाश्चात्य आधिभौतिक तत्त्वज्ञान, ख्रिस्ती धर्म-प्रसार यांचा सतत वाटणारा धोका आणि हिंदुधर्म, वेदांत हे पर्यायी व श्रेष्ठ तत्त्वज्ञान असल्याची मनाची खात्री या सर्वांमुळें टिळकांची सामाजिक भूमिका समाजसुधारणे-विषयी सदैव साशंक व प्रतिक्रियात्मक राहिली. राजकीय हक्कावरोवर सामाजिक हक्कांची भावनाही समाजात प्रबळ होत जाते, ही वस्तुस्थिती आहे. ती टिळकांना राष्ट्रीयत्वा-वर किंवा स्वराज्याविषयींच्या तळमळीनें बदलता आली नाही, असेच नंतरचा इतिहास सांगतो. टिळक स्वतःच राजकारणात व्यग्र राहिल्याने त्यांच्या कल्पनेतली सामाजिक विचारसरणीही समाजापुढे आली नाही हेही तितकेच खरे आहे. पण टिळकांनी गीतारहस्यात चर्चिलेला विषय अधिक मूलगामी होता व आजही त्याचा पुनर्विचार व्हावयास हवा आहे. तोही टिळकांचा सामाजिक पुनर्रचनेचा सैद्धांतिक व तत्त्वविचार समजला पाहिजे. त्याची चर्चा पुढील प्रकरणात करावयाची आहे.

११

लोकव्यवहाराचे भारतीय तत्त्वज्ञान

योगी अरविंदांनी टिळकांचे ध्येय कोणते होते हे सांगताना म्हटले होते, " भारतीय राष्ट्राचे पुनरुज्जीवन करणे, त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेच किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्ज्वल करणे हा टिळकांचा जीवनोद्देश होता. व तेवढ्याकरता त्यांना नुसती राजकीय जागृती करावयाची नसून सुप्तावस्थेत असलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला खडबडून जागे करावयाचे होते. टिळकांनी आपल्या आयुष्यांत जे जे कार्य केले त्यांचा साक्षात् या राष्ट्रसंवर्धनाकडेच संबंध पोहोचतो. " (ग. वि. केतकरांच्या 'लोकमान्यांची भाषाशैली' या पुस्तकामधून उद्धृत) स्वराज्य किंवा स्वातंत्र्य ही राष्ट्राच्या पुनरुत्थानातील एक कालदृष्ट्या आवश्यक अशी गरज होती. म्हणून टिळकांनी त्याला प्राधान्य किंवा अग्रस्थान दिले. पण त्यांच्या सर्व विचारविश्वाचा ध्रुवतारा राष्ट्रीय पुनरुत्थान हाच होता. त्यांची सारी विचारप्रणाली, वैचारिक प्रतिक्रिया, वैचारिक आंदोलने किंवा राष्ट्रीय 'स्वत्वा'च्या जागृतीसाठी केलेली होती. ही जागृती राष्ट्रोत्थानासाठी आवश्यक होती. पण टिळकांच्या विचारांना तात्कालिकता असली तरी दूरची क्षितिजे दाखविणारेही विचार त्यात आढळतात. त्या दृष्टीने टिळकांनी लिहिलेले 'गीतारहस्य' हा टिळकांचा असा वैचारिकवारसा पुढच्या पिढ्यांना देणारा महान ग्रंथ ठरला आहे. टिळकांचे पांडित्य, प्रतिभा, प्रज्ञा, लोकोपदेशाची तळमळ, मनन, चिंतन या सर्व गुणवैशिष्ट्यांचे प्रतीक म्हणजे 'गीतारहस्य' हा ग्रंथ होय. हा ग्रंथ लिहिण्याचा उद्देशही चिरकाल टिकणारे, राष्ट्राला कृतिप्रवण करणारे 'मामनुस्मर युद्ध्य च' असा संदेश देणारे लोकव्यवहाराचे

भारतीय परंपरेवर आधारलेले तत्त्वज्ञान सांगणे हाच होता. टिळकांची राष्ट्रकल्पना राष्ट्रीय स्वत्वावर आधारलेली होती, हे आपण दुसऱ्या प्रकरणात पाहिलेच आहे. राष्ट्राच्या ऐहिक वैभवालासुद्धा जीवनमूल्यांचा आधार व दिशा असावी लागते. ही मूल्ये नैतिक प्रेरणा देतात. टिळकांनी 'गीतारहस्या'त भारतीय नीतिशास्त्राचा विचार याच दृष्टिकोणातून केला आहे. दुसरे म्हणजे 'गीतारहस्या'चा मुख्य रोख समाजाच्या हिंदू मनावर निवृत्तिमार्गाची असलेली पकड होती ती ढिली करून त्याला कृतिप्रवण करणे होता. त्या ग्रंथाची ही सामाजिकता हे त्याचे एक महत्त्वाचे मूल्य आहे. भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी भारतीय समाजाला कर्मयोगाचे तत्त्वज्ञान देणारा ग्रंथ म्हणून तो राष्ट्रीय ग्रंथही आहे. तिसरे म्हणजे केवळ भारतीयांच्या नव्हे तर साऱ्या मानवजातीच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार या ग्रंथात असल्यामुळे तो मानवी तत्त्वज्ञानाचा ग्रंथ म्हणून मानला पाहिजे. त्या दृष्टीने या ग्रंथातील विचारांची मांडणी करण्याचा हा प्रयत्न आहे.

गीतेचे संस्कार

या ग्रंथातील विचारांची समीक्षा करण्यापूर्वी या ग्रंथाचे कल्पनाबीज टिळकांच्या मनात केव्हा उद्‌भवले हे समजून घेणे उपयुक्त ठरेल. टिळकांवर गीतेचे संस्कार लहानपणापासून झालेले होते. याचे वर्णन टिळकांनी स्वतःच १९१७ साली अमरावती येथे दिलेल्या इंग्रजी व्याख्यानात केले होते. "माझ्या लहानपणीं माझ्या घरांतील वडीलधारी माणसें नेहमीं सांगत कीं, खऱ्या धर्मनिष्ठ व तत्त्वजाणिवेचें जीवन सध्यां आपण जें जीवन जगतों त्याच्यांत अनुभवता येत नाहीं. माणसाचें उच्चतम ध्येय म्हणजे मोक्ष. तो मिळवावयाची आकांक्षा असेल तर ऐहिक उपभोगाची आकांक्षा सोडून संसारत्याग करावयास हवा. परमेश्वर व जगत् या दोघांची एकदम सेवा करतां यावयाची नाहीं. ज्या धर्मांत माझा जन्म झाला त्याच्या कल्पनेंतील आदर्श जीवन मला जगावयाचें असेल तर मला संसारत्यागच करावयास हवा असा याचा अर्थ मी घेत असे. माझ्या मनांत उद्‌भवलेल्या या प्रश्नामुळेंच मी अधिक विचार करूं लागलों. माझा प्रश्न असा होता कीं, मानवी जीवनांत पूर्णत्व प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर संसारत्यागच करावयास हवा काय? हेंच माझा धर्म मला सांगतो काय? मला लहानपणीं असेंहि सांगण्यांत येई की हिंदु धर्माचीं सर्व मूलतत्त्वें व तात्त्विक सिद्धांत ज्यांत ग्रथित केले आहेत असा जगमान्य ग्रंथ म्हणजे भगवद्‌गीता होय. मग मला असें वाटावयास लागलें कीं, माझ्या मनांत उद्‌भवलेल्या प्रश्नाचें उत्तरहि या ग्रंथांत मला सापडूं शकेल. हें उतर शोधण्यासाठींच मीं गीतेचा अभ्यास सुरू केला." टिळकांच्या गीतारहस्याचे कल्पनाबीज या शोधातच आहे. याच व्याख्यानाच्या शेवटीं टिळक म्हणाले होते, "याप्रमाणें हा माझा प्रश्न मींच सोडविला.

माझें मत असें झालें कीं, जगताची सेवा म्हणजे परमेश्वराची सेवा. व ती करणें हा मुक्तीचा स्पष्ट मार्ग आणि हा मार्ग जगांत राहून आचरता येतो. त्याला जग सोडून दूर जावें लागत नाहीं."

गीतेचे स्वरूप

'गीतारहस्या'च्या प्रस्तावनेत टिळकांनी जी चर्चा केली आहे ती हा ग्रंथ समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्यात पुढील मुद्यांची चर्चा आहे. (१) ॲरिस्टॉटलने नीतिशास्त्रावरचा पहिला पद्धतशीर ग्रंथ लिहिला हे पाश्चात्य विद्वानांचे म्हणणे. टिळक म्हणतात की गीता त्यापूर्वीची अ.हे व त्या गीतेत धर्म की अधर्म, कर्म की अकर्म यांची चर्चा आहे, त्यास पूर्वी धर्मशास्त्र म्हणत, आता नीतिशास्त्र म्हणतात. (२) गीतेचे महत्त्व इतकेच नाही. त्यात आत्मविद्येची मूलतत्त्वे थोडक्यात व असंदिग्ध रीतीने सांगितलेली आहेत. आध्यात्मिक पूर्णावस्था कोणती हे सांगितले आहे. भक्तीची ज्ञानाशी जोड करून दाखविली आहे. संसारात भांबावून गेलेल्या मनास शांत व निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा हा ग्रंथ आहे. (३) गीतेचा प्रारंभ क्षात्रधर्म की बंधुप्रेम या समस्येने झालेला आहे. पण असेच इतर प्रश्न संसारात उपस्थित होतात. ते सोडविण्याचे काही तत्त्वज्ञान आहे काय, हा प्रश्न पडतो. कारण अशा प्रसंगी योग्य निर्णय झाला नाही तर आपल्या हातून अधर्म किंवा गुन्हा होईल काय, अशी सामान्य माणसास भीती वाटते.

रणांगण : गीतेची पार्श्वभूमी

टिळकांनी गीतेची पार्श्वभूमी काय होती हे सांगताना म्हटले होते, " आपला हिंदुस्थान देश ज्ञानाचें, वैभवाचें आणि पूर्ण स्वराज्याचें सुख अनुभवीत आहे अशी जेव्हा ख्याति झाली आहे तेव्हां एका सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियानें दुसऱ्या महान् धनुर्धरास क्षात्रधर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यास गीता उपदेशिली आहे. तसेच गीतेंतील उपदेश अर्जुन संभ्रमानेंच जेव्हां खचल्यासारखा झाला होता तेव्हा केला होता. अर्जुनाची ही मानसिक अवस्थाहि लक्षांत घेतली पाहिजे." टिळक म्हणाले होते. " धैर्य खचलें असतां धीर देणें, कर्तव्याची जागृति करणें हेंहि गीतेचें उद्दिष्ट होतें. आपणांस करावयाचें काम ईश्वरानें आधींच नेमून दिलें आहे— असा भरवंसा ठेवून ईश्वरार्पणबुद्धीनें तें केलें पाहिजे." म्हणूनच गीतेंत 'मामनुस्मर युद्ध्य च' असे म्हटले आहे. म्हणजे गीतेचा उद्देश निवृत्त उदासीन मनाला कर्मप्रवृत्त करणे, स्वधर्माचें आचरण करण्याचा संदेश देणे व जीवनातील संघर्षासाठी सिद्ध करणे हा होता. गीतेच्या या उपदेशाला वैयक्तिक व सामाजिक व्यवहार व आचरण (Behaviour Pattern) अशा दोन्हीही बाजू आहेत. वैयक्तिक उदासीन मनःस्थिती

व सामाजिक धर्मकल्पनांनी अशा दुहेरी पेचात ज्यावेळी देश सापडतो तेव्हा गीताधर्माचे पुनरुज्जीवन उपयुक्त ठरते, असा टिळकांचा विश्वास होता. म्हणून वर उल्लेखिलेले वैयक्तिक शंकासमाधान हे गीतारहस्याचे कल्पनाबीज असले तरी टिळकांची सामाजिक जाणीव, राष्ट्रीय गरज हे गीतारहस्याचे सामाजिक उद्दिष्ट टिळकांपुढे होते हे स्पष्ट आहे. टिळकांना स्वतःच्या काळातील परिस्थिती व समर्थ रामदासांच्या वेळची परिस्थिति यात साम्य आहे असे वाटत होते. टिळकांनी म्हटले होते, "समर्थांच्या वेळेसारखीच आता परिस्थिति आहे. समर्थांनी राष्ट्राचीं मनें तयार करण्याचें काम केलें. त्यांनीं राष्ट्राचा अभ्युदय कशानें होईल तें शिकविलें. आज धर्माची, नव्हे महाराष्ट्रधर्माची (महा म्हणजे मोठ्या राष्ट्रधर्माची) म्हणजे हिंदुस्थानच्या धर्माची स्थापना व्हावयास पाहिजे आहे." (सज्जनगड मासिक, मार्च १९०६.) 'गीतारहस्या'तही टिळकांनी म्हटले होते, "कर्ममार्गाचें खरें महत्त्व प्रासादिक मराठी भाषेंत रामदासांनींच सांगितलें. त्यांनी कर्ममार्गाचें पुनरुज्जीवन केलें, पण हें आमच्या दुर्दैवानें फार टिकलें नाहीं." सारांश, भगवद्गीतेचा पुन्हा निराग्रहबुद्धीने अर्थ निश्चित करून गीतेचे रहस्य शोधून काढणे व त्या गीताधर्माचा प्रसार करणे हे कार्य केले पाहिजे, असा निष्कर्ष काढून 'गीतारहस्या'चा ज्ञानयज्ञ त्यांनी केला. टिळकांनी केलेला हा ज्ञानयज्ञ केवळ भारताच्या उपयोगी पडेलच असे नाही, तर गीतेतील कर्मयोगशास्त्र हे मानवी जीवनाला उपयुक्त ठरणारे आहे अशी तत्कालीन व त्यानंतरच्या अनेक विद्वानांनी ग्वाही दिली आहे. उदाहरणार्थ, डॉ. राधाकृष्णन् यांनी टिळकांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या लेखात म्हटले होते, " Mr. Tilak makes out a case that the Gita, which has a supreme place in the spiritual life of India stands for the do and dare spirit. The Bhagwad Gita is designed as a solution of universal problem of life. It reconciles spiritual freedom with work in the world. "

सारांश, भारताला स्वतःच्या जीवनतत्त्वज्ञानावर आधारलेले नीतिशास्त्र आहे हे सिद्ध करणे हे 'गीतारहस्य' लिहिण्याचे पहिले राष्ट्रीय उद्दिष्ट होते. भारताच्या राष्ट्रीय पुनरुत्थानाला, राष्ट्रधर्माची संस्थापना आवश्यक आहे म्हणून गीतेतील कर्मयोगशास्त्र पुन्हा मांडले पाहिजे ही टिळकांची दुसरी सामाजिक प्रेरणा होती. वैयक्तिक व सामाजिक जीवनात निवृत्तिमार्गापेक्षा ईश्वरार्पित कर्मावर आधारलेला कर्मयोग हाच अनुकरणीय आहे. तेव्हा वैयक्तिक व राष्ट्रजीवनाला कर्मप्रवण अध्यात्माची बैठक देणे हीच भारताची परंपरा आहे. पाश्चात्य नीतिविचारांचा, त्यांच्या सामाजिक मूल्यांचा तौलनिक अभ्यास करून गीताधर्माची फेरमांडणी करणे हा 'गीतारहस्या'चा तिसरा हेतू होता.

पायाभूत तत्त्वज्ञान

व्यक्तिजीवनाचे व समाजजीवनाचे हिंदू तत्त्वज्ञान काय आहे ते टिळकांच्याच शब्दात संक्षेपाने सांगण्यासारखे आहे. गीतारहस्याचा तो गाभा आहे. सर्वांभूती एकच आत्मा आहे हा समबुद्धियोग संपादन केला की, मनुष्य दुसऱ्याच्या सुखाचा किंवा दुःखाचा विचार स्वतःप्रमाणेच करू लागतो. असे करणे हीच आत्मज्ञानाची, आत्मनिष्ठेची पराकाष्ठा असते. यातच मनुष्याचे मनुष्यपण व नरदेहाचे सार्थकत्व असते. अशा रीतीने मनुष्य समाजकल्याणाशी, समाजजीवनाशी जोडला जातो. जगात करावयाचे व्यवहार कोणत्या बुद्धीने करावयाचे याचा उलगडा होतो. कर्मयोगशास्त्रातील हा महत्त्वाचा सिद्धांत आहे. कर्मयोगाचे हेच आध्यात्मिक तत्त्व आहे.'

व्यक्तिजीवन व समाजकल्याण यांचे हे पायाभूत तत्त्वज्ञान आहे. त्यांच्यावरच सर्व ऐहिक जीवनाची रचना झाली पाहिजे. अध्यात्माचा पाया असेल, ईश्वरार्पितबुद्धीने कर्म करण्याची बुद्धी व्यक्तिमात्रात असेल, तर समाजजीवनही शुद्ध राहील. म्हणून टिळकांचे म्हणणे असे होते की, पाश्चात्य नीतिशास्त्रापेक्षा भारतीय नीतिशास्त्र श्रेष्ठ आहे.

आध्यात्मिक दृष्टीची महती

व्यक्तिजीवनाचा आध्यात्मिक दृष्ट्या व लोककल्याणाच्या दृष्टीने आदर्श कोणता, त्याचे आचरण कसे असले पाहिजे, याचाही विचार टिळक करीत. माणसाला प्रथम वासना होते. त्यानंतर तो ती साध्य करण्यांसाठी कर्म करतो, असा क्रम असल्यामुळे वासनात्मक बुद्धी प्रथम शुद्ध झाली पाहिजे. ती बुद्धी मोक्षप्राप्तीच्या ध्येयाने प्रभावित झाली तर शुद्ध होते. सर्वांभूती एकच आत्मा आहे हे ओळखण्यास समर्थ होते. अशी वासनात्मक बुद्धी शुद्ध, सम, निर्भय व पवित्र झाली म्हणजे त्याच्या हातून कोणतेही पाप किंवा मोक्षाला प्रतिबंधक असे कर्म घडणेच अशक्य होते. कारण शुद्ध वासनेमुळे होणारे कर्म शुद्धच असले पाहिजे व जे शुद्ध ते मोक्षानुकूल होय. अशा रीतीने पारलौकिक कल्याणाच्या आड न येता संसारात माणसाला कर्म करता येते असाच याचा अर्थ आहे.

म्हणून 'साम्यबुद्धी हे सदवर्तनाचे बीज होय', असे टिळकांनी म्हटले होते. म्हणूनच गीता नुसत्या कर्माचा विचार करता प्रेरक बुद्धीचाच विचार श्रेष्ठ मानते. ही प्रेरक बुद्धी निष्काम व निःसंग असली पाहिजे. अशा बुद्धीने केलेले जे कर्म ते सात्विक व उत्तम होय असे गीता सांगते. पण पूर्ण साम्यबुद्धी हेच जरी सदाचरणाचे बीज असले तरी बुद्धी शुद्ध होईपर्यंत कर्मे करणारांनी वाट पाहिली पाहिजे असे नाही. स्थितप्रज्ञाप्रमाणे समबुद्धी करणे हे परमध्येय आहे परंतु ते सर्व

सिद्ध होईपर्यंत वाट न पहाता शक्य तेवढ्याच निष्कामबुद्धीने प्रत्येक मनुष्याने कर्मे करीत जावी. म्हणजे त्याने बुद्धी अधिकाधिक शुद्ध होत जाऊन अखेर पूर्ण सिद्धी मिळते. पूर्ण सिद्धी मिळाल्याखेरीज कर्मे न करण्याचा आग्रह धरून काल फुकट दवडू नये इत्यादि उपदेश गीतेच्या प्रारंभीच केलेला आहे. (गीता अ. २.४०) हे सांगून टिळकांनी पुढे परोपकाराची चर्चा केली होती.

सर्वभूतांत एकच आत्मा आहे असे मानून प्रत्येक पुरुष जर सदासर्वदा सर्वभूत-हितच करू लागला तर त्याचा स्वतःचा चरितार्थ कसा चालावा? आणि याप्रमाणे त्याचा योगक्षेम चालला नाही तर तो लोकांचे कल्याण तरी कसे करणार? परंतु या शंका अपरिहार्य किंवा नव्याही नाहीत. लोककल्याण करण्याची बुद्धी ज्याला झाली त्याने जेवणखाण सोडून द्यावे असे होत नाही. तरी आपली देहधारणाही लोकोप-योगार्थच करतो अशी त्याची बुद्धी असली पाहिजे. अशी बुद्धी असेल तेव्हाच इंद्रिये ताब्यात राहून लोककल्याण होते, असे जनकाने म्हटले आहे. लोककल्याण करावे हा हेतू मनात ठेवून साधुपुरुष लोककल्याण करीत नसतात. प्रकाश देणे ज्याप्रमाणे सूर्याचा स्वभाव आहे त्याप्रमाणे लोककल्याण करणे हा साधुपुरुषांचा स्वभाव होऊन जातो. या साधुवृत्तीची परोपकारबुद्धी, सर्वभूतांचे आत्मैक्य ध्यानात घेऊन, त्यातून निष्पन्न होणारे सर्वभूतहिताचे आध्यात्मिक तत्त्व स्वार्थ व परमार्थ–मी व लोक वेगळे–समजून पुष्कळांचे पुष्कळ सुख पाहाणाऱ्या आधिभौतिक द्वैतबुद्धीपेक्षा श्रेष्ठ आहे, असे टिळकांनी म्हटले होते.

निष्काम कर्मयोग

व्यक्तिजीवनाच्या दृष्टीने मोक्षानुकूल जीवन कसे जगावे हा महत्त्वाचा प्रश्न असतो. गीतारहस्यातील 'संन्यास व कर्मयोग', 'सिद्धावस्था व व्यवहार' या प्रकरणांत टिळकांनी त्याचे विवेचन केलेले आढळते. कर्मसंन्यास व कर्मयोग यांचा तौलनिक विचार करून त्यांनी जे निष्कर्ष काढले त्याला केवळ व्यक्तिजीवनाच्या दृष्टीने नव्हे तर सामाजिक महत्व आहे. कारण हिंदू मनावर निवृत्तिमार्गाची जी पकड होती ती ढिली करून किंवा नाहीशी करून कर्ममार्गाचा निःसंदिग्ध पुरस्कार त्यात केलेला आढळतो. त्यांचे म्हणणे असे होते की, गीता हे मोक्षदृष्ट्या संसार कसा करावा याचे शास्त्र आहे. संसार सोडून देण्यासाठी गीता सांगितलेली नाही. संसारशास्त्राचा मोक्ष-शास्त्राशी म्हणजे अध्यात्मशास्त्राशी गीतेने उत्तम मेळ घालून दिलेला आहे. हा कसा घातला आहे हे सांगताना त्यांनी म्हटले होते की, "हें जग आम्ही केलेलें नाहीं. म्हणूनं यांतील व्यवहारहि आमचे नसून ईश्वरनिर्मित आहेत असेंच म्हणावें लागतें. हे व्यवहार काम्यबुद्धीनेंहि अभिमानानें किंवा स्वार्थबुद्धीनें केले म्हणजे बंधाला कारणी-भूत होतात. पण उत्कट भगवद्भक्तीवरोवर जगांतील सर्व कामें ईश्वराचींच आहेत

किंवा त्यांतील कांहीं विशिष्ट भाग करण्याकरितांच ईश्वरानें मला जन्म दिला आहे, या भावनेनें आपण जें कांहीं करतो तें परमेश्वरार्पण करून जगाचे सर्व व्यवहार चालविणें हें प्रत्येक मनुष्याचें काम आहे, असा गीतेचा उपदेश आहे. किंबहुना विराटरूपी परमेश्वराची ही एक उपासनाच होते असें म्हटलें तरी चालेल."

कर्मयोगाची व भक्तिमार्गाची सामान्य माणसाच्या दृष्टीने अशी सांगड घालून टिळक सांगत, " भक्ति हें साधन आहे, साध्य नव्हे व सर्व साधनांत हें साधन जरी सुलभ असलें तरी त्यानें निष्काम व सत्‌बुद्धी संपादन करून कर्में सोडावी असें सिद्ध न होतां उलट त्या बुद्धीनें सर्व व्यवहार करीत राहावें, हेंच गीतेचें सांगणें आहे. यानें मोक्षप्राप्ति होते इतकेंच नव्हे त्यानें जगांतील सुस्थितीहि कायम राहाते. यासच ज्ञान-कर्मसमुच्चय पक्ष असें म्हणतात."

सारांश, " ब्रह्मविद्यामूलक भक्ति गीतेंत प्रतिपाद्य आहे, इतकेंच नव्हे तर त्या-बरोबर तितक्याच व योग्यतेचा निष्काम कर्मयोगहि आवश्यक म्हणून प्रतिपादला असल्यामुळें गीता हें ब्रह्मविद्यामूलक भक्तिसहचारी नीतिशास्त्र होय, असें माझें मत आहे," असा अखेरचा निष्कर्ष टिळकांनी काढलेला दिसतो. (केसरी, १५ सप्टेंबर १९१४.)

गीतेतील व्यक्तिजीवनाचे तत्त्वज्ञान टिळकांनी कसे सांगितले, याचा आराखडा समजून घेतल्यानंतर गीतेचा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा विचार टिळकांनी गीता-रहस्यात कसा मांडला आहे हे पहाणे उपयुक्त ठरेल. समाजजीवनाच्या दृष्टीने जे सामाजिक तत्त्वज्ञान सांगितले जाते त्यातील काही महत्त्वाचे विषय गीतारहस्यात विषयाच्या चर्चेच्या ओघात आले आहेत. माणसा-माणसात संबंध कसे असावेत, हा त्यातला एक विषय आहे. तसेच माणूस समाजाशी अनेक प्रकारच्या संबंधांतून जोडला जातो, तेव्हा भारतीय जीवनदृष्टी या संबंधांकडे कशा रीतीने पहाते, हा दुसरा प्रश्न आहे. माणूस कुटुंबाचा घटक असतो तसाच तो समाजाशी, राष्ट्राशी, जगाशी जोडलेला असतो, या संबंधाने स्वत्व काय असते याचाही विचार टिळकांनी केलेला दिसतो. समाजातील ज्ञानी लोकांचे कर्तव्य काय, गीतेतील लोकसंग्रह या संकल्पनेचा अर्थ काय, समाज व्यवहारात अधर्म, अन्याय यांचेविषयी धोरण काय असावे याचाही उहापोह गीतारहस्यात आहे. इतर धर्मांशी कसे वागावे याचीही चर्चा आहे. त्यांच्याच शब्दात हे संकलन केले आहे.

मानव-मानव परस्पर संबंध

भारतीय तत्त्वज्ञानात माणसांचे एकमेकांशी संबंध कसे असावेत याचा विचार केला आहे, त्याचा उल्लेख करून त्या संबंधाचा तात्त्विक आधार टिळकांनी गीता-रहस्यात वर्णिलेला आहे. " समाजांत एका मनुष्यानें पुरुषावरोवर कसें वागावें

याबद्दल साम्यबुद्धीच्या दृष्टीनें आमच्या शास्त्रांतून मूळ नियम सांगितले आहेत त्याचा विचार करूं. 'सर्वभूतस्थमात्मानं सर्व भूतानि च आत्मनि' असा गीतेच्या सहाव्या अध्यायांत (गीता–६.२९) अक्षरशः उल्लेख आहे. 'मी आपल्याशीं जसा वागतो त्याचप्रमाणें इतर भूतांशीं मीं वागलें पाहिजे' असें त्यापासून सहज अनुमान निघतें. म्हणून या आत्मौपम्य दृष्टीनें जो सर्वांशीं वागतो तोच उत्तम कर्मयोगी म्हणावयाचा. सामान्य लोकास नीतीचा व धर्माचा बोध करण्यासाठीं रचलेल्या महाभारतांत हें तत्त्व अनेक ठिकाणीं सांगून व्यासांनीं त्यांतील खोल व व्यापक अर्थ स्पष्ट करून दाखविला आहे. जो पुरुष आपल्याप्रमाणें परक्याला मानितो, ज्यानें क्रोध जिंकला तो परलोकीं सुख मानतो. याप्रमाणे प्रथम सांगून आपल्याला जे प्रतिकूल म्हणजे दुःखकारक वाटतें तसें लोकांबरोबर वर्तन करूं नये हें सर्व धर्मचिं व नीतीचें सार होय, बाकी सर्व व्यवहार लोभमूलक आहेत असें सांगितल्यावर सुख किंवा दुःख, प्रिय किंवा अप्रिय, दान किंवा निषेध या सर्व बाबतींत मनुष्यानें आपल्या आत्म्याला काय वाटेल हे पाहून इतरांबद्दल अनुमान करावें. एक ज्याप्रमाणें दुसऱ्याशीं वागलें त्याप्रमाणें दुसरे त्याजबरोबर वागतात, म्हणून तीच उपमा घेऊन जगांत आत्मौपम्यानें वागणें हा शहाण्यांनीं धर्म म्हटला आहे. तसेंच भीष्मांनीं युधिष्ठिरास धर्मलक्षण सांगतांना त्याहिपेक्षां जास्त खुलासा करून आपल्याबरोबर दुसऱ्यांनीं ज्याप्रमाणें वागूं नये असें आपण इच्छितों त्याप्रमाणें म्हणजे आपलें मन जाणून आपण लोकांबरोबर वागूं नये. स्वतः जिवंत राहावें अशी जो इच्छा करतो तो दुसऱ्यास कसा मारणार? जें जें आपल्याला हवें तें तें परक्यासहि हवें अशी इच्छा ठेवावी. (शांतिपर्व) आपल्या वागणुकीचें हें मुख्य नैतिक तत्त्व होय असें आम्ही प्राचीन काळापासून समजत आलों आहों. हें या सर्व वचनांवरून स्पष्ट दिसून येईल. समाजांत एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याशी कसें वागावें याचा निर्णय करण्यास आत्मौपम्यबुद्धीचें हें सूत्र 'पुष्कळ लोकांचें पुष्कळ हित' या आधिभौतिक तत्त्वापेक्षां अधिक सुदृढ, निःसंदिग्ध, व्यापक, स्वस्थ व अगदीं अडाणी मनुष्याच्याहि लक्षांत भरण्यासारखें आहे."

कुटुंब हा पहिला धडा

या दृष्टीने समाजातील मानव-मानव संबंधाचा तात्त्विक आधार स्पष्ट करून 'गीता रहस्या'त म्हटले आहे, "सर्व भूतांचें ठायीं असलेलें आत्मैक्य ओळखून आत्मवत् समबुद्धीनें दुसऱ्याशीं वागत जा, असा एकदा निर्बंध घालून, दिल्यावर लोकांवर दया कर, त्यांना यथाशक्ति मदत कर, त्यांचें कल्याण कर, त्यांना अभ्युदयाच्या मार्गास लाव, व त्यांच्यावर प्रीति कर, त्यांना कंटाळूं नको, त्यांना दुखवूं नको, त्यांच्याबरोबर न्यायानें व समतेनें वाग, कोणास फसवूं नकोस, कोणाचें द्रव्यहरण अगर हिंसा करूं नकोस अथवा त्याला खोटेंहि सांगूं नको किंवा पुष्कळांचें

पुष्कळ कल्याण करण्याची बुद्धि नित्य मनांत टेव अगर एकाच बापाचीं लेकरें समजून त्यांच्याशी बंधुप्रेमानें वागत जा इत्यादि उपदेश पृथक् पृथक् करण्याची जरूरच राहात नाहीं. संसारांत वागतांना 'आत्मा वै पुत्र नामासी' अथवा 'अर्धं भार्या शरीरस्य' असें समजून आपल्याप्रमाणेच आपल्या स्त्रीपुरुषांवरहि आपण प्रेम केलें पाहिजे या गोष्टीचा अनुभव कुटुंबव्यवस्थेनें त्यास प्राप्त होत असतो. पण कुटुंब हे आत्मौपम्यबुद्धीचा धडा शिकण्याचें पहिलें साधन होय, यांतच सदैव लंपट होऊन न राहातां पुढें मित्र, आप्त, गोत्रज, ग्रामस्थ, ज्ञातिबंधु, धर्मबंधु आणि अखेर सर्व भुतें याप्रमाणें मनुष्यानें आपली आत्मौपम्यबुद्धी जास्त जास्ती व्यापक करून, आपल्या ठिकाणीं आत्मा आहे हें ओळखून अखेर त्याप्रमाणें कर्तव्य करणें ही ज्ञानाची व आश्रमव्यवस्थेची परमावधि किंवा मनुष्यमात्राच्या साध्याची सीमा होय असा आत्मौपम्यबुद्धी-सूत्राचा शेवटचा व व्यापक अर्थ होय. 'लोको वै अयमात्मा' अशी स्वभावतःच असलेली व्याप्ति ओळखून 'उदार चरितानां वसुधैव कुटुंबकम्' थोर लोकांचे पृथ्वी हेंच कुटुंब, या समजुतीप्रमाणें आपले व्यवहार करीत जावें असें अध्यात्मशास्त्राच्या पायावर रचलेलें कर्मयोगशास्त्र सर्वांस सांगत आहे. आणि या बाबतींत आमचें कर्मयोगशास्त्र इतर कोणत्याहि देशांतील प्राचीन, अर्वाचीन कर्मयोग-शास्त्रास हार जाणार नाही. उलट तीं सर्व पोटांत घेऊन दहा अंगुळें शिल्लक राहील, अशी आमची खात्री आहे." अध्यात्मशास्त्राने सामाजिक व्यवहार कसे करता येतात, त्याची नैतिक संकल्पना किती व्यापक आहे हे टिळकांच्या या विवेचनात मांडलेले आढळते.

अन्यायाचा प्रतिकार धर्म्य आहे

पण सामाजिक व्यवहारात प्रश्न असा येत असतो की, हा आदर्शवाद ठीक आहे, तर्कसंगत आहे. पण समाजात असे निःस्वार्थी व आदर्शवादी लोकच व्यवहार करीत नाहीत; स्वार्थी, तत्त्वशून्य लोकांबरोबरही जगात वावरावे लागते. तेच स्वहितासाठी दुसऱ्याच्या हिताचा बळी देतात. वैरबुद्धीने दुसऱ्याशी वागतात, अन्याय करतात. त्यांच्याशी कसे वागावयाचे हा खरा व्यवहारातील प्रश्न आहे. याला उत्तर देताना 'गीतारहस्या'त टिळकांनी म्हटले होते, "'आघाताइतकाच प्रत्याघात' असा जो अचेतन सृष्टींतील कर्माचा न बदलणारा कायदा तसेंच जशास तसें हें त्याचें सचेतन सृष्टींतील रूपांतर आहे. ज्याची सारी बुद्धि साम्यावस्थेस पोहोचलेली नाहीं असे सामान्य लोक या कर्मविपाकाच्या कायद्यांत आपली ममत्व-बुद्धि घालून क्रोधानें किंवा द्वेषानें आघातापेक्षां अधिक प्रत्याघात करून आघाताचा सूड घेत असतात किंवा आपल्या-पेक्षां कोणी दुर्बल असला तर त्याच्या शुष्क किंवा काल्पनिक गुन्ह्यासाठीं प्रतिकार-बुद्धीच्या निमित्तानें त्याला लुबाडून आपला फायदा करून घेण्यास नेहमीं प्रवृत्त

होतात. पण सूड घेण्याची, वैराची, अभिमानाची, क्रोधानें, लोभानें किंवा द्वेषानें दुर्बलांना लुबाडण्याची अगर हेव्यानें प्रौढीचें, शेखीचें, सत्तेचें, शक्तीचें प्रदर्शन करण्याची ही बुद्धि सामान्य लोकांप्रमाणें ज्याच्या मनांत राहिली नाहीं त्यानें आपल्या अंगावर आलेला चेंडू केवळ माघारी फिरविण्यामुळें त्याची शांत, निर्वैर व समबुद्धी न बिघडतां उलट दुष्ट लोकांचें जगांत प्राबल्य माजून गरिबांचा छळ होऊं नये म्हणून असलें प्रत्याघातरूप कर्म करणें हें लोकसंग्रहदृष्ट्या त्याचा धर्म म्हणजे कर्तव्य होय." (गीता : ३–२५) आणि अशा प्रसंगीं समबुद्धीनें केलेलें घोर युद्धहि धर्मांत श्रेयस्कर आहे, हें गीतेंतील सर्व उपदेशाचें सार आहे. सर्वांशीं निर्वैरपणें वागावें, दुष्टाशीं दुष्ट होऊं नये, रागावणाऱ्यावर रागावूं नये ही धर्मतत्त्वें स्थितप्रज्ञ योग्यास मान्य नाहींत असें नाहीं. पण निर्वैर म्हणजे निष्क्रिय किंवा प्रतिकारशून्य हें केवळ संन्यासमार्गांतलें मत खरें न मानतां वैर म्हणजेच मनांतील दुष्टबुद्धि सोडून द्यावी, एवढाच निर्वैर पदाचा अर्थ समजून कर्म ज्या अर्थी कोणासच सुटलें नाहीं त्या अर्थी केवळ लोकसंग्रहार्थ किंवा प्रतिकारार्थ जरूर व शक्य तोवर कर्म दुष्टबुद्धि मनांत न ठेवतां केवळ कर्तव्य म्हणून वैराग्यानें व निःसंगबुद्धीनें केलें पाहिजे असें कर्मयोगाचें सांगणें आहे."

रामायणातील उदाहरण देऊन टिळकांनी लिहिलें होते, "रावणाच्या दुष्ट कृत्याबद्दल निर्वैर व निष्काम रामचंद्रांनीं युद्धात त्याचा वध केल्यावर त्याची उत्तरक्रिया करण्यास बिभीषण जेव्हां कचरूं लागला तेव्हां 'वैर मरणावरोवर संपलें.' आमचें (दुष्टांचा नाश करण्याचें) काम संपलें, आतां हा तुझा भाऊ तसा माझाहि आहे. यासाठीं त्याला अग्निसंस्कार दे.' असे रामचंद्रांनीं बिभीषणास सांगितलें आहे. दुष्ट पुरुषाचा प्रतिकार साधुपणानें करतां येत असेल तर तो साधुपणानेंच करावा. कारण दुसरा मनुष्य दुष्ट झाला म्हणजे तेवढ्यामुळेंच आपणहि त्याच्यावरोवर दुष्ट झालें पाहिजे किंवा एकजण नकटा झाला म्हणजे इतरांनींहि त्यासाठीं आपलीं नाकें कापून घ्यावीं असें नाहीं. किंबहुना हा धर्महि नव्हे. पण असल्या साधुपणानें दुष्टाचें निवारण होत नसेल तर 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायानें पोटिसानें बाहेर न पडणारा काटा अखेर साध्या किंवा लोखंडी काट्यानेंच म्हणजे सुईनेंच बाहेर काढणें जरूर आहे."

मानवी संस्थांविषयीचा दृष्टीकोण

सामाजिक संबंधांचा विचार करताना आधुनिक काळात स्वतःचा, समाज, देश, जग यांचा अभिमान ही सध्याच्या जगात अपरिहार्य भावना असते, त्या भावनेचा तात्त्विक विचारही टिळकांनी केलेला होता. "सर्व मानवजातीचें हित डोळ्यांसमोर ठेवलें तरी कुलाभिमान, देशाभिमान या पुढच्या पायऱ्यांची दखल घ्यावीच लागते." असे सांगून टिळकांनी म्हटलें होते, "सर्व मानवजातीचें किंबहुना प्राणिमात्राचें ज्यानें हित होईल तोच धर्म हा जरी अखेरचा सिद्धान्त आहे, तरी परमावधीची ही स्थिति

प्राप्त होण्यास कुलाभिमान, धर्माभिमान, देशाभिमान या चढत्या पायऱ्या असल्यामुळें त्यांची आवश्यकता केव्हांहि नाहींशी होत नाही. निर्गुणब्रह्मप्राप्त्यर्थ ज्याप्रमाणें सगुणोपासना अवश्य, त्याप्रमाणें 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी बुद्धि होण्यास कुलाभिमान, जात्यभिमान, धर्माभिमान, देशाभिमान इत्यादि सरणी अवश्य आहे; आणि समाजांतील प्रत्येक पिढी याच जिन्यानें वर चढत असल्यामुळें हा जिना नेहमींच कायम राखावा लागतो. त्याचप्रमाणें आपल्या भोवतालचे लोक किंवा राष्ट्रें खालच्या पायरीवर असतां एखादा पुरुष किंवा राष्ट्र आपण एकाकीच जर सदैव वरच्या पायरीवर राहूं म्हणेल तर तें देखील सिद्धीस जाणें शक्य नाहीं. कारण, परस्पर व्यवहारांत 'जशास तसें' या न्यायानें वरच्या वरच्या मजल्यावरील लोकांस खालच्या खालच्या मजल्यावरील लोकांच्या अन्यायाचा प्रतिकार करणें प्रसंगविशेषीं जरूर पडतें, हें वर सांगितलेंच आहे. जगांतील सर्व मनुष्यांची स्थिति सुधारतां सुधारतां केव्हां तरी सर्वभूतात्मैक्य ओळखण्यापर्यंत त्यांची मजल येईल यांत शंका नाहीं; निदान तशी स्थिति मनुष्यमात्रास प्राप्त करून देण्याची आशा बाळगणें तरी अयुक्त नव्हे. परंतु आत्मोन्नतीची ही परमावधीची स्थिति जोपर्यंत सर्वांस प्राप्त झाली नाही, तोपर्यंत इतर राष्ट्रें किंवा समाज यांची स्थिति लक्षांत आणून साधुपुरुषांनीं आपआपल्या समाजांस तत्तत्कालीं श्रेयस्कर होईल असा देशाभिमानादि धर्मच त्यांस उपदेशिला पाहिजे, असें न्यायतःच सिद्ध होतें. शिवाय दुसरें असेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, घराचे वरवरचे मजले बांधून तयार केले तरी खालचे मजले ज्याप्रमाणें काढून टाकितां येत नाहींत, किंवा तरवार हातांत पडली म्हणजे कुदळीची, अगर सूर्य असला तरी अग्नीची जरूर ज्याप्रमाणें नाहींशी होत नाहीं, तद्वत् सर्वभूतहिताच्या शेवटच्या पायरीवर पोंचलें तरी देशाभिमानाची नव्हे तर कुलाभिमानाचीहि आवश्यकता नाहींशी होत नाहीं. कारण, समाजसुधारणेच्या दृष्टीनें पाहिलें तर कुलाभिमान जें विशिष्ट काम करितो तें केवळ देशाभिमानानें होत नाही, आणि देशाभिमानाचें कार्य निव्वळ सर्वभूतात्मैक्य-दृष्टीनें सिद्ध होत नाहीं. अर्थात् समाजाच्या पूर्णावस्थेंत सुद्धां साम्य-बुद्धीप्रमाणेंच देशाभिमान व कुलाभिमान इत्यादि धर्मांचीहि नेहमींच जरूर रहाते. पण केवळ आपल्या देशाचा अभिमान हेंच परम साध्य मानिल्यावर एक राष्ट्र आपल्या फायद्यासाठीं दुसऱ्या राष्ट्रांचें कितीहि नुकसान करण्यास जसें तयार होतें, तसा प्रकार सर्वभूतहित हें परमसाध्य मानिल्यानें होत नाही. कुलाभिमान व अखेर सर्व मानवज्ञातींचें हित यांमध्यें वर विरोध येऊं लागला तर खालच्या प्रतीचे धर्म वरच्या वरच्या पायरीच्या धर्मांसाठी सोडून द्यावे, असें साम्य-बुद्धीनें परिपूत झालेल्या नीति-धर्मांचें महत्त्वाचें व विशेष सांगणें आहे. (गीतारहस्य : सिद्धावस्था व व्यवहार.)

सर्वधर्मसमभाव

गीतेतील समदर्शीवृत्तीने इतर धर्मांकडे, उपासनापंथांकडे पाहिले पाहिजे असेही टिळकांनी म्हटले होते. देशाभिमानाला जसे त्यांनी आध्यात्मिक अधिष्ठान दिले तसेच सर्वधर्मसमभावालाही दिले होते. टिळक म्हणत, "देव भावाचा भुकेला– भक्तीचा नव्हे, असे तुकोबांनीं म्हटले आहे. 'मी ज्याची उपासना करतो तेंच ईश्वरस्वरूप किंवा प्रतीक खरें असून इतर खोटीं' हा दुराग्रह न धरतां कोणाचें प्रतीक कसेंहि असो, तद्द्वारा परमेश्वराचें भजन करणारे एका परमेश्वरालाच पोहोचतात अशी उदारबुद्धि उत्पन्न होते. 'एकं सद् विप्राः बहुधा वदन्ति' या वेदवचनाचें तात्पर्यहि तेंच आहे. यावरून हें तत्त्व वैदिक धर्मांत फार प्राचीन काळापासून चालत आलेलें आहे असें सिद्ध होतें. आणि अलिकडे झालेल्या श्री शिवाजी महाराजांसारख्या वैदिकधर्मीय कर्त्या पुरुषाच्याहि अंगांत त्याच्या परमउत्कर्षाच्या वेळीं परधर्म असहिष्णुता हा दोष आढळून येत नव्हता हें या तत्त्वाचेंच फल होय. 'अविभक्तं विभक्तेषु' या सात्त्विक जनदृष्टीनें सर्व धर्मांतील ऐक्य ओळखून, भक्तिमार्गांतील खोट्या वंडाचा समूळ बीमोड करणारे धर्मगुरू प्रथम कोठें उदयास आले असतील याचा शोध घेऊ लागल्यास आमच्या भरतभूमीस अग्रस्थान दिलें पाहिजे असें म्हणणें भाग पडतें." (गीतारहस्य : भक्तिमार्ग.)

ज्ञानी पुरुषाचा खरा धर्म

सर्वाभूतीं निर्वैर व सम असलेली आपली बुद्धी झाली तरी ज्ञानी माणसाने कर्मसंन्यास न पत्करता, अज्ञानी लोकास न कंटाळता, त्याची बुद्धी न बिघडविता देशकालपरिस्थितीप्रमाणे त्यांना जे योग्य त्याचा उपदेश केला पाहिजे. व स्वतःच्या आचरणाने त्यांना धडा घालून दिला पाहिजे. वेळोवेळी परमेश्वर पृथ्वीवर अवतार घेऊन हेच करीत असतो. ज्ञानी पुरुषाने तोच कित्ता गिरवून आपले कर्तव्य निष्कामबुद्धीने नेहेमी करीत राहिले पाहिजे. किंबहुना त्यात मरण आले तरी ते आनंदाने पत्करले पाहिजे. आपले कर्तव्य म्हणजे धर्म सोडू नये यालाच लोकसंग्रह किंवा खरा कर्मयोग म्हणतात, असा सर्व गीताशास्त्राचा निष्कर्ष टिळकांनी काढला होता.

लोकसंग्रहाचा तत्त्वविचार

लोकसंग्रह या संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण गीतारहस्यातील 'संन्यास व कर्मयोग' या प्रकरणात करताना टिळकांनी म्हटले होते, "लोकसंग्रह म्हणजे 'मनुष्यांचा नुसता जमाव करणे' किंवा 'स्वतःचा कर्म सोडिण्याचा अधिकार असतांहि अडाणी लोकांनी कर्में सोडू नयेत म्हणून त्यांना गोड वाटण्यासाठीं त्यांच्याप्रमाणे वागण्याचें सोंग करणें' असा अर्थ

महाविद्यालय
220

नव्हे. कारण, लोकांनीं अडाणी रहावें किंवा त्यांना अडाणी ठेवण्यासाठीं ज्ञानी पुरुषानें कर्में करण्याचें ढोंग करावें हें शिकविण्याचा गीतेचा हेतु नाही. ढोंग तर दूरच राहिलें, पण 'लोक तुझी अपकीर्ति गातील' (गी. २.३४) इत्यादि सामान्य जनांस पटणाऱ्या युक्तिवादानें जेव्हा अर्जुनाचें समाधान होईना तेव्हां त्यापेक्षां वजनदार व तत्त्वज्ञान-दृष्ट्या बलवत्तर कारणें भगवान् आतां सांगत आहेत. म्हणून 'संग्रह' या शब्दाचे गोळा करून ठेवणें, राखणें, पाळणें, नियमन करणें. वगैरे जे अर्थ कोशांतून दिलेले आहेत ते सर्व यथासंभव येथें घ्यावे लागतात, व तसें केलें म्हणजे लोकांचा संग्रह करणें म्हणजे 'त्यांस एकत्र संबद्ध करून त्यांच्या परस्परानुकृत्यानें जें सामर्थ्य उत्पन्न होतें तें त्यांच्या अंगीं येईल अशा रीतीनें त्यांचें पालन, पोषण किंवा नियमन करणें, आणि तद्द्वारा त्यांची सुस्थिति. कायम ठेवून पुढें त्यांस श्रेयःप्राप्तीच्या मार्गास लावणें,' असा अर्थ होतो. 'राष्ट्राचा संग्रह' हे शब्द याच अर्थी मनुस्मृतींत आलेले असून (मनु. ७.११४), शांकरभाष्यांत 'लोकसंग्रह=लोकस्योन्मार्गप्रवृत्तिनिवारणं' अशी या शब्दाची व्याख्या केलेली आहे; व त्यावरून अज्ञानानें सैरावैरा होऊन वागत असणाऱ्या लोकांस शहाणे करून सुस्थितींत एकत्र ठेवणें आणि आत्मोन्नतीच्या मार्गास लावणें, असा संग्रह शब्दाचा आम्ही जो अर्थ करितों तो अपूर्व किंवा निराधार नाहीं असें दिसून येईल. संग्रह शब्दाचा हा अर्थ झाला. पण 'लोकसंग्रह' यांतला 'लोक' हा शब्द केवळ मनुष्यवाची नाहीं, हेंहि येथें सांगितलें पाहिजे. जगांतील इतर प्राण्यांपेक्षा मनुष्य श्रेष्ठ असल्यामुळें मानवजातीच्या कल्याणाचाच मुख्यत्वेंकरून 'लोकसंग्रह' या शब्दांत समावेश होतो हें खरें. तरी भूलोक, सत्यलोक, पितृलोक, देवलोक इत्यादि जे अनेक लोक म्हणजे जगें भगवंतांनीं निर्माण केलीं आहेत, त्यांचेंहि नीट धारणपोषण होऊन तीं सर्व चांगल्या रीतीनें चालू रहावीं अशी भगवंताचीच इच्छा असल्यामुळें, मनुष्यलोकावरोबरच या सर्व लोकांचे व्यवहारहि सुस्थितीनें चालावे (लोकानां संग्रहः), एवढा व्यापक अर्थ 'लोकसंग्रह' पदानें या ठिकाणीं विवक्षित आहे, असें म्हणावें लागतें."

"शांतिपर्वांत भीष्मांनी युधिष्ठिरास सांगितलें आहे, लोकसंग्रह म्हणजे उगाच कांहीं तरी थोतांड किंवा लोकांना अज्ञानांत ठेवण्याची युक्ति नसून, ज्ञानयुक्त कर्म जगांतून नाहींसें झाल्यास जगाचा नाश होण्याचा संभव असतो म्हणून ब्रह्मदेवानें निर्मिलेल्या साधुपुरुषांच्या कर्तव्यांपैकीं हें एक मुख्य कर्तव्य आहे, असें यावरून सिद्ध होतें; व 'मीं हें काम न केलें तर हे सर्व लोक म्हणजे जगें उद्ध्वस्त होतील' (गी. ३.२४) या भगवद्वचनाचा भावार्थहि तोच आहे. ज्ञानी पुरुष हे लोकांचे डोळे होत; आणि ते जर आपलें काम सोडितील तर जग आंधळें होऊन लोकांचा सर्वतोपरी नाश झाल्याखेरीज रहाणार नाहीं. ज्ञानी पुरुषांनींच लोकांना ज्ञानी करून उन्नतीस आणिलें पाहिजे. पण हें काम नुसत्या तोंडपाटीलकीनें, केवळ उपदेशानें कधींहि सिद्धीस जात

नाहीं. कारण ज्या लोकांना सदाचरणाची संवय नसून ज्यांची बुद्धीहि पूर्ण शुद्ध झालेली नसते त्यांना नुसतें कोरडें ब्रह्मज्ञान सांगितलें तर 'तुझें तें माझें आणि माझें तें माझेंच' अशा रीतीनें त्याच ज्ञानाचे ते दुरुपयोग करितात, असें व्यवहारांत नेहमीं आढळून येतें, शिवाय एखाद्याच्या उपदेशाच्या खरेपणाची परीक्षाहि लोक त्याच्या आचरणावरूनच करीत असतात. म्हणून ज्ञानी मनुष्य स्वतः कर्म न करील तर सामान्य लोकांस आळशी बनण्यास ती एक सबब होते. यासच 'बुद्धिभेद' असें म्हणतात; व हा बुद्धिभेद न होतां लोक खरोखर निष्काम होऊन कर्तव्यास जागृत व्हावें म्हणून ज्ञानी पुरुषानें संसारांत राहूनच आपल्या कर्मांनीं लोकांस सदाचरणाचा म्हणजे निष्काम बुद्धीनें कर्म करण्याचा प्रत्यक्ष धडा घालून देणे हें त्यांचें कर्तव्य (ढोंग नव्हे) बनून जातें. म्हणूनच कर्म सोडण्याचा अधिकार त्याला केव्हांहि प्राप्त होत नसून स्वतःसाठी नको तर लोकसंग्रहार्थ चातुर्वर्ण्याचीं सर्व कर्में यथाधिकार त्यानें केलींच पाहिजेत असें गीतेचें म्हणणें आहे. पण ज्ञानी पुरुषानें चातुर्वर्ण्याची कर्में निष्काम बुद्धीनेंहि करणें अवश्य नाहीं किंवहुना करूं नयेत, असें संन्यासमार्गीयांचें मत असल्यामुळें, ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रहार्थ कर्में करावीं या गीतेच्या सिद्धांताचें संन्यास-मार्गीय टीकाकारांनीं कांहीं तरी गुळखोवरें करून खुद्द भगवानहि प्रत्यक्ष नाहीं तर पर्यायानें ढोंगाचा उपदेश करितात असें म्हणण्यास ते तयार झाल्यासारखे आहेत! पण गीतेंतील लोकसंग्रह शब्दाचा हा मिळमिळीत अर्थ खरा नव्हे, असें पूर्वापार संदर्भावरून उघड होतें. ज्ञानी पुरुषास कर्में सोडण्याचा अधिकार प्राप्त होतो हें मतच आधीं गीतेस मान्य नाहीं; व तें कां मान्य नाहीं हें दाखविण्यास गीतेंत जीं कारणें दिलीं आहेत त्यांपैकीं लोकसंग्रह हें एक मुख्य कारण आहे. म्हणून ज्ञानी पुरुषास कर्में सुटतात हें प्रथम गृहीत धरून लोकसंग्रह पदाचा ढोंगपर अर्थ करणें सर्वथैव अन्याय्य होय. मनुष्य या जगांत केवळ आपल्या स्वतःसाठींच जन्मला नाहीं. अजाणतेपणानें सामान्य लोक स्वार्थांतच गुंतलेले असतात हें खरें, पण 'सर्वभूत-स्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि' (गीता ६.२९.) मी सर्व भूतांत आणि सर्व भूतें माझ्या ठायीं–अशा रीतीनें सर्व जगच ज्याला आत्मभूत झालें त्यानें 'मला मोक्ष मिळाला, आतां लोक दुःखी असले तरी मला त्याची काळजी कशाला?' असें म्हणणें म्हणजे स्वमुखानेंच आपल्या ज्ञानाला कमीपणा आणण्यासारखें होय. ज्ञानी पुरुषाचा आत्मा म्हणून कांही स्वतंत्र व्यक्ति आहे काय? त्याच्या आत्म्यावर जोंपर्यंत अज्ञानाचें पांघरूण होतें तोंपर्यंत 'मी' व 'लोक' हा भेद कायम होता. पण ज्ञानप्राप्तीनंतर सर्व लोकांचा आत्मा हाच त्याचा आत्मा होतो. म्हणून योगवासिष्ठांत वसिष्ठांनीं रामास असें सांगितलें आहे कीं—

यावल्लोकपरामर्शो निरूढो नास्ति योगिनः।
तावदरूढसमाधित्वं न भवत्येव निर्मलम्॥

"जोंपर्यंत लोकांचा परामर्श घेण्याचें (अर्थात् लोकसंग्रहाचें) काम थोडें तरी शिल्लक आहे, संपलें नाहीं, तोंपर्यंत योगारूढ झालेल्या पुरुषाची स्थिति निर्दोष आहे, असें कधींच म्हणतां येत नाहीं" (यो. ६ पृ. १२८. ९७.) त्यानें केवळ आपल्याच समाधिसुखांत गढून जाणें म्हणजे एक प्रकारें आपला स्वार्थ पहाण्यासारखें होय. संन्यासमार्गीय लोक या गोष्टीकडे दुर्लक्ष करितात, हाच त्यांच्या युक्तिवादांतील मुख्य दोष आहे. भगवानापेक्षां कोणीहि अधिक ज्ञानी, अधिक निष्काम किंवा अधिक योगारूढ असणें शक्य नाही. पण भगवान् देखील 'साधूंचें संरक्षण, दुष्टांचा नाश व धर्मसंस्थापन' हीं लोकसंग्रहाचीं कामें करण्यासाठींच जर वेळोवेळीं अवतार घेतात (गीता ४·८.) तर ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रह करण्याचें सोडून देऊन 'ज्या परमेश्वरानें हे सर्व लोक उत्पन्न केले आहेत तो त्यांचें पाहिजे तसें धारणपोषण करील, तिकडे पहाणें हें माझें काम नव्हे,' असें म्हणत बसणें सर्वथैव अनुचित होय. कारण ज्ञानोत्तर परमेश्वर, मी व लोक हा भेदच रहात नाहीं; व राहील तर तो ज्ञानी नव्हे, ढोंगी म्हटला पाहिजे. ज्ञानानें ज्ञानी पुरुष जर परमेश्वररूपी होतो तर परमेश्वर जें काम करितो तें परमेश्वराप्रमाणें म्हणजे निःसंग बुद्धीनें करण्याची आवश्यकता ज्ञानी पुरुषास तरी कशी सुटणार?" (गीता ३. २२ व ४. १४ व १५.)

ज्ञानी पुरुष समाजाचे गुरू

"ज्ञानी माणसानें केवळ आपल्याच समाधिसुखांत गढून जाणें म्हणजे एकप्रकारें आपला स्वार्थ पहाण्यासारखें आहे. संन्यासमार्गीय लोक याकडे दुर्लक्ष करतात हाच त्यांच्या युक्तिवादांतील दोष आहे. परमेश्वरापेक्षां कोणीहि अधिक ज्ञानी असूं शकत नाहीं. पण तोहि साधूंचें संरक्षण, दुष्टांचा नाश व धर्मसंस्थापन हीं लोकसंग्रहाचीं कामें करण्यासाठीं अवतार घेतो. तेव्हां ज्ञानी पुरुषानें लोकसंग्रहाचें काम सोडून देणें योग्य नाहीं. ज्ञानोत्तर परमेश्वर, मी व लोक हा भेदच राहात नाहीं." पाश्चात्त्य देशांत लोकसंग्रह हे महत्त्वाचे शास्त्र होऊन बनले आहे, असे सांगून गीतेतील चातुर्वर्ण्यव्यवस्थेप्रमाणे प्राप्त झालेली आपली कर्मे निष्कामबुद्धीने कशी करावी याचा लोकांना प्रत्यक्ष धडा घालून देणे असा लोकसंग्रह या गीतेतील पदाचा टिळकांनी अर्थ लावला होता. ज्ञानी पुरुष हे समाजाचे केवळ डोळेच नाहीत तर गुरू आहेत असा टिळकांचा निष्कर्ष होता.

आपल्या काळी जी समाजव्यवस्था असेल त्यात काही काही उणेपणा वा दोष असल्यास तो देशकालानुरूप काढून टाकून समाजाची भरणपोषणाची शक्ती फुटू न देता तीच वाढत्या पंथास लागेल असे उद्योग करणे हे मग अर्थातच प्राप्त होते. अशा प्रकारचा लोकसंग्रह जनक राजाने केला. संन्यास न घेता तो आमरण राज्य करीत राहिला. स्वतःच्या आत्म्याचे जे कल्याण त्यातच समष्टिरूप आत्म्याच्या

कल्याणार्थ यथाशक्ती झटणे याचा समावेश होत असल्यामुळे लोकसंग्रह करणे हेच ब्रह्मात्मैक्यज्ञानाचे खरे पर्यवसान होय, असे त्यापुढे गीतेचे विशेष सांगणे आहे.

ज्ञान व निष्काम कर्म

ज्ञानी पुरुषाने 'मी लोकसंग्रह करीन' अशी अभिमानाची अगर फलाशेची बुद्धी ठेवता कामा नये. लोकसंग्रह करावयाचा तोही कर्तव्यबुद्धीने केला पाहिजे. लोकसंग्रह हे महत्त्वाचे कर्तव्य खरे, पण तेही अनासक्तीने केले पाहिजे. ज्ञानाच्या व फलाच्या अपेक्षेने केलेल्या कर्माचा विरोध असतो. ज्ञान व निष्काम कर्म यांच्यात अध्यात्मदृष्ट्या विरोध नसून यावद्जीव निःसंगबुद्धीने लोकसंग्रहाची कामे ज्ञानी पुरुषाने करीत राहिले पाहिजे. कर्तृत्व व ब्रह्मज्ञान यांची जोडच सर्वात उत्तम आणि नुसते कर्तृत्व किंवा नुसते ब्रह्मज्ञान ही प्रत्येकी एकदेशीय होत असा गीतेचा अखेरचा सिद्धांत आहे, असे टिळक म्हणत. ज्ञानयुक्त निष्काम कर्मे करण्याच्या मार्गास निवृत्ति किंवा निवृत्त कर्म असे नाव न देता कर्मयोग हे नाव देणे उत्तम होय, हा टिळकांचा अखेरचा निष्कर्ष होता.

कर्मयोग शास्त्र व नीतिशास्त्र

कर्मयोगाची महती वर्णन करून व त्यामागचा तत्त्वविचार सांगून टिळकांनी त्याची नीतिशास्त्र म्हणून चिकित्सा केली. म्हणून गीतेतील कर्मयोगाला 'कर्मयोगशास्त्र' असे नाव देणे उचित ठरेल, असे उपसंहारात टिळकांनी मांडले. भारताला समाजव्यवहाराचे नीतिशास्त्रच नाही, मोक्षाच्या गहन विचारात गढून गेल्यामुळे नीतिधर्माच्या तत्त्वांचे विवेचन करण्यास आमचे पूर्वसुरी विसरले, असा आक्षेप होता. पाश्चात्य विचारवंत सदाचार, कर्तव्य, समाजधारणा, सद्वर्तन आदि विषयांचा स्वतंत्रपणे लौकिकदृष्ट्या विचार करतात आणि ते विचार वाचल्यावर आपल्या लोकांना वाटू लागते की आपल्याला नीतिशास्त्र नाही. 'गीतारहस्या'चा हेतू लोकांची समजूत बदलून गीतेतील तत्त्वज्ञानाचा नीतिशास्त्राच्या अनुबंधात विचार करणे हाच होता.

मानवजातीची पूर्णावस्था

गीता व महाभारत यात कर्मयोगाची मांडणी केलेली आहे. महाभारतात जीवनातील समस्यांचा रूपकात्मक विचार केला आहे असे मानले तर चुकीचे ठरणार नाही.

"अध्यात्मशास्त्राचें काम एवढ्यानेंच संपतें असें नाहीं. जगाच्या बुडाशीं असणाऱ्या अमृतत्त्वाच्या नित्य उपासनेनें आणि अपरोक्षानुभवानें मनुष्याच्या आत्म्याला एक प्रकारची विशिष्ट शांति मिळून त्यामुळें मनुष्याच्या शीलांत किंवा स्वभावांत जो फरक होतो तोच सदाचरणाचें मूळ असल्यामुळें, मानव-जातीची पूर्ण अवस्था कशांत आहे या प्रश्नाचाहि अध्यात्मशास्त्रानें जसा निर्णय होतो, तसा केवळ आधिभौतिक

सुखवादानें होत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण, केवळ विषयसुख हें पशूंचें साध्य असून ज्ञानवान् मनुष्याच्या बुद्धीचें त्यानें कधींच पूर्ण समाधान होणें शक्य नाहीं, व सुखदुःखें अनित्य असून धर्म नित्य आहे, हें पूर्वीच सविस्तर प्रतिपादन केलें आहे. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे गीतेंतील पारलौकिक धर्म आणि नीतिधर्म मिळून दोन्हीहि जगांतील नित्य व अमृतत्वाच्या आधारें प्रतिपादिलेले असल्यामुळें परमावधीचा हा गीता-धर्म, मनुष्य हें एक केवळ उच्च प्रतीचें जनावर आहे अशा दृष्टीनें मानवी कृत्यांचा विचार करणाऱ्या नुसत्या आधिभौतिक ज्ञानास कधींहि हार न जाणारा अतएव नित्य व अभय झाला आहे, व हिंदु लोकांस या बाबतींत दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथाकडे, धर्माकडे किंवा मताकडे पहाण्याची अपेक्षा भगवंतांनीं ठेविलेली नाहीं, असे दिसून येईल, किंबहुना सर्व ब्रह्मज्ञानाचें निरूपण केल्यावर 'अभयं वै प्राप्तोऽसि'–आतां तूं अभय झालास–(बृ. ४.२.४.) असें याज्ञवल्क्यानें जें जनक-राजास सांगितलें आहे तेंच या गीता-धर्माच्या ज्ञानासहि अनेकार्थी अक्षरशः लागू पडतें असें म्हटलें तरी चालेल."

"अशा रीतीनें सर्वतोंपरी निर्भय व व्यापक असून, सम म्हणजे वर्णाचा जे ज्ञातीचा, देशाचा किंवा दुसरा कोणताच भेद न ठेवितां सर्वांस एकाच मापानें एकच सद्गति देणारा, व इतर धर्मांवद्दल योग्य सहिष्णुता दाखविणारा, ज्ञान–भक्ति–कर्मयुक्त गीता-धर्म सनातन वैदिक धर्मवृक्षाचें अत्यंत मधुर व अमृत फल आहे. वैदिक धर्मांत प्रारंभी द्रव्यमय किंवा पशुमय यज्ञांचें म्हणजे नुसत्या कर्मकांडाचेंच अधिक माहात्म्य होतें. पण पुढें उपनिषदांतील ज्ञानानें हा केवळ कर्मकांडपर श्रौत–धर्म गौण ठर-विल्यावर त्यातच सांख्यशास्त्राचाहि प्रादुर्भाव झाला. पण हें ज्ञान सामान्य जनांस अगम्य असून त्याचा ओढाहि कर्म–संन्यासाकडे विशेष असल्यामुळें सर्वसामान्य लोकांचें केवळ औपनिषदिक धर्मानें किंवा दोहोंच्या स्मार्त एकवाक्यतेनें सुद्धां पूर्ण समाधान होणें शक्य नव्हतें. यासाठीं उपनिषदांतील केवळ बुद्धिगम्य ब्रह्मज्ञानास प्रेमगम्य व्यक्त उपासनेच्या राजगुह्याची जोड देऊन, कर्मकांडाच्या प्राचीन परंपरे-प्रमाणें 'तुम्ही आपआपल्या योग्यतेनुरूप आपआपलीं सांसारिक कर्तव्यें लोकसंग्रहार्थ निष्काम बुद्धीनें, आत्मौपम्य–दृष्टीनें व उत्साहानें यावज्जीव करीत राहून तद्द्वारां पिंडब्रह्मांडांत सर्वांभूतीं एकत्वानें भरलेल्या नित्य परमात्मदेवतेचें नेहमीं यजन करा, त्यांतच तुमचें पारलौकिक व ऐहिक कल्याण आहे," असे अर्जुनास निमित्त करून सर्वांसच गीता-धर्म कंठरवानें सांगत आहे; व त्यामुळें कर्म, बुद्धी (ज्ञान) आणि प्रेम (भक्ति) या तिहींमधील विरोध नाहींसा होऊन सर्व आयुष्यच यज्ञमय करण्यास सांगणाऱ्या एका गीताधर्मांत सकल वैदिक धर्मांचें सार आलें आहे. (गीतारहस्य : उपसंहार.)

अध्यात्मशास्त्राची बुद्धिनिष्ठ चिकित्सा

टिळकांच्या काळात पाश्यात्य विचारांचा भारतीय संस्कृतीशी जो संपर्क आला त्यामुळे भारतीय विचारवंत अंतर्मुख होऊन स्वतःच्या सामाजिक संस्थांची कठोर चिकित्सा करू लागले. पश्चिमीकरणाची एक सामाजिक प्रक्रिया त्यातून सुरू झाली. आधिभौतिक दृष्टीतून समाजाचा विचार सुरू झाला. टिळकांनी भारतीय अध्यात्मशास्त्राची बुद्धिनिष्ठ चिकित्सा करून भारतीय तत्वज्ञानाची वेदांतील जीवनदृष्टीची महती सांगण्यासाठी 'गीतारहस्य' लिहिले. उपसंहारात त्यांनी म्हटले, " आधिभौतिक शास्त्रांची वाढ कितीहि झाली तरी जगाचें मूलतत्व समजून घेण्याची मनुष्यमात्राची जी स्वाभाविक प्रवृत्ति तिचें नुसत्या आधिभौतिक वादानें पूर्ण समाधान होणें शक्यच नाहीं. जगाच्या बुडाशी असणारें अव्यक्त तत्त्व नित्य, एक, स्वतंत्र व आत्मरूपी आहे यापेक्षां जास्त कांही सांगता येत नाहीं असा आमच्या उपनिषत्कारांचा सिद्धांत असून या सिद्धांताच्या पलिकडे मनुष्याच्या ज्ञानाची कधी गति जाईल की नाहीं याची वानवाच आहे. तेव्हां अध्यात्मशास्त्रांतील भारतीय तत्त्वज्ञानांत असलेलीं मूलतत्त्वें हीं सनातन आहेत, असें असलें तरी दृश्य सृष्टींतील हजारों व्यवहार कोणत्या पद्धतीनें चालवावे हें नीट समजण्यास दृश्य सृष्टीच्या ज्ञानाची नेहमीं आवश्यकता लागणार आणि हा व्यवहार अधिकाधिक कौशल्यानें करतां येण्यास नामरूपात्मक आधिभौतिक शास्त्राचेंच जास्त अध्ययन केलें पाहिजे, यावद्दल शंका नाहीं."

जगाच्या बुडाशी असणाऱ्या अमूर्त तत्त्वाच्या नित्य उपासनेने आणि अपरोक्षानुभवाने मनुष्याच्या आत्म्यास एक प्रकारची विशिष्ट शांती मिळून त्यामुळे मनुष्याच्या शीलात किंवा स्वभावात जो फरक पडतो, तोच सदाचरणाचे मूळ असल्यामुळे मानवजातीची पूर्ण अवस्था कशात आहे, या प्रश्नाचाही अध्यात्मशास्त्राने जसा निर्णय होतो तसा केवळ आधिभौतिक सुखवादाने होत नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे, असा टिळकांचा अभ्यासपूर्ण निष्कर्ष होता.

अध्यात्माची बैठक असलेले विज्ञान राष्ट्राने जोपासले पाहिजे, तरच जगातील स्पर्धेत कोणतेही राष्ट्र टिकेल, असे टिळकांनी सांगितले होते. जशास तसे या न्यायाने जे प्राचीन राष्ट्र आधिभौतिक ज्ञान संपादन करून घेणार नाही, त्याचा सुधारलेल्या नवीन पाश्चिमात्य राष्ट्रापुढे टिकाव लागणे अशक्य होय, हे निर्विवाद आहे, असे त्यांनी गीतारहस्यात स्पष्टपणे सांगून ठेवले आहे.

गीताधर्माला शरण जा

सारांश, टिळकांनी भारताच्या अंतर्मुख अध्यात्मवादाची पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाशी तुलना करून त्याच्यावर आधारलेले भारताचे नीतिशास्त्र श्रेष्ठ आहे, असा निष्कर्ष

काढला. हे व्यवहारशास्त्र आहे असे त्यांचे म्हणणे होते. राष्ट्रजीवन सुखी, निरामय व्हावयाचे असेल तर कर्तव्यबुद्धीने स्वधर्माचरण करून प्रत्येक व्यक्तीने देशसेवा केली पाहिजे. देशभक्ती हे परोपकाराचे लहान माप आहे असा त्यांचा सिद्धांत होता. तेव्हा वेदांती समदर्शित्व अंगी बाणून, स्वतःच्या वर्तनाने इतरांना धडा घालून देण्यासाठी लोकसंग्रह करून भारतातील ज्ञानी लोकांनी आपले कर्तव्य केले पाहिजे, हा गीताधर्म टिळकांनी पुरस्कारला होता.

समाजाच्या कल्याणात स्वतःचे कल्याण पहाण्याचा हा त्यांचा संदेश आहे. केवळ विषयसुख हे पशूंचे साध्य असून मनुष्य हे केवळ उच्च प्रतीचे जनावर आहे अशा दृष्टीने विचार करणाऱ्या आधिभौतिक दृष्टीचा कधीही स्वीकार न करता समदर्शी, भेदभावरहित, इतर धर्मांबद्दल सहिष्णू असणाऱ्या ज्ञानभक्तिकर्मयुक्त गीताधर्मासच सर्वांनी शरण जावे, त्यातच सकल वैदिक धर्माचे सार आले आहे, असा टिळकांचा दिव्य संदेश आहे. यात टिळकविचारांचे सार आहे. हेच टिळकांनी सांगितलेले लोकव्यवहाराचे भारतीय तत्त्वज्ञान आहे.

१२

राष्ट्रसंजीवक विचारसंपदा

टिळकविचार हा भारताच्या राष्ट्रीय अभ्युदयाचा, उत्थानाचा विचार आहे. टिळकांचे वर्णन त्यांच्या मृत्यूनंतर लंडनच्या मँचेस्टर गार्डियनने 'भारतीय राष्ट्रवादाचे निरूपक' (Exponent) असे केले होते. स्वराज्यासाठी त्यांनी केलेला लढा हा राष्ट्राच्या पुनरुत्थानाचा एक भाग होता. टिळकांनी विचारप्रतिपादन करावयास सुरुवात केल्याला आता १०० वर्षे झाली आहेत. अशा वेळी केवळ 'स्वराज्याचे उद्गाते लोकमान्य' हे त्यांचे मूल्यमापन फार सीमित आहे. आता त्यांचे भारतीय इतिहासातील स्थान आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचे संजीवक, निर्माते वा शिल्पकार म्हणून केले गेले पाहिजे. टिळक हे राष्ट्रीय भावनांचे, राष्ट्रीय उत्थानाचे, भारताच्या राष्ट्रीयत्वाचेच प्रतीक झाले होते. ब्रिटिश राज्यामुळे भारताच्या जनतेत आलेला न्यूनगंड, गुलामी वृत्ती, मरगळ, असहायता व सांस्कृतिक भग्नता नाहीशी करणारा राष्ट्रवादी विचारांचा भाष्यकार म्हणूनच त्यांचे वर्णन करणे योग्य आहे. राष्ट्राच्या आयुष्यात असा जो कालखंड असतो, त्यात जे विचारमंथन होते त्यात भावी पिढ्यांच्या आशा-आकांक्षा तर प्रतिबिंबित झालेल्या असतातच, पण त्याच्या जीवन-तत्त्वज्ञानाची बीजेही असतात. हा बीजविचार पुनः पुन्हा सांगावा लागतो—तपासावा लागतो. एकोणिसाव्या शतकात भारताच्या आधुनिक प्रबोधनात निर्माण झालेल्या विचारसंप्रदायांचा, विचार-पीठांचा, मतप्रवाहांचा आता या दृष्टीने अभ्यास व्हावयास हवा आहे. असे पाहिले तर दादाभाई नौरोजी, राजा राममोहन राय, स्वामी दयानंद, न्या. रानडे, लोकमान्य टिळक आदी सर्वांचे विचार महत्त्वाचे आहेत. राष्ट्राचा इतिहास हा नुसता सामाजिक

राजकीय चळवळींचा किंवा त्या करणाऱ्या व्यक्तींचा इतिहास नसतो, तर तो विचारांचाही एक इतिहास असतो. या दृष्टीने भारताच्या राष्ट्रीय विचारांच्या इतिहासात टिळकविचाराला एक युगप्रवर्तक स्थान आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकमान्यांच्या वैचारिक कार्याचे वर्णन करताना म्हटले होते, " टिळकांची विद्वत्ता चतुरस्र व अष्टपैलू असून तिच्यात सूक्ष्म विवेचन व व्यापक समालोचन करणारी तर्कशक्ती, चमत्कृतिजनक प्रतिभा आणि क्रांतदर्शी प्रज्ञा यांचा उत्कृष्ट मिलाफ झालेला होता. प्राचीन व अर्वाचीन विविध विद्यांच्या ज्ञानगंगेत सतत अवगाहन करून स्वात्मा त्यांनी पावन केला होता. चारही वेद, सहा वेदांगे आणि वेदान्त या भारतीय विद्या त्यांनी ज्याप्रमाणे करतलामलकवत् स्वाधीन केल्या होत्या त्याप्रमाणे खगोलविषयक गणित, ज्योतिष, तुलनात्मक पुराण, मानवजातिशास्त्र, मानवेतिहास, कायदा, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान या पाश्चात्य विद्यांचे त्यांनी व्यापक परिशीलन केले होते. त्यांनी आपल्या प्रतिभेचा, तर्कशास्त्राचा, आणि विद्वत्तेचा फार महत्त्वाचे संशोधन करण्यासाठी उपयोग केला. त्यांचे संशोधन हे रुळलेल्या व गतानुगतिक मार्गाने जाणारे नव्हते. जेथे मार्गच सापडत नाहीत, वाटा पडलेल्या नाहीत, जेथे अडचणींचे निबिड अरण्य आहे, जेथे अनपेक्षित संकटे, धोके अनुल्लंघन, अडथळे आडवे उभे राहिले आहेत, त्यामुळे मागे फिरणेच प्राप्त आहे अशा विचार्य विषयांत शोध घेण्याकरता शर्थीने त्यांनी परिश्रम केले. राजकारणात जसे ते एकाकी महासाहसास प्रवृत्त झाले तसे ते ऐतिहासिक संशोधन क्षेत्रातही तितक्याच हिरीरीने व एकाकीपणे साहसास प्रवृत्त झाले. त्यांच्या पांडित्याची स्वतःच्या जीवनविषयक ध्येयांशी सांगड जमली होती. किंबहुना त्यांच्या गंभीर, ध्येयवादी प्रेरणाच त्यांच्या वैचारिक वा ऐतिहासिक संशोधनास मार्गदर्शक बनल्या होत्या. ते राष्ट्रीय भावनांचे, राष्ट्रीय उत्थानाचे आणि साक्षात राष्ट्रीयत्वाचे द्रष्टे व स्पष्टे होते. भारतीय राष्ट्रीयत्वाचा, राष्ट्रीय उच्च अहंतेचा, विस्तृत, गंभीर व बलिष्ठ पाया रचण्याकरिता त्यांनी ऐतिहासिक व वैचारिक क्षेत्रात संशोधन केले. त्यांनी वेदांचा अभ्यास करून भारतीय आर्यांच्या अतिप्राचीन किंवा इतिहासपूर्वकालीन सामाजिक जीवनाचा आरंभबिंदू ठरविण्याकरता फार परिश्रम घेतले. त्याकरिता विस्तृत भूप्रदेशाचा व मानवजातीच्या दीर्घकालीन इतिहासाचा चित्रपट कालाच्या खोल अंतरंगात शिरून विद्येच्या सहाय्याने त्यांनी तपासला. टिळकांच्या विद्वत्तेची, चिरंतन विशाल व विमल यशोध्वजा म्हणजे गीतारहस्य होय. भारतीयांच्या पारमार्थिक, धार्मिक वा नैतिक विचारांची दिशाच 'गीतारहस्यात' वदलून टाकली आहे. बुद्ध, शंकराचार्य व मध्ययुगीन संत यांनी येथील माणसास निवृत्तिवाद शिकवून या ऐहिक जीवनाबद्दल उदासीन बनविणारा दृष्टिकोण दिला. अनेक सहस्र वर्षांच्या विचारसरणीची बैठकच रहस्याने वदलून टाकली. ऐहिक जीवन व मोक्ष, अध्यात्मविद्या व भौतिक विद्या,

परमार्थ व येथील जीवनाचे साफल्य, अभ्युदय व निःश्रेयस यांची संगती घालून दिली, विसंगती घालविली. समाजधारणेची कर्तव्ये पार पाडीत असताच ईश्वरी साक्षात्कार किंवा ब्राह्मसमाधी अनुभवता येते असे दिव्य आश्वासन टिळकांच्या कर्मयोगशास्त्राने भारतीयांस दिले आहे." (आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून झालेले भाषण, २४ जुलै १९५६.)

टिळकांच्या वैचारिक कार्याचें हे उत्कृष्ट शब्दचित्र आहे. यावरून टिळकांच्या विचारांचे परिशीलन व मीमांसा किती विविध अंगांनी व किती विविध क्षेत्रांत व्हावयास हवी आहे याची कल्पना येण्यासारखी आहे. अनेक क्षेत्रांत टिळकविचार हा बीजविचार होता व राहाणार आहे. नव्या संशोधकांनी त्याचा शोध घेऊन तो लोकांपुढे मांडला पाहिजे.

राष्ट्रजीवनाचा नवा प्रवास

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला तेव्हा इतिहासात प्रथमच एकछत्री राजकीय शासन असलेले, भारतीय समाज म्हणून स्वतःचा सर्वांगीण विचार करणारे भारतीय राष्ट्र जन्मास आले आहे. त्याचा नवा प्रवास सुरू झाला आहे. टिळकांनी त्यापूर्वीच सांगितले की हे राष्ट्र प्राचीन आहे, त्याला स्वतःचे भवितव्य घडविण्याचा, अभ्युदय करण्याचा, त्यावेळच्या आदर्शाप्रमाणे उद्योगप्रधान, आधुनिक समृद्ध राष्ट्र म्हणून जगापुढे येण्याचा अधिकार आहे. त्यांची जीवनदृष्टी वेदांती, आध्यात्मिक असेल. त्यातील नेतृत्व समदर्शी वृत्तीमुळे 'बुडत हे जन देखवे न डोळां' याप्रमाणे करुणामय असेल पण कर्मवादी असेल. वैयक्तिक मोक्षसाधनेत गर्क न होता, समाजाला कर्तव्यतत्पर करण्यासाठी ज्ञानी लोक निष्काम लोकसेवेच्या प्रेरणेने सेवारत राहातील. देश व देव हे दोन मानणार नाहीत. समाजातील तळाच्या लोकांशी एकरूप होतील. लोक व लोकमत ही राजकीय संस्कृतीची प्राणतत्त्वे असतील व मातृभूमीच्या भक्तीच्या बंधाने एकात्म झालेले, सर्व धर्मांशी वेदांती समवृत्तीने वागणाऱ्या भारतीय जनतेचे हे भारत राष्ट्र होईल. स्वतंत्र भारताचे टिळकांचे हे भव्य स्वप्न होते. तेच उत्कटतेने त्यांनी मनात आयुष्यभर बाळगले. स्वतंत्र भारताने आपला राष्ट्रीय जीवनाचा प्रवास सुरू करताना आपल्या राज्यघटनेत जे स्वप्न पाहिले, जी मूलभूत तत्त्वे व सिद्धांत समाविष्ट केले त्या सर्वांची बीजे टिळकांच्या राजकीय विचारात सापडतात. पण टिळक वारंवार सांगत त्याप्रमाणे राष्ट्रीयत्वामध्ये जोम हवा असतो. तो असल्याखेरीज राष्ट्र प्रगती करू शकत नाही. जपान, जर्मनी, इंग्लंड आणि आता रशिया, अमेरिका, चीन या सर्व आधुनिक राष्ट्रांत हा राष्ट्रीयत्वाचा जोम आहे. तो जोम त्यांच्या राष्ट्रीय व्यक्तित्वाचा, त्यामुळे येणाऱ्या अहंतेचा असतो. टिळक हे या राष्ट्रीय अहंतेचे मूर्तिमंत प्रतीक होते.

'लोक' कल्पनेचा वारसा

आपण पाहिले त्याप्रमाणे टिळक हे भारतातील लोकयुगाचे निर्माते होते. 'लोक' ही राजकीय संकल्पना टिळकांनीच भारतीय राजकारणात प्रथम आणली. तिला गीतेतील तत्त्वज्ञानाची जोड दिली हे टिळकांचे कार्य आहे. तेव्हा 'लोक' ही कल्पना भारतीय जीवनात केवळ राजकीय राहिलेली नाही. तिला टिळकांनी आध्यात्मिक रूप दिले आहे. म्हणून 'गीतारहस्य' त्यांनी जनतेच्या आत्म्याला अर्पण केले. या कल्पनेशी जवळीक असलेली व ते प्रतिबिंबित करणारी वृत्तपत्रे, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, लोकसभा, विधानसभा या सर्व लोकशाही संस्थांना आधारघटकाचे स्थान टिळकांनी मिळवून दिले. या सर्व संस्थांबाबत तडजोड होऊ शकत नाही. तसेच झाले तर लोकशाही पंगुवत् होईल. म्हणून टिळकांचे लोकप्रेम हे त्यांच्या स्वातंत्र्य-प्रेमाइतकेच मूलभूत आहे. हा टिळकविचाराचा अत्यंत महत्त्वाचा वारसा आहे. तो अनंत पिढ्यांना जपावा लागणार आहे.

देशभक्ती आणि वेदांत

टिळकांनी 'लोक' या संकल्पनेला जसे आध्यात्मिक अधिष्ठान दिले तसेच देशभक्तीचा विचारही ते वेदांती दृष्टीतून करीत होते. 'वेदांत हे परोपकाराचे मोठे माप व देशाभिमान हे धाकटे माप' हे टिळकांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. त्याचे अधिक स्पष्टीकरण करताना टिळक म्हणाले होते, "वेदांताचे ध्येय वरचे असले तरी त्यांतच राष्ट्रीयत्वाच्या खालच्या ध्येयाचा अंतर्भाव अपरिहार्यतेनें होतो, त्या दोहोंचा विरोध नाहीं. हजारामध्ये पाचशे ही संख्या येतेच येते. त्याप्रमाणें एकांत दुसऱ्याचा अंतर्भाव होतो. दोन्हीं एकमेकाशीं जुळतीं आहेत. व दोहोंसाठीं एकप्रकारचा स्वार्थत्याग व आत्मसंयम लागतो. त्याखेरीज ज्या भावनेमुळें मनुष्य व्यक्तिस्वार्थाशीं बिलकुल संबंध नसल्लेया गोष्टीसाठीं झटतो व व्यक्तिस्वार्थाला गौणत्व देतो ती भावनादेखील दोन्ही ध्येयांना आवश्यकच आहे. मनुष्यजातीवर दया व परमेश्वरापुढें सर्व मानव एक आहेत ही बुद्धि या स्वरूपानें ही परोपकारी भावना वेदांती राष्ट्रीय अशा जीवितध्येयांना व्यापून जाते" ('लोकमान्यांची भाषाशैली' या ग. वि. केतकरांच्या पुस्तकातून उद्‌धृत.) 'गीतारहस्या'त याची अधिक चर्चा टिळकांनी केली होती. समान आत्मिक वृत्तीचा पहिला घडा माणसाला स्वतःच्या कुटुंबात मिळतो. त्यातून समाज, राष्ट्र व नंतर जग अशा पायरीपर्यंत ही वृत्ती वाढत जाते हा सिद्धांत टिळकांनी मांडला होता. मानवी समाजसंस्थेकडे पहाण्याचा हा आध्यात्मिक दृष्टकोण आहे. टिळक त्याचेही निरूपण करणारे विचारवंत होते.

लोकसंग्रहाचा सामाजिक अर्थ

टिळकांच्या जीवनाचा, विचाराचा व कार्याचा उगम गीतेत होता. गीता हे त्यांचे निःश्वसित होते. त्यांनी जी लोकसेवा केली, तिचा उगम 'ज्ञानी लोक हे समाजाचे डोळे आहेत, ते जर काम करणार नाहींत तर समाज आंधळ्यासारखा वागेल' ह्या त्यांच्या लोकसंग्रहविषयक जाणिवेत आहे. लोकसंग्रह करून त्यांचे प्रबोधन व उद्‌बोधन करणे, त्यांना धैर्य देणे, मार्गदर्शन करणे, कर्मप्रवण करणे हे ज्ञानी जनांचे कार्य आहे ही टिळकांची श्रद्धा होती. म्हणून तेच त्यांचे जीवनकार्य झाले. लोकसंग्रहाची ही सामाजिक मीमांसा हा टिळकांचा वैचारिक वारसा आहे. निष्काम कर्म करून, फलनिरपेक्ष सेवा करून बुद्धिमंतांनी हा वारसा सदैव चालविला पाहिजे, इतका मोलाचा आहे.

लोकसामर्थ्याची उपासना

टिळकांची लोकसंग्रहाची संकल्पना, लोकमताचा त्यांचा आग्रह याप्रमाणेच लोकशक्तीवरचा टिळकांचा विश्वास हाही त्यांच्या तत्त्वविचाराचा गाभा आहे. 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' ही त्यावेळाची उपहासात्मक उपाधी हे त्यांचे बिरुद झाले. याचे कारण सामान्य माणसाच्या सामर्थ्यावरचा विश्वास व सामान्यजनांची निर्णय-क्षमता, हाच लोकशाहीचा आधार असतो. "सामर्थ्य आहे चळवळीचें जो जो करील तयाचें, परंतु तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे." या रामदासांच्या सामाजिक सिद्धांतांची प्रत्यक्ष प्रचीती टिळकांनी आपल्या आयुष्यात या देशाला आणून दिली. त्यांच्या सगळ्या राजकीय मोहिमा, स्वराज्य-संकल्पनेसाठी केलेला प्रचार ही त्याची उत्तम उदाहरणे होती. लोकसामर्थ्याचा किंवा लोकगंगेचा उपासक व लोकसामर्थ्याचा संघटक म्हणून टिळकांनी व्यक्त केलेले विचार हे त्यांच्या राजकीय विचाराचा सनातन अंश आहे.


व्यक्तिहित व समाजहित

समष्टीच्या आत्म्यात व्यक्तीचा आत्मा असतो हे व्यक्ती व राष्ट्र किंवा समाज यांचे आध्यात्मिक नाते टिळकांनी सांगितले. निष्काम कर्मयोगाचा पुरस्कार केला. समाजासाठी कार्य करणे हीच ईश्वरसेवा आहे, इथपर्यंत टिळकांनी ही समाजसेवेची कल्पना नेऊन भिडवली होती. निःस्वार्थी देशसेवेचा उत्तम आदर्श टिळकांनी स्वतःच्या उदाहरणाने घालून दिला, इतकेच नव्हे तर त्यांनी केलेल्या संघर्षाची प्रेरणा 'मामनुस्मर युद्ध्य च' या कृष्णवचनात होती. समाजसेवेचे हे तत्त्वज्ञान हे अस्सल भारतीय तत्त्व-ज्ञान आहे. व्यक्ती व समाज यांचे हे आध्यात्मिक संबंध टिळकविचाराचा वारसा आहे.

सारांश, टिळकांच्या सर्व सामाजिक वेदांताची बैठक मानवाला प्रेरित करणाऱ्या कर्मप्रवण अध्यात्माची आहे. आपल्याला योजून दिलेले कर्म निष्काम रीतीने ईश्वरार्पित भावाने करीत राहणे हे टिळकांच्या कर्मयोगाचे रहस्य आहे. मानवी प्रयत्नांनीच इतिहास घडत असतो. इतिहासाचा कर्ता करविता मानवच आहे, हा दिव्य संदेश टिळकांच्या या कर्मयोगात आहे. टिळकांनी स्वतः म्हटल्याप्रमाणे 'आकाश कोसळून पडलें तर मी त्याच्यावर उभा राहीन' इतकी जिद्द, हिंमत त्यांच्यात होती. १९०८ साली राजद्रोहाच्या खटल्याच्या वेळी टिळकांनी काढलेले उद्‌गार 'मी गुन्हेगार नाहीं. लौकिक गोष्टींचें नियंत्रण करणारी अशी एक शक्ति या न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच असेल कीं मला शिक्षा व्हावी आणि मीं अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी." हे टिळकांच्या निर्भयतेचे प्रतीक तर होतेच पण स्वतःच्या ईश्वरार्पित कर्मावरचा, कृतीवरचा अपूर्व विश्वास व्यक्त करणारेही ते उद्‌गार होते. मानवी कर्तृत्वावरची, ईश्वरार्पित कर्मावरची टिळकांची श्रद्धा टिळकांच्या कर्मप्रवण अध्यात्मविचारातून आलेली होती. हीही टिळकविचाराचीच आधुनिक भारताला देणगी आहे.

कालगती ओळखणारी, कालप्रभावी ठरलेली, पांडित्य, संशोधनवृत्ती, चिकित्सा व बौद्धिक साहस व तर्कनिष्ठा यांच्या संगमामुळे अपूर्व ठरणारी टिळकांची विचारसंपदा ही भारताची फार मोठी ठेव आहे. खरे म्हटले तर ही ठेव साऱ्या मानवजातीसाठीच आहे. पुढच्या विचारवंतांनी व अभ्यासकांनी ती जपली पाहिजे. समाजाने व्यवहारात वापरली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
2000
दा. क्र. 23252
निबंध
2004
शाखा



REFBK-0023252